Trusted Since 1949

महालक्ष्मी रिटकवली

रुचकर स्वादिष्ट खमंग

75 वर्षांची रिटकवली शेवचिवड्याची रुचकर परंपरा १९४९ • २०२४



चव जी सांगते वारसा परंपरेचा...

साहित्य रसिकांसाठी स्वादाचा विराम
रिटकवली स्पेशल शेवचिवडा.

३रे अ.भा. मराठी साहित्य संमेलन, सातारा. १९०५

स्थापना महालक्ष्मी स्पेशल शेवचिवडा, रिटकवली. १९४९

४४वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन, सातारा. १९६२

६६वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन, सातारा. १९९३

५० वर्ष महालक्ष्मी स्पेशल शेवचिवडा, रिटकवली. १९९९

७५ वर्ष महालक्ष्मी स्पेशल शेवचिवडा, रिटकवली. २०२४

९९वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन, सातारा. २०२६

प्रोपा. शामराव रामचंद्र मर्ढेकर
मु. रिटकवली, पो. बिभवी, ता. जावली, जि. सातारा
संपर्क:- 9860114633 | 02378 295438

ritkawali_shevchivada
www.ritkawlichiwada.com

अटकेपार - २०२६

महाराष्ट्र साहित्य परिषद

मावळा फौंडेशन सातारा

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा - शाहूपुरी, सातारा आणि मावळा फौंडेशन, सातारा आयोजित
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०२६ सातारा

अटकेपार

मराठ्यांची शान अटकेपार निशाण

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन
सर्व साहित्यप्रेमीं रसिकांचे मनःपूर्वक स्वागत !

आस्वाद साहित्याचा...
स्वाद मानसचा!



मानस® सातारा | bananaa leaf The South Indian Restaurant | श्रीरस्वागर™ सातारी कंदी पेढे | Rivers & Oceans™ SEA FOOD RESTO

MANAS FAMILY RESTO, SATARA Satara Thoseghar Road, Just 1 K.M. from Satara City. Jakatwadi, Satara. | Contact: 9867 65 7171 , 136, Kesarkar Peth, Satara. | Contact: 9004 527171 , NH 4. Vadhe Phata, Satara. | Contact: 7796 679323 , NH 4, Opp. DSK Toyota, Varye. Satara. | Contact: 8308 14 9494, **SURUR** NH 4, Pune-Kolhapur Highway, Surur, Satara. | Contact: 9049 08 9494 **PUNE** Near Balgandharava Rangamandir, JM Road, Pune. | Contact: 9049 14 7171
BANANAA LEAF NH4, Wadhe Phata, Satara. | 7263 88 9494, NH4, Surur, Satara. | 8308 14 9494
KSHIRSAGAR PEDHA MALL Manas, Wadhe Phata, Satara. | 8675 94 9494, NH4, Wadhe Phata, Satara. | 7887 65 9494, NH4, Varye, Satara. | 7447 39 9494, NH4, Surur, Satara. | 7507 32 9494
RIVERS AND OCEANS SEA FOOD RESTO, NH4, Wadhe Phata, Satara. | 9709 09 7171

CONTACT: 98 2324 9323

सारस्वत बँक | सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...





स्वागताध्यक्षांचे मनोगत

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा शाहूपुरी, सातारा आणि मावळा फौंडेशन सातारा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे होत आहे आणि या ऐतिहासिक संमेलनाचे स्वागताध्यक्षपद मला सांभाळायला मिळाले आहे. याचा मला निश्चितच खूप आनंद आहे. यापूर्वी सातारा येथे झालेल्या ६६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष माझे पूज्य पिताश्री श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले ऊर्फ भाऊसाहेब महाराज हे होते. त्यांचा तोच साहित्यिक वारसा पुढे नेताना मला मनापासून आनंद होत आहे. सातारा ही लढाऊ भूमी असली तरी याच भूमीमध्ये साहित्य आणि इतर सांस्कृतिक बीजांची चांगली पेरणी झाली आहे. येथील लेखक, कलाकार आणि साहित्यिकांनी राज्यात, देशात आणि देशाबाहेरही नाव कमावले आहे. समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये सातारचे नाव आघाडीवर असताना साहित्य क्षेत्रामध्येसुद्धा सातारचा दबदबा निर्माण झालेला पाहून आनंद वाटतो. या संमेलनाच्या निमित्ताने आपण 'अटकेपार' ही विशेष स्मरणिका प्रसिद्ध करत आहोत. सातारा जिल्ह्यातील विविध साहित्यिक घडामोडींचा आणि सातारा जिल्ह्याच्या देदीप्यमान इतिहासाचा आढावा या स्मरणिकेत घेण्यात आला आहेच. शिवाय मराठी साहित्यातील विविध विषयांवरही या स्मरणिकेमध्ये चर्चा करण्यात आली आहे. ही स्मरणिका संग्राह्य असून एक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून काम करेल याचा विश्वास वाटतो. सातारा जिल्ह्यातील माध्यम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या अनेक प्रमुखांनी सहकार्याच्या भावनेतून एकत्र येऊन ही स्मरणिका प्रत्यक्षात आणली आहे, ही जास्त आनंदाची बाब आहे. या निमित्ताने साताराच्या या संमेलनाने एक नवीन धडाही घालून दिला आहे. साहित्य रसिकांनी या स्मरणिकेचा आनंद घ्यावा, असे आवाहन मी या निमित्ताने करत आहे.

आपला,

श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले

स्वागताध्यक्ष

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा.

आमचे प्रेरणास्थान, स्फूर्तिस्थान



मा. श्री. छ. अभयसिंहराजे भोसले

स्वागताध्यक्ष, ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

संपादकीय मंडळ

विनोद कुलकर्णी
मुख्य संपादक

मुकुंद फडके
व्यवस्थापकीय संपादक

डॉ. उमेश करंबेळकर
कार्यकारी संपादक

नंदकुमार सावंत
कोषाध्यक्ष

संपादकीय सल्लागार

हरीश पाटणे
श्रीकांत कात्रे
रविंद्र बेडकिहाळ
ज्योत्स्ना कोल्हटकर
विश्वास पवार
राजेश सोळसकर
हणमंत पाटील
गजानन चेणगे
डॉ. देवानंद सोनटक्के
डॉ. वैभव ढमाळ
सुनील शेडगे

प्रकाशक
नंदकुमार सावंत
मुखपृष्ठ, सजावट व मांडणी
संजय घाटगे
मुद्रितशोधन
आरती देवगांवकर
सविता कारंजकर
वैदेही कुलकर्णी
मुद्रक
सिद्धी विनायक ऑफसेट प्रिंटर्स

अटकेपार स्मरणिकेतील सर्व लेख
मजकूर व छायाचित्रे यांच्या
पुनर्मुद्रणाचा सर्वाधिकार मावळा,
फौंडेशन, सातारा.
यांच्याकडे आहेत.

* या स्मरणिकेतील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते लेखकांची वैयक्तीक असून संपादकीय मंडळ त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.

* या स्मरणिकेतील काही छायाचित्रे आंतरजालावरुन घेण्यात आली आहेत.



संपादकीय मनोगत



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा शाहूपुरी, सातारा आणि मावळा फौंडेशन सातारा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे होत आहे. यानिमित्ताने 'अटकेपार' ही विशेष स्मरणिका प्रकाशित करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. मराठा साम्राज्याची राजधानी असलेल्या सातारच्या गादीने मराठा साम्राज्याचे प्रतिनिधित्व करताना अटकेपार झेंडा फडकवला होता. त्याची आठवण ठेवूनच या स्मरणिकेला 'अटकेपार' असे सार्थ नाव देण्यात आले आहे. ही स्मरणिका तीन विभागांमध्ये विभागली असून पहिल्या भागामध्ये सातारा जिल्ह्याविषयी सर्व लेख आहेत. दुसरा विभाग हा मराठी साहित्य आणि लेखनविषयक घडामोडींचा असून त्यात मराठी साहित्यातील विविध प्रवाहांचा मागोवा घेण्यात आला आहे. तिसऱ्या विभागामध्ये काही साहित्यविषयक परिसंवादांचे आयोजन केले असून त्यामध्ये विविध विषयांवर मान्यवर लेखकांनी आपली मते व्यक्त केली आहेत. सातारा शहर आणि जिल्हा वैशिष्ट्यपूर्ण, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रदेश असल्याने जिल्ह्याची सर्वांगाने थोडक्यात माहिती देणाऱ्या काही फूटनोट्स नोंद म्हणून प्रत्येक पानावर देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सातारा जिल्ह्याची थोडक्यात ओळख या निमित्ताने होणार आहे. या स्मरणिकेच्या नियोजनापासून अखेरपर्यंत साताऱ्यातील सर्व माध्यमातील प्रतिनिधी, लेखक, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते अशा अनेकांचा हातभार ही स्मरणिका तयार करण्यासाठी लागला आहे, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. या स्मरणिकेच्या निमित्ताने सातारच्या देदीप्यमान इतिहासाला स्पर्श करतानाच मराठी साहित्यातील आधुनिक प्रवाहाचाही वेध घेण्यात आला असल्याने आगामी कालावधीसाठी एक किमती दस्तऐवज म्हणून ही स्मरणिका नावारूपाला येईल, याची खात्री वाटते.

आपले

विनोद कुलकर्णी
मुख्य संपादक व कार्याध्यक्ष
९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

मुकुंद फडके
व्यवस्थापकीय संपादक

आमचे मार्गदर्शक, पाठीराखे



मा. ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले

स्वागताध्यक्ष, ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

संमेलनाच्या स्वप्नपूर्तीचे शिल्पकार



विनोद कुलकर्णी

कार्याध्यक्ष,

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य : शुभेच्छा संदेश

मा. ना. देवेंद्र फडणवीस



सत्यमेव जयते

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./१२५९/२०२५
दि. ०९ डिसेंबर, २०२५

शुभेच्छा

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणजे अभिजात मराठीचा अक्षर सोहळा. मराठी माणसाचा अभिमान असणारे हे संमेलन शतक महोत्सवाकडे वाटचाल करत आहे. यातील ९९ वे संमेलन स्वराज्याची राजधानी सातारा येथे, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज थोरले यांच्या कर्तृत्व भूमीत होत आहे, याचा विशेष आनंद आहे. या संमेलनाच्या निमित्ताने 'अटकेपार' स्मरणिका प्रकाशित केली जात असल्याची बाब समाधानाची आहे.

युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापनेतून महाराष्ट्र धर्म जागृत केला. त्यातून भाषिक आणि सांस्कृतिक गुलामगिरी मोडून काढली. त्यासाठी मराठीतील परकीय शब्दांना पर्यायी शब्द शोधण्यासाठी स्वतंत्र भाषा विभाग सुरू केला. पुढे आपल्या संत साहित्याने मराठी भाषा प्रवाहित ठेवली. अभंग, ओव्यांनी मराठी रोजच्या जगण्याशी जोडली. अशा मराठी भाषेचा हा अक्षर सोहळा गेली कित्येक वर्षे सातत्यपूर्णरित्या, चोखंदळ वाचकांच्या पाठिंब्यावर वर्षानुवर्षे सुरू राहिला आहे. यात अभिजात मराठी भाषेला ज्ञान आणि रंजनाची भाषा करण्याचे मोठे कार्य आपल्या कवि-लेखकांनी साहित्यकृतींच्या माध्यमातून केले आहे. मराठीत अनेक साहित्य चळवळीचा उगम झाला. त्या पुढे प्रवाहित झाल्या. या प्रवाहांच्या काठावर अनेक कलाकृती निर्माण झाल्या. अंतिमतः मराठी या एकाच सरितेच्या या उपनद्या असून त्यातून मराठी माणूस समृद्ध झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात न्या. महादेव गोविंद रानडे यांच्यासारख्या द्रष्ट्या समाजसुधारकाच्या पुढाकारातून सुरू झालेली अक्षर चळवळ आता शतक महोत्सवाच्या उंबरठ्यावर पोहचली आहे. या दरम्यानच्या वाटचालीत कृष्णशास्त्री राजवाडे, हरिनारायण आपटे, न.चि. केळकर, माधव श्रीहरी अणे, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, वि. स. खांडेकर, आचार्य प्र. के. अत्रे यांच्यापासून पु. ल. देशपांडे, वसंत आबाजी डहाके, जयंत नारळीकर, रवींद्र शोभणे, प्रा. डॉ. तारा भवाळकर ते ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील या सर्वांनीच मराठी भाषेचे दालन समृद्ध केले आहे.

शिवछत्रपतींच्या मराठा साम्राज्याने छत्रपती शाहू महाराज थोरले यांच्या नेतृत्वाखाली अटकेपार झेंडा रोवला. त्यावेळी मराठा साम्राज्याची राजधानी साताराच होती. त्यामुळे या स्मरणिकेचे अटकेपार नावही समर्पक आहे. आता आपल्या संमेलनांनी देखील मराठीचा लौकिक सातासमुद्रापार पोहचविला आहे. त्यादृष्टीने ही स्मरणिका साहित्यिक ठेवा ठरेल, या विश्वासासह स्मरणिकेच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा! स्मरणिकेच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा, सातारा आणि मावळा फाउंडेशन अभिनंदन!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य : शुभेच्छा संदेश

मा. ना. एकनाथ शिंदे



सत्यमेव जयते

एकनाथ संभाजी शिंदे
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

18 NOV 2025

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

शुभेच्छा

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त 'अटकेपार' स्मरणिका प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला. या स्मरणिकेच्या प्रकाशनास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

या संमेलनाचे 'अटकेपार' हे मध्यवर्ती साहित्यिक सूत्र निश्चित करण्यात आले आहे. या संकल्पनेतून व्यक्त होणारा सामाजिक बांधिलकीचा आणि दूरदृष्टीचा विचार निश्चितच समाजात एक सकारात्मक ऊर्जा निर्माण करेल.

माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेंहि पैजासी जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। या संत ज्ञानेश्वरांच्या ओळी मराठी भाषेचे वैभव व्यक्त करतात. अनेक थोर लेखक, साहित्यिक यांच्या विचारांनी निर्माण झालेले साहित्य आपला अनमोल ठेवा आहे. मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी आणि संवर्धनासाठी कार्य करण्याच्या उद्देशाने आपले महामंडळ स्थापन झाले आहे. या कार्यामुळे मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत सहज पोहोचण्यास नक्कीच मदत होईल. महामंडळाचे सुरु असलेले कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे.

मराठी साहित्य, संस्कृतीची ओळख करुन घेण्यासाठी व यावर चर्चा करण्यासाठी हे साहित्य संमेलन एक सुवर्ण व्यासपीठ ठरेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही आपणा सगळ्यांसाठी अभिमानाची बाब आहे. मराठी भाषेसाठी आगामी काळात जे जे करण्यासारखे असेल ते प्रामुख्याने आणि प्राथमिकतेने केले जाईल.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुढील वाटचालीस व साहित्य संमेलनास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

(एकनाथ संभाजी शिंदे)

कार्यालय : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, **दूरध्वनी** : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, **संकेत स्थळ** : www.maharashtra.gov.in

उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य : शुभेच्छा संदेश

मा. ना. अजितदादा पवार



उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

दि. २१ नोव्हेंबर २०२५

शुभेच्छा

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेची शाहूपुरी (सातारा) शाखा व मावळा फौंडेशन, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन स्वराज्याची राजधानी असणाऱ्या ऐतिहासिक सातारा नगरीत ज्येष्ठ साहित्यिक श्री. विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित होत असल्याचे समजून आनंद झाला.

मराठी साहित्य संमेलन म्हणजे मराठी भाषा, संस्कृती आणि अस्मितेचा उत्सव होय. हे संमेलन म्हणजे विचारांचे, अनुभूतींचे, सर्जनशीलतेचे आणि संवादाचे अधिष्ठान, मराठी साहित्यप्रेमींना आवडत्या लेखक-कवींशी प्रत्यक्ष भेटण्याची, संवाद साधण्याची, विचारांची देवाणघेवाण करण्याची ही एक सुवर्णसंधी असते. साहित्य संमेलन हे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक चळवळींना दिशा देणारे दीपस्तंभ म्हणून कार्यरत राहिले आहे.

सातारा ही युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी. या भूमीवर मराठी भाषेचा, संस्कृतीचा आणि स्वाभिमानाचा संगम आहे. त्यामुळे ९९ वे साहित्य संमेलन या भूमीवर होणे, ही एक ऐतिहासिक बाब आहे. स्वराज्याच्या या पवित्र भूमीत मराठी साहित्याचे नवे क्षितिज उघडले जाईल, नवे विचार आकार घेतील आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असा मला विश्वास आहे. सातारा जिल्ह्याला थोर साहित्यिकांचा आणि वैचारिक परंपरेचा समृद्ध वारसा लाभला आहे. सातारा जिल्ह्याचे सुपुत्र, नव महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते, तर एक संवेदनशील साहित्यिक, चिंतनशील लेखक आणि विचारवंत होते. याच भूमीतून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर, कवी यशवंत पेंढारकर, डॉ. आ. ह. साळुंखे यांसारख्या श्रेष्ठ साहित्यिक-विचारवंतांनी मराठी साहित्यविश्वात नवे मानदंड निर्माण केले. या साहित्यिकांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वैचारिक प्रवाहाला नवचैतन्य दिले. साताऱ्याच्या या वैचारिक परंपरेच्या साक्षीने होणारे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणजे मराठी साहित्याच्या परंपरेला अभिवादन करणारा आणि नव्या सर्जनशील विचारांना प्रेरणा देणारा ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

मराठी भाषा ही महाराष्ट्राची ओळख, तर मराठी साहित्य हे आपल्या समाजमनाचा आरसा आहे. आपल्या साहित्यिकांनी युगानुयुगे विचारांचा, भावनांचा, अस्मितेचा आणि परिवर्तनाचा प्रवाह वाहता ठेवला आहे. या संमेलनादरम्यान काव्यवाचन, कथाकथन, परिसंवाद, चर्चासत्रे या विविध उपक्रमांच्या माध्यमातून साहित्यरसिकांना विचारवंतांना आणि नवोदित लेखकांना एकत्र येण्याची संधी मिळेल. नव्या विचारांची बीजे पेरली जातील आणि मराठी साहित्यातील आधुनिकता व परंपरा यांचे सुंदर मिश्रण सर्वांसमोर येईल. संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे पदाधिकारी, सातारा जिल्हा आयोजक मंडळ, साहित्यिक, कार्यकर्ते व साहित्यप्रेमी नागरिकांचे मनःपूर्वक अभिनंदन. या संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित होणारी 'अटकेपार' ही स्मरणिका मराठी साहित्य चळवळीच्या अखंड प्रवासाचे, अभिमानास्पद परंपरेचे आणि नव्या वाटचालीचे जिवंत दस्तऐवज ठरेल, असा मला विश्वास आहे.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या यशस्वीतेसह या निमित्त प्रकाशित होणाऱ्या 'अटकेपार' या स्मरणिकेच्या प्रकाशनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती अधिकाधिक बहरत राहो, नव्या पिढीपर्यंत पोहोचत राहो, याच सदिच्छा.

(अजित पवार)

उद्योग, मराठी भाषा मंत्री महाराष्ट्र राज्य : शुभेच्छा संदेश

मा. ना. उदय सामंत



उदय सामंत

सत्यमेव जयते

मंत्री
उद्योग, मराठी भाषा
महाराष्ट्र राज्य

शुभ संदेश

'अटकेपार' या साहित्यविषयक विशेष स्मरणिकेच्या प्रकाशनानिमित्त मी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (शाहूपुरी शाखा - सातारा) आणि मावळा फाउंडेशन सातारा यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

सातारा ही मराठ्यांच्या पराक्रमाची आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची भूमी आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या राजधानीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ९९ वे अधिवेशन आयोजित होत आहे, ही अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक बाब आहे. प्रसिद्ध साहित्यिक मा. विश्वास पाटील या संमेलनाचे अध्यक्ष आहेत, ही गोष्ट ही या अधिवेशनाच्या वैभवात भर घालणारी आहे.

'अटकेपार' ही स्मरणिका मराठी साहित्य, संस्कृती आणि परंपरेचा वैभवशाली वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करेल, असा मला विश्वास आहे. मराठी भाषेच्या जतन-विकासासाठी आणि साहित्यातून समाजजागृतीसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या सर्व साहित्यिक, लेखक आणि आयोजकांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

मराठी भाषा ही आपल्या अस्मितेचा श्वास आहे. या भाषेच्या उन्नतीसाठी आणि साहित्य संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग हा विविध उपक्रम, योजनांच्या माध्यमातून सातत्यानं प्रयत्नशील आहेच.

'अटकेपार' स्मरणिकेला आणि या ऐतिहासिक संमेलनाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

जय महाराष्ट्र !

(डॉ. उदय सामंत)

कार्यालय : १०१, मुख्य इमारत, पहिला मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : (०२२) २२८४ ३६२८/ ३६६४, **ई-मेल** : udaysamant.minister@nic.in
www.maharashtra.gov.in

खासदार, सातारा लोकसभा : शुभेच्छा संदेश

मा. श्री. छ. उदयनराजे भोसले



सत्यमेव जयते

Chh. Udayanraje Bhonsle

Member of Parliament - Loksabha

दिनांक–06–12–25

शुभेच्छा संदेश

आपली मायबोली मराठी भाषेला अभिजात भाषेचा नुकताच गौरव प्राप्त झाला आहे. मराठी भाषा निश्चितच जितकी कोमल-प्रेमळ तितकीच कठोर म्हणून ख्यातकिर्त आहे. कशीही असो, आपल्या सर्वांना मराठी भाषेचा अभिमान आहे. मराठी भाषेमधील कथा-कादंब-या, तुकाराम गाथा- ज्ञानेश्वरीसह संतसाहित्य, काव्ये-महाकाव्ये, नाटये-महानाटये इत्यादी विविध प्रकारातील साहित्य आपल्याला पहायला मिळते. मराठी साहित्य अधिकाधिक वर्धिष्णु व्हावे, त्याचा प्रचार-प्रसार होवून लोकाभिमुख व्हावे, त्याव्दारे समाजाला एक सकारात्मक जीवनाची दिशा मिळावी म्हणून अखिल भारतीय स्तरावर मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात सुमारे शे-सव्वाशे वर्षापूर्वी झाली. त्याला संघटीत रुप मिळाल्यावर, यंदाचे 99 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, मराठा साम्राज्याची चौथी राजधानी असलेल्या सातारा नगरीत म्हणजेच आपल्या शाहूनगरीत होत आहे हे आपल्या सर्वांना अभिमानास्पद आहे.

पूर्वी 66 वे संमेलन सातारा येथे दिमाखदारपणे झाले होते. त्यापूर्वीही एक दोनवेळा सातारा येथे साहित्य संमेलन झाले आहे. त्यामुळे यंदाचे साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.श्री.छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले हे आहेत तर जेष्ठ पत्रकार आणि मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष श्री.विनोद कुलकर्णी हे कार्याध्यक्ष आहेत. त्यांना आमच्यासह सर्वांचीच साथ आहे त्यामुळे सातारा येथे स्वराज्य विस्तारक छत्रपती शाहू महाराज थोरले नगरीमध्ये दिनांक 01 ते 04 जानेवारी 2026 या कालावधीत होणारे 99 व संमेलनाचे नियोजन दर्जेदार, नेटके व स्मरणात राहील असे होईल अशी धारणा आहे. या संमेलनाच्या निमित्ताने "अटकेपार" या शिर्षकाखाली साहित्यविषयक स्मरणिका प्रकाशित होत आहे. साताराचे थोरले छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वाखाली कटक ते अटक पर्यंत स्वराज्याचा साम्राज्यविस्तार झाला. या मराठा साम्राज्याची ताकद व विस्तार, थोरल्या छत्रपती शाहू महाराजांचे कुशल प्रशासन, तत्कालीन व्यक्तीमत्वांनी गाजवलेला पराक्रम याची पूनर्जाणिव निश्चितपणे "अटकेपार" या स्मरणिकेव्दारे जनमानसामध्ये होईल असा विश्वास आहे.

गेल्या अनेक वर्षापासून, साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यासाठी अनेक शहरे-जिल्हे सातत्याने आग्रही आहेत. सातारला सुध्दा साहित्य संमेलन होण्यासाठी आमचे मित्र, जेष्ठ पत्रकार आणि साहित्यिक श्री.विनोद कुलकर्णी हे गेली 11-12 वर्षे चिकाटीने प्रयत्न करीत होते. प्रत्येक वर्षी संमेलन दुसरी कडे गेले, तरी नाऊमेद न होता ते पुन्हा प्रयत्न करीत होते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच 99 वे साहित्य संमेलन त्यांनी साता-यामध्ये अक्षरश: खेचून आणले आहे. त्याचप्रमाणे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्षपद श्री विनोद कुलकर्णी यांच्या रुपाने साता-याला लाभले आहे ही अभिमानस्पद घटना आहे. 1993 च्या 66 वे साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष कै.श्री.छ.अभयसिंहराजे उर्फ भाऊसाहेब महाराज होते, त्यांचेच सुपूत्र ना.श्री.छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले हे 99 वे साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत हा एक दुर्मिळ योगायोग आहे. मराठा साम्राज्याच्या राजधानीत, उभारण्यात येणा-या थोरले छत्रपती शाहू महाराज नगरीत, होत असलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून पानिपत कार मा.श्री. विश्वास पाटील लाभले हा आणखीन दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल.

या पार्श्वभुमीवर संमेलनाच्या निमित्ताने प्रसिध्द होणा-या "अटकेपार" या स्मरणिकेस आमच्या मनापासून शुभेच्छा..

लेखनसीमा..

श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले,

खासदार,सातारा.

प्रति,

मा.श्री.विनोंद कुलकर्णी,

कार्याध्यक्ष, 99 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

व्दारा- दि.गजराथी अर्बन क्रेडित सोसायटी, 151, भवानीपेठ, देवी चौकाजवळ, सातारा यांना सस्नेह..

Member : Standing Committee on Water Resources • Consultative Committee on Jal Shakti.

New Delhi : C-1/17, Pandara Park, New Delhi - 110003, Tel : 011-23782196
Maharashtra : 'Jalmandir' Palace, 1, Shukrwar Peth, Satara-415001, Maharashtra
Tel.: 02162-283833, 281800, Email : jalmandirpalace@gmail.com



श्री. विश्वास पाटील
अध्यक्ष, ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन



डॉ. तारा भवाळकर
अध्यक्ष, ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

पदाधिकारी व सदस्य



प्रा. मिलिंद जोशी
अध्यक्ष



श्री. गुरुव्या स्वामी
उपाध्यक्ष



सौ. सुनिताराजे पवार
कार्यवाह



श्री. विनोद कुलकर्णी
कोषाध्यक्ष



डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
सदस्य



डॉ. दादा गोरे
सदस्य



श्री. प्रदीप दाते
सदस्य



प्रा. प्रतिभा सराफ
सदस्य



श्री. चंद्रशेखर गोखले
सदस्य



डॉ. रामचंद्र काळुंखे
सदस्य



श्री. देविदास फुलारी
सदस्य



श्री. विलास मानेकर
सदस्य

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

पदाधिकारी व सदस्य



डॉ. गजानन नारे
सदस्य



श्री. रमेश वंसकर
सदस्य



डॉ. विद्या देवधर
सदस्य



श्री. संजय बच्छाव
सदस्य



श्री. मोहन रेडगावकर
सदस्य



श्री. कपूर वासनिक
सदस्य

विश्वस्त मंडळ



प्रा. मिलिंद जोशी
अध्यक्ष



डॉ. अश्विनी भालेराव-गांधी
कार्यकारी विश्वस्त



श्री. विनोद कुलकर्णी
विश्वस्त



ॲड. प्रमोद आडकर
विश्वस्त



डॉ. हेमलता पाटील
विश्वस्त



डॉ. तीर्थराज कापगते
विश्वस्त

विश्वस्त मंडळ



श्री. बाळासाहेब देशमुख
विश्वस्त



डॉ. सतीश तराळ
विश्वस्त



प्रकाश पागे
विश्वस्त

प्रशासनाचे सहकार्य



श्री. संतोष पाटील
जिल्हाधिकारी, सातारा



श्री. तुषार दोषी
जिल्हा पोलीस अधिक्षक



याशनी नागराजन
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा



श्री. अभिजीत बापट
सह आयुक्त, नगर प्रशासन

अनुक्रमणिका

- अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच कशासाठी? — प्रा. मिलिंद जोशी.....१७
- संमेलनाच्या स्वप्नाचा पाठलाग — विनोद कुलकर्णी.....२१
- शंभूपुत्र शाहू महाराज सातारचे निर्माते — डॉ. पी. एन. शिंदे..... २४
- सातारा जिल्ह्यातील साहित्य संमेलने — राजेश सोळसकर.....२८
- संमेलनाध्यक्ष सातारचे — पद्माकर पाठकजी..... ३१
- साहित्यातील सातारचे योगदान — डॉ. उमेश करंबेळकर..... ३७
- सातारा नगरीचा समृद्ध वारसा — डॉ. ज्योत्स्ना कोल्हटकर...३९
- सातारा जिल्ह्याचे अर्थव्यवस्थेतील योगदान — डॉ. राजेंद्र सरकाळे.....४२
- ज्ञानप्रज्ञेच्या गुढी — अमित कुलकर्णी.....४८
- नांगर ते ए आय — भाग्यश्री फरांदे.....५३
- सातारा जिल्ह्याचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग — संभाजीराव पाटणे..... ५८
- गिर्यारोहणाची राजधानी — डॉ. संदीप श्रोत्री.....६१
- सातारा जिल्ह्याचे बदलते राजकारण — हरीश पाटणे.....६७
- निर्भीड पत्रकारितेची भूमी — मुकुंद फडके..... ७१
- मैदानावरही साताऱ्याची आघाडी — सिद्धार्थ लाटकर..... ७४
- सातारा जिल्ह्याचे मंदिर वैभव — सुनील शेडगे..... ७६
- सातारचा ग्रंथमहोत्सव — शिरीष चिटणीस..... ८०
- कंदी रंगी सातारा — ॲड. सीमंतिनी नूलकर.....८४
- सातारांगण — राजीव मुळ्ये..... ८८
- पर्यावरणसमृद्ध भूमी — श्रीकांत कात्रे..... ९१



मराठ्यांची शान अटकेपार निशाण

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा - शाहूपुरी, सातारा आणि मावळा फौंडेशन, सातारा आयोजित
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

जानेवारी २०२६

१ २ ३ ४



- चळवळी, आंदोलनांचा जिल्हा — किशोर बेडकिहाळ.....९५
- ऐतिहासिक सातारा — नंदकुमार सावंत.....९९
- पर्यटनाची राजधानी सातारा — गजानन चेणगे.....१०२
- देशाच्या ऊर्जेची राजधानी — हणमंत पाटील.....१०५
- ढंगदार साताऱ्याची लयदार बोली — सचिन जवळकोटे.....११०
- भेदिक परंपरा आणि हैबतीबाबा — विलास आपटे ११३
- वैशिष्ट्यपूर्ण मंदिरे — आदित्य फडके ११८
- काही ऐतिहासिक नोंदी — डॉ. अनुपमा उजगरे.....१२२
- म. सा. प. शाहूपुरी शाखेचे कार्य १२४
- मावळा फौंडेशनचे कार्य १२६
- मराठी भाषेसमोरील आव्हाने — डॉ. सुनीलकुमार लवटे...१२९
- कृत्रिम बुद्धिमत्ता मराठीला तारणार की मारणार? — सारंग दर्शने.....१३३
- भारतीय भाषांतील अभिजात आणि लोकभाषिक प्रवाह — गणेश देवी.....१३६
- ज्ञानेश्वरी, बाळशास्त्री आणि सातारा — रवींद्र बेडकिहाळ.....१३९
- अभिजात दर्जासाठीचा यशस्वी लढा — विनोद कुलकर्णी.....१४२
- अस्मितांच्या धाकात अभिव्यक्ती — सचिन मोटे.....१४७
- माझा मऱ्हाटीचा बोलू — डॉ. यशवंत पाटणे.....१५१
- लेखक आणि साहित्यिक यामधील फरक — प्रा. विश्वास वसेकर.....१५७
- मराठी अनुवादातील समस्या — श्रीनिवास वारुंजीकर.....१६०
- क्रांतिकारी शिक्षणमहर्षी — डॉ. जे. पी. देसाई.....१६४

परिसंवाद : विज्ञानविषयक लेखन अधिकाधिक लोकाभिमुख कसे होईल?

- विज्ञान साहित्य लोकाभिमुख होण्यासाठी — संजय सोनवणी.....१७०
- शुद्ध वैज्ञानिक ज्ञान देणारे साहित्य असावे — प्रा. माधुरी शानभाग.....१७३
- कृत्रिम बुद्धिमत्तेला कामाला लावा — सुबोध जावडेकर.....१७८

परिसंवाद : इंग्रजी माध्यमाच्या रेट्यात बाल साहित्याची पीछेहाट होत आहे का?

- हीच बदलाची वेळ आहे — राजीव तांबे.....१८२
- इंग्रजी माध्यम आणि मराठी बालसाहित्य — डॉ. संगीता बर्वे.....१८५
- बालसाहित्याच्या पीछेहाटीला मानसिकता कारणीभूत — ल. म. कडू.....१९०

परिसंवाद : युवकांना वाचनाकडे कसे वळवावे?

- आणि ग्रंथोपजीविये : ग्रंथ हेच जीवन व्हावे — डॉ. वैभव ढमाळ.....१९४
- समन्वय महत्त्वाचा — डॉ. निर्मोही फडके १९८

परिसंवाद : कृत्रिम प्रज्ञा आणि साहित्यिकांची सर्जनशीलता

- प्रतिभेची निर्मिती अशक्य — डॉ. राजेंद्र माने.....२०५
- एआय सर्जनशीलतेची जागा घेणे अशक्य — शरद तांदळे.....२०८
- लेखकांची सर्जनशीलता म्हणजे सोन्याची पारख — प्रा. डॉ. केशव देशमुख.....२११

परिसंवाद : चित्रपटविषयक लेखन साहित्य आहे का?

- 'तोवर' हा प्रश्न आपण विचारत राहू — श्रीकांत बोजेवार.....२१६
- चित्रपटविषयक साहित्याला प्रतिष्ठा मिळावी — सुलभा तेरणीकर.....२१९
- चित्रपटविषयक लेखनाला गांभीर्याने घ्या — दिलीप ठाकूर.....२२२

परिसंवाद : मराठी प्रकाशकांसमोरील आव्हाने

- मराठी प्रकाशन क्षेत्रातील बाधा — रामदास भटकळ.....२२७
- वितरण व्यवस्थेची समस्या — अरविंद पाटकर.....२३०
- डिजिटल बदलांच्या उंबरठ्यावर मराठी प्रकाशन व्यवसाय — साकेत बाबा भांड.....२३३
- प्रकाशनक्षेत्र : वाटा आणि वळणे — सुनिताराजे पवार.....२३६

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा शाहूपुरी, सातारा



श्री. विनोद कुलकर्णी
संस्थापक अध्यक्ष



श्री. नंदकुमार सावंत
अध्यक्ष



श्री. विक्रम पाटील
उपाध्यक्ष



श्री. चंद्रकांत बेबले
कार्याध्यक्ष



श्री. अजित साळुंखे
प्रमुख कार्यवाह



श्री. संजय माने
कार्यवाह



श्री. सचिन सावंत
कोषाध्यक्ष



श्री. किशोर बेडकिहाळ
सदस्य



डॉ. श्री. उमेश करंबेळकर
सदस्य



श्री. वजीर नदाफ
सदस्य



श्री. आ. डी. पाटील
सदस्य



श्री. अमर बेंद्रे
सदस्य



सौ. ज्योती कुलकर्णी
सदस्य



सौ. अश्विनी जठार
सचिव



डॉ. राजेंद्र माने
निमंत्रित सदस्य

मावळा फौंडेशन, सातारा



श्री. विनोद कुलकर्णी
संस्थापक अध्यक्ष



श्री. नंदकुमार सावंत
सचिव



सौ. ज्योती कुलकर्णी
विश्वस्त



श्री. अनिल जठार
स्वीकृत सदस्य



श्री. तुषार महामुलकर
स्वीकृत सदस्य



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच कशासाठी ?

प्रा. मिलिंद जोशी

मो.: ९८७०२७०८२३

(अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ)

'संमेलन घेण्याखेरीज महामंडळ काय करते', असा एक प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो. हा प्रश्न निरर्थक आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळात सहभागी असणाऱ्या सर्व संस्था त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात वर्षभर साहित्यिक कार्यक्रम घेत असतात. त्या त्या संस्थांची विभागीय संमेलने त्यांच्या भागात होत असतात. त्यामुळे साहित्य महामंडळानेही पुन्हा तेच काम करावे हे अभिप्रेतही नाही आणि अपेक्षितही नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लोकहितवादी आणि न्या.महादेव गोविंद रानडे यांनी 'ग्रंथकार संमेलनां'ची सुरुवात केली. १८७८ मध्ये पहिले ग्रंथकार संमेलन न्या. रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात हिराबागेत भरले. दुसरे १८८७ मध्ये बुधवार पेठेतील सार्वजनिक सभेच्या जोशी सभागृहामध्ये भरले. तिसरे संमेलन १९०७ मध्ये सातारा येथे भरले. ही संमेलने अनेकदा काही कारणांमुळे खंडित होत होती. ती खंडित होऊ नयेत यासाठीचा प्रयत्न पुण्यात भरलेल्या चौथ्या ग्रंथकार संमेलनात झाला. पुण्यात २६ आणि २७ मे १९०६ रोजी चौथे ग्रंथकार संमेलन विद्वान कवी गो. वा. कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली नागनाथ पाराजवळच्या मळेकर वाड्यात भरले होते. लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर, चिंतामणराव वैद्य, विसुभाऊ राजवाडे, पांगारकर, रेव्हरंड टिळक या संमेलनात सहभागी झाले होते. २७ मे रोजी समारोपाच्या दिवशी न.चिं.केळकर यांनी ''महाराष्ट्र साहित्य परिषद आज रोजी स्थापन झाली आहे'' अशी घोषणा केली. लोकमान्य टिळकांनी उठून या घोषणेला पाठिंबा दिला. महाराष्ट्र साहित्य परिषद गेली १२० वर्षे मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत आहे. हा मुळीचा झरा अनेक सारस्वतांसाठी अक्षय ऊर्जा केंद्र आहे. ग्रंथकार संमेलन 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' या नावाने पुढे नेण्याचे काम महाराष्ट्र साहित्य परिषदेने निष्ठेने केले. १९६४ साली गोव्यात मडगावला, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पंचेचाळिसावे साहित्य संमेलन झाले. महाराष्ट्र साहित्य संमेलन या नावाने भरलेले ते शेवटचे संमेलन होते.

३ ऑक्टोबर १९६१ रोजी मराठी साहित्य महामंडळाची स्थापना झाली. चार संस्था महामंडळाच्या घटक असल्यामुळे त्यांना घटक संस्था मानण्यात यावे, असेही ठरविण्यात आले. त्या वेळी दत्तो वामन पोतदार यांच्या समवेत विदर्भ साहित्य संघाचे

नोंद

अभिनव भारत संघटनेच्या सातारा शाखेचे काही सभासद गाजलेल्या औंध बॉम्ब प्रकरणात पकडले गेले होते. औंध हायस्कूलच्या एका खोलीत २३ मे १९०० रोजी बॉम्ब सापडला, या प्रकरणातील तिन्ही आरोपी साताऱ्याचे असल्याने या प्रकरणाला 'सातारा कट खटला' असेही म्हणतात. काही व्यक्तींनी पोलिसांना याबाबत माहिती पुरवल्याने आरोपी पकडले गेले व त्यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली.

ग.त्र्यं.माडखोलकर, वि.भि.कोलते, मुंबई मराठी साहित्य संघाचे श्री. शं. नवरे, वा. रा. ढवळे, मराठवाडा साहित्य परिषदेचे भगवंतराव देशमुख, अनंत भालेराव, न. शे. पोहनेरकर सहभागी होते. दरम्यानच्या काळात बृहन्महाराष्ट्रात असणाऱ्या मराठी माणसांनी त्यांच्यासाठी संस्था स्थापन केल्या होत्या. त्या मराठी साहित्य मंडळात येण्यासाठी उत्सुक होत्या. त्यांच्या प्रस्तावांचा विचार करून मराठी साहित्य महामंडळाने त्यांना समाविष्ट करून घेतले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे संमेलने होत असताना संमेलनाध्यक्ष निवडीची जी प्रक्रिया होती, तीच महामंडळानेही स्वीकारली होती. बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन मतदारांची संख्याही वेळोवेळी वाढविण्यात आली. २०१२ च्या घटना दुरुस्ती नंतरही संमेलनाध्यक्षपदाच्या निवडणुका आल्या की, चर्चेचे आणि टीकेचे गुऱ्हाळ सुरूच राहायचे. 'वाघ म्हटले तरी खाणारच आहेत आणि वाघोबा म्हटले तरी खाणारच आहेत.' अध्यक्ष निवडीची पद्धत कोणतीही असली तरी टीका होणारच आहे, वातावरण गढूळ केले जाणारच आहे, तर हे टाळण्यासाठी 'सन्मानाने अध्यक्षपद' देण्याचा विचार करायला काय हरकत आहे, असा विचार नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाकडे महामंडळाचे कार्यालय गेल्यानंतर झाला. श्रीपाद भालचंद्र जोशी त्या वेळी महामंडळाचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेने त्यासाठी पुढाकार घेऊन प्रथम कार्यकारी मंडळात आणि नंतर वार्षिक सर्वसाधारण सभेतही हा ठराव मंजूर करून घेतला. साहित्य महामंडळातही तो मंजूर व्हावा यासाठी पुढाकार घेतला. निवडणुकीऐवजी 'सन्मानाने निवड' हा पर्याय स्वीकारला गेला. साहित्यक्षेत्रात एक चांगला संदेश गेला. निवडणुकीच्या राजकारणापासून लेखिका कायम चार हात दूर राहिल्या, त्यामुळे अनेक कर्तृत्वसंपन्न लेखिका संमेलनाध्यक्षपदापासून वंचित राहिल्या. नव्या घटना-दुरुस्तीमुळे हे चित्र बदलले. या घटना दुरुस्तीनंतर डॉ. अरुणा ढेरे यांची संमेलनाध्यक्षपदी सन्मानाने निवड करण्यात आली, त्याचे साहित्य विश्वाने आणि माध्यमांनीही जोरदार स्वागत केले. बऱ्याच वर्षांनंतर महामंडळाचे कौतुक करणारे अग्रलेख आले. फादर फ्रान्सिस दिब्रिटो, डॉ. जयंत नारळीकर, भारत सासणे, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. तारा भवाळकर, विश्वास पाटील यांच्यासारख्या मान्यवर लेखकांना अध्यक्षपदाचा मान मिळाला.

संस्थात्मक कार्यही नदीसारखे प्रवाही असावे लागते. काठावरचे भले-बुरे, मागून वाहून आलेले सगळे बरोबर घेऊन पुढे जावे लागते. संस्था प्रवाही राहिल्या नाहीत आणि काळानुसार बदलल्या नाहीत, तर त्यांचे डबके व्हायला वेळ लागत नाही. ते झाले की, संस्थांची संस्थाने होतात आणि चळवळींचा जीव गुदमरतो. म्हणून संस्थांनी सतत प्रयोगशील राहिले पाहिजे. निवडणुकीऐवजी 'सन्मानपूर्वक निवड' हा एक प्रयोग आहे. तो फसतो आहे असे लक्षात आले, तर नव्या प्रयोगाचा विचार होईल. प्रयोगच करायचे नाहीत ही मानसिकता नव्या वाटांचे स्वागत करणारी नाही. असे प्रयोग महामंडळाने सातत्याने केले आहेत.

'संमेलन घेण्याखेरीज महामंडळ काय करते', असा एक प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो. हा प्रश्न निरर्थक आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळात सहभागी असणाऱ्या सर्व संस्था त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात वर्षभर साहित्यिक कार्यक्रम घेत असतात. त्या त्या संस्थांची विभागीय संमेलने त्यांच्या भागात होत असतात. त्यामुळे साहित्य महामंडळानेही पुन्हा तेच काम करावे हे अभिप्रेतही नाही आणि अपेक्षितही नाही. एकेकाळी साहित्यनिर्मितीचा केंद्रबिंदू पुण्यामुंबईतच होता. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील लोक लिहू लागले आहेत. त्यांचेच साहित्य आज मुख्य प्रवाहात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. साहित्य संस्थांनी त्यांची विभागीय साहित्य संमेलने आणि महामंडळाने अ. भा. मराठी साहित्य संमेलन महानगराबरोबरच अशा ग्रामीण आणि निमशहरी भागात घेऊन तेथील नव्या प्रतिभेला उत्तेजन मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. ज्या गावात किंवा शहरात अ. भा. म. साहित्य संमेलन होते त्या संमेलनाच्या निमित्ताने त्या परिसरात जी वातावरणनिर्मिती होते, त्यामुळे तिथली साहित्य चळवळ अधिक गतिमान होते. त्याचा फायदा लेखक-वाचकांबरोबरच ग्रंथालयांनाही होतो. संमेलन होऊन गेले तरी त्याची स्पंदने दीर्घकाळ त्या मातीत घुमत राहतात. हेच अशा संमेलनांचे फलित असते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने लोक चळवळ उभी केली. पंतप्रधान कार्यालयाला एक लाख पत्रं पाठवली. राजकीय इच्छाशक्तीला आवाहन करण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना पत्रं पाठवली. त्यांच्या भेटी घेतल्या.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी नाशिकला 'अभिनव भारत' ही संघटना स्थापन केली होती. त्याच्या शाखा सातारा व कऱ्हाडलाही गुप्तपणे सुरू झाल्या होत्या. कोरेगाव येथील गुरव गुरुजी यांच्यासारखे काही ब्राह्मणेतर नेतेदेखील या अभिनव संघटनेला साथ देत होते. ब्रिटिशांविरुद्ध शस्त्र प्रतिकार करणाऱ्या एका भूमिगत गटात सातारा जिल्ह्यातील पाटण व सातारा तालुक्यातील अनेक युवक सहभागी होते.

नोंद

आमदार-खासदारांना आवाहन केले. एवढेच नाही तर दिल्लीत जाऊन धरणे आंदोलनही केले. साहित्य संस्थेने भाषिक प्रश्नांसाठी दिल्लीत जाऊन आंदोलन करण्याची ही घटनाच ऐतिहासिक आहे. महामंडळातील इतर संस्थांनीही या विषयासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबिले. मराठी भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करण्यात यावा यासाठीच्या धरणे आंदोलनात महामंडळातील सर्व साहित्य संस्था इतर संस्थांसह मुंबईच्या आझाद मैदानावर एकत्र आल्या होत्या. साहित्य महामंडळाने संमेलनाखेरीज भाषिक प्रश्नांसाठी जे जे करायला हवे ते ते महामंडळ आजवर करत आले आहे.

'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जे ठराव मंजूर केले जातात, त्याचे पुढे काय होते' असा प्रश्न नेहमी चर्चिला जातो. शासनाकडे त्याचा पाठपुरावा करून संबंधित विषय धसास लावण्याचे काम कार्यक्षम अध्यक्षांनी यापूर्वी केलेले आहे. संमेलनासारख्या मोठ्या व्यासपीठावर ठराव झाल्यामुळे तो विषय केंद्रस्थानी येतो, त्याच्यावर अनेक बाजूंनी चर्चा होते, विचारमंथन होते ही गोष्ट दुर्लक्षित करता येणार नाही.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर हे मूठभरांचे संमेलन आहे अशीही टीका होते; पण टीका करणाऱ्यांना त्यांच्या मनातील आदर्श पर्यायी संमेलन आजवर उभे करता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे. हे मूठभरांचे संमेलन आहे, तर या संमेलनाला समाजाकडून एवढा उदंड प्रतिसाद कसा मिळतो, या समाज मानसिकतेचाही अभ्यास संबंधितांनी करायला हवा. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांना जी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, ती सातत्य आणि वैविध्यामुळेच. या संमेलनाला समृद्ध अशी परंपरा आहेच. ती समर्थपणे पुढे नेण्याचे काम साहित्य महामंडळाने आजवर केले आहे. त्यामुळेच संमेलनात व्यासपीठाला यांचेच नाव हवे. प्रवेशद्वाराला त्यांचेच नाव हवे, असा आग्रह फक्त याच संमेलनाकडून धरला जातो. इतके हे संमेलन सर्व प्रवाहांच्या आस्थेचा आणि अस्मितेचा विषय आहे. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मराठी समाजाचे वैचारिक नेतृत्व करतात अशी भावना मराठी माणसांच्या मनात आहे. त्यामुळे त्यांनी अध्यक्षीय भाषणात असा विचार मांडला, तर तो केंद्रस्थानी येईल असे लोकांना वाटत असते. महाराष्ट्रात एवढी शेकडो संमेलने होतात; पण चर्चा होते ती केवळ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणाचीच.

संमेलनाचे उत्सवी स्वरूप पाहता संमेलनात साहित्यिक आणि सामाजिक विषयांवर गांभीर्याने चर्चा होत नाही अशी तक्रार करणारीही काही मंडळी आहेत. संमेलन हा मराठी भाषेचा उत्सव आहे, ती साहित्यप्रेमींची आणि वाचकांची जत्रा आहे. गांभीर्याने साहित्य चर्चा करण्यासाठी विद्यापीठांचे मराठी विभाग आहेत. साहित्य परिषदही 'समीक्षा संमेलन' घेते. त्यातील सगळेच विषय गंभीर असतात. जिथे संमेलनाला सामान्य रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळतो तिथे लोकमानस समजून घेऊन थोडा लोकानुनय केला म्हणून भाषेचे आणि साहित्याचे न भरून येणारे नुकसान होते, असे समजण्याचे काहीच कारण नाही.

संमेलन साधेपणाने, आशयसंपन्न आणि कमी खर्चात व्हावे अशीच महामंडळाची अपेक्षा आहे; पण ज्या गावात हे संमेलन होते तेथील संयोजकांना ते पूर्वीच्या संमेलनांपेक्षा भव्यदिव्य व्हावे, असे वाटत असते. त्या स्पर्धेतूनच 'कोटीच्या कोटी उड्डाणे' होतात. संमेलने खर्चिक होतात. महामंडळाने कठोर भूमिका घेतली आणि संयोजकांनी ऐकले तर हे चित्र बदलू शकते, हे महामंडळाने उस्मानाबादच्या संमेलनातून दाखवून दिले आहे.

जुन्यातले नवे आणि नव्यातले अगदी नवे स्वीकारत परंपरा आणि आधुनिकतेचा मिलाफ साधत साहित्य महामंडळाने आजवर वाटचाल केली आहे. ती अधिक जोमाने करताना बदललेले समाजमानस, तंत्रज्ञानातील क्रांती, तरुणाईच्या आशा-आकांक्षा आणि महामंडळाचा व्यवहार यांची सांगड घालायला हवी. ती आपल्याला साताऱ्यात होणाऱ्या ९९ व्या साहित्य संमेलनात बघायला मिळेल.

(लेखक अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आहेत.)



नोंद

दामोदर हरी चाफेकर आणि त्यांच्या बंधूंनी पुण्यात इंग्रजी अधिकाऱ्यांची हत्या केल्यानंतर त्यांचे धैर्य आणि बाणेदारपणा याबद्दल सातारा जिल्ह्यातील युवकांनी आदर व्यक्त केला होता. वारुगड गावचे एक जमीनदार पांडुरंग जियाजी सबनीस यांनी तर बाळकृष्ण व वासुदेवराव चाफेकर यांना पोलिसांची नजर चुकवून सुरक्षित राहता येईल अशी व्यवस्था केली होती.



सातारा विभाग

मराठा साम्राज्याची राजधानी
असलेल्या सातारा जिल्ह्याचे
साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक,
ऐतिहासिक आणि सर्वांगीण दर्शन



विनोद कुलकर्णी
मो.: ८००७५९७०९०

संमेलनाच्या स्वप्नाचा पाठलाग

साताऱ्यात २०११ मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेची स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू झाली आणि प्रत्यक्षात २०१२ पासून काम सुरू झाले. साताऱ्यात गेल्या चौदा वर्षांत साहित्य चळवळ रुजवण्यात यश मिळाले आणि तब्बल एक तपानंतर संमेलन मिळवण्यातही यश मिळाले. एका शाखेची स्थापना आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मिळवण्याच्या स्वप्नांचा प्रवास हा प्रचंड संघर्षमय आणि खडतर होता.

साताऱ्यात १९९३ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाल्यानंतर साहित्याची चळवळ मोठ्या प्रमाणावर रुजायला हवी होती. मात्र तसे घडताना दिसत नव्हते. साहित्य क्षेत्रात साताऱ्यातून काहीतरी घडायला हवे आणि कोणीतरी काहीतरी करायला हवे, असे वाटत होते. मात्र ते कसे घडणार आणि कोण घडवणार, हा प्रश्न होता. शेवटी कोणीतरी काहीतरी करेल, अशी वाट बघण्यापेक्षा आपण स्वत:च काहीतरी केले पाहिजे, या भूमिकेतून मी स्वत: या क्षेत्रात काहीतरी काम करावे, असे ठरवले. त्यादृष्टीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेची स्थापना जिल्हा प्रतिनिधी रवींद्र बेडकिहाळ यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

साताऱ्यात साहित्य चळवळ वृद्धिंगत करणे आणि साताऱ्यात साहित्य संमेलन घेणे, हेच दोन उद्देश त्यापाठीमागे होते. साताऱ्यातील साहित्य चळवळ अपेक्षेपेक्षा खूप गतिमान करण्यात मला यश आले आणि आता अंतिम ध्येयही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याने साध्य झाले आहे.

स्व. श्री. छ. अभयसिंहराजेंचा वारसा

दिवंगत सहकारमंत्री श्री. छ. अभयसिंहराजे भोसले यांनी यापूर्वी साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेतले होते. त्यामुळे यापुढील काळात आपणही संमेलन घेतले पाहिजे. श्री. छ. अभयसिंहराजे यांचा वारसा चालवण्यासाठी मी पुढाकार घेतोय. मात्र, तुम्ही मला पाठिंबा दिला, तर मी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याची मागणी करू शकतो, असे मी त्यांचे सुपुत्र, सार्वजनिक बांधकाममंत्री श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना भेटून सांगितले. त्यांनीही आपण संमेलन घेऊयात, असे सांगून माझ्या मागणीला मोठे बळ दिले. सन २०१४ मध्ये पहिल्यांदा साताऱ्यात संमेलन घेण्याची मागणी सासवड येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात आमदार श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे

नोंद

अनेक लेखकांनी सातारी बोलीचा अभ्यास केला आहे. डॉ. जया कदम यांनीही सातारी बोलीच्या सांस्कृतिक आविष्कारावर सुंदर पुस्तक लिहिले आहे.
डॉ. सरोजिनी बाबर यांच्या लोकसाहित्यातील अभ्यासातही बऱ्याच ठिकाणी सातारी बोलीभाषेचा वारंवार उल्लेख आला आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्याही शब्दसामर्थ्यात सातारा बोली भाषा दमदारपणे उमटलेली आढळते.

आणि मी स्वत: केली होती. त्यानंतर तब्बल १२ वर्षे साताऱ्यात संमेलन घेण्यासाठी शाहूपुरी शाखेची मागणी आणि श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या पाठिंब्याच्या पत्रासह प्रस्ताव देण्याचे काम अविरतपणे सुरू होते. संमेलन मिळण्यासाठी सतत पाठपुरावा करावा लागतो, तो माझ्याकडून सुरू होता. एका ध्येयाने प्रेरित होऊन, एक तप, एक संमेलन मिळवण्यासाठी केलेला प्रवास हा अतिशय खडतर आणि संघर्षमय होता. कटू आणि गोड असे वेगवेगळे अनुभव त्या वेळी वाट्याला आले. मात्र संमेलन मिळत नव्हते आणि ते का मिळेना हेही समजत नव्हते, ही एक वस्तुस्थिती आहे.

प्रचंड कष्टाची तयारी

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे संयोजन करणे, ही छोटी गोष्ट नाही. संमेलन घेण्यासाठी प्रचंड तयारी असावी लागते. संमेलन ही फार खर्चिक गोष्ट आहे. त्यामुळे आर्थिक सक्षमता हा महत्त्वाचा निकष आहे. प्रचंड मनुष्यबळही लागते. संमेलन उभे करण्यासाठी प्रचंड कष्ट घ्यावे लागतात. सातारा म्हणजे पेन्शनरांचे गाव, अशी या शहराची ओळख आहे. त्यामुळे एवढे खर्चिक संमेलन साताऱ्याला पेलवणारे नाही, अशी भावना साताऱ्यात संमेलन नाकारताना अनेक वेळा दिसली. ९७ वे संमेलन साताऱ्याला मिळेल, अशा पद्धतीने आम्ही प्रयत्न केले होते. मात्र केवळ एका मताने ते संमेलन अमळनेरला मिळाले. मी खूप निराश झालो होतो. संमेलनाच्या अगदी जवळ जाऊनही संमेलन मिळाले नाही, याचे अतीव दु:ख होते. त्या नाराजीनंतर पुन्हा कामाला लागलो आणि पुढच्या दोन वर्षांत साताऱ्यात संमेलन घेण्याचा निर्धार केला.

यंदाच्या वर्षी १ एप्रिलपासून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे (पुणे) आले. परिषदेचे सर्व पदाधिकारीच महामंडळाचे पदाधिकारी झाले. मी स्वत:ही महामंडळाचा कोषाध्यक्ष झालो. त्यामुळे संमेलन साताऱ्यात घेण्यासाठीचा परिपूर्ण प्रस्ताव दिल्लीत झालेल्या संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात दाखल केला. सलग अकरा वर्षे माझ्या आणि श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या स्वाक्षरीने हा प्रस्ताव जात होता. मात्र, यंदाच्या संमेलन मागणी प्रस्तावावर माझी स्वाक्षरी नव्हती; कारण, मी तत्पूर्वी शाहूपुरी शाखेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता आणि नवीन कार्यकारिणी निवडली होती. त्यामुळे संमेलन मागणीचा मान माझ्या वाट्याला प्रत्यक्ष आला नाही. तो आला शाहूपुरी शाखेचे अध्यक्ष नंदकुमार सावंत यांचेकडे. मी संमेलन मागता मागता संमेलन देणारा प्रमुख पदाधिकारी झालो होतो.

निवड समितीची परीक्षा

संमेलन मिळवण्याच्या प्रवासात मी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेचा अध्यक्ष झालो. मात्र, नंतर तो प्रवास इतका वेगवान झाला की, पुढे मी सातारा जिल्हा प्रतिनिधी, विभागीय कार्यवाह आणि आता महाराष्ट्र साहित्य परिषदेचा (पुणे) कोषाध्यक्ष झालो. एका संमेलन मागणीच्या इच्छाशक्तीने मला खूप काही दिले.

संमेलनाचा पाठलाग करताना ज्या गोष्टीची इच्छा आणि कल्पना केली नव्हती अशा असंख्य गोष्टी नियतीने माझ्या पदरात टाकल्या. गीतेतल्या वचनाप्रमाणे 'कर्म करत राहा फळाची अपेक्षा करू नका'. तसे फक्त संमेलन मिळवण्यासाठीचे कर्म मी केले आणि संमेलनाचे मुख्य फळ मला मिळालेच. मात्र अनेक प्रकारची चांगली फळे मला मिळाली. संमेलन मिळवण्याच्या प्रक्रियेत मी संमेलन देणाऱ्या व्यवस्थेमध्ये मुख्य नेतृत्व करणाऱ्यांच्या पंगतीत जाऊन बसलो. आत्मस्तुतीचा दोष पत्करून हे

सातारा जिल्हा सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला असल्यामुळे येथे पावसाचे प्रमाण भरपूर आहे. कोयना, कृष्णा, वेण्णा, उरमोडी, नीरा या नद्यांच्या माध्यमातून जलसंपत्ती मुबलक आहे. या नद्यांच्या पाण्यावर आधारित कोयना जलविद्युत प्रकल्प हे साताऱ्याचे सर्वांत मोठे योगदान आहे. ऊर्जानिर्मितीत देशात अग्रस्थान मिळवले आहे. त्यामुळे देशाचे तत्कालीन अर्थमंत्री सी. डी. देशमुख यांनी कोयना वीज प्रकल्पाला 'महाराष्ट्राची भाग्यरेखा' म्हटले.

नोंद



पुण्य नगरी

सातारा। सोमवार, १ जून २०२५

संमेलनस्थळ जाहीर होताच साहित्यप्रेमींकडून शिवतीर्थावर जल्लोष

मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ ठरकास मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, हर्षित घाटगे, अर्जुन साळुंखे.

संमेलनस्थळ जाहीर होताच शिवेंद्र कुलकर्णी यांचे पेढा भरवून अभिनंदन करताना मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, हर्षित घाटगे व मान्यवर.

संमेलनापूर्वी सातारा होणार सुशोभित

अता राहा संमेलनाच्या नियोजनासाठ..!



सातारकरांना साहित्य संमेलनाची पर्वणी

ना. शिवेंद्रराजे भोसले : शिवतीर्थावर जोरदार जल्लोष

छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ ठरकास ना. शिवेंद्रराजे भोसले, शिवेंद्र कुलकर्णी, हर्षित घाटगे, अर्जुन साळुंखे, मंत्रालयात संमेलन व ग्रंथ.

सर्व सांगतो आहे. कारण तुम्ही स्वत:साठी अपेक्षा न करता एखाद्या क्षेत्रासाठी भान हरपून काम केले, तर तुम्ही जी अपेक्षा करत नाही त्यापेक्षा कैक अशा गोष्टी तुम्हाला मिळतात, की तुम्ही स्वत:ही चकित होऊन जाता.

९९ वे संमेलन हे साहित्य संमेलनाच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाचे संमेलन आहे. हे संमेलन शताब्दीपूर्व संमेलन आहे. त्यामुळे हे संमेलन मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मागणी होणार, हेही निश्चित होते. त्यादृष्टीने सर्व मजबूत आणि भक्कम मागणीचे अर्ज आले. चिपळूण, कोल्हापूर, इचलकरंजी, औदुंबर आणि सातारा अशा अर्जातून एकाची निवड करायची होती. सक्षमता आणि नियोजनाच्या बाबतीत कोणी कोणाला कमी नव्हते. परीक्षा निवड समितीचीच होती. कोणाला संमेलन द्यावे आणि कोणाला डावलावे हे निवड समितीलाही समजत नव्हते.

संमेलन यशस्वी करू या

सलग १२ वर्षे केलेली मागणी, नवकवितेचे जनक बा. सी. मर्ढेकर यांच्या नामशेष होणाऱ्या घराचे नूतनीकरण करून त्याचे स्मारकात रूपांतर करण्याचे काम आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविलेली एक लाख पत्रे, दिल्लीत जाऊन केलेले धरणे-आंदोलन अशा कामांची नोंद महामंडळ सदस्यांनी घेतली. कोणतेही काम वाया जात नाही. उलट तेच तुमच्या कसोटीच्या प्रसंगी उपयोगी येते, हेही यानिमित्ताने माझ्यासारख्या कार्यकर्त्याला समजले. तब्बल ३२ वर्षांनंतर सातारा जिल्ह्यातील साहित्यप्रेमींसाठी संमेलनाची मेजवानी देण्यामध्ये माझ्या शाहूपुरी शाखा आणि मावळा फौंडेशनच्या सर्व सहकाऱ्यांसह खारीचा वाटा उचलू शकलो, याचा आनंद आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासारखे भव्यदिव्य संमेलन अन्य कोणत्याही भाषेत होत नाही. मराठी भाषेतील हा सर्वोच्च उत्सव साताऱ्यात आणू शकलो आणि ते भाग्य माझ्या वाट्याला आले, याचा आनंद शब्दांत व्यक्त करणे अतिशय अवघड अशी गोष्ट आहे. हे संमेलन अतिशय देखणे, भव्य आणि साहित्यमूल्य असलेले होईल, याची मात्र ग्वाही देतो. सातारकर रसिकांनी हे संमेलन यशस्वी करण्यासाठी मला भरभरून आशीर्वाद द्यावेत आणि संमेलन यशस्वी करावे, एवढीच अपेक्षा आहे.

(लेखक अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष आहेत.)

नोंद

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा क्षेत्रात काम करणारे प्रबोधनकार ठाकरे यांचाही सातारा जिल्ह्याशी संबंध आहे. त्यांच्या गाजलेल्या आणि आघाडीच्या 'प्रबोधन' या नियतकालिकेचे काही अंक सातारा जिल्ह्यातील सातारारोड येथून निघाल्याची नोंद आहे. नंतरच्या कालावधीत ठाकरी भाषा म्हणून जो शब्दप्रयोग प्रचलित झाला त्यावर सातारी बोलीचा छाप आढळतो.



शंभूपुत्र शाहू महाराज सातारचे निर्माते

डॉ. पी. एन. शिंदे
मो.:९८७००६३४१०

सातारा हे जिल्ह्याचे ठिकाण असून त्याला समृद्ध इतिहास आहे. या नगरीचे मूळ नाव शाहूनगर असे असून त्याची निर्मिती शाहू महाराजांनी केली आहे. त्यांच्या नावावरून शाहूनगर असे नाव रूढ आहे. पुढे तेच सातारा झाले.

सातारची निर्मिती करणारे छ. शाहू महाराज म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे नातू व छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र होत. त्यांनी या सातारा शहराची स्थापना कधी केली, त्याचा विकास कसा व कितपत केला, हा या लेखाचा विषय आहे. त्याबरोबर त्यांच्या चरित्रातील ठळक वैशिष्ट्यांचा थोडक्यात उल्लेख आवश्यक आहे.

अजिंक्यतारावर राज्याभिषेक

शाहू महाराजांचा जन्म १८ मे १६८२ रोजी कोकणात गांगवली ता. माणगांव येथे झाला. राजमाता येसूबाई आणि छत्रपती संभाजी महाराज त्यांचे माता-पिता होते. त्यांना वडिलांचा सहवास फार लाभला नाही. बाल शाहूस महाराजांनी मांडीवर घेतल्याचे चित्र आहे. १६८९ साली औरंगजेबाने संभाजी महाराजांना फार क्रूरपणे ठार मारले. त्याचवर्षी येसूबाई व शाहूंना कैद झाली. तेव्हा शाहू फक्त सात वर्षांचे होते. यापुढे १८ वर्षे ते कैदेत होते. येसूबाई तर ३० वर्षे कैदेत होत्या.

शाहू महाराजांच्या आयुष्यात एकापेक्षा एक भयंकर असे प्रसंग घडले आहेत; पण सोनं जसं भट्टीतून बाहेर काढलं की, आकर्षक आकार घेतं तसं हा राजा या अनुभवातून घडत गेला आणि एक महान, आदर्श ठरला. बालवयात सातव्या वर्षी कैद, २७ व्या वर्षी सुटका, स्वराज्याकडे आगमन, ताराबाईंचा प्रखर विरोध, त्यातून खेडचे युद्ध व विजय, अनेक मराठा सरदार ससैन्य मिळणे, रयतेचा पाठिंबा आणि साताऱ्याला आगमन होणे, हे सगळेच भयंकर प्रसंग होते; पण याचा शेवट गोड झाला.

१२ जानेवारी १७०८ रोजी अजिंक्यतारावर राज्याभिषेक झाला. तेथील राजसभेचे अवशेष आजही आहेत. बारा वर्षे येथून शाहू महाराजांनी कारभार पाहिला.

राजधानी गडावरून खाली जमिनीवर आणली

स्वराज्याचा कारभार आतापर्यंत गडावरून पाहिला गेला होता. राजगड, रायगड,

सातारा जिल्ह्यातून सैन्यात जाण्याची परंपरा आहे. अपशिंगे हे लहान गाव त्यात अग्रेसर आहे. या गावातल्या प्रत्येक घरातला निदान एक तरी सदस्य भारतीय सैन्यात भरती झाला आहे. १९६२ च्या चीनविरुद्धच्या युद्धात चार, १९६७ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात दोन, तर १९७१ च्या युद्धात एक जवान देशासाठी शहीद झाला आहे.

नोंद



जिंजी व शेवटी अजिंक्यतारा. छ. शाहू महाराजांनी गडाच्या आश्रयाऐवजी खाली जमिनीवर राजधानीचा निर्णय घेतला. त्याला काही कारणे असतील. अजिंक्यताराच्या पायथ्याशी उत्तरेस जागा ठरवून त्यासाठी आवश्यक अशा इमारती बांधण्यास सुरुवात केली. त्यांचा हा निर्णय म्हणजे मूलभूत स्वरूपाचा बदल होता.

सातारा शहराची निर्मिती अशी झाली

राजधानीसाठी आवश्यक अशा इमारतींचे बांधकामास पायथ्याशी सुरुवात केली. त्याच्याशी संबंधित एक पत्र पाहा, २८ मार्च १७२१ रोजी मल्हार तुकदेव पेशव्यांना लिहितो, ''शाहू राजेंसाठी तातडीने वाडा बांधायला हवा. गवंडी, सुतार अजून आले नाहीत. फाल्गुन मासी घरामध्ये येऊन राहावे यैसा विचार वाडियांतील आहे. घर तातडीने बांधोन दिले पाहिजे. हइगई करिता येत नाही. तरी घर बांधोन द्यावे.'' जानेवारी व फेब्रुवारी १७२२ मध्ये पेशव्यांनी महाराजांची माची किल्ला येथे भेट घेऊन चर्चा केल्याचा पेशव्यांच्या रोजनिशीत उल्लेख आहे. तेव्हा हीच सातारा या शहराची निर्मिती किंवा स्थापना ठरू शकते; पण तेव्हा त्याचे नाव महाराजांच्या नावावरून 'शाहूनगर' असे होते. शाहू महाराजांनी या नवीन नगरात पेठा वसविल्या. अनेक इमारती बांधविल्या. तसेच त्याच्या विकासासाठी अनेक तशी पत्रे उपलब्ध आहेत.

अनेक इमारती, वाडे तयार

महाराजांच्या आदेशाप्रमाणे स्वराज्याचा विस्तार चालू होता. त्याचवेळी शाहूनगरात आवश्यक इमारती, राजपरिवार निवास, अधिकारी, सरदारांचे वाडे उभारले गेले.

रंगमहाल

राजकुटुंबाचे हे भव्य असे निवासस्थान तयार झाले. किल्ल्याच्या पायथ्याशी 'माची' भागात या महालाचे अवशेष आजही आहेत. इतिहास संशोधक म्हणून आम्हाला त्याबद्दल अधिक माहिती मिळाली नाही, दुरून पाहावे लागले. शाहू महाराज येथे राहत होते ही कल्पना सुखद व आनंददायी वाटते. १७ डिसेंबर १७४९ रोजी याच रंगमहालात त्यांचे निधन झाले.

तख्ताचा वाडा

रंगमहालापासून काही अंतरावर हा वाडा असावा. तेथे महाराजांचे तख्त (सिंहासन) असावे. येथून राज्यकारभार करीत महाराजांनी स्वराज्याचे साम्राज्य केले. उत्तरेस यमुना-दिल्ली ते दक्षिणेस त्रिचनापल्ली-अर्कट आणि पूर्वेस बंगाल ते पश्चिमेस अरबी समुद्र असा पूर्व पश्चिम ११०० मैल व दक्षिणोत्तर १३०० मैल एवढा साम्राज्य विस्तार राजधानीतून साध्य केला. इतके महत्त्व या

नोंद

ऑलिंपिकमध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारात भारताला पहिले पदक मिळवून देणारे श्री. खाशाबा जाधव हे कऱ्हाड तालुक्यातील गोळेश्वर या गावचे होते. श्री. जाधव यांनी १९५२ च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये कुस्ती या खेळात कांस्यपदक मिळविले होते. ऑलिंपिकला जाण्यासाठी कऱ्हाडमधील लोकांनी त्यांना मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले होते.



वास्तूस आहे; पण त्याची कागदपत्रे मिळाली नाहीत. येथे एक मोठा चौथरा असून तेथे सिंहासन असावे. लगत दोन भुयारी मार्ग आहेत; पण सध्या बंद आहेत. दक्षिणेस तत्कालीन भिंतीच्या बांधकामाचे अवशेष दिसतात. तेथे तत्कालीन विहीर असून आम्ही खाली उतरून पाहिली. येथे सध्या 'गुरुवार बाग' आहे.

अदालत राजवाडा

शाहूकालीन हा राजवाडा आजही सुंदर स्थितीत आहे. परवानगीने आम्ही तो पाहिला आहे. माची भागातील हा वाडा सातारचे एक ऐतिहासिक असे शाहूकालीन वैशिष्ट्य आहे. याशिवाय महाराजांच्या आज्ञेने अनेक वाडे बांधले गेले. उदा. डफळे व शेखमियाची पागा, मंत्र्याचा वाडा, खतिबाचे घर व मशीद, नागपूरकर भोसल्यांचा वाडा, चिमणाजी दामोदर (चिमणपुरा), शिर्केंचा वाडा, श्रीपतराव प्रतिनिधी पंताचा गोट व वाडा, अनगळ सावकारांचा वाडा, इ. २० मार्च १७७३ रोजी होळीच्या रात्री आग लागून यातील पुष्कळसे वाडे जळले.

शाहूकालीन अन्य अवशेष

महाराजांची आवडती उपस्त्री विरुबाई यांनी शहराजवळ लिंब शेरी येथे बांधलेली बारा मोटेची विहीर म्हणजे स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असून लोक आवर्जून बघायला जातात. शाहू महाराजांच्या सगुणाबाई या धाकट्या राणीसाहेब 'धाकटी धनीण' या नावे परिचित होत्या. त्यांच्या नावे 'धनिणीची बाग' आजही आहे. त्याचे वैशिष्ट्य असे, की पुढील शाहू महाराजांनी ही ११ एकर जागा कर्मवीर भाऊराव पाटील यांना दान दिली. तेथे रयत शिक्षण संस्थेची एक शाखा अनाथ व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलाचे शिक्षण, सांभाळ करते. महाराजकालीन वास्तूचा हा केवढा समृद्ध वारसा आहे. १७४० साली बांधलेले श्रीकृष्णेश्वर मंदिर आजही आहे.

सातारचा शाहूकालीन विकास

शाहू महाराजांनी सातारा (शाहूनगर) वसविले. त्याबरोबर त्याच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले. सर्वप्रथम शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविला. किल्ल्यावर सात तळी होती ती नावेही मिळतात. माची भागात आल्यावर पाण्याचा उपाय, शोध सुरू झाला आणि शाहूनगरची पहिली पाईपलाईन पाणीपुरवठा योजना १७०८ ला अस्तित्वात आली. यवतेश्वर डोंगरावरील पाण्याचे अनेक झरे एकत्र करून सांबरवाडी येथे हौदात आणले. तेथून उताराने चार इंच व्यासाच्या खापरी पाईपलाईनने पाणी रंगमहालात आणले. तेथून तख्ताच्या विहिरीत व उताराने अन्यत्र पुरवले. अशा झऱ्यांपैकी 'नागझरी झरा' आजही सुस्थितीत बांधीव असून त्याचा फोटो आमच्याकडे आहे. लोकांनी ते ठिकाण जरूर बघावे. शाहू महाराजांनी शहराच्या आर्थिक विकासाकडे लक्ष दिले. अनेक उद्योजक, सावकारांना निमंत्रित केले. ११ मे १७२७ रोजी भवानी शंकर व मेहेर महम्मद या आपल्या दूतांना सुरतला मनोहरदास या सावकाराकडे पाठवले व कळविले, 'सातारला येऊन आपला व्यवसाय करावा. मदत व संरक्षण असेल. इतरांना आणावे'. हे पत्र उपलब्ध आहे. १७३९ साली शहरात नाईक, मोघे, कडू, तांबेकर, बर्वे, दादाभाई इ. १४ सावकारांची नावे मिळतात. उत्तर व दक्षिणेतून सावकारी, वकिली, देवतार्चन इ. कामे करणारी अनेक कुटुंबे शाहूनगरात येऊन राहिल्याचे पुष्कळ उल्लेख मिळतात. आशानंद, सुखानंद, मनसापुरी, बंसीपुरी, रूपपुरी, सुमेरगिरी गोसावी असे व्यापारी शहरात वास्तव्य करून होते. ११ मार्च १७३८ च्या

निसर्गसंपन्न सातारा जिल्हा इतर अनेक कारणांसाठी प्रसिद्ध आहे. फलोत्पादनाच्या क्षेत्रात स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी देखील सातारा जिल्हा प्रसिद्ध आणि आघाडीवर आहे. विशेषतः महाबळेश्वर, वाई आणि पाचगणी हे भाग भारतातील सुमारे ८०% स्ट्रॉबेरीचे उत्पादन करतात. महाबळेश्वरमधील स्ट्रॉबेरीला तर भौगोलिक (जीआय) उपाधीदेखील प्राप्त आहे.

नोंद

पत्रात उल्लेख आहे की, ''सुमेरगिरी गोसावी थोर सावकार कार्यास येईल. त्यास गाव अगत्य देणे.'' तानशेठ भुरके यास महाराजांनी १७४० साली किल्ल्यावर टांकसाळीचा अधिकारी म्हणून नेमले. या सोनार व्यावसायिकांचे वारस आजही सातारमध्ये आहेत. शाहू महाराजांनी स्थापन केलेले आणि विकास केलेले शाहूनगर म्हणजे सातारा शहराचा हा आहे थोडक्यात इतिहास.

१७०८ ते १७४९ या कालखंडात शंभूपुत्र छत्रपती थोरले शाहू महाराज यांनी सातारा राजधानीतून राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे रयतेवर प्रेम केले. शेतकऱ्याच्या काठीकुपाडाला धक्का लावला तर हात पाय तोडले जातील; अशी सरदारांना लिहिलेली जरबेची पत्रे आहेत. न्यायनिवाडा पक्षपाती नसावा, भ्रष्टाचार सहन केला जाणार नाही ज्यांचे उपकार झाले ते विसरू नका. हा देश आपला, दूर दूर जा, विजय मिळवा, वाडे बांधा, कर्ज काढा व फेडा. आजच्या बृहन्महाराष्ट्र चळवळीचे अधिष्ठान शाहूंच्या धोरणात व कार्यात मिळते. पूर्वजांबद्दल आदर हवा हे सांगताना शहाजीराजे, संभाजी महाराज, राजाराम महाराज यांच्या समाधी स्थळासाठी इनाम दिले. शिवाजी महाराजांनी स्थापना केलेली राजधानी 'रायगड' ४० वर्षे मोगलांच्या ताब्यात होती ती जिंकली, स्वराज्यात घेतली. आरमारी विकास करून पोर्तुगीजांचा पराभव करून वसई जिंकली. इंग्रज, फ्रेंच इ. युरोपीयांना ठणकावून सांगितले की, 'भूमी, समुद्र आमचा आहे. आमचे परवाने घ्या'. असे उत्तुंग कार्य करणारा हा निष्कलंक राजा होता. माहुली येथे त्यांची समाधी आहे.

ता. क. हा लेख लिहिण्यासाठी आम्ही अस्सल कागदपत्रे वापरली आहेत.

(लेखक ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ असून शंभूपुत्र शाहू महाराज यांच्या इतिहासाचे अभ्यासक आहेत.)



नोंद

सातारा जिल्ह्यात अनेक आकर्षक लँडस्केप्स म्हणजे निसर्ग पर्यटनस्थळे आहेत. ज्यामध्ये कास पठार, वजराई व ठोसेघर धबधबा, सज्जनगड, अजिंक्यतारा किल्ला आणि चाळकेवाडी पवनचक्की फार्म यांचा समावेश आहे. येथे भेट देण्यासाठी सर्वांत सुंदर काळ पावसाळ्यात (जुलै ते सप्टेंबर) असतो, जेव्हा संपूर्ण भाग अत्यंत सुंदर दिसतो.



सातारा जिल्ह्यातील साहित्य संमेलने

राजेश सोळसकर
मो.: ९८८११३३०७७

सातारा जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या सहा मराठी साहित्य संमेलनांचा आढावा सुरुवातीपासून घेणे महत्त्वाचे आहे. संमेलन अध्यक्षांचे योगदान, संमेलनातील प्रमुख चर्चा, वादविवाद आणि परिणाम यांचाही सखोल विचार या निमित्ताने या लेखात करण्यात आला आहे.

संमेलनवेध

मराठी साहित्य संमेलनांचा इतिहास दीडशे वर्षांच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. आजवर सातारा, कऱ्हाड आणि महाबळेश्वर या तीन शहरांत सहा वेळा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले आहे. प्रत्येक संमेलन हे त्या काळाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब उमटवणारे ठरले. केवळ साहित्याच्या चर्चांपुरते मर्यादित न राहता, या संमेलनांनी मराठी भाषेच्या संवर्धनासोबतच सामाजिक मूल्यांचे रक्षण, राजकीय विषयांवर संवाद आणि लोकसाहित्याचा प्रसार साधला. सातारा जिल्ह्यातील साहित्य संमेलनांनी मराठी भाषेला केवळ साहित्यिक व्यासपीठ दिले नाही, तर सामाजिक बदल, लोकसंपर्क, राजकीय विचार आणि सांस्कृतिक संवाद यांचा संगम घडवला. या संमेलनांचा इतिहास आजही मराठी साहित्याच्या अभ्यासात महत्त्वाचा आहे आणि पुढील पिढ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे.

सातारा जिल्हा हा फक्त भौगोलिकदृष्ट्या नव्हे, तर साहित्यिक, ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राचा हृदयबिंदू म्हणून उभा राहिला आहे. या जिल्ह्यातील संमेलनांची परंपरा आजही जिवंत आहे आणि मराठी साहित्य, संस्कृती आणि समाज यांचा संगम पुढेही सुरू राहण्याची शक्यता स्पष्ट करते.

सातारा : १९०५ : प्रारंभीचे पाऊल

सातारा जिल्ह्यातील पहिले संमेलन १९०५ मध्ये झाले. अध्यक्ष म्हणून रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांची निवड झाली. या काळात मराठी साहित्याला एक सुसंगत दिशा देण्याची गरज होती आणि करंदीकर यांचा सहभाग संमेलनाला वैचारिक आधार देणारा ठरला. या संमेलनात भाषाशुद्धी, कविता, नाटक आणि कथालेखनाच्या प्रारंभिक पायऱ्या यावर चर्चा झाली.

नोंद

सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यात कोयना नदीवर उभारलेले कोयना धरण हे महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या जलविद्युत प्रकल्पांपैकी एक आहे. घनदाट हिरवाई, पठारे आणि धबधब्यांच्या सान्निध्यात वसलेले हे ठिकाण निसर्गप्रेमींसाठी पर्वणी आहे. परवानगी घेतल्यास पर्यटकांना धरणाच्या आत बोट सफारीचा अनुभव घेता येतो.

या काळात साहित्याचा उद्देश मुख्यतः भाषा जपणे, शुद्ध मराठीला प्रोत्साहन देणे आणि शालेय व विद्यापीठीय अभ्यासक्रमात भाषेची योग्य ओळख करून देणे असा होता. राजकीय परिस्थिती अजून स्वातंत्र्यपूर्व आंदोलनांच्या प्रारंभीची असल्यामुळे संमेलन हे राजकीय वादांपासून दूर राहिले; परंतु साहित्यिक विचारांचा प्रवाह रुंद झाला. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषेच्या विकासासाठी विशेष समित्या स्थापन केल्या गेल्या, ज्यामुळे पुढील पिढ्यांसाठी साहित्याचे तळ सुरक्षित झाले.

सातारा : १९६२ : स्वातंत्र्योत्तर वास्तव

१९६२ मध्ये स्वातंत्र्यानंतरच्या काळात साताऱ्यात पुन्हा एकदा संमेलन भरले. अध्यक्षपदी नरहर विष्णू गाडगीळ होते. स्वातंत्र्यानंतर नव्या महाराष्ट्राची घडण सुरू होती आणि साहित्याला सामाजिक जबाबदारी स्वीकारावी लागली होती. गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली साहित्य आणि राष्ट्रनिर्मिती यांचा परस्परसंबंध अधोरेखित केला गेला. या संमेलनात लेखक आणि विचारवंतांनी आपल्या भाषणांद्वारे सामाजिक बदल, ग्रामीण शिक्षण आणि समाजातील स्त्री-पुरुष समानतेसारख्या विषयांवर मंथन केले. विशेष म्हणजे, या काळात साहित्यिकांनी सामाजिक सुधारणांसाठी ठोस भूमिका घेण्यास सुरुवात केली. गाडगीळ यांच्या राजकीय अनुभवामुळे साहित्याच्या सामाजिक जबाबदारीवर गंभीर चर्चा रंगली, ज्याचा प्रभाव पुढील संमेलनांवरही दिसून आला.

कऱ्हाड : १९७५ : साहित्याची सामाजिक टीका

१९७५ मध्ये कऱ्हाड येथे ५१वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. अध्यक्ष म्हणून दुर्गा भागवत यांची निवड झाली. ही वेळ भारतासाठी संवेदनशील होती. आणीबाणी लागू होती आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर मर्यादा होत्या. भागवत यांनी या संमेलनात प्रखर भाषण केले. त्यांनी सरकारी धोरणांवर टीका केली, लोकशाहीच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी साहित्याचा उपयोग कसा होऊ शकतो यावर भर दिला. त्यांच्या विचारांनी संमेलन अधिक चर्चात्मक बनले आणि उपस्थित साहित्यिक व वाचक वर्गात तीव्र प्रतिक्रिया निर्माण झाली.

या संमेलनात आणखी एक वाद उभा राहिला, राजकीय नेत्यांना व्यासपीठावर आणण्याबाबत काही मतभेद निर्माण झाले. स्थानिक नेते यशवंतराव चव्हाण उपस्थित होते; परंतु त्यांच्या संयमामुळे हा वाद थांबवण्यात आला. दुर्गा भागवत यांच्या स्पष्टवक्त्या शैलीमुळे संमेलन साहित्य व राजकारण यांचा संगम ठरले आणि पुढील काळात साहित्यिक-सामाजिक निर्णयांवर याचा ठसा राहिला.

सातारा : १९९३ : लोकसाहित्याचा आग्रह

१९९३ मध्ये साताऱ्यातील संमेलनाचे अध्यक्षस्थान विद्याधर गोखले यांनी भूषविले. स्वागताध्यक्ष होते भाऊसाहेब महाराज ऊर्फ श्री. छ. अभयसिंहराजे भोसले. या संमेलनात लोकाभिमुख साहित्य, ग्रामीण समाजातील कथा, लोककथा आणि भाषेच्या शुद्धतेवर विशेष भर देण्यात आला. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन हे फक्त शहरकेंद्रित नव्हते, तर ग्रामीण वाचकांशी संवाद साधणारे ठरले. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि स्थानिक साहित्य संप्रेषणाचे माध्यम यांचा समावेश करून साहित्याचे जनसंपर्क वाढवण्यावर भर देण्यात आला. या काळात साहित्यिकांनी ग्रामीण जीवनाचे दर्शन, लोककला व लोककथा यांचा संग्रह करण्यावर चर्चा केली. गोखले यांनी संमेलनात ग्रामीण साहित्यिकांची भूमिका, त्यांच्या कथेतील समाजसुधारणा आणि लोकसाहित्याची सध्याची स्थिती याबाबत ठोस विचार मांडले. या संमेलनाने साहित्याला लोकसंस्कृतीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ज्यामुळे साहित्याचा सामाजिक परिणाम अधिक दृढ झाला.

कऱ्हाड : २००३ : आधुनिकतेचा वेध

२००३ मध्ये कऱ्हाड येथे संमेलन भरले. अध्यक्षपदी सुभाष भेण्डे होते. या काळात साहित्यावर बदलत्या तंत्रज्ञानाचा प्रभाव दिसू लागला होता. ई-मेल, इंटरनेट आणि प्रकाशनातील नव्या तंत्रांचा वापर साहित्याच्या प्रसाराला नवे मार्ग देत होता. भेण्डेंच्या अध्यक्षतेखाली संमेलनात आधुनिक कथासाहित्य, कादंबरी आणि नाटकांतील नव्या प्रवाहांवर चर्चा झाली. लेखक, समीक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन बदलत्या वाचकसंस्कृतीवर संवाद साधला. साहित्याचे जागतिकीकरण आणि स्थानिक संवेदनांचा संगम यावर चर्चेची झलक दिसली. संमेलनाच्या कार्यशाळांमध्ये लेखकांनी नवीन साहित्यसंकल्पना, कथानक रचना आणि पात्र विकास यावर कार्य केले. भेण्डेंच्या

नोंद

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने सुरू झाल्यानंतर दिल्लीत पहिल्यांदा १९७४ मध्ये म्हणजे महाराष्ट्राची निर्मिती होण्यापूर्वी संमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्षपदही सातारा जिल्ह्यातील नामवंत साहित्यिक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भूषविले होते. गेल्या वर्षी दिल्लीत दुसरे संमेलन झाले. मात्र महाराष्ट्राबाहेरील पहिल्या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानही सातारा जिल्ह्याने भूषविलेला आहे.

अध्यक्षतेखाली संमेलनाने आधुनिक साहित्यावर सखोल विचार, अभ्यास आणि मार्गदर्शन प्रदान केले, ज्यामुळे ते पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरले.

महाबळेश्वर – २००९ : वादळातले संमेलन

२००९ मध्ये महाबळेश्वर येथे झालेल्या ८२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद आनंद रतन यादव यांना देण्यात आले. या संमेलनाला विशेष ओळख मिळाली; कारण, अध्यक्ष निवडीनंतर लगेचच वाद निर्माण झाला. यादव यांच्या 'संतसूर्य तुकाराम' या कादंबरीतील विधानांमुळे वारकऱ्यांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. संत तुकाराम यांच्याबद्दल काही अपमानास्पद विधान असल्याचा आरोप वादाचे मुख्य कारण ठरले. याचा परिणाम असा झाला की, यादव यांनी १७ मार्च २००९ रोजी साहित्य महामंडळाच्या सचिवांना फॅक्सद्वारे राजीनामा पाठवला. वारकऱ्यांच्या संघटनांनी संमेलनात व्यत्यय आणण्याची धमकी दिल्याने यादव यांचा राजीनामा स्वीकारला. प्रकाशक सुनील मेहता यांनी यादव यांच्या कादंबरीचे प्रकाशन केले होते आणि संमेलनाच्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणाची प्रत मागितल्यावर वाद अधिक चिघळला. या संमेलनात साहित्य, समाज आणि राजकारण यांचे अविभाज्य नाते पुन्हा अधोरेखित झाले.

(लेखक सकाळचे सहयोगी संपादक आहेत.)

सातारा जिल्ह्यातील संमेलनांनी काय दिले?

सातारा जिल्ह्यातील सहा संमेलनांचा आढावा घेतला तर दिसते की, प्रत्येक संमेलनाने त्या काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि साहित्यिक प्रश्नांना प्रखरपणे स्पर्श केला.

१९०५ : भाषाशुद्धी आणि मराठी साहित्याचे पाय रोवणे.
१९६२ : साहित्याचा सामाजिक जबाबदारीसाठी वापर.
१९७५ : आणीबाणीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण.
१९९३ : लोकसाहित्य आणि ग्रामीण वाचकांपर्यंत पोहोच.
२००३ : आधुनिक साहित्य, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाचा प्रभाव.
२००९ : साहित्य, समाज आणि राजकारण यांचे अविभाज्य नाते.



उद्घाटन सोहळा, १९९३ चे साहित्य संमेलन सातारा

नोंद

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी सर्वाधिक मोठा पाठपुरावा सातारा जिल्ह्याने केला आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष वेधण्यासाठी तब्बल एक लाख पत्रे सातारा जिल्ह्याने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेच्या वतीने श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली पाठवण्यात आली होती.



पद्माकर पाठकजी
मो.: ८८८८८०१४४३

संमेलनाध्यक्ष सातारचे

आज शतकाच्या उंबरठ्यावर होत असलेले हे ९९ वे साहित्य संमेलन व त्याचे ठिकाण सातारा, यामुळे सहजच मागे वळून बघताना या शतकी वाटचालीत सातारचे योगदान काय आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधत असताना सातारा जिल्ह्यातील अनेक लेखक, कवी, समीक्षक यांचे स्मरण होते.

साहित्यवेध

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची परंपरा शतकाच्या उंबरठ्यावर आहे. सन १८७८ मध्ये ग्रंथकारांचे संमेलन म्हणून सुरू झालेली ही वाटचाल, वाटेतील काही अडथळे पार करत करत ९९ व्या संमेलनापर्यंत पोहोचली आहे. पारतंत्र्याचा काळ, दोन महायुद्धांचे परिणाम, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही उद्भवलेले काही मतभेद या सगळ्यांना तोंड देत ही साहित्य संमेलनाची परंपरा चालू राहिली आणि यापुढेही चालू राहणार आहे यात काही शंका नाही. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सातारचे म्हणून किती साहित्यिक विराजमान झाले होते यासाठी भूतकाळात डोकावले असताना काय दिसते....

दादासाहेब करंदीकर

सन १८७८ मध्ये पुणे येथे संमेलनाची सुरुवात झाल्यानंतर दरवर्षी हे संमेलन घ्यायचे या विचारावर एकमत झाले. तरी प्रत्यक्षात काय घडले? तर पुढील सहा वर्षे काहीच घडले नाही आणि सन १८८७ मध्ये पुन्हा पुणे येथेच संमेलन झाले. त्यानंतर वीस वर्षांच्या कालावधीनंतर १९०७ या वर्षात तिसरे संमेलन सातारला झाले. या संमेलनाचे नुसते ठिकाण सातारा नव्हते, तर त्या संमेलनाचे अध्यक्षही सातारा येथीलच होते.

तो बहुमान ज्यांना मिळाला ते रघुनाथ पांडुरंग करंदीकर हे दादासाहेब करंदीकर या नावाने प्रख्यात होते. त्यांचा जन्म २१ ऑगस्ट १८७७ चा आणि त्यांचे निधन २४ एप्रिल १९३७ रोजी झाले. हा त्यांचा जीवनकाल होता. करंदीकर हे एक व्यासंगी कायदेपंडित, स्वातंत्र्य चळवळीतले प्रभावी नेते, साहित्यिक आणि लोकमान्य टिळकांचे सहकारी होते. त्यांचा जन्म पंढरपूर येथे खाडिलकर घराण्यात झाला होता; परंतु ते पाच वर्षांचे असताना आपली बहीण सत्यभामा यांचे बरोबर सातारला राहण्यास आले व पुढे सत्यभामाबाईंचे पती पांडुरंग करंदीकर यांनी

नोंद

सातारा किल्ल्याच्या नावावरून शहरास सातारा नाव पडले आहे. या नावाविषयी अनेक कथा-दंतकथा असून सातदरा, सप्ततारा, महादरा या शब्दांवरून हे आले असावे. काही तज्ज्ञांच्या मते येथील किल्ल्यावरील सप्तऋषींच्या मंदिरामुळे किंवा किल्ल्यास असलेले सतरा बुरूज वा द्वारे यांतील सतरा शब्दाचा अपभ्रंश होऊन सातारा हे नाव रूढ झाले असावे.

रघुनाथ यांना दत्तक घेतले. तेव्हापासून ते सातारा येथेच राहिले व येथेच त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे प्रथम बार्शी कोर्टात बेलिफाची नोकरी, नंतर कायद्याचा अभ्यास करून वकिलीची परीक्षा उत्तीर्ण व नंतर नोकरी सोडून साताऱ्यात वकिलीची सुरुवात, असा त्यांचा जीवनक्रम घडला.

त्यांनी सामाजिक कार्यात सहभागी होऊन सार्वजनिक सभेच्या सातारा शाखेचे कार्यवाहपद भूषवले. स्वदेशी चळवळीत विविध कामे केली. व्याख्याने दिली. लेखन केले. विलायतेतून धाडलेली पत्रे, केदार खंड यात्रा पत्रे, कै. रघुनाथ पांडुरंग ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांची दैनंदिनी अशी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

नरसिंह चिंतामण केळकर

१९०७ च्या संमेलनानंतर साताऱ्याच्या साहित्यिकाला अध्यक्षपदाचा मान मिळाला, १९२१ या वर्षात बडोदे येथे भरलेल्या साहित्य संमेलनात. या संमेलनाचे अध्यक्ष होते नरसिंह चिंतामण केळकर. २४ ऑगस्ट १८७२ ते १४ ऑक्टोबर १९४७ हा न. चिं. केळकर यांचा जीवनकाळ. त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब या गावी झाला असला तरी मिरज, कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी त्यांनी एल.एल.बी. पर्यंतचे शिक्षण घेतले आणि १८९७ मध्ये त्यांनी सातारा येथे राहून वकिलीस प्रारंभ केला. केसरी व मराठा या वृत्तपत्रांचे वेळोवेळी संपादन, सह्याद्री मासिकाचे संपादन, नाटक, कादंबरी, लघुकथा, कविता, निबंध अशा विविध प्रकारांतील विपुल लेखन (प्रकाशित लेखनाची पृष्ठसंख्या १७०००) त्यांनी केले. साहित्यसम्राट म्हणून ते ओळखले जातात. १९२७ च्या साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्षही होते.

पंतप्रतिनिधी भवानराव

१९२१ नंतर १९३७ च्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी एका साताऱ्याच्या सुपुत्राची निवड झाली होती. सातारा जिल्ह्यात औंध हे संस्थान स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रसिद्ध आहे. या संस्थानाचे पंतप्रतिनिधी भवानराव ऊर्फ बाळासाहेब श्रीनिवासराव (२४ ऑक्टोबर १८६८ ते १३ एप्रिल १९७१ हा यांचा जीवनकाळ) हे १९३७ च्या संमेलनाचे अध्यक्ष होते. संस्थानिक म्हणून त्यांची कारकीर्द संस्मरणीय आहे. विद्या, कला व शरीर संवर्धन याविषयी त्यांना फार आस्था होती. ते चित्रकार होते. वेरूळ (१९२८) आणि अजिंठा (१९३०) हे त्यांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये चित्रशिल्पांविषयी त्यांनी केलेले लेखन एक मार्मिक कला समीक्षा म्हणून वाचनीय आहे. आहार आणि व्यायाम शास्त्रावरही त्यांनी ग्रंथ लिहिले आहेत. ते स्वतः उत्तम कीर्तनही करत असत. बनारस विद्यापीठ व भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरास त्यांनी भरीव आर्थिक साहाय्य केले होते.

यशवंत दिनकर पेंढारकर

सातारा जिल्ह्यातील चाफळ गावी ९ मार्च १८९९ रोजी जन्मलेले यशवंत दिनकर पेंढारकर ऊर्फ कवी यशवंत हे १९७० च्या मुंबई येथे भरलेल्या ३३ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' ही त्यांची कविता त्यांची ओळख बनून राहिली आहे. विविध भावनांवर काव्य लिहिणारे यशवंत, बडोदा संस्थानचे राजकवी होते; तर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्यांचा महाराष्ट्र कवी म्हणून गौरव करण्यात आला होता. १९१५ते १९८७ या प्रदीर्घ कालखंडात त्यांनी काव्य निर्मिती केली. महाकाव्य, खंड काव्य, बालगीते, भावगीते असे विविध काव्यप्रकार निर्माण करणाऱ्या कवी यशवंतांचे २६ नोव्हेंबर १९८७ रोजी निधन झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

२७ जानेवारी १९०१ मध्ये जन्मलेले लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्म धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर गावी झाला होता; परंतु वयाच्या चौदाव्या वर्षापासून ते वाईच्या प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले व पुढे त्यांचे वास्तव्य वाई मध्येच राहिले. न्याय वेदान्तादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन, धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य, मराठी विश्वकोशाचे कार्य, अनेक ग्रंथांचे लेखन, व्याख्याने असे लक्ष्मणशास्त्री यांचे कार्य विस्तृत प्रमाणात असून कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून त्यांना 'तर्कतीर्थ' ही पदवीही देण्यात आली होती.

अशा शास्त्रीबुवांनी १९७४ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या ३७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यांचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हा हेच असल्याने त्यांची गणना साताऱ्याच्या साहित्यिकांच्यातच होते. त्यांचे निधन २७ मे १९९४ रोजी वाई येथेच झाले.

श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

सातारा जिल्ह्यातील पाल (पाली) येथे प्राथमिक व

भिलार हे भारतातील पहिले पुस्तकांचे गाव आणि एक पर्यटन स्थळ सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात आहे. वाई शहरापासून पश्चिमेस सुमारे २० कि. मी., तर महाबळेश्वरपासून पूर्वेस १७ किमी. अंतरावर हे स्थित आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या अंतर्गत 'पुस्तकांचे गाव' या अभिनव उपक्रमाची आखणी वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी करण्यात आली.

नोंद

माध्यमिक शिक्षण झालेले, साताऱ्याच्या सरकारी शाळेतून मॅट्रिक झालेले, श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९०१ रोजी झाला होता. मराठी साहित्यात ते श्री. के. क्षी. नावाने लेखक व समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. विविध टीका लेखातून त्यांनी सौंदर्यवाद, गूढवाद, नव मानवतावाद, वास्तववाद इत्यादी वाङ्मयीन वादांसंबंधी केलेली मूलभूत चर्चा उद्बोधक व सखोल आहे. १९७९ मध्ये मिरज येथे झालेल्या ४१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. २९ एप्रिल १९८० मध्ये त्यांचे निधन झाले.

वसंत कानेटकर

१९८८ मध्ये ठाणे येथे झालेल्या ६१ व्या संमेलनाचे अध्यक्ष असलेले वसंत कानेटकर यांचा जन्म २० मार्च १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर या गावी झाला होता. कवी गिरीश हे त्यांचे वडील, महाराष्ट्रभर उत्कृष्ट कवी म्हणून प्रख्यात होते. लघुकथा, कादंबरी या साहित्य प्रकारातून वसंतराव नंतर नाट्य लेखनाकडे वळले. 'वेड्याचे घर उन्हात' हे त्यांचे पहिले नाटक! पुढे लोकप्रिय नाटककार म्हणून गणले जाणारे कानेटकर यांनी आपल्या ७४ वर्षांच्या लेखन कारकिर्दीत ४२ तीन अंकी नाटके, चार कादंबऱ्या व अनेक कथा लिहिल्या. ३० जानेवारी २००१ रोजी हा साताऱ्याच्या भूमीतील प्रतिभावंत लेखक महायात्रेला निघून गेला.

वसंत बापट

मराठी साहित्य क्षेत्रातील आणि साताऱ्याच्या भूमीतील मराठी रसिकांना भावलेला दुसरा वसंत म्हणजे श्रेष्ठ कवी वसंत बापट होय! सातारा जिल्ह्यातील कराड येथे २५ जुलै १९२२ रोजी जन्मलेले वसंत बापट यांच्यावर राष्ट्रसेवा दल आणि साने गुरुजी यांचे संस्कार झाले होते. त्याचा प्रभाव १९७२ मधील त्यांच्या 'बिजली' या काव्यसंग्रहातील कवितांवर दिसून येतो; परंतु पुढे त्यांचे अनुभव क्षेत्र विस्तारत गेल्यानंतर त्यांनी आपल्या काव्यातून विविध विषय हाताळले. जनजागृती, देशप्रेम या त्यांच्यातील आवडीमुळेच त्यांच्या हातून, 'जिंकू किंवा मरू', सारखे काव्य, 'संयक्त महाराष्ट्राचा पोवाडा' अशा विविध रचना निर्माण झाल्या.

१९९९ मध्ये मुंबई येथे भरलेल्या ७२ व्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. बालनाट्य, प्रवासवर्णन, लोककला या विषयावरही विपुल लेखन करणारे प्राध्यापक वसंत बापट यांचे १७ सप्टेंबर २००२ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले.

माडगूळकर बंधू

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले साताऱ्याचे लेखक या विषयाच्या अनुषंगाने हा आढावा घेत असताना १९७३ च्या संमेलनाचे अध्यक्ष ग. दि. माडगूळकर व १९८३ च्या संमेलनाचे अध्यक्ष व्यंकटेश माडगूळकर या दोन महान साहित्यिकांचा उल्लेख आवश्यक ठरतो; परंतु या दोन्ही साहित्यिकांचा जन्म ज्या काळात झाला त्या काळात सातारा जिल्ह्याचे क्षेत्र खूप मोठे होते. कालांतराने त्यातील काही भाग हा सांगली जिल्ह्यात गणला जाऊ लागला. ग. दि. मांचा जन्म शेटफळ व व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म माडगूळ गावचा! ही दोन्ही गावे त्यावेळी सातारा जिल्ह्यातच होती. असे हे दोघे लेखक बंधू, 'गीत रामायण' व 'बनगरवाडी' या मुख्य रचनांमुळे प्रसिद्ध असले तरी त्या शिवाय त्यांचे प्रचंड लेखन मराठी साहित्याचे भांडारात दिसून येते.

श्रीपाद महादेव माटे

श्रीपाद महादेव माटे हे ज्येष्ठ लेखक १९४३ च्या सांगली येथील संमेलनाचे अध्यक्ष होते. २ सप्टेंबर १८८६ रोजी त्यांचा जन्म विदर्भातील शिरपूर या गावी झाला होता; परंतु त्यांचे शिक्षण हे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे झाल्यामुळे ते साताराचेच लेखक म्हणून ओळखले जातात. भाषेचा जन्म व विकास याचे विवेचन आपल्या 'रसवंतीची जन्मकथा' या ग्रंथात मांडणारे श्री. म. माटे अभ्यासू वृत्तीचे होते. विविध कथांचे लेखन आणि ग्रंथांचे लेखन आपल्या माघारी ठेवून २५ डिसेंबर १९५७ रोजी ते निजधामास गेले.

साताराच्या मातीतून तसे अनेक साहित्यिक निर्माण झाले आहेत व होत आहेत. त्यामधील संमेलनाच्या अध्यक्षपदावर नियुक्त झालेल्या साहित्यिकांचा धावता आढावा येथे शब्द मर्यादेमुळे अल्प स्वरूपात घेतला आहे. त्या सर्वांचा स्वतंत्र परिचय करून द्यायचा झाल्यास पाच हजार शब्दांची किमान मर्यादा तरी लागेल, एवढे त्यांचे कर्तृत्व आहे. साताराच्या भूमीतील जे साहित्यिक अध्यक्ष पदापर्यंत पोहोचले नाहीत त्यांचे कर्तृत्वही महान आहे, हे ग्रंथागारात डोकावले तरी कळते.



सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील धुमाळवाडी गावानं राज्यातील पहिलं 'फळांचं गाव' हा दर्जा मिळवला आहे. या गावात १९८० नंतर फळबागा लावण्याकडे शेतकरी वळले होते. या गावातील फळांचा दर्जा, गुणवत्ता, चव उत्तम असल्याने बाजारपेठेत फळांच्या गावांचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे धुमाळवाडी गाव 'फळांचे गाव' म्हणून लौकिकप्राप्त ठरले आहे. नुकतीच या गावाला राजमान्यता मिळाली आहे.



औंधचे महाराज श्री पंतप्रतिनिधी



श्री. दादासाहेब करंदीकर



कवी यशवंत



तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी



श्री. वसंत कानेटकर

या सर्व साहित्यिकांना त्यांच्या लेखन कर्तृत्वाबद्दल विनम्र अभिवादन करून आणि सातारच्या संमेलनात सामील झालेल्या सर्व रसिकांनाही विनम्र अभिवादन करून थांबतो. इति लेखन सीमा.

(लेखक चित्रपट अभ्यासक आणि साहित्यिक आहेत.)

पुस्तकांचे गाव, फळांचे गाव याप्रमाणे सातारा जिल्ह्यात राज्यातील आणि देशातील पहिलं 'मधाचं गाव' आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवला जात असून यासाठी महाबळेश्वरनजीक असलेल्या मांघर गावाची निवड करण्यात आली आहे. महाबळेश्वरचा हा परिसर मधुमक्षिका पालनासाठी आधीपासूनच प्रसिद्ध आहे.

नोंद



साहित्यातील सातारचे योगदान

डॉ. उमेश करंबेळकर
मो.:९८२२३९०८१०

६६ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन १९९३ साली साताऱ्यात उत्साहाने पार पडले. त्यानंतर पुन्हा ३३ वर्षांनी शतकाच्या उंबरठ्यावर ९९ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन सातारा शहरात होत आहे. त्या निमित्ताने एकूणच साताऱ्यातील साहित्यिक, साहित्यविषयक चळवळी, उपक्रम, ग्रंथालये इ. चा आढावा घेणे उचित ठरते.

साहित्यसेवा

मराठी साहित्याच्या इतिहासात म्हणजे १८७० च्या पूर्वी डोकावल्यास त्या काळात बहुतेक साहित्य काव्य स्वरूपात लिहिले गेले. या काळातील कवींची संत, पंत आणि तंत अशा तीन प्रकारांत विभागणी केली जाते. विशेष म्हणजे या तीनही प्रकारांत साताऱ्याचे मोठे योगदान आहे.

संतकाव्य

संत साहित्यामध्ये सज्जनगडनिवासी समर्थ रामदासांचे नाव अग्रक्रमाने येते. दासबोध, मनाचे श्लोक, असंख्य आरत्या यासारखे विपुल काव्य करणाऱ्या समर्थांचा 'दिसामाजि काहीतरी ते लिहावे। प्रसंगी अखंडित वाचीत जावे।।' हा उपदेश आजच्या वाचनसंस्कृती लयाला जात असलेल्या काळात चपखलपणे लागू होतो. यातूनच त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. समर्थांशिवाय त्रिपुटीचे गोपालनाथ महाराज आणि सातारचे विष्णुदास महाराज यांनीही संतकाव्यात भर घातली.

पंत कवींमध्ये वामन नरहरी शेष ऊर्फ वामन पंडित हे समर्थांचे समकालीन होते. वाई जवळील भोगाव येथे त्यांची समाधी आहे. हरि विलास, भागवती रामायण, काव्यसंग्रह (४ भाग) यासह विपुल ग्रंथरचना त्यांनी केली. तंत म्हणजे शाहिरी कवी. यामध्ये खटाव तालुक्यातील डिस्कळ गावात शाहीर हैबतींची नोंद घ्यायला हवी.

साहित्यिकांचे भरीव योगदान

१८७० नंतर मराठी साहित्य सर्वांगाने बहरू लागले. काव्याबरोबरच कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, निबंधलेखन, कथा, प्रवासवर्णन, ललित, वैचारिक, नाटक, बाल, धार्मिक एवढंच नव्हे तर विज्ञान इत्यादी विविध प्रकारच्या वाङ्मयाची

नोंद

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात साताऱ्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. असहकार आंदोलनाशिवाय १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनादरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश अधिकाऱ्यांना हुसकावून लावून पर्यायी पत्री सरकार स्थापन करण्यात आले. त्यामुळे सातारा जिल्हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे केंद्र ठरला.



भर पडू लागली. अर्थात काव्य निर्मितीचे प्रमाण आजच्याप्रमाणे तेव्हाही इतर प्रकारांहून जास्त होते. लेखिकादेखील नावारूपास येऊ लागल्या. वरील बहुतेक सर्व साहित्य प्रकारांत साताऱ्यातील साहित्यिकांचे भरीव योगदान दिसून येते.

राजा शिवाजी हे महाकाव्य (६ खंड) लिहिणारे महादेव मोरेश्वर कुंटे क्षेत्र माहुलीचे. थोर समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर टेंभूचे. 'अजिंक्यतारा', 'उमज पडेल तर', 'उपेक्षा', 'न पटणारी गोष्ट' अशा जवळपास पस्तीस कादंबऱ्या लिहिणारे ना. ह. आपटे कोरेगावचे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयातर्फे 'ना. ह. आपटे साहित्यिक पुरस्कार' देण्यात येतो. १९७५ ते १९३१ या काळात अनेक वृत्तपत्रे आणि मासिके काढणारे 'संदेश'कार अच्युत बळवंत कोल्हटकर मूळचे वाईचे. मराठी भाषेच्या काव्य, शास्त्र, विनोद त्रयींमधील शास्त्र संज्ञेचे प्रतिनिधी म्हणून मान्यता पावलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची कर्मभूमी वाई होती. मराठी रंगभूमीला पडत्या काळात ज्यांच्या नाटकांनी तारले ते बाळ कोल्हटकर सातारचे. गेल्या शतकातील विख्यात समीक्षक व विचारवंत श्री. के. क्षीरसागर सातारा जिल्ह्यातील पाली गावचे, तर भाषाशास्त्राचे पंडित कृ. पां. कुलकर्णी ओंडचे. फलटणच्या मुधोजी हायस्कूलचे प्राचार्य शंकर केशव कानेटकर ऊर्फ कवी गिरीश यांचं जन्मगाव रहिमतपूर. मसाप शाहूपुरी, सातारा शाखेने तेथे त्यांचा अर्ध पुतळा उभारला आहे. विख्यात नाटककार (अंधारयात्रा, उद्ध्वस्त धर्मशाळा) आणि निबंध लेखक गो. पु. देशपांडे देखील रहिमतपूरचे. युगप्रवर्तक कवी बा. सी. मर्ढेकर यांचे मूळ गाव साताऱ्याजवळील मर्ढे होय. तेथील त्यांच्या घराचे मसापच्या सातारा (शाहूपुरी) शाखेने नूतनीकरण करून तेथे मर्ढेकरांचे सुंदर स्मारक निर्माण केले आहे. १ मे, १९६० रोजी निर्माण झालेल्या महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, सुसंस्कृत साहित्यप्रेमी यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणाची कर्मभूमी कराड. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले. याचबरोबर 'लंपन' ही व्यक्तिरेखा अजरामर करणारे प्रकाश नारायण संत, मौजेचे साक्षेपी संपादक आणि 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी, चित्रकार कवयित्री वासंती मुजुमदार, बालसाहित्य आणि ललित लेखक विद्याधर म्हैसकर, कवयित्री आसावरी काकडे हे सर्व साहित्यिक कराडचेच. याचबरोबर सुप्रिया दीक्षित (अमलताश) डॉ. सुलभा आणि डॉ. अजय ब्रह्मनाळकर यांचीही नोंद घेणे महत्त्वाचे ठरते. आपल्या वक्तृत्वाने ज्यांनी अवघ्या महाराष्ट्राला मोहिनी घातली ते प्राचार्य शिवाजीराव भोसले तसेच पत्रकार लेखक आणि मसापचे जिल्हा प्रतिनिधी रवींद्र बेडकिहाळ फलटणचे.

कादंबरीकार

कादंबरी या प्रकारात साताऱ्याचे वि. वा. हडप, मायणीचे व. ह. पिटके, माधव पिटके, कोरेगावचे प्रा. व. बा. बोधे, वाईचे रवींद्र भट, सातारचे पद्माकर गोवईकर, द्वारकानाथ लेले, जगन्नाथ शिंदे. प्रा. यशवंत पाटणे, दिलीप पाठक यांच्या लेखनाचा समावेश होतो. येथे २७ पुस्तके ज्यांच्या नावावर जमा आहेत असे डॉ. राजेंद्र माने तसेच नवोदित नीलेश महिगावकर यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. याचबरोबर 'उपरा'कार लक्ष्मण

सातारा शहरापासून सुमारे ३० किमी अंतरावर वसलेला चाळकेवाडी पवनचक्की प्रकल्प हा आशियातील सर्वांत मोठ्या वाऱ्याच्या ऊर्जानिर्मिती प्रकल्पांपैकी एक आहे. ५ किलोमीटरच्या विस्तीर्ण पठारावर पसरलेला हा प्रकल्प संपूर्ण परिसराला स्वच्छ ऊर्जा पुरवतो. हा प्रकल्प पर्यटकांचे आकर्षण झाले असून पर्यटक इथे आवर्जून भेट देतात.

नोंद

माने, शाम भुर्के, मधुसूदन नेने, द. स. हर्षे, संभाजीराव पाटणे, प्रा. पुरुषोत्तम शेठ, प्रा. सुहास साळुंखे, पद्माकर पाठकजी, दीपक मोडक (राथमुनिया), जयवंत गुजर, डॉ. उमेश करंबेळकर (ओळख पक्षिशास्त्राची), विनोद कुलकर्णी (मोठ्या बँकेची छोटी गोष्ट : आत्मकथन), ओंकार पाटील (ग्राहक संरक्षण कायदा), दीपक सुधाकर कुलकर्णी (स्वयं व्यवस्थापन), जगदीश पवार (नाटक : साम्राज्य), डॉ. प्रसन्न दाभोळकर (बाल साहित्य) यांनी चरित्र, कथा, लेखन, विज्ञान अशा विषयांवर लेखन केले आहे. डॉ. मोहन सुखटणकर आणि डॉ. शंतनु अभ्यंकर यांनी रंजक शैलीत वैद्यकीय विषयावर लेखन केले. मात्र, डॉ. अभ्यंकरांची अकाली एक्झिट चुटपूट लावून जाते.



बा. सी. मर्ढेकर



बाळ कोल्हटकर



वसंत कानेटकर

गेल्या काही वर्षांत प्रवास, ट्रेकिंग, पदभ्रमण या विषयावर देखील विपुल प्रमाणात लेखन झाले आहे. यामध्ये अरुण गोडबोले (सातारा ते सिंगापूर) वसंत नलावडे (वेण्णा ते व्होल्गा), आदित्य फडके, डॉ. संदीप श्रोत्री (कासवाचे बेट), मिनिष उमराणी (ग्रीस), सुनील शेडगे यांच्या लेखनाचा समावेश होतो. अरुण गोडबोलेंनी लेखनाबरोबरच 'कौशिक प्रकाशना'द्वारे अनेक पुस्तके प्रकाशित केली. पुसेगावसारख्या ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या सुनिताराजे पवार यांनी 'संस्कृती' प्रकाशनाच्या माध्यमातून अनेक नवोदित लेखकांच्या प्रतिभेला वाव दिला.

वैचारिक साहित्य

डॉ. आ. ह. साळुंखे (विद्रोही तुकाराम), डॉ. नरेंद्र दाभोळकर (तिमिरातूनी तेजाकडे), डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर (शोध स्वामी विवेकानंदांचा), किशोर बेडकिहाळ (संपादन : वेध नेहरू विचार विश्वाचा), डॉ. हमीद दाभोळकर (विवेकाच्या वाटेवर), विश्वास दांडेकर (धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे), डॉ. शरद अभ्यंकर यांनी आपल्या लेखनाद्वारे वैचारिक साहित्य समृद्ध केले. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकरांनी मराठी शोधपत्रकारिता वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवली. दीर्घकाळ समीक्षेच्या क्षेत्रात घालवल्यावरही ज्यांचा 'स्नेहशील' शब्दाने गौरव व्हायचा ते शंकर सारडा साताऱ्याचेच.

कवितेचे क्षेत्र

साहित्यातील योगदानात साताऱ्यातील कवींचाही मोठा वाटा आहे. प्रमोद कोपर्डे, अरविंद हसमनीस, लक्ष्मीकांत रांजणे, श्रीनिवास वारुंजीकर, गणेश बोडस, प्रदीप कांबळे, वसंत शिंदे, सुभाषचंद्र सरदेशमुख यांसारख्या कवींनी आपल्या सकस काव्य निर्मितीने हातभार लावला आहे. गेल्या काही वर्षांत कवयित्रींच्या संख्येतही लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. यामध्ये मानसी लाटकर, अंजली ढमाळ, डॉ. अदिती काळमेख, डॉ. राजश्री देशपांडे, प्रमिला कुलकर्णी, कांता भोसले यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. लेखिकांमध्ये विजया शरद आठवले, प्रतिभा द्वारकानाथ लेले (बाल साहित्य) निर्मला सारडा, ज्योत्स्ना कोल्हटकर, संगीता धायगुडे, पूनम ससाणे (कथा), ॲड. सीमंतिनी नूलकर



सातारा जिल्ह्यात युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले कास पठार, मनमोहक ठोसेघर धबधबा आणि नयनरम्य महाबळेश्वर ही आकर्षणाची मुख्य केंद्रे आहेत. साहसप्रेमींसाठी वासोटा किल्ल्याचा ट्रेक आकर्षण असते. कास पठारावरील पुष्पवैभव पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक येत असतात.

(प्रवास, खाद्यसंस्कृती), संध्या चौगुले (काव्य), ॲड. शुभांगी कुलकर्णी (ललित) यांची कामगिरी लक्षणीय आहे. नवोदितांमध्ये शुभांगी दळवी (लेस्बियन) आणि विद्या पोळ- जगताप (बाय गं) यांच्या कादंबऱ्यांनी रसिक वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

चळवळी आणि उपक्रम

साहित्यिकांबरोबरच साताऱ्यातील साहित्यविषयक चळवळींचा आणि उपक्रमांचाही आढावा घेऊ.

डॉ. आंबेडकर अकादमीतर्फे १९९२- २००७ अशी सलग १५ वर्षे- दोन तीन दिवसांच्या साहित्यविषयक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. प्रतिसाहित्य संमेलन असं सार्थ वर्णन करण्यात येणाऱ्या 'सातारा ग्रंथ महोत्सवा'चे २५ हून अधिक वर्षे सातत्याने शिरीष चिटणीसांच्या नेतृत्वाखाली ग्रंथ महोत्सव समितीतर्फे आयोजन केले जाते. सातारा नगर परिषद आणि म.सा.प. सातारा (शाहूपुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने गेली चौदा वर्षे सातत्याने २८ फेब्रुवारी ते १४ मार्च हा 'मराठी भाषा पंधरवडा' म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्रातील पहिले पुस्तकाचे गाव पाचगणीजवळील भिलार हे आहे. यातून प्रेरणा घेऊन प्रल्हाद पारटे यांनी जकातवाडी हे 'कवितेचं गाव' म्हणून नावारूपास आणलं. या सर्व साहित्यिकांचे लेखन वाचनप्रेमींना पुरविण्याचे काम सातारा जिल्ह्यातील अनेक ग्रंथालये इमाने इतबारे करत आहेत. काही ग्रंथालयांनी शतकोत्तर वाटचाल सुरू ठेवली आहे. यामध्ये सातारचे सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखले जाणारे श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, रहिमतपूरचे हिंद वाचनालय, कराडचे नगर वाचनालय आणि वाईचे टिळक ग्रंथालय यांचा समावेश होतो. साताऱ्यातील धन्वंतरी पतसंस्था आणि अश्वमेध पतसंस्था यांचे स्वत:चे ग्रंथालय आहे, हे विशेष.

साहित्यातील साताऱ्याच्या योगदानाचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा नम्र प्रयत्न. यात काही त्रुटी असतील, काही साहित्यिकांचे उल्लेख करण्याचे राहून गेले असेल, याची जाणीव आहे. याला लेखमर्यादा हे कारण आहेच; पण साहित्यिकांची माहिती सहजासहजी उपलब्ध होत नाही, हेही आहे. यावर उपाय म्हणजे प्रत्येक तालुक्यातील परिषदेच्या शाखांनी आपल्या तालुक्यातील साहित्यिकांची सूची, त्यांची साहित्य निर्मिती तसेच विविध उपक्रम यांची माहिती त्यांच्या वेबसाईटवर टाकणे व वेळोवेळी तिचे नूतनीकरण करणे हा होय. असे केल्यास ते देखील साहित्यातील साताऱ्याचे मोठे योगदान ठरेल.

(लेखक वैद्यकीय व्यावसायिक आणि साहित्यिक आहेत.)



सातारा जिल्हा केवळ निसर्ग आणि इतिहासासाठीच प्रसिद्ध नाही, तर कंदी पेढा आणि भौगोलिक निर्देशांक (जीआय) टॅग मिळालेली महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी यांसाठीही ओळखला जातो. कोणताही आनंद किंवा विजयोत्सव साजरा करण्यासाठी कंदी पेढा हवाच. महाराष्ट्र आणि देशाबाहेरही या कंदी पेढ्याची गोडी पोहोचली आहे.

नोंद



सातारा नगरीचा समृद्ध वारसा

डॉ. ज्योत्स्ना कोल्हटकर
मो.: ९४०३७०३६४१

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि समर्थ रामदासांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या सातारा नगरीत ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे, ही सर्व सातारकरांच्या दृष्टीने अतिशय अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

साहित्यवारसा

सातारा आहे सात डोंगराच्या कुशीत वसलेलं गाव. सातारा ही जशी शूर वीरांची भूमी आहे, तशीच संतांचीही भूमी आहे. प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालून सामान्य संसारी माणसाला परमेश्वर प्राप्तीचा मार्ग दाखवणारे समर्थ रामदास यांचा जन्म जरी जांबला झाला तरी सातारा हीच त्यांची कर्मभूमी आहे. समाज जागृती आणि समाजप्रबोधन हेच या संतांच्या आयुष्यातले ध्येय होते आणि त्याच्या पूर्ततेसाठीच त्यांनी अवघे आयुष्य वेचले. समर्थांच्याच पावलावर पाऊल ठेवून त्यांचे कार्य पुढे चालू ठेवणारे त्यांचे शिष्य जयराम स्वामी वडगावकर, कल्याण स्वामी, कृष्णदयार्णव कोपर्डेकर, रंगनाथ स्वामी निगडीकर, तसेच गोंदवलेकर महाराज, त्रिपुटीचे गोपाळनाथ महाराज, ब्रह्मेंद्रस्वामी, बाबा महाराज सातारकरांचे वडील श्री. आप्पासाहेब महाराज अशा अनेकांनी कीर्तन-प्रवचन यातून समाज जागृती केली. साध्या सोप्या अभंग रचनाही केल्या. पुढच्या काळात 'रुक्मिणी स्वयंवर' आणि 'यथार्थ दीपिका' यामुळे प्रसिद्धी पावलेले पंडित कवी वामन पंडित हेही सातारा जिल्ह्यातले.

शाहिरी परंपरा

आजही साताऱ्याचे नाव घेतले की, संत परंपरेबरोबरच आठवते ती साताऱ्याची शाहिरी परंपरा. कलगीसम्राट शाहीर हैबती हेही सातारा जिल्ह्यातल्या खटावचे रहिवासी, तर पठ्ठे बापूराव हेही पूर्वीच्या सातारा जिल्ह्यातले. सातारचे शाहीर म्हणून त्यांचे नाव घेतले जाते ते अण्णा भाऊ साठे, अलीकडच्या काळातले कृष्णराव साबळे, शाहीर पुंडलिक फरांदे यांनी साताऱ्याच्या नावलौकिकात भर घातली. संतांचे कार्य पुढे चालू ठेवणाऱ्या हैबतबाबांनी सातारा जिल्ह्यातल्या आरफळ येथून पंढरपूरची आषाढी वारीची प्रथा सुरू केली. या शाहिरी वाङ्मयाप्रमाणे साताऱ्ची

नोंद

सातारा जिल्ह्यात भटक्या विमुक्तांची चळवळ ही ज्येष्ठ लेखक 'उपराकार' लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. नारायण जावलीकर, मच्छिंद्र जाधव असे अनेक कार्यकर्ते या चळवळीत सहभागी झाले आहेत. भटक्या विमुक्त जाती जमातींचा तपशीलवार अभ्यास, त्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेऊन त्यांच्या प्रश्नांवर ही संघटना काम करत आहे.

लावणी परंपरा ही मोठी आहे. यमुनाबाई वाईकर, कांताबाई सातारकर, साहेबराव नांदवळकर, द्वारका आणि अनुसया सातारकर, रोशन सातारकर यांनी लावणीवर आपला ठसा उमटविला आहे. यमुनाबाई वाईकरांनी तर लावणीतही खानदानी सौंदर्य असते हे दाखवून दिले आहे.

अनेक मान्यवर

समाज सुधारणेचे व्रत आयुष्यभर चालवणारे गोपाळ गणेश आगरकर हे कराड जवळच्या टेंभू या गावचे. त्यांनी १८८३ मध्ये 'विकार विलासित' हे हॅम्लेटचे भाषांतर केले, तर वाईच्या महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी १८६७ मध्ये 'ऑथेल्लो' नाटकाचा अनुवाद केला. ही नाट्यलेखनाची परंपरा बाळ कोल्हटकर यांच्या नंतरही चालू आहे. कोल्हटकर यांच्यानंतर माधवराव पाटणकर, ना. वि. कुलकर्णी यांची परंपरा पुढे चालवली ती शां. गो. गुप्ते, वसंतराव कानिटकर, गो. पु. देशपांडे, दिलीप जगताप यांनी. बाळ कोल्हटकर यांचा वारसा पुढे चित्तरंजन कोल्हटकर यांनी जोपासला आणि आनंद घाटुगळे, जयवंत गुजर, रवींद्र भट, तुषार भद्रे यांनी हा वारसा पुढे चालवला. 'हिरव्या चादरीवर' या सदरामुळे प्रसिद्ध झालेले वा. य. गाडगीळ हे सातारच्या जवळ लिंबगाव येथील. नाटककारांप्रमाणेच अनेक कवीही सातारा जिल्ह्यात होऊन गेले. कवी यशवंत(चाफळ), कवी गिरीश (रहिमतपूर), तसेच रविकिरण मंडळातले कवी पंडित सप्रे, ना. वा. टिळक, महादेव मोरेश्वर कुंटे, वसंत बापट, द. वि. केसकर या सातारच्या सुपुत्रांनी काव्यक्षेत्रात मुक्त विहार केला. नवकवितेचे जनक असणारे बा. सी. मर्ढेकर हे साताराजवळच्या मर्ढे गावचे. स्त्रियांना शिक्षणाची वाट दाखवणाऱ्या पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थान असणारे नायगाव हे सातारा जिल्ह्यातीलच. हा साहित्यिकांचा वारसा पुढे चालवणारे वासंती मुजुमदार, अशोक नायगावकर, लक्ष्मीकांत रांजणे, उमेश सणस, प्रमोद कोपर्डे, सुरेश गायकवाड, मधुकर जोशी, शैलजा चरेगावकर, दीपाली चरेगावकर, अनुराधा कुलकर्णी, अरुण गोडबोले, डॉ. राजेंद्र माने, विजया जालिहाळ, विजया देशपांडे असे अनेक लेखक ही वाट समृद्ध करत आहेत. कवी प्रदीप कांबळे यांचेही नाव या परंपरेत आहे.

चरित्र, आत्मचरित्र

चरित्र, आत्मचरित्र हा साहित्याचा प्रकार अनेक लेखकांनी निर्माण केला. त्यात लक्ष्मणशास्त्री जोशी, सदाशिव आळतेकर, पूर्वा गोखले, पी. जी. पाटील, बजरंग शेलार, हे. वि. इनामदार, संभाजीराव पाटणे, यशवंत पाटणे, रा. ना. चव्हाण, अरुण गोडबोले, द. स. हर्षे, पळणीटकर, न. ल. गाडगीळ या लेखकांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. मात्र मराठी आत्मचरित्र म्हटले की, अभावितपणे आठवण होते, श्री. म. माटे आणि यशवंतराव चव्हाण, श्री. के. क्षीरसागर यांची. कवयित्री संजीवनी तोफखाने सातारचीच माहेरवाशीण आहे हे गौरवास्पद आहे. साताऱ्यामध्ये महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि गुरुवर्य देवधर यांच्या पुढाकाराने कन्या शाळा, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूल आणि रयत शिक्षण संस्था यातून शिक्षणाच्या अनेक वाटा निर्माण झाल्या आणि साताऱ्याची एक वेगळी ओळख निर्माण झाली. दलित साहित्य, विद्रोही साहित्य, ग्रामीण साहित्य यामध्ये लक्ष्मण माने, पार्थ पोळके, आ. ह. साळुंखे, शशिकांत सायगावकर, नरेंद्र दाभोळकर यांनी आपापल्या कामात लेखन हे शस्त्रासारखे वापरले. म. वि. कोल्हटकर, पद्माकर गोवईकर, जयवंत गुजर, डॉ. राजेंद्र माने, उषा कोल्हटकर, नलिनी महाडिक, मीरदेव गायकवाड, यशवंत पाटणे, विद्याधर म्हैसकर, शशिकला उपाध्ये, मधू नेने अशा अनेक लेखकांनी कथाविश्वात मोलाची भर घातली, तर डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, विश्वास दांडेकर यांनी वेगवेगळ्या विषयांवर लेखन केले. अनेक लेखकांची जन्मभूमी सातारा, तर काहींची कर्मभूमी सातारा असल्याने त्यांनाही सातारकर म्हणूनच गौरविले जाते.

अनेक उपक्रम

वाचन संस्कृती जपण्यासाठी आणि वाढवण्यासाठी साताराच्या श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज थोरले नगर वाचनालयात अनेक उपक्रम राबविले जातात. यामध्ये पुस्तक प्रदर्शन, पुस्तक परिचय हे कार्यक्रम घेतले जातात, एखाद्या कवी लेखकाची जयंती किंवा पुण्यतिथी असेल, तर त्याच्या पुस्तकाचे प्रदर्शन भरवले जाते आणि पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक उपक्रम केले जातात. वाचक व्यासपीठ हा उपक्रम गेली ३२ वर्षे चालू

सातारा जिल्ह्याने महाराष्ट्राला चार मुख्यमंत्री दिले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान यशवंतराव चव्हाण यांचा आहे. त्यानंतर सातारा जिल्ह्याने बॅ. बाबासाहेब भोसले, पृथ्वीराज चव्हाण आणि एकनाथ शिंदे हे नेते मुख्यमंत्री म्हणून दिले. राज्याच्या राजकारणात सातारा जिल्ह्यातील इतरही अनेक नेत्यांचा प्रभावशाली वावर आहे.

नोंद





आहे. शिवाय साताऱ्यात गेली अनेक वर्षे चालू असलेला 'ग्रंथ महोत्सव' साताराचे सांस्कृतिक वैभव बनला आहे. याशिवाय रहिमतपूरची कुसुमावती व्याख्यानमाला, उंडाळे येथे होणारे साहित्य संमेलन, वाई आणि कराड येथे होणाऱ्या व्याख्यानमाला, वाईच्या घाटावर होणारी वसंत व्याख्यानमाला, तसेच वाई, पाटण, फलटण, कोरेगाव सातारा येथील मराठी साहित्य परिषदेच्या शाखांमध्येही अनेक साहित्यविषयक कार्यक्रम होत असतात. साताऱ्यामध्ये १९०५, १९६२ आणि १९९३ साली भरलेली साहित्य संमेलने चिरस्मरणीय झाली. याशिवाय अभिजात मराठी संमेलन, आपले साहित्य संमेलन, विचारवेध संमेलन, समरसता साहित्य संमेलन, सर्वोदयी संमेलन अशा अनेक संमेलनांमधून श्रोत्यांना ज्ञान आणि मनोरंजन दोन्हीचा लाभ झाला. याशिवाय वाई येथे चालणारे विश्वकोशाचे काम, सातारचे साहित्यिक ना. ह. आपटे यांच्या नावाने साहित्य पुरस्कार दिला जातो, त्याला वेगळीच प्रतिष्ठा लाभली आहे. सातारा जिल्ह्यातल्या अनेक लेखकांना साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला आहे, हे निश्चितच गौरवास्पद आहे.

आणखी एका मानबिंदूचा उल्लेख केल्याशिवाय या लेखाची पूर्तता होणार नाही. साताऱ्यातले एक उच्चविद्याभूषित व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. कृष्णाजी केशव कोल्हटकर त्यांनी 'भारतीय मानसशास्त्र पातंजल योगदर्शन' हा एकमेवाद्वितीय ग्रंथ लिहिला. त्यावर त्यांना पुणे विद्यापीठाने डी. लिट. पदवी देऊन गौरविले ही सातारा जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घालणारी घटना आहे.

वर्तमानाला प्रेरणा

वास्तविक सातारा जिल्ह्याची साहित्यिक परंपरा खूप विस्तृत आहे. तिचा एवढ्या थोडक्यात परामर्ष घेणे केवळ अशक्य आहे; पण वर्तमानाला प्रेरणा मिळण्यासाठी थोडे इतिहासात डोकावून पाहणे आणि त्याची झळाळी न्याहाळणे आवश्यकच आहे, असं मला वाटतं. निव्वळ मनोरंजन हा हेतू न ठेवता स्वदेशाभिमान, अन्यायाविरुद्धची चीड, पारतंत्र्याची जाणीव या बाबी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी साहित्य हे प्रभावी साधन ठरले आणि अनेक कथा, कविता, नाटके, कादंबऱ्या, ललित आणि वैचारिक लेख या साऱ्या माध्यमांतून हे साध्य झाले. आजही वाचन हा विरंगुळा असला तरी अनेक साहित्यिक वेगवेगळ्या हेतूने लेखन करीत आहेत. प्रत्येक साहित्यिकाची प्रतिभा निराळी असते. त्याची शब्दसंपदा वेगवेगळी असते, संस्कार निराळे असतात; पण वाचकाला काहीतरी देण्याची प्रेरणा मात्र सारखीच असते म्हणून हे सातारचे संमेलन सर्व साहित्य प्रेमींसाठी एक आनंद सोहळा ठरेल हे मात्र नक्की.

(लेखिका ग्रंथालय चळवळीत कार्यरत आहेत.)

नोंद

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे होते. कराड विधानसभा मतदारसंघातून ते निवडून येत होते. १९ नोव्हेंबर १९६२ पर्यंत त्यांनी मुख्यमंत्रिपद सांभाळले. त्यानंतर चीनने भारतावर आक्रमण केले. त्यामुळे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना बोलावून संरक्षणमंत्री केले.



डॉ. राजेंद्र सरकाळे
मो.: ९३०७६८१७६८

सातारा जिल्ह्याचे अर्थव्यवस्थेतील योगदान

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेला सातारा जिल्हा हा पुणे विभागातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे. सातारा जिल्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मराठा राज्याची पूर्वीची राजधानी म्हणून ओळखला जातो. सातारा जिल्हा हा केवळ ऐतिहासिक आणि नैसर्गिक सौंदर्यासाठीच नव्हे, तर आपल्या महत्त्वपूर्ण आर्थिक योगदानासाठी देखील ओळखला जातो.

सातारा जिल्हा कृषिप्रधान आहे आणि येथील अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे.

ऊस आणि साखर उद्योग

जिल्हा ऊस उत्पादनात महत्त्वपूर्ण आहे आणि येथे सहकारी तसेच खाजगी क्षेत्रातील अनेक साखर कारखाने आहेत. साखर उद्योग हा येथील सर्वांत मोठा कृषी-आधारित उद्योग आहे.

आर्थिक

फळबागा आणि प्रक्रिया उद्योग

महाबळेश्वर-पाचगणी परिसर स्ट्रॉबेरी, तुती (मलबेरी) आणि इतर फळांसाठी प्रसिद्ध आहे. यामुळे फळ प्रक्रिया उद्योग (जॅम, जेली, क्रश इत्यादी) आणि पर्यटनाद्वारे फळांची थेट विक्री यातून जिल्ह्याला मोठे आर्थिक उत्पन्न मिळते.

पिके

बाजरी, तांदूळ, भुईमूग ही खरीप पिके, तर गहू आणि हरभरा ही रब्बी पिके घेतली जातात.

दुग्धव्यवसाय आणि पशुपालन

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय (डेअरी) आणि पशुपालनाचे महत्त्व वाढत आहे. दुग्धव्यवसायात सहकारी संस्था कार्यरत आहेत.

औद्योगिक विकास

सातारा जिल्ह्यात विविध ठिकाणी औद्योगिक वसाहती (MIDC) आहेत, ज्यामुळे उद्योगांचे योगदान वाढत आहे. प्रामुख्याने वाई, सातारा, कराड, खंडाळा, फलटण,

नोंद

दि. १ डिसेंबर १९८० रोजी साहित्य संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन मराठी विश्वकोशाच्या संपादन आणि प्रकाशन कार्यार्थ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली. विश्वकोशाच्या कामाची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. जागतिक धर्तीवर वाई येथे मराठी विश्वकोशाचे काम करण्यात आले.



शिरवळ, लोणंद आणि कोरेगाव येथे औद्योगिक वसाहती आहेत. औद्योगिक वसाहतींमध्ये सूक्ष्म आणि लघुउद्योगांची संख्या मोठी आहे, जे जिल्ह्याच्या रोजगारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तरीही सातारा जिल्ह्याचा कृषी आणि कृषी-आधारित उद्योग सहकारी बँकिंगच्या तुलनेत विशेष औद्योगिक विकास झाला नाही.

सहकार क्षेत्र आणि वित्त

सहकार चळवळीमध्ये सातारा जिल्ह्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. महाराष्ट्र राज्याच्या सहकार चळवळीमध्ये सातारा जिल्ह्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ आर्थिक उलाढाल किंवा संस्थांची संख्या नव्हे, तर ग्रामीण भागातील कृषी-औद्योगिक विकास आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात सातारा जिल्ह्याच्या सहकारी संस्थांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

सातारा जिल्ह्यातील सहकारी चळवळीमध्ये यशवंतरावजी चव्हाण, आर. डी. पाटील, बाळासाहेब देसाई, किसन वीर, अभयसिंहराजे भोसले ऊर्फ भाऊसाहेब महाराज, लक्ष्मणराव पाटील(तात्या), यशवंतराव मोहिते, पी. डी. पाटील, जयवंतराव भोसले, मालोजीराजे नाईक निंबाळकर, विलासकाका उंडाळकर यांच्यासारख्या धुरिणांनी घालून दिलेल्या आदर्शवत सहकारामुळे जिल्ह्यातील सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. सहकारी चळवळीतील सहकारी पतपुरवठा, पणन सहकारी संस्था, प्रक्रिया व उत्पादक सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, मजूर संस्था, तसेच दुर्बल घटकांच्या आणि महिलांच्या, सुशिक्षित बेरोजगारांच्या सहकारी संस्थांनी जिल्ह्याच्या ग्रामीण व नागरी भागाच्या सर्वांगीण विकासामध्ये महत्त्वपूर्ण भर टाकलेली आहे. या सहकारामध्ये महाराष्ट्र राज्य देशाच्या तुलनेत अग्रेसर असून सातारा जिल्ह्याचा यामध्ये सिंहाचा वाटा आहे. सातारा जिल्ह्याच्या सहकारी चळवळीचा आणि बँकिंगचा इतिहास खूप गौरवशाली आहे.

सहकाराचे महत्त्व

सातारा जिल्ह्यामध्ये सहकारी चळवळीची सुरुवात विसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात केशवराव विचारे आणि इतर नेत्यांनी बहुजन समाजाला सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सहकाराचे महत्त्व पटवून दिले. सन १९०४ चा सहकार कायदा झाल्यानंतर सातारा जिल्ह्यात पहिली प्राथमिक विविध कार्यकारी संस्था सन १९०७ मध्ये माण तालुक्यातील बोथे या गावात स्थापन झाली. १९१७ मध्ये कराड येथे द कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना झाली,



महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत आतापर्यंत विश्वकोशाचे २० खंड प्रकाशित करण्यात आले आहेत. या सर्व खंडांचे लोकार्पण भ्रमणध्वनी उपयोजकाद्वारे (मोबाईल ॲप) दि. १२ जानेवारी २०१८ रोजी वाई येथे करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण विश्वकोश आता ॲपवर पाहता येतो. याशिवाय वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

जी नंतर कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये रूपांतरित झाली. कराड अर्बन बँकेनेही तळागाळापर्यंत बँकिंग सुविधा उपलब्ध करून, जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला आहे. त्याबरोबरच १९२४ मध्ये स्थापन झालेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने शिक्षकांना आर्थिक आधार दिला.

युनायटेड वेस्टर्न बँक

युनायटेड वेस्टर्न बँकेची स्थापना अण्णासाहेब चिरमुले यांनी सन १९३६ मध्ये केली. बँकेचे कामकाज १९३७ मध्ये सुरू झाले. सातारा हे तिचे मूळ मुख्यालय होते, ज्यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत एक मोठी वित्तीय संस्था रुजली. सन १९०७ मध्ये स्थापन झालेल्या पहिल्या सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेचे युनायटेड वेस्टर्न बँकेमध्ये १९६१ मध्ये विलीनीकरण केले. त्याबरोबरच काही लहान बँकांचे विलीनीकरण केले, ज्यामुळे त्यांची ताकद वाढली आणि स्थानिक बँकिंग सेवा अधिक मजबूत झाल्या. जिल्ह्यातील शेती, छोटे उद्योग, व्यापार आणि व्यवसायांना कर्ज आणि आर्थिक साहाय्य पुरवून बँकेने आर्थिक गतिशीलता आणली. स्थानिक उद्योजकांना भांडवल उपलब्ध झाल्यामुळे रोजगार निर्मिती आणि उत्पादन वाढीस मदत मिळाली. युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेडचे ऑगस्ट २००६ मध्ये आयडीबीआय बँकेत विलीनीकरण झाले. तरीही, तिने साताऱ्यात अनेक दशके केलेल्या विकासकामाचा पाया जिल्ह्याच्या सध्याच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा ठरला आहे.

जनता सहकारी बँक

सन १९६३ साली सातारा शहरातील दूरदृष्टी असलेल्या प्रतिष्ठित आणि नामवंत मान्यवरांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या जनता सहकारी बँकेने स्थानिक उद्योगांना आधार आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करून जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. सध्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी कार्यरत असलेल्या श्री. विनोद कुलकर्णी यांचे नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाने जनता सहकारी बँकेची जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील यशस्वी वाटचाल सुरू आहे. त्याबरोबरच जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेल्या इतर नागरी सहकारी बँका व पतसंस्थांनीही जिल्ह्यातील ग्राहकांना दैनंदिन बचतीच्या माध्यमातून बचतीची सवय लावून, छोटेमोठे व्यावसायिक व व्यक्तींच्या निकडीच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी विशेष योगदान देऊन जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये सहभाग नोंदवला आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेसाठी सर्वांत महत्त्वाचे पाऊल म्हणजे सन १९४९ साली सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना. समाज परिवर्तन करण्यासाठी शेतकरी आर्थिकदृष्ट्या मजबूत केला पाहिजे तसेच त्याची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी सहजतेने व गरजेनुसार माफक व्याजदराने कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी शेतकऱ्यांपासून सामान्य ग्राहकांपर्यंत, छोट्या व्यावसायिकांपासून लघु उद्योजकांपर्यंत आणि विकास सेवा संस्थांपासून सहकारी साखर कारखान्यांपर्यंत सर्वांना आर्थिक पाठबळ देणाऱ्या सातारा जिल्हा बँकेची स्थापना यशवंतरावजी चव्हाणसाहेब, बाळासाहेब देसाई, आर. डी. पाटील, किसन वीर इत्यादी द्रष्ट्या व दूरदृष्टी असलेल्या धुरिणांनी १७ ऑगस्ट १९४९ रोजी केली. जिल्ह्याची मातृसंस्था व अर्थवाहिनी असणाऱ्या सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या यशस्वी वाटचालीमध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे व जिल्ह्यातील सर्व सहकाऱ्यांचे भक्कम नेतृत्व व मार्गदर्शन लाभल्यामुळे बँकेची सर्वांगीण प्रगती झाली आहे. अनुभवी संचालक मंडळ, कार्यक्षम प्रशासन, उत्कृष्ट निधी व्यवस्थापन, पारदर्शक आणि भविष्यवेधी सकारात्मक धोरणे व त्यांची प्रभावी अंमलबजावणी याद्वारे बँकेच्या उत्कर्षाचा आलेख कायम चढता ठेवला आहे. बँकेचे घोषवाक्य 'उद्धरेदात्मनात्मानम्' हे आहे. तसेच, 'सहकाराच्या माध्यमातून शेतकरी व समाजाचा विकास' हेच बँकेचे ध्येय आहे. बँक स्थापनेपासून नफ्यात, सतत ऑडीट वर्ग 'अ', निव्वळ एन. पी. ए. सतत १७ वर्षे शून्य टक्के राखला आहे. शेतकऱ्यांना रु. ३ लाखापर्यंतचे पीक कर्ज 'शून्य'टक्के दराने, शैक्षणिक तसेच सोसायटी इमारत

'श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा' हे सातारा शहरातील सार्वजनिक वाचनालय आहे. महाराष्ट्रातील शतकोत्तर ग्रंथालयांपैकी मोजक्या ग्रंथालयांत याचा समावेश होतो. सातारा शहराच्या मध्यवर्ती भागातील सांस्कृतिक केंद्र, अशी वाचनालयाची ओळख आहे.

नोंद

व गोडाऊन बांधकामासाठी 'शून्य'टक्के दराने कर्ज उपलब्ध, सामाजिक बांधिलकी तसेच सहकारी संस्थांच्या विकासासाठी प्रभावी कामकाज, वसुली टक्केवारी ९७ टक्केहून अधिक, अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सुविधांच्या माध्यमातून अविरत ग्राहक सेवा इत्यादी बँकेची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

कृषी क्षेत्राची आर्थिक जीवनरेखा

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या सहकार आणि कृषी क्षेत्राची आर्थिक जीवनरेखा आहे. बँकेच्या ३१९ शाखा व सलग्न ९६४ प्राथमिक विकास संस्थांच्या माध्यमातून ती थेट शेतकऱ्यांशी तसेच ग्रामीण व अति दुर्गम भागातील प्रत्येक स्तरापर्यंत जोडलेली आहे. शेतकऱ्यांना शासनाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा जास्त अल्पमुदतीचे पीक कर्जवाटप करून, सातारा जिल्हा बँकेने जिल्ह्याच्या एकूण पतपुरवठा आराखड्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने उभे करण्यासाठी आणि पाणीपुरवठा संस्थांना अर्थसाहाय्य पुरवले आहे. यामुळे कोरडवाहू शेती बागायती होण्यास मदत झाली आहे. त्याबरोबरच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, फळप्रक्रिया यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांसाठी जवळपास ७५ हून अधिक योजनांच्या माध्यमातून मध्यम आणि दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. बँक प्राथमिक विकास सेवा संस्थांचे (PACS) सक्षमीकरण करण्यासाठी मार्गदर्शन करते, ज्यामुळे ग्रामीण स्तरावर बँकिंग सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात. तसेच, व्यक्ती कर्ज सुविधेच्या माध्यमातून जवळपास ४० पेक्षा अधिक योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील व्यावसायिक, नोकरदार वर्ग व अन्य ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यांसारख्या शासन पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीत जिल्हा बँक राज्यात आघाडीवर आहे. यामुळे अनेक उद्योजकांना व व्यावसायिकांना कर्जपुरवठा होऊन स्वयंरोजगार निर्मितीस चालना मिळाली आहे.

साखर कारखानदारी

श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांच्या पुढाकाराने १९७७ मध्ये सातारा जिल्ह्यात फलटण येथे श्रीराम सहकारी साखर कारखाना हा पहिला साखर कारखाना उभारला गेला. सातारा जिल्हा बँकेच्या अर्थसाहाय्यामुळे खऱ्या अर्थाने सातारा जिल्ह्यातील साखर कारखानदारीस बळ प्राप्त झाले. सुरुवातीला ५०० ते १००० मे. टन दैनंदिन गाळप क्षमता असलेले व ठरावीक कार्यक्षेत्र असलेले साखर कारखाने जिल्हा बँकेच्या अर्थसाहाय्याने आज रोजी १८,००० ते २०,००० मे. टन प्रति दिन गाळप क्षमतेपर्यंत पोहोचले आहेत. सन १९६६ मध्ये यशवंतराव मोहिते आणि जयवंतराव भोसले यांच्या पुढाकाराने आणि प्रेरणेने कृष्णा सहकारी साखर कारखाना, १९६९ मध्ये पी. डी. पाटील यांच्या पुढाकाराने आणि प्रेरणेने सह्याद्री सहकारी साखर कारखाना, शिवाजीराव देसाई यांच्या प्रयत्नातून बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना, किसन वीर आबांच्या पुढाकाराने आणि प्रेरणेने किसन वीर सहकारी साखर कारखाना आणि नंतर १९८२ मध्ये अभयसिंहराजे उर्फ भाऊसाहेब महाराजांच्या माध्यमातून अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, बाळासाहेब देसाई यांनी मरळी, तर विलासकाका उंडाळकर यांनी रयत, आणि लालसिंगराव शिंदे यांनी प्रतापगड सहकारी साखर कारखान्यांची उभारणी करून, शेतकरी आर्थिकरीत्या सधन करण्याचे काम केले. जिल्ह्यामध्ये आज रोजी १८ साखर कारखाने असून त्यांपैकी नऊ सहकारी आणि नऊ खाजगी क्षेत्रात कार्यरत आहेत. २०२३-२४ च्या हंगामात, कारखान्यांनी १ कोटी १५ लाख टन ऊस गाळप करून सुमारे १ कोटी ७३ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले होते, ज्यामुळे मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी स्थिर उत्पन्नाचा आणि रोजगाराचा एक महत्त्वाचा स्रोत आहेत. कारखान्यामुळे उसाला शाश्वत बाजारपेठ मिळते. कारखान्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे



श्री. छ. प्रतापसिंह महाराजांना ग्रंथसंकलन करण्याचा छंद होता. त्यांनी स्वतःचे एक ग्रंथालय सुरू केले होते. त्यांच्यानंतर त्यांचे बंधू आप्पासाहेब यांनीही त्यात भर घातली. त्यांच्या मृत्यूनंतर पत्नी सगुणाबाई यांनी हे ग्रंथालय त्याच्या जागेसह जनतेच्या स्वाधीन केले. अशा प्रकारे सातारा वाचनालयाची स्थापना ६ जुलै १८७३ रोजी झाली.

मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती केली आहे. यामध्ये शेतमजूर, वाहतूकदार, कामगार आणि प्रशासकीय कर्मचारी यांचा समावेश आहे. साखर कारखान्यांसोबत संलग्न असलेले वीज निर्मिती आणि डिस्टिलरी सारखे पूरक उद्योग जिल्ह्याच्या औद्योगिकीकरणास आणि महसुलात वाढ करण्यास मदत करतात.

डेअरी उद्योग

सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात सातारा जिल्हा आघाडीवर असून सहकारी तत्त्वावर डेअरी स्थापन करण्यातही आघाडीवर होता. यामुळे जिल्ह्यात सहकारी दुग्धव्यवसायाचा प्रसार झाला. भाऊसाहेब महाराजांनी सातारा तालुक्यात सूतगिरणी, फळे-फुले, भाजीपाला खरेदी विक्री संस्था उभारणी करून सहकाराचे जाळे विणले. या संस्थांमुळे जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार मिळाला, तर आर. डी. पाटील यांनी 'कोयना दूध संघ' तसेच इतर सहकारी संस्थांची स्थापना करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आणि कराड तालुक्यातही सहकार रुजवण्याचा व आर्थिक जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला.

जिल्ह्यातील केंद्रांवर शासकीय हमीभावाने शेती माल, शेती अवजारे, बी-बियाणे इत्यादी मालाची खरेदी विक्री करून जिल्ह्यातील शेतकरी सभासदांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याकरिता शासनाच्या माध्यमातून आणि यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांच्या अथक परिश्रमातून जिल्ह्यात 'सातारा जिल्हा खरेदी विक्री संघ' आणि प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तालुका खरेदी विक्री संघाची स्थापना झाली.

संघटित विपणन जाळे

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषी मालाला योग्य किंमत मिळवून देण्यासाठी, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक पायाभूत सुविधांनी सुसज्ज असे संघटित विपणन जाळे विकसित करण्यासाठी, ग्राहकांना दर्जेदार कृषीमाल उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे तसेच शेतीमाल विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या मालाची वाजवी किंमत मिळावी, शेतकऱ्यांचे मध्यस्थांकडून होणारे शोषण टाळण्यासाठी व त्यांच्या मालाला योग्य ती किंमत मिळण्यासाठी शासनामार्फत व पणन संचालनालयामार्फत कृषी मालाच्या किमतीचे नियंत्रण करण्याबरोबरच ग्राहकांना योग्य भावात शेतमाल मिळण्यासाठी काम करते. याकरिता तालुका पातळीवर कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. सातारा जिल्ह्यातल्या सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या धुरिणांच्या कल्पकतेने जिल्ह्यातील बाजार समितीच्या माध्यमातून पेट्रोल पंप, पशुवैद्यकीय दवाखाना, कार्डियाक ॲम्ब्युलन्स, अन्नदाता सन्मान योजना, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र आदि विविध सोयी व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अशा प्रकारे सातारा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या शेतकरी हितासाठी विविध उपक्रम व योजना यशस्वीपणे राबवीत असल्याने जिल्ह्यातल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे कामकाज राज्यातीलच नव्हे तर देशातील इतर सहकारी संस्थांना आदर्शवत असे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदविण्यात आलेल्या पणन, ग्राहक, कृषी प्रक्रिया, खरेदी विक्री संघ, जिनींग व प्रेसिंग इत्यादी सहकारी संस्थांच्या संनियंत्रणाचे कामकाज संचालनालयाकडून पार पाडले जाते. सदर संचालनालय कृषी उत्पन्न बाजार समितीशी संबंधित व्यवहारांवर देखरेख व नियंत्रण ठेवते.

याव्यतिरिक्त सातारा जिल्ह्यात सहकारी ग्राहक भांडार, सहकारी पतसंस्था, सहकारी विकास सेवा सोसायट्या, इत्यादी विविध सहकारी संस्थांमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या रोजगार निर्माण झाला.

जलसिंचन योजना

सातारा जिल्ह्याला कोयना धरण आणि कृष्णा नदीच्या खोऱ्यातील सिंचन योजनांचा मोठा फायदा झाला आहे. पाणी पुरवठा संस्था; मग त्या शासकीय असोत किंवा सहकारी; शेती आणि नागरी जीवनासाठी पाणी उपलब्ध करतात. पाणी पुरवठा संस्था आणि जलसंधारण योजना, विशेषतः पाटबंधारे प्रकल्प सातारा जिल्ह्याच्या कृषी-आधारित अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कोयना जलविद्युत प्रकल्प आणि कृष्णा नदी

नोंद

कोयना आणि कृष्णा या सातारा जिल्ह्यातील दोन प्रमुख नद्या आहेत. कृष्णा ही दक्षिण भारतातील तीन मोठ्या पवित्र नद्यांपैकी एक आहे. कृष्णा नदीचा जवळपास १७२ किमीचा प्रवाह सातारा जिल्ह्यातून जातो. कृष्णा नदी महाबळेश्वरच्या पठारावरील पूर्वेकडील वरच्या भागात उगम पावते. कोयना ही कृष्णा नदीची जिल्ह्यातील प्रमुख उपनदी आहे.

खोऱ्यातील सिंचन योजनांचा यामध्ये मोठा वाटा आहे. सिंचनाच्या सुविधांमुळे शेतीत निश्चित पाणीपुरवठा होतो, ज्यामुळे कोरडवाहू शेतीचे सिंचन-आधारित शेतीत रूपांतर होते. यामुळे ऊस आणि इतर नगदी पिकांचे उत्पादन वाढते. कृषी उत्पादनात वाढ झाली आहे. पाणी पुरवठा संस्था पाणी साठवून ठेवतात, ज्यामुळे दुष्काळसदृश परिस्थितीत पिके वाचवण्यासाठी मदत होते. या संस्था जलव्यवस्थापन आणि जलसंधारणाचे काम करतात, ज्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी टिकून राहते आणि शेती अधिक शाश्वत होते.

विमा कंपन्यांचे कवच

सातारा जिल्ह्यातील LIC, United India, New India आणि National Insurance Co. यांचे योगदान जिल्ह्याला आर्थिक संरक्षण कवच पुरवते. विम्याचे एजंट व संलग्न सेवांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात स्वयं-रोजगार संधी निर्माण केली आहे. यामुळे जिल्ह्याच्या सेवा क्षेत्राचा विकास होण्यास आणि नागरिकांना आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत झाली आहे. एल.आय.सी. ने अल्पावधीत केलेल्या प्रगतीमुळे सातारा येथे प्रशस्त असे विभागीय कार्यालय उभारण्यात आले. LIC आणि सर्वसाधारण विमा कंपन्यांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातून मोठ्या प्रमाणात बचत गोळा होते. हा निधी सरकारी रोखे, पायाभूत सुविधा आणि जिल्हा विकास योजनांसाठी अप्रत्यक्षपणे वापरला जातो. हे योगदान जिल्ह्याच्या सहकारी बँका तसेच कृषी आणि कृषी-आधारित उद्योग व्यवसायांतून झालेल्या प्रगतीएवढे प्रत्यक्ष नसले तरी सेवा क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक म्हणून ते महत्त्वपूर्ण ठरते.

सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीमध्ये अमूल्य योगदान दिले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांनी १९१९ मध्ये स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही संस्था सातारा जिल्ह्याचीच नव्हे तर महाराष्ट्राची शैक्षणिक क्रांतीची आधारशिला आहे. रयत शिक्षण संस्थेबरोबरच इतर शासकीय, निमशासकीय व खाजगी शिक्षण, व्यावसायिक शिक्षण संस्था, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त आणि सुसंस्कार रुजवून त्यांना उत्तम नागरिक बनवतात. शिक्षणामुळे तरुणांना कौशल्ये मिळतात, ज्यामुळे ते व्यवसाय, नोकरी किंवा उद्योगासाठी तयार होतात. अनेक संस्था व्यावसायिक शिक्षण देतात आणि कौशल्य विकास करतात, ज्याद्वारे बेरोजगारी कमी होऊन जिल्ह्याचा आर्थिक विकास करण्यासाठी ते महत्त्वाचे ठरते.

एकंदरीत, पश्चिम महाराष्ट्रात स्थित असलेल्या सातारा जिल्ह्याने कृषी, सहकार, शिक्षण आणि उद्योग या विविध क्षेत्रांतून महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेत मौलिक आणि अमूल्य योगदान दिले आहे. सातारा जिल्ह्याची अर्थव्यवस्था सहकारी तत्त्व आणि कृषी-आधारित असल्याने जिल्हा बँक, नागरी बँका, पतसंस्था, प्राथमिक विकास संस्था, साखर कारखाने, खरेदी विक्री संघ, पाणी पुरवठा संस्था, दूध संघ इत्यादी अनेक सहकारी संस्थांनी तळागाळातील लोकांना आर्थिक विकास प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले आहे. या सर्व संस्थांच्या समन्वित प्रयत्नांमुळे सातारा जिल्ह्याची आर्थिक प्रगती झाली असली तरी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गेल्या सात दशकांमध्ये जिल्ह्यात तळागाळापर्यंत अविरत बँकिंग सुविधा पोहोचवून केंद्रस्थानी राहिली आहे. सातारा जिल्हा बँकेने जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक कार्याच्या माध्यमातून दिलेले योगदान व सहकारी संस्था सक्षमीकरणासाठी केलेले विशेष प्रयत्न पाहता जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक व सहकार चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी केलेले कार्य व योगदान अभूतपूर्व आहे. सहकारी संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्यास सुरुवात केली असल्याने भविष्यात अधिक समतोल आणि जलद विकास साधण्यास गती मिळणार आहे.

(लेखक सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.)



भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई जोतीराव फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे ३ जानेवारी, इ.स. १८३१ रोजी झाला. आईचं नाव लक्ष्मीबाई, तर वडिलांचं नाव खंडोजी नेवसे पाटील होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. स्त्रीस्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला.



अमित कुलकर्णी
मो.: ९४२२४०००००१

ज्ञानप्रज्ञेच्या गुढी

शैक्षणिक

सातारा जिल्ह्यात जसे कर्तृत्वाचे मनोरे उंचावले गेले, तशाच ज्ञानप्रज्ञेच्या गुढी देखील उभारल्या गेल्या. सातारा जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक संकुले ही जिल्ह्यातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वांच्या ठळक पाऊलखुणांचा अलौकिक ठेवा जपत नि:स्पृहपणे कार्यरत आहेत.

प्राचीन काळापासून भारतात गुरुकुल परंपरेच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे चालू आहे. मात्र सातारा जिल्हा आणि त्याचे शैक्षणिक योगदान याविषयी जर आढावा घ्यायचा झाला, तर सातारा जिल्ह्यातील आधुनिक काळातील ज्ञानाची गंगोत्री म्हणून आपल्याला श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज हायस्कूल या शाळामाउलीची नोंद घ्यावी लागेल. ब्रिटिशकाळात राजघराण्यातील महिलांना शिक्षण देता यावे यासाठी छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) यांनी या वास्तूची निर्मिती केली. १८७४ सालापासून इंग्रज राजवटी अंतर्गत 'गव्हर्नमेंट हायस्कूल' या नावाने पहिली शाळा सुरू झाली. जिचे नामांतर पुढे 'छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल' असे करण्यात आले. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, श्रीमंत पंतप्रतिनिधी भवानराव श्रीनिवासराव, अशा नामवंत विद्यार्थ्यांसोबत विशेषत्वाने नोंद घ्यायची म्हणजे स्वतंत्र भारताला राज्यघटना देणारे भारतमातेचे सुपुत्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राथमिक शिक्षणाचे पहिले पाऊल या वास्तूतच उमटवले. यासह सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. बी. गजेंद्रगडकर हे देखील या शाळेचे माजी विद्यार्थी. सुमारे २०० वर्षांची साक्ष देत आजही छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल ज्ञानदानाचे कार्य करत आदर्श विद्यार्थी घडवण्यासाठी कार्यरत आहे.

मुधोजी हायस्कूल

फलटण तालुक्यात १८९३ मध्ये स्व. श्रीमंत मुधोजी नाईक निंबाळकर यांच्या पुढाकाराने मुधोजी हायस्कूलची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची संधी निर्माण करण्यात आली. १९७१ मधे 'फलटण एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी केली व आज संस्थेच्या माध्यमातून पूर्व सातारा जिल्ह्यात ३७ संस्थांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सातारा शहरापासून काही अंतरावर असलेल्या देगाव गावाजवळील डोंगरावर पाटेश्वर महादेवाचे पुरातन मंदिर व लेणी समूह आहे. गर्द निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या या परिसरात पाटेश्वर मंदिरासोबतच वऱ्हाडघर लेणी आहेत. या लेण्यांमध्ये धारालिंग, एकमुखीलिंग, नंदीच्या पाठीवरील शिवलिंग, दुर्मीळ सहस्रलिंगी शिवपिंडी आहेत. याशिवाय येथील वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेली अग्निवृष मूर्ती होय. मानव आणि नंदी यांची ही एकत्रित मूर्ती आहे.

नोंद

नाईक निंबाळकर कुटुंबीय संस्थेच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

औंधची शैक्षणिक परंपरा

सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यामधील औंधचे तत्कालीन संस्थानिक राजा भवानराव पंतप्रधान यांनी १८९८ मधे श्री यमाई श्रीनिवास हायस्कूल, औंध येथे स्थापन केले. विद्यालयाने समाजाला अनेक थोर व्यक्तिमत्त्वे दिली आहेत. साने गुरुजी, शंतनुराव किर्लोस्कर आणि ग. दि. माडगूळकर यांसारख्या नामवंत







व्यक्तींनी या विद्यालयातून शिक्षण घेतले, हे औंधच्या शैक्षणिक परंपरेचे वैशिष्ट्य होय. १९४९ साली औंध शिक्षण मंडळाची स्थापना झाली. सद्य: स्थितीत मा. श्रीमंत गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी औंध शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा आहेत, तर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार मंडळाचे अध्यक्ष म्हणून संस्थेस मार्गदर्शन करीत आहेत.

महिलांसाठी शिक्षणाची मुहूर्तमेढ

स्वातंत्र्यपूर्व काळात सर्वत्र राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या हेतूने शिक्षण निर्मिती ही जणू सामाजिक चळवळ झाली होती. पुणे येथे महात्मा ज्योतिबा फुले तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची मुहूर्तमेढ, रोवली तेही मूळचे सातारा जिल्ह्यातीलच. महात्मा ज्योतिबा फुले यांचे गाव सातारच्या खटाव तालुक्यातील कटगुण हे होय, तर क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे मूळ गाव खंडाळा तालुक्यातील नायगाव. ही स्थळे आज शैक्षणिक क्षेत्रातील तीर्थक्षेत्र म्हणून ओळखली जातात.

दगडी शाळा

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या हेतूने अनेक समाजधुरिणांनी एकत्र येऊन शिक्षण संस्थांची स्थापना केली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे तत्कालीन नेतृत्व करणारे लोकमान्य टिळक, समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर आदी विद्वतजनांनी राजर्षी छत्रपती शाहूमहाराज यांच्या अध्यक्षतेखाली डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना पुणे येथे केली व तिची शाखा असलेली 'न्यू इंग्लिश स्कूल सातारा'ची स्थापना ही १८९९ मध्ये झाली. आज दिमाखदारपणे कार्यरत असलेल्या, 'दगडी शाळा' म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या वास्तूत, न्यू इंग्लिश स्कूल, सातारा गेली सव्वाशे वर्षे ज्ञानदानाचे कार्य करत आहे. अनेक नामवंत विद्यार्थ्यांसोबत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी ज्यांना गुरुस्थानी मानतात ते लक्ष्मणराव इनामदार न्यू इंग्लिश स्कूलचे माजी विद्यार्थी. साताऱ्याच्या राजघराण्यातील स्व. श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले, स्व. श्रीमंत छत्रपती शिवाजीराजे भोसले, श्रीमंत छत्रपती सत्वशीलाराजे भोसले, आदी व्यक्तिमत्त्वे या शाळा माउलीचे माजी विद्यार्थी.

रयत शिक्षण संस्था

विसाव्या शतकाच्या शैक्षणिक क्षितिजावर १९१९ मध्ये एक अद्वितीय ज्ञानसूर्य झळकला, ते म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. त्यांनी कराड येथील काले या गावी 'रयत शिक्षण संस्थे'ची स्थापना केली व १९२४ पासून सातारा ही आपली कर्मभूमी निश्चित करून रयत शिक्षण संस्था ही सातारा केंद्रित संस्था झाली. कर्मवीर अण्णांनी

नोंद

सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यात उलट्या धबधब्याचा आविष्कार पाहायला मिळतो. हा आविष्कार वाऱ्याच्या दाबावर अवलंबून आहे. वाऱ्याचा दाब असल्यास अतिशय मनमोहक व डोळ्याचे पारणे फेडणारा नजारा पाहायला मिळतो. विस्तीर्ण पठार, धुक्यात हरवलेल्या गगनचुंबी पवनचक्क्या, दाट धुके, धुक्यात हरवलेला रस्ता व कौलारू घरे, थंडगार हवा, सोबत थुईथुई पाऊस, पठारावरून निसर्गाचे नयनरम्य दृश्य दिसते.

बहुजन समाजातील अनेक मुलांना स्वकष्टातून शिक्षण घेण्याचा 'कमवा व शिका' हा मूलमंत्र दिला. समाजातील सर्व क्षेत्रांत व प्रामुख्याने शैक्षणिक क्षेत्रात नेतृत्व करणारे अनेक दिग्गज मान्यवर विद्यार्थी समाजास दिले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू स्व. आप्पासाहेब पवार, स्व. बॅ. पी. जी. पाटील, स्व. इस्माईलसाहेब मुल्ला असे एक ना अनेक प्रतिभावान विद्यार्थी हे रयत शिक्षण संस्थेचे मानबिंदू म्हणता येतील. आज सुमारे ७२५ हून अधिक घटक संस्था, ४.३० लाखांहून अधिक विद्यार्थी, सुमारे १२.५ हजार शिक्षक, यांसह सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेली रयत शिक्षण संस्था केवळ सातारा नाही तर संपूर्ण आशिया खंडातील सर्वांत मोठी व प्रभावी शिक्षण संस्था म्हणून नावलौकिक मिळवलेली शिक्षण संस्था आहे. मा. डॉ. अनिल पाटील, पाटील परिवार, महाराष्ट्रातील अनेक मान्यवर नेतेमंडळींसह आदरणीय खा. श्री. शरद पवारसाहेब रयत शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक नेतृत्व करत आहेत.

शिक्षण मंडळ कराड

१९२० साली लोकमान्य टिळक यांचे निधन झाले. त्यांचे स्मारक चिरंतन राहावे या हेतूने कै. आप्पासाहेब आळतेकर, कै. नानासाहेब देशपांडे, कै. सिताराम पाटील, कै. महंमद याकूब मुलाणी आदी समाज धुरिणांनी कराड येथे 'शिक्षण मंडळ कराड'ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी स्वातंत्र्यपूर्व काळात उपलब्ध करून देण्यात आली. संस्थेची बांधणी लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय विचारांच्या आधारावर करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे स्व. यशवंतराव चव्हाण, ऑलिंपिक वीर स्व. खाशाबा जाधव, स्व. वि. स. पागे, स्व. पी. डी. पाटील, माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराजबाबा चव्हाण असे अनेक नामवंत माजी विद्यार्थी संस्थेने समाजाला दिले. आजही शिक्षण मंडळ कराडच्या टिळक हायस्कूल कराड, महिला महाविद्यालय, स्व. रा. कि. लाहोटी कन्या शाळा आदी घटक संस्थांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचे ज्ञानदानाचे काम करण्यात येत आहे.

कन्या शाळा

याच कालखंडा दरम्यान म्हणजेच १९२२ मध्ये महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे संस्थापक भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या उपस्थितीत सातारा येथे सात विद्यार्थिनींसह परांजपे वाडा येथे 'कन्या शाळा' सुरू झाली. कमलाबाई देशपांडे यांनी अध्ययनाचे काम स्वीकारले. महिलांच्या शिक्षणाचे अद्वितीय कार्य या शिक्षण संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीपासून ते आजपर्यंतच्या आव्हानात्मक परिस्थितीपर्यंत अत्यंत नेटाने व समर्पण भावनेने केले आहे. अनेक विद्यार्थिनींचे आयुष्य ज्ञानाने प्रकाशमान करून स्त्रीशक्ती विद्याविभूषित व ज्ञानसंपन्न केली.

१९३५ मध्ये 'सातारा एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. सातारा येथील लोकांच्या प्रेरणेतून सुरू झालेली व यशस्वीपणे कार्यरत असलेली ही शिक्षण संस्था नव्वद वर्षे शिक्षण क्षेत्रात आपले महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. माजी आमदार स्व. केशवराव पाटील यांचे नेतृत्व लाभलेली ही संस्था आज अनेक घटक संस्थांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण शैक्षणिक योगदान देत आहे. डॉ. चेतना माजगावकर यांचे अभ्यासू नेतृत्व संस्थेच्या यशस्वी वाटचालीस दिशा देत आहे. १९३५ साली कोरेगाव येथे 'सरस्वती इंग्लिश स्कूल'ची स्थापना कोरेगावातील स्व. मारुती कुलकर्णी, बोकील, ललगुणकर आदी स्थानिक ज्ञानोपासकांनी केली. यानंतर अनेक स्थित्यंतरे होत आज कोरेगावातील एक अत्यंत नामवंत शाळा म्हणून सरस्वती विद्यालय, कोरेगाव कार्यरत आहे. श्री. किशोर बाचल, श्री. रजनीकांत भंडारी यांच्या मार्गदर्शक नेतृत्वाखाली संस्थेची वाटचाल सुरू आहे.

१९५१ मध्ये खंडाळा येथे स्व. विनायकराव गुरव, सयाजीराव अवताडे व सहकारी यांनी पहिले राष्ट्रपती व 'राजेंद्र प्रसाद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राजेंद्र विद्यालय खंडाळा'ची स्थापना केली. स्व किसानवीर, स्व. प्रतापभाऊ भोसले यांसारख्या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक नेत्यांनी संस्थेचे नेतृत्व अनेक वर्षे केले. आज मा. श्री. शंकरराव गाढवे व श्री. अनिरुद्ध गाढवे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या २० हून अधिक घटक संस्था यशस्वीपणे कार्यरत आहेत.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था

सातारा येथील पाटण तालुक्यातील रामापूर येथे जन्म घेतलेले शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे हे शिक्षण क्षेत्रातील

फलटण शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले जबरेश्वर. मंदिर ह १३ व्या शतकातीले मंदिर असून त्यावरील वैशिष्ट्यपूर्ण शिल्पांमुळे प्रसिद्ध आहे. मुधोजीराव निंबाळकर यांनी या गाभाऱ्यात शिवलिंगाची स्थापना केल्याची नोंद आहे. जबरेश्वर मंदिर हे उत्तराभिमुख असून मुखमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी त्याची रचना आहे. हे राजवाड्याच्या समोरील बाजूस व रस्त्याच्या मधोमध आहे.

एक असामान्य कर्तृत्व प्रदर्शित केलेले नाव म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांनी १९७४ मध्ये 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' या नावाने शिक्षण संस्थेची स्थापना करून कोल्हापूर हे आपले कार्यक्षेत्र निवडले. प्रदीर्घ काळ संघर्ष करून, आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्रासाठी समर्पित केलेल्या स्व. बापूजी यांच्या अतुलनीय योगदानानंतर; त्यांचा वारसा घेऊन अथक प्रयत्नाने; शिक्षण संस्थेला एका उंचीवर घेऊन जाणारे नेतृत्व म्हणजे आदरणीय श्री. अभयकुमार साळुंखे सर. त्यांच्या नेतृत्वाखाली आज संस्थेच्या ३३० घटक संस्था व सुमारे दोन लाखाहून अधिक विद्यार्थी शैक्षणिक लाभ घेत आहेत. मा. ना. चंद्रकांतदादा पाटील हे संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

स्वातंत्र्यसैनिक स्व. दादासाहेब उंडाळकर पाटील यांनी १९७७ साली उंडाळे येथे माध्यमिक शाळा स्थापन केली. त्यांच्या प्रेरणेतून स्व. दिनकरराव पाटील व माजी आमदार स्व. विलासराव पाटील उंडाळकर यांनी १९६६ साली 'ग्रामविकास शिक्षण संस्थेची' स्थापना केली. मूलतः ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचविणे हे संस्थेचे ध्येय आहे. सध्या संस्थेअंतर्गत सुमारे २० विविध घटक संस्थांच्या शाखांमध्ये ७००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

१९७९ साली फलटण येथे स्व. नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) यांनी श्रीराम एज्युकेशन 'सोसायटी'ची स्थापना करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी, या हेतूने शैक्षणिक क्षेत्रात कार्याला सुरुवात केली. अनेक आव्हानांवर मात करत आज संस्थेच्या २४ हून अधिक शाखा कार्यरत असून तालुक्यासह परिसरातील विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सूर्यवंशी (बेडके) कुटुंबीय प्रयत्नरत आहेत.

सैनिक स्कूल सातारा

१९६१ मध्ये सातारा जिल्ह्याचे वैभव असलेले 'सैनिक स्कूल सातारा'ची स्थापना करण्यात आली. अनेक काळ भारतातील पहिल्या क्रमांकाची शाळा म्हणून या शाळेची ओळख आहे. सैनिक स्कूल साताऱ्याच्या माध्यमातून भारतीय सैन्य दलास अनेक नामवंत अधिकारी व सैनिक देण्यात आले आहेत. आजही भारतातल्या सैनिकी शाळांमधील एक प्रतिष्ठित संस्था म्हणून सैनिक स्कूल साताराकडे बघितले जाते. केंद्र शासनाद्वारे संचलित ही शाळा सातारा जिल्ह्याचा मानबिंदू आहे.

स्व. जयवंतराव भोसले यांनी कराड येथे १९६४ साली 'शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळा'च्या कराड विभागात नवीन शैक्षणिक पर्वाचा शुभारंभ केला. या संस्थेमार्फत ग्रामीण भागात अनेक शाळा व महाविद्यालये चालविली जातात आणि या संस्था गावांमधील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या पहिल्या संस्थांपैकी एक ठरल्या. १९७४ साली त्यांनी 'कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट'ची स्थापना केली. १९८२ साली २०० खाटांचे 'कृष्णा हॉस्पिटल' सुरू झाले आणि १९८४ साली त्यांनी महाराष्ट्र सरकार तसेच तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतरावदादा पाटील यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षण संस्थांमध्ये खाजगी सहभागास मान्यतेचे महत्त्व पटवून देण्यात यशस्वी भूमिका बजावली. डॉ. सुरेश भोसले यांच्या प्रगल्भ नेतृत्वाखाली विस्तीर्ण व समाजोपयोगी स्वरूप धारण करून संस्था यशस्वी वाटचाल करीत आहे.

१९६७ मधे पाटणसारख्या दुर्गम भागात विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी श्री. सोपानराव चव्हाण व सहकाऱ्यांनी कोयना 'एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली व १९६९ मध्ये 'बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण' सुरू करण्यात आले. पाटण तालुक्यातील अत्यंत दुर्गम भागात संस्थेच्या वतीने अनेक शाळा कार्यरत असून प्रामुख्याने विद्यार्थिनींसाठी या शाळा शिक्षणाच्या एकमेव स्रोत आहेत. निसर्गाच्या प्रखरतेवर मात करून उत्तम दर्जाचे शिक्षण देण्यासाठी संस्था प्रयत्न करत आहे. मा. सत्यजित पाटणकर, श्री. संजीव चव्हाण, श्री. याज्ञसेन पाटणकर अशा शिक्षण क्षेत्रातील अनेक अनुभवी लोकांच्या माध्यमातून आज संस्थेचे कामकाज बघितले जाते.

१९६७ मधे जनता शिक्षण संस्थेच्या 'किसन वीर महाविद्यालय, वाई'ची स्थापना करण्यात आली तसेच काही माध्यमिक शाळांची देखील निर्मिती करून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. स्व. प्रतापभाऊ भोसले यांनी स्थापन केलेली संस्था आज श्री. मदनदादा भोसले व कुटुंबीय आधुनिकतेची जोड देऊन चालवीत आहेत.

महाराष्ट्राचे समर्थ नेतृत्व करणारे स्व. बाळासाहेब देसाई

नोंद

अपशिंगे मिलिटरी हे सातारा जिल्ह्यातील सातारा तालुक्यातील एक लहान गाव आहे. गावातील प्रत्येक कुटुंबातील किमान एका सदस्याने सशस्त्र दलात सेवा केली आहे किंवा करत आहे. उपलब्ध नोंदींनुसार, पहिल्या महायुद्धात या गावाने आपले ४६ सैनिक गमावले होते. स्वातंत्र्यानंतर १९६२ च्या चीनविरुद्धच्या युद्धात चार सैनिक, १९६५ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात दोन सैनिक आणि १९७१ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात एक सैनिक शहीद झाला.

यांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक विश्वातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सवलत देऊन शैक्षणिक क्रांती घडवली. हाच वारसा पुढे नेत पाटण तालुक्यात शिवाजीराव देसाई यांनी 'मोरणा शिक्षण संस्थे'ची स्थापना केली. यासह बाळासाहेब देसाई फाउंडेशनच्या माध्यमातून मा. ना. श्री. शंभूराज देसाई व श्री. रविराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय, शाळांच्या माध्यमातून दुर्गम भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मा. चित्रलेखा माने-कदम यांच्याद्वारे पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे 'बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर' तर मा. सुनिता जगताप यांच्याद्वारे कोरेगाव एज्युकेशन सोसायटीचे 'शंकरराव जगताप महाविद्यालय, वाघोली' अशा संस्थांद्वारे महाविद्यालये, शाळा संचलित करून कोरेगाव तालुक्यातील विस्तीर्ण भागात शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात यशस्वी भूमिका बजावत आहेत.

सातारा जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेला पाचगणीसारख्या थंड हवेच्या ठिकाणामुळे एक वेगळी ऐतिहासिक परंपरा आहे. १८९५ मध्ये सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल सुरू करण्यात आले. त्यानंतर अनेक इंग्रजी शाळा पाचगणीत सुरू झाल्या व पाचगणी इंग्रजी शाळांचे शहर म्हणून महाराष्ट्रात किंबहुना देशभर ओळखले जाऊ लागले. अनेक शाळा चांगल्या पद्धतीने कार्यरत असून इंग्रजी माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्याचे काम करत आहेत.

१९७० च्या दशकात सातारा जिल्ह्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू होण्याकडे सुरुवात झाली. संपूर्ण सातारा जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या संस्थांचा आढावा घेणे याला लिखाण मर्यादेनुसार बंधन असले तरी उपराक्त सर्व शिक्षण संस्थांच्या स्वतःच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. मात्र सातारा शहरातील प्रायमरी सैनिक स्कूल, सेंट पॉल स्कूल, इंग्लिश मीडियम स्कूल, करंजे, निर्मला कॉन्व्हेंट, सातारा इंग्लिश मीडियम स्कूल, के. एस. डी. शानबाग इंग्लिश मीडियम स्कूल, नर्मदा इंग्लिश मीडियम स्कूल, निर्मला कॉन्व्हेंट, गुरुकुल स्कूल, दातार शेंदूरे इंग्लिश मीडियम स्कूल, हिंदवी पब्लिक स्कूल, यांसह नंतरच्या काळात आलेली पोद्दर इंटरनॅशनल, युनिव्हर्सल नॉलेज या सीबीएससी माध्यमाच्या इंग्रजी शाळा शैक्षणिक विश्वात आपले योगदान देत आहेत.

उच्च शिक्षण क्षेत्रात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरशी संलग्नित अनेक महाविद्यालये कार्यरत आहेत. त्यांच्या बहुतांश मातृसंस्थांचा वर उल्लेख झालेला आहे. मात्र कृष्णा अभिमत विद्यापीठाने वैद्यकीय महाविद्यालयासह अनेक शिक्षण संस्थांच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यात अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. नव्याने स्थापन झालेले रयत विद्यापीठ याचीदेखील उच्च शिक्षणातील एक महत्त्वाची घडामोड म्हणून नोंद घ्यावी लागेल.

अभियांत्रिकी क्षेत्रात कराडचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच वरील संस्थांसह समर्थ एज्युकेशन ट्रस्ट, यशोदा टेक्निकल कॅम्पस, धनलक्ष्मी फाउंडेशन कराड, आधुनिक शिक्षण देणाऱ्या संस्थांनी साताराच्या शैक्षणिक विश्वाला तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. पारंपरिक शिक्षणाचा मागोवा घेत असताना सातारा जिल्ह्यात अनेक वेदशाळा कार्यरत असून पारंपरिक सांस्कृतिक शिक्षण देण्याचे काम अनेक आचार्य करत आहेत. समाजात अत्यंत क्लेशदायक स्थितीत असलेल्या विशेष विद्यार्थ्यांना अत्यंत उत्तम दर्जाचे शिक्षण देणाऱ्या व संगोपन करणाऱ्या आनंद परिवार, रोटरी क्लब सातारा आनंदबन, समता शिक्षक प्रसारण मंडळाचे मूकबधिर विद्यालय, यांच्या विशेष विद्यार्थ्यांच्या शाळादेखील शैक्षणिक कार्याचे अलौकिक अंग आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेली अनेक जुनी वाचनालये व विश्वकोशासारखी संस्था ही साताऱ्यातील ज्ञानसंपादनातील ऊर्जा केंद्रे आहेत.

जिल्ह्यामध्ये काही मदरसे व उर्दू शाळादेखील कार्यरत असून त्याद्वारे मुस्लिम विद्यार्थ्यांना धार्मिक ज्ञान देण्याची व्यवस्था आहे. गेल्या ३० वर्षांत माझ्या शिक्षण क्षेत्रातील कारकिर्दीत माझ्या संपर्कात असलेली, काही वाचनातून समजलेली तसेच आंतरजालाच्या माध्यमातून उपलब्ध झालेली माहिती संक्षिप्त रूपात सर्वंकष मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक कर्तृत्वसंपन्न शिक्षण संस्था व त्यांचे कार्य माझ्या हातून व्यक्तिगत व लेखन मर्यादेमुळे राहून गेले आहे. त्यासाठी मी अशा सर्वांची क्षमा मागतो व लेखणीला विराम देतो.

(लेखक शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य आहेत.)

राजाराम शंकर गोसावी ऊर्फ राजा गोसावी हे प्रसिद्ध मराठी नाट्य आणि चित्रपट अभिनेते. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीत 'विनोदाचा राजा' म्हणत असत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील सिद्धेश्वर कुरोली (ता. खटाव) येथे झाला. मेळे, गाणी, नकला आणि नाटके यांची त्यांना लहानपणापासूनच आवड होती. नाट्यअभिनेते बाळ गोसावी हे राजा गोसावींचे धाकटे बंधू होत.



भाग्यश्री प्रमोद फरांदे
मो.: ९७५२११२७००

नांगर ते ए आय

कृषिगाथा

गड, किल्ले, धबधबे, पर्यटन यांबरोबरच साधा, सरळ आणि कष्टाळू शेतकरी हे सातारा जिल्ह्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सातारा जिल्हा हा लढाऊ बाणा आणि क्रांतिकारी विचारांचा वारसा असलेला पुढारलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. या विचार वारशाचे जतन आणि संवर्धन खेड्यापाड्यात शेतकऱ्याच्या घरातच झाले.

शेतकरी आणि शेती संस्कृती हे मराठी साहित्याचे अविभाज्य भाग राहिले आहेत. कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता यातील सर्वोत्तम साहित्य हे शेतकऱ्याच्या शेतात जन्माला आले किंवा त्याच्या प्रेरणेतून निर्माण झाले. त्यातून अनेक दृक्श्राव्य कलाकृती, चित्रपट आणि संगीतही जन्माला आले. शेत शिवाराची हिरवाई, मोट, झरे, कष्टकरी शेतकऱ्याची बाणेदार आणि अस्सल गावरान जीवनपद्धती याचे चित्रण अनेक कलाकारांनी साहित्य आणि चित्रपट माध्यमातून केले. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी, नातेसंबंध, निसर्गाचा प्रकोप, बाजारातील व्यापाऱ्यांच्या समोर असलेली शेतकऱ्यांची हतबलता, याचेही दर्शन साहित्यकृतीतून झाले. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला आणि त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम नेहमीच साहित्यातून झाले आहे. अशाच अनेक साहित्यकृतींना प्रेरणा देणारा जिल्हा म्हणजे सातारा.

गड, किल्ले, धबधबे, कास पठार, कोयना धरण, पाचगणी-महाबळेश्वर यांबरोबरच साधा, सरळ आणि कष्टाळू शेतकरी हे या जिल्ह्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सातारा जिल्हा हा लढाऊ बाणा आणि क्रांतिकारी विचारांचा वारसा असलेला पुढारलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. या विचार वारशाचे जतन आणि संवर्धन खेड्यापाड्यात शेतकऱ्याच्या घरातच झाले. स्वातंत्र्य लढा आणि सामाजिक परिवर्तन चळवळींमध्ये प्रामुख्याने शेतकरी समाज सहभागी होऊन अग्रेसर राहिला. त्यामुळे महाराष्ट्राच्या वैचारिक पुढारपणाचे श्रेय शेतकऱ्यांना जाते.

शेती पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल

सुमारे शंभर दीडशे वर्षांपूर्वी बैल आणि लाकडी नांगर घेऊन शेती करणारा साधाभोळा शेतकरी आता ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून शेती करतो आहे. जगाच्या पटलावर आपले स्थान निर्माण करतो आहे. मागील शंभर वर्षांत

नोंद

पाणी असेल तरच एखाद्या गावाचा, शहराचा विकास होतो. ही बाब ओळखून सातारा शहर वसविताना प्रतापसिंह महाराज थोरले यांनी स्थापत्य तंत्राचा कल्पकतेने वापर करून शहरात पाणी खेळवले. ठिकठिकाणी दगडांचे हौद आणि तलाव बांधले. यातील एक तलाव म्हणजे महादरे होय. १८२९ रोजी महादरे तलावाची उभारणी केली. संपूर्ण दगडी बांधकाम असलेला हा तलाव स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

सातारा जिल्ह्यातील शेती पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल झाले. विशेषतः मागील पन्नास वर्षांत, दुष्काळी गणल्या जाणाऱ्या तालुक्यात पीक पद्धती बदलली. शेतीची साधने पिकांचे प्रकार, खते औषधे यांची उपलब्धता व त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती यातही बदल झाला. किर्लोस्कर आणि त्यानंतर कुपर यांच्या लोखंडी नांगराची इथेच निर्मिती झाली. या नांगरांचा कर्मवीर भाऊराव पाटील आण्णांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात प्रचार, प्रसार केला. त्यामुळे शेतकऱ्याच्या हतबल आणि दयनीय स्थितीला शिक्षणाचा अभाव कारणीभूत असल्याचा त्यांचा विश्वास अधिक दृढ झाला असावा. या दोन्ही नांगरांमुळे शेतीच्या प्रगतीला चालना मिळाली.



अन्नधान्य पिके

हरितक्रांतीपूर्वी शंभर वर्षे मागे सातारा जिल्ह्यात(त्यावेळी सांगली आणि सातारा एकत्र होते) अन्नधान्य पिके प्राधान्याने घेतली जात. एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी सुमारे ३ लाख ७६ हजार हेक्टर (७८.१२ टक्के) क्षेत्र अन्नधान्य पिकाखाली होते. त्यामध्ये १ लाख ७२ हजार हेक्टरवर बाजरी,१ लाख २८ हजार हेक्टरवर ज्वारी, १८ हजार हेक्टरवर नाचणी, १७ हजार ७९० हेक्टरवर गहू,९ हजार ७१५ हेक्टर सावा, ७ हजार ७९३ हेक्टर भात, ७ हजार ७८३ हेक्टर राळा, ५२७ हेक्टर बार्ली किंवा जव आणि सुमारे १४ हजार हेक्टरवर कोद्रासारखी इतर धान्य-पिके घेतली जात. सुमारे ६२ हजार ६११ हेक्टर क्षेत्रावर (१३.७७ टक्के) कडधान्य-पिके होत असत. त्यात १७ हजार ७०२ हेक्टर हरभरा, १२ हजार ५२८ हेक्टर तूर, ११ हजार हेक्टर कुळीथ, ३ हजार ८८१ हेक्टर उडीद, १ हजार ३६० हेक्टर मूग, तर १६ हजार ११७ हेक्टर वाटाणा, मसूर व इतर कडधान्यांचा समावेश होता. १७ हजार ७६५ हेक्टर क्षेत्र हे तीळ, अलसी अशा तेलबिया पिकांखाली होते. तर, ५ हजार ६६४ हेक्टरवर कापूस, ताग सारखी पिके होत असत. उसाचे पीक फक्त ३ हजार ३३४ हेक्टरवर घेतले जात होते. त्या व्यतिरिक्त मिरची, तंबाखू, कॉफी, करडई, तसेच अडीच हजार हेक्टरवर फळे आणि भाजीपाला होत असे.

शेतीला प्रतिष्ठाही होती. कोणत्याही रासायनिक खतांच्या वापराशिवाय शेतीउत्पादन होत असे. त्या वेळी जिल्ह्यात लागवड कालावधीनुसार दूधमोगरा, काळबोंडी, शाळू, तांबड आणि उटवली किंवा अरगडी अशी पाच

सातारा शहरापासून जवळच लिंब गावाच्या दक्षिणेला २ कि.मी. अंतरावरील शेरीची वाडी या ठिकाणी बारा मोटेची विहीर आहे. बारा मोटेची विहीर म्हणजेच बारा मोटा असलेली विहीर. ही विहीर म्हणजे वास्तुकलेचा एक अप्रतिम नमुना आहे. ह्या विहिरीतून पाणी उपसण्यासाठी एकावेळी १२ मोटा लावल्या जात. देश विदेशातील पर्यटक ही विहीर पाहण्यासाठी येत असतात.

नोंद

प्रकारची ज्वारी, बक्षी आणि खपली असा दोन प्रकारचा गहू, तसेच इतर धान्य आणि कडधान्याचे देशी वाण प्रचलित होते. उसाचेसुद्धा पांढरा किंवा खड्या, बांगड्या, आणि काळा किंवा तांबडा असे तीन प्रकार अस्तित्वात होते, जे गूळ बनवण्यासाठी वापरले जात. अन्नधान्य पिकांमध्ये विविधता होती. शेतीसाठी लाकडी नांगर, कुळव आणि पाबर व्यतिरिक्त कोणतीही यंत्रे अवजारे अस्तित्वात नव्हती. त्यामुळे बैलांच्या साहाय्याने अत्यंत कष्टाने शेती केली जात असे. १८८२ च्या काळात जिल्ह्यात सुमारे १ लाख २० हजार १५८ शेतकरी खातेदार होते आणि ११७ हेक्टर सरासरी जमीन धारणा होती. एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या फक्त ३.१५ टक्के क्षेत्रच सिंचनाखाली होते. ३८ टक्के खातेदारांकडे किमान ५ एकर जमीन होती, ज्यांना त्या वेळी लहान किंवा अल्पभूधारक गणले जात असे. ३७८२ खातेदारांकडे ५० ते १०० एकर आणि १२८५ खातेदारांकडे १०० ते २०० एकर जमीन होती. जिल्ह्याचा संपूर्ण पूर्व भाग हा दुष्काळी होता. हरितक्रांती होईपर्यंत शेतीकडे केवळ जगण्याचे साधन म्हणूनच पाहिले जाई. त्यामध्ये व्यावसायिक दृष्टिकोन नव्हता. उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी, असे समीकरण असल्याने शेतीला समाजात प्रतिष्ठाही होती.

हरितक्रांतीनंतर बदल

स्वातंत्र्योत्तर काळात हरितक्रांतीनंतर शेतीमध्ये खरे बदल झाले. शेतीकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहण्यास सुरुवात झाली. त्यामुळे प्रत्येकाला शेतीची मालकी आवश्यक वाटू लागली. परिणामी, शेतीचे तुकडे झाले. १९५० साली सातारा जिल्ह्यात १ लाख ८८ हजार ४७६ खातेदार होते, जे आज सुमारे ९ लाख ६४ हजार आहेत, आणि केवळ ७८ गुंठे सरासरी जमीन धारणा आहे. शेतकऱ्यांची संख्या वाढली; पण शेतीचा आकार लहान झाला.

आजही पश्चिम भागात मुसळधार पाऊस पडतो आणि पूर्व भागात दुष्काळ आहे; परंतु पीक पद्धती सिंचनाधारित झाली आहे. आता जिल्ह्याचे सुमारे ३० टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. ज्वारी, बाजरीचे जुने वाण आता प्रचलित नाहीत. राळा, सावा, कुळीथ, करडई, तीळ, खपली गहू, ताग, जवस आदी पिके नामशेष झाली आहेत. ज्वारी, बाजरी, नाचणी यांचे क्षेत्र कमी होत आहे. सोयाबीन आणि उसाने त्याची जागा घेतली आहे. सुमारे १ लाख १५ हजार हेक्टरवर आज उसाचे, तर ९० हजार हेक्टरवर सोयाबीनचे उत्पादन आता घेतले जाते. रासायनिक खते आणि औषधांचा वापर वाढला आहे. सातारा जिल्ह्यात दर वर्षी सुमारे २ लाख टन खताची विक्री होते. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढली आहे. २०२४-२५ या वर्षात सातारा जिल्ह्यात सुमारे ५ लाख ८०हजार मे. टन अन्नधान्याचे उत्पादन झाले. फळे आणि भाजीपाला क्षेत्र वाढले आहे. सोयाबीन, ॲवोकॅडो, ड्रॅगन फ्रुट, ब्लूबेरी, खजूर, विदेशी भाजीपाला ही मुळात आपली नसलेली अशी पिकेदेखील घेतली जात आहेत. जिल्ह्यात सुमारे ४० प्रकारची फळे आणि तितक्याच प्रकारचा भाजीपाला सध्या उत्पादित होतो आहे. सातारा जिल्ह्यात पर्वतीय, उप पर्वतीय, मैदानी आणि दुष्काळी असे चार प्रकारचे कृषी हवामान विभाग आहेत. जिल्ह्यात पूर्व भागात सरासरी ४५० मिमी पाऊस पडतो आणि उन्हाळ्यातील तापमान ४२-४६ अंश सेल्सियसपर्यंत जाते, तर पश्चिम भागात ५००० मिमी पाऊस पडतो आणि महाबळेश्वरला वर्षभर थंड हवामान असते. देशातील अतिशय वैशिष्ट्यपूर्ण हवामान स्थिती सातारा जिल्ह्यात आढळते.

पिकांची विविधता

शेतीक्षेत्रात पिके आणि वाण, पाणी व्यवस्था, कीड रोग नियंत्रणात झालेले संशोधन जसजसे शेतकऱ्यांना समजू लागले तशी पिकांची विविधतादेखील दिसू लागली. मागील वीस वर्षांच्या काळात अधिक उत्पादन देणारी, सहज विक्रीव्यवस्था उपलब्ध असलेली आणि कमी श्रम करावी लागणारी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढतो आहे. त्यामुळे मोठ्या क्षेत्रावर ऊस आणि सोयाबीनची एकपीक पद्धती दिसते आहे.

खरे तर बहुपीक पद्धती, आंतरपीक पद्धती जमिनीचा पोत राखण्यासाठी उत्तम असतात; परंतु सरासरी जमीन धारणा खूप कमी झाल्याने एकपिकाद्वारे अधिक उत्पादन असे समीकरण झाले. सिंचनासाठी साधन सुविधा असलेल्या तालुक्यांमध्ये भाजीपाल्याची आंतरपीक पद्धती अनुसरली जात आहे; परंतु त्याचे प्रमाण कमी आहे. सरासरी जमीन धारणा कमी होणे, खते आणि कीटकनाशकांचा अतिरेकी वापर, देशी वाण आणि मिलेटवर्गीय पिके नामशेष होणे, असे अनेक नकारात्मक



सातारा शहरात 'बाजीराव विहीर' म्हणून एक आकर्षण केंद्र आहे. ही १०० फूट खोल असून तिचा आकार महादेवाच्या पिंडीसारखा आहे. या विहिरीस ९ कमानी आहेत, तसेच या विहिरीमध्ये छत्रपती शाहू महाराजांचे राजचिन्हांसह शिल्प कोरण्यात आलेले आहे. या विहिरीमध्ये आजही दगडामध्ये जिवंत पाण्याचे झरे आहेत. पूर्वी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या याच बाजीराव विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत होते.

बदल मागील पन्नास वर्षांत कृषी क्षेत्रात झाले. त्याचबरोबर काही सकारात्मक बदलदेखील झाले. शेतीमधील नवीन संशोधनाचा शेतकरी अंगीकार करू लागले. त्यामुळे अनेक प्रयोगशील शेतकरी जिल्ह्यात उदयास आले. त्याचाच परिणाम म्हणून पूर्वेकडील दुष्काळी तालुके थोड्या पाण्याच्या उपलब्धतेत देखील फळबाग लागवडीत अग्रेसर झाले आहेत. कॅनॉल द्वारे उपलब्ध झालेले पाणी शेततळ्यात साठवून शेकडो



एकरवर डाळिंब, आंबा, द्राक्ष, सीताफळ, पेरू, ड्रॅगन फ्रूट अशा फळांचे उत्पादन आणि निर्यात होत आहे. हरितक्रांतीने प्रति हेक्टर उत्पादतेबद्दल शेतकऱ्यांना जागृत केले. खते, संकरित बियाणे याबद्दल विद्यापीठे आणि कृषी विभागाच्या विस्तार कार्यामुळे आपण अन्नधान्यात स्वयंपूर्ण होऊ शकलो. या विस्तार कार्याला ज्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला, तेथील शेतीला आधुनिक रूप येऊ लागले. साताऱ्यातदेखील नव्या वाणांचा प्रसार झपाट्याने झाला. केवळ आठ वर्षांत २७ हजारपेक्षा जास्त अवजारे आणि शेतीयंत्रे विविध योजनांमधून शेतकऱ्यांनी खरेदी केली. साताऱ्यात १९७४-७५ मध्ये ८३६ किलो प्रति हेक्टर असणारी भाताची उत्पादकता आज १९७३ किलो प्रति हेक्टर आहे. २६१ किलो/ हे. असणारी ज्वारीची उत्पादकता आज १४३६ कि/हे. आहे. पन्नास वर्षांत दुप्पट झालेली सर्वच पिकांची उत्पादकता हे जिल्ह्यातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाला देत असलेल्या प्रतिसादाचे द्योतक आहे, असेच म्हणावे लागेल. जिल्ह्याच्या जीडीपीमध्ये सध्या कृषी क्षेत्राचा वाटा १३.५ टक्के आहे. यात सहकाराने साधलेल्या प्रगतीचे योगदान मोठे आहे.

कृषी क्षेत्रात क्रांतिकारी बदल

स्वातंत्र्यपूर्व काळात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सत्यशोधकांनी शेतकऱ्यांची सावकारीतून मुक्तता करण्यासाठी सहकार परिषदा या जिल्ह्यात घेतल्या. 'सहकाराची' रुजवणूक होण्यासाठी कोर्सेस चालविले गेले, परीक्षा घेतल्या गेल्या. समूह शेतीसारखे प्रयोग साताराराेड परिसरात झाले. त्यातून सहकार रुजण्याला चालना मिळाली. यामुळे शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यासाठी सहकारी पतपेढ्या, कृषी संस्थांची काही प्रमाणात निर्मिती झाली. पुढे महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर जिल्ह्याचे सुपुत्र, महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी स्वीकारलेल्या सहकार धोरणामुळे कृषी क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले. सहकारी कारखानदारीला वेग आला. कमी जमीन असतानादेखील केवळ 'एकमेका साहाय्य करू' या मार्गामुळे अल्पभूधारक शेतकरीदेखील आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ लागला. आज जिल्ह्यात १७ साखर कारखाने कार्यरत आहेत. ज्यात सुमारे १२७ लाख टन उसाचे गाळप केले जाते. ९६३ विकास सेवा संस्थांमार्फत शेतकऱ्यांना सुमारे ३ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले जाते. कर्ज फेडण्याचे

नोंद

कराडमधील प्रमुख ऐतिहासिक वास्तूंपैकी एक, ऐतिहासिक मिनार (मशिदीचे मनोरे) हे मुघलकालीन वास्तुकलेचा उत्तम नमुना असून, ते सुलतान अली आदिलशाहने बांधलेल्या मशिदीचा भाग आहेत, जेथे उंच, गोलाकार पायऱ्यांनी वर जाता येते आणि ते दुरूनही दिसतात. हे मनोरे सुमारे १०६ फूट उंच असून, त्यांच्यामध्ये गोलाकार पायऱ्या आहेत, ज्यांच्या मदतीने वर जाता येते. या मनोऱ्यांवरून कराडचा परिसर दिसतो.

प्रमाण गेली अनेक वर्षे सरासरी सुमारे ९८%आहे; पण सहकाराची आणि सहकाराच्या नैतिक अधिष्ठानाची पाळेमुळे नव्या पिढीमध्ये खोलवर रुजणार का, असा प्रश्न सध्या सर्वांना सतावतो आहे. सहकाराने कारखानदारीबरोबरच आर्थिक सुबत्ता, शिक्षण, आधुनिक विचार आणि स्पर्धाक्षमता शेतकऱ्यांच्या दारापर्यंत आणली.

महिलांचा वाटा मोठा

जिल्ह्याच्या कृषी विकासात महिलांचा वाटा मोठा आहे. घरातील पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या शेतात कष्ट करीत असल्यानेच कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय असे पूरक व्यवसाय यशस्वी आहेत. शेतीतील ७० टक्के कामे महिलाच करतात. शेतीपूरक व्यवसायातूनच ग्रामीण महिलांचे खरे सक्षमीकरण होऊ लागले. केवळ शेतीकामांच्या मर्यादेत न राहता त्यापुढे जाऊन जिल्ह्यात शेतकरी महिलांचे गट आणि उत्पादक कंपन्यांचे उद्योग आता उभे राहू लागले आहेत. भौगोलिक दृष्ट्या विचार केल्यास सातारा जिल्ह्याचा पाटण, जावळी, महाबळेश्वर हा पश्चिम भाग अत्यंत डोंगराळ आणि दुर्गम आहे. येथील शेतकरी भात, नाचणी अशीच पिके घेतात. या भागात पर्यटन व्यवसायाच्या उत्तम संधी आहेत; परंतु त्या संधीचे सोने करताना हवामान बदलामुळे होणारे परिणाम विसरता कामा नये. जमीन, जंगल आणि प्राण्यांचे शाश्वत संवर्धन करूनच पुढे जावे लागेल. पूर्व जावळी, वाई, सातारा, कोरेगाव, कराड हा भाग काळ्या कसदार जमिनीचा आहे. अन्नधान्याबरोबरच उसाचे मोठे उत्पादन याच भागात होते. महामार्ग लगत असल्याने भाजीपाला, हळद आणि आले या पिकांनी येथे समृद्धी आणली आहे. या भागातील शेतकरी कष्टाच्या जोरावर अत्यल्प-भूधारक असूनही अस्मानी संकटांचा सामना करत प्रयोगशील आहे. पूर्व सातारा हा माण, खटाव आणि फलटण या तालुक्यांचा दुष्काळी भाग आहे; परंतु या भागातील शेतकरी आज प्रगतिशील आहे. ज्वारी बाजरी, मूग, उडीद बरोबरच आधुनिक फळशेती येथे होते, फळाचे गाव धुमाळवाडीदेखील याच भागात फलटण तालुक्यात आहे. द्राक्ष, डाळिंब, पेरू आणि भाजीपाल्याची निर्यात आता याच भागातून होते आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित शेतीचे प्रयोग कृषी विभागामार्फत इथे होत आहेत. महाराष्ट्राच्या ज्या भागात शेतकरी आत्महत्या करतात त्या सारखाच दुष्काळ शतकानुशतके या तालुक्यांमध्ये आहे. तथापि या भागात कधीही शेतकऱ्याची आत्महत्या झाल्याचे ऐकिवात नाही. उलट महाराष्ट्राच्या प्रशासनात सर्वोत्तम असलेले अनेक सनदी अधिकारी या प्रदेशाने दिले आहेत. शेतीतून श्रीमंत झालेले शेतकरी याच भागात आहेत. कसे घडले असावे हे? शेती संस्कृती जेव्हा प्रगतिशील विचारांचा वारसा रुजवते आणि अंगी बाणवते तेव्हाच असे बदल घडू शकतात.

प्रश्नाचे रूपांतर संधीत

महाराष्ट्राच्या सर्वदूर भागातील शेतकऱ्याचे प्रश्न सातारा जिल्ह्याच्या शेतकऱ्यांनाही भेडसावत आहेत; परंतु प्रश्नाचे रूपांतर संधीत करण्याचे धाडस इथल्या शेतकऱ्यांनी नेहमी केल्याचे दिसते. पिकांची विविधता आणि उत्पादकता येथील शेतकऱ्यांनी दुप्पट केली असली तरीही जागतिक उत्पादनाच्या तुलनेत अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानामुळे कृषी व्यापार आणि शेतमाल प्रक्रियेत प्रचंड रोजगार निर्मितीची क्षमता जिल्ह्याला प्राप्त झाली आहे. त्याचा सुयोग्य वापर शेतकरी कुटुंबातील मुलामुलींनी करणे आवश्यक आहे आणि तशीच ध्येय-धोरणे ठरविण्यासाठी शेतकऱ्यांच्या दबाव गटाचीदेखील आवश्यकता आहे. तरच सध्या कनिष्ठ गणली जात असलेली शेती उद्योग स्वरूपात भरारी घेईल.

जागतिक हवामान बदलामुळे उष्णता आणि पावसाचे प्रमाण आणि तीव्रता दिवसेंदिवस बदलते आहे. त्यामुळे शेतीत अनेक नवीन प्रश्न तयार होत आहेत. यावर्षी वर्षभर न संपलेला पावसाळा आणि दुष्काळी भागात अतिवृष्टीने झालेले नुकसान जिल्ह्याने पाहिले आहे. तरीही शेतकरी शेतात नवा विचार घेऊन येत आहे. शेतकरी करत असलेले नवनवीन तंत्रज्ञानाचे प्रयोग आणि यांत्रिकीकरण पाहता निसर्गातील बदल, लोकसंख्येचे अवलंबित्व, छोट्या जमीन धारणा आणि केवळ ३० टक्केच असणारे सिंचन या आव्हानांशी दोन हात करत साताऱ्यातील साडेनऊ लाख शेतकरी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अत्याधुनिक शेतीसाठी सज्ज आहेत, असेच म्हणावे लागेल.

(लेखिका सातारच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आहेत.)



कराडमध्ये 'पंताचा कोट' हा एक ऐतिहासिक भाग आहे. कृष्णा-कोयना संगमाजवळ असलेला पंताचा कोट हा एक जुना तटबंदीचा भाग आहे, जिथे प्राचीन अवशेष सापडले आहेत. सातवाहन काळातील नाणी आणि मातीची भांडी या परिसरात सापडल्याने ही वास्तू महत्त्वाची आहे. कराडचे ऐतिहासिक महत्त्व त्यामुळे अधोरेखित होते.



संभाजीराव पाटणे
मो.: ९४२२६०६१७७

सातारा जिल्ह्याचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग

मराठा साम्राज्याची राजधानी असलेल्या सातारा जिल्ह्याला स्वातंत्र्यलढ्याचीही मोठी पार्श्वभूमी आहे. सातारा जिल्ह्याचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग हे इतिहासातील एक देदीप्यमान पान आहे.

सातारचे छ. प्रतापसिंह महाराज यांना इंग्रजांनी ५ सप्टेंबर १८३९ रोजी पदच्युत केले. इंग्रजांच्या कपटी कारस्थानाचा आणि रावणशाहीचा निषेध करून राजाला न्याय मिळवून देण्यासाठी रंगो बापूजी इंग्लंडला गेले. आपल्या छत्रपतींच्या तख्त रक्षणासाठी चौदा वर्षे त्यांनी विलायतेत संघर्ष केला. कंपनी सरकारचा जळजळीत धिक्कार केला. पहिला निःशस्त्र सत्याग्रह करणाऱ्या सातारच्या राजाला इंग्रजांकडून न्याय मिळाला नाही. तोफखान्याचे सरसेनापती हैबतराव राजे महाडिक यांना तोफेच्या तोंडी देण्यात देण्यात आले. रंगो बापूजींनी महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेविरुद्ध उठाव केला. इंग्रजी दानवी अत्याचाराविरुद्ध लढणारे रंगो बापूजींचे सुपुत्र सीताराम गुप्ते व त्यांच्या सोळा साथीदारांना सातारच्या गेंडामाळावर तोफेच्या तोंडी देऊन, फाशी देऊन, गोळ्या घालून ठार केले. या देहदंडणाची तारीख होती ८ सप्टेंबर १८७७. वाईचे क्रांतिकारक बाळाजी जोशी यांना इंग्रजी सत्तेविरुद्ध उठाव केला म्हणून १८७३ साली अटक झाली. त्यांनी २७ वर्षे दीर्घ कारावास भोगला. १९०२ साली त्यांची सुटका झाली. नंतर त्यांचे निधन झाले. वाई तालुक्यातील बावधन नजीकच्या कणूर गावचे श्रीपती मारुती जाधव यांनी स्वातंत्र्य चळवळीत तुरुंगवास भोगला. त्यांचे नंतर निधन झाले. वाईचे विष्णू पुरुषोत्तम लेले, बाळाजी ऊर्फ सदाशिव नारायण जोशी हे हुतात्मा झाले. वडूजला ९ सप्टेंबर १९४२ रोजी परशुराम श्रीपती घार्गे व त्यांचे आठ साथीदार मोर्चावरील पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ठार झाले. कराड तालुक्यातील दुशेरे गावचे व्यंकप्पा ह्यानू जाधव पोलिस छाप्यात गोळी लागून ठार झाले. याच गावचे हणमंत कृष्णा लोहार शस्त्रागारामधल्या बंदुका पळवून नेत असतानाच नडशी (माळ) येथे पोलिस छाप्यात ठार झाले. इंदोलीचे केशव अमृता कोळगुडे-जाधव सत्याग्रह चळवळीत

स्वातंत्र्यलढा

अमेरिकन मराठी मिशनने साताऱ्यातील पहिली निवासी प्राथमिक शाळा १८३४ मध्ये सुरू केली. मिस इजाबेल न्युजंट ह्या पहिल्या मुख्याध्यापिका होत्या. मुलांच्या आरोग्यासाठी वैद्यकीय चाचणी, औषधे, टॉनिक्स ह्या बाबींकडे त्यांनी विशेष लक्ष पुरवले. ह्याच वर्षी शासन मान्यता मिळून शाळेचे नाव 'युनियन (प्राथमिक) स्कूल' असे ठेवण्यात आले.

नोंद

भाग घेतल्याबद्दल कारावास भोगत असतानाच तेथील भयंकर छळाने आजारी पडून तुरुंगातच मरण पावले. कराडचे लक्ष्मण गणेश जोशी यांना १९३२ च्या सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल अटक झाली. ९ सप्टेंबर १९३२ रोजी पुण्याच्या येरवडा जेलमध्ये त्यांचा मृत्यू झाला. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेले सदाशिव नारायण पेंढारकर १२ एप्रिल १९४६ रोजी मृत्यू पावले. सातारचे पुरुषोत्तम ऊर्फ तानाजी बाळकृष्ण पेंढारकर, सातारा जिल्ह्याच्या भूमिगत चळवळीत काम करताना विषमज्वराने आजारी पडले. कराड येथे त्यांचा मृत्यू झाला. जन्माने राजस्थानमधील पाली गावच्या; परंतु वास्तव्याने सातारच्या असलेल्या चंपाबाई बन्सीलाल भट्टड कारावास भोगताना झालेल्या हालामुळे आजारी पडल्या. जेलमधून सुटल्यावर मुदतीच्या तापामुळे मृत्यू पावल्या. तसेच पर्वती साळुंखे, नारायण शेंडे, अंबाजी शिर्के हुतात्मा झाले. कोरेगांव तालुक्यातल्या भोसे गावचे कृष्णाजी पांडुरंग भोसेकर-कुलकर्णी सशस्त्र क्रांती गटात सहभागी झाले. भूमिगत राहून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. कॅलिफोर्नियात त्यांचे निधन झाले. खटाव तालुक्यातील कळंबीचे हरीबा नाईक व पाटलू येसू घाडगे यांनीही स्वातंत्र्य लढ्यात प्राणाहुती दिली. कराड तालुक्यातल्या सुपन्याचे कुंडलिक बाबाजी कदम १९४२ च्या आंदोलनात मारले गेले.



राष्ट्राची संजीवनी

सातारा जिल्ह्यातील ज्या ज्ञात, अज्ञात शूर वीरांनी स्वातंत्र्य वेदीवर बलिदान केले, त्यांची स्मृती राष्ट्राची संजीवनी आहे. जिल्ह्यातील हुतात्म्यांची स्मारके ही त्यागाची, देशभक्तीची आणि सर्वस्व समर्पणाची मानचिन्हे आहेत. स्वातंत्र्य सूर्याच्या दर्शनासाठी प्राणांची अर्घ्ये देणाऱ्या या शूर महावीरांच्या संस्मरणाबरोबरच 'प्रासाद आम्हा बंदिशाला' मानणाऱ्या हजारो सातारी माणसांनी राष्ट्राच्या संसारासाठी सर्वस्वाचा होम केला. जिल्ह्यातल्या सर्व भागांतून देशभक्तांची तुफानी फौज स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाली.असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, विदेशी कपड्यांची होळी, स्वदेशी, दारुबंदी पिकेटिंग, बुलेटिन्स वाटप, मोर्चे, हरताळ, मिरवणुका, प्रभातफेऱ्या, प्रवचने, कीर्तने, भजने, पोवाडे, झेंडावंदने, सभा, भूमिगत चळवळ, प्रतिसरकार, राष्ट्रीय शिक्षण, वृत्तपत्रांतून स्वातंत्र्यासाठी प्रचार, चलेजाव चळवळीत सहभाग इत्यादी बरोबरच ब्रिटिश सत्तेला हादरे देण्यासाठी रेल्वे स्टेशने, सरकारी इमारती जाळणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, रूळ उखडून टाकणे, उठावासाठी शस्त्रे गोळा करणे, घातपात करून शासन व्यवस्था खिळखिळी करणे, भूमिगतांना आश्रय देऊन सहकार्य करणे अशा स्वातंत्र्य आंदोलनाच्या विविध रूपांशी सातारा जिल्हा समरस झाला होता. पोलिसांच्या मारहाणीला, जुलूम-जबरदस्तीला, दहशतीला येथील जनता भ्यायली नाही. डगमगली नाही. मागे हटली नाही. अन्यायाशी, अत्याचाराशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य निर्माण झाल्यामुळे 'स्वातंत्र्य' या एकाच ध्येयाने हजारो स्वातंत्र्यवीरांनी या लढ्यात आपले योगदान दिले. मसूरचे श्री. दत्तोबा काटकर व त्यांच्या पत्नी सौ. काटकर यांना १९४२ च्या चळवळीत अटक झाली. तुरुंगामध्ये सौ. काटकर बाळंत झाल्या. त्या वेळी त्यांनी आपल्या मुलीचे नाव तुरुंगबाला ठेवले.

स्फूर्तिदायी स्वातंत्र्यसेनानी

ज्यांच्या असामान्य देशभक्तीचा गौरव करावा अशा स्वातंत्र्यसेनानींच्या महान परंपरेत यशवंतरावजी चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतरावदादा पाटील,

नोंद

कवी रेव्हरंड नारायण वामन टिळक सातारा येथे दोनदा वास्तव्याला होते. 'ख्रिस्तायन' हे महाकाव्य लिहिण्याचा त्यांचा मानस नगरमध्ये निवांतपणा मिळत नसल्याने पूर्ण होत नव्हता. रेव्हरेड डॉ. रॉबर्ट ह्यूम ह्यांनी साताऱ्यात असलेली त्यांची कन्या मिसेस ली हिला सांगून गावाबाहेरचा बंगला टिळकांसाठी तयार करवून टिळकांना सहकुटुंब तिकडे पाठवले. गेल्या गेल्या टिळकांनी 'ख्रिस्तायनाश्रम' अशी पाटी बंगल्यावर लावून लेखनाला प्रारंभ केला.

क्रांतिसिंह नाना पाटील



किसन वीर



यशवंतराव चव्हाण



क्रांतिवीर आबासाहेब वीर, बाबूराव घोरपडे-गुरुजी, दादासाहेब साखवळकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, हरिभाऊ लाड, बाबूराव गोखले, स्वामी रामानंद भारती, कासेगावकर वैद्य, बापूराव कचरे, डी. जी. देशपांडे, माधवराव जाधव, शेखकाका, काशीनाथ देशमुख, नाथ घाणेकर, जी. डी. लाड, राघुअण्णा लिमये, संभाजीराव थोरात, बुवा म्हावशीकर, बाबूराव चरणकर, गौरीहर सिंहासने, दत्ताराम महाराज, दिनकरराव निकम, व्यंकटराव पवार, भाऊसाहेब सोमण इत्यादींचा समावेश होतो. ज्या स्वातंत्र्य सेनानींनी स्वराज्य गाथा निर्माण केली त्यांची दीर्घ नामावली आहे. स्फूर्तिदायी अशा या सर्व स्वातंत्र्य सेनानींना कृतज्ञताभावाने अभिवादन!

स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्ह्याचा इतिहास, बलिदानाचे, उत्कट देशभक्तीचे, त्यागाचे, धैर्याचे, शौर्याचे, अलौकिक दर्शन घडवितो म्हणूनच हा इतिहास तेवता आहे-जागता आहे-गौरवशाली आहे-अमर आहे -दिव्यत्वाची प्रचीती देणारा आहे.

'दिव्यत्वाची जेथ प्रचीती, तेथे कर माझे जुळती!'

(लेखक इतिहासाचे अभ्यासक आहेत.)

सातारा जिल्ह्यातून अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मोठी चळवळ डॉक्टर नरेंद्र दाभोळकरांच्या नेतृत्वाखाली १९८९ ला सुरू झाली. भानामती, जादूटोणा, चमत्कार, जटा निर्मूलन, जात पंचायतीला विरोध अशा मुद्द्यांवर ही समिती कार्यरत आहे. बघता बघता समितीने महाराष्ट्रव्यापी संघटना निर्माण केली. युवकांचा मोठा प्रतिसाद या आंदोलनाला मिळाला व मिळत आहे.

नोंद



डॉ. संदीप गजानन श्रोत्री
मो.: ९८२२०७८७८३

गिर्यारोहणाची राजधानी

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेला आहे. इतिहास, संस्कृती, निसर्गसंपदा आणि राजकीय चळवळी यांबरोबरच साहसी क्रीडा प्रकारांसाठी, परंपरेसाठीही सातारा ओळखला जातो. गेल्या काही काळात ही ओळख अधिकच गडद झाली आहे.

साहस

दिनांक ११ जुलै २०२५ रोजी रात्री अचानक आनंदाची बातमी आली. आली तीच हत्तीवरून साखर उधळत, ढोलताशे वाजवत, सर्व निसर्गप्रेमी, दुर्गप्रेमी आणि इतिहासप्रेमी मंडळींची छाती अभिमानाने आणि आनंदाने फुलवत.

काय होती ती बातमी? छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचे युनेस्कोच्या सांस्कृतिक वारसा स्थळांमध्ये नामांकन त्या दिवशी जाहीर झालं. 'मराठा मिल्ट्री लँडस्केप' ह्या शीर्षकाखाली 'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून सह्याद्रीमधील मराठा साम्राज्याच्या ३५० पेक्षा अधिक डोंगरी आणि सागरी किल्ल्यांना दिलेली ही जागतिक मान्यता आहे. अभिमानाची गोष्ट ही की, त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील किल्ले प्रतापगडचा समावेश आहे. सह्याद्री पर्वतरांगा, त्यांच्या आश्रयाने वाढलेले दुर्गम जंगल आणि प्राणी-पक्षी सृष्टी, तेथे जन्म घेणाऱ्या नद्या यांचा सुयोग्य वापर जर कुणी केला असेल, तर तो छत्रपती शिवाजी महाराजांनी. महाराजांनी हे किल्ले वैभव उभारले ते सह्याद्रीच्या निसर्गवैभवाला हाती धरूनच. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांचे त्रिस्तरीय स्थापत्य (माची, किल्ला बालेकिल्ला) हा मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. शिवाजी महाराजांच्या ह्या स्वराज्य स्थापनेची सुरुवात रायरेश्वर मंदिरात शपथ घेऊन झाली होती. स्वराज्याची पहिलीवहिली लढाई ही किल्ले सुभानमंगळ ह्या सातारा जिल्ह्यातील शिरवळच्या किल्ल्यापाशी झाली होती. आमचे भाग्य असे की, आमचा जन्म व वास्तव्य सातारा जिल्ह्यातील आहे आणि हाच शौर्याचा आणि साहसाचा वारसा सातारा जिल्ह्याची भूमी आजही पुढे चालवते आहे.

हीच आपली श्रीमंती

सप्टेंबर २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यामध्ये आणखीन एक आनंदाची बातमी

नोंद

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पहिल्यांदाच दिल्लीत जाऊन आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनातही सातारकरांची संख्या सर्वाधिक होती आणि सातारकरांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले होते. एकूणच साहित्य संमेलने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचा पाठपुरावा यामध्ये सातारा जिल्ह्याचा मोठा वाटा आहे.

धडकली, युनेस्कोच्या यादीमध्ये भारतातील दहा स्थळे नैसर्गिक वारसा हक्क स्थळे म्हणून जाहीर झाली. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील पाचगणी आणि महाबळेश्वर येथील डोंगरधारा आणि सरळसोट कडे आहेत. बरोबर १३ वर्षांपूर्वी पश्चिम घाटांच्या ३९ स्थळांचं युनेस्कोच्या नैसर्गिक वारसास्थळांमध्ये नामांकन जाहीर झालं होतं. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील पुष्पपठार कास आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचा समावेश आहे. प्रत्येक साताराकराला अभिमान वाटावा, अशा ह्या घटना आहेत. हीच आपली श्रीमंती आहे.

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेला आहे. इतिहास, संस्कृती, निसर्गसंपदा आणि राजकीय चळवळी यांबरोबरच साहसी क्रीडा प्रकारांसाठी परंपरेसाठीही सातारा ओळखला जातो. या जिल्ह्याची भौगोलिक रचना पाहिली तर डोंगरकडे, किल्ले, दऱ्या-खोऱ्यांनी भरलेली ही भूमी साहसप्रेमींसाठी जणू एक नैसर्गिक विद्यालयच आहे. उगीच नाही सातारा जिल्ह्यातील लाखो तरुण पहिल्या महायुद्धापासून आजतागायत देशाच्या लष्करामध्ये सेवा देत आहेत. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी देशातील पहिले सैनिकी शिक्षण देणारे सैनिक स्कूल सातारा येथे सुरू केले. गिर्यारोहणाचा इतिहास, त्याचे सामाजिक-सांस्कृतिक महत्त्व आणि साताऱ्याच्या पर्वतरांगांतून झालेली त्याची उभारणी यावर नजर टाकली, तर या जिल्ह्याची वेगळी ओळख प्रकर्षाने जाणवते.

सशक्त पिढी घडवणारी भूमी

सातारा जिल्हा ही साहसी खेळांची आणि पर्यायाने सशक्त पिढी घडवणारी भूमी आहे. सातारा जिल्हा हा सह्याद्रीच्या मुख्य रांगेत आणि नीरा-कृष्णा-कोयना-वारणा खोऱ्यांत विस्तारलेला आहे. पूर्वीचा सातारा जिल्हा हा तर नीरा ते वारणा नद्यांच्या दरम्यान विस्तारला होता. ह्याच जिल्ह्यात महाबळेश्वर, पाचगणी सारखी थंड हवेची ठिकाणे, रायरेश्वर, पाचगणीचे टेबललँड, कास पठार, चाळकेवाडी, सडावाघापूर, वनकुसवडे, वाल्मिकीसारखी अनेक पठारे, कोयना-जावळी खोऱ्यातील घनदाट जंगल, त्या आश्रयाने उभे असलेले अनेक किल्ले आणि कातळकडे तरुणाईला आव्हान देत आहेत. पर्वतरांगांमुळे येथे असंख्य कातळकडे, धबधबे, गुहा आणि ट्रेकिंगसाठी डोंगरवाटा आहेत. या संपूर्ण भागामध्ये गिर्यारोहण, प्रस्तरारोहण, रॅपलिंग, ट्रेकिंग, जंगल भटकंती, बंगी जम्पिंग, मोटोक्रॉस, हायकिंग, सायकलिंग, पॅराग्लायडिंग सारखे अनेक साहसी पर्याय उपलब्ध आहेत. जमीन, पाणी आणि आकाश ह्या तीनही पातळ्यांवर साहसी क्रीडा प्रकारांना भरपूर वाव मिळतो, सातारा जिल्ह्यास हिमशिखरे आणि समुद्र सोडता सर्व काही निसर्गदत्त लाभले आहे. नुसतीच भटकंती ही पहिली पायरी, डोंगरदऱ्यांमधून चढ-उतारावर चालणे म्हणजेच ट्रेकिंग ही दुसरी पायरी आणि गिर्यारोहण ही ह्या क्रीडा प्रकारातील तिसरी आणि सर्वोच्च पायरी आहे.

गिर्यारोहणाला विशेष संधी

सातारा जिल्ह्यातील डोंगरी किल्ल्यांमुळे गिर्यारोहणाला विशेष संधी प्राप्त झाल्या आहेत. अजिंक्यतारा, सज्जनगड, चंदन-वंदन, महिमानगड, कल्याणगड, वर्धनगड, सदाशिवगड, मच्छिंद्रगड आदी पंधरा किल्ले हे साधे, सोपे आणि सरळ वाटा असलेले आहेत. वाईजवळचा रायरेश्वर, प्रतापगड हे किल्ले केवळ ऐतिहासिकच नाहीत, तर गिर्यारोहणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. कमळगड, पांडवगड, भैरवगड, जंगली जयगड, चंद्रगड, वासोटा, प्रतापगड, मधुमकरंद, महिमंडण हे किल्ले दाट जंगलांनी वेढलेले आहेत. ह्या किल्ल्यांच्या चढाई दरम्यान आपल्याला वन्यजीव प्राण्यांचे दर्शन होते, विविध वनस्पतींची ओळख होते. ह्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा म्हणजे किल्ले प्रतापगड. शिवाजी महाराजांच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाची आणि सर्वांत पहिली अशी लढाई प्रतापगडावरील. किंबहुना असे म्हणता येईल की घनदाट जंगल, पावसाळ्यातील रौद्र आणि भीषण असे ओढे, नाले, धबधबे यांचा सामना करत खडकाळ पायवाटेतून येथे चढाई करावी लागते. त्या वेळी आठवते ते शिवरायांनी अफझलखानाला मारल्यानंतर त्याच्या उर्वरित सेनेची काय तारांबळ झाली असेल? ट्रेकर्स आणि गिर्यारोहकांच्या मध्ये सर्वाधिक लोकप्रिय असणारा किल्ला म्हणजे किल्ले व्याघ्रगड अर्थात वासोटा किल्ला. कोयना अभयारण्यात दडलेला हा किल्ला आजही गिर्यारोहकांसाठी एक आव्हान आहे. जंगलातील वाट, वन्यजीवांचा वावर आणि अवघड चढाई यामुळे गिर्यारोहणाचा रोमांच येथे अनुभवता येतो. अडीच-तीन हजार फूट सरळसोट असा बाबू कडा खालून वर चढणे

निवडणुकीच्या माध्यमातून जे थोर साहित्यिक अध्यक्ष होऊ इच्छित नाहीत त्यांना सन्मानाने अध्यक्षपद दिले पाहिजे, अशी भूमिका महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेने घेतली आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या फलटण येथे झालेल्या बैठकीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सन्मानाने देण्याचा ठराव मांडला व त्याबाबत निर्णयही झाला.

आणि वरून खाली उतरणे हे फक्त पाउस, वारा आणि सच्च्या मावळ्याचेच काम आहे! सर्वांत पवित्र असे ठिकाण म्हणजे रायरेश्वर, भले ते नावाला पुणे जिल्ह्यात असेल; पण जवळ आहे ते सातारा जिल्ह्याला. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ येथे घेतली. गिर्यारोहकांसाठी येथे जाणे म्हणजे इतिहासाच्या साक्षीने साहस अनुभवणे होय. रायरेश्वर ते ऑर्थर सीट, महाबळेश्वर व्हाया चंद्रगड असा ट्रेक म्हणजे आयुष्यातील अविस्मरणीय असा एक अनुभव आहे.

स्वतःशी आणि निसर्गाशी संवाद

ट्रेकिंग, गिर्यारोहण ही केवळ साहसी क्रिया नसून ती स्वतःशी आणि निसर्गाशी संवाद साधण्याची प्रक्रिया आहे. एकाच वेळी अंतर्मुख होणे आणि बाह्य अवकाशाचे ब्रह्मांड दर्शन असे दोन्ही आपल्याला पर्वत शिखर मोहिमेमध्ये अनुभवता येते. शारीरिक आणि मानसिक आत्मविश्वास दोन्हीही मिळतो. परस्परसाहाय्य करण्याची वृत्ती वाढते. कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीशी सामना करण्याचे धैर्य प्राप्त होते. अरण्यवाचन होते, निसर्गाची अनेक गुपिते समजतात. उगीच नाही समर्थ रामदासस्वामी हे सज्जनगड येथे राहत होते व आसपासच्या डोंगरातील गुहा व घळीमध्ये त्यांनी चिंतन, मनन आणि दासबोधासारखे ग्रंथलेखन केले.

ह्या जिल्ह्यामध्ये लिंगमळा (महाबळेश्वर), ठोसेघर, ओझरे-नवजा (कोयना) तसेच वजराई-भांबावली असे चाळीस -पन्नास तरी धबधबे आहेत. अंदाजे साडेतीनशे मीटर (१००० फूट) उंचीवरून जलप्रपात थेट खाली कोसळतो. त्यांचे जवळून दर्शन हेच एक मोठे साहस आहे. सांडवली, केळवलीसारखे धबधबे हे अनेक तरुणांना पावसाळ्यामध्ये खुणावत असतात. महाबळेश्वर व पाचगणी ही जरी थंड हवेची ठिकाणे म्हणून पर्यटन स्थळाच्या जागतिक नकाशावर असली, तरीही त्यांचे खरे दर्शन, खरे सौंदर्य आणि खरे रौद्र रूप हे अनुभवायचे असेल, तर गिर्यारोहकच व्हावे लागते. घाटमाथ्यावरील या टेकड्यांतून चालणे, लांब लांब दऱ्या आणि निसर्गाचे सान्निध्य हा गिर्यारोहणाचा अविभाज्य अनुभव ठरतो.

जल-क्रीडा प्रकार

वनदुर्ग, गिरिदुर्ग यांच्या ह्या भटकंतीदरम्यान आणखीन भर पडते ती कोयना नदीच्या धरणामुळे तयार झालेल्या 'शिवसागर' ह्या विशाल जलसाठ्याची. त्यामध्ये तापोळा आणि बामणोली सारख्या काठावरील गावांमध्ये आता जलपर्यटनाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. स्पीड बोटिंग आहे, कयाकिंग आहे. पश्चिमेकडील गावांमधील होम स्टे आहेत, तिथे मिळणारी स्थानिक लोकांनी केलेली भारंगीची भाजी, नाचणीची भाकरी आणि कुळथाचे पिठले असू देत. श्रमलेल्या हातापायाला हा निवारा आणि हे अन्न अमृताहून प्रिय असते. प्रत्येकाने अनुभव घेऊन बघायलाच हवा. लघु आणि मध्यम पाटबंधारे प्रकल्प आणि जलाशय यांची यादी लक्षात घेतली, तर सातारा जिल्हा हा आशियामध्ये सर्वांत जास्त धरणे असलेला आहे. त्यामुळे ह्या जल-क्रीडा प्रकाराला सातारा जिल्हा अगदी योग्य आहे.

सांस्कृतिक विविधतेचे दर्शन

सातारा जिल्हा हा मिनी-भारत आहे. येथे असंख्य देवळे, तीर्थक्षेत्रे ही निसर्गात, डोंगरात, जंगलात, देवरांयात लपलेली आहेत. चकदेव, मल्लिकार्जुन पर्वत, नागेश्वर ही काही उदाहरणे. धार्मिक, नैसर्गिक आणि सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडवणारी केंद्रे विविध ठिकाणी दृक्श्राव्य माध्यमातून सुरू झाली, तर स्थानिकांना रोजगार निर्मिती होऊ शकते. सज्जनगडच्या पायथ्याला नव्यानेच सुरू झालेले 'समर्थ दर्शन' येथे मोठ्या संख्येने पर्यटक येत आहेत. सातारा जिल्ह्यात अनेक छोट्या-मोठ्या गुहा धार्मिक म्हणून श्रद्धेने स्थानिकांनी जपल्या आहेत. रामघळ, राजापूरघळ, मोरघळ, मंडपघळ, नागेश्वर ही केवळ काही उदाहरणे. सातारा जिल्ह्यात तीनशेपेक्षा जास्त जंगल 'देवराया' आहेत. डोळस पर्यटनाला येथे चालना मिळू शकते.

साताऱ्यातील अशा पोषक वातावरणामुळे सातारा जिल्ह्यात अनेक ट्रेकिंग आणि गिर्यारोहण संस्था उदयाला आल्या आहेत. सह्याद्री ट्रेकिंग क्लब, रानवाटा निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन मंडळ ही काही उदाहरणे. शाळा-महाविद्यालयांच्या गिर्यारोहण शाखा, हरित मंडळे यामुळे युवकांमध्ये साहसी वृत्ती वाढीस लागली आहे. गिर्यारोहणाच्या मोहिमा, ट्रेकिंग शिबिरे, साहस शिक्षण वर्ग यांचे सातत्याने आयोजन केले जाते. साताऱ्यातील काही गिर्यारोहकांनी हिमालय मोहिमेत भाग घेऊन जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. आशिष माने, प्रियांका मोहिते ह्यांनी तर हिमालयातील पाच-सहा सर्वोच्च शिखरमोहिमा



१८७८ साली पुण्याच्या हिराबागेत ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले होते. या संमेलनालाच पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मानले जाते. त्यानंतर तब्बल सात वर्षांनी १८८५ मध्ये दुसरे ग्रंथकार संमेलन पुण्यातच भरले. संमेलनांची परंपरा खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली असतानाच सातारकरांनी पुढाकार घेतला. तब्बल वीस वर्षांनी तिसरे संमेलन साताऱ्यात भरले. ॲड. दादासाहेब करंदीकर यांनी हे संमेलन भरवण्यासाठी पुढाकार घेतला.

यशस्वी केल्या आहेत आणि अशी शिखरे सर करणारी ही जोडी भारतातील हाताच्या बोटावर मोजता येतील अशा गिर्यारोहकांपैकी आहेत. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत सातारची अवघ्या बारा वर्षांची लहानगी पर्वतकन्या धैर्या विनोद कुलकर्णी एव्हरेस्ट बेस कॅम्प, आफ्रिकेतील किलीमांजारो शिखर सर करणारी व वयाच्या तेराव्या वर्षी माऊंट एल्ब्रूस नावाचे युरोप खंडातील सर्वोच्च शिखर सर करणारी मुलगी आहे. साताऱ्यातील इतरही अनेक गिर्यारोहकांनी हिमालयासह इतर पर्वतरांगांवर यशस्वी मोहिमा केल्या आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील युवकांमध्ये साहसाची प्रेरणा जागृत झाली आहे.

जिल्ह्याचे वेगळे वैशिष्ट्य

गिर्यारोहण ही केवळ शारीरिक ताकद दाखवण्याची कला नसून ती मानसिक धैर्य, टीमवर्क, निसर्गसंवर्धन यांचे शिक्षण देणारी प्रक्रिया आहे. युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि साहसाची वृत्ती निर्माण होते. निसर्गप्रेम आणि पर्यावरण संवर्धन याबाबत जाणीव वाढते. स्थानिक पातळीवर पर्यटन आणि अर्थकारणाला चालना मिळते. ऐतिहासिक किल्ल्यांची संरक्षण जाणीव समाजात निर्माण होते.

सातारा जिल्हा हा इतिहास-भूगोल, निसर्ग आणि संस्कृतीच्या दृष्टीने संपन्न आहे. गिर्यारोहणाच्या परंपरेमुळे





या जिल्ह्याला वेगळे वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे. डोंगरमाथे, किल्ले, दऱ्या, पठारे, जंगल यामुळे गिर्यारोहणासाठी येथे अफाट संधी उपलब्ध आहेत. संस्थात्मक प्रयत्न, युवकांची उत्सुकता आणि निसर्गसंवर्धनाची जाणीव यामुळे साताऱ्याचे नाव महाराष्ट्रातील गिर्यारोहण केंद्र म्हणून नोंदले जाते. गिर्यारोहणाच्या माध्यमातून साताऱ्याने केवळ साहसी संस्कृती जपली नाही, तर निसर्गाशी एकात्मता साधण्याचा सुंदर आदर्शही उभा केला आहे. निळाशार शिवसागर, काळजाचा थरकाप उडविणारे सह्याद्रीचे रौद्र डोंगरकडे, निळे आकाश आणि हिरवीगार सदाहरित जंगले! त्यातून आढळणारे जैववैविध्य, वनस्पती, प्राणी, पक्षी यांचे सौंदर्य हे जागतिक वारसाहक्क म्हणून शिक्कामोर्तब झालेले आहे. ते जपायला कठोर पावले उचलायला नकोत का? सातारा जिल्ह्याच्या पश्चिम डोंगररांगेमधे स्थानिक जनतेमधे सर्वांत जास्त रोजगार निर्मिती ही साहसी पर्यटनामधे आहे असे मला वाटते. सध्याच्या मोबाइल संस्कृतीमध्ये बुडून गेलेल्या तरुणाईला बाहेर काढण्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

(लेखक ज्येष्ठ साहित्यिक आणि गिर्यारोहक आहेत.)



महाराष्ट्र साहित्य परिषदेला शक्ती देण्याचे काम या ना त्या कारणाने सातारा जिल्ह्याने नेहमीच केलेले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेची इमारत पुण्यातील ज्या जागेवर उभी आहे, ती जागाही साहित्य क्षेत्रासाठी औंधच्या राजांनी साहित्य परिषदेला दिलेली आहे. ही जागा ज्या वेळी साहित्य परिषदेला मिळाली, त्या वेळी साहित्य परिषदच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आयोजित करत होती.

नोंद



हरीश पाटणे
मो.: ८८०५००७१८२

सातारा जिल्ह्याचे बदलते राजकारण

संपूर्ण देशाच्या राजकारणाला, समाजकारणाला क्रांतिकारकांच्या सातारा जिल्ह्याने दिशा दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा सातारा छत्रपती शाहूंची राजधानी ठरला. शिवरायांच्या विचारांचे संस्कार घेऊन राजनीतीत सातारा जिल्हा धुरंधर राहिला. सध्या सातारा जिल्ह्याचे राजकीय संक्रमण सुरू आहे.

सातारा जिल्ह्याची गेल्या काही वर्षांतील वाटचाल लक्षणीय आहे. १९७२ ते १९८० हा काळ सातारा जिल्ह्याच्या राजकारणात यशवंतरावांच्या विचाराने भारलेला काळ राहिला. याच विचारांच्या मुशीतून पुढे प्रदीर्घ काळ शरद पवारांनी सातारा जिल्ह्यावर आपली कमांड ठेवली. १९८० नंतर प्रतापराव भोसले, विलासराव पाटील उंडाळकर, लक्ष्मणराव पाटील, अभयसिंहराजे भोसले, रामराजे ना. निंबाळकर अशा नेत्यांनी सातारा जिल्ह्याचे एकमुखी नेतृत्व केले. अलीकडच्या कालावधीत पूर्वीचा काँग्रेस विचारांचा हा बालेकिल्ला भाजपच्या ताब्यात गेला आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्या विचारांचे नेते आता सातारा जिल्ह्याचे नेतृत्व करत आहेत.

अनेक स्थित्यंतरे

१९७२ पासून ते १९८० पर्यंत सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये अनेक स्थित्यंतरे आली. मात्र, यशवंतराव चव्हाण या व्यक्ती व नावाने भारावलेल्या या काळाने केवळ सातारा जिल्ह्यालाच नव्हे तर महाराष्ट्राला व देशालाही भरभरून दिले. यशवंतरावांनी बेरजेचे राजकारण करताना सातारा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात तरुण वैचारिक फळी निर्माण केली. १९४६ ते १९६२ एवढ्या प्रदीर्घ काळात यशवंतरावांनी सातारा जिल्ह्यातील कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना जिल्ह्यावर एकहाती वर्चस्व ठेवले होते. नंतर भारताच्या संसदेतही त्यांनी आपला प्रभाव पाडला. त्याच वेळी सातारा जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यामध्ये यशवंतरावांनी स्वत:च्या नेतृत्वाची फळी निर्माण केली. किसन वीर

नोंद

मूळचे सातारचे असलेले विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले हे मराठी उद्योगपती आणि अर्थतज्ज्ञ होते. शिवाय 'वेस्टर्न इंडिया इन्शुरन्स कंपनी' आणि 'युनायटेड वेस्टर्न' या महत्त्वाच्या आर्थिक संस्थांचे ते संस्थापक होते. अण्णासाहेब चिरमुले यांच्या विमाविषयक ज्ञानामुळेच त्यांना आदराने 'विमामहर्षी' ही पदवी बहाल करण्यात आली.

आबांच्या साथीने त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती, जिल्हा मध्यवर्ती बँक, खरेदी विक्री संघ, दूध संघ अशा ठिकाणी या नव्या तरुणांना नेतृत्वाची संधी दिली. मुत्सद्दी यशवंतरावांच्या या धोरणामुळेच १९८० ला देशात इंदिरा गांधींची लाट आली असताना व महाराष्ट्रात ४७ पैकी ४४ जागा वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली इंदिरा काँग्रेसच्या आल्या असतानाही साताऱ्याची लोकसभा मात्र वसंतदादा पाटील यांना जिंकता आली नाही, कारण यशवंतराव चव्हाण यांनी सातारा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात आपला विचार पोहोचवला होता.

१९७७ ते १९८० हा काळ देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात बऱ्याच उलथापालथी करणारा, आश्चर्यजनक घटना घडवणारा कालावधी होता. देशात इंदिरा काँग्रेस, अर्स काँग्रेस, तर राज्यात पुलोदचा प्रयोग व पुन्हा शरद पवारांची समाजवादी काँग्रेस (एस. काँग्रेस) असा घनश्याघोळ सुरू होता. त्या कालावधीत झालेली १९८० ची लोकसभा निवडणूक यशवंतराव चव्हाण यांनी जिंकली होती. त्यानंतर सहा महिन्यांत झालेल्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये सातारा जिल्ह्यात यशवंत विचारांचे उमेदवार अर्स काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आले. या नव्या नेत्यांनी पुढची १५-२० वर्षे सातारा जिल्ह्याचे राजकारण व काँग्रेसचा विचार सांभाळला.

जिल्ह्याच्या राजकारणाची इमारत

१९७७ ते १९८० या कालावधीत महाराष्ट्रात जे काही घडले त्यातून बरेच काही परिणाम समोर आले. अखंड काँग्रेसची झालेली दुफळी, यशवंतराव व वसंतदादा पाटील अशी निर्माण झालेली स्वतंत्र नेतृत्वं, या नेतृत्वांच्या तयार झालेल्या उपशाखा, त्यातून त्या त्या मतदार-संघांमध्ये तयार झालेले गट यावर आजच्या सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची इमारत उभी राहिली आहे. १९७८ ला जनता पार्टीतून तिघे जण निवडून गेले, त्यात होते बाळासाहेब देसाई, अभयसिंहराजे भोसले, शिवाजीराजे ना. निंबाळकर. याच जनता पार्टीचे आजच्या भारतीय जनता पार्टीत रूपांतर झाले आहे आणि तो देशातला व राज्यातला सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. १९८० ला अर्स काँग्रेसमधून विधानसभेवर निवडून आलेले विलासराव पाटील-उंडाळकर, प्रतापराव भोसले, चिमणराव कदम, पी. डी. पाटील, डी. बी. कदम, शंकरराव जगताप, विष्णुपंत सोनवणे यांनी पुढे अनेक वर्षे आपापल्या तालुक्याचे नेतृत्व केले. विलासराव पाटील-उंडाळकर व प्रतापरावभाऊ, अभयसिंहराजे भोसले यांनी तर जिल्ह्याचे नेतृत्व केले. या १५-२० वर्षांच्या वारशावर पुढे सातारा जिल्ह्याचे राजकारण प्रवाही राहिले. मात्र १९८० च्या दशकाने जी बेगमी केली त्या मागे यशवंतरावांचा विचार अधिक प्रभावी राहिला. पुढच्या २० वर्षांत प्रतापरावभाऊ भोसले, अभयसिंहराजे भोसले,
विलासराव पाटील- उंडाळकर, लक्ष्मणराव पाटील, रामराजे ना. निंबाळकर, विक्रमसिंह पाटणकर यांनी सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. त्यानंतरच्या कालावधीत म्हणजेच २०२५ पर्यंत उदयनराजे भोसले, शिवेंद्रराजे भोसले, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे, मकरंदआबा पाटील असे नेते सातारा जिल्ह्याचे नेतृत्व करत आहेत. काँग्रेस विचारांचा बालेकिल्ला दुभंगून हिंदुत्ववादी विचारांचा बालेकिल्ला म्हणून सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची नवी ओळख वाढू लागली आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाच्या फांद्यांचा विस्तार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही होऊन पक्षीय राजकारणाची शकले झाली आहेत, राजघराण्यातील वितुष्टापासून ते मनोमिलनापर्यंत.

राजघराण्याचा प्रवेश

१९८० च्या निवडणुकीने सातारा विधानसभा मतदार संघालाही नेता दिला. १९७२ साली धोंडीराम जगताप काँग्रेसच्या तिकिटावर विधान सभेत निवडून गेले. १९७८ साली साताऱ्याच्या राजकारणात चमत्कार घडला. राजघराण्यातील व्यक्ती तोपर्यंत राजकारणात नव्हत्या. राजमाता सुमित्राराजे भोसले यांनी तर सक्रिय राजकारणात जाण्यास नकार दिला. १९७८ साली अभयसिंहराजे भोसले यांचा राजकारणात सक्रिय प्रवेश झाला. त्यावेळच्या जनता पक्षाच्या तिकिटावर त्यांनी काँग्रेसचे बाबूराव घोरपडे यांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढवली आणि ते निवडूनही आले. १९८० ला मात्र श्री. छ. अभयसिंहराजे भोसले इंदिरा काँग्रेसमध्ये गेले. यशवंतराव चव्हाण यांच्या अर्स काँग्रेसमध्ये ते गेले नाहीत. इंदिरा गांधी व वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली ते कार्यरत राहिले. पुढे प्रदीर्घकाळ काँग्रेसमधूनच सातारा विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले. १९८० साली सातारा विधानसभा मतदारसंघाला

सातारा जिल्ह्यात १८७८ मध्ये वृत्तपत्राचा श्रीगणेशा केला गेला. डिसेंबर १८७८ मध्ये सातारा जिल्ह्याचे पहिले उपलब्ध वृत्तपत्र, 'शुभसूचक' हे अस्तित्वात आले. हे पत्र साताऱ्यात यादोगोपाळ पेठेमध्ये संपादक रामचंद्र आप्पाजी चितळे हे शिळाछापावर छापत असत. शुभसूचक पत्राच्या नावाभोवती बाण लावलेले धनुष्य दाखवून संपादक रामचंद्रपंत चितळे यांना आपल्या वृत्तपत्राचा करारी बाणा दर्शवायचा होता.

भाऊसाहेब महाराजांच्या रूपाने संयमी नेता मिळाला. पुढची १५ ते २० वर्षे भाऊसाहेब महाराजांनी सातारा जिल्ह्याच्या सहकाराच्या उद्धाराचे काम केले. राजमाता सुमित्राराजेंचे थोरले सुपुत्र प्रतापसिंहराजे भोसले हे सातारा नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष होते. त्यांच्या अकाली निधनानंतर छत्रपती कल्पनाराजे भोसले यांनी काही काळ नेतृत्व केले. छत्रपती उदयनराजे भोसले राजकारणात सक्रिय झाल्यानंतर नेतृत्वाचा हा वारसा उदयनराजेंकडे आला. मात्र अभयसिंहराजे भोसले व उदयनराजे भोसले यांच्यामध्ये कमालीचे वितुष्ट आले. प्रदीर्घ काळ हा संघर्ष देशाने पाहिला. पुढे अभयसिंहराजेंच्या मृत्यूनंतर उदयनराजे व शिवेंद्रराजे यांच्यातील संघर्षही महाराष्ट्राने पाहिला. या दोघांचेही काका शिवाजीराजे भोसले यांच्या पुढाकाराने दोन्ही भावांचे मनोमिलन झाले; पण नगरपालिकेच्या एका निवडणुकीत हे मनोमिलन तुटले. त्यानंतर पुन्हा एकदा उदयनराजे-शिवेंद्रराजे यांच्यामधील संघर्ष महाराष्ट्राने पाहिला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत या संघर्षाला पुन्हा एकदा विराम मिळाला. दोघांचे पुन्हा मनोमिलन झाले. उदयनराजे चौथ्यांदा खासदार आहेत, तर शिवेंद्रराजे आता राज्याच्या मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम मंत्री आहेत. दोघेही देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्याचे नेतृत्व करत आहेत.

काकांपासून ते बाबांपर्यंत

१९६२ पर्यंत यशवंतरावांनी कराड दक्षिण मतदारसंघ सांभाळला होता. संसदीय राजकारणात प्रवेश केल्यानंतर या मतदारसंघाचे नेतृत्व १९६२ ते १९७८ या कालावधीत यशवंतराव मोहिते यांनी केले. काँग्रेसच्या फाटाफुटीनंतर १९८० ला यशवंतराव चव्हाण यांनी आपले वैचारिक वारसदार विलासराव पाटील-उंडाळकर यांना अर्स काँग्रेसच्या तिकिटावर यशवंतराव मोहिते यांच्या विरुद्ध निवडणूक रिंगणात उतरवले. त्यात त्यांचा पराभव झाला. मात्र याच विलासकाकांनी पुढे १९८५, १९९०, १९९५, १९९९, २००४ अशा सलग विधानसभा निवडणुका काँग्रेसच्या तिकिटावर लढल्या आणि जिंकल्याही. १९८० ला विलासकाका लढले नसते तर, यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना संधी दिली नसती तर, पुढची १५-२० वर्षे सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर विलासकाका नावाची हस्ती दिसली नसती. विलासकाकांनी ज्या कराड दक्षिणचे नेतृत्व केले त्या कराड दक्षिणवर पुढच्या कालावधीत पृथ्वीराज चव्हाण यांची कमांड राहिली. पृथ्वीराज चव्हाण यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व करतानाच राज्याचे मुख्यमंत्रिपदही भूषवले. मात्र, मुख्यमंत्री राहिलेल्या पृथ्वीराजांचा भाजपचे डॉ. अतुल भोसले यांनी पराभव केला. काँग्रेस विचारांचा हा बालेकिल्ला आता भाजप विचारांचा झाला आहे. विलासराव काका ते पृथ्वीराजबाबा व पृथ्वीराजबाबा ते अतुलबाबा असे कराड दक्षिणचे संक्रमण सुरू आहे. विलासकाका उंडाळकरांचे चिरंजीव उदयसिंह उंडाळकर यांनी पुरोगामी विचार म्हणून अजितदादांची राष्ट्रवादी निवडली आहे.

कोरेगाव मतदार संघाची शकले

यशवंतरावांचा वैचारिक वारसा कोरेगावलाही लाभला. १९७८ साली शंकरराव जगताप या मतदारसंघाचे काँग्रेसमधून आमदार होते. १९८० साली मात्र यशवंतरावांच्या अर्स काँग्रेसमधून त्यांनी निवडणूक लढवली. त्यानंतर प्रदीर्घ काळ या मतदारसंघाचे ते आमदार राहिले. अल्पसंख्याक समाजातील एक व्यक्ती कर्तृत्वाच्या जोरावर प्रदीर्घ काळ एखाद्या मतदारसंघाचा आमदार राहू शकते हे शंकरराव जगताप यांनी सिद्ध करून दाखवले. हेच शंकरराव जगताप पुढे महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्षही राहिले. १९८० नंतर पुढची १५-२० वर्षे शंकरराव अण्णांनी कोरेगाव तालुक्याचे नेतृत्व केले. त्यानंतर या मतदारसंघाचे नेतृत्व डॉ. शालिनीताई पाटील यांनी केले. प्रदीर्घ काळ जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून त्या कार्यरत राहिल्या. त्या राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्रीही राहिल्या. मात्र, जावलीतून आलेल्या शशिकांत शिंदे यांनी शालिनीताईंच्या राजकारणाला ब्रेक दिला. पुढे बराच काळ शशिकांत शिंदे यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले. ते साताऱ्याचे पालकमंत्रीही राहिले. याच शशिकांत शिंदेंचा महेश शिंदे यांनी वारू रोखला. पूर्वीच्या काँग्रेस विचाराच्या नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमय झालेल्या या मतदारसंघात देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांच्या विचारांचे महेश शिंदे आता कार्यरत आहेत. शशिकांत शिंदे व महेश शिंदे यांच्यातील संघर्षाने कळस गाठला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे हे प्रदेशाध्यक्ष आहेत, तर देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे



साताऱ्यात १८६७ मध्ये कोल्हटकर यांचे 'महाराष्ट्रमित्र' नावाचे पत्र निघाले. गणेश नारायण कोल्हटकर हे त्याचे मालक होते. नंतरच्या कालावधीमध्ये 'संदेश'कार अच्युत बळवंत कोल्हटकर लोकप्रिय झाले होते. संदेशकारांनी आपले पत्रकारितेचे आणि मार्मिक लेखनाचे पहिले धडे महाराष्ट्रमित्रकार कोल्हटकरांकडेच गिरवले होते. कोल्हटकर यांनी 'विनोदप्रतोद' नावाचे एक पत्र १८७३ मध्ये सुरू केले होते.

यांच्या साथीने महेश शिंदे यांची वाटचाल सुरू आहे.

पी. डी. पाटलांचा झेंडा खाली उतरला

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातून १९७८ ला केशवराव पवार हे कामगार किसन पक्षातून निवडून गेले. पुलोद सरकार बरखास्त झाल्यानंतर १९८० ला अर्स काँग्रेसची उमेदवारी यशवंतराव चव्हाण यांनी उमद्या विचारांच्या पी. डी. पाटील यांना दिली. १९८० ते १९८५ या कालावधीत पी. डी. पाटील या मतदारसंघाचे आमदार राहिले. पुढे १९८५, १९९० या कालावधीत आधी शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेसमधून, तर नंतर काँग्रेसमधून शामराव अष्टेकर हे आमदार राहिले. १९९५ ला पुन्हा पी. डी. पाटील अपक्ष निवडून आले.

थोडक्यात, १९८० च्या निवडणुकीने पी. डी. पाटील या नेतृत्वाला यशवंतरावांनी संधी दिली. यशवंतरावांनी हा पेरलेला विचार पी. डी. पाटील यांनी एवढा वाढवला, की याच वैचारिक वारशावर बाळासाहेब पांडुरंग पाटील या तत्त्ववादी खऱ्याखुऱ्या यशवंतनिष्ठ नेत्याचा जन्म झाला. बराच काळ कराड उत्तरचे नेतृत्व पी. डी. पाटील यांचे सुपुत्र बाळासाहेब पाटील हे करत राहिले. ते राज्याचे सहकार मंत्रीही राहिले. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत बाळासाहेबांचा पराभव करून मनोज घोरपडे यांनी या मतदारसंघात भाजपचे कमळ फुलवले.

यशवंतराव चव्हाण ज्या मतदारसंघातून निवडून जायचे त्या मतदारसंघाचे नेतृत्व करण्याचे भाग्य मनोज घोरपडे यांना लाभले आहे. पी. डी. पाटील यांच्या नेतृत्वाचा उंच गेलेला झेंडा घोरपडेंच्या विजयाने खाली उतरला.

बाळासाहेब देसाईंच्या नातवाचा करिश्मा

पाटणचे नेतृत्व प्रदीर्घ काळ बाळासाहेब देसाई यांनी केले. १९७१ ते १९७२ एवढा प्रदीर्घ काळ ते काँग्रेसमधून आमदार राहिले. मात्र १९७८ ला तत्कालीन काँग्रेसजनांशी त्यांचे मतभेद झाले आणि त्यांनी काँग्रेस सोडली. ते जनता पार्टीत सामील झाले. १९७८ ला बाळासाहेब देसाई हे जनता पार्टीतून विधान सभेवर गेले. मात्र, १९८० ची निवडणूक ते पुन्हा काँग्रेसच्या तिकिटावर लढले आणि जिंकूनही आले. याच बाळासाहेब देसाई यांचे नातू शंभूराज देसाई हे आज सातारा जिल्ह्याचे नेतृत्व करत आहेत. बाळासाहेब देसाई यांच्या वैचारिक वारशावर शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाची इमारत उभी आहे. मात्र, १९८० च्या दशकात बाळासाहेब देसाई यांच्या मृत्यूनंतर विक्रमसिंह पाटणकर या नेत्याचाही या मतदारसंघात उदय झाला. १९८३ ला शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेसमधून ते निवडून आले. पुढे प्रदीर्घ काळ ते पाटणचे नेते राहिले. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. विक्रमसिंह पाटणकरांनी आपला वारसा सत्यजितसिंह पाटणकर यांच्याकडे सोपवला. मात्र, शंभूराज देसाई यांनी विक्रमसिंहांना डोके वर काढू दिले नाही.

रामराजेंच्या प्रभावाचा काळ

फलटण विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व कृष्णचंद्र भोईटे करत होते. १९७२ ला ते काँग्रेसचे आमदार होते. १९७८ ला शिवाजीराजे ना. निंबाळकर हे जनता पार्टीतून आमदार झाले. मात्र, १९८० साली यशवंतराव चव्हाण यांनी कडक स्वभावाच्या व त्या वेळी सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असलेल्या चिमणराव कदम यांना अर्स काँग्रेसमधून उमेदवारी दिली. ते निवडूनही आले.

१९८० ला जे नवे नेते सातारा जिल्ह्याला मिळाले, त्यात चिमणराव कदम हे आणखी एक नाव. या चिमणरावांनी पुढे महाराष्ट्राची विधानसभा दणाणून सोडली. 'काँग्रेसची मुलुखमैदान तोफ' ही चिमणरावांची ओळख राहिली. १९८५ ला तर हा पठ्ठ्या अपक्ष लढला आणि निवडूनही आला. १९९० ला ते पुन्हा काँग्रेसमधून निवडणूक लढले आणि जिंकून आले. १९८० नंतर पुढची १५ वर्षे चिमणराव कदम यांनी फलटणचे नेतृत्व केले. चिमणरावांचा पाडाव करत रामराजे ना. निंबाळकर या नेतृत्वाचा उदय फलटणमध्ये झाला. फलटणच्या नगराध्यक्षपदापासून सुरू झालेली ही कारकीर्द आजअखेर सुरूच आहे. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली रामराजेंनी फलटणची विधानसभा गाजवली. ते राज्याचे जलसंपदा मंत्रीही राहिले. प्रदीर्घ काळ सातारा जिल्ह्याचे पालकमंत्रीही राहिले. राज्याच्या विधानपरिषदेचे सभापती म्हणून त्यांनी काम पाहिले.

अभयसिंहराजेंनंतर रामराजे ना. निंबाळकर यांनीच लक्ष्मणराव पाटील यांना सोबत घेत सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. हिंदूराव ना. निंबाळकर व रामराजे ना. निंबाळकर यांचाही संघर्ष गाजला. हिंदूराव लोकसभा मतदार संघाचे खासदारही राहिले होते. आताही रणजितसिंह ना. निंबाळकर यांच्या भाजप प्रवेशानंतर रामराजेंच्या नेतृत्वाला शह बसू लागला. जयकुमार गोरे यांच्या साथीने रणजितसिंहांनी रामराजेंच्या गडाला सुरुंग

सातारा जिल्ह्यात वाई येथे ७ ऑगस्ट १८९० रोजी 'मोदवृत्त' हे पत्र सुरू झाले. केशवराव वैद्य व गजानन केळकर हे या पत्राचे जनक होते. कोणत्याही पत्रापेक्षा या पत्राने वाई आणि सातारा परिसर अधिक गाजवला. काही दिवसांनंतर या पत्राची मालकी काशिनाथ वामन उर्फ भाऊशास्त्री लेले यांच्याकडे गेली. भाऊशास्त्री लेले यांनी स्वतःचा छापखाना उभा करून या पत्राची बाजू विकसित केली.

नोंद

लावले. त्यामुळे अनेकदा रामराजेंच्या राजे गटाला पक्षांतर करावे लागले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीनंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत व अलीकडच्या काळात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत राजेगट स्थिरावला आहे. त्या चवेळी भाजपमध्ये खासदार राहिलेल्या रणजितसिंह ना. निंबाळकरांचे नेतृत्व वाढत आहे.

जावली अनेकांची सावली

जावली विधानसभा मतदारसंघातून १९७२ साली लालसिंगराव शिंदे काँग्रेसमधून निवडून आले. १९७८ ला भि. दा. भिलारे गुरुजी काँग्रेसमधून निवडून गेले. मात्र १९८० साली यशवंतराव चव्हाण यांनी डी. बी. कदम यांना अर्स काँग्रेसमधून उमेदवारी दिली. १९८०, १९८५ या कालावधीत डी. बी. कदम हे आधी अर्स काँग्रेसमधून व नंतर काँग्रेसमधून आमदार म्हणून निवडून गेले. नंतरच्या कालावधीत अभयसिंहराजेंनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले. पुढे सदाशिव सपकाळ हे या मतदारसंघातून शिवसेनेचे पहिले आमदार म्हणून निवडून गेले. त्यानंतर शशिकांत शिंदे यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले. मतदारसंघाच्या पुनर्रचनेनंतर शिवेंद्रराजे भोसले हे या मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत. जावलीने अनेक नेत्यांना सावली दिली.

जयकुमार गोरेंचा सुवर्णकाळ

माण विधानसभा मतदारसंघात १९७२ ला काँग्रेसमधून प्रभावती शिंदे निवडून आल्या. १९७८ ला काँग्रेसमधून विष्णूपंत सोनवणे निवडून आले. १९८० साली यशवंतरावांनी अर्स काँग्रेसमधून विष्णूपंत सोनवणे यांना उमेदवारी दिली आणि ते निवडूनही आले. या सोनवणेंनी पुढे यशवंत विचारांचा वारसा टिकवून ठेवला. प्रदीर्घ काळ हा मतदारसंघ काँग्रेस विचारांचा राहिला. त्या वेळच्या खटाव विधानसभा मतदारसंघात चंद्रहार पाटील व केशवराव पाटील या दोघांनी नेतृत्व केले. १९६७ ते १९७२ या कालावधीत चंद्रहार पाटील आमदार होते. १९७२ व १९७८ साली काँग्रेसमधून केशवराव पाटील आमदार राहिले, तर १९८० साली ते इंदिरा काँग्रेसमधून निवडणूक लढले आणि जिंकले. पुढे १९८५ नंतर प्रदीर्घ काळ भाऊसाहेब गुदगे यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले. एकत्रित माण-खटावचे नेतृत्व प्रदीर्घ काळ सदाशिवराव पोळ यांनी केले. आरक्षित असलेल्या या मतदारसंघात ते किंगमेकर राहिले. अनेक सामान्य कुटुंबांतील चेहऱ्यांना त्यांनी आमदार केले. धोंडीराम वाघमारे, तुकाराम तुपे, संपत अवघडे यांनी या मतदार-संघाचे नेतृत्व केले. सदाशिवराव पोळ यांनीही विधान परिषदेत या मतदारसंघाचे नेतृत्व केले. एकत्रित माण-खटावचे नेते म्हणून भाजपचे पहिले आमदार राहिले ते डॉ. दिलीप येळगावकर. मात्र या दोन्ही नेतृत्वांचा पाडाव केला तो बोराटवाडीसारख्या सामान्य खेड्यातून आलेल्या जयकुमार गोरे यांनी. आधी अपक्ष नंतर काँग्रेसमधून व अलीकडच्या काळात भाजपमधून ते सलग निवडून येत राहिले. एवढेच काय राज्याचे ग्रामविकास मंत्री म्हणून ते आता कार्यरत आहेत. जयकुमार गोरेंच्या नेतृत्वाला शह देण्याचे प्रयत्नही अलीकडच्या काळात प्रभाकर देशमुख, प्रभाकर घार्गे, अनिल देसाई, अभयसिंह जगताप अशी नवी नेतृत्वं करत आहेत. शेखर गोरे यांचे वाढळी नेतृत्वही माण-खटावमध्ये घोंगावत आहे.

किसन वीर आबा ते मकरंदआबा

वाई विधानसभा मतदारसंघ नेहमीच क्रांतिकारक राहिला. १९७१ व १९७७ या साली किसन कामगार पक्षातून दादासाहेब जगताप या मतदारसंघाचे आमदार राहिले. १९६२ ते काँग्रेसमधून आमदार राहिले. १९६७ साली या मतदारसंघाचे नेतृत्व प्रतापराव भोसले यांच्याकडे आले. १९६७ ते १९७८ या विधानसभेच्या तीन निवडणुका प्रतापरावभाऊ काँग्रेसच्या तिकिटावर लढले. यशवंतरावांनी देशाचे नेतृत्व करायचे आणि किसन वीर आबांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्ह्याचे नेतृत्व प्रतापराव भाऊंनी करायचे असा तो काळ होता. त्यामुळेच १९८० साली प्रतापराव भाऊंनी यशवंतरावांच्या अर्स काँग्रेसमधून विधानसभेची निवडणूक लढवली आणि ते जिंकलेसुद्धा. सातारा जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाची मोट बांधण्याचे काम त्या काळात प्रतापराव भाऊंनी केले. पुढे १९८४ साली यशवंतराव चव्हाण ज्या सातारा लोकसभा मतदारसंघातून लढायचे त्या लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व प्रतापराव भाऊंकडे आले. एक प्रकारे यशवंतरावांचे उत्तराधिकारी म्हणून पुढचा प्रदीर्घ काळ प्रतापराव भाऊंनी जिल्ह्याचे नेतृत्व केले. मात्र १९८० साली त्यांनी अर्स काँग्रेसमधून लढवलेली विधानसभेची निवडणूक त्यांच्या यशवंत विचाराला व्यापक नेतृत्वाची संधी देणारी ठरली. पुढे भाऊंनी आपल्या विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व



भाऊशास्त्री लेले यांच्या 'मोदवृत्त' या वृत्तपत्रामध्ये धार्मिक विषयांना प्राधान्य असले तरी त्यातील राजकीय लेख जहाल असत. त्याचा परिणाम म्हणून या पत्राच्या संपादकांवर खटलेही दाखल करण्यात आले होते. भाऊशास्त्री लेले यांच्या घराची झडती घेऊन त्यांना अटकही करण्यात आली होती. राजद्रोहाच्या आरोपाखाली त्यांना नऊ महिन्यांची शिक्षाही सुनावण्यात आली होती.



मदनआप्पा पिसाळ यांच्याकडे दिले. त्यांनीही प्रदीर्घ काळ वाई विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले. याच कालावधीत १९८० च्या दशकात लक्ष्मणराव पाटील या करारी नेत्याचाही उदय झाला. सातारा जिल्हा परिषदेचे त्यांनी प्रदीर्घकाळ नेतृत्व केले. १९८० च्या दशकात लक्ष्मणराव पाटील यांना संधी मिळाली नसती, तर पुढच्या प्रदीर्घ काळात लक्ष्मणराव पाटील नावाचा जो झंझावात पाहायला मिळाला तो मिळाला नसता आणि १९८० च्या दशकात लक्ष्मणराव पाटील यांनी डेअरिंग दाखवले नसते, तर आज जे बेअरिंग मकरंद पाटील सांभाळत आहेत, ते त्यांना साध्य करता आले नसते. मकरंद पाटील यांच्या राजकीय इमारतीचा कळस आज दिसत असला तरी त्याचा पाया १९८० च्या दशकात रचला गेला आहे. प्रतापराव भाऊंचा वारसा सांभाळत मदनदादा भोसले यांनीही २०१८ पर्यंत काँग्रेसची सोबत केली. नंतर मात्र भाजपमध्ये प्रवेश केला. प्रतापराव भाऊंचा वारसा मदनदादांनी चालवला. एकदा त्यांनी वाई मतदारसंघाचे प्रतिनिधित्वही केले. किसन वीर सहकारी साखर कारखान्याचे ते प्रदीर्घ काळ चेअरमनही राहिले. मात्र, मकरंदआबांच्या झंझावातापुढे मदनदादा निष्प्रभ ठरले. वाई-खंडाळा-महाबळेश्वरचे एकत्रित नेतृत्व करताना भि. दा. भिलारेंच्या वैचारिक वारशातून आलेले बाळासाहेब भिलारे यांनी, तर खंडाळ्यातून बकाजीराव पाटील, नितीन भरगुडे-पाटील यांच्यासारख्यांनी मकरंदआबांच्या नेतृत्वाला ताकद दिली. मदनदादांसाठी शंकरराव गाढवे यांच्यासारखे खंडाळ्याचे नेते पुढे सरसावले. आज वाई मतदारसंघाच्या राजकारणात लक्ष्मणराव पाटलांची पुढची पिढी मकरंद पाटील यांच्या रूपाने राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री व अजितदादा पवार गटाचे नेते म्हणून कार्यरत आहेत. त्यांना सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन असलेले व राज्यसभेचे खासदार म्हणून कार्यरत असलेले नितीनकाका पाटील यांची साथ आहे. तर मदनदादांची वारसदार म्हणून त्यांच्या कन्या सुरभि भोसले वाई विधानसभेच्या राजकारणात सक्रिय झाल्या आहेत. खंडाळा व महाबळेश्वरमधून अद्यापही एकमुखी नेतृत्व उभे राहिले नाही. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांतून आजही एकमुखी नेतृत्वाची वानवाच आहे. किसन वीर आबांच्या वैचारिक वारशातून उभी राहिलेली नेतृत्वं पुढे विस्तारली; मात्र वैचारिक दृष्ट्या वेगळी झाली. सातारा जिल्ह्याच्या एकंदर राजकारणाचे उलट फेर सुरू आहेत. यशवंतरावांचा पुरोगामी विचार इतिहासजमा होऊन हिंदुत्ववादी राजकारणाने डोके वर काढले आहे. सातारा जिल्ह्याच्या राजकारणाचा परीघ बदलला आहे. वेगवेगळ्या विभागांमध्ये दुभंगला आहे. यशवंतरावांच्या, शरद पवारांच्या वैचारिक नेतृत्वाची धुरा मकरंदआबा सांभाळत आहेत. बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यानंतर वाढलेला हिंदुत्ववादी विचार एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून विस्तारत आहे. तो धनुष्यबाण शंभूराज देसाई यांनी खांद्यावर घेतला आहे; तर सुरुवातीच्या कालावधीत ज्या जनसंघाचे नेतृत्व अभयसिंहराजेंनी केले होते तोच वारसा देवेंद्र फडणवीसांच्या मार्गदर्शनाखाली उदयनराजे भोसले, शिवेंद्रराजे भोसले चालवत आहेत. कोणताही राजकीय वारसा नसताना संघाचे विचार स्वीकारत देवेंद्र फडणवीसांच्या आशीर्वादावर जयकुमार गोरे हेही नेतृत्वाची कमान सांभाळत आहेत. देशाच्या व राज्याच्या बदलत्या राजकारणाचे प्रतिबिंब आपल्याला सातारा जिल्ह्याच्या राजकारणात देखिल दिसत आहे.

(लेखक दै. पुढारी सातारा आवृत्तीचे निवासी संपादक आहेत.)

वाईच्या 'मोदवृत्त' या प्रख्यात पत्राचे संपादक भाऊशास्त्री लेले यांनी काही कालावधीनंतर या पत्राशी संबंध तोडून वाई येथे 'धर्म' नावाचे साप्ताहिक सुरू केले होते. हे पत्र दर गुरुवारी प्रसिद्ध होत असे. त्यामध्ये धार्मिक व सामाजिक विषयांची चर्चा करण्याचा संपादकांचा मानस असे. त्या काळात धर्मासंबंधी चर्चा करणारी अशा प्रकारची वृत्तपत्रे नसल्याने या पत्राचा बऱ्यापैकी गवगवा झाला होता.

नोंद



मुकुंद फडके
मो.: ९७५२५९३२९७

निर्भीड पत्रकारितेची भूमी

समाजातील इतर सर्वच क्षेत्रांप्रमाणे पत्रकारितेच्या क्षेत्रांमध्ये सुद्धा सातारा जिल्ह्याने वेगळा ठसा उमटवला आहे. मराठी पत्रकारितेच्या गेल्या दीडशे पावणेदोनशे वर्षांच्या इतिहासामध्ये सातारच्या पत्रकारितेचा इतिहास ठळकपणे उठून दिसणारा आहे.

दरवर्षी सहा जानेवारीला 'पत्रकार दिन' साजरा केला जातो. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी १९३२ रोजी 'दर्पण' हे नियतकालिक सुरू केले. त्याची आठवण म्हणून हा पत्रकार दिन साजरा केला जातो. विविध प्रकारच्या माध्यमांमध्ये पत्रकारितेची सेवा बजावणारे सर्वच जण या निमित्ताने बाळशास्त्रींसमोर नतमस्तक होतात. बाळशास्त्रींचा निर्भीड बाणा समोर ठेवून सातारा जिल्ह्यामध्ये सुद्धा पत्रकारितेचा मोठा इतिहास आहे. आज २०२५ मध्ये देशातील आणि राज्यातील कोणत्याही शहराप्रमाणे सातारा शहरात आणि जिल्ह्यामध्ये सर्वच प्रकारची वृत्तपत्रे येत आहेत; पण हा प्रवास सोपा नव्हता. अर्थात मराठी पत्रकारितेच्या पहिल्या काही काळामध्ये पुणे-मुंबईच्या खालोखाल सातारा जिल्ह्याचा दबदबा होता.

पत्रकारिता

पत्रकारितेचा विस्तार

मराठी पत्रकारिता शिकणाऱ्यांसाठी बायबल म्हणून ज्या ग्रंथाचा उल्लेख केला जातो त्या 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या रा. के. लेले लिखित पुस्तकामध्ये लेखकाने स्पष्टपणे असा उल्लेख केला आहे की, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकामध्ये मुंबई पुण्याच्या खालोखाल सातारा जिल्ह्यामध्येच पत्रकारितेचा सर्वांत जास्त विस्तार झाला होता. सातारा येथे १८७८ मध्ये 'शुभसूचक'पत्राने मराठी वृत्तपत्रांचा शुभारंभ केला. त्यानंतर १८६७ मध्ये कोल्हटकर यांचे 'महाराष्ट्रमित्र' नावाचे पत्र निघाले. प्रसिद्ध नट चिंतामणराव कोल्हटकर यांचे वडील गणेश नारायण कोल्हटकर यांनी हे पत्र

नोंद

सातारामध्ये १९०७ च्या सुमारास 'व्यवस्था' नावाचे एक साप्ताहिक सुरू झाले होते. या साप्ताहिकाचे वैशिष्ट्य असे होते की, प्रिव्हीकौन्सिल तसेच हायकोर्टाचे ठराव आणि निकाल सोप्या भाषेत आणि थोडक्यात या पत्रात देण्यात येत असत. सार्वजनिक महत्त्वाचे खटले, महसूल खात्याचे ठराव वगैरे उपयुक्त माहितीही या पत्रात देण्यात येत असे.

सुरू केले होते. गणेश कोल्हटकर यांनी १८७३ मध्ये 'विनोद प्रतोद' नावाचे एक पत्रही सुरू केले होते काही प्रमाणात थट्टेखोर आणि व्यंगपत्र अशा अर्थाचे हे नियतकालिक होते.

१८८१ मध्ये आत्ताच्या सांगली जिल्ह्यात पण पूर्वीच्या सातारा जिल्ह्यात विनायकराव कौलगीकरांचे 'चंडांशु' हे साप्ताहिक प्रसिद्ध होत होते. तासगावमध्ये सदाशिव शास्त्री भिडे यांनी 'आर्यभानू पत्र' सुरू केले. त्यानंतर तासगावमध्ये 'आर्यपुत्र' नावाचेही एक पत्र सुरू झाले होते. १८८३ मध्ये इस्लामपूर मध्ये 'प्रतोद' हे एक पत्र प्रसिद्ध झाले. या पत्राचे संपादक रा. ना. कशाळकर होते. त्यानंतरच्या कालावधीमध्ये कराडमध्ये 'विदूषक' हे पत्र, वाईमध्ये अण्णासाहेब वैद्य यांचे 'वृत्तसार' हे पत्र, सातारमध्ये भाऊसाहेब कारेकरांचे 'छत्रपती' हे पत्र सुरू झाले. १८८७ मध्ये कराड येथे जगन्नाथ बालाजी सप्रे यांनी 'चित्रगुप्त' नावाचे पत्र सुरू केले. सातारा येथे रामभाऊ राजोपाध्ये यांनी 'वृत्तसुधा' हे साप्ताहिक सुरू केले. 'महाराष्ट्र कोकीळ' हे आणखी एक पत्र निघाले. महात्मा फुले यांच्या विचारसरणीतील पांडबा भोसले यांनी 'महाराष्ट्रवृत्त' याचवेळी काढले. 'सुभाष्यचंद्रिका' आणि 'वृत्तमाला' ही दोन पत्रे याच काळात निघाली. सातारा येथे २४ ऑक्टोबर १८९९ ला ग. ब. फणसळकर यांचे 'प्रेक्षक' हे नामवंत पत्र निघाले. शुभसूचकनंतर सातारा जिल्ह्याचे प्रातिनिधिक पत्र असा 'प्रेक्षक' पत्राला मान होता. हे पत्र १९०७ मध्ये बंद पडले. १८९० मध्ये 'मोदवृत्त' हे पत्र सुरू झाले. केशवराव वैद्य व गजाननराव केळकर ह्या पत्राचे जनक होते. इतर कोणत्याही पत्रांपेक्षा या पत्राने वाई अधिक गाजवली. वाई येथेच तेली समाजाच्या उन्नतीसाठी 'तेली समाचार' नावाचे वृत्तपत्र विश्वनाथ धोंडो चिंचकर यांनी १८९२ मध्ये सुरू केले. 'विटावृत्त', 'भाग्यता', 'मधुवृत्त', 'सुमंत', 'मित्रोदय', 'भागवत' अशी आणखी काही पत्रे त्या कालावधीमध्ये सुरू झाली. वामनराव ढवळे यांचे 'श्री शाहू' हे साप्ताहिक ४ नोव्हेंबर १८९९ रोजी साताऱ्यात निघाले.

सातारचा प्रकाश

नंतरच्या कालावधीमध्ये सातारा जिल्ह्यातील नाव घेण्यासारखे वृत्तपत्र म्हणजे 'सातारचा प्रकाश' हे पत्र होय. सातारा जिल्ह्यातील एक नामवंत पुढारी रामचंद्र गणेश ऊर्फ भाऊसाहेब सोमण यांच्या पुढाकाराने हे पत्र निघाले. साताऱ्यातील त्या वेळचे नामवंत वकील दादासाहेब करंदीकर यांच्याकडे वकिलीच्या व्यवसायाची उमेदवारी करत असतानाच भाऊसाहेब सोमण यांचे सामाजिक कार्य सुरू झाले होते. भाऊसाहेब सोमण यांनी स्वतः श्री शाहू, शुभसूचक या सातारच्या वृत्तपत्रांत लेखन केले होते; पण स्वतःच्या विधायक वृत्तीला साजेसे स्वतंत्र असे स्वतःचे वृत्तपत्र असावे, असे त्यांना वाटले. त्याप्रमाणे 'प्रकाश' वृत्तपत्र ७ एप्रिल १९०६ रोजी सुरू झाले. १९३० पर्यंत प्रकाश पत्र सुरू होते. या व्यतिरिक्त 'लोकबंधू', 'भारतमाता', 'सतार ए हिंद', 'भारतमित्र', 'उद्यमप्रकाश', 'सत्यप्रकाश', 'भारतवृत्त' अशी काही पत्रेही जिल्ह्यामध्ये निघाली. १९२४ मध्ये वडूजमध्ये 'रयत' नावाचे एक पत्र निघत असे.

ऐक्य व इतर वृत्तपत्रे

१९२३ मध्ये सातारमध्ये 'ऐक्य पत्र' सुरू झाले. रावबहादूर काळे यांचे हे वाङ्मयीन व राजकीय पत्य होते. तेच त्याचे संस्थापक होते. त्याचे पहिले संपादक नरहर गंगाधर जोशी होते. रा. ब. काळे यांच्याप्रमाणेच वाग्भट नारायण देशपांडे यांचे पाठबळ ऐक्य पत्रामागे होते. ऐक्यचे संपादकपद पुढे दीर्घकाळ चंडीराम पळणिटकर यांनी सांभाळले. नंतर त्यांचे चिरंजीव सुरेश पळणिटकर यांनी दीर्घकाळ संपादक पद सांभाळलेन नुकतेच ऐक्याने आपली १०० वर्षे पूर्ण केली आहेत. सध्या शैलेंद्र पळणिटकर संपादक आहेत

१९२४ मध्ये कराड येथे कृष्णाराव मारुतीराव ऊर्फ भाऊसाहेब कळंबे यांचे 'कैवारी पत्र' सुरू झाले. त्याच वेळी कराडमध्ये १९२५ मध्ये स. ब. पाटील यांनी 'शिक्षकांचा कैवारी' हे साप्ताहिक सुरू केले. मुसलमान वीरांच्या कथा सांगणारे कराडचे 'मुसलमान' साप्ताहिक १९२७ मध्ये निघाले. १९२८ मध्ये कराडला डॉ. ना. पा. कोल्हापुरे यांचे 'अभ्युदय' पत्र निघाले. 'सारथी' नावाचे एक पत्र १९२८ च्या सुमारास साताऱ्यात निघत असे १९२० नंतर तासगाव येथे काही दिवस 'सत्यप्रकाश' आणि सातारा येथे काही दिवस 'सातारा विजय' इस्लामपुरात 'भारत विजय' अशी पत्रे निघत असत. प्रबोधनकार ठाकरे यांचे 'प्रबोधन' साताराराेड येथून काही दिवस निघत असे. 'पंचांग' नावाचे एक साप्ताहिकही कराड येथे १९२९ च्या सुमारास सुरू झाले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी अनेक लोकप्रिय कादंबऱ्यांचे लेखक नारायण हरी आपटे यांनीसुद्धा काही काळ पत्रकारिता केली होती. मे १९१९ मध्ये त्यांनी स्वतःचे 'आल्हाद' नावाचे साप्ताहिक सुरू केले होते व ते काही काळ चालवले. अर्थात या साप्ताहिकांमध्ये साहित्यिक मजकुरालाच प्राधान्य देण्यात येत होते.



समर्थ साप्ताहिक

सातारला विनायक शंकर ऊर्फ बाबुराव वैद्य यांनी विशेषतः सातारा जिल्ह्याच्या प्रश्नांचा ऊहापोह करण्याच्या उद्देशाने 'समर्थ साप्ताहिक' सुरू केले त्याचा पहिला अंक ११ मे १९२७ रोजी बाहेर पडला. काही काळाने हे पत्र बंद पडले. त्याचे पुनरुज्जीवन नरूभाऊ लिमये यांनी केले. पुढे अनंतराव कुलकर्णी त्याचे संपादक झाले. म. प. बिचकर यांचे 'लोकसेवा' पत्र १९३० च्या सुमारास कराडात निघाले. तुकाराम भोसले शाईवाले हे 'लोकराज्य' नावाचे पत्र सातारा येथे १९३५ च्या सुमारास चालवीत असत. साताऱ्यातच रामचंद्रराव बाबाजीराव जाधव यांनी खेड्यांचा उद्धार करण्याच्या हेतूने 'ग्रामोद्धार' नावाचे पत्र एक ऑक्टोबर १९३५ पासून सुरू केले. हे दैनिक स्वरूपात असून अजूनही व्यवस्थित सुरू आहे. हरिभाऊ निंबाळकर यांचे 'शिवसंदेश' फलटणमध्ये निघाले. वर्धमान शहा यांनी १९७२ मध्ये साप्ताहिक 'आदेश' फलटणमध्ये सुरू केले. ब. भा. पेटकर यांचे 'फलटण जनसेवा' हे पत्र १९५८ च्या सुमारास निघाले. ज्ञानेश्वर जरंडी यांचे 'आक्रोश' हे पत्र १९७१ च्या सुमारास सुरू झाले. दिलीपकुमार इतराज यांचे 'संक्रमण' हे साप्ताहिक १९७६ मध्ये सुरू झाले. याशिवाय रवींद्र बेडकिहाळ यांचे 'लोकजागर' आणि दिलीप रुद्रभटे यांचे 'स्थैर्य' ही फलटणमधील आणखी काही वृत्तपत्रे. बाळकृष्ण आंबेकर यांचे 'जिव्हाळा' हे पत्र १९७० मध्ये सुरू झाले. कृ. मा. साखवळकर यांचे 'सैनिक' नावाचे साप्ताहिक १९४७ मध्ये सुरू झाले होते. याशिवाय कराडचे 'कर्मयोगी', सातारा येथील 'मुक्तागिरी', 'सांजवात', 'सत्यसह्याद्री' ही आणखी काही वृत्तपत्रे आहेत

आज साताऱ्यात स्थानिक वृत्तपत्रांशिवाय 'सकाळ', 'पुढारी', 'लोकमत', 'प्रभात', 'तरुण भारत' या वृत्तपत्रांच्या सातारा जिल्हा आवृत्त्या क्रियाशीलपणे आणि प्रभावीपणे कार्यरत आहेत. त्याशिवाय 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता', 'सामना' ही मुंबईची वृत्तपत्रेही साताऱ्यात स्थिरावली आहेत. डिजिटल माध्यमातही साताऱ्याच्या पत्रकारितेने प्रभावी काम सुरू केले आहे. न्यूज पोर्टल्स आणि यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून ही पत्रकारिता सुरू आहे.

संघटनात्मक कार्य

सातारा ही मुळातच लढाऊ भूमी असल्याने पत्रकारांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या आणि सामान्यांचे प्रश्न सरकार दरबारी मांडणाऱ्या पत्रकार संघटना प्रभावीपणे काम करत आहेत. रवींद्र बेडकिहाळ यांची 'पत्रकार कल्याण निधी' ही संघटना दरवर्षी राज्यातील पत्रकारांचा सन्मान करते. 'मराठी पत्रकार परिषद सातारा शाखा', 'सातारा पत्रकार संघ', 'सातारा तालुका पत्रकार संघ', इतर सर्व तालुक्यातील पत्रकार संघ', सातारा डिजिटल मीडिया परिषद अशा अनेक संघटना प्रभावीपणे काम करत आहेत लेखाच्या प्रारंभी उल्लेख केल्याप्रमाणे पुणे आणि मुंबई पाठोपाठ सातारा येथेच पत्रकारितेचा सर्वांत जास्त विस्तार झाला. त्यामुळे या लेखात माहिती न मिळाल्यामुळे की, अपुऱ्या माहितीमुळे क्वचित एखादा उलेख राहिला असण्याची शक्यता आहे. तो दोष आधीच स्वीकारून अशा अज्ञात सर्व पत्रकारांना आणि नियतकालिकांना मानाचा मुजरा!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक आहेत.)

नोंद

सातारा जिल्ह्यातील पहिले वृत्तपत्र म्हणून शुभसूचकचे नाव असले तरी त्यापूर्वी 'बोधामृत' व 'शुभेच्छा' ही वृत्तपत्रे निघाल्याचा उल्लेख आढळतो. त्यापैकी बोधामृत पत्राचा उल्लेख 'ज्ञानोदय' या प्रख्यात वृत्तपत्रात आढळतो. 'बोधामृत' नामक एक पत्र दर आठवड्यात सातारा मुक्कामी निघत असते त्या पत्राची किंमत आगाऊ दिली असता पाच रुपये आणि वार्षिक दिल्यास सहा रुपये आहे, असे 'ज्ञानोदय' मध्ये म्हटले आहे यापेक्षा अधिक या पत्राची माहिती उपलब्ध नाही.



सिद्धार्थ लाटकर
मो.: ९४२३०००००६६

मैदानावरही साताऱ्याची आघाडी

सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांनी वेढलेल्या सातारा जिल्ह्याला सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक असे विविध अधिष्ठान लाभले आहे. क्रीडा क्षेत्रात सातारा जिल्ह्याने कायमच योगदान दिले आहे. पारंपरिक कबड्डी, खोखो, मैदानी क्रीडा स्पर्धांपासून वेटलिफ्टिंग, बास्केटबॉल, नेमबाजी, धनुर्विद्या अशा क्रीडा प्रकारांत जिल्ह्यातील खेळाडू सातत्याने चमकत आहेत.



क्रीडा क्षेत्र

सातारा जिल्हा हा शूरांचा जिल्हा. छत्रपतींच्या गादीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो तसंच तो ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची भूमी म्हणूनही ओळखला जातो. देशाला ऑलिंपिक स्पर्धेत पहिले पदक मिळवून देणाऱ्या खाशाबा यांच्या पराक्रमाचा वारसा आजही साताऱ्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील खेळाडू तेवढ्याच ताकदीने जोपासत आहेत.

मुळातच जिल्हा दुष्काळी आणि अति पावसाचा त्यात दुर्गमपणा जास्त, त्यामुळे येथील खेळाडूंना आधुनिक खेळाच्या सुविधा लवकर मिळू शकल्या नाहीत तरीही अडचणींवर मात करीत खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत आपला ठसा उमटविला आहे.

कै. नंदा जाधव ते आत्ताच्या सुदेष्णा शिवणकर, अदिती स्वामी, प्रिशा शेट्टी आदींनी जिल्ह्याचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला आहे.

गेल्या काही वर्षांपासून होणाऱ्या सातारा हिल मॅरेथॉन स्पर्धेला आता आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. सध्याची पिढी ही विविध खेळांमध्ये जिल्ह्याच्या लौकिकास साजेल अशी कामगिरी करत असताना दिसत आहे.

क्रीडा संकुलाची निर्मिती

छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलाबरोबरच काही तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा संकुलाची निर्मिती झाल्याने खेळाडूंना सुविधा मिळू लागल्या आहेत. यामुळे

नोंद

सातारा नगर परिषद आणि म. सा. प. सातारा (शाहूपुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने गेली चौदा वर्षे सातत्याने सातारा शहरात २८ फेब्रुवारी ते १४ मार्च हा 'मराठी भाषा पंधरवडा' म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर या महान कवींचे त्यानिमित्ताने स्मरण केले जाते. पंधरा दिवस विविध उपक्रम राबवले जातात.

प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी संस्था या उपलब्ध होऊ लागल्या आहेत. खेळाडूंची कामगिरी पाहता त्यांचा, पालकांचा आत्मविश्वास उंचावला जात असून खेळाकडे सातारकर आता करिअरच्या दृष्टीने पाहू लागले आहेत.
पारंपरिक खेळाबरोबरच साताऱ्यातील खेळाडू साहसी आणि पॅराऑलिंपिक स्पर्धेत जिल्ह्याचा झेंडा अटकेपार फडकवत आहेत याचा अभिमान वाटतो.

सातारा जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त खेळाडू

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार

खाशाबा जाधव (विशेष पुरस्कार कुस्ती)
संजय बोडरे – खोखो
सुजित शेडगे – मल्लखांब
राजेंद्र शेळके – रोइंग
बबनराव फुले – कबड्डी
आनंद कोल्हापुरे – मल्लखांब
डॉक्टर नरेंद्र दाभोलकर – कबड्डी
शंकर लोखंडे – कुस्ती
साहेबराव पवार – कुस्ती
नंदा जाधव – ॲथलेटिक्स
विजय जाधव – कबड्डी
नीलिमा कदम तुपलीवार – खोखो
शिवाजी पाचपुते – कुस्ती
कुमार कुलकर्णी – कबड्डी
जयश्री संकपाळ – बुद्धिबळ
प्रभाकर पाठक – रोइंग
उज्ज्वला माने – वेटलिफ्टिंग
कैलास माने – ॲथलेटिक्स
माया पवार – मल्लखांब
विश्वतेज मोहिते – मल्लखांब
अर्निका गुजर – बास्केटबॉल
सीमा लाड – वेटलिफ्टिंग
राजेंद्र मोहिते – शूटिंग बॉल
प्राची वेलणकर थत्ते – बास्केटबॉल
प्रज्ञा माने – बास्केटबॉल
शुभांगी कारंड – वेटलिफ्टिंग
मिथिला गुजर – बास्केटबॉल
विशाल दाभाडे – मल्लखांब
मीनाक्षी शिंदे – सायकलिंग
भाग्यश्री फडतरे – खोखो
प्रसाद गायकवाड – सायकलिंग
शुभसवा शिखरे – पॉवर लिफ्टिंग
माधवी भोसले – खो खो
स्नेहल कदम – जलतरण
प्रियंका देसाई – सायकलिंग
विक्रांत दाभाडे – मल्लखांब
प्रियंका येळे – खो-खो
आदित्य अहिरे – मल्लखांब
आशिष माने – एव्हरेस्ट वीर
शिवराज ससे – शूटिंग
एकता शिर्के – आर्चरी
सायली शेळके – रोइंग
सतीश कदम – खाडी समुद्र
ललिता बाबर – ॲथलेटिक्स
तेजस शिंदे – रोविंग
स्नेहल शेळके – रोइंग
प्रवीण जाधव – आर्चरी
कालिदास हिरवे – ॲथलेटिक्स
प्रियांका मोहिते – गिर्यारोहण
स्नेहल मांढरे – आर्चरी
प्रतीक्षा मोरे – मल्लखांब
अक्षता ढेकळे – हॉकी
प्रांजली धुमाळ – शूटिंग
अदिती स्वामी – आर्चरी
वैष्णवी फाळके – हॉकी
किरण जाधव – शूटिंग
मयूर पवार – सायकलिंग
संस्कृती मोरे – बुद्धिबळ

अर्जुन पुरस्कार

अदिती स्वामी – आर्चरी

तेनसिंग नॉरगे पुरस्कार

(लेखक क्रीडा संघटक व दैनिक सकाळचे क्रीडा वार्ताहर आहेत.)
संकलन साहाय्य : सातारा जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, सातारा.

नोंद

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील खर्शी या छोट्या गावातून आलेल्या सुदेष्णा शिवणकरने ॲथलेटिक्समध्ये इतिहास रचला आहे. २०१८ ते २०२५ या काळातील राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये तब्बल ६२ पदके तिने मिळवली आहेत. ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तिने 'देशातील वेगवान धावपटू' हा किताब पटकावला आहे.



सुनील शेडगे
मो.: ९८२२४५४६३०

सातारा जिल्ह्याचे मंदिर वैभव

अनेक वैविध्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण मंदिरे सातारा जिल्ह्यात बहुसंख्येने पाहावयास मिळतात. त्यातील अनेक मंदिरांना प्राचीनतेची किनार लाभली आहे. आज काळाच्या बदलत्या प्रवाहातही ही मंदिरे आपले अस्तित्व अबाधित राखून आहेत आणि पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत.

सातारा या शब्दाला कितीतरी पैलू लाभले आहेत. साताऱ्याला इतिहासाची समृद्ध परंपरा लाभली आहे. इथला निसर्ग समृद्ध आहे. इथे विचारांचा वारसा आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, आध्यात्मिक, औद्योगिक, कला आदी क्षेत्रांतही साताऱ्याचे नाव कायमच अग्रेसर राहिलेले आहे. सातारा ही मराठेशाहीची राजधानी. स्वाभाविकच कित्येक गडकिल्ले या जिल्ह्यात आहेत. त्याच अनुषंगाने अनेक वैविध्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण मंदिरेही जिल्ह्यात पाहावयास मिळतात.

पाटेश्वर

जिल्ह्यातील प्राचीन मंदिरांवर दृष्टिक्षेप टाकल्यास सातारा शहरापासून नजीक असलेल्या पाटेश्वरचा उल्लेख अग्रक्रमाने येतो. हे स्थान समुद्रसपाटीपासून सुमारे तीन हजार फुटांहून अधिक उंचीवर आहे. पाटेश्वरचे मंदिर हे स्थापत्यशास्त्राचा एक उत्तम नमुना मानले जाते. परिसरात असलेली शेकडो शिवलिंगे ही येथील वैशिष्ट्ये ठरतात. या शिवलिंगांसह शिलालेख, दीपमाळा, तलाव येथे पाहावयास मिळतात.

धार्मिक

सातारा शहराच्या अवतीभवतीही अनेक मंदिरे आहेत. शहराच्या पश्चिमेस डोंगरउंचावर यवतेश्वराचे पुरातन मंदिर आहे. प्रशस्त सभामंडप, मजबूत काळ्या पाषाणातील चिरांचे बांधकाम, आकाशाच्या दिशेने निमुळता होत जाणारा हेमाडपंती शैलीचा कळस, ही या मंदिराची वैशिष्ट्ये.

सातारा शहरातील ब्रिटिशकालीन बोगदा ओलांडला, की नजीकच कुरणेश्वरचे मंदिर आहे. ते भाविकांचे श्रद्धास्थान आहे. परळीतील उरमोडी जलाशयालगत असलेले शिवमंदिर अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय ठरते.

धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी यांनी बांधलेले भार्गवराम मंदिर आजही आपली

नोंद

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात २३ जून १९६१ रोजी सातारा येथील सैनिक स्कूलची स्थापना झाली. भारतातील अशा अनेक सैनिकी शाळांपैकी पहिली शाळा असल्याचा मान या शाळेला आहे. ही शाळा खडकवासला, पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये प्रवेश घेण्यासाठी मुला-मुलींना तयार करते.



वेगळी ओळख टिकवून आहे. सातारा शहरातही कोटेश्वर, कृष्णेश्वर, बहुलेश्वर, काशी विश्वेश्वर, काळाराम, दुर्गामाता, गारेचा गणपती, पंचमुखी गणपती आदी मंदिरे आहेत. महामार्गालगतचे नटराज मंदिरही प्रेक्षणीय ठरते. इतिहासप्रसिद्ध सज्जनगडावरील श्रीरामाचे मंदिर लक्षवेधक ठरणारे आहे. सातारा- कास मार्गावर पेटेश्वर अन् देवराईत दडलेले घाटाई मंदिर आहे.

कृष्णा नदीकाठी प्राचीन शिवमंदिरे

सातारा तालुक्यात कृष्णा नदीकाठी अनेक प्राचीन शिवमंदिरे आढळतात. त्यात वडूथ येथील शकुंतलेश्वर मंदिर, बोरखळ येथील खलवेश्वर मंदिर, मर्ढे येथील रामेश्वर मंदिर, सोनगाव येथील वाकेश्वर मंदिर, लिंब-गोवे येथील कोटेश्वर मंदिर आदींचा उल्लेख करता येईल. संगम अन् क्षेत्र माहुली ही कृष्णा- वेण्णा नदीच्या संगमावरील गावे तर मंदिरांसाठी प्रसिद्ध मानली जातात. अंगापूर येथील गणेश मंदिराचा महिमाही मोठा आहे. वर्णे- आबापुरीचे श्री काळभैरवनाथाचे मंदिरही जागृत मानले जाते.

वाईतील मंदिरे

वाई हे ठिकाण दक्षिण काशी म्हणून प्रसिद्धी पावले आहे. येथील ढोल्या गणपतीचे मंदिर हे राज्यातील प्रमुख मंदिरांपैकी एक. या मंदिरातील गणपतीची महाकाय मूर्ती अचंबित करणारी आहे. शहर परिसरात विविध प्राचीन मंदिरे आहेत. वाईपासून नजीक मेणवली येथे अठराव्या शतकात बांधलेले मेणेश्वराचे मंदिर अप्रतिम आहे. या परिसरात कृष्णा नदीकाठी असलेला चंद्रकोरीच्या आकाराचा घाटही तितकाच रम्य आहे. तिथून पुढे काही अंतरावर धोम धरणालगत नृसिंह मंदिर आहे. या मंदिराच्या प्रांगणात पाषाणात कोरलेली सुबक, रेखीव पुष्करणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. बावधनचे वाकेश्वर, भुईंजचे महालक्ष्मी, ओझर्डेचे सोनेश्वर, बोपर्डीचे भीमाशंकर, आसलेचे भवानीमाता, मांढरदेवीचे काळूबाई ही मंदिरे विशेष प्रसिद्ध आहेत. किकली येथील भैरवनाथ मंदिर हे तर शिल्पकलेचा अप्रतिम ठेवा आहे.

पंचगंगा मंदिर

क्षेत्र महाबळेश्वर येथील पंचगंगा मंदिर हे महत्त्वपूर्ण तीर्थस्थान मानले जाते. येथे कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री अन् गायत्री या नद्या उगम पावतात. किल्ले प्रतापगडावर असलेल्या भवानीदेवी मंदिराला ऐतिहासिक संदर्भ लाभले आहेत. तिथून काही अंतरावरचे पार येथील आदिशक्ती श्रीरामवरदायिनी मंदिर म्हणजे एक जागृत शक्तिपीठ. दाट, गर्द वृक्षराजीत वसलेले हे लक्षवेधक मंदिर मराठा सरदार, कुलवंत घराणी अन् लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. जावळी तालुक्यातील कुसुंबी



सातारा जिल्ह्यातील कोयना अभयारण्यात गेली अनेक वर्षे वाघांचे अस्तित्व आहे. पश्चिम घाटाच्या छायेखालील कोयना अभयारण्य आणि चांदोली राष्ट्रीय उद्यान परिसर एकत्र करून स्वतंत्र 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्प' म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. नैसर्गिक वारसा जपण्याबरोबरच जागतिक पर्यटकांचे लक्ष वेधल्याने निसर्गपूरक पर्यटनास चालना मिळाली आहे.



येथे काळेश्वरी देवीचे मंदिर आहे. नवरात्र काळात येथे विविध उत्सव साजरे होतात. कुडाळ येथील कुडाळी नदीकाठी श्री पिंपळेश्वर वाकडेश्वरचे देवस्थान प्रसिद्ध आहे. करहर तीर्थक्षेत्राचा उल्लेख प्रति पंढरपूर म्हणून होतो. डोंगरावर रम्य ठिकाणी असलेले मेरूलिंग मंदिर हे सुमारे ४०० वर्षांपूर्वी बांधण्यात आले आहे.
खंडाळा तालुक्यातील कवठे येथील ग्रामदैवत श्री केदारेश्वराचे मंदिरही प्राचीन आहे. ते सतराव्या शतकात बांधले गेले असल्याचे सांगितले जाते.

शिरवळ येथील केदारेश्वराचे मंदिरही जिल्ह्यातील प्रसिद्ध मंदिरांपैकी एक मानले जाते. खास करून दगडी बांधकामातील भव्यतेवरून ते लक्षात राहते. घडीव दगडी बांधकामातील कलाकुसरही त्यानिमित्ताने अधोरेखित होते. मोर्वे गावातील दत्त मंदिरासही राज्यभरातील भाविक भेट देतात.

जरंडेश्वर

कोरेगाव तालुक्यातील जरंडेश्वराचे स्थान भाविकांसह भटकंती करणाऱ्या पावलांना कायमच साद घालते. येथील मंदिरासमोर सुमारे ३०० वर्षांपूर्वीची दीपमाळ आहे. समर्थांनी स्थापलेली हनुमानाची मूर्ती आहे. वांगणा नदीकाठच्या किन्हई गावालगत असलेल्या साखरगड टेकडीवर यमाईदेवीचे मंदिर आहे. देवीला साखरगड निवासिनी म्हणूनही संबोधले जाते. औंध संस्थानाचे पंतप्रतिनिधी यांनी १७३६ ते १७४६ या काळात हे वैशिष्ट्यपूर्ण मंदिर बांधले आहे. त्रिपुटीत गोपालनाथ महाराज अन् निगडीत निजानंद महाराज यांची समाधी मंदिरे आहेत. सोळशीतील शनैश्वर, चवणेश्वरातील च्यवणेश्वर, तडवळेतील रामेश्वर, देऊरचे मुधाईदेवी, पिंपोडेतील घुमाईदेवी ही मंदिरेही प्रसिद्ध आहेत.

औंधचे मंदिर

खटाव तालुक्यातील औंध येथील मंदिर ठेवा अमूल्य आहे. डोंगरउंचावरील या मंदिराचे स्थापत्यकाम अप्रतिम आहे. विशेषत: मंदिराच्या शिखरावर विविध हिंदू देवतांच्या कोरीव प्रतिमा अन् मूर्ती आहेत. यमाई देवीचे आणखी एक मंदिर गावात आहे. कातरखटाव येथील कात्रेश्वर मंदिराला प्राचीनतेचा स्पर्श लाभला आहे. खटाव येथे यादव, चालुक्य कालखंडातील विविध मंदिरे पाहावयास मिळतात. पुसेगाव येथे सेवागिरी महाराजांचे, तर कुरोली येथे सिद्धेश्वराचे मंदिर आहे. गुरसाळे येथील प्राचीन रामलिंग मंदिर हे लक्षवेधक आहे. ते तेराव्या शतकात बांधले गेले आहे. हेमाडपंती शैलीच्या या मंदिरापुढे असलेली पुष्करणी हे इथले खास वैशिष्ट्ये. तिची कलात्मकता, स्थापत्यकाम, दगडी कोरीवकाम पाहताना आपण अचंबित होतो. भूषणगड किल्ल्यावर हरणाईमाता या गडदेवतेचे मंदिर आहे.

शिखर शिंगणापूर

जिल्ह्यात पूर्वेकडील शिखर शिंगणापूरचे महादेव मंदिर



प्राचीन आहे. हेमाडपंती शैलीतील हे मंदिर वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना मानले जाते. इथल्या दीपमाळा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मंदिर परिसरात मोठमोठ्या घंटा पाहावयास मिळतात. मलवडी येथील खंडोबा मंदिर

कृष्णा नदीवरील धोम येथील धोम धरण (१९७७), वेण्णा नदीवरील कण्हेर धरण, नीरा नदीवरील वीर धरण (१९६७), पाटण तालुक्यात कोयना नदीवरील कोयना धरण ही सातारा जिल्ह्यातील प्रमुख धरणे आहेत. 'कोयना जलविद्युतनिर्मिती प्रकल्प' हा राज्यातील सर्वांत मोठा प्रकल्प आहे. त्याशिवाय अनेक लघु पाटबंधारे प्रकल्पदेखील आहेत.

नोंद

भाविकांचे श्रद्धास्थान आहे. म्हसवड येथील माणगंगा नदीकाठी असलेले सिद्धनाथ मंदिर हे ११ व्या शतकात चालुक्य शासकांनी बांधले आहे. गोंदवले गावात ब्रह्मचैतन्य स्वामी महाराजांची समाधी आहे. येथील मंदिरास दरवर्षी लाखो भाविक भेट देतात.

फलटण शहर हे महानुभाव पंथीयांची दक्षिणकाशी म्हणून ओळखले जाते. येथील श्रीराम अन् पुरातन हेमाडपंती जबरेश्वर मंदिर विशेष प्रसिद्ध आहेत. वाठार निंबाळकर येथेही पुरातनकालीन राम मंदिर आहे. ताथवडा येथील बाळसिद्धाचे मंदिर आहे. तेथील भक्कम दगडांची तटबंदी, नगारखाना प्रेक्षणीय आहे.

कराड शहरातील प्रीतिसंगम हे प्रेक्षणीय स्थळ. याच परिसरात कृष्णामाई मंदिरासह संगमेश्वर, कमळेश्वर, हटकेश्वर, रत्नेश्वर आदी शिवमंदिरे आहेत. सैदापूरचे पावकेश्वर, पाचवडचे पाचवडेश्वर, कापिलचे कपिलेश्वर, गोळेश्वरचे श्री शंभू महादेव, वडोलीचे निळेश्वर, मसूरचे केदारेश्वर ही मंदिरेही प्रसिद्ध आहेत. तारळी नदीकाठी असलेल्या पालीच्या खंडोबा देवस्थानाच्या दर्शनाला भाविकांची सदैव गर्दी असते. तळबीड या इतिहासप्रसिद्ध गावातील श्रीराम मंदिर भव्य आहे. कराड शहरानजीक असलेल्या नांदलापूर येथील आगाशिव डोंगरात असलेली बौद्धकालीन लेणी विशेष प्रसिद्ध आहेत.

पाटण तालुक्यातील धारेश्वरचे मंदिर रम्य परिसरात आहे. बहुले येथील बहुलेश्वर, येराडवाडी येथील रुद्रेश्वर, येराड येथील येराडेश्वर, उरुल घाटातील शिवमंदिर या मंदिरांचे श्रावणात माहात्म्य असते. मारूल हवेली येथील सिद्धेश्वर मंदिरात १९३६ पासून श्रावणातील दीपोत्सवाची आगळी परंपरा सुरू आहे. जळव येथील डोंगरउंचावर असलेल्या ज्योतिबा मंदिराला भाविक बहुसंख्येने भेट देतात. बनपुरी येथील नाईकबा देवस्थानावर भाविकांची मोठी श्रद्धा आहे. महाराष्ट्र अन् कर्नाटकातील लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

चाफळला समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापलेले राम मंदिर अन् दोन मारुती मंदिरे आहेत. कडवे या आडवळणाच्या गावात असलेले पांडवकालीन मंदिरही तितकेच प्रेक्षणीय ठरणारे आहे. सह्याद्रीच्या घनदाट जंगलात काही प्रसिद्ध शिवमंदिरे आढळतात. त्यात पर्वत येथील मल्लिकार्जुन मंदिर हे जिल्ह्यातील सर्वांत उंचावरील शिवमंदिर म्हणून ओळखले जाते. चकदेवचे चौकेश्वर मंदिरही प्रसिद्ध आहे. वासोटा किल्ला परिसरात असणारे नागेश्वर मंदिरही हे अत्यंत दुर्गम भागात स्थापित आहे. ते सातारा अन् रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेवर आहे.

जावळीच्या घनगर्द हिरवाईतली सप्तशिवालये विशेष प्रसिद्ध आहेत. तळदेव, धारदेव, गाळदेव, मोळेश्वर, चकदेव, पर्वत, घोणसपूर या ठिकाणी ती स्थापित आहेत. त्यातील चकदेव, पर्वत, घोणसपूर येथील स्वयंभू शिवमंदिरे ही शिवसागरापलीकडे आहेत. तळदेवचे शिवालय महाबळेश्वर- तापोळा रस्त्यावर, तर उर्वरित तीन कासपासून महाबळेश्वरकडे जाणाऱ्या राजमार्गावर आहेत.

एकूणच काय, ही मंदिरे केवळ धार्मिक स्थळेच नाहीत, तर ती सातारा जिल्ह्याच्या समृद्ध ऐतिहासिक अन् सांस्कृतिक वारशाचे प्रतीक बनली आहेत.

(लेखक शिक्षक आणि पत्रकार आहेत.)



नोंद

सातारा शहरापासून पाच कि. मी. कोरेगाव रस्त्यावर कृष्णा-वेण्णा यांचे संगमस्थान असलेले संगम माहुली हे ठिकाण पेशवाईतील प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे जन्मस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. सातारा शहरापासून ११ कि. मी. सातारा-सोलापूर रस्त्यावरील त्रिपुटी येथील संत गोपालनाथ महाराजांचे समाधी मंदिर, धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामींची समाधी व भार्गव राममंदिर, सज्जनगड येथील समर्थ रामदास स्वामींची समाधी इत्यादी प्रसिद्ध ठिकाणे आहेत.



शिरीष चिटणीस
मो.: ७७८८८६७०७१

सातारचा ग्रंथमहोत्सव

‘सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव समिती’ने २७ वर्षांपूर्वी डिसेंबर १९९९ मध्ये नवीन सहस्रकाच्या आगमनापूर्वीच ग्रंथमहोत्सव साताऱ्यात चालू करून समाजामध्ये वाचनसंस्कृतीची ओढ आणि सवय निर्माण करण्यास सुरुवात केली. संपूर्ण महाराष्ट्रात हा ग्रंथमहोत्सव ‘सातारा पॅटर्न’ म्हणून ओळखला जातो.

सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव समिती आयोजित, सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापूर्वी या संमेलनाला पूरक ठरेल असा ‘ग्रंथमहोत्सव’ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे नगरीमध्ये ७,८,९,१० नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. ‘सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव’ समितीने २७ वर्षांपूर्वी डिसेंबर १९९९ मध्ये नवीन सहस्रकाच्या आगमनापूर्वीच साताऱ्यात ग्रंथमहोत्सव चालू करून समाजामध्ये वाचनसंस्कृतीची ओढ आणि सवय निर्माण करण्यास सुरुवात केली. संपूर्ण महाराष्ट्रात ‘सातारा पॅटर्न’ म्हणून ओळखला जाणारा हा ग्रंथमहोत्सव महाराष्ट्राला वाचनसंस्कृतीसाठी दिशा देत आहे. गेली २७ वर्षे सातत्य, चिकाटी, निष्ठा, निरपेक्ष भावना आणि ग्रंथप्रेमाने हा ‘ग्रंथमहोत्सव’ सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

उपक्रम

शाळांचे सहकार्य

विविध शाळांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना, शिक्षकांना सामावून घेतल्यामुळे ग्रंथमहोत्सवाचा मुख्य हेतू तडीस जात आहे. साताऱ्याचा ग्रंथमहोत्सव हा विशेषतः विद्यार्थीकेंद्रित आहे. ग्रंथमहोत्सव चालू होण्यापूर्वीच्या महिन्याभरात कथाकथन, मी वाचलेले पुस्तक, कविसंमेलन, वक्तृत्व अशा विद्यार्थ्यांच्या प्राथमिक स्पर्धा घेतल्या जातात. प्रत्येक गटातून साधारणपणे १७ विद्यार्थ्यांची निवड केली जाऊन या सर्वांना ग्रंथमहोत्सवातील यशवंतराव चव्हाण व्यासपीठावरून आपली कला सादर करण्याची संधी दिली जाते. तसेच विविध शाळांचे प्राथमिक व माध्यमिक गटातील सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याची संधी देऊन त्यातूनही विजेते निवडले जातात. ग्रंथदिंडीच्या माध्यमातून चित्ररथामुळेही विद्यार्थ्यांना कलागुण सादर करता येतात. या सर्व माध्यमांतून

नोंद

अर्वाचीन मराठी साहित्यातील युगप्रवर्तक कवी तसेच नवकविता व नवटीका ह्यांचा प्रारंभ करणारे श्रेष्ठ साहित्यिक बा. सी. मर्ढेकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील मर्ढे ह्या गावचा. त्यांचे कुटुंब परंपरेने रामदासी पंथाचे होते. अभंग आणि ओवी ह्या प्राचीन मराठी रचनाप्रकारांचे मर्ढेकरांनी पुनरुज्जीवन केले. मर्ढेकरांची कविता ही नवकविता किंवा नवकाव्य म्हणून ओळखली जात असली, तरी पूर्वपरंपरेशी तिचे निश्चित नाते आहे.

विद्यार्थी-पालक-शिक्षक यांचे पाय आपसुकच ग्रंथमहोत्सवाकडे वळतात. साधारणपणे शंभर ग्रंथांच्या स्टॉलच्या गराड्यात.

''चॉकलेट बिस्किट नको मला
छान छान पुस्तके घेऊ चला''

या घोषवाक्याप्रमाणे मुले, पालक, शिक्षक, ग्रंथपाल, सर्वसामान्य नागरिक झुंबडीने(गर्दीत)ग्रंथ खरेदी करतात. एकदा घरी ग्रंथ आला की, वाचन आपसुकच चालू होते आणि अशा पद्धतीने गेल्या २५ वर्षांत घरा-घरांमध्ये त्यांचे स्वतःचे ग्रंथालय उभे राहिले आहे.

सांस्कृतिक समृद्धी

आर्थिक समृद्धीबरोबरच सांस्कृतिक समृद्धी जीवनात गरजेची असते आणि ती वाचनातूनच मिळते. ही वाचनाची आवड लहान वयातच निर्माण होणे संवेदनशील मनासाठी आवश्यक असते. बघणे आणि वाचणे यात खूप महत्त्वपूर्ण फरक असतो. बघितलेली माहिती तुम्हाला आठवतेच असे नाही; पण वाचलेली माहिती तसेच शब्द हे मनावर कोरले जातात. चांगले साहित्य वाचकांना अंतर्मुख करते. शब्दांचे सामर्थ्य हे फार मोठे असते. नवनिर्मितीचे कार्य हे शब्द व विचार करीत असतात. ज्या स्व. यशवंतराव चव्हाण व्यासपीठावरून परिसंवाद, भाषणे, मुलाखती व इतर विविध मान्यवरांकडून शब्दरूपी विचारधन ग्रंथप्रेमींना श्रवण करण्याची संधी मिळते. त्यांच्या मनात आणि विचारात नवसंकल्पनांचे विविध मार्ग सुरू होतात. यशवंतराव चव्हाण यांचेच शब्द आहेत की, ''कल्पना, विचार आणि शब्दांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती असते.''

वाचन, श्रवण, चिंतन

२५ वर्षांपूर्वी तत्कालीन शिक्षणाधिकारी दिनकरराव पाटील, त्या वेळचे सैनिक स्कूलचे प्राचार्य डॉ. मुखोपाध्याय, ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शिरीष चिटणीस, राजकुमार निकम आणि इतरांनी सुरू केलेल्या ग्रंथमहोत्सवाने, ज्या सातारा शहरात पुस्तकाचे-ग्रंथाचे वेगळे दुकान नाही त्या साताऱ्यात समाजामध्ये असणारी सुप्त ग्रंथ-पुस्तके खरेदी करण्याची मागणी मार्गी लावली. नवा माणूस घडवायचा असेल, तर ते काम फक्त ग्रंथ व कला हेच करू शकतात. माणूस घडविणे म्हणजे काय तर माणसांचे मन घडविणे. मन घडलं तर जीवन घडते. वाचन, श्रवण, चिंतन हे अत्यंत गरजेचे आहे. ते काम ग्रंथ व ग्रंथमहोत्सवाच्या माध्यमातून होत आहे. ज्येष्ठ लेखक व विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी हा ग्रंथमहोत्सव सातत्याने जे योगदान देत आहे ते बघितल्यामुळे तसेच त्यांच्या ग्रंथमहोत्सवातील सहभागासह त्यांनी केलेल्या वैचारिक प्रबोधनामुळे हा ग्रंथमहोत्सव त्यांच्या मनात ठाण मांडून बसला होता. त्यांनी विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून चाललेल्या या ग्रंथमहोत्सवाचे यश महत्त्वपूर्ण मानले. डॉ. आ. ह. साळुंखे महाराष्ट्र शासनाच्या भाषा समितीचे प्रमुख असताना अशा प्रकारचे ग्रंथमहोत्सव हे शासनाने प्रत्येक जिल्ह्यात राबविले पाहिजेत, अशी शिफारस शासनाकडे केली आणि त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला शासनाकडून किमान एक लाख रुपये अनुदान देण्याचीही शिफारस केली. महाराष्ट्र शासनाने हे धोरण मान्य करून बजेटमध्ये तशी तरतूद केली, त्यामुळे बरीच वर्षे संपूर्ण महाराष्ट्रात त्या त्या जिल्ह्याच्या शासकीय ग्रंथालयामार्फत छोटे ग्रंथमहोत्सव त्या त्या जिल्ह्यात होत असतात. ही महत्त्वाची योजना सातारा ग्रंथमहोत्सवामुळे महाराष्ट्र शासनाने आचरणात आणली त्याबद्दल आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो.

प्रश्न पडायला हवेत

मुळात मुलांना स्वतःचे प्रश्न पडायला हवेत. त्यासाठी कुतूहल वाटायला हवं. सध्या मुलं पुस्तकात आणि परीक्षेत दिलेले प्रश्न सोडवतात; पण प्रश्न पडणे ही आवश्यक प्रक्रिया मेंदूत होत नाही. कोणत्याही प्रकारच्या समृद्ध प्रगतीसाठी प्रश्न पडणे अतिशय महत्त्वाची बाब आहे. एका प्रश्नाचं उत्तर मिळालं आणि कुतूहल संपलं, असं व्हायला नको. तर एका प्रश्नातून दुसरा प्रश्न, मिळालेल्या उत्तरातून किंवा मिळालेलं उत्तर अपूर्ण वाटल्याने नवीन प्रश्न, त्याचा शोध असा प्रवास सुरू व्हायला हवा. जसे मुलांच्या बाबतीत तसेच व्यक्तींच्या बाबतीत हे शेवटपर्यंत आवश्यक आहे. हा ग्रंथमहोत्सव त्यादृष्टीने लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत दिशादर्शक आहे. या ग्रंथ महोत्सवातून वाचनसंस्कृतीबरोबरच विविध कार्यक्रमांतून असे प्रश्न निर्माण होऊन सर्वांना आपले व्यक्तिमत्त्व अभ्यासपूर्ण, समृद्ध होण्यासाठी गेली पंचवीस वर्षे मदत होत आहे. पडलेल्या प्रश्नांना उत्तर

नोंद

कवी गिरीश ऊर्फ शंकर केशव कानेटकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील फत्यापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण सातारा आणि पुणे येथे झाले. फलटण, पुणे, सांगली येथे शिक्षक व प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. शिक्षण क्षेत्रातील सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपतींचे पारितोषिक मिळाले. निवृत्तीनंतर सांगलीस स्थायिक झाले. मासिक मनोरंजनात क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या 'अभागी कमल' (१९२३) ह्या सामाजिक खंडकाव्याने त्यांना विशेष प्रसिद्धी मिळाली.



मिळण्यासाठी आवश्यक ती ग्रंथसंपदा लगेचच ग्रंथमहोत्सवात उपलब्ध होत आहे. यातच या ग्रंथमहोत्सवाचे यश आहे.

यशवंतराव चव्हाण व्यासपीठ

यशवंतराव चव्हाण सातवी इयत्तेच्या वर्गात शिकत होते. त्यामुळे त्यांना समज होती; परंतु त्या वेळी जी वृत्तपत्रे त्यांना वाचायला मिळत असत. ती म्हणजे पुण्यात प्रसिद्ध होणारा 'विजयी मराठा' आणि बेळगावहून प्रसिद्ध होणारा 'राष्ट्रवीर'. ही ब्राह्मणेतर चळवळीचा पुरस्कार करणारी होती. ती एकाच व एकांगी विचाराचा परखड प्रचार सतत करत असल्यामुळे त्यांचा थोडाफार परिणाम त्यांच्या मनावर झालेलाच होता. त्यानंतर ते या संकुचित व दूषित क्षेत्रातून प्रयत्न करून बाहेर पडले व इतर काही मंडळींच्या संपर्कात आले. त्यामध्ये हरिभाऊ लाड यांचे नाव महत्त्वाचे. मनाने मोठे धैर्यशील असलेले हरिभाऊ लाड आपल्या छोटेखानी दुकानात बाहेरची वृत्तपत्रे घेत असत. त्यामध्ये पुण्यामुंबईची वृत्तपत्रे असत. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांना बाहेरची वृत्तपत्रे वाचण्याची सोय झाली आणि सवयही झाली. पुण्याहून प्रसिद्ध होणारे 'मजूर' हे पत्र आणि मुंबईहून प्रसिद्ध होणारे 'साप्ताहिक श्रद्धानंद' हे वर्तमानपत्र ते वाचू लागले आणि त्यामुळे मनावर अधिक व्यापक स्वरूपाचे संस्कार त्यांच्यावर व्हायला सुरुवात झाली आणि या वाचनातून त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी शिवछत्रपती मंडळ सुरू केले. त्याच वेळी त्यांचे मित्र शिवाजी बटाणे यांच्या मंदिरामध्ये दरवर्षी गणेशोत्सव साजरा होत असे. त्या उत्सवासाठी एक मेळा काढण्याची कल्पना यशवंतराव चव्हाण आणि त्यांच्या मित्रांनी ठरवली आणि त्या मेळ्यामध्ये यशवंतराव चव्हाण स्वतः वर्ष, दोन वर्षे तरी गाणी गात फिरत होते. या मेळ्यासाठी काही पदेही यशवंतराव चव्हाण यांनी स्वतः तयार केली होती. यावरून आपणांस हे स्पष्ट दिसते, की यशवंतराव चव्हाण यांची जडणघडण लहानपणापासूनच वाचनसंस्कृतीमुळे घडली आहे.

ग्रंथमहोत्सवामध्ये आपण यासाठीच यशवंतराव चव्हाण व्यासपीठावरून मुलांची नवीन पिढी वाचनसंस्कृतीच्या माध्यमातून गेली २५ वर्षे घडवित आहोत. यशवंतराव चव्हाण यांना शाळेमध्ये शेणोलीकर म्हणून एक शिक्षक होते. अत्यंत वक्तशीर, व्यवस्थित आणि टापटिपीने काम करणारे शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांचे चालणे बोलणेसुद्धा अगदी खास शैलीदार होते. त्यांना खरा शौक होता शिकवण्याचा आणि क्रिकेटचा. त्यांनी यशवंतराव चव्हाण यांना क्रिकेटमध्ये गुंतवण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु चव्हाण साहेबांना क्रिकेटपेक्षा सामाजिक कार्याची आवड असल्याने शेणोलीकरांनी त्यांचा नाद सोडून दिला. यशवंतराव चव्हाण यांच्या शाळेमध्ये टिळक आणि आगरकर यांच्या संबंधाने निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेत असत. त्यामुळे यशवंतराव चव्हाण हे टिळक आणि आगरकर यांच्यासंबंधी जे मिळेल, ते वाचायचा प्रयत्न करीत असत. त्यामुळे त्यांना वक्तृत्वाची हौस निर्माण झाली आणि ते वक्तृत्व-निबंध स्पर्धेत भाग घेऊ लागले. त्यांनी लोकमान्य टिळक यांच्यावर लिहिलेल्या त्यांच्या एका निबंधाला पहिले

यशवंत दिनकर पेंढारकर ऊर्फ कवी यशवंत यांचा जन्म ९ मार्च १८९९ रोजी सातारा जिल्ह्यातील तारळे गावात झाला. यशवंत दिनकर पेंढारकर हे नामवंत मराठी कवी होते. बडोद्यात १९४० साली त्यांना 'राजकवी' किताबाने सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी काव्यवाचन या प्रकाराला प्रसिद्धी मिळवून दिली. पेंढारकरांनी प्रणयरम्य, सामाजिक, राष्ट्रीयत्वविषयक अनेक कविता केल्या. त्यांनी लहान मुलांसाठीही काव्य केले.

नोंद

बक्षीस मिळाले होते. त्यामुळे त्यांची लिहिण्याची सवयही वाढत गेली.

वाचनसंस्कृती

भारत देश आधुनिक, विज्ञाननिष्ठ व लोकशाहीवादी असा झाला पाहिजे! मात्र ते काही अचानक वा एका रात्रीत किंवा चमत्कार घडावा तसे किंवा तंत्रज्ञानाच्या क्रांतीसारखे काम नाही. ती अखंड प्रक्रिया आहे. क्रमाक्रमाने विकसित होत जाणारी! त्यासाठी सातत्यपूर्ण व सजग प्रयत्न व्हायला हवेत. यासाठी वाचनसंस्कृती हा महत्त्वाचा घटक असून, त्यासाठी गेली २५ वर्षे वाचनसंस्कृतीचा जागर हा ग्रंथमहोत्सव आणि मराठी साहित्य संमेलन आम्ही यशवंतराव चव्हाण व्यासपीठावरून करीत आहोत. चिंतन करण्यासाठी मनन आणि वाचन हे घटक महत्त्वाचे आहेत. हे वाचनातूनच घडते. नवनवीन संकल्पना वाचनामुळेच निर्माण होतात. आज पर्यावरण हे औद्योगिकीकरणापेक्षाही महत्त्वाचे झाले आहे. पर्यावरणावर आपले जीवन अवलंबून आहे. पुढच्या पिढीसाठी आपण पर्यावरणाची काळजी घेणे संवेदनशील मनासाठी आवश्यक आहे. ग्रंथमहोत्सवाचा मूळ घटक हा विद्यार्थी आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून होणारा हा ग्रंथमहोत्सव महाराष्ट्राला दिशादर्शक ठरलेला आहे. सातारचा हा मानदंड आहे. गेल्या १० वर्षांपासून इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी 'मी वाचलेले पुस्तक' आणि 'कथाकथन' या स्पर्धांत भाग घेत असून, निर्मला कॉन्व्हेंट स्कूल, मेरी एंजेल्स स्कूल, रयत इंग्लिश मिडीयम स्कूल आणि इतर शाळेतील विद्यार्थीही स्पर्धेत अव्वल येऊन मुख्य मंडपात यशवंतराव चव्हाण व्यासपीठावरून आपले म्हणणे आणि कथाकथन सादर करीत आहेत, ही भूषणावह गोष्ट आहे. ग्रंथमहोत्सवात स्पर्धेतून, वाचनातून विद्यार्थी घडतोय, पालक आनंदी होतोय, शिक्षकांना नवनवीन पुस्तके उपलब्ध होतात. चार दिवस हा ग्रंथमहोत्सव बरेच काही सर्वांना देऊन जातोय. संयोजन समिती वेगवेगळ्या अनुभवांतून आणि ऐकण्यातून समृद्ध होतेय. ही ग्रंथमहोत्सवाची पर्वणी आहे. ती कोणीही चुकवू नये हाच उद्देश आहे. ग्रंथमहोत्सव हा सातारा शहराचे वैभव आहे. सातारा शहरात होणाऱ्या या ग्रंथमहोत्सवातील हे विचार-वैभव पुढच्या पिढीसाठी निश्चित मार्गदर्शक ठरणारे आहे. विचार आणि ग्रंथ समाजासाठी सहज उपलब्ध करून देणे, हेच ग्रंथमहोत्सवाचे ध्येय आहे.

(लेखक सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव समितीचे कार्यवाह आहेत.)





ॲड. सीमंतिनी नूलकर
मो.: ९८२२३२३८४७

कंदी रंगी सातारा

सातारा जिल्ह्याची ओळख विविध प्रकारे करून दिली जाते. ऐतिहासिक साताऱ्यात इतर अनेकविध पैलू दडले आहेत. निसर्गसंपदेने समृद्ध असलेला सातारा आपल्या आगळ्यावेगळ्या खाद्य-संस्कृतीसाठीही प्रसिद्ध आहे. या संस्कृतीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. या खाद्यजीवनाचा परिचय करून देणारा लेख.

सातारा जिल्ह्याची टॅगलाइन आहे. 'something for everyone.' रांगड्या गड- किल्ल्यांची, अफाट निसर्गसंपदा असलेली, छत्रपतींची राजधानी सातारा. सब कुछ दिलसे लुटानेवाली...from the HEART सातारा जिल्हा, हेरिटेज टुरिझम (क), इको टुरिझम(ए), ॲडव्हेंचर टुरिझम (अ), रिलीजियस टुरिझम, ट्रॅडिशनल/सांस्कृतिक टुरिझम (ढ) या आणि याहीपेक्षा वेगळ्या प्रकारच्या पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी, हृदय खोलून स्वागतासाठी उभा आहे. पर्यटनाचे नवीन कल आहेत. त्यापैकी एक म्हणजे Food Tourism. खाद्य पर्यटन, खाद्य-संस्कृती हा लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे

खाद्यसंस्कृती

वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपरंपरा

खाद्यसंस्कृतीची भारताइतकी प्राचीनता, प्रदेश-प्रांतागणिक विविधता अभावानेच आढळते. सातारा जिल्ह्याचीही स्वत:ची अशी एक वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपरंपरा आहे. सातारा आणि खाद्यसंस्कृती याचा एक फार जुना बंध आहे. 'भोजनकुतूहलम' म्हणून एक १७ व्या शतकातला संस्कृत पाकग्रंथ आहे. हा ग्रंथ लिहिणारे रघुनाथ नवहस्त (नवाथे) नावाचे गृहस्थ. राहणार माहुली, तालुका सातारा, जिल्हा सातारा येथील होते. ते समर्थ रामदासांच्या परिवारातले आणि काही काळ चाफळच्या राममंदिरात सेवा करत होते. नंतर ते तंजावरला तिथल्या छत्रपतींच्या पदरी गेले. या ग्रंथात अनेक पाककृतींबरोबरच जिलबीचा उल्लेख 'जलवल्लिका' असा आहे. रसयुक्त आणि वेलीसारखी म्हणून 'जलवल्लिका' जिलबी, 'कंदी पेढा' आणि सातारा जिल्हा यांचं एक अतूट नातं आहे.

प्रत्येक सणाचे एक पक्वान्न असते. होळीची पुरणपोळी, गणेशोत्सवाचे मोदक,

नोंद

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे अनेक वर्षे फलटण येथे वास्तव्य होते. आपल्या ओघवत्या वाणीने, वैशिष्ट्यपूर्ण अशा वक्तृत्वशैलीच्या माध्यमातून प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, श्रीरामकृष्ण परमहंस या व्यक्तिमत्त्वांचे एक निराळेच दर्शन महाराष्ट्राला घडवले होते.

संक्रांतीची गूळपोळी, तसं १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन आणि २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन या राष्ट्रीय सणांना सातारा जिल्ह्याचे पक्वान्न आहे जिलबी. ते अशासाठी, की सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्वकाळात पत्रीसरकार किंवा प्रतिसरकार स्थापन झालेलं होतंच. स्वातंत्र्यानंतर जो जल्लोष झाला तो सातारा जिल्ह्यात पत्रीसरकारमुळे जरा जास्तच. स्वातंत्र्य जल्लोष साजरा करताना तोंड गोड करायला इतकं देखणं, चमकदार, रसरशीत, तिरंग्याचीच आठवण करून देणारं आणि कोणालाही परवडेल, सहज वाटता, खाता येईल अशी जिलबीच! त्यामुळे जिलेबीबाईंनी सातारा जिल्ह्यात बस्तान बसवलं ते बसवलंच.

कंदी पेढ्याची कथा

साताऱ्याच्या कंदी पेढ्याचे व्यसनी खूप आहेत. साताऱ्याच्या पेढ्याला 'कंदी' का म्हणतात याबद्दल अनेक कथा आहेत. ब्रिटिश काळात एका 'अंगरेज अफसर'ला, साताऱ्याच्या आसपासच्या गावातल्या कुणीतरी पेढ्याची करंडी दिली. करंडी म्हणजे ती टोपली का त्यातली वस्तू, ते त्याला कळेना. त्याने मग त्या पदार्थालाच नाव दिलं 'कंदी'. दुसरी कथा आहे ती अशी. भारतात अफाट रुचिवैविध्य आहे. प्रांतागणिक, प्रदेशागणिक. सण-उत्सवागणिकसुद्धा. साधे गोडाधोडाचे पदार्थ, मिठाया, पक्वान्न, मिष्टान्न यांच्या सतराशे साठ चवी, स्वाद, रूपडी, आकार. ते इंग्रजांना कुठले माहीत असणार? त्यांच्या मते बरेच गोड पदार्थ 'कॅन्डी' या ठोस प्रकारात मोडतात. म्हणून साताऱ्याच्या या खास पदार्थालाही ब्रिटिशांनी नाव दिलं 'कॅन्डी'च. त्याचा अपभ्रंश होत तो झाला 'कंदी'. साताऱ्याला 'कंदी' पेढा बनवणारे पिढीजात कलाकार आहेत. इथले हलवाई पेढ्याचा खवा, स्वत:, विशिष्ट पद्धतीने, अगदी सावकाश, निगुतीने खरपूस भाजतात. आजही लोखंडी कढईत, स्वत: हाताने भाजतात. ती विशिष्ट भाजणी म्हणजे कंदी भाजणी. साताऱ्याच्या पेढ्यांचा जो विशिष्ट भाजणीमुळे विशिष्ट रंग येतो तो रंगच 'कंदी' रंग. म्हणून ते कंदी पेढे. मराठी लोकांचे त्यांचे म्हणून वेगळेच देशी अस्सल रंग आहेतच. अंजिरी, गुलबक्षी, नारिंगी वगैरे. तसाच 'कंदी' रंग! अवघ्या साताऱ्याचाच 'कंदी', खमंग रंग. पेढ्यासारखी सुटसुटीत मिठाई नाही. घरात नवीन बाळ जन्माला आल्याचा आनंद साजरा करण्यापासून रिझल्ट, नोकरी, चांगलं पॅकेज मिळाल्याच्या आनंदाची दवंडी देण्यापर्यंत, साखरपुडा-लग्नात, वऱ्हाडी मंडळींना पेढे खिलवून सामूहिक आनंद साजरा करण्यापासून, कुणाकडे जाताना सहज देण्यासाठी पेढेच! पेढ्याचा बॉक्स म्हणजे आनंदाचा, प्रसन्नतेचा, मैत्रभावाचा, शुभेच्छांचा सातारी संदेशच.

भाज्यांची रेलचेल

साताऱ्यात पावसाळी भाज्यांची रेलचेल आणि लज्जतही काही औरच असते. या भागात भारंगीची, पाथरीची भाजी मिळते. भारंगी तर कोणत्याही आम पालेभाजीसारखीच लागते. या भारंगीची फुलं तर मन मोहवून टाकतील अशीच असतात. भारंगीची फुलांची शोभा जशी पाहण्यासारखीच तशीच शेंडवळं! मोहरींदाण्याइतक्या लहानलहान फळांचे घोस असतात. नाजूकसाजूक आणि त्याला एक नाजूक दरवळसुद्धा असतो. एखाद्या पायवाटेवरून, झुडपाजवळून जाताना अचानक तो दरवळ जाणवून जातो. तो पुन्हा अनुभवावा म्हणून पुन्हा पुन्हा तिथंच घुटमळलं, घोसाला नाक नेऊन भिडवलं, तरी येत नाही. हुलकावणी देत राहतो. ही निसर्गाची लहर. त्याची मर्जी. शेंडवळाचे घोस महाबळेश्वरच्या आठवडा बाजारात, आजूबाजूच्या खेड्यांतून बाजारासाठी आलेल्या खेडुतांकडे हमखास असतात.

तळलेला आषाढ

'आषाढ तळणं' ही एक साताऱची विशिष्ट परंपरा आहे. आषाढात घरोघरी गुळाच्या गोडसर कडकण्या केल्या जातात. कापण्या, कानवले यांची तर मजा औरच! थंडी संपतासंपता वावरात झाडाखाली तीन दगडांची चूल मांडून मातीच्या मडक्यात केलेला शेंगसोला हे एक गावरान प्रकरण. कोकणी पोपटी किंवा गुजराती उंधियूचा साताऱी अवतार. मिळेल त्या भाज्या हाताने मोडायच्या, मसाला, भाज्या यांना प्रमाण असं काही नाही. चुलीवर दमाने शिजू द्यायचं. सोबत बाजरीची भाकरी. चव विसरता विसरत नाही. थंडीच्या दिवसात, भाजलेल्या हुरड्याबरोबर हाईहुई करत खायची, कांद्यालसणाची ठेचलेली लालभडक चटणी आणि जोंधळ्यांची पिशी चमच्यासारखी वापरून मडक्यात लावलेलं साईचं घट्टगार दही यांची मजा चाखायलाच हवी. सोबत विस्तवात भाजलेला हावळा आणि विस्तवात भाजलेले बटाटे-रताळी. कधी सगळं बनवताना त्यात सहभागी होणं, एखादा

नोंद

सातारा अनेक महान सुपुत्रांची जन्मभूमी आहे. ज्येष्ठ लोककलावंत शाहीर साबळे व महाराष्ट्रातील प्रमुख उद्योजक श्री. बी. जी. शिर्के यांचा जन्म जिल्ह्यातील वाई तालुक्यातील पसरणी या गावचा. आपापल्या क्षेत्रात उच्च शिखर गाठल्यानंतरही या दोघांनी आपल्या गावाशी संपर्क ठेवलेला होता.

गावरान पदार्थ शिकून घेणं, त्या लोकांशी एक वेगळीच जवळीक निर्माण करतं. हे फक्त खाद्यपदार्थांची चव घेणं नसतं, तर साताऱ्याची, तिथल्या संस्कृतीची चव घेणं, स्वाद घेणं असतं.

यात्रेतील जेवण

पौष संपला, की सातारा जिल्ह्याला यात्रांचे वेध लागतात. यात्रेच्या पहिल्या दिवशीचं जेवण असतं पोळीचं आणि दुसऱ्या दिवशीचं नळीचं! पोळी म्हणजे पुरणाची पोळी आणि त्यासोबत गुळवणीही हवीच. कोणत्याही सणाला सातारा जिल्ह्यात पुरणाची पोळी, कटाची आमटी आणि गुळवणी असा मेनू असतोच. नळीचे जेवण हे कुठल्याही यात्रेचे वैशिष्ट्य आहे. मटणाचा तर्रीदार पातळ, तिखटतिखट रस्सा, मटणाचं सुक्कं, भाकरी आणि बुक्कीनं फोडलेला कांदा पितळीत घेऊन खायचं. यंव रे यंव! मांसाहारी लोकांसाठी सातारी मेजवानी म्हणजे नदीतले, धरणातले, आमळीसारखे चविष्ट मासे, खेकड्या-मटणाचा रस्सा, गावरान कोंबडीचं सुक्कं. साताऱ्याच्या लोकांना सर्दी, ताप, यावर एकच औषध! खेकडा किंवा माशाचा झणझणीत पातळ रस्सा. सहसा मटणच खायचे.. कोंबडी खायची तर गावठीच!

सातारा जिल्ह्याचा ट्रेडमार्क

खाद्यपर्यटन हा सातारा जिल्ह्याचा ट्रेडमार्क होऊ शकतो. प्रचंड latent हीट असलेला चुलीवरचा स्वयंपाक, वटकराचा टेकू लावलेल्या पितळीत जेवणे, लसणीची चुरचुरीत फोडणी घातलेलं गरगटं, उडदाचं घुटं, तेल-चटणी, शाळूची भाकरी, आळणी भात, महाद्या. महाद्या म्हणजे शेंगदाण्याच्या कुटाचं झणझणीत कालवण. फॉर्म आपल्याला हवा तसा करायचा, घट्ट किंवा पातळ. प्रवासात टिकतो म्हणून न्यायला अतिउत्तम. शिजताना चुटचुट आवाज येतो म्हणून त्याला 'चुटचुटं' असंही म्हणतात. त्याहून वाईकडे त्याला जबरदस्त नाव आहे.. 'फुदकनं'. जिल्ह्यात घरोघरी उन्हाळ्यात 'चटणी' म्हणजे वर्षभराचा कांदालसूण मसाला बनवणं हा एक इव्हेंटच असतो. चटणी तयार झाल्यावर सांजच्याला घरादारानं ती ताजी ताजी लालभडक चटणी, त्यावर तेल घेऊन भाकरीसंगं खाल्ल्याबिगर काय खरं नसतंय.

कडधान्ये

सातारा जिल्ह्याचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कातळकड्यांवर, खडकाळ पठारांवर, अगदी कमी पावसाच्या प्रदेशातही उपलब्ध असणाऱ्या नागली-नाचणी, ज्वारी-बाजरी, वरी, तांदूळ इत्यादिंच्या भाकरी-दामट्या-कण्या, हे पूर्वापारपासूनचे अन्न! आणि त्यातही या अन्नाचं महत्त्व म्हणजे, एक वेगळी ऊर्जा, बळ देणारा स्वाद आणि



चव!

हल्लीच्या भाषेत म्हणायचं तर कम्फर्ट फूडच ते! शिवछत्रपतींनी, जरीपटक्याचा धाक, शत्रूवर बसवला होता त्यात या श्रीधान्याचा सिंहाचा वाटा आहे.

सातारा जिल्ह्याची खाद्यसंस्कृती हा अफाट आवाका

महाराष्ट्रातील पहिले पुस्तकाचे गाव पाचगणीजवळील भिलार हे आहे. यातून प्रेरणा घेऊन प्रल्हाद पार्टे यांनी जकातवाडी हे 'कवितेचं गाव' म्हणून नावारूपास आणलं. राज्याच्या कानाकोपऱ्यातील पर्यटक आणि साहित्यरसिक या गावाला आवर्जून भेट देतात. कवितांविषयी माहिती देणारे असे गाव अन्यत्र कोठेही नाही.

नोंद

असलेला विषय आहे. त्याला भौगोलिक संदर्भ आहेत, सामाजिक संदर्भ आहेत, धार्मिक-सांस्कृतिक संदर्भही आहेत.

लग्नकार्य ठरली, की शेवयांचे वेल काढायचे. पाच सांडग्यांना हळदीकुंकू वाहायचं. गव्हले, नखुले करायचे. तळणात कुरडईचा मान पहिला, तर रुखवतात रंगीबेरंगी कुरड्या-पापड्यांचा. पापड-कुरड्या, सालपापड्या, भातुड्या, खारोड्या, चिकवड्या, सांडगे, ताकात भिजवलेल्या मिरच्या, तिखटासाठी वाळत घातलेल्या लाल मिरच्या, खिम्याच्या बोट्या ही सर्वसामान्य वाळवणं झाली. खेडोपाड्यात अजूनही काही वेगळे प्रकार आहेत; पण हळूहळू विस्मृतीच्या गर्तेत चालले आहे. सातारा भागात कोवळ्या गवारीच्या शेंगा, डिंगऱ्या (मुळ्याच्या शेंगा), वांग्याचे तुकडे वाफवून, खारवून वाळवतात. गवारी-डिंगऱ्यांना धने-जिरेपूड, मीठ घातलेल्या ताकात भिजवून वाळवतात. पुन्हा भिजवायचे पुन्हा वाळवायचे. अशी दोन, तीन तरी पुटं चढली पाहिजेत. या गवारीच्या शेंगा, डिंगऱ्या एकदम 'कॅडॅक' लागतात. स्नॅक्स म्हणून चलती आहे त्यांची. तसं तर कारल्याच्या, पडवळाच्या, भेंडीच्या काचऱ्याही हिंग मीठ लावून वाळवून ठेवतात. कारल्याच्या काचऱ्यांचा कडवटपणा कमी करण्यासाठी थोडी उस्तवार जास्त करावी लागते इतकंच. कुरकुरे, फ्रायम्सला काहीच मजा नसते. हरभऱ्याचा कोवळा पालाही वर्षभराची बेगमी म्हणून वाळवून साठवतात. हा पाला फक्त थंडीत मिळतो. वर्षभरात कधी लहर आली, तर काय करायचं? तेव्हा हा उपयोगी पडतो. लसणीच्या चरचरीत फोडणीचं गरगटं करायला.

हरभऱ्याची आंब धरून वाळवणं हा एक गावाकडचा इरसाल प्रकार आहे. पूर्वी विनेगर वगैरे कुठे असायचं? खेडोपाडी लिंबूही पटकन उपलब्ध नसे. मग थंडीत हरभऱ्याच्या झाडाखाली स्वच्छ पातळ फडके रात्री टाकून ठेवायचं आणि दवथेंबयुक्त आंब म्हणजेच हरभऱ्याच्या पाल्याचा नैसर्गिक आंबटपणा धरून ठेवायचा. ते फडकं वाळवायचं आणि वर्षभरात केव्हाही आंबटासाठी गरज लागली, की त्या फडक्याचा तुकडा पाण्यात भिजवून पिळून ती आंब वापरायची. याच प्रकारे खरवसाचा चीकही वाळवून साठवण्याची पद्धत आहे. स्वच्छ पांढरे धोतर गाई-म्हशीच्या पहिल्या दिवशीच्या जाड चिकात भिजवून, वाळवून घडी करून ठेवून द्यायचं. मनात आलं, की एक तुकडा फाडून दुधात भिजवून चीक करायचा. खरवस तयार. आजकालसारखा खोटा खरवस नको खायला. अडीअडचणीला नुसत्या सांडग्यांची कांदा आणि सातारी कांदा-लसूण मसाला घालून सुकी भाजी किंवा रस भाजी करतात किंवा डाळीत टाकतात किंवा एखादी वांग्यासारखी, दोडका-दुधीसारखी भाजी पुरवठ्याला कमी पडत असेल, तर त्यातही सांडगे 'समरसून' जातात. कुरड्यांची भाजी करतात. थोडा वेळ भिजवून, कांद्यावर परतून कांदा मसाला, कोथिंबीर घालून केलेली भाजी भारीच लागते. सांडग्यासारखंच दुसरं प्रस्थ पापडांचं आणि गावरान आंब्याच्या लोणच्याचं. गावरान पापड ही एक वेगळीच चीज असते. उडीद, मूग वगैरेचे पापड म्हणजे नेहमीचे झाले. सातारा भागाचं म्हणून वैशिष्ट्य आहेच की.

ज्वारीचे पापड, हे त्यापैकीच. ज्वारीचे 'पापड' नव्हेत ते, त्यांना लाडानं 'बिबड्या' म्हणतात. लोणच्याचाही काही तामझाम नसतो; पण चविष्ट साताऱ्यात लग्नात किंवा पूजेचा मेनू म्हणजे गरा, भात, आमटी किंवा मसाल्याचा भात. गरा म्हणजे शिरा आणि मसालेभात म्हणजे वेगळंच रसायन. नेहमीचा टिपिकल मसालेभात नव्हे. खाके तो देखो!

साताऱ्याची खाद्य संस्कृती अनुभवणं म्हणजे तिथल्या प्रत्येक पदार्थाची स्वत:च चव बनून जाणं आणि तृप्ती अनुभवणं. ती चव, मिठास मग अवघ्या आयुष्यात उतरते, स्पर्शात येते, स्मितात येते.

ओशो म्हणतात, "It will slowly engender a taste for the sweetness of inner silence".

अशी चव आंतरिक शांतीला आमंत्रण देते.

(लेखिका पर्यावरण अभ्यासक आणि ज्येष्ठ कायदा सल्लागार आहेत.)

नोंद

सातारा शहरात सातारा ग्रंथ महोत्सव समितीतर्फे २५ वर्षांहून अधिक वर्षे 'ग्रंथ महोत्सवा'चे सातत्याने आयोजन केले जात आहे. एखाद्या छोट्या साहित्य संमेलनाचे स्वरूप असलेल्या या ग्रंथ महोत्सवात ग्रंथांच्या खरेदी विक्रीसोबत इतर अनेक साहित्यिक उपक्रमही राबवले जातात. या ग्रंथ महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळतो.



राजीव मुळ्ये
मो.: ९८८१७३६०६७

सातारांगण

मराठा साम्राज्याची राजधानी असलेल्या साताऱ्यामध्ये विविध कलांचा संगम झालेला पाहायला मिळतो. कलेच्या तारांगणात चमकदार कामगिरी करणारे अनेक तारे साताऱ्याने दिले आहेत. सातत्याने लक्षणीय कामगिरी करून हे तारे सातारच्या मातीचा नावलौकिक वाढवत आहेत.

सांस्कृतिक

'आज रात्रौ ठीक साडेनऊ वाजता शाहू कलामंदिराच्या भव्य रंगमंचावर...' असं ओरडत फिरणाऱ्या रिक्षामागे हँडबिलासाठी धावणारं पोर आज त्याच रंगमंचावर उभं राहून काही आठवू पाहत आहे.

'तिकीटविक्री अप्पासाहेब निगडीकर यांचे चहाचे दुकानी सुरू आहे,' हे ऐकून तांदूळ आळीतून आणलेली तिकिटे त्याला आठवतात. खुर्ची दहा रुपये, जमीन पाच रुपये. ना खुर्चीवाल्यांना गर्व; ना जमीनवाल्यांना न्यूनगंड. लक्ष्य एकच. नाटक बघायचं. घरून नेलेली सतरंजी जाडसर वाळूवर अंथरून. खुलं नाट्यगृह आता बंदिस्त झालं; पण कंपन्यांचे दौरे कमी झाले. महानगरी फ्लॅट सीनमध्ये 'आपलं घर' अभावानेच दिसतं; पण विठ्ठल मंदिरापासून पाऊल शाहू कलामंदिराकडे वळतंच.

सांस्कृतिक नांगरट

याच रसिकतेने साताऱ्याच्या जमिनीची सांस्कृतिक नांगरट केली. औंधच्या स्वामी शिवानंद प्रतिष्ठानने १९४० मध्ये सुरू केलेल्या ग्रामीण भागातील एकमेव संगीत महोत्सवाने तानपुरा जुळवून दिला. शेतीभातीत रमलेले इथले शाहीर महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय चळवळींमधील बिनीचे शिलेदार ठरले. रंजनातून लोकशिक्षणाची मोठी परंपरा उभी राहिली. नाटककारांपासून निर्मात्यांपर्यंत आणि अभिनेत्यांपासून संगीत- नृत्यातील तज्ज्ञांपर्यंत कलावंतांची फौज उभी राहिली. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी संगीत रंगभूमीवर थेट नायिकेच्याच भूमिकेत उभे राहिल्यामुळं 'छोटा गंधर्व' म्हणून नावारूपाला आलेले सौदागर गोरे हे कोरेगाव तालुक्यातील भाडळे गावचे. पुढं ग्वाल्हेर आणि जयपूर घराण्याच्या संगीताची साधना करून त्यांनी शास्त्रीय संगीताच्या मैफली रंगवल्या. साताऱ्यात शास्त्रीय संगीताची बैठक पक्की करणाऱ्यांमध्ये पंडित प्रभाकरपंत जोशी यांचा वाटा मोलाचा.

केवळ ब्रिटिशांना घालवणे एवढेच सातारच्या प्रतिसरकारचे उद्दिष्ट नव्हते, तर आदर्श ग्रामराज्य कसे असावे याचा तो वस्तुपाठ होता. छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या समन्यायी स्वराज्याची ती लहान प्रदेशात साकारलेली प्रतिकृती होती. ती सातारा जिल्ह्याची क्रांती भूमी होती.

नोंद

मूळचे सिद्धेश्वर कुरोलीचे रहिवासी असलेल्या पंतांनी पंडित जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांच्याकडे साधना केली आणि दत्तात्रय डोईफोडे, संजय दीक्षित, राजेंद्र आफळे, अमित द्रविड यांसारख्या शिष्योत्तमांची परंपरा निर्माण केली. यापैकी संजय दीक्षित यांनी पुढे जयपूर घराण्याचे पंडित मधुसूदन कानिटकर, भास्करबुवा शाळीग्राम, डॉ. सुचेता बीडकर यांचंही मार्गदर्शन घेतलं. जयपूर घराण्याच्या विदुषी धोंडूताई कुलकर्णी यांच्याकडे सुमारे दहा वर्षे गुरुकुल पद्धतीने शिक्षण घेतलेले संजय दीक्षित हे अप्रचलित रागांवरील प्रभुत्व आणि रागांच्या बंदिशींचा अफाट संग्रह यांसाठी प्रसिद्ध आहेत. दत्तात्रय डोईफोडे हे रागमांडणी, सरगमवरील प्रभुत्व आणि संगीत रचनाकार म्हणून ओळखले जातात.

भेंडीबाजार घराण्याचे पंडित त्र्यंबकराव जानोरीकर यांच्या तालमीत तयार झालेल्या पल्लेदार आवाजाच्या विदुषी डॉ. साधना जोशी यांनीही साताऱ्यात डॉ. संगीता कोल्हापुरे, उज्ज्वला नानल, प्रज्ञा लाटकर अशी शिष्यपरंपरा निर्माण केली. डॉ. कोल्हापुरे यांनी गांधर्व महाविद्यालयाची 'गायनाचार्य' उपाधी पटकावली. त्यांचे नातू यश कोल्हापुरे हेही गांधर्व महाविद्यालयातून पीएच. डी. करत असून, साताऱ्यात गुरुकुल उभारण्यासाठी प्रयत्नशील आहेत.



तबलजींचीही मोठी परंपरा

गायकांप्रमाणेच तबलजींचीही साताऱ्याला मोठी परंपरा. पंडित रमाकांत देवळेकर हे या परंपरेतील अग्रणी. त्र्यंबकराव उमराणी, हैदराबादचे उस्ताद शेख दाऊद खाँ यांच्याकडे गंडाबंद शिक्षण घेतल्यानंतर पंडित लालजी गोखले, पंडित गजाननराव जोशी, बसवण्णा भेंडिगिरी यांचंही मार्गदर्शन त्यांनी घेतलं. पंडित भीमसेन जोशी यांना साथसंगत करण्यासाठी पंडित देवळेकर परदेश दौऱ्यावर गेले होते. गोविंद जोशी, धनंजय पेंढारकर, विश्वनाथ पुरोहित, राजेंद्र आफळे असे त्यांनी घडवलेले अनेक शिष्योत्तम त्यांची परंपरा पुढे चालवतायत. तबलावादनात नव्या पिढीतील एक आश्वासक नाव म्हणजे संगीत विशारद परीक्षेत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक मिळवणारे अमेय देशपांडे. रामदास पळसुले आणि सुधीर पाध्ये यांच्याकडे तालाचे धडे घेणाऱ्या अमेय यांनी ऑल इंडिया रेडिओचा राष्ट्रीय प्रथम पुरस्कार, एनसीपीए आणि वंदे मातरम फोरमचा प्रॉमिसिंग आर्टिस्ट ऑफ दि इयर पुरस्कार लागोपाठ दोन वर्षं पटकावला. पंडित सुरेश तळवलकर यांचे शिष्य केतन पवार हे 'सुखन' मधील अप्रतिम तबलावादनामुळं जसे प्रसिद्ध आहेत, तसेच अनेक चित्रपटांमधून केलेल्या उत्कृष्ट भूमिकांमुळंही सर्वपरिचित आहेत.

सातारची रंगभूमी

समृद्ध संगीत परंपरेबरोबरच साताऱ्याची रंगभूमी हा तर अथांग सागर. ज्यांच्या लेखणीने अश्रूंची फुलं केली, ते वसंत कानेटकर रहिमतपूरचे. कवी गिरीश यांचे ते सुपुत्र. ४३ नाट्यसंहितांची समृद्ध रंगसंपदा त्यांनी महाराष्ट्राला दिली. 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यू', 'जिथे गवतास भाले फुटतात' या त्यांच्या ऐतिहासिक नाटकांनी मराठी रंगभूमी दणाणून सोडली. 'लेकुरे उदंड झाली', 'रंग उमलत्या मनाचे', प्रेमाच्या गावा जावे', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'छूमंतर' या नाटकांनीही प्रदीर्घकाळ रसिकमनाचा ताबा घेतला. त्यांच्या अनेक नाटकांचे हिंदी, गुजराती आणि कन्नडमध्ये अनुवाद झाले. हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनावरील 'कस्तुरीमृग', बाबा आमटे यांच्या जीवनावर 'वादळ माणसाळतंय', महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनावरील 'हिमालयाची सावली' ही त्यांची जीवननाट्ये रसिकमान्य ठरली. दुसरीकडे, नवाक्षरी नाटकांची परंपरा निर्माण करणारे बाळ कोल्हटकर यांनी रंगभूमीच्या चरणी वाहिलेली

नोंद

स्व. यशवंतराव चव्हाण अनेक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांला रसिक साहित्यिक म्हणून उपस्थित राहिले होते. अनेक साहित्यिक, नाटककार, कलाकार यांच्याशी त्यांचे मैत्र होते. त्यांनी १७ ग्रंथ लिहिले आहेत. अनेक ग्रंथांना त्यांनी प्रस्तावना दिल्या आहेत. त्यांची भाषणे म्हणजे अमूल्य विचारांच्या तुषारांचा अमृतसंगम अशी असत. साहित्य संमेलनांना राजाश्रय (शासनाचा) त्यांनीच सुरू केला.

'दुर्वांची जुडी' महाराष्ट्राची मर्मबंधातली ठेव ठरली. सिकंदर आणि पोरस यांचा संघर्ष उलगडणारं 'सीमेवरून परत जा', वसिष्ठ-विश्वामित्र यांच्यातील खटकेबाज संवाद असणारं 'उघडले स्वर्गाचे दार' याबरोबरच 'वेगळं व्हायचंय मला', 'दुरितांचे तिमिर जावो', 'देव दीनाघरी धावला', 'मुंबईची माणसं' या कोल्हटकरी नाटकांचे शेकडो प्रयोग म्हणजे मराठी रंगभूमीवरील सुवर्णपानच. आधुनिक काळात सातारा, वाई, कराडमधील असंख्य नाट्यसंस्थांनी हा वारसा समर्थपणे पुढे नेला. अभिनव कलामंदिर, नाट्यासक्त, लोकरंगमंच, अद्वैत रंगभूमी, प्रतीक थिएटर्स अशा संस्थांनी लक्षवेधी नाट्यनिर्मिती केली. निमशहरी आणि ग्रामीण जाणिवा मंचावर आणल्या. रंगसेवेची पन्नाशी पूर्ण करणारे ज्येष्ठ रंगकर्मी तुषार भद्रे यांनी केलेलं वेगळ्या वाटेवरचं नाट्यलेखन राज्यभरात चर्चेचा विषय ठरलं. आज अमित देशमुख यांच्यासारखे लेखक-दिग्दर्शक जाज्वल्य इतिहासाचा पट मंचावर उलगडत आहेत, तर नितीन पवार, विक्रम बल्लाळ यांच्यासारख्या समर्पित रंगकर्मींनी ग्रामीण भागात नाट्यनिर्मिती चिकाटीनं सुरू ठेवली आहे. सयाजी शिंदे, सचिन मोटे, नितीन दीक्षित यांच्यासह असंख्य कलावंत व्यावसायिक नाटकांत आणि छोट्या-मोठ्या पडद्यावर सातारचा दबदबा वाढवतायत.

अस्सल मातीतली शाहिरी

साताऱ्याच्या सांस्कृतिक मंदिरावरचा कळस म्हणजे इथली अस्सल मातीतली शाहिरी. आजच्या भाषेत सांगायचं, तर शाहिरी कलेला 'स्टारडम' देण्याची किमया पसरणीचे शाहीर कृष्णराव साबळे यांनी अनेक वर्षांपूर्वी करून दाखवली. राजा बढे यांनी लिहिलेलं आणि श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केलेलं महाराष्ट्र राज्याभिमान गीत शाहिरांच्या पहाडी आवाजामुळे मराठी माणसाच्या गळ्यातील ताईत बनलं. महाराष्ट्राची लोकधारा त्यांनी शहरी रसिकांच्याही मनात रुजवली. पसरणीच्या भैरवनाथ मंदिरात दलितांना प्रवेश देण्याकामी पुढाकार घेतला. साने गुरुजी, सेनापती बापट, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील प्रवेशासाठी साने गुरुजींनी केलेल्या उपोषणाला पाठिंबा देताना शाहीर साबळे यांच्या कलापथकानं दौरे केले. 'चलेजाव आंदोलना' पासून संयुक्त महाराष्ट्र आणि गोवा मुक्तिसंग्रामापर्यंत सर्वत्र शाहिरांचा डफ कडाडला. महाराष्ट्रभूषण शाहीर पुंडलिक फरांदे हे प्रखर देशभक्त. सत्यशोधक समाजाचे वर्ग चालवणाऱ्या या शाहिराने परिवर्तनवादी विचारांची पेरणी करण्यासाठी उभा महाराष्ट्र पालथा घातला. भटक्या समाजाच्या विकासासाठी तसेच अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, अघोरी प्रथांचं निर्मूलन यासाठी जिवाचं रान केलं. पन्नास वर्षांहून अधिक काळ त्यांची मनोरंजनातून प्रबोधनाची शाहिरी यात्रा कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न धरता सुरू होती.

'काठी न् घोंगडं' 'माझी मैना गं तुझी हौस पुरवीन' अशी एकाहून एक अफलातून लोकगीतं महाराष्ट्राला देणारे शाहीर निवृत्ती पवार चिंचणेर गावचे. वयाच्या आठव्या वर्षापासून ते पोवाडे सादर करू लागले. क्रांतिसिंहांच्या सभेत ते गात असत. सोळाव्या वर्षी त्यांनी गायिलेल्या अभंगाचं कौतुक प्रत्यक्ष महात्मा गांधींनी केलं होतं. ग्रामीण आणि शहरी संस्कृतीच्या उंबरठ्यावर असलेल्या साताऱ्यात आजही अनेकांनी शाहिरीची ही परंपरा कायम राखली आहे. भानुदास गायकवाड, थळेंद्रकुमार लोखंडे यांच्यासारख्या शाहिरांसोबत थेट काम करण्याचा अनुभव घेता आला, हे आमच्या पिढीतील रंगकर्मींचं भाग्य. साताऱ्याच्या सांस्कृतिक वारशाची उजळणी करावी तेवढी कमीच आहे. सर्व नावं, संस्था, प्रयोग आणि घटनांचा उल्लेख अशक्य. संबंधितांची क्षमायाचना करतो. असंख्य ज्ञात-अज्ञात कलावंत ही मशाल घेऊन धावतायत. साताऱ्याचं सांस्कृतिक क्षितिज प्रकाशमान करत आहेत.

(लेखक ज्येष्ठ रंगकर्मी, पत्रकार आहेत.)



कराडच्या आणि सातारा जिल्ह्याच्याही शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीत यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा आहे. सातारा जिल्ह्याचे सुपुत्र असणाऱ्या यशवंतरावांची केंद्रीय मंत्रिपदाची व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची कारकिर्द गाजली, यशस्वी ठरली. ज्यांच्याकडे सांस्कृतिक जाण होती, विकासात्मक दूरदृष्टी होती अशा यशवंतराव चव्हाण यांची समाधी प्रीतिसंगमावर आहे.

नोंद



श्रीकांत कान्हे
मो.: ८३८००७८७७३

पर्यावरणसमृद्ध भूमी

मराठी साहित्यामध्येही सातारच्या वैभवशाली पर्यावरणाचे उल्लेख अनेक साहित्यकृतींमधून शब्दबद्ध झाले आहेत. यापुढे हेच साहित्य इथल्या पर्यावरण समृद्धीसाठी प्रेरक शब्दांची पेरणी करत राहील. यात शंका नाही.

पर्यावरण

जगासमोर आज हवामान बदलाचे संकट आ वासून उभे आहे. जगाच्या विविध भागात कधी दुष्काळाला, तर कधी अतिवृष्टीला तोंड द्यावे लागत आहे. वेळी अवेळी पडणारा पाऊस शेतीचे चक्र बिघडवत आहे. कधी वादळ, कधी भूकंप अपरिमित हानी करत आहे. निसर्गाचे चक्र अनियमित होऊ लागले आहे. मानवाच्या पुढील पिढ्यांपुढे जगण्याचे प्रश्नही वेगळेच असण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागतिक पातळीवर त्याबाबतच्या उपाययोजना करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न आणि प्रयोग सुरू आहेत. या संकटाशी सामना करण्यासाठी सर्व ते प्रयत्न होतील. मात्र, या संकटावर मात करून मानवी जीवन सुखद करण्याचा एकमेव मार्ग आहे तो म्हणजे पर्यावरणाचे संतुलन राखणे.

नैसर्गिकरीत्या पर्यावरणसमृद्ध असलेल्या सातारा जिल्ह्यानेही अशा संकटांचा सामना केला आहे. कदाचित यापुढेही तो करावा लागणार आहे. संकटातून तरून जाताना आपल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न सातारा जिल्ह्यातही होतो आहे, ही आशादायक बाब लक्षात घेतली पाहिजे. पर्यावरणसमृद्ध वाटेवरून जाण्याचे स्वप्न साताऱ्याची भूमी नक्कीच दाखवत आहे. तेवढी नैसर्गिक व पर्यावरणाची ताकद या भूमीतून मानवाला मिळेल याची खात्री आहे.

वैविध्यपूर्ण पर्यावरण

सातारा जिल्ह्याचे पर्यावरण खूपच सुंदर आणि वैविध्यपूर्ण आहे. जिल्ह्याचे हवामान सामान्यतः थंड आणि आल्हादायक आहे. त्यामुळे पूर्वी म्हणजे अगदी काहीच वर्षांपूर्वी बाराही महिने आल्हाददायक वातावरणाचा अनुभव देणारा हा जिल्हा होता. आजही काही काळ तसे वातावरण अनुभवता येते आहे. हवामान बदलाच्या काळात हा परिणाम जाणवू लागला आहे.

वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी संगीत रंगभूमीवर थेट नायिकेच्याच भूमिकेत उभे राहिल्यामुळं 'छोटा गंधर्व' म्हणून नावारूपाला आलेले सौदागर गोरे हे कोरेगाव तालुक्यातील भाडळे गावचे. पुढं ग्वाल्हेर आणि जयपूर घराण्याच्या संगीताची साधना करून त्यांनी शास्त्रीय संगीताच्या मैफली रंगवल्या.

सातारा जिल्ह्याची भौगोलिक रचनाही विलक्षण आहे. परस्परविरोधी वैशिष्ट्यांनी आपापली ताकद जपणारा हा जिल्हा आहे. पश्चिमेकडील मुसळधार पावसाचा परिसर आणि पूर्वेकडे वर्षातून कधीतरी एखाद-दोन वेळा हजेरी लावणाऱ्या पावसाचा दुष्काळी भाग. अशा दोन टोकाचे चित्र एकाच जिल्ह्यात पाहावयास मिळते. डोंगर, टेकड्या आणि दऱ्यांनी बनलेला हा प्रदेश. पश्चिमेकडे सह्याद्री आणि त्यांच्या शाखांनी सजलेले अजस्र डोंगर. आणि जिल्ह्याच्या मध्यापासून पूर्वेकडे शंभू महादेव डोंगररांगा. अशा दोन डोंगररांगांमधून जिल्ह्याचे पर्यावरण आपापल्या पद्धतीने विकसित आणि समृद्ध होत गेले आहे. सह्याद्रीच्या डोंगरातून वाहणाऱ्या नद्यानाल्यांनी परिसर नैसर्गिक समृद्ध केला आहे. हिरव्या सौंदर्याने डोळ्यात भरून ठेवावा असा जपला आहे.

सह्याद्रीच्या डोंगररांगा

सातारा जिल्ह्याची पश्चिम दिशेची सीमा सह्याद्रीच्या डोंगरांची. सुमारे ९६ किलोमीटर एवढ्या अंतराची पश्चिम सीमा. निसर्गाचं वरदान लाभलेली. सदाहरित जंगलाने समृद्धता लाभलेली. उंच उंच डोंगर, धारदार कडे आणि खोल खोल दऱ्या. जणू सौंदर्याची देवताच या भागावर प्रसन्न आहे. या भागातील महाबळेश्वर व पाचगणी ही जागतिक पातळीवरील प्रसिद्ध थंड हवेची ठिकाणे, सातारा शहराजवळील कासचे पठार, कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील शिवसागर जलाशयातील बामणोली, तापोळा, मुनावळे ही पर्यटनस्थळे, कोयनानगर अभयारण्याचा अर्थातच सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचा परिसर, ओझर्डे, ठोसेघर, वजराई, सडा वाघापूरचा उलटा धबधबा, एकीव आदी धबधबे ही पर्यावरण समृद्ध ठिकाणे म्हणजे जिल्ह्याची नैसर्गिक संपत्तीच. याच दक्षिणोत्तर पट्ट्यातील डोंगररांगांत प्रतापगड, मकरंदगड, जंगली जयगड, भैरवगड आणि प्रचितगड, वासोटा अशा गडकिल्ल्यांची ऐतिहासिक साद अनेकांना खुणावत राहते. हा सारा परिसर गिर्यारोहकांच्या दृष्टीनेही अतिशय महत्त्वाचा. याच परिसरात आंबेनळी, पार घाट, खिंड, हातलोट घाट, आंबोली घाट, उत्तर तिवरा खिंड, कुंभार्ली घाट, दक्षिण तिवरा खिंड असे पूर्वीपासून उपयोगात येणारे घाटरस्ते. त्यापैकी आंबेनळी आणि कुंभार्ली घाट म्हणजे कोकणात जाणारे मोठे मार्ग आहेत. इतर मार्ग पूर्वी बैलगाडीसाठी उपयोगात आणले जात होते. किंवा त्यांचा उपयोग कोकणात उतरणारी पाऊलवाट म्हणून होत असे.

दक्षिणोत्तर मुख्य रांगेकडून थोडे अलीकडे पूर्वेकडे व आग्नेयेकडे म्हणजे सध्याच्या पुणे-बंगळुरु महामार्गाच्या अलीकडे आलो, की उत्तरेकडून दक्षिण दिशेकडे मकरंदगड, वैराटगड, हातगेगड आर्ले, बामणोली घेरादातेगड आणि भैरवगड कांदूर असे छोटे गड किल्ले किंवा टेकड्या. तेथून पूर्वेकडे सुरू होतो तो शंभू महादेव डोंगररांगांचा प्रदेश. खंबाटकी घाटाच्या पूर्व पश्चिम सीमेवर किंवा महामार्गावरील वेळे गावापासून आग्नेय बाजूकडे पूर्वेकडील दहिवडी शहरापुढे १९ किलोमीटरपर्यंत या डोंगररांगांचा विस्तार झाला आहे. घेरा केळंजा, ताथवडा किंवा संतोषगड, वारुगड, चंदन वंदन, वर्धनगड, महिमानगड, भूषणगड असे छोटे छोटे किल्ले आहेत. दक्षिणेकडे सांगली जिल्ह्यातील कुंडलपर्यंत, ८० किलोमीटरपर्यंत या डोंगररांगा पसरल्या आहेत. मात्र, या रांगांचा विस्तार पश्मिमेकडील डोंगररांगांसारखा सलग आणि खोल दऱ्यांचा नाही. छोट्या टेकड्या, छोटे घाट, बराच सपाट प्रदेश अशा रचनेतून तयार झालेला हा परिसर प्रामुख्याने दुष्काळी भागात मोडतो.

नद्या आणि धरणे

नीरा, कृष्णा, कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, कोयना, वसना, वांगणा, येरळा, माणगंगा अशा नद्यांकाठच्या गावांचे जनजीवन पर्यावरण समृद्ध झालं आहे. त्याशिवाय वेण्णा लेक, धोम बलकवडी, धोम, कण्हेर, उरमोडी, तारळी, कास, कोयना धरण, नेर, राणंद, म्हसवड, मायणी, आंधळी, पिंगळी, येरळवाडी, राजेवाडी असे छोटे मोठे जलाशय जिल्ह्यात आहेत. हे जलसाठे शहरे किवा मोठ्या गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी तसेच सिंचनासाठीही उपयोगी येत आहेत. यापैकी नेर, राणंद, राजेवाडी, मायणी, पिंगळी, कास असे काही साठे स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. काही विशेषतः दुष्काळी भागातील तलाव इंग्रज प्रशासनाने बांधले आहेत. उर्वरित मोठी धरणे स्वातंत्र्यानंतरच्या काळात विकसित करण्यात आली आहेत. जिल्ह्याच्या पश्चिम भागात काही प्रमाणात बॉक्साईटचे साठेही आहेत. दगड प्रामुख्याने बेसाल्ट प्रकारचा आहे.

वृक्षसंपदा

वनसंपदेच्या दृष्टीने सह्याद्रीच्या डोंगररांगांतील

नवाक्षरी नाटकांची परंपरा निर्माण करणारे बाळ कोल्हटकर सातारचे. 'वाहतो ही दुर्वांची जुडी', सिकंदर आणि पोरस यांचा संघर्ष उलगडणारं 'सीमेवरून परत जा', वसिष्ठ-विश्वामित्र यांच्यातील खटकेबाज संवाद असणारं 'उघडले स्वर्गाचे दार' याबरोबरच 'वेगळं व्हायचंय मला', 'दुरितांचे तिमिर जावो', 'देव दीनाघरी धावला', 'मुंबईची माणसं' या कोल्हटकरी नाटकांचे शेकडो प्रयोग झाले.

सदाहरित वने आणि सह्याद्रीच्या पूर्वेकडील कोरडे अर्धहरित वनक्षेत्र हे दोन प्रकार प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजेत. त्याशिवाय कृष्णेच्या पूर्वेकडील म्हणजे प्रामुख्याने दुष्काळी भागात खुरट्या वनस्पतींचे वन क्षेत्र हा तिसरा प्रकारही जिल्ह्यात पाहायला मिळतो. पहिल्या सदाहरित जंगलांमध्ये जांभूळ, अंजन, ऐन, उंबर, किंजळ, हिरडा, फणस, नाना, धावडा, सांग, बांबू यासारखे वृक्ष मोठ्या प्रमाणावर आहेत. दुसऱ्या अर्धहरित वनक्षेत्रात सागवान, किंजळ, हिवरे, शिकेकाई, आपटा, बाभूळ, नीम अशी वृक्षसंपदा मोठ्या प्रमाणावर आहे. तिसऱ्या प्रकारात शमी, हिवरे, हिंगणबेट, बोर, करवंद, खैर, घायपात या प्रकारच्या खुरट्या वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळतात. त्याशिवाय वड, पिंपळ असे वृक्ष बहुतेक भागात आहेतच. एका सर्वेक्षणानुसार पश्चिम भागात वनस्पतींच्या ८४ जाती आणि १६ वनस्पती समूह आढळतात. जिल्ह्याची वनसंपदा खूपच वैविध्यपूर्ण आणि समृद्ध आहे. फळझाडांमध्ये आंबा, फणस, पेरू, डाळिंब, जांभूळ, आणि काजू आणि द्राक्ष मोठ्या प्रमाणात आहेत. हिरडा, बेहडा आणि कडुनिंब यांसारख्या वनौषधी या भागात आढळतात. या वनसंपदेमुळे या पश्चिम भागात मधुमक्षिका पालनाचा उद्योग व्यवसायही मोठ्या प्रमाणावर वाढू लागला आहे. महाबळेश्वर तालुक्यातील मांघर हे गाव 'मधाचे गाव' म्हणून विकसित होऊ लागले आहे.



वन्यप्राण्यांची संख्या व प्रकार

विपुल प्रमाणातील वनस्पतींप्रमाणेच सातारा जिल्ह्यातील वन्यप्राण्यांची संख्या व प्रकारही लक्षणीय आहेत. पूर्वी वाघ, बिबट्यांची संख्या खूपच होती. आता सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामुळे वाघांची संख्या सुरक्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शासनाने १९८७ मध्ये कोयना अभयारण्य घोषित केले. त्यामुळे पश्चिमेकडील जंगलांमध्ये वाघ, बिबट्या, अस्वल, सांबर, चितळ, भेकर, गवे, हरण असे प्राणी आढळतात. पूर्वेकडील डोंगराळ भागात तरस, कोल्हे, खोकड, लांडगा असे वन्य जीव आढळतात; तर ससा, साळिंदर, रानडुक्कर, रानमांजर, उदमांजर, घोरपड, वानर व माकड हे प्राणी सर्व भागांत दिसतात. सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये घोणस, मण्यार, नाग यांसह विविध प्रकारचे साप, विंचू, सरडे आढळतात. बेडूक आणि टोड हे उभयचर प्राणीही सर्वत्र दिसतात. पक्ष्यांमध्ये मोर, कावळा, चिमण्या, होले, पारवे आणि पोपट सर्रास दिसतात. मायणी पक्षी अभयारण्याची स्थापना १९८७ मध्ये झाली. त्याठिकाणी तसेच नजीकच्या येरळवाडी तलावावर हंगामानुसर रोहित, करकोचा, चमचोचा, निळे बदक आदी वन्यपक्षी पाहण्यासाठी पक्षीप्रेमी येत असतात. जिल्ह्यात वन विभागाकडून वन्यप्राणी संवर्धन आणि संरक्षणासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

पूर्वी वाघांची संख्या मोठी होती. १८७९ ते १८८२ या काळात वन्यप्राण्यांनी २९४ माणसे मारली होती. यापैकी २३ वाघांनी, २८ इतर वन्यप्राण्यांनी मारली, तर २४३ जणांचा मृत्यू सर्पदंशांने झाला होता. वन्यप्राण्यांनी ६६१ गुरे मारली होती. यांपैकी ७८९ वाघ व बिबट्यांनी मारली होती. ७२ इतर वन्यप्राण्यांनी मारली होती. त्या वेळी वन्यप्राण्यांच्या उपद्रवाला आळा घालण्यासाठी सरकारी बक्षीस मिळायचे. ३४ वाघ मारण्यासाठी ७२६ रुपये, ९३ बिबटे मारण्यासाठी ८२७ रुपये आणि १, ६४, ८२६ साप मारण्यासाठी १०२७६ रुपयांचे बक्षीस दिले होते, असा उल्लेख सरकारी गॅझेटमध्ये आहे.

सातारा जिल्हा धबधबा पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. ठोसेघर धबधबा, वजराई भांबवली धबधबा, एकीवचा धबधबा, केळवली धबधबा, ओझर्डे धबधबा, महाबळेश्वरजवळचा लिंगमळा धबधबा तसेच सडावाघापूरचा रिव्हर्स फॉल हे प्रसिद्ध धबधबे आहेत. यातील काही धबधबे तर अलीकडच्या काळातच नावारूपाला आले आहेत.

नैसर्गिक खजिना व धार्मिक पर्यटन स्थळे

सातारा जिल्ह्यात अनेक पर्यटन स्थळे आहेत. अर्थातच पश्चिमेकडील भागात पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे प्रमाण अजूनही चांगले असल्यामुळे विपुल वनसंपदा आहे. सदाहरित जंगलांमुळे पश्चिम भागात निसर्गाचे आविष्कार पाहण्यासाठी अनेक पर्यटनस्थळे आहेत. या पर्यटनस्थळांचा विकास यापूर्वी काही प्रमाणात झाला आहे. सध्या पर्यटन जिल्हा होण्यासाठी विविध प्रकारे प्रकल्प राबविले जात आहेत. ब्रिटिशकाळापासून महाबळेश्वर व पाचगणी ही थंड हवेची दोन ठिकाणे विकसित झाली आहेत. त्या ठिकाणी महाराष्ट्रासह विविध राज्यांतील पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात. कोयनानगर परिसरातही कोयना धरण परिसर, ओझर्डे धबधबा यांसह विविध स्थळे पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. सातारा परिसरात जागतिक वारसास्थळाचा दर्जा असलेले कास पठार, कास तलाव परिसर, ठोसेघर, वजराई, एकीव आदी धबधबे, सज्जनगड व अजिंक्यतारा हे दोन किल्ले, लिंब येथील बारा मोटेची विहीर, देगाव पाटेश्वर, धावडशी व माहुलीतील मंदिरे आदी पर्यटनस्थळी पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. धोम धरण परिसर, धोमचे नृसिंह मंदिर, मेणवलीचा वाडा आणि घाट, मांढरदेव, वाई शहरातील कृष्णाकाठच्या विविध घाटांवरील काशीविश्वेश्वर, महागणपतीसह विविध मंदिरे यामुळे वाई तालुक्यातील पर्यटन वाढत आहे. जावळी तालुक्यातही पर्यटनस्थळांच्या विकासासाठी प्रयत्न होत आहे.

नैसर्गिक पर्यटनाबरोबरच जिल्ह्यात परंपरेने चालत आलेले धार्मिक पर्यटनही मोठ्या प्रमाणावर आहे. विशेषतः पूर्वेकडील तालुक्यांमध्ये धार्मिक पर्यटनाचा विकास होऊ लागला आहे. प्रामुख्याने माण तालुक्यातील म्हसवड, शिखर शिंगणापूर आणि गोंदवले या तीर्थक्षेत्र स्थळी भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर असते. खटाव तालुक्यात औंध, पुसेगाव, मायणी, सिद्धेश्वर कुरोली, नागनाथवाडी, फलटण तालुक्यातील फलटण शहरातील श्रीराम मंदिर, जबरेश्वर मंदिर अशी लोकांची श्रद्धास्थाने आहेत. फलटणला महानुभाव पंथाची काशी असेही म्हटले जाते.

विविध उपक्रम

नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण असलेल्या सातारा जिल्ह्यात पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासाठी आज विविध उपक्रम राबवले जात आहेत. पर्यावरण शिक्षण आणि जनजागृतीसाठी वेगवेगळ्या अभियानांद्वारे नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण केली जात आहे. प्रामुख्याने वृक्षारोपण मोहिमा राबवल्या जात आहेत. अलीकडील काही वर्षांत 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान' किंवा सध्याही केंद्र शासनामार्फत स्वच्छतेसाठी विविध पातळ्यांवर मोहिमा राबविल्या जात आहेत. प्रामुख्याने पाणी, हवा, ध्वनी यांसारख्या प्रदूषणांविरोधात मोहिमा सुरू असतात. त्यात विविध गावांमध्ये पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात. पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबविताना अनेक गावांत 'एक गाव एक गणपती' यांसारख्या संकल्पनाच्या अंमलबजावणीसाठी प्रयोग केले जातात. स्वच्छतेच्या आदर्श प्रकल्पांची पाहणी आणि त्याचे अनुकरण करण्यासाठी अनेक गावे प्रयत्न करतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा जिल्ह्यात पर्यावरणपूरक पर्यटनाचा विकास करण्याची घोषणा केली आहे.

निसर्ग संवर्धन

निसर्ग व पर्यावरण रक्षणासाठी तसेच आपले सातारा शहर निसर्गसंपन्न व हरित करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून जिल्ह्यातील २९३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. प्रशासनाने पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी निर्माल्याचे योग्य संकलन करून पाण्याचे प्रदूषण टाळावे यासाठी उपक्रम राबवला आहे. १४२३ ग्रामपंचायतींमध्ये नैसर्गिक तळी व जुन्या पडक्या विहिरी, तर ४८८ विसर्जन कुंडांची निर्मिती करण्यात आली आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास होण्याच्या काळात पर्यावरण संतुलनासाठी नेमके उपक्रम राबविण्याचे प्रयत्न सातारा जिल्ह्यात सातत्याने सुरू आहेत, ही बाब आशावादी आहे. आल्हादायक वातावरण टिकविण्यासाठी सातारा जिल्हा यापुढेही विधायक वाटचाल करत राहील, असा विश्वास येथील वातावरणातूनच मिळत राहतो.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आणि प्रभातचे निवासी संपादक आहेत.)

२०१५ पासून सातारा जिल्ह्यात कृषी पर्यटनाने भरारी घेतली आहे. ही पर्यटन केंद्रे शहरी जनतेला कृषी संस्कृतीशी आणि ग्रामीण संस्कृतीशी जोडण्याचे काम करत आहेत. याला मोठा प्रतिसाद मिळत असल्यामुळे जिल्ह्यात सुमारे दीडशे कृषी पर्यटन केंद्रे झाली असून, त्यातील बहुतांश जिल्ह्याच्या पश्चिम भागात आहेत.



किशोर बेडकिहाळ
मो.: ९४२३०१२८७१

चळवळी, आंदोलनांचा जिल्हा

सातारा जिल्हातील सामाजिक चळवळी आणि आंदोलने हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. अनेक नवीन चळवळी आणि आंदोलने यांची सुरुवात साताऱ्यात झाली आहे. समाजाला दिशा देणाऱ्या या आंदोलनांचा धावता आढावा घेणारा लेख.

सातारा जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्याचा लढा या जिल्ह्यात जोरदारपणे लढवला गेला. १९४२ च्या 'चलेजाव आंदोलना'त या जिल्ह्याने इतिहास घडवला. नागनाथअण्णा नायकवडी, किसन वीर आदी स्वातंत्र्यसैनिकांनी तुरुंग फोडून स्वातंत्र्यलढा तेवता ठेवला, तर नाना पाटील, चरणकर, पांडू मास्तर, जी. डी. बापू लाड, यशवंतराव चव्हाण, बर्डे गुरुजी आदींनी प्रति सरकार चालवून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. देशभर १९४२ चा उठाव थंड झाला तरी सातारा जिल्ह्यातील लढा १९४६ पर्यंत चालू होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जिल्ह्यात पक्षांचे राजकारण सुरू झाले. शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष आदींनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मोठेच योगदान दिले. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर विविध पक्षांच्या राजकारणाबरोबर इतरही सामाजिक चळवळी सुरू झाल्या. शेकाप, दोन्ही कम्युनिस्ट पक्षांनी महागाई, एसटी भाडेवाढ, रेशन भ्रष्टाचार, पेट्रोल डिझेल भाववाढ, शेतमालाच्या किमती आदी प्रश्नांवर संघर्षात्मक राजकारण केले.

आंदोलने

विद्यार्थी आंदोलन

१९७० च्या दशकात देशभर विद्यार्थी किंवा संघटनांचे पेव फुटले. जगभरच विद्यार्थी युवा आंदोलनातून समाज व्यवस्थेत क्रांतिकारक बदल घडू लागले. भारत, महाराष्ट्र व सातारा जिल्हा यात मागे राहिला नाही. युवक क्रांती दल ही मोठी युवक संघटना डॉक्टर कुमार सप्तर्षींच्या नेतृत्वाखाली उभी राहिली व तिने विद्यार्थी, युवकांचे अनेक प्रश्न हाती घेतले. तसेच भ्रष्टाचाराच्या विरुद्ध लढाईही सुरू केली. आमूलाग्र परिवर्तनाचा त्यांचा अजेंडा होता. सातारा जिल्ह्यात याच सुमारास डॉक्टर नरेंद्र दाभोळकरांच्या नेतृत्वाखाली

नोंद

सन १९३६ मध्ये अण्णासाहेब चिरमुले यांनी युनायटेड वेस्टर्न बँकेची स्थापना सातारा शहरात केली. बँकेचे कामकाज १९३७ मध्ये सुरू झाले. सातारा हे तिचे मुख्यालय होते. १९०७ मध्ये स्थापन झालेल्या पहिल्या सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेचे विलीनीकरण १९६१ साली युनायटेड वेस्टर्न बँकेमध्ये केले. त्याबरोबरच काही लहान बँकांचे विलीनीकरणही झाले.

समाजवादी युवक दल या संघटनेची स्थापना झाली. बबनराव उथळे, कॉम्रेड सी. पी. कुलकर्णी, कॉम्रेड नारायणराव देशपांडे, विलास ढाणे, बाळासाहेब थोरात, जगदीश कासट, प्रमोद कोपर्डे, किशोर बेडकिहाळ, लक्ष्मण माने, पार्थ पोळके, विजय मांडके, दिनकर शिंदे, अरुण शेलार, दशरथ करवले, धनंजय कासकर आदींनी या संघटनेत योगदान दिले. सामाजिक युवक दल ही बिगर संसदीय संघटना होती.

भ्रष्टाचार विरोधी आंदोलन

१९७३/७४ च्या सुमारास जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली देशव्यापी भ्रष्टाचार विरोधी आंदोलन संपूर्ण क्रांतीचा नारा देत उभे राहिले. समाजवादी युवक दल, स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया, अभाविप, समाजवादी पक्ष, शेकाप, डावे कम्युनिस्ट पक्ष या आंदोलनात सहभागी झाले. समाजवादी युवक दलाने एक गाव एक पाणवठा, एक गाव एक मसणवाट, भाजी मंडई आंदोलन, नगरपालिका भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, हमाल संघटना, रोजगार हमी मजूर संघटना, नगरपालिका शाळा सुधार आंदोलन, महागाईविरोधी आंदोलन, एसटी भाडेवाढ विरोधी आंदोलन, दलित अत्याचार विरोधी आंदोलन, आणीबाणी विरोधी जनजागृती व प्रचार मोहीम, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, जयप्रकाश नारायण यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात कृतिशील सहभाग, सातारा महाड दलित समाजाच्या हक्कासाठी पदयात्रा, दलित हक्क समितीची स्थापना व दलितांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांसाठी व्यापक आंदोलन, त्रिपुटी येथे मानवता सत्याग्रह, दलित शिष्यवृत्ती आंदोलन, गरीब दलित विद्यार्थ्यांसाठी मुक्तांगण, वसतिगृहाची स्थापना अशा विविध क्षेत्रांत काम केले. कार्यकर्त्यांसाठी अभ्यास शिबिरे, चर्चासत्रे, मेळावे, व्याख्याने, दलितांच्या स्थितीसंबंधी पाहणी दौरे, परित्यक्ता महिलांचा मेळावा, तलाक पीडित मुस्लिम महिलांच्या कामात मुस्लिम सत्यशोधक मंडळाला मदत, राष्ट्रसेवा दलाच्या कार्यात मदत हे उपक्रम समाजवादी युवक दलाने राबविले. १९८३ मध्ये ही संघटना समता आंदोलन या संघटनेत विलीन झाली. जवळपास बारा वर्षे समाजवादी युवक दलाने सातारा जिल्ह्यात परिवर्तनाची चळवळ गतिमान ठेवली. त्यातून विद्यार्थी युवकांमधून नवनवीन कार्यकर्ते निर्माण झाले.

धरणग्रस्तांच्या प्रश्नावर चळवळ

डॉक्टर भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली धरणग्रस्तांच्या प्रश्नावर मोठी चळवळ सुरू झाली. कोयना धरण प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, उरमोडी धरण विस्थापितांचे प्रश्न व अन्य प्रकल्पांतील विस्थापितांचे प्रश्न या चळवळीने लावून धरले व बऱ्याचशा प्रश्नांवर तोडगा काढला. दुष्काळविरोधी आंदोलने, समन्यायी पाणी वाटप चळवळ अशा ग्रामीण भागातल्या जिल्ह्यांच्या प्रश्नावर या संघटनेने आवाज उठवला व मागण्या पदरात पाडून घेतल्या. विस्थापितांना त्यांचे मानवी हक्क, न्याय, प्रतिष्ठा, स्वाभिमान या आंदोलनांनी मिळवून दिला. जलसमाधी आंदोलन, ठिय्या आंदोलन, साखळी उपोषण, जल सत्याग्रह आदी माध्यमातून ही आंदोलने झाली. सातारा जिल्ह्यात कोयना, तारळी, महू होतेघर, उरमोडी, वांग मराठवाडी या धरणांचे लाभ विस्थापितांना मिळाले नाहीत. त्यामुळे डॉ. पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर धरणग्रस्तांची आंदोलने झाली व आजही चालू आहेत.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती

सातारा जिल्ह्यातून अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मोठी चळवळ डॉक्टर नरेंद्र दाभोळकरांच्या नेतृत्वाखाली १९८९ ला सुरू झाली. भानामती, जादूटोणा, चमत्कार, जटा निर्मूलन, जात पंचायतीला विरोध अशा मुद्द्यांवर ही समिती कार्यरत आहे. बघता-बघता समितीने महाराष्ट्रव्यापी संघटना निर्माण केली. युवकांचा मोठा प्रतिसाद या आंदोलनाला मिळाला व मिळत आहे. अंधश्रद्धांचे दुकान चालवणाऱ्या अनेक ढोंगी बुवांच्या कृत्याची भांडाफोड अंनिसने केली. चमत्कारांच्या प्रात्यक्षिकाद्वारे त्यातील फोलपणा उघडा पाडला. भूतशोधसारखी थरारक मोहीम समितीने राबवून युवकांच्या, लोकांच्या मनातील भीती घालवण्याचा उपक्रम केला. या उपक्रमाबरोबर समितीने अंधश्रद्धा निर्मूलन कायदा व्हावा यासाठी मोठे आंदोलन केले. दुर्दैवाने डॉक्टर दाभोळकरांच्या हत्येनंतर महाराष्ट्र सरकारने हा कायदा संमत केला. या कायद्यामुळे कार्यकर्त्यांना अंधश्रद्धा विरोधी लढण्यासाठी एक मोठाच आधार प्राप्त झाला. या कायद्याच्या माहितीसाठी, प्रशिक्षणासाठी समितीने मोठ्या हिमतीने मोहिमा राबविल्या. शासकीय यंत्रणा पोलीस यंत्रणांना या कायद्याचे प्रशिक्षणही देण्यात

शेतकऱ्यांपासून सामान्य ग्राहकांपर्यंत, छोट्या व्यावसायिकापासून लघु उद्योजकांपर्यंत आणि विकास सेवा संस्थांपासून सहकारी साखर कारखान्यांपर्यंत आर्थिक पाठबळ देणाऱ्या सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, आर. डी. पाटील, किसन वीर या दूरदृष्टी असलेल्या धुरिणांनी १५ ऑगस्ट १९४९ रोजी केली.

सहभाग नोंदविला. समितीने जवळपास प्रत्येक महाविद्यालयात विवेक वाहिनीची स्थापना करून



प्राध्यापक, विद्यार्थी युवक यांना विवेकवादी जीवनदृष्टी दिली. विज्ञाननिष्ठेचे, बुद्धिनिष्ठेचे महत्त्व समजावून दिले. या संदर्भात अनेक उपक्रमही राबवून विज्ञाननिष्ठा, विज्ञान प्रसार व विवेक दृष्टिकोन यासंदर्भात अंनिसने मोठेच काम केले आहे व आजही चालू आहे.

स्त्रीमुक्ती आंदोलन

स्त्रीमुक्ती आंदोलनाची सुरुवात भारतात १९७५ साली झाली. सातारा जिल्ह्यातही हा विचार लवकरच पोहोचला. ॲड. वर्षा देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली महिला मंडळांचे काम सुरू झाले व ते बघता बघता जिल्हाभर पसरले. परित्यक्ता महिलांचे प्रश्न, विवाहअंतर्गत होणारे अन्याय, बलात्कारित स्त्रियांचे प्रश्न, हुंडाबळी, गर्भलिंग निदान तपासणी अशा अनेक प्रश्नांवर या संघटनेने काम केले. लोकसंख्येतील मुलींचे कमी होणारे प्रमाण, हा या सर्व संघटनांच्या कार्यातील महत्त्वाचा मुद्दा. यासंदर्भात संघटनेने धडक मोहिमा राबवल्या. स्टिंग ऑपरेशनद्वारा गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टर्सना संघटनेने उघडे पाडले. अनेकांवर कारवाई झाली. बरीच बडी प्रस्थे यात अप्रतिष्ठित झाली. या क्षेत्रातील कार्याबद्दल ॲड. वर्षा देशपांडे यांना युनोचा आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे. उभी बाटली आडवी करणे ही मोहीम, त्याद्वारा कायद्याने दारूचे दुकाने बंद करणे, स्त्रियांच्यात जागृती, दारूभट्ट्या उद्ध्वस्त करणे अशा मोहिमाही संघटनेने राबवल्या. दलित महिला विकास मंडळाद्वारे संघटनेने झुणका भाकरी केंद्रासारखे विधायक उपक्रमही राबवले. महिलांचे संघटन व प्रश्न यावर काम करत असताना समाज परिवर्तनाच्या व्यापक चळवळीतही महिला कल्याण केंद्र या संघटनेने महत्त्वाचे योगदान दिले आहे. 'लेक लाडकी अभियान' ही संघटनेची मोहीम आता व्यापक झाली असून शासनासह व्यापक मान्यता मिळाली आहे.

भटक्या विमुक्तांची चळवळ

सातारा जिल्ह्यात भटक्या विमुक्तांची चळवळ ही ज्येष्ठ लेखक 'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. नारायण जावलीकर, मच्छिंद्र जाधव असे अनेक कार्यकर्ते या चळवळीत सहभागी झाले व आहेत. भटक्या विमुक्त जाती-जमातींचा तपशीलवार अभ्यास, त्यांचे प्रश्न समस्या जाणून घेऊन त्यांच्या प्रश्नावर ही संघटना काम करत आहे. विधायक संघर्षात्मक व प्रसंगी राजकारण करूनही चळवळ आता चांगलीच स्थिरावली आहे. भटक्या जाती-जमातींचे शैक्षणिक प्रश्न या संघटनेने आश्रमशाळा, विद्यालय याद्वारे सोडवायचा प्रयत्न केला आहे. आश्रमशाळा वसतिगृह याद्वारे मुलांचे शिक्षण मार्गी लावण्यात

नोंद

सातारा जिल्ह्यातील चाफळ गावी ९ मार्च १८९९ रोजी जन्मलेले यशवंत दिनकर पेंढारकर ऊर्फ कवी यशवंत हे १९५० साली मुंबई येथे भरलेल्या ३३ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. विविध भावनांवर काव्य लिहिणारे यशवंत, हे बडोदा संस्थानचे राजकवी होते. तर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्यांचा, 'महाराष्ट्र कवी' म्हणून गौरव करण्यात आला होता.

संघटनेला यश आले. या जाती जमातींचे आर्थिक प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न या संघटनेद्वारे झाला. एकंदर समाजाचे या समस्यांकडे लक्ष वेधण्यात ही चळवळ यशस्वी झाली. सातारा जिल्हा पोलिसांकडूनही पारध्यांचे प्रश्न, सोडविण्याचा प्रयत्न झाला. मूकबधिर मुलांचे प्रश्न,विशेषत: शैक्षणिक प्रश्न सोडवण्याची चळवळ पार्थ पोळके यांनी उभी केली. या मुलांसाठी एक शाळा ही सातारा शहरात चालवली जाते.

दलित पँथरचा झंझावात साताऱ्यात १९७४ च्या आसपास येऊन पोहोचला होता. दलित पँथर काही काळ साताऱ्यात अस्तित्वातही होती व दलितांच्या प्रश्नावर मोठी आंदोलनेही झाली. आजही दलित समाजाच्या प्रश्नांसाठी अनेक संघटना जिल्ह्यात अस्तित्वात आहेत. त्या संघर्षात्मक मागणीने आपले प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत असतात. यात विशेषत: मागासवर्गीयांवरील अत्याचार, अन्याय, नामांतर चळवळ, गायरान जमिनीचे प्रश्न, घरांचे प्रश्न यांचा समावेश असतो.

कामगार चळवळ

कामगार चळवळही साताऱ्यात आपले अस्तित्व व प्रभाव राखून आहेत. बँक, विमा, सरकारी कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक अशांच्या संघटना आपापल्या विभागात त्यांच्या त्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करत असतात. सिटू व आयटक यांच्या प्रभावाखाली एमआयडीसीतील काही संघटना तसेच अंगणवाडी कर्मचारी, आशा योजनेतील कर्मचारी, वीज कर्मचारी या संघटना कार्यरत आहेत. या तुलनेत व असंघटित कामगारांच्या मात्र फारच थोड्या संघटना कार्यरत आहेत. उदाहरणार्थ अरुण शेळके यांची 'हमाल संघटना'. त्याही फारशा प्रभावशाली झाल्या नाहीत.

शेतकरी चळवळीचा झंजावात साताऱ्यातही पोहोचला आहे. जिल्ह्यातील शेतकरी चळवळ एकसंध नाही. ती गटातटात विभागली आहे. नेत्यांच्या आदेशाप्रमाणे प्रासंगिक आंदोलने होताना दिसतात. एकूणच शेतकरी, कामगार आदी चळवळींचा प्रभाव जिल्ह्यावर जाणवत नाही.

विद्यार्थ्यांच्या क्षेत्रातही एकेकाळी 'छात्रभारती' या संघटनेचा दबदबा जिल्ह्यात होता. आज तो तितका नाही. 'स्टुडंट फेडरेशन', 'अभाविप' या संघटनाही सातारा जिल्ह्यात आहेत. या दोन्ही संघटना विशिष्ट पक्षांना बांधील आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांवर या आवाज उठवतात; पण त्यांचा धोरणात्मक परिणाम फारसा होत नाही.

मुस्लिम समाजातही विधायक सामाजिक कार्यात असणाऱ्या संस्था, संघटना दिसतात. सामान्यतः मुस्लिमांचे शैक्षणिक आर्थिक प्रश्न व अलीकडे निर्माण झालेले सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न अशा संघटना करतात. शाहीनबाग आंदोलन साताऱ्यातही झाले व शांततापूर्ण झाले.

प्रबोधनाची चळवळ

प्रबोधनाची चळवळही साताऱ्यात झाली व सुरू आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अकादमी, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, संबोधी प्रतिष्ठान अशा संस्थाद्वारा प्रबोधनाची चळवळ येथे गतिमान झाली. विचारवेध संमेलन, विद्रोही सांस्कृतिक चळवळीची संमेलने हे जिल्ह्याचे वैशिष्ट्य राहिले आहे.

एकंदरीत सातारा जिल्ह्यात विविध सामाजिक गटांच्या चळवळी आजही अस्तित्व राखून आहेत व त्यांना विविध सामाजिक गटांचा प्रतिसादही मिळत आहे; मात्र या चळवळींचा राजकीय परिणाम काही संघटना वगळता फारच कमी आहे, हेही नोंद करायला हवे.

(लेखक सामाजिक चळवळी आणि आंदोलनांचे अभ्यासक आहेत.)

साताऱ्यातील सर्वांत जुन्या ठिकाणांचा उल्लेख करताना गडकर आळी हे नाव प्रथम घेतले जाते. सातारचा किल्ला (अजिंक्यतारा) ही मराठ्यांची चौथी राजधानी समजली जाते. येथे इ. स. १७५० ते १८०० च्या कालखंडात गडावर देखरेख करणारे गडकरी ज्या ठिकाणी राहत, त्या वस्तीस गडकर आळी या नावाने ओळखले जाते. येथे लोकांच्या दहा ते वीस घरांची जुनी वस्ती आहे.

नोंद



नंदकुमार सावंत
मो.: ९४२२६०४५०९

ऐतिहासिक सातारा

सातारा ही मराठा साम्राज्याची राजधानी म्हणून सर्वपरिचित आहेच, त्याशिवाय या जिल्ह्याला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. राजधानी सातारा हे बिरुद अभिमानाने मिरवणाऱ्या साताऱ्याच्या या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकणारा लेख.

सातारा शहर हे अजिंक्यताऱ्याच्या पायथ्याशी वसलेले गाव आहे. सातारचा इतिहास हा अजिंक्यताऱ्याशी जोडलेला आहे. या किल्ल्याच्या मुलखात इसवीसन पूर्वी २०० वर्षे बौद्धांचा अंमल होता. त्यानंतर इ. स. पूर्व ९० ते ३०० वर्षे आंध्रभृत्य राजाचा अंमल होता. बाराशेपर्यंत चालुक्य राष्ट्रकूट सिंघम शिलाहार यांचा अंमल होता. सातारा तालुक्यातील लिंब, माहुली, सोनगाव येथे पूर्वाश्मयुगीन मानवाचे अस्तित्व दर्शवणारे पुरावे उपलब्ध झाले आहेत.

अजिंक्यतारा किल्ल्यावर सप्तर्षींचे देवालय असल्याने याला सप्तर्षींचा किल्लाही म्हटले जायचे. ११९० मध्ये कोल्हापूरच्या शिलाहार वंशाचा दुसरा भोज राजा याने हा किल्ला बांधला. नंतरच्या काळात यावर आदिलशाह, निजामशाह यांची सत्ता होती याच किल्ल्यावर चांदबिबी कैदेत होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ. स. १६७३ मध्ये हा किल्ला जिंकून स्वराज्यात घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचे वास्तव्य या किल्ल्यात काही काळ म्हणजे जवळपास तीन महिने १६७६ च्या दरम्यान होते. या किल्ल्यावर महाराज आजारी असताना त्यांच्या मृत्यूच्या अफवादेखील पसरल्या होत्या. १६९० मध्ये धनाजी जाधव, संताजी घोरपडे, शंकररावजी नारायण व रामचंद्रपंत अमात्य यांनी घनघोर लढाई करत हा किल्ला मराठेशाहीच्या ताब्यात घेतला. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीकडे प्रयाण करण्यापूर्वी सातारा व परळी यांना भेटी दिल्या. इ. स. १६९८ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी सातारचा किल्ला मराठेशाहीची राजधानी म्हणून घोषित केला.

नोंद

महाराष्ट्रात मराठी वृत्तपत्रांची संख्या वाढत असल्यामुळे तत्कालीन ब्रिटिश सरकारने त्यावर काही निर्बंध लादण्याची घोषणा केली होती. त्याविरुद्धही सातारमधील 'शुभसूचक' या पत्राने जोरदार आवाज उठवला होता. आपल्या अग्रलेखाच्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिश सरकारच्या या धोरणाचा कडक शब्दांत धिक्कार केला होता. सरकारी अधिकाऱ्यांवर वृत्तपत्र टीका करतात हे सरकारला सहन होत नाही, असे शुभसूचकने म्हटले होते.

मोठा संघर्ष

मराठ्यांची ही राजधानी जिंकण्यासाठी स्वतः औरंगजेबाने या किल्ल्यास वेढा घातला. बादशहाने मंगळाई बुरुजाखाली दोन सुरुंग पेरले होते. सर्व तयारी झाल्यावर मुस्लिम सणाच्या निमित्ताने औरंगजेब छावणीतून बाहेर पडला. त्या वेळी किल्ल्याचा किल्लेदार प्रयागजी कणसे काही सैन्य घेऊन बुरुजावर उभा राहिला आणि वरून बादशहाची मिरवणूक बघू लागला. इतक्यात बुरुजावरील सुरुंग उडून बुरुज ढासळून त्यात प्रयागजी गाडला गेला. त्याचे डोके फक्त वर दिसत होते. तेवढ्यात दुसरा सुरुंग उडून प्रयागजी सुखरूप बाहेर पडला. छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर ताराबाईने आपला मुलगा दुसरा शिवाजी यांच्या नावाने कारभार सुरू केला. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर इ. स. १७०७ मध्ये अलीमशाह हा बादशहा झाला व त्याने शाहू महाराजांना कैदेतून सोडविले. त्यानंतर शाहू आणि ताराबाई यांच्यात बराच वाद आणि युद्ध होऊन किल्ल्यावरील जामदार शेख मिरे यास शाहू महाराजांनी आपल्याकडे वळवले व सातारचा किल्ला ताब्यात घेतला. या किल्ल्यावर शाहू महाराजांनी स्वतःला १२ जानेवारी १७०८ रोजी राज्याभिषेक केला. त्यानंतर या गादीस मराठेशाहीची गादी असे म्हणू लागले.

साम्राज्यात रूपांतर

इथूनच शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. नंतर कोल्हापूर व सातारकर यांच्यात वारणेचा तह होऊन दोन्हीच्या सीमा निश्चित झाल्या १७१९ मध्ये छत्रपती शाहूंच्या मातोश्री येसूबाई साहेब यांना बाळाजी विश्वनाथ यांनी दिल्लीच्या कैदेतून सोडवून सातारला आणले. त्या शेवटपर्यंत साताऱ्यात होत्या. जखिणवाडीच्या तहानंतर ताराबाईसाहेब शेवटपर्यंत साताऱ्यात किल्ल्यावर राहिल्या. त्यांची समाधी माहुली येथे आहे. शाहू महाराजांनी साताऱ्यात रंगमहाल बांधला. तख्ताच्या वाड्यातून ते राज्यकारभार करत असत, अदालतवाड्यातून न्यायदानाचे काम चालत असे. यानंतर सर्व पेशव्यांच्या नेमणुका साताऱ्यातूनच होत असत. शाहू महाराजांनी पंतप्रधान-पेशवे यांना पुण्यात राहण्याची परवानगी देऊन साम्राज्यविस्तारास मोकळीक दिली. यानंतर सत्तेचे केंद्र पुण्यात सरकले. तरी राज्याची सर्व सूत्रे साताऱ्यातूनच हलत होती. बाळाजी विश्वनाथ, थोरला बाजीराव पेशवा, माधवराव पेशवे हे छत्रपतींचा यथोचित सन्मान राखत. छत्रपती शाहूंच्या काळात मराठा साम्राज्याचा मोठा विस्तार झाला. शाहू महाराजांनी साताऱ्याला विविध पेठा वसवल्या आणि शहराचा विस्तार केला.

शहर वसवले

शाहू महाराजांनी राजधानी किल्ल्यावरून खाली आणून कारभार सुरू केला. मंत्री, सरदार यांचे वाडे व विविध पेठा त्यांनी वसवल्या. सरदारांच्या नावावरून व्यंकटपुरा, चिमणपुरा, केसरकर पेठ, पंताचा गोट अशी नावे रूढ झाली. त्यांनी दोन वाडे बांधले. रंगमहालात ते राहत असत व तख्ताच्या वाड्यातून राज्यकारभार चालायचा. सध्या रंगमहालाच्या जागी कूपर कारखाना असून तख्ताच्या वाड्याच्या जागी गुरुवार बाग आहे. डोंगरावरील चार भिंतीवरून राजघराण्यातील स्त्रिया दसऱ्याची मिरवणूक पाहत असत. शाहू महाराजांनी विविध देवालये उभारली व अनेक बागा तयार केल्या. औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा निसार हिने कैदेत असताना शाहू महाराजांची योग्य देखभाल केली म्हणून तिच्या स्मृतिप्रीत्यर्थ खातीब मशिदीचे बांधकाम केले.

छत्रपती शाहूंच्या मृत्यूनंतर त्यांना मूलबाळ नसल्याने ताराबाईंचा नातू रामराजा दत्तक घेतल्यावर तो गादीवर आला. सदाशिवराव भाऊंनी त्याला ५६ लाखाची जहागिरी तोडून दिली. ताराराणींना हे पसंत नव्हते. त्यांना स्वतः राज्य चालवायचे होते. ताराबाईंनी रामराजास चंपाषष्ठी निमित्ताने किल्ल्यावर बोलावून कैद केले. ताराबाईंच्या मृत्यूनंतर ते कैदेतून मुक्त झाले. रामराजासदेखील मूल बाळ नव्हते. त्यामुळे विठोजींच्या वंशातील विठोजी भोसले बावीकर यास दत्तक घेऊन त्यांचे नाव शाहू असे ठेवले. त्यांना आबासाहेब असे म्हणत. १७९३ मध्ये अजिंक्यताऱ्यावर त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. तेच थोरले प्रतापसिंह होय. नाना फडणवीसांनी दुसऱ्या शाहूस रावबाजी म्हणजेच दुसरा बाजीराव यांच्याविरुद्ध उठाव करण्यास सांगितले. त्यांनी उठाव केल्यावर दुसऱ्या बाजीरावाने रामभाऊ पटवर्धन यांच्या मदतीने दुसऱ्या शाहूंचा पराभव करून त्यांना अजिंक्यताऱ्यावर कैदेत ठेवले. त्यांचा १८०८ साली तिथेच मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूपश्चात छत्रपती प्रतापसिंह महाराज गादीवर आले.

महान समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर हे सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील टेंभू येथील. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' वृत्तपत्राची उभारणी करण्यासाठी त्यांनी मोठा हातभार लावला होता. नंतर त्यांनी १५ ऑक्टोबर १८८८ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर स्वतःचे 'सुधारक'पत्र सुरू केले. आगरकरांची मते सुधारणावादी असल्याने सुधारकपत्रामध्ये त्यांनी आपल्या अशाच मतांचे प्रदर्शन घडवले.

ते एक प्रजाहितदक्ष राजा होते. त्यांची आई आनंदीबाई यांनी त्यांना कैदेत असताना चांगले शिक्षण दिले. १८२४ मध्ये प्रतापसिंह यांनी जुना राजवाडा उभारला. सध्या तिथे प्रतापसिंह हायस्कूल आहे. प्रतापसिंह महाराजांनी साताऱ्यात अनेक सुधारणा केल्या. पंचपाळी हौद, कमानी हौद, मंगळवार तळे, महादरे तलावाबरोबरच कासवरून खापरी पद्धतीने साताऱ्याला पिण्याचे पाणी आणले. सातारा ते महाबळेश्वर रस्ता तयार केला. अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी प्रतापसिंहांची प्रशंसा केली आहे. मुंबईचा गव्हर्नर पर्ल ऑफ क्लिअर याने ६ ऑक्टोबर १८३३ मध्ये साताऱ्यात छत्रपती प्रतापसिंह महाराजांची भेट घेतल्यावर जो वृत्तान्त लिहून ठेवला आहे, त्यामध्ये 'लोकांस विद्यादान देण्याची मोठी हौस त्यास असून त्यासाठी साताऱ्यात पाठशाळा काढली आहे, त्यात इंग्रजी, पर्शियन, मराठी इत्यादी भाषा शिकवल्या जातात' असे लिहिले आहे. राजा राममोहन रॉय या सुप्रसिद्ध समाजसुधारकाचीही हा राजा मोठी वाखाणणी करतो.

प्रजाहितदक्ष राजा

प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहरात सरळ व आखीव हमरस्ते बांधले. पाठशाळेची इमारत बांधली. १२,००० रुपये खर्च करून एक छापखाना काढून त्यामध्ये अनेक ग्रंथ छापून घेतले. त्यांनी कारागीर, उद्योग व व्यापार यांना मोठे प्रोत्साहन दिले. पूर्वजांच्या लौकिकास साजेसा पराक्रम करून मराठी साम्राज्य राखावे, असा त्यांचा मनसुबा होता. त्यांच्या राज्यात तासगाव सोडून १८८७ मध्ये असलेला सातारा जिल्हा प्रदेशाचा समावेश होता. त्याशिवाय सांगोला, माळशिरस, पंढरपूर उपविभाग, विजापूर जिल्ह्याचा काही भाग होता. जेम्स ग्रँड डफ सातारा जिल्ह्याचा रेसिडेंट असताना १८१८ ला पेशवाई संपल्यावर साताऱ्याला छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी १८३९ पर्यंत कारभार केला. ४ सप्टेंबर १८३९ मध्ये इंग्रजांनी त्यांच्याविरुद्ध कारस्थान करून त्यांच्यावर खोटे आरोप केले. राजांनी मीर अफझल अली याच्यानंतर यशवंतराव शिर्के, भगवंतराव विठ्ठल यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला पाठविले. आरोपमुक्तीच्या बदल्यात इंग्रजांनी घातलेल्या अटी त्यांनी मान्य केल्या नाहीत. त्यामुळे त्यांना पदच्युत केले. तसेच रात्रीच्यावेळी अटक करून दोन महिन्यांसाठी लिंब येथे ठेवले. त्यानंतर त्यांना काशीला पाठविले. रंगो बापूजी गुप्ते यांनी इंग्लंडला जाऊन १४ वर्षे त्यांचा खटला चालविला. अशा या गुणवान राजास अखेरीस हालअपेष्टा भोगाव्या लागल्या आणि काशीमध्येच त्यांचे निधन झाले.

प्रतापसिंह महाराजांच्या नंतर १८३९ ला शहाजी छत्रपती झाले. त्यांना आप्पासाहेब असे म्हणत आप्पासाहेबांनी भाऊसाहेब शेडगांवकर यांना दत्तक घेतले; परंतु इंग्रजांनी हा दत्तक नामंजूर करून १८४९ ला साताऱ्याचे राज्य खालसा केले.

छत्रपती प्रतापसिंह महाराजांवरील अन्याय व त्यांचा छळ केल्यामुळे देशातील सर्व संस्थानिकांत असंतोष पसरला, सातारा परिसरात इंग्रजांविरुद्ध अनेक उठाव झाले. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर अनेक स्वातंत्र्य योद्ध्यांना गेंडामाळ येथे फाशी देण्यात आली.

साताऱ्याचा हा जाज्वल्य इतिहास पुढे असाच धगधगत राहिला. नंतरच्या काळात हा जिल्हा क्रांतिकारकांचा, सैनिकांचा म्हणून नावारूपास आला. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची चौथी राजधानी असलेल्या साताऱ्यातून अटकेपार निशाण फडकवले गेले. मराठा स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. हा इतिहास महाराष्ट्रासच नव्हे तर देशवासीयांनादेखील कायम प्रेरणा देत राहील. अशा या ऐतिहासिक सातारा नगरीला आमचा मानाचा मुजरा!

(लेखक ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे कोषाध्यक्ष आहेत.)



नोंद

मूळचे सातारकर असणारे अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे 'संदेश'पत्र हे मराठी पत्रकारितेतील एक ठळक वैशिष्ट्य मानले जाते. पत्रकारितेत नवा जमाना सुरू करणारे पत्र म्हणून संदेशचा उल्लेख केला जातो. अच्युत कोल्हटकर यांनी १९१७ मध्ये मुंबईमध्ये आपले संदेश हे पत्र सुरू केले. समाजातील सर्व थरांतील वाचक वर्ग समोर ठेवून अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी संदेश या पत्राला लौकिक प्राप्त करून दिला.



गजानन चेणगे
मो.: ७७८८६३८६१३

पर्यटनाची राजधानी सातारा

गेल्या वीस-पंचवीस वर्षांत सातारा जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायात क्रांतीच झाली आहे. जिल्ह्यात निसर्ग पर्यटन, दुर्ग पर्यटन तसेच धार्मिक पर्यटनाला प्रचंड वाव आहे. विशेषतः जिल्ह्याच्या पश्चिम भागावर विधात्याने जणू निसर्गसौंदर्याची मुक्त हस्ते उधळण केली आहे.

सातारा जिल्ह्यातील निसर्गरम्य ठिकाणे, छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारे गड किल्ले, प्रमुख तीर्थक्षेत्रे अशा ठिकाणी वर्षाचे बाराही महिने पर्यटक येत असतात. येथील हवा, पाणी, निसर्ग या गोष्टीही पर्यटनाला अनुकूल आहेत. तथापि, गेल्या वीस-पंचवीस वर्षांत जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाला खऱ्या अर्थाने सुगीचे दिवस आले आहेत. पूर्वी महाबळेश्वर-पाचगणीपुरत्या सीमित असलेल्या येथील पर्यटन व्यवसायाने आता या सीमा ओलांडून पर्यटन जिल्हा अशी ओळख निर्माण केली आहे.

पर्यटनाला प्रचंड वाव

व्यापार, व्यवसाय, नोकरी, घरप्रपंच अशा चक्रात अडकून जीवन यंत्रवत वाटू लागते तेव्हा प्रत्येकालाच सगळे व्याप विसरून यातून चार - दोन दिवस बाहेर पडून आनंदाचे क्षण वेचावे वाटतात. त्यासाठी पर्यटनाचे महत्त्व आहे. यातून केवळ विरंगुळाच नव्हे, तर आनंद, ऊर्जा, उमेदही मिळते. ती प्राप्त करून पुन्हा नव्या उत्साहाने कामाला लागता येते. हे खरे असले तरी अलीकडच्या काळात मौजमजा करण्याची, पर्यटनाची मानसिकता वाढली आहे हेही तितकेच खरे.



गेल्या वीस - पंचवीस वर्षांत जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायात जणू क्रांतीच झाली आहे. महाबळेश्वर-पाचगणीपुरता सीमित असलेला येथील पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारला असून त्याच्या विविधांगी स्वरूपामुळे राज्यातील, परराज्यातील लाखो पर्यटकांना त्याची भुरळ पडत आहे. जिल्ह्यात निसर्ग पर्यटन, दुर्ग पर्यटन तसेच धार्मिक पर्यटनाला प्रचंड वाव आहे. विशेषतः जिल्ह्याच्या पश्चिम भागावर विधात्याने जणू निसर्गसौंदर्याची मुक्तहस्ते उधळण केली आहे.

सातारा जिल्ह्याला मुख्यमंत्रिपदाचा दुसरा मान बॅ. बाबासाहेब भोसले यांनी दिला. त्यांचा मतदारसंघ मुंबईतील असला तरी ते मूळचे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कलेढोण येथील होते. ते सातारा जिल्ह्यातील दुसरे मुख्यमंत्री होते. २१ जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३ असा त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ होता.





महाबळेश्वर – पाचगणीचा लौकिक

फार पूर्वीपासून थंड हवेचे ठिकाण म्हणून किंवा महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून महाबळेश्वर – पाचगणीचा राज्यासह देशभरात लौकिक आहे. शरीर आणि मन प्रफुल्लित करणारी महाबळेश्वर – पाचगणीची गुलाबी थंडी, त्या वातावरणात आस्वाद घ्यावासा वाटणारी तेथील लालचुटूक स्ट्रॉबेरी, अंगावर रोमांच निर्माण करणारे सह्याद्रीचे बेलाग कडे, त्याच्या सान्निध्यातील विविध पॉईंट्स, नेत्रसुखद घनदाट जंगल, हे सौंदर्य आणखी खुलवणारा वेण्णा लेक, आशिया खंडातील उंचीच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचे पाचगणीचे टेबल लँड अशी या ठिकाणची कितीतरी वैशिष्ट्ये सांगता येतील. महाबळेश्वरपासून जवळच असलेले क्षेत्र महाबळेश्वर हे पर्यटकांनी आवर्जून भेट द्यावी असे ठिकाण आहे. येथील महाबळेश्वर मंदिर, त्याच्या बाजूलाच असलेले पंचगंगा मंदिर पाहण्यासारखे आहे. कृष्णा, कोयना, वेण्णा, सावित्री आणि गायत्री या नद्यांच्या उगमाचे हे पवित्र ठिकाण आहे. जवळच कड्यावर कृष्णामाईचे प्राचीन मंदिर आहे. शिल्पकलेचा अजोड नमुना म्हणून त्याकडे पाहिले जाते.

आकर्षणाची नवीन केंद्रे

या व्यतिरिक्त जिल्ह्यात अलीकडच्या काही वर्षांत अनेक डेस्टिनेशन्स पर्यटकांसाठी आकर्षणाची केंद्रे झाली आहेत. यामध्ये सातारा शहराजवळील 'कास पुष्प पठारा'चा उल्लेख करावा लागेल. विविधरंगी रानफुलांच्या अगणित ताटव्यांनी डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या कास पुष्प पठाराचा युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला आहे. फुलांच्या हंगामात येथे देश-विदेशातून लाखो पर्यटक भेट देत असतात.

फॉल आणि रिव्हर्स फॉल

उंच कड्यावरून फेसाळत कोसळणारा जलप्रपात एकाच वेळी निसर्गाच्या वेगळ्या आविष्कारासोबत रौद्ररूपाची जाणीव करून देत असतो. असे अनेक धबधबे पर्यटकांना साद घालत असतात. ठोसेघर धबधबा, वजराई भांबवली धबधबा, एकीवचा धबधबा, केळवली धबधबा, ओझर्डे धबधबा, महाबळेश्वरजवळचा लिंगमळा धबधबा तसेच सडावाघापूरचा रिव्हर्स फॉल या ठिकाणी पावसाळ्यात पर्यटकांचा ओघ वाढला आहे. यातील काही धबधबे तर अलीकडच्या काळातच नावारूपाला आले आहेत.

शिवरायांच्या पराक्रमाचे साक्षीदार

अफजलखानाच्या वधाची रोमहर्षक घटना घडली तो प्रतापगड, स्वराज्याची चौथी राजधानी सातारचा

नोंद

पृथ्वीराज चव्हाण हे महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री, तर सातारा जिल्ह्याने दिलेले तिसरे मुख्यमंत्री ठरले. त्यांनी तत्कालीन कराड मतदारसंघाचेही नेतृत्व केले होते. १० नोव्हेंबर २०१० ते २६ सप्टेंबर २०१४ असा त्यांचा कार्यकाळ होता. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि पृथ्वीराज चव्हाण दोघेही कराडचे आहेत.

अजिंक्यतारा तसेच सज्जनगड, वासोटा, वसंतगड, वर्धनगड, पांडवगड, वैराटगड, चंदन वंदन, मकरंद गड, भूषणगड, महिमानगड, वारूगड असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्या पराक्रमी मावळ्यांच्या पराक्रमाची साक्ष देणारे अनेक गड किल्ले जिल्ह्यात आहेत. यामध्ये प्रतापगड, सज्जनगड तसेच अजिंक्यतारा या ठिकाणी असंख्य पर्यटक भेट देत असतात.

धार्मिक पर्यटन

याशिवाय धार्मिक पर्यटनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे कुलदैवत शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव, ज्या मंदिरात छत्रपती शिवरायांनी जिजाऊ माँसाहेबांची सुवर्णतुला केली होती ते क्षेत्र महाबळेश्वर मंदिर, मांढरदेवची काळुबाई, म्हसवड येथील सिद्धनाथ, पालीचे खंडोबा देवस्थान, ढेबेवाडी खोऱ्यातील नाईकबा, गोंदवले येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज समाधी मंदिर, पुसेगाव येथील श्री सेवागिरी देवस्थान, प्रतापगडावरील भवानी माता, औंध येथील यमाई, कराड येथील दत्तनिवारिणी, प्रीतिसंगमावरील कृष्णामाई, पारची राम वरदायिनी, घाटवणचे घाटाई देवस्थान, वाई येथील गणपती मंदिर आदी तीर्थक्षेत्री लाखो पर्यटक यात्रा-जत्रांच्या निमित्ताने किंवा अन्य वेळीही दर्शनासाठी येत असतात.

आता कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयात जल पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत. अलीकडच्या दोन दशकांत जिल्ह्यात बहरलेल्या पर्यटन व्यवसायामुळे राज्यात पर्यटन जिल्हा म्हणून जिल्ह्याची ओळख ठसठशीत होऊ लागली आहे. यातून जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला बळ मिळते आहे.

कृषी पर्यटन केंद्रांची भरारी

साधारणपणे सन २०१५ पासून सातारा जिल्ह्यात कृषी पर्यटनाने भरारी घेतली आहे. ही पर्यटन केंद्रे शहरी जनतेला कृषी संस्कृतीशी आणि ग्रामीण संस्कृतीशी जोडण्याचे काम करत आहेत. याला मोठा प्रतिसाद मिळत असल्यामुळे जिल्ह्यात सुमारे दीडशे कृषी पर्यटन केंद्रे झाली असून त्यातील बहुतांश जिल्ह्याच्या पश्चिम भागात आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे ग्रामीण लोकजीवन आणि संस्कृती यापासून माणूस दुरावत आहे. त्यामुळे शहरी भागात राहणाऱ्या नागरिकांना ग्रामीण जीवनाची ओढ असते. त्यांची ती भावनिक गरज ही पर्यटन केंद्रे पूर्ण करत आहेत. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी हा नवा मार्ग प्रशस्त होतो आहे. हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या हेतूने सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने या कृषी पर्यटन केंद्रांना मोठ्या प्रमाणावर अर्थसाहाय्य केले आहे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)



महाराष्ट्राचे २५ वे मुख्यमंत्री होण्याचा मान एकनाथ शिंदे यांच्या नावावर आहे. ठाण्यातील कोपरी पाचपाखडी विधानसभा मतदारसंघाचे ते प्रतिनिधित्व करतात; पण त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात दरे हे असल्याने, सातारा जिल्ह्याने दिलेले ते चौथे मुख्यमंत्री ठरले.

नोंद



हणमंत पाटील
मो.: ९८८१९०७१०२

देशाच्या ऊर्जेची राजधानी

ऊर्जा

साताऱ्यातील कोयना जलविद्युत प्रकल्प, पवन ऊर्जा आणि सौरऊर्जा प्रकल्पांतील विजेमुळे महाराष्ट्राच्या व देशाच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली. हजारो लोकांना रोजगार मिळाला. साताऱ्यातील ऊर्जेच्या स्थिरतेमुळे औद्योगिक प्रगतीसह पर्यटन व कृषी क्षेत्रांना चालना मिळाली. सह्याद्रीच्या डोंगररांगाच्या कुशीतील सातारा जिल्हा हा जल, वारा आणि सूर्य या तिन्ही ऊर्जास्रोतांचा संगम आहे.

देशाचा विकास, प्रगती व मानवनिर्देशांक वाढविण्यात विजेचा प्रकाश महत्त्वाचा आहे. औद्योगिक विकासाचा मनोरा विजेच्या पायावर उभा राहतो. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिला प्रश्न पाणी सिंचन योजनेप्रमाणेच वीजपुरवठा टंचाईचा होता. विकासात सर्वाधिक आघाडीवर असेलल्या महाराष्ट्रातून सर्वाधिक विजेची मागणी होती. मात्र, दगडी कोळशापासून तयार होणाऱ्या पारंपरिक औष्णिक वीजनिर्मितीशिवाय आपल्यापुढे कोणताही पर्याय नव्हता. औष्णिक विद्युत केंद्रांना पाण्याची शाश्वती लागते. मात्र, दुष्काळ महाराष्ट्राच्या पाचवीला पुजलेला होता. पावसाळ्यातील पाण्यावर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे पाणीटंचाई असल्याने औष्णिक विद्युत निर्मितीला अडथळा निर्माण होऊ लागला. ईराई, कामठीखेडी, हतनूर व जायकवाडी या जलाशयांवर चंद्रपूर, कोराडी, भुसावळ व परळी येथे सुमारे ४ हजार ६१८ मेगावॅट औष्णिक विद्युतनिर्मिती कशीबशी होत असे. मात्र, राज्यभर सिंचन योजना नसल्याने विस्ताराला मर्यादा होत्या. त्यामुळे देशाच्या औद्योगिक विकास व विस्तारासाठी नवीन वीजनिर्मितीचे स्रोत शोधण्याशिवाय पर्याय नव्हता.

आपल्या देशात पाणी सिंचन व वीजनिर्मितीलाही प्रदीर्घ इतिहास आहे. अगदी यजुर्वेदामध्येही कालवा, धरण व शेतीचे पाणी सिंचन याचा उल्लेख आहे. एखाद्या जलाशयाच्या काठी मानवी वस्ती उदयास येऊन त्याचा पुढे विस्तार झाल्याचे दाखले मिळतात. देशातील दिल्ली, लखनौ, मुंबई, पुणे व छत्रपती संभाजीनगर ही शहरे नदी व मोठ्या जलाशयांच्या परिसरात विकसित झाली. ''जे राज्य आपल्या कृषी उत्पादनासाठी पावसावर अवलंबून न राहता सिंचन योजना विकसित करते. ते राज्य अधिक समृद्ध होते'', असे कौटिल्याने म्हटले आहे. शिवाय पाणीपट्टीचे दर

नोंद

सातारा जिल्ह्यातील कोयना नदी ही कृष्णा नदीची जिल्ह्यातील सर्वांत मोठी उपनदी आहे. महाबळेश्वर येथील उगमानंतर जावळी व पाटण तालुक्यांतून दक्षिणेस हेळवाकपर्यंत ती वाहत जाते. त्यानंतर ती पूर्ववाहिनी होते व कराड शहराजवळ कृष्णेला मिळते. हे संगमस्थान प्रीतिसंगम म्हणून प्रसिद्ध आहे. कोयना नदीवरील कोयना धरण वीजनिर्मितीसाठी विशेष प्रसिद्ध आहे.



ठरविण्याच्या पद्धतीविषयी कौटिल्य सांगतात की, ''शेतीसाठी हातानं पाणी उपसणाऱ्यांनी १/७ भाग पाणीपट्टी द्यावी, बैलाच्या साहाय्याने पाणी उपसणाऱ्यांनी १/४ आणि यंत्राद्वारे पाणी उपसणाऱ्यांना १/३ भाग पाणीपट्टी आकारण्यात यावी.'' भारतीय वाङ्मय व शिलालेखांमधूनही समकालीन सिंचन पद्धतीचा उल्लेख सापडतो. त्यामध्ये बारमाही नद्यांवर बंधारे बांधून त्याचे पाणी वळवून ते शेतीच्या सिंचनासाठी वापरले जाते. ही फड पद्धती खान्देशात प्रचलित होती.

आपल्या देशातील सरंजामशाही, वतनदारी जाऊन ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून १८१८ साली ब्रिटिशांचे राज्य आले. त्यांनी भारतातील वीज, पाणी, रस्ते व वाहतूक यामध्ये यंत्राचा वापर सुरू केला. रस्त्यांचे जाळे, रेल्वे, एकच चलन, शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघडली. शेतीच्या सिंचनासाठी मानवाच्या ऐवजी यंत्रसामग्रीचा वापर सुरू झाला. त्यामुळे सुरुवातीला इंग्रज आपल्या भल्यासाठी आले आहेत, असा गोड गैरसमज भारतीयांमध्ये तयार झाला. मात्र, या मूलभूत सुविधांमधील यंत्राचा वापर हा भारतीयांच्या भल्यासाठी नसून, तो इंग्लंडला समृद्ध करण्यासाठी आहे. त्यासाठी ब्रिटिशांकडून सुरू असलेल्या पद्धतशीर शोषणाचं स्वरूप लक्षात यायला मोठा काळ लोटला. दादाभाई नौरोजी, म. गो. रानडे यांनी केलेल्या अर्थशास्त्रीय विश्लेषणातून ते पुढे भारतीयांच्या लक्षात आले. या असंतोषातून पुढे १८७७ चा उठाव झाला.

देशात १८९६ आणि १९०० या साली भयानक दुष्काळ पडला. ब्रिटिशांच्या काळापूर्वीही दुष्काळ पडत होता; परंतु त्या काळात शेतसारा माफ केला जायचा. मात्र, ब्रिटिशांच्या 'कायमधारा कर' पद्धतीमुळे दुष्काळातही कराची वसुली करण्यात आली. कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांची अस्वस्थता व असंतोष वाढत गेला. अखेर राणी व्हिक्टोरिया यांना त्याची दखल घ्यावी लागली. भारतीयांचा असंतोष कमी करण्यासाठी महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त दक्षिण पठारावर सिंचन प्रकल्प उभारण्याची कल्पना पुढे आली. त्यासाठी ब्रिटिश सरकारने इंजिनिअर असलेले एच. एफ. बील यांच्यावर जबाबदारी सोपवली.

सिंचन प्रकल्पांना सुरुवात

इंजिनिअर बील साहेबांनी दक्षिण पठारावर सर्वेक्षण सुरू केले. १८६४ साली सातारा जिल्ह्यातील कराडजवळ कृष्णा नदीवर खोडशी येथे बंधारा घालून कालवा बांधला. १८७९ साली पुण्यासाठी मुठा नदीवर खडकवासला धरण बांधले. मुंबईसाठी विहार, पवई, तळशी व तानसा हे प्रकल्प पूर्ण केले. १८८७ साली नीरा नदीवर कालवा बांधला. ब्रिटिशांनी सिंचन प्रकल्पासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला होता. त्यामुळे प्रकल्प पूर्णपणे सरकारी झाले. त्या काळात ब्रिटिशांनी 'टोपोशीट' हा प्रकार आणला. एका नकाशावर संपूर्ण जमिनीच्या चढउताराचे मोजमापाचे चित्र दिसू लागले. त्यामुळे प्रकल्पाचे कागदावर नियोजन करणे सोपे झाले.

कोयनेचे खोरे बोटीसारखे

बील साहेब जेव्हा सह्याद्रीच्या डोंगररांगेत धरणासाठी जागा शोधण्यासाठी फिरू लागले. तेव्हा त्यांच्या एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली. सह्याद्रीतून उगम पावलेल्या अनेक नद्या पूर्ववाहिनी आहेत; परंतु कोयना ही एकमेव नदी आहे, जी सह्याद्रीच्या रांगेला समांतर अशी उत्तर-दक्षिण वाहते. सुमारे ६७ किलोमीटर तिचा प्रवाह खळखळता आहे. मग, पाटण तालुक्यातील हेळवाक गावी ती एकदम पूर्ववाहिनी होते. तिथे साधारण ५०० मीटर रुंद अशा डोंगरखिंडीतून तिचं पात्र अचानक पूर्वेकडे वळलं आहे. कोयनेच्या हेळवाकपर्यंतच्या खोऱ्याचा आकार एखाद्या बोटीसारखा असल्याने ही जागा बील साहेबांना कोयनेवरील धरणासाठी योग्य वाटली; परंतु, काही कारणाने हे सर्वेक्षण कागदावरच राहिलं.

कराडमधील नकट्या रावळाची विहीर हीदेखील तितकीच प्रसिद्ध आहे. बाराव्या शतकात शिलाहार राजवटीत ही विहीर बांधण्यात आली आहे. या विहिरीला एकूण ८२ पायऱ्या असून प्रत्येक वीस पायऱ्यांनंतर थांबण्याकरिता एक सपाट पायरी बांधली गेली आहे. विहिरीचे बांधकाम रेखीव असून चिऱ्याचे आहे. या विहिरीची लांबी १२० बाय ९० फूट इतकी आहे. कराड परिसरातील लोक आणि पुरातत्त्व विभाग यांच्याकडून या विहिरीची देखभाल केली जाते.

नोंद

कोयनेसाठी शिष्टमंडळ दिल्लीला

देशाच्या स्वातंत्र्यानंतर औद्योगिक विकासासाठी सिंचन व वीज प्रकल्पाला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे १९५१ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात कोयना धरणाचा समावेश करण्यात आला; परंतु मराठी व गुजराती अशा द्वैभाषिक मुंबई राज्यात तापीवरील उकाई धरणाचा गुजरातमधून जोरदार पुरस्कार करण्यात आला. महाराष्ट्र विरुद्ध गुजरात या वादात काही प्रमाणात कोयना प्रकल्प मागे पडला. त्या वेळी सांगली येथील डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने पुढाकार घेत हेळवाक या गावी कोयना परिषद घेतली. परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब हिरे आणि स्थानिक इंजिनिअर जी. के. मनोळीकर यांनी उपस्थितांना धरणाची माहिती दिली. त्यानंतर भाऊसाहेब हिरे, धनंजयराव गाडगीळ व शंकरराव किर्लोस्कर, नानासाहेब गोरे यांनी ठराव करून शिष्टमंडळाने दिल्ली गाठली. कोयना धरणाचा पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यासाठी शेकाप, हिंदू महासभा व कम्युनिस्ट पक्ष यांनीही ठरावाला पाठिंबा दिला. मुंबईतील सुमारे चार हजार कामगारांनी सह्या केलेले निवेदन दिल्लीला पाठविले. त्यामध्ये म्हटलं होतं, ''आमच्या अंधारी जीवनात 'कोयना योजना' हा एकच प्रकाश आहे. ही योजना झाली, तर आमच्या शेतात धान्याच्या राशी लागतील.''

अभूतपूर्व एकजूट अन् मंजुरी

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील या परिषदेत म्हणाले, ''महाराष्ट्रातील माणसं केवळ एक वेळ जेवून हे धरण बांधण्यासाठी या खोऱ्यात येतील, असे मी आश्वासन देतो.'' आचार्य अत्रे म्हणाले, ''आपण कोयना दिन साजरा करून जत्रा भरवावी. या जत्रेत कोयना! कोयना! कोयना! हा निनाद सर्व महाराष्ट्रात सर्वत्र उठला पाहिजे.'' कोयना धरणासाठी शेतकरी, कामगार, राजकीय नेते व कारखानदार यांच्यात अभूतपूर्व एकजूट घडून आली होती. अखेर महाराष्ट्रातील एकजुटीच्या रेट्याने कोयना योजनेला मंजुरी देणे केंद्राला भाग पडले. १६ जानेवारी १९५४ ला मुंबईत राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते कोयना धरणाच्या पायाभरणीच्या बांधकामाचा शुभारंभ झाला.

'महाराष्ट्राची भाग्यरेखा' ठरलेला प्रकल्प

सातारा जिल्हा सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला



असल्यामुळे येथे पावसाचे प्रमाण भरपूर आहे. कोयना, कृष्णा, वेण्णा, उरमोडी, नीरा या नद्यांच्या माध्यमातून जलसंपत्ती मुबलक आहे. या नद्यांच्या पाण्यावर आधारित 'कोयना जलविद्युत प्रकल्प' हे साताऱ्याचे सर्वांत मोठे योगदान आहे. या जलसंपत्तीमुळे साताऱ्याने ऊर्जानिर्मितीत देशात अग्रस्थान मिळवले आहे. त्यामुळे देशाचे तत्कालीन अर्थमंत्री सी. डी. देशमुख यांनी कोयना वीज प्रकल्पाला 'महाराष्ट्राची भाग्यरेखा' म्हटले. धरणाचे बांधकाम सुरू झाल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू व यशवंतराव चव्हाण यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्या वेळी पंडित नेहरू यांनी कोयना वीज प्रकल्पाचे 'भारताचे आधुनिक तीर्थक्षेत्र' असे कौतुक केले.

तुडुंबली ही इथें कोयना
विशाल जणूं मांडिला आयना
डोकावुनि हो यांत पहा ना
भवितव्य महाराष्ट्राचे,
या इथे निरखुनी घ्याया,
आनंदवन भुवनीं या

या कोयनेचे वर्णन करणाऱ्या काव्यपंक्ती आहेत, कवी यशवंत ऊर्फ यशवंत दिनकर पेंढारकर यांच्या. १९६२ साली कोयना धरणाचे 'शिवसागर' हे जलाशय भरायला सुरुवात झाली. त्यावर पोफळी, कोळकेवाडी आणि पायथ्याला एक अशी तीन विद्युतगृहे उभारण्यात आली. चार टप्प्यांतील वीज प्रकल्प उभारण्यासाठी भुयारी व भूमिगत वीजनिर्मितीचे आव्हान स्वीकारले.

नोंद

वाईजवळ मेणवली गावातील प्रख्यात वाडा इ. स. १७७० च्या दशकात नाना फडणवीस यांनी कृष्णा नदीच्या काठावर बांधला. २५० अधिक वर्षे जुन्या असलेल्या वाड्याच्या रचनेमध्ये मुख्य दगडी प्लिंथ आहे, ज्यावर विटा आणि वाळलेल्या माती, गवत आणि चुनखडीच्या भिंती असलेल्या दोन मजली लाकडी चौकटीच्या रचना आहेत. वाड्यात भिंतीवर मराठा शैलीतील चित्रे आहेत, जी प्राणी आणि फुलांच्या आकृत्यांनी सजवलेली आहेत.



सीमेवर सैनिकांनी लढावे, त्याप्रमाणे अभियंते, कुशल व अकुशल कामगार प्रकल्पासाठी जीव धोक्यात घालून काम करीत होते. काहीवेळा अपघात होऊन अनेकांना जीव गमवावे लागले. तरीही प्रकल्प थांबला नाही. त्यामुळे संपूर्ण आशिया खंडातला त्या काळातला अशा तऱ्हेचा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेला पहिलाच प्रयोग होता.

'झाडाझडती'त प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा

कोयना जलविद्युत प्रकल्प उभारणीबरोबर कोयना प्रकल्पग्रस्तांचा प्रश्नही उभा राहिला. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा 'झाडाझडती' या कादंबरीतून मांडल्या आहेत. साताऱ्याच्या पाटण तालुक्यातील कोयनानगर येथे उभारलेला कोयना जलविद्युत प्रकल्प हा देशाच्या ऊर्जा व वीजनिर्मितीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. भारतातील १९६० मेगावॅट वीजनिर्मितीचा हा मोठा जलविद्युत प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र हे वीजनिर्मितीत भारतातील सर्वांत आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. देशात निर्माण होणाऱ्या एकूण विजेच्या १५ टक्के निर्मिती एकट्या महाराष्ट्रात होते. तरीही विजेच्या मागणीचे प्रमाण हे निर्मितीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे गेली काही वर्षे महाराष्ट्रातील जनतेला पुन्हा वीज टंचाईचा सामना करावा लागतोय, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे पारंपरिक वीजनिर्मितीऐवजी पवन व सौरऊर्जा निर्मितीचे अपारंपरिक स्रोत विकसित होत आहेत. या अपारंपरिक वीजनिर्मितीतही सातारा जिल्ह्याने आघाडी घेतल्याचे दिसते.

चाळकेवाडी पवनऊर्जा प्रकल्प

साताऱ्यापासून सुमारे ३० किमी अंतरावर वसलेला 'चाळकेवाडी पवनचक्की प्रकल्प' आहे. आशियातील सर्वांत मोठा, वाऱ्यापासून ऊर्जानिर्मितीच्या काही प्रकल्पांपैकी हा एक आहे. चाळकेवाडी (ता. पाटण) येथील पाच किलोमीटरच्या विस्तीर्ण पठारावर पसरलेला हा प्रकल्प संपूर्ण परिसराला स्वच्छ ऊर्जा पुरवतो. हिरव्यागार टेकड्या, लालसर मृदा आणि अनंत रांगेत उभ्या असलेल्या पवनचक्क्या यांचे दृश्य निसर्गप्रेमी आणि



फोटोग्राफीसाठी उत्कृष्ट ठिकाण ठरते. तसेच, पावसाळ्यात येथे धुके आणि वाऱ्यामुळे एका वेगळ्याच वातावरणाचा अनुभव येतो. त्यामुळे पर्यटक येथे आवर्जून भेट देतात. चाळकेवाडीप्रमाणेच पवनचक्क्या मुख्यत्वे भुवे, शिंदेवाडी, पाटण, कोरेगाव व खटाव या भागांमध्येही उभारण्यात आल्या आहेत. या पवनचक्क्यांच्या माध्यमातून सुमारे ८०० मेगावॅट विजेची निर्मिती होते. सातारा जिल्ह्याची पवन ऊर्जानिर्मिती क्षमता अंदाजे ११२२.६१ मेगावॅट इतकी असून, त्यासाठी १६३६ पवन टर्बाईन स्थापित आहेत.

सौरऊर्जा निर्मितीतही आघाडी

साताऱ्यातील ग्रामीण भागात सौरऊर्जेचा झपाट्याने प्रसार झाला आहे. अनेक गावांमध्ये सौरपंप, सौरदिवे आणि सोलार ऊर्जाकेंद्रे कार्यरत आहेत. शेतकऱ्यांना वीजपुरवठ्याच्या कमतरतेवर उपाय म्हणून सौरऊर्जेचा पर्याय मिळाला आहे. शासनाच्या 'सोलार व्हिलेज'

सातारा शहराच्या पश्चिमेकडे यवतेश्वर डोंगराच्या कुशीत, समुद्रसपाटीपासून १२३० मीटर उंचीवर यवतेश्वर हे गाव आहे. येथील यादवकालीन यवतेश्वर मंदिर हे शंकराचे जागृत स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. येथे भरणारी यात्रा ही या भागातील सर्वांत पहिली यात्रा असते. या यात्रोत्सवात मंदिरातून निघणारी पालखी ही मंदिरापासून काही अंतरावर असणाऱ्या एका आंब्याच्या झाडाजवळ जाते. हे झाड देवआंबा म्हणून प्रसिद्ध आहे.

नोंद



योजनेत साताऱ्यातील काही गावे आदर्श ठरली असून, त्यांनी आघाडी घेतली आहे. त्यामध्ये मान्याचीवाडी (ता. पाटण) हे गाव सौरऊर्जा निर्मितीमुळे भारताच्या नकाशावर पोहोचले आहे. ही सौरऊर्जा आज ग्रामीण अर्थव्यवस्थेची पायाभरणी करत आहे.

साताऱ्यातील कोयना प्रकल्प, पवन ऊर्जा आणि सौरऊर्जा प्रकल्पांतील विजेमुळे महाराष्ट्राच्या व देशाच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली. हजारो लोकांना रोजगार मिळाला आहे. साताऱ्यातील ऊर्जेच्या स्थिरतेमुळे औद्योगिक प्रगती, पर्यटन आणि कृषी क्षेत्रांत मोठी भर पडली आहे. ऊर्जा हे केवळ यंत्र चालवणारे साधन नाही, तर संपूर्ण समाजाला गती देणारा आत्मा आहे. सातारा जिल्हा हा जल, वारा आणि सूर्य या तिन्ही ऊर्जास्रोतांचा संगम आहे. कोयना जलविद्युत प्रकल्पाने भारताला स्थिर वीजपुरवठा दिला, पवनचक्क्यांनी स्वच्छ ऊर्जा दिली आणि सौरऊर्जेने ग्रामीण विकासाला नवी दिशा दिली. यामुळेच सातारा हा महाराष्ट्राचीच नव्हे, तर देशाची ऊर्जा राजधानी म्हणून ओळखला जातो कारण इथूनच भारताच्या प्रगतीचा प्रकाश पसरतो, हे साताऱ्यातील कोयनेसह विविध वीज प्रकल्पांनी सिद्ध करून दाखविले आहे.

जिल्ह्यातील जलविद्युत प्रकल्प (क्षमता)
१. कोयना धरण : १९६० मेगावॅट
२. वीर धरण : ९ मेगावॅट
३. कण्हेर धरण : ४ मेगावॅट
४. धोम धरण : ४ मेगावॅट

संदर्भ व माहितीचे स्रोत : कहाणी कोयनेची – उषा तांबे, पाण्याचे राजकारण – डॉ. सुधीर भोंगळे, गुगल, चॅट-जीपीटी, आदी.

(लेखक लोकमतचे वृत्तसंपादक आहेत.)

नोंद

सातारा जिल्ह्यातील पाल (पाली) येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झालेले, साताऱ्याच्या सरकारी शाळेतून मॅट्रिक झालेले, श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९०१ रोजी झाला होता. मराठी साहित्यात ते श्री. के. क्षी. नावाने लेखक व समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. १९५९ मध्ये मिरज येथे झालेल्या ४१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.



सचिन जवळकोटे
मो.: ९८७०३८४३७६

ढंगदार साताऱ्याची लयदार बोली

सातारी बोली

आज-काल टीव्हीवरचा 'लगा लगा लगा' डायलॉग बऱ्याच मराठी माणसांच्याही तोंडी येऊ लागलेला. या शब्दात कुठलाच मोठा अर्थ नसला तरी याला आश्चर्याची झालर लाभलेली. उत्सुकतेची लय यात लपलेली. हा शब्द टीव्हीवर गाजवला रोहित मानेंनी. होय.. तोच तो साताऱ्याचा अवलिया कलाकार. तो त्याच्या अभिनयापेक्षाही विशिष्ट संवादफेकीमुळे अधिक लोकप्रिय झालेला. त्याची बोलण्याची जी स्टाईल त्यावर पब्लिक फिदा झालेलं. गंमत म्हणजे त्याच्या सोबतीचे कलाकारही आता कळत-नकळत त्याच ढंगानं बोलू लागलेले. ही बोलीभाषा साताऱ्याची. एकदम फास्ट. शब्दांवर शब्द आदळवत नवनवीन वाक्यं निर्माण करणारी. सातारी बोलीभाषेला तसा खूप प्राचीन इतिहास आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या ग्रामीण भाषाशैलीत नेहमीच झटकन ओळखू येणारी आणि समजायला अवघड, तरीही इतर प्रांतीयांना खूप आवडणारी ही भाषा. लोकसाहित्यातही सातारी बोली मोठ्या दिमाखात मिरवली गेलेली. इथली भाषा निसर्गात रमलेली. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यातून खळाळत वाहणाऱ्या नद्यांसारखी जितकी प्रवाही; तितकीच पूर्वेच्या दुष्काळी भागातल्या ओसाड माळरानासारखी गंभीरही. या भाषेनं शेकडो वर्षांपासून आपलं वेगळेपण जपलेलं. इथली कैक लोकगीतं आजही जुन्या लोकांनी जपून ठेवलेली. सातारी लोकजीवनाचा अखंड धागा बनून राहिलेली. 'मोत्याची चुंबळ.. तांब्याची घागर' सारखी गाणी आजही महिला भगिनींच्या तोंडी गुणगुणली गेलेली. झणझणीतपणा तोच.

खरंतर गाव बदललं की, पाणी बदलतं. भाषा बदलते. सातारा जिल्ह्यातही नदीचं खोरं बदललं की, भाषेची लय बदललेली. मात्र, त्यातला झणझणीतपणा तोच राहिलेला. जावळी, पाटण, सातारा, वाई अन् महाबळेश्वर तालुक्यातील डोंगराळ भागाची भाषा थोडीशी वेगळी. निसर्गात रमणारी. जावळी-परळी खोऱ्यात स्वतःचं

सातारी बोलीभाषेला तसा खूप प्राचीन इतिहास आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या ग्रामीण भाषाशैलीत नेहमीच झटकन ओळखू येणारी; पण समजायला अवघड, तरीही इतर प्रांतीयांना खूप आवडणारी अशी ही सातारी बोली लोकसाहित्यातही मोठ्या दिमाखात मिरवली गेलेली. इथली भाषा निसर्गात रमलेली आहे.

१९८८ मध्ये ठाणे येथे झालेल्या ६१ व्या संमेलनाचे अध्यक्ष असलेले वसंत कानेटकर यांचा जन्म २० मार्च १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर या गावी झाला होता. कवी गिरीश हे त्यांचे वडील. लघुकथा, कादंबरी या साहित्य प्रकारांतून वसंतराव नंतर नाट्य लेखनाकडे वळले.

नोंद

सातारी बोली

वेगळं अस्तित्व टिकवून ठेवणारी. 'तिकडच्या वाडीतून आलायंस का?' असं मिस्कीलपणे विचारत समोरच्याचा 'आयक्यू' चेक करणारी. कराड पट्ट्यावर थोडासा कोल्हापूरचा प्रभाव पडलेला, मात्र 'डोस्क्यावर पडलायंस व्हय?' असं विचारत स्वतःचं हुशारपण अधोरेखित करणारी. ही कराडी भाषा साताऱ्याशी साधर्म्य दाखवणारी. फलटण, खंडाळा, शिरवळ अन् वाई भागावर मात्र पूर्वीपासून थोडासा पुण्याचा प्रभाव. रोजचं जाणं-येणं असल्यानं 'पुणे तीस' संस्कृतीची ओळख यांना झाली असली तरीही 'मोठ्या गावाकडचं नसतं झिंगाट घेऊ नगंस,' असं अस्सल सातारी भाषेत ठणकावून सांगणारी जुनी मंडळी आजही खंबाटकी घाटाच्या परिसरात भेटलेली. पूर्वेकडच्या म्हसवड-खटाव भागानं अस्सल माणदेशी बाज जपलेला. माडगूळकरांच्या साहित्यातून मोठ्या अभिमानानं उलगडत गेलेला. आज-कालच्या 'स्पेशल डिश'च्या जमान्यातही इथल्या शिवारातली मंडळी 'कोरड्यास अन् कालवण' सारखे शब्द मोठ्या कौतुकानं वापरत असलेली. कोरेगाव मात्र सातारा शहरातलीच भाषा बोलत असलेलं.

भाषेचे तीन प्रकार

सातारा शहरातही तीन प्रकार. जुन्या पेठेतील भाषा वेगळी. खाली सदर बझारकडची स्टाईल वेगळी. शहराच्या उपनगरांत मिसळून गेलेल्या आजूबाजूच्या वाड्या-वस्त्यांची ग्रामीण लयदार भाषाही वेगळी. मात्र, तिन्हीकडची मंडळी जेव्हा स्टॅन्डसमोरच्या भाजी खरेदीला येतात, तेव्हा मात्र प्रत्येकजण असतो अस्सल सातारकर. एखादा आडव्या डोक्याचा तरुण छटाकभर पोरासंगट फुकटचं झिंगाट करू लागला, तर दोघांपैकी एकाच्या तोंडून हा अस्सल सातारी डॉयलॉग येणारच, 'अय दाताड्या पेताड हैस का? पायताऱ्यानं चेचीन. गलगा करू नगंस.' तेव्हा आजूबाजूची माणसं विनाकारण 'भंजाळतात'. खरं तर या दोघांमधला 'खडताक' इतरांना न समजणारा, तरीही एखादा 'बेनवाड' उगाचंच मध्ये पडतो. स्वतःचं 'लय त्वांड' सोडून आणखी एक नसता 'लिचांड' लावून घेतो.

जुनी खोड

नावांची फोड करणं, ही सातारी भाषेची जुनी खोड. एखाद्याचं कितीही चांगलं नाव आई-वडिलांनी ठेवलेलं असू द्या; पण त्याचं 'कांडकं' पाडणार म्हणजे पाडणारच. 'अशक्या, चंद्या, रम्या, मन्या अन् अव्या' असं प्रेमळ नवं नामकरण करण्यात गल्लीतले 'खवट शेंगदाणे' एका पायावर तयार. उन्हाळ्यात भर दुपारी 'कवा-कवा' चक्क 'ऊन चावतं' ते याच गावात. खरं तर चावायला ऊन काही हे जनावर नाही; मात्र प्रतीकात्मक भाषेत एखाद्या घटनेचा उल्लेख करण्यात सातारकर नेहमीच मशहूर. एखाद्या सडपातळ व्यक्तीला 'बरगड्या नळनळायला' लावायलाही ही भाषा मागं-पुढं पाहत नाही. अंघोळीला 'अंगुळा' अन् गळ्याशपथला 'गळ्याच्यानं' म्हणायलाही तयार. इंग्रजी शब्दांचीही तोडफोड या सातारी भाषेनं केलेली. रिपोर्टला 'रपोट' हा शब्द केवळ इथंच ऐकायला मिळतो. इथल्या म्हणीही बहारदार. अत्यंत मिस्कील. 'अंगापेक्षा बोंगा, जवाचं गहू तवाच्या पोळ्या, नटूबाई नटू नि माजंच तट्टू' अशा काही ग्रामीण म्हणी आजही पारावरच्या गप्पांमध्ये रंगलेल्या.

सातारी बोलीची कल्पकता

सातारा परिसरात गावच्या जत्रांना मोठा मान. देवतांवरील गाण्यांचाही वेगळा थाट. तारळी नदीच्या खोऱ्यात 'नंद पालीमध्ये गं म्हाळसा.. देव मल्हारी देव मल्हारी'चा आवाज घुमतो तेव्हा तल्लीन होतात खंडोबाचे भक्त. आजही रानावनात काम करताना बायका एकमेकींना 'हुमणं' टाकून कोंडीत पकडतात. 'हुमणं' म्हणजे कोडी. 'खण खण कुदळी, मण मण माती.. सूर्य उगवला मध्यानराती,' याचं उत्तर भल्या भल्यांच्या

नोंद

श्रीपाद महादेव माटे हे ज्येष्ठ लेखक १९४३ च्या सांगली येथील संमेलनाचे अध्यक्ष होते. २ सप्टेंबर १८८६ रोजी त्यांचा जन्म विदर्भातील शिरपूर या गावी झाला होता; परंतु त्यांचे शिक्षण हे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे झाल्यामुळे ते सातारचेच लेखक म्हणून ओळखले जातात.

आकलनापलीकडचं. सारे डोकं खाजवू लागले, की 'हुमणं' टाकणारी तोंडाला पदर लावून खुसखुसते, 'यवढंबी म्हाईत नाय व्हय.. उंबराचं फूल..' लक्षात घेतल्या जाणाऱ्या उखाण्यांमधूनही सातारी बोलीची कल्पकता नेहमीच दिसून आलेली.

मराठी साहित्यात छाप

मराठी साहित्यात सातारा बोलीभाषेची छाप नेहमीच उमटलेली. श्री. म. माटे यांच्या साहित्यातून 'धबडगा', 'सुर्मान', 'झुंजक', 'गव्हार', 'वादाडा' अन् 'माचाड'सारखे कैक गावरान शब्द शहरी वाचकांना वाचायला मिळालेले. म. भा. भोसले यांनीही 'इदरट', 'भरवाट गणगा', 'बावकड', 'फळकाट्या' अन् 'खाकोटी'सारखे अनेक दुर्मीळ शब्द वापरलेले. प्रा. व. बा. बोधे यांच्या बहुतांश कथांमधून तर हजारो सातारी शब्द पानोपानी प्रकटलेले. 'भिरकं', 'चितपाट', 'बेंडल', 'मोळकांड' अन् 'चावरतिडा' अशा असंख्य शेलक्या सातारी शब्दांनी वाचकांसमोर नवं विश्व उलगडून दाखवलेलं. बजरंग शेलारांनीही 'इसावा', 'जुंढळा', 'चुंबळ', 'जानवसा' अन् 'खुडील' हे अस्सल गावरान शब्द आपल्यापर्यंत पोहोचवलेले. याशिवाय सीताराम सावंत, डॉ. यशवंत पाटणे, डॉ. राजेंद्र माने, सुरेंद्र शिंगटे, प्रा. सुहासकुमार बोबडे, प्रा. नलिनी महाडिक अन् जगन्नाथ शिंदे यांच्यासह अनेक साहित्यिकांनी सातारी बोलीभाषेचं सुरेख दर्शन अत्यंत कल्पकतेनं आपापल्या साहित्यातून दिलेलं. डॉ. जया कदम यांनीही सातारी बोलीच्या सांस्कृतिक आविष्कारावर सुंदर पुस्तक लिहिलेलं.

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या लोकसाहित्यातील अभ्यासातही बऱ्याच ठिकाणी सातारी बोलीभाषेचा वारंवार उल्लेख आलेला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्याही शब्दसामर्थ्यात सातारा बोली भाषा ढमदारपणे उमटलेली. या सातारी बोलीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समोरच्याच्या 'डोस्क्यावरनं जैल' अशी भाषा वापरायची. थेट टोमणे मारण्याऐवजी शालीतून चपखल शब्दांचे जोडे वापरायचे. व्यवहारशून्य माणसाला 'बोंबलभिक्या' अशी शेलकी शिवी देणार. एखाद्याला किरकोळीत काढण्यासाठी 'नरसाळ्या' म्हणणार. मात्र, कौतुक करण्यातही मनापासून शब्दरचना. काळ्याभोर जमिनीचा उल्लेख 'काळवट' असा करणार. सूर्याची वेळ समजण्यासाठी 'पेंडभर..कासराभर' असे शब्द वापरणार; पण एक मात्र खरं, रागाच्या भरात समोरच्याला 'आडपता तडपता' करणारा सातारकर वेळप्रसंगी मात्र जीव द्यायलाही तयार.

पडद्यावरही मोहिनी

पुस्तकांच्या कागदाप्रमाणेच पडद्यावरही सातारी भाषेनं आपली मोहिनी घातलेली. पूर्वीच्या काळातील बऱ्याच मराठी चित्रपटातही सातारी गावरान भाषाच बोलली गेलेली. साताऱ्याला गेल्यानंतर सांडली गेलेली 'बुगडी' सध्याच्या नव्या पिढीला गोंधळात पाडणारी असली तरी जुन्या काळातल्या मंडळींना याचा खोचक अर्थ अचूकपणे समजलेला. आता छोट्या पडद्यावरही सातारी भाषा भुरळ घालू लागलेली. 'लागीर झालं जी..' यातला 'लागीर' हा शब्द अस्सल सातारीच.

सुमारे २०१० चा काळ असावा. त्या वेळी ग्रामीण भागातील सातारकरांना मोबाइल या वस्तूनं कशी भुरळ घातली, यावर मी 'लोकमत'मध्ये एक लेख लिहिलेला. या जोडीला मोबाइलवरची सातारी भाषाही वाचकांना खूप आवडलेली. त्यात एसटीत बसलेल्या एका सातारी आजीबाईचा डायलॉग होता. 'बर्मगठिव्का' हा शब्द सुरुवातीला अनेकांना कळालाच नव्हता. नीट वाचल्यानंतर सारेच पोट धरून हसलेले. मोबाइलवरचं संभाषण झाल्यानंतर ही आजीबाई चार-चार वेळा 'बर्मगठिक्का' का म्हणते, हेच सुरुवातीला कळत नव्हतं. खरंतर याचा अर्थ 'बरं मग ठेवू का'? हा एवढा साधा सोपा अर्थ होता. हीच तर खरी गंमत सातारी बोलीभाषेची. ऐकताना गोंधळात टाकणारी; परंतु समजल्यावर पार वाट लावणारी.

(लेखक लोकमत कोल्हापूरचे कार्यकारी संपादक आहेत.)

साताऱ्यातील पोषक वातावरणामुळे सातारा जिल्ह्यात अनेक ट्रेकिंग आणि गिर्यारोहण संस्था उदयाला आल्या आहेत. 'सह्याद्री ट्रेकिंग क्लब', 'रानवाटा निसर्ग' आणि 'पर्यावरण संवर्धन मंडळ' ही काही उदाहरणे. शाळा-महाविद्यालयांच्या गिर्यारोहण शाखा, हरित मंडळे यामुळे युवकांमध्ये साहसी वृत्ती वाढीस लागली आहे.



भेदिक परंपरा आणि हैबतीबाबा

विलास आपटे
मो.: ९२७१७६७८३३

भेदिक हा महाराष्ट्रातील लोकशाहिरी परंपरेतील एक अद्वितीय काव्यप्रकार आहे. सातारा जिल्ह्याने या परंपरेला मोठेपण मिळवून दिले. या अद्वितीय काव्यप्रकाराची माहिती करून देणारा लेख.

लोकसाहित्य

भेदिक परंपरेची (वैदिक परंपरा) सुरुवात ऋग्वेदकालीन आर्य समाजातून झाली, असे मानले जाते. याचा उगम सुमारे इ.स.पूर्व १५००-१२०० च्या दरम्यान झाला.

आर्यांचे भारतात आगमन

मध्य आशियातून (इराण-कझाकस्तान परिसरातून) आर्य जमाती स्थलांतरित झाल्या. त्यांनी पंजाब, सरस्वती-सिंधूच्या काठी वस्ती केली.

ऋग्वेदाची रचना

सुरुवातीला ते 'देवता-उपासना', 'यज्ञ', 'प्रकृतीचे स्तवन' या स्वरूपात गीतं म्हणू लागले. ही स्तोत्रं मौखिक परंपरेने (श्रुतीरूपाने) पुढे चालली.

यज्ञकेंद्रित जीवन

इंद्र, अग्नी, वरुण, सोम इत्यादी देवतांची स्तुती केली जाई. यज्ञाद्वारे देवता प्रसन्न करून समाजातील कल्याण साधण्याची भावना होती.

संहिताकाल ते ब्राह्मणग्रंथ

ऋग्वेदानंतर यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद उदयास आले. नंतर यज्ञपद्धती, विधी, कर्मकांड यांचं स्पष्टीकरण करणारे 'ब्राह्मणग्रंथ' तयार झाले.

आरण्यक व उपनिषद

जंगलात राहणाऱ्या ऋषींनी चिंतनपर परंपरा सुरू केली. यज्ञकर्मापासून आत्मविद्या, ब्रह्मविद्या, तत्त्वज्ञानाकडे वळण लागले.

भेदिक/वैदिक परंपरा ही सुरुवातीला यज्ञ-उपासना आणि नंतर हळूहळू आध्यात्मिक व तत्त्वचिंतनपर परंपरा अशा दोन मुख्य टप्प्यांत विकसित झाली.

नोंद

सातारा जिल्ह्याच्या कृषी विकासात महिलांचा वाटा मोठा आहे. कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय असे पूरक व्यवसाय यशस्वी आहेत. शेतीतील ७० टक्के कामे महिलाच करतात. शेतीपूरक व्यवसायातूनच ग्रामीण महिलांचे खरे सक्षमीकरण होऊ लागले. आता जिल्ह्यात शेतकरी महिलांचे गट आणि उत्पादक कंपन्यांचे उद्योग उभे राहू लागले आहेत.

भेदिक म्हणजे काय?

भेदीक (किंवा भेदिक) हा महाराष्ट्रातील लोकशाहिरी परंपरेतील एक अद्वितीय काव्यप्रकार आहे. तो मूलतः लावणी व तमाशा या लोककला प्रकाराशी जोडलेला असला तरी त्याचा आशय साधा मनोरंजनात्मक नसून आध्यात्मिक, तत्त्वज्ञाननिष्ठ व गूढार्थपूर्ण असतो. भेदिक म्हणजे 'भेद' उलगडणारे काव्य. लौकिक लावणीत प्रेम, विरह, शृंगार येतो; पण भेदिक लावणीत अध्यात्म, उपदेश, तत्त्वचर्चा, पुराणकथा, कोडी, सामाजिक प्रश्न यांचा प्रभाव असतो.

भेदिकाचा उगम

भेदिकाचा उगम हा कलगी तुरा या पारंपरिक वादसंवादातून झाला.

कलगी-तुरा : दोन बाजू (पक्ष) समोरासमोर येऊन कोडी घालणे व उलगडणे अशा पद्धतीने तासन्तास चालणारी चर्चा. या चर्चेत कलगीवाल्यांचा पक्ष शक्तिवाद, प्रकृतिवाद, शाक्त मत मांडतो, तर तुरेवाले शिवतत्त्व, पुरुषतत्त्व, ब्रह्मज्ञानवादी भूमिका मांडतात. यातूनच नंतर 'सवाल-जवाब लावणी' व 'भेदिक काव्य' हे उपप्रकार उदयास आले.

भेदिक काव्याविषयी माहिती

भेदिक काव्य हे लोकांना बोध घडवणारे, विचारप्रवर्तक स्वरूपाचे असते.

प्रश्नोत्तर पद्धत : एकाने कोडे किंवा तात्त्विक प्रश्न विचारायचा आणि दुसऱ्याने काव्यरूप उत्तर द्यायचे.

आशय : पुराणातील कथा, रामायण-महाभारतातील प्रसंग, संत वाङ्मयातील ओव्या, निसर्गावर आधारित रूपकं.

संगीत साथ : डफ, तुणतुणे, ढोलकी, झांज, हार्मोनियम.

सादरीकरण : रंगमंचावर समोरासमोर दोन पथके; मध्ये प्रेक्षकांची उपस्थिती; नाट्यमय हावभाव व रंगतदार वेशभूषा.



भेदिक काव्याचे प्रकार

भेदिक लावणी-लौकिक लावणीसारखीच पण आशयाने आध्यात्मिक.

कलगी तुरा-मूळ प्रश्नोत्तरात्मक प्रकार, तासन्तास चालणारा.

सवाल-जवाब लावणी-तमाशात नंतर विकसित झालेला छोटा व लोक-मनोरंजनप्रधान उपप्रकार.

सातारा येथील पाटण तालुक्यातील रामापूर येथे जन्म घेतलेले शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे हे शिक्षणक्षेत्रातील एक असामान्य कर्तृत्व असलेले नाव म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. १९७४ मध्ये 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' या नावाने शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणक्षेत्रात नावलौकिक मिळवला.

नोंद

परंपरेची सुरुवात

प्राचीन काळी जत्रा, यात्रांत रात्री लोक एकत्र येऊन अशा प्रश्नोत्तरांच्या मैफिली ऐकत.'कोडे-उकल' ही लोकाभ्यासाची पद्धत होती. त्यामुळे शहाणपणा, बोध व मनोरंजन तिन्ही साधले जात. संत परंपरेच्या प्रभावामुळेही 'भेद' उलगडणारे गीत-संवाद प्रचलित झाले.

कोणत्या जिल्ह्यांत प्रचलित?

सोलापूर इथे भेदिक कवितेचे फड मोठ्या प्रमाणात भरत असत.

अहमदनगर (पारनेर तालुका)-स्थानिक शाहिरांच्या गटांनी कलगी तुरा/भेदिक सादर केले.

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर-तमाशा परंपरेमुळे इथेही पथके प्रसिद्ध. ग्रामीण महाराष्ट्र -अनेक ठिकाणी अजूनही जत्रांमध्ये व उत्सवांत कधीकधी सादर होत असतात.

सध्या सुरू असलेले उपक्रम

अनाहद फाउंडेशनसारख्या संस्था कलाकारांचे प्रोफाइलिंग, रेकॉर्डिंग करतात. आकाशवाणी केंद्रे काही कलाकारांच्या गटांना व्यासपीठ देतात.

डिजिटल माध्यमे (YouTube, Facebook) यावर अनेक भेदिक लावणी व कलगीतुरा रेकॉर्डिंग उपलब्ध.

सांस्कृतिक महोत्सव/विद्यापीठे -लोककला अभ्यासाच्या संदर्भात भेदिकाचे सत्र ठेवले जाते.

उल्लेखनीय काव्य

भेदिक कवितेत कोड्यांचा मोठा वापर आहे.

उदा.-''वडील-आई नसताना जन्मलेला कोण?''

उत्तर : ब्रह्मा/आकाश.

''शेपटीने आहार करणारा नर कोण?''

उत्तर : अग्नी.

ही कोडी रूपकात्मक, पुराणसंदर्भित असतात आणि श्रोत्यांना विचार करायला लावतात.

अल्पपरिचित पण महत्त्वाच्या गोष्टी

भेदिकाला 'अध्यात्मिक लावणी' म्हटले जाते.

शिव-शक्ती तत्त्वचर्चा हे मुख्य आधारस्थान.

वाद्यांची विशेष साथ : तुणतुण्याचा 'ड्रोन' (सतत आवाज) यामुळे आध्यात्मिक वातावरण.

रात्रभराचे फड : एकेकाळी संपूर्ण रात्र कार्यक्रम चालायचा, आज मात्र वेळ कमी झाला आहे.

सध्याची स्थिती

घटते अस्तित्व -तमाशाचा लोप, सिनेमे-टीव्ही मनोरंजन यामुळे भेदिक जवळपास विस्मृतीत.

काही ठिकाणी जिवंत परंपरा-अजूनही काही गावांमध्ये जत्रेतून पथके सादर करतात.

दस्तावेजीकरण प्रयत्न-एनजीओ, शासकीय लोककला अकादमी, संशोधक प्रयत्नशील.

संरक्षणाची गरज-आज ही कला जिवंत ठेवण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे.

सर्वोत्तम कलाकार कोण?

ऐतिहासिक काळात : राम जोशी, अनंत फंदी (तुरा पक्ष), प्रभाकर, परशुराम, होनाजी, पठ्ठे बापूराव (कलगी पक्ष).

आधुनिक काळात : लहु दादा कदम व समूह, शिवाजी



थानगे व समूह, तसेच काही इतर ग्रामीण शाहिरांचे गट उल्लेखनीय आहेत.

भेदिक हा महाराष्ट्राच्या लोककला वारशातील एक

नोंद

सातारा जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेला पाचगणीसारख्या थंड हवेच्या ठिकाणामुळे एक वेगळी ऐतिहासिक परंपरा आहे. १८९५ मध्ये सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल सुरू करण्यात आले. त्यानंतर अनेक इंग्रजी शाळा पाचगणीत सुरू झाल्या व पाचगणी इंग्रजी शाळांचे शहर म्हणून महाराष्ट्रात किंबहुना देशभर ओळखले जाऊ लागले.

अद्वितीय, पण आज धोक्यात आलेला ठेवा आहे. तो केवळ मनोरंजनासाठी नसून समाजबोध, अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि लोकशिक्षणासाठी उपयोगी ठरलेला आहे. त्याचे जतन करण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश, सांस्कृतिक महोत्सवांत स्वतंत्र सत्र, डिजिटल रेकॉर्डिंग व अर्काइव्ह तयार करणे यांसारखे उपक्रम आवश्यक आहेत.

हैबतीबाबा यांचे जीवनकार्य

हैबतीबाबा हे संत, विचारवंत व कवी होते. ते मुख्यत्वेकरून महाराष्ट्रात संत परंपरेत ओळखले जातात. त्यांचा कार्यकाळ मुख्यत्वे १७ वे-१८ वे शतक असा मानला जातो. त्या काळात महाराष्ट्रात संत परंपरा, वारकरी संप्रदाय तसेच शाहिरी परंपरेचा प्रभाव दिसतो. हैबतीबाबांनी संतपरंपरेतील नामदेव, तुकाराम, एकनाथ यांच्याप्रमाणे समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अन्याय याविरुद्ध उपदेश केले. लोकांमध्ये समता, भक्तिभाव आणि नैतिक मूल्ये रुजवण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे प्रमुख कार्य म्हणजे कलगी तुरा. याशिवायही त्यांनी अनेक अभंग, ओव्या व रचना केल्या होत्या. कलगी तुरा हा एक ग्रंथ आहे. तो मुख्यतः शाहिरी परंपरेत लिहिलेला असून त्यात तात्त्विक, धार्मिक आणि सामाजिक संदेश आहे. कलगी म्हणजे डोक्यावरची शोभेची पिसे, तर तुरा म्हणजे शस्त्र. या नावातून मानवाच्या जीवनात शोभा व पराक्रम दोन्ही असावेत, असा संदेश सूचित होतो.

साहित्यिक वैशिष्ट्ये

भाषा ओव्या व अभंग शैलीतील आहे. लोकांना समजेल अशा सोप्या, प्रासादिक भाषेत विचार मांडले आहेत. समाजातील अन्याय, लोभ, ढोंगीपणा यावर कठोर टीका केली आहे. भक्ती, सत्य, प्रामाणिकपणा, शौर्य व समतेचा संदेश दिला आहे.

तात्त्विक आशय

अध्यात्म व व्यवहार यांचा समन्वय.
धर्म म्हणजे आडमुठेपणा नसून, माणुसकी व सेवा आहे, हा विचार. माणसाने पराक्रम (तुरा) व साधना (कलगी) या दोन्ही गोष्टी जीवनात जोपासल्या पाहिजेत, ही शिकवण.

महत्त्व

हैबतीबाबा व त्यांचा कलगी तुरा हे वारकरी व शाहिरी परंपरेतील एक महत्त्वाचा दुवे आहेत. लोकसाहित्याच्या माध्यमातून त्यांनी समाजाला योग्य दिशा दाखवली. आजही कलगी तुरा लोकांना प्रेरणा देतो.
कलगी तुरामधील निवडक ओव्या व अर्थ

भूतदया परमो धर्म।
अहंकार पाप महाधर्म।।
अर्थ : सजीवांवर दया करणे हाच खरा धर्म आहे. अहंकार करणे हे मोठे पाप आहे.
जो देईल तो देव जाणावा।
जो घेईल तो भिकारी ठरावा।।
अर्थ : देणारा (दान करणारा) माणूस देवासारखा आहे; पण सतत घेणारा माणूस भिकारी ठरतो.
जग जाहले भोंदूंचे।
फसले साधुसंतांचे।।
अर्थ : जगात खोटे, ढोंगी लोक वाढले आहेत. त्यामुळे खरी साधुसंतांची परंपरा हरवली आहे.
जगी ठेवा नीती व सत्य।
बाकी सगळे आहे मिथ्या।।
अर्थ : जगात खरी संपत्ती म्हणजे नीती आणि सत्य आहे. बाकी सर्व नाशवंत आहे.
कलगी तुरा हा खरा शिरपेच।
तोच शोभतो वीरांच्या मस्तक।।
अर्थ: पराक्रम (तुरा) आणि सद्गुण (कलगी) यांनी सजलेला जीवनमुकुट हाच खरा अलंकार आहे.

या ओव्यांतून दिसते, की हैबतीबाबा हे समाजसुधारक, संतविचारवंत आणि परखड टीकाकार होते. त्यांनी लोकांना सत्य, दया, पराक्रम आणि माणुसकी यांचा संदेश दिला. अगाध ज्ञानाचे भांडार, विशाल, कुशाग्र, प्रगल्भ आणि सर्वसंग्राहक बुद्धिमत्तेच्या जोरावर सुमारे एक लाख साठ हजार कवने तयार करून समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या हैबतीमहाराज यांचे समाधीस्थळ पुसेसावळी येथे आहे. त्यांचा जन्म इ.स.१७९४ साली सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात डिस्कळ येथे घाडगे घराण्यात झाला. सहा-सात वर्षांचे असताना त्यांनी गुराख्याचे काम केले आहे. त्या वेळी ते गोपाळ गीते गुणगुणत. गुरे राखणे हे त्यांचे आवडते काम

सातारा जिल्ह्याच्या उत्तर सरहद्दीवरून वाहणारी नीरा नदी पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यात सह्याद्रीच्या डोंगररांगांत उगम पावते. माणगंगा ही भीमा नदीची उपनदी माण तालुक्याच्या वायव्य भागात उगम पावून आग्नेय दिशेस वाहत जाते व पुढे सांगली जिल्ह्यात प्रवेश करते. म्हस्कोबाच्या डोंगराळ भागात उगम पावणारी येरळा नदी कोरेगाव व खटाव या तालुक्यांतून वाहत जाऊन पुढे सांगली जिल्ह्यात प्रवेश करते.

होते. त्यांच्या कवनशक्तीची माहिती कुणालाही नव्हती. त्यामुळे त्यांचे कवित्व बरेच दिवस अज्ञातच राहिले. सर्व विषयांचे अध्ययन करून सुमारे १२ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर त्यांनी निरनिराळी कवने लिहिली. कल्पकतेचा एक नमुना म्हणून त्या काळी त्यांच्याकडे पाहिले जात होते. कंस वधावर 'चुडा कटाव' या शिवाय महाभारतातील गजगौरीव्रत, विराटपर्व आदी विषयांबरोबर रामायणातील सीताहरण इत्यादी विषयांवर हैबती महाराजांनी बहारदार कवने केली आहेत. प्रारंभी त्यांच्या काव्यगुणांची उपेक्षाच झाली. मात्र, त्यांची प्रासादिक व रसाळ कवने पाहून त्यांचे आईवडील थक्क झाले होते. त्रिपुटी हे साधुसंतांचे स्थान म्हणून ख्याती पावलेले होते. तेथे जाण्याचा हट्ट त्यांनी आईवडिलांजवळ केला होता. अशा या संतपुनित गावात येऊन राहणे ही त्यांच्या आयुष्यातील पहिली महत्त्वाची घटना होती. तेथे ते गोपाळनाथांचा उपदेश एकाग्रचित्ताने ऐकत. खटाव तालुक्यातील पुसेसावळी हे गाव मोठे व्यापारीपेठ असलेले. त्या वेळी धान्याची मोठी बाजारपेठ येथे होती. या गावात अमृता कारंडे हा वारकरी पंथाचा निष्ठावंत अनुयायी होता. हैबती महाराजांच्या कवनांचे चीज पुसेसावळीसारख्या मोठ्या गावात होईल व अशा सत्पुरुषाच्या निवासाने पुसेसावळीचा लौकिक वाढेल म्हणून त्यांनी हैबती महाराजांना पुसेसावळीला आणले. हैबती महाराजांच्या पुराणाचे आणि तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले. ज्यामध्ये एखाद्या लोकप्रिय विषयाची मनोरंजक माहिती आहे. गूढ प्रश्नाची उकल आहे, अशा प्रकारची कवने करण्यास त्यांनी प्रारंभ केला. अमृता कारंडे व हैबती महाराजांची भेट ही हैबती महाराजांच्या आयुष्यातील दुसरी महत्त्वाची घटना. त्रिपुटी सोडून हैबती महाराज पुसेसावळीस आले आणि त्यांचे जीवितकार्य सुरू झाले. त्यांच्या कार्याचा व्याप प्रचंड वाढला. तमाशाची लोकप्रियता व प्रचाराचे साधन यादृष्टीने तमाशाची उपयुक्तता हैबती महाराजांना पटली होती. तमाशातील कवनांची पद्धती तशीच ठेवून त्यांनी विशिष्ट काव्यरचना केली. तमाशातील कवनांप्रमाणे त्यांनी लावण्या, कटाव, फटके आदी काव्यप्रकार रचले. त्यांनी केलेली कलगी पक्षाची कवने प्रभावी ठरली. त्यांच्या विद्धत्तेमुळे ते नेहमीच अजिंक्य ठरले. हैबती महाराजांना 'कलगीसम्राट' ही पदवी प्राप्त होण्याला त्यांची आध्यात्मिक कवनेच कारणीभूत ठरली. त्यांनी कलगी प्रचारासाठी शिष्य तयार केले. शृंगार आणि अध्यात्म यांचे मनोज्ञ मिश्रण होऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले. कवनांच्या जोरावर अज्ञी चेतवण्याची त्यांची ख्याती होती. वनस्पतीशास्त्र, शरीरशास्त्र, प्राणिशास्त्र आदी अनेक विषयांवर हैबती महाराजांनी कवने लिहिली आहेत. आज सर्व शास्त्रांचा अभ्यास मातृभाषेतून व्हावा म्हणून प्रयत्न केले जात आहेत. अशा वेळी हैबतीमहाराजांनी केलेली कामगिरी विशेष महत्त्वाची वाटते. पुसेसावळीत त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. मात्र, प्रपंचात त्यांना नैराश्य आले. हैबती महाराजांचे प्रमुख आध्यात्मिक कवन 'तुर्त बोध' या नावाचे आहे. हैबती महाराजांचा प्रथम व मुख्य शिष्य अमृता कारंडे. ज्योती मुळे व गोपाळा हे हैबती महाराजांचे मुख्य सुरते होते. अगाध ज्ञानाचा हा दिवा मार्गशीर्ष नवमी १८७४ साली मावळला. अशा या शाहीर हैबती महाराजांच्यामुळे पुसेसावळी हे भेदिक कवनाचे केंद्र बनले.

(लेखक लोकसाहित्याचे अभ्यासक आणि भेदिक तज्ज्ञ आहेत.)



सातारा शहराची स्थापना छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती थोरले शाहूमहाराज यांनी केली. औरंगजेबाच्या कैदेतून सुटून आल्यावर शाहू महाराजांनी सातारच्या किल्ल्यावर (अजिंक्यताऱ्यावर) आपला राज्याभिषेक करवून घेतला व सातारच्या किल्ल्यावरूनच त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. अडचणीत सापडलेले मराठा साम्राज्य शाहू महाराजांच्या समयसूचक धोरणांमुळे हळूहळू मोकळा श्वास घेऊ लागले.



आदित्य फडके
मो.: ९८२२१०८७५३

वैशिष्ट्यपूर्ण मंदिरे

सातारा जिल्ह्यात केदारेश्वर मंदिर, परळी; रामेश्वर मंदिर, गुरसाळे आणि भैरवनाथ मंदिर, किकली ही मंदिरे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. या मंदिरांमध्ये काही घटक समान असल्याचे दिसते.

सातारा जिल्ह्यातील प्राचीन वारसा-स्थळांना भेटी देताना लिखित पुराव्यांचा आधार मिळाल्यावर त्यातील माहिती अध्ययनाचे नवे दालन उघडे करते, ज्यामधून आत प्रवेश करताना नव्या भावविभोर चैतन्याची प्रचीती येतेच; परंतु मंदिरे ही प्राचीन पुरावेक्षम वास्तू आहे याचा बोध न झाल्यामुळे वास्तूंच्या जीर्णोद्धार रूपाने मंदिरांचे विद्रुपीकरण झालेले दिसते. परिणामी, नव्याने केलेल्या लेपनांमुळे शिलालेख, शिल्पे यांसारखे मौल्यवान पुरावे नष्ट होतात; आणि केवळ नवे मंदिर समोर दिसते. ही परिस्थिती केवळ सातारा जिल्ह्यातच आहे असे नाही तर महाराष्ट्रात, भारतात देखील हा प्रकार पाहायला मिळतो. त्यातील सातारा जिल्ह्यातील काही मंदिरांचा आढावा या ठिकाणी घेतला आहे.

मंदिरवैभव

काही घटक समान

सातारा जिल्ह्यात प्राचीनतम स्थानांचा उल्लेख करताना रहिमतपूर, वाई आणि कराड गावांचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. सातारा जिल्ह्यातील प्राचीन वास्तूंचा आढावा घेतला, तर साधारण १२ व्या शतकापासून आजपर्यंत इथे मंदिरांची बांधणी चालू आहे. यातल्या १३ व्या शतकातील मंदिरांचा उल्लेख करताना केदारेश्वर मंदिर परळी, रामेश्वर मंदिर गुरसाळे, कात्रेश्वर मंदिर, कातरखटाव आणि भैरवनाथ मंदिर, किकली या मंदिरांमध्ये काही घटक समान असल्याचे दिसते. त्यांची माहिती घेणे अगदीच रोचक असल्याचे जाणवते.

केदारेश्वर मंदिर (परळी)

सज्जनगड किल्ल्याच्या पायथ्याला, परळी गावाच्या मागे केदारेश्वर मंदिर समूह आहे. मुख्य मंदिराला मंडप, अंतराळ आणि गर्भगृह आहेत. मंडपाच्या दर्शनी अर्ध

१९०४ चा सहकार कायदा झाल्यानंतर, सन १९०७ मध्ये सातारा जिल्ह्यात पहिली प्राथमिक विविध कार्यकारी संस्था माण तालुक्यातील बोथे या गावात स्थापन झाली. १९१७ मध्ये कराड येथे द कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना झाली, जी नंतर कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये रूपांतरित झाली.

नोंद

भिंतींवर कामशिल्पे आणि काही वादक आणि नर्तक-नर्तकी यांची शिल्पे याच भागावर दिसतात. मंडपात सर्वांत कोरीव असलेल्या मंडपामध्ये रंगशिळा आहे. अंतराळाच्या बाजूला, मंडपात दोन्ही भिंतींवर मोठी देवकोष्ठे आहेत. ज्यामध्ये डाव्या कोनाड्यात गणेशाचे तर उजव्या कोनाड्यात विष्णू-लक्ष्मीचे शिल्प आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार त्रिशाखायुक्त असून त्यावर कोणतेही द्वारपाल नाहीत. ललाटबिंबावर गणेश आहे. केदारेश्वर मंदिर केवळ एकच गर्भगृह असलेले मंदिर आहे. गर्भगृहात



मध्यभागी शिवलिंग असून उजव्या भिंतीवर दीड मीटर उंचीवर पीठासारखा भाग तयार केला आहे. त्यावर कोणत्या देवतेची मूर्ती नाही.

केदारेश्वर मंदिरानजीक, आणखी एक मोठे मंदिर आहे. या मंदिराला 'देवी मंदिर' म्हणतात. याचीही रचना केदारेश्वर मंदिराच्या प्रतिकृतीसारखीच दिसते. मंडपातील अंतराळाच्या बाजूच्या भिंतीवर मोकळी देवकोष्ठे आहेत. अंतराळातील खांब त्रिशाखायुक्त आहेत, त्याच्या खालच्या बाजूला द्वारपालांचे केवळ अंकन दिसते. गणेशपट्टीवर कोणतेही शिल्प नाही. गर्भगृहात मध्यभागी शिवलिंग असून त्याच्या मागे १८ व्या शतकातील महिषमर्दिनीचे भग्न शिल्प आहे. मंदिराच्या बाह्यांगाची पाहणी केल्यास केदारेश्वर मंदिराइतकेच हे मंदिर जुने असल्याचे दिसते. केदारेश्वर मंदिराचे शिखर आणि बाह्यभागाचे मराठा कालखंडात नूतनीकरण झाल्यामुळे त्याला घडीव दगडांचे चिरे, शिखराला भाजलेल्या विटा आणि त्यावर चुन्याचा गिलावा करून त्यावर नैसर्गिक रंगांचे रंगकाम केलेले दिसते. मंदिराच्या प्रांगणात पुढील बाजूस मोठ्या, उंच चौथऱ्यावर आणि घडीव तीन दगडांमध्ये (मान/विजय) स्तंभ उभारलेला आहे. याचे प्रयोजन नेमके कशासाठी होते याबद्दल अधिकृत पुरावे मिळत नाहीत. मात्र असे स्तंभ विजयाप्रीत्यर्थ घडवले जात असावेत, असा समज आहे. स्तंभाच्या शेजारी जमिनीवर सदाशिवाचे लिंग आहे. त्यावर सहा मुखवटे दिसतात. याच्याजवळच काही वीरगळ आणि सतीशिळा ठेवलेल्या आहेत. त्याच्या सुरुवातीलाच इथल्या स्तंभाचा पडलेला भाग दिसतो. केदारेश्वर मंदिराच्या उजव्या बाजूला, उघड्या चौथऱ्यावर गणेश आणि शिवलिंग एका चौथऱ्यावर आणि त्यांच्या समोर नंदी दुसऱ्या चौथऱ्यावर बसविलेले दिसतात. त्याच्याही उत्तर बाजूला मोठ्या शिळा एकावर एक ठेवून एक चौरसाकृती बांधणी केली आहे. मुख्य मंदिराच्या सर्वांत उजवीकडे एका मोठ्या कुंडाचा आज फक्त खड्डा शिल्लक आहे. आता त्यातले काही घडीव दगड फक्त दिसतात.

रामेश्वर/रामलिंग मंदिर (गुरसाळे)

गुरसाळे गावात दोन मंदिरे मुख्य आहेत. एकूण पाच मंदिरे या भागात असल्याचे ग्रामस्थ सांगतात. त्यातील सोमेश्वर मंदिर गावातच असून ते पूर्णतः नव्याने बांधलेले असले तरी मूळ मंदिर रामेश्वर मंदिराइतकेच प्राचीन आहे. रामेश्वर मंदिर प्रशस्त आवारात मध्यभागी चौकोनी कुंडासह १३ व्या शतकात बांधलेले आहे. त्याच्या कळसाचे बांधकाम अलीकडच्या काळात केलेले असून त्याला रंगरंगोटी केली आहे. मंदिरामध्ये जमिनीवर फरशीचे काम केले आहे. त्याच्या खालच्या बाजूस लहान रंगशिळा होती, जी आता दिसत नाही. मंदिराची अर्धमंडप, अंतराळ आणि गाभारा अशी रचना आहे. या

नोंद

राज्याच्या शिक्षण चळवळीत सातारा जिल्ह्यातील पातक तालुक्यातील नेते बाळासाहेब देसाई यांचा मोठा वाटा होता. १९६० मध्ये महाराष्ट्र सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळात देसाई हे शिक्षण मंत्री होते. १९६२ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्यात त्यांचा पुढाकार होता. बाळासाहेब देसाई यांनी त्यापूर्वी राज्याचे गृहमंत्री म्हणूनही काम पाहिले होते.

मंदिरातील मंडपाच्या बाह्य-अर्धभिंतीवर शृंगार शिल्पे आणि अन्य काही अशी शिल्पे आहेत, जी उपरोक्त दोन्हीही मंदिरांमध्ये आढळत नाहीत. मंडपामध्ये दक्षिणोत्तर आणि पूर्व बाजूला दोन अशी चार देवकोष्ठे आहेत. उत्तरेकडील देवकोष्ठात शेषशायीची मूर्ती आहे. त्यावर अद्याप संशोधन झालेले नाही. गर्भगृहात मध्यभागी जमिनीवर शिवलिंग आहे, तर केदारेश्वर आणि भैरवनाथ मंदिरामध्ये असणारा ओटा या मंदिरातही उजव्या बाजूच्या



भिंतीवर आणि तितक्याच उंचीवर दिसतो. मंदिरासमोरच मोठी बारव आहे. त्यामध्ये मंदिरातून आणि त्याच्या समोरच्या बाजूने (पूर्व-पश्चिम बाजूने) उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. कुंडात उतरल्यानंतर त्याच्या चारही बाजूने फिरण्यासाठी वाट आहे. त्याच्या बाजूच्या भिंतींवर चौदा देवकोष्ठे आहेत. पूर्वेकडील बाजूने उजव्या पहिल्या देवकोष्ठात भैरवाची मूर्ती आहे. इतर काही देवकोष्ठांत मूर्तींचे आणि मंदिरांचे इतर भाग ठेवलेले दिसतात; परंतु त्यात पूर्वी मूर्ती असाव्यात कारण प्रत्येक कोनाड्यात मागील भिंतीलगत पीठ आहे.

भैरवनाथ मंदिर (किकली)

किकली गावामध्ये भैरवनाथ मंदिर-प्राकारात एकूण चार मंदिरांचा समूह आहे. त्यातील भैरवनाथ मंदिर जोत्यावर बांधलेले असून त्याचा आकार फुलीसारखा आहे. हे मंदिर त्रिदल मंदिर आहे हे ध्यानात ठेवलं पाहिजे. या मंदिराचा खुलामंडप, मंडप आणि प्रत्येक गाभाऱ्याला अंतराळ असे तीन अंतराळ आणि तीन गर्भगृह असा तलविन्यास आहे. याच्या खुल्या मंडपाची रचना ही खिद्रापूरमधील कोपेश्वर मंदिराच्या मंडपासारखी असली तरी तो विलग नसून चौकोनी आणि बारा स्तंभांवर तोललेला आहे. याच्या बाह्य अर्धभिंतीवर शृंगारिक, नृत्य-वाद्यमग्न स्त्री-पुरुष यांची शिल्पे आहेत. त्याच्या खालच्या बाजूस व्यालांचे प्रकार आणि शिखरांची मालिका आहे. मंदिराच्या मंडपात प्रवेश केल्यावर उजव्या बाजूच्या गर्भागारात भैरवनाथाची मूर्ती आहे. याच्या अंतराळ कक्षात डाव्या कोनाड्यात साधूचे, तर उजव्या कोनाड्यात शिव-पार्वतीचे शिल्प आहे. ही दोन्हीही शिल्पे अलीकडच्या काळात घडविलेली दिसतात. गर्भगृहाच्या गणेशपट्टीवर गणेशाचे शिल्प आहे. पंचशाखायुक्त असलेल्या द्वारावर कुबेर, शैव द्वारपाल, चवरीधारिका, गंगा-यमुना आणि अन्य (परिवार) देवता यांची शिल्पे आहेत. अशीच शिल्पे प्रस्तुत मंदिराच्या अन्य दोन गाभाऱ्याच्या द्वारांवर देखील आहेत. मंडपामध्ये, मध्यभागी केदारेश्वर मंदिर(परळी) येथील चौकोनी शिळेसारखी शिळा असून त्यावर रंगशिळा आहे. त्याच्या बाजूच्या चार खांबांवर खालच्या बाजूला भिक्षाटन शिव, दर्पणा, विष्णू, मर्कटपीडीता, मृदंगवादिका अशी काही शिल्पे आहेत, तर बहुतांशी खांबांवर रामायण-महाभारतातील प्रसंग, वामन-बळी, नटराज अशी शिल्पे आहेत. प्रस्तुत मंदिर महाराष्ट्र पुरातत्त्व विभागाने पुनर्बांधणी केले असून त्याचे मूळ रूप तसेच ठेवले आहे. भैरवनाथाच्या गाभाऱ्याव्यतिरिक्त अन्य दोन्ही गाभाऱ्यांत १८ व्या शतकाच्या सुमारास शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. त्यामध्ये कोणत्या देवता होत्या हे समजू शकत नाही; परंतु शैवद्वारपाल आणि गणेशपट्टी यांची रचना पाहिल्यावर त्यामध्ये शिवाशी निगडित शिल्पे असावीत, असे संशोधकांना वाटते.

मंदिराच्या प्रांगणात मुख्य मंदिराशेजारी आणखी एक त्रिदल मंदिर भग्नावस्थेत आहे. त्याच्या उजव्या आणि डाव्या गर्भगृहात शिवलिंगे आहेत. तिन्ही गर्भगृहांच्या चंद्रशिळा शिल्लक आहेत. या शिळा केदारेश्वर आणि भैरवनाथ मंदिर यांच्याशी साधर्म्य दाखवतात. या भग्न मंदिरासमोर दुसरे आणखी एक भग्न मंदिर आहे, त्याच्या अंतराळ आणि गर्भगृहाच्या काही भिंती आणि खांब शिल्लक आहेत. हे मंदिर एकदल असून त्याला चौकोनी

फलटण संस्थानचे राजे मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी आपल्या रयतेचे आर्थिक प्रश्न सोडविण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यासाठी आपल्या संस्थानात सहकार चळवळीला प्रोत्साहन दिले. त्यासाठी संस्थानात सहकारी पतपेढी व सोसायट्या स्थापन करण्यात आल्या. १९१८ साली दि फलटण बँक लिमिटेडची स्थापना करण्यात आली, तसेच १९२६ साली श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापन केली.

मंडप अलग आहे. याच्या बाजूला हत्तींची दोन सुटी शिल्पे आहेत. मंदिराचा मुख्य मंडप बाजूने अर्धा खुला आहे. एक अर्थाने त्याची रचना भैरवनाथ मंदिरासारखीच आहे. मुख्य मंदिराच्या मागच्या बाजूस आणखी एक छोटेखानी मंदिर आहे. यामध्ये काही देवतांच्या मूर्ती आहेत. मंदिरालगत शाळेची इमारत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार ही इमारत मंदिर आवारातील कुंडावर बांधलेली आहे. त्याची रचना आजमितीला समजू शकत नाही; परंतु त्याला पायऱ्या होत्या, असे मात्र ऐकायला मिळते. संशोधकांच्या मतानुसार त्याची रचना गुरसाळे येथील कुंडासारखीच असावी. भैरवनाथ मंदिरासमोर नवीन बनविलेली एक दीपमाळ आणि स्तंभाचा एक भाग एकत्र सांधून तयार केलेला भाग आहे.

मंदिराच्या आवारभिंतींना टेकवून किकली गावातील अनेक वीरगळ आणि सतीशिळा आणून ठेवलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील पहिले वीरगळ-गाव म्हणून या गावाचा मान आहे.

एकूणच या सर्व मंदिरांचा विचार केल्यावर असे लक्षात येते, की हीच मंदिरे किल्ले आणि लेणी यांच्या बरोबरीने सातारा जिल्ह्यातील आपला प्राचीन वारसा बाळगून आहेत; ज्यांना पाहणे, समजून घेणे आणि जतन करणे हे स्थानिक, पर्यटक आणि अभ्यासक या सर्वांचे कर्तव्य आहे.

(लेखक पुरातत्त्व संशोधक आहेत.)



नोंद

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळालं आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील प्रतापगडासह ११ किल्ल्यांचा समावेश असून, तामिळनाडूमधील जिंजी किल्ल्याचाही यात समावेश आहे. महाराष्ट्रातील इतर किल्ले रायगड, राजगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे आहेत.



डॉ. अनुपमा निरंजन उजगरे
मो.: ९९२०१०२०८९

काही ऐतिहासिक नोंदी

सातारा जिल्ह्याच्या एकूण विकासात आणि शैक्षणिक प्रसारात ख्रिस्ती समाजाचेही योगदान आहे. रेव्हरंड ना. वा. टिळक यांचे साताऱ्यात वास्तव्य होते याबाबत नोंद घेणारा लेख.

१८३४- अमेरिकन मराठी मिशनने साताऱ्यातली पहिली निवासी प्राथमिक शाळा सुरू केली. मिस इजाबेल न्युजंट ह्या पहिल्या मुख्याध्यापिका होत्या. मुलांच्या आरोग्यासाठी वैद्यकीय चाचणी, औषधे, टॉनिक्स ह्या बाबींकडे त्यांनी विशेष लक्ष पुरवले. ह्याच वर्षी शासन मान्यता मिळून शाळेचे नाव 'युनियन (प्राथमिक) स्कूल' असे ठेवण्यात आले.

१८३९-रेव्हरेंड बर्जेस पत्नीसह साताऱ्यात आले. येथे त्यांनी शालेय पाठ्यपुस्तके, युरोपियन मिशनरींना मराठी शिकणे सोपे व्हावे म्हणून मराठी-इंग्रजी शब्दकोश आणि व्याकरणाची पुस्तके तयार केली. त्यांच्या पत्नी येथे शिक्षिका होत्या.

१ जून १८४९-येथे अमेरिकन मिशनच्या ठाण्याची स्थापना करून त्याच वेळी पहिली मुलींची शाळा सुरू केली. रेव्हरंड विल्यम वूड आणि ल्यूसी वूड ह्यांनी शिक्षणकेंद्राची धुरा सांभाळली. तीन वर्षांनी ल्यूसी वूड ह्यांनी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देऊन त्यांच्यासाठी आणखी शाळा सुरू केल्या. ह्या अतिश्रमाने त्यांचे अकाली निधन झाले.

१८८२-रेव्हरंड कासिम महंमद ढालवाणी हे सातारकर. उपलब्ध इंग्रजी बायबल-कोशांच्या आधारे त्यांनी अनुवाद करून बायबलचा सचित्र मराठी कोश तयार केला. रेव्हरेंड हेन्री ब्रूस ह्यांनी डोळ्यांत तेल घालून तपासला. बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटीने प्रकाशित केलेला ४७३ पृष्ठांचा हा पहिला 'मराठी बायबल सचित्र कोश' महत्त्वाचा मानला जातो.

१९१७-कवी नारायण वामन टिळक येथे दोनदा वास्तव्याला होते. 'ख्रिस्तायन' हे महाकाव्य लिहिण्याचा त्यांचा मानस नगरमध्ये निवांतपणा मिळत नसल्याने पूर्ण होत नव्हता. रेव्हरंड डॉ. रॉबर्ट ह्यूम ह्यांनी साताऱ्यात असलेली त्यांची कन्या

सातारा जिल्ह्यातील सर्वांत जुने ज्ञात ठिकाण म्हणजे कराड आहे. इ.स.पूर्व २०० च्या शिलालेखांमध्ये करहकडा असे लिहिलेले आहे. तेच कराड असावे. या शिलालेखांमध्ये मध्यप्रदेशातील जबलपूरजवळील भरहुत स्तूपावर कराडच्या यात्रेकरूंनी दिलेल्या खांबांच्या भेटवस्तूंची नोंद आहे. कराडच्या नैऋत्येस सुमारे तीन मैल अंतरावर सापडलेल्या बौद्ध गुहांच्या गटाने याची पुष्टी केली आहे.

नोंद



मिसेस ली हिला सांगून गावाबाहेरचा बंगला टिळकांसाठी तयार करवून टिळकांना सहकुटुंब तिकडे पाठवले. गेल्या गेल्या टिळकांनी 'ख्रिस्तायनाश्रम' अशी पाटी बंगल्यावर लावून लेखनाला प्रारंभही केला. बरीच अभंगरचनाही केली. संध्याकाळी शाळेच्या रिकाम्या वर्गात टिळक भारतीय परंपरेनुसार टाळचिपळ्या वाजवत नाचून भजन-कीर्तन करीत; परंतु अशाने भक्तीचे गांभीर्य नष्ट होते ह्या समजुतीने एक मिशनरीबाई टिळकांच्या उपासनेच्या वेळी वर्गाला टाळे ठोकत असे.

''तुकारामाच्या सेतुवरुनि आलो ख्रिस्तचरणी'' असे अभंगात म्हणणाऱ्या टिळकांना त्रास देणाऱ्या त्या मिशनरीबाईंना लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्र' मध्ये 'मंबाजी' म्हटले आहे. मग टिळक अंगणातच भजनकीर्तन करू लागले. त्याच सुमारास टिळकांना आजारपणामुळे मुंबईला जावे लागले. जाताना ते सातारकर ख्रिस्ती बंधूंना म्हणाले, ''स्वतःचं हक्काचं चर्च बांधा, तोवर मी इथे पाऊल ठेवणार नाही.''

नियतीने टिळकांना परतू दिले नाही.

चर्चबांधणीसाठीच्या अठरा हजार रुपये खर्चापैकी ख्रिस्ती समाजाने बारा हजार जमवले. उरलेली रक्कम वॉर्नर दांपत्याने अमेरिकेहून पाठवली. जागा घेण्यात 'मंबाजी' (इजाबेल न्युजंट) ने पुढाकार घेतला, तर 'टिळक मेमोरियल चर्च' हे नाव देण्यात समाजाने पुढाकार घेतला.

१९३४-अमेरिकन परिचारिका मिसेस लुईस फिशर ह्यांनी सातारा आणि आसपासच्या खेड्यांत मोफत औषधोपचारासह आरोग्य चळवळ सुरू केली.

१९४२-शाळांसाठी आरोग्य योजना चालू केली.

१९४६ शिशुसंगोपन, माता-बाल कल्याण केंद्र, कामगार महिलांसाठी आरोग्य व्याख्यानमाला सुरू करून, सिसल फायबरपासून चटया, गालिचे, चपला, बास्केट्स अशा काही वस्तू तयार करवून स्त्रियांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग 'अमेरिकन मराठी मिशन'ने उपलब्ध करून दिला.

१९७४-सातारा शहरापासून सात मैलांवर एका वटवृक्षाखाली कुष्ठरोगी तपासणीची सुरुवात लुईस फिशर ह्यांनी केली. रोग्यांची संख्या चौदा हजार आढळली तेव्हा औषधसामग्री घेऊन त्या तेथे पोहचल्या. त्यांच्या मदतीस गांधीजींच्या आश्रमातले प्रशिक्षित अक्षय महंती आले. तिथल्या दोन खेडूतांनी आपली जमीन दवाखान्यासाठी दिली. लिलियन पिकेन ह्यांनी इमारत बांधकामात लक्ष घातले. रेव्हरंड ग्रीव्हज ह्यांनी महाबळेश्वर-पाचगणीच्या दोन वर्षांच्या वास्तव्यात कॉफीच्या झाडांची लागवड करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवले.

२०१२- अमेरिकन मराठी मिशनच्या द्विशताब्दी स्मरणिकेच्या संपादनानिमित्त मी आले असता टिळकांनी लावलेली 'ख्रिस्तायनाश्रम' ही पाटी मला दिसली नाही. तिचे साहित्य दृष्ट्या असलेले ऐतिहासिक महत्त्व मी मिशन संचालक श्री. रॉबर्ट ह्यांच्या लक्षात आणून दिले. त्यांनीही तत्परतेने मी दिलेल्या संक्षिप्त मजकुराची पाटी मला हवी तशी दोन तासांत तयार करवून माझ्याच हस्ते लावूनही घेतली.

(लेखिका ख्रिस्ती साहित्याच्या अभ्यासक आहेत.)

नोंद

रावबहादूर दत्तात्रेय बळवंत पारसनीस हे महाराष्ट्रातील एक इतिहाससंशोधक व ऐतिहासिक साधनांचे संग्राहक होते. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ब्रिटिश सरकारने त्यांना 'रावबहादूर' हा किताब दिला. पारसनिसांचे घराणे मूळचे सातारा जिल्ह्यातील मलवडीचे होते. वडील बळवंतराव महसुली खात्याच्या नोकरीनिमित्त साताऱ्यास आले आणि स्थायिक झाले.

म. सा. प. शाहूपुरी शाखा

म.सा.प.शाहूपुरी शाखा १४ वर्षांपूर्वी सुरू झाली.

* गेली १२ वर्षे २७ फेब्रुवारी कुसुमाग्रजांची जयंती ते १४ मार्च विंदांची पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील पहिल्या मराठी भाषा पंधरवड्याअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.
* विभागीय साहित्य संमेलन/समीक्षा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. युवानाट्य संमेलनाचेही आयोजन.
* गेली ४ वर्षे सातारा साहित्य संमलेनाचे आयोजन. बाबा आमटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पहिले संमेलन झाले. या वेळी त्यांच्या कार्यास २ लाख २० हजार रुपये रोख मदत केली. दुसरे संमेलन मा. शरद पवार यांच्या पंचाहत्तरीनिमित्त घेण्यात आले. या वेळी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत केली.
* तिसरे संमेलन 'विज्ञान संमेलन' म्हणून आयोजित केले. या वेळी विज्ञान परिषदेला मदत करण्यात आली. यावर्षी कै. श्री. छ. सुमित्राराजे भोसले यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने साहित्य संस्कृती मंडळ व म.सा.प शाहूपुरी शाखेच्या वतीने २ दिवसांच्या संमेलनाचे आयोजन.
* व्याख्याने/कविसंमेलन/परिसंवाद इ. बरोबरच पुस्तकप्रकाशने, मान्यवरांच्या मुलाखती इ. कार्यक्रमांचे वेळोवेळी आयोजन.
* शिवार साहित्य संमेलनाचे गेली २ वर्षे आयोजन. शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये या संमेलनांचे आयोजन.

वाङ्मय मंडळ अंतर्गत विविध पुस्तकांवर चर्चा होतात. यात साहित्यिकांचा लक्षणीय सहभाग.

* मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून शासन स्तरावर प्रयत्न. मा. पंतप्रधान, मा. शरद पवार, मा. राज ठाकरे यांच्या बरोबर सातत्याने पत्रव्यवहार चालू.
* मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून पंतप्रधानांना १ लाख पत्रे पाठविली.
* अभिजात दर्जा मिळणेसाठी मा. आ. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि म.सा.प.पुणे, चे कार्याध्यक्ष श्री. मिलिंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे महाराष्ट्र सदन येथे धरणे आंदोलन केले.
* 'लेखक तुमच्या भेटीला' या उपक्रमा अंतर्गत विविध शाळांमध्ये लेखकांची विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने.
* कविवर्य बा. सी. मर्ढेकर यांचे मर्ढे या गावातील घर त्यांचा मुलगा श्री. राघव मर्ढेकर यांच्याकडून शाखेला मिळाले असून त्याची दुरुस्ती करून या नूतनीकरण केलेल्या घराचे व स्मारकाचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा नुकताच संपन्न झाला.
* दरवर्षी मर्ढे येथे बा. सी. मर्ढेकर यांची जयंती व पुण्यतिथी निमित्ताने विविध कार्यक्रमांचे अयोजन.

१३. सातारा जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिकांच्या घरांचे व स्मारकाची दुरुस्ती/सुशोभीकरण/पुतळा बसविणे इ. कामे प्रगतिपथावर.

* लेखन कार्यशाळा / सूत्रसंचालन कार्यशाळा इ. चे यशस्वी आयोजन.
* अ. भा. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड बिनविरोध व सन्मानाने व्हावी म्हणून शाखेतर्फे प्रथम म. सा. प., पुणे यांना प्रस्ताव दिला होता.
* मा. नरेंद्र दाभोळकर यांच्या नावाने सातारा नगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या निवड समितीवर शाहूपुरी शाखेला प्रतिनिधित्व.
* रयत शिक्षण संस्थेच्या आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन बरोबर शाहूपुरी शाखेच्यावतीने सामंजस्य करार करून कार्यक्रमांचे आयोजन केले.
* मर्ढे गाव कवितांचे गांव व्हावे म्हणून शासनस्तरावर प्रयत्न.
* बा. सी. मर्ढेकर यांच्या मर्ढे गावातील सरकारी स्मारकाचे काम व लोकार्पणासाठी शासनाकडे पाठपुरावा.
* शासनाने तयार केलेल्या मर्ढे गावातील बा. सी. मर्ढेकर यांच्या स्मारक समितीवर शाखेला प्रतिनिधित्व.

म. सा. प. शाहूपुरी शाखा

क्षणचित्रे...

















मावळा फौंडेशन, सातारा

* छ. शाहू महाराज थोरले यांची जयंती व पुण्यतिथीचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करणे.
* छ. शाहू महाराज थोरले यांचे कार्याचा प्रचार व प्रसार करणे.
* छ. शाहू महाराज थोरले यांच्या नावाने समाजातील व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देणे.
* छ. शाहू महाराज थोरले यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय स्तरावर 'छ. शाहूमहाराज फेस्टिव्हल'चे आयोजन करणे.
* छ. शाहू महाराजांच्या चरित्राचे संशोधन करून त्यांच्या जीवनावरील विविध पुस्तकांचे प्रकाशन करणे.
* साहित्यविषयक विविध कार्यक्रम आयोजित करणे, व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्र, साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.
* मराठी भाषा संवर्धन व वाढीसाठी प्रयत्न करणे.
* सामाजिक, साहित्य, कला-सांस्कृतिक, शैक्षणिक, पत्रकार, सहकार व अन्य क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे व आवश्यक ती मदत करणे.
* लोककला, नाट्य, सिनेमा अशा क्षेत्रांत काम करणाऱ्या कलाकारांना मोफत मार्गदर्शन करणे व प्रोत्साहन देणे. तसेच सामाजिक उपक्रमांवर आधारित लघुपट, चित्रपट, नाटके यांची निर्मिती करणे.
* वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथालयाची उभारणी करणे व त्याअनुषंगाने विविध प्रकारचे उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करणे.
* धर्मादाय स्वरूपाचे रुग्णालय उभारून समाजातील गरीब व गरजू रुग्णांची सेवा करणे. तसेच समाजातील गरीब रुग्णांना आवश्यक ते सर्व प्रकारचे वैद्यकीय साहाय्य करणे.
* मोफत वृद्धाश्रम, बालकाश्रम, शिशुगृहे, अनाथाश्रम चालविणे.
* नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या आपत्तीग्रस्तांना मदत करणे, तसेच मोफत मदत केंद्र चालविणे.
* समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या मदत करणे. तसेच शैक्षणिक साहित्य यांचा मोफत पुरवठा करणे. उदा. गणवेश, वह्या-पुस्तके.
* पुस्तके, संदर्भपुस्तके यांचे संकलन करून ग्रंथालय अथवा अभ्यासिकांद्वारे सदर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य करून प्रोत्साहन देणे.
* स्पर्धापरीक्षा विषयक मोफत मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करणे, तसेच सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका व ग्रंथालय सुरू करणे.
* गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे आयोजन करून पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.
* समाज प्रबोधनासाठी वेगवेगळ्या विषयांवर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे.
* शासनमान्य खेळांच्या विविध स्तरांवरील स्पर्धांचे आयोजन करणे व त्या यशस्वीपणे पार पाडणे, तसेच या क्रीडा प्रकारांमध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंना आवश्यक ती मदत मिळवून देणे व प्रोत्साहन देणे.
* सोशल मीडियाचा योग्य व प्रभावी वापर करणे बाबत समाजमाध्यमात जनजागृती करणे.
* मोफत सामुदायिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे अगर शासनामार्फत होणाऱ्या मोफत विवाह सोहळ्यांना मदत करणे,
* समाजातील अंध, अपंग, दिव्यांगासाठी न्यासामार्फत आवश्यक ते सर्व प्रकारचे कार्य करणे.
* विविध प्रकारच्या उद्योग, व्यवसायांसाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण मोफत देणे.

मावळा फौंडेशन, सातारा

क्षणचित्रे...



मावळा फौंडेशन व जयहिंद गणेशोत्सव मंडळ-गड स्वच्छता मोहिम



स्वराज्यविस्तारक छ. शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



स्वराज्यविस्तारक छ. शाहू महाराज जयंती



छ. शाहू महाराजांच्या पुतळ्याची स्थापना करण्याबाबत मंजुरीपत्र



मराठी साहित्य विभाग

मराठी भाषा, या भाषेला मिळालेला
अभिजात दर्जा, या भाषेचे महत्त्व
आणि सौंदर्य आणि मराठी भाषेला
विद्यमान काळात जाणवणारी
आव्हाने याची सखोल चर्चा



डॉ. सुनीलकुमार लवटे
मो.: ९८८१२७००९३

मराठी भाषेसमोरील आव्हाने

भाषा वापरली तरच टिकते. गेल्या अवघ्या ५० वर्षांत दोन हजार भाषा नष्ट झाल्या. मराठी भाषा मरू नये वाटत असेल, तर घरी-दारी, बाजारी सर्वत्र तिचा नि तिचाच वापर व्हायला हवा. तुम्ही जी भाषा वापरता, समोरचा तिचे अनुकरण करत असतो. त्यामुळे स्वत: मराठी बोला, लिहा, वाचा, म्हणजे मराठी समाज तयार होईल.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे हे शतकस्पर्शी ९९ वे संमेलन. मराठी भाषेस भारत सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ ला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला, या पार्श्वभूमीवर येणारे हे दुसरे साहित्य संमेलन. या संमेलन परंपरेचे जनकत्व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्याकडे जाते. यांनी मराठी ग्रंथकारांना एकत्र करून साहित्याचे प्रश्न सोडवण्याच्या इराद्याने ७ फेब्रुवारी १८७८ ला 'ज्ञानप्रकाश'मध्ये निवेदन देऊन यासंबंधीचे आवाहन केले होते. यानुसार ११ मे १८७८ रोजी पुण्याच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन पार पडले. ते संमेलनच मराठी साहित्य संमेलनांची गंगोत्री मानली जाते. मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी, पुणेची स्थापना करण्यामागचा उद्देश, या मंडळीच्या १८८१ च्या दुसऱ्या अहवालात नमूद आहे. ''पुस्तककर्त्यांनी पुस्तके लिहिण्याची मेहनत घेतल्यावर या पुस्तकांची योग्यता चांगली आहे, याविषयी लोकांच्या घरोघर जाऊन अभिप्राय मिळविण्याची खटपट करावी लागते व मग ते प्रसिद्ध करण्याकरता वर्तमानपत्रांकडे जावयाचे. या ग्रंथकारांच्या (साहित्यिक) मार्गांतल्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून मंडळी (संस्था) निघाली. हा उद्देश सर्वसंमत आहे.'' (न्यायमूर्ती गोविंद रानडे चरित्र-लेखक/प्रकाशक-न.र.फाटक,१९२४-पृ-२९४) पाचशे वर्गणीदार जमताच ग्रंथ प्रकाशन सुरू करण्याचा या मंडळीचा इरादा होता. ग्रंथोत्तेजक मंडळीची जाहिरात प्रसिद्ध होताच आठशे लोकांनी वर्गणीदार पटात नोंदणी केली. मंडळींना आनंद झाला; पण वर्गणी वसूल करण्याच्या वेळी तोंड आंबट झाल्याखेरीज राहिले नाही. पहिल्या वर्षी शेकडा १० जणांकडून वर्गणी आली, दुसऱ्या वर्षी हे प्रमाण पाचवर आले, तर तिसऱ्या वर्षी शेकडा एक इसमाने

नोंद

रावबहादूर दत्तात्रेय बळवंत पारसनीस यांनी जानेवारी १८८७ मध्ये 'सुभाष्यचंद्रिका' नावाचे मासिक काढले आणि सहा अंक निघाल्यानंतर त्यांनी इ.स. १८८७ मध्ये सुरू केलेल्या 'महाराष्ट्र कोकिळ' या मासिकात समाविष्ट केले. त्या मासिकातून मराठेशाहीतील प्रसिद्ध व्यक्तींशी संबंधित कागदपत्रे प्रसिद्ध होत. ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध करता यावीत म्हणून पारसनिसांनी 'भारतवर्ष' आणि 'इतिहास संग्रह' नावाची नियतकालिके चालू केली.

वर्गणी भरली. न्यायमूर्ती रानडे व लोकहितवादी देशमुख आपापल्या कार्यार्थ परगावी राहणार असल्याने यांनी आपल्या जागी चिटणीस नेमला. या बहाद्दराने आलेले अन्य (वर्गणी) आपल्या खिशात टाकली. या संदर्भातील अनुभव न्यायमूर्तींनी लिहून ठेवलेला आहे. तो त्यांच्याच शब्दांत सांगायचा तर, ''वर्गणी वसूल करण्याचे कामी बहुत पत्रे धाडली. तगादेही पुष्कळ केले. या संबंधाने एकंदर सुमारे ३० रुपये बुडीत खर्च आला ज्याकडे पत्रे धाडली व तगादे झाले, या गृहस्थांची नावे येथे लिहिणे अवश्य (प्रशस्त) नाही; पण ते सर्व विद्वान व सभ्य यांत मोडत आहेत. तेव्हा त्यांजकडून या कामी अशी अनास्था झाली, हे या देशाचे दुर्भाग्य होय. तथापि, एवढ्याकरता अर्जाबाद उद्योग (उपक्रम) सोडून देऊन निराश होणे हेही वाजवी (योग्य) नाही, असे व्यवस्थापकांचे मत आहे. मराठी ग्रंथांचा संग्रह वाढावा, ही कल्पना संमत आहे. गुजराथेत दरसाल वर्गणीदार बिनमोबदला ५ रुपये दान करतात. अशा रीतीची इकडे व्यवस्था झाल्यास महाराष्ट्री बोलणारे ११ जिल्हे आहेत, शिवाय संस्थाने आहेत. एवढ्या विस्तीर्ण प्रदेशात पाच रुपये देणारे पाचशे लोक मिळू नयेत, असे वाटत नाही.'' (तत्रैव-पृ-२३९).

विचार फार अगोदरपासून

न्यायमूर्ती रानडे यांच्या मनात ग्रंथोत्तेजक मंडळ काढावे असा विचार फार अगोदरपासून मनात रूंजी घालत होता, असे लक्षात येते. पुण्यात 'वक्तृत्वोत्तेजक सभा' १८७५ ला स्थापन झाली व 'वसंत व्याख्यानमाले'ची परंपरा सुरू झाली. चालू वर्ष तिचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे; पण या अगोदर मुंबईत नाना शंकरशेठ यांनी सन १८६७ मध्येच वक्तृत्वोत्तेजक सभा स्थापन केली होती. तिच्या प्रारंभीच्या काळात न्यायमूर्ती रानडे यांनी बराच भाग घेतला होता. या संस्थेमार्फत न्यायमूर्ती रानडे यांचे एक व्याख्यान १७ फेब्रुवारी १८६७ रोजी योजण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय 'साहित्य' होता. तो विषय न्यायमूर्तींच्या सहमतीनेच मुकर करण्यात आला होता. आपल्या या व्याख्यानात न्यायमूर्तींनी मराठी ग्रंथ प्रकाशनाची विषयवार सांख्यिकी माहिती अशासाठी सादर केली होती, की श्रोत्यांना मराठी साहित्यविश्वाचे वास्तव ध्यानी यावे. त्यानुसार गेल्या साठ वर्षांत इंग्रजीतून मराठीत आलेल्या ग्रंथांची संख्या हजारही नव्हती. असे का व्हावे, याबद्दल न्यायमूर्ती बरेच उग्र झाले होते. आंजारणी गोंजारणीने वा प्रोत्साहनाने, चुचकारणीने मराठी लोकांची झोप उडत नाही. हे लक्षात घेऊन न्यायमूर्ती रानडे आपल्या भाषणात म्हणाले होते की, ''असे का व्हावे? याचे उत्तर पाया कच्चा. अमूक जातीनेच विद्येचा व्यवहार करावयाचा, इतरांस अधिकार नाही. ही चूक झाली आहे. अशाच चुका पुढे होत गेल्या. छापखान्याची कला निघण्यापूर्वी इतर देशांची जी स्थिती होती, ती आज आपली आहे. आपल्या लोकांस नुसते ओझे घेऊन चालावयाचे मात्र समजते; पण कोणतीही गोष्ट समजून घेण्याची मात्र आस्था नाही. आपल्या देशातील शास्त्रीय विषयांची भाषांतरे परक्यांनी जितकी केली आहेत, त्याचा शतांश आमच्याकडे नाही. नुसते टपालहशील (टपाल खर्च) घेऊन ग्रंथ वाचायला देऊ केले, तर लोक ते घेऊन वाचायला तयार नाहीत. इतकी अनास्था आपल्या भाषेची आहे. तेव्हा मानवी सृष्टीस धरणीकंप (भूकंप) होऊन सर्व आंतडी बाहेर पडतील, तेव्हा ही स्थिती सुधारली तर कोण जाणे''. (तत्रैव पृ. ३३२)

मराठी भाषेपुढील आव्हाने

वरील परिस्थिती दीडशेहून अधिक वर्षांपूर्वीची. मराठी माणसाच्या ग्रंथवाचन, साहित्य अभिरुची, सामाजिक उपक्रमात सहभाग या बाबींचा विचार करतो, तेव्हाचे चित्र वरीलपेक्षा फार वेगळे आज आहे, असे म्हणावयास मन धजत नाही. ही निराशा नाही. यथार्थता म्हणून जे चित्र वर्तमानापुढे येते, ते फारसे उत्साहवर्धक नाही. दीडशे वर्षांपूर्वीच्या मराठी समाजाची भौतिक स्थिती आज किती तरी संपन्न आहे. चारचाकी, दुचाकी, घरगुती यंत्रे, मोबाइल, संगणक सारे घरी असते, नसतात फक्त पुस्तके! आपला मिडास झाला आहे. जी तंत्रज्ञान साधने माहिती व संपर्क युगाने हाती दिली, त्यांचा वापर आपण रंजनासाठी, रिकामा वेळ वाया घालवण्यासाठी जितका करतो, तितका वाचन, विचार, साहित्य, ग्रंथचर्चेवर नाही. ही मराठी समाजाची भौतिक संपन्नता बौद्धिक दिवाळखोरीकडे नेणारी ठरत आहे. सार्वजनिक वाचनालयांच्या अनुदानाबाबत शासन अनुदार आहे, कारण त्यांचे विकास प्राधान्य काँक्रिटच्या रस्त्यात रुतलेले आहे. सार्वजनिक ग्रंथालयांचे सभासद प्रमाण काय? एक टक्काही नाही. महाविद्यालये, विद्यापीठांचे रोज

रावबहादूर दत्तात्रेय बळवंत पारसनीस यांच्या प्रेरणेने व प्रयत्नांनी सातारा येथे १९२५ मध्ये ऐतिहासिक संग्रहालय स्थापन झाले. १९३९ साली हे संग्रहालय त्यातील कागदपत्रांसह पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात हलविण्यात आले. पारसनिसांच्या संग्रहात मराठेशाहीतील विशेषतः अठराव्या शतकातील घटनांसंबंधीची अनेक अस्सल कागदपत्रे होती. पारसनीस यांनी ऐतिहासिक पत्रे, हस्तलिखिते इत्यादींचाही मोठा संग्रह केला होता.

घसरत जाणारे आलेख, विद्यार्थ्यांची वाढती अनुपस्थिती, शिक्षक-प्राध्यापकांचे रोज घटत जाणारे अध्यापन, मराठी साहित्यात मौलिक लेखनापेक्षा भाषांतरित साहित्याचा न थांबणारा महापूर आपल्या सांस्कृतिक उद्ध्वस्त धर्मशाळेचे चित्र नाही का?

मराठी शाळांचा प्रश्न

मराठी शाळांचा घटता पट व इंग्रजी शाळांचे फुटलेले पेव हे मराठी समाजाच्या इंग्रजी गुलामगिरीचे लक्षण नाही का? मायबाप सरकार गेली अनेक वर्षे मराठी शाळांना परवानगीच देत नाही. दिली तर कायम विना अनुदानित अटीवर; पण दुसरीकडे जूनला मिळणाऱ्या परवानग्या मार्चमध्येपण मिळतात, त्याही फक्त इंग्रजी माध्यम अन् खासगी संस्थांनाच. बहुजन समाजाची मुले ज्या मराठी शाळेत शिकतात, या मराठी शाळा शासन अनुदानापेक्षा लोकवर्गणी व लोकसहभागावर श्वास रोखून जिवंत आहेत, उठसूठ सरकारी कार्यक्रमात मराठी अभिमान गीत वाजवणाऱ्या सरकारला याचा मथितार्थ का कळू नये?



मराठी भाषेचे कर्म संपुष्टात

आपली मराठी वृत्तपत्रे इंग्रजी शब्द-प्रयोगित मथळे देण्यात एकमेकांच्या पुढे जाण्याच्या शर्यतीत मश्गुल आहेत. महाराष्ट्रातील साखळी वृत्तपत्रे म्हणून खपांचे रोज वाढते आकडे जाहीर करण्याची अहमहमिका दाखविणाऱ्या वृत्तपत्रांत आज डेडलाइन, पॅरोल, नोटीस, डॉक्टर, मॅटर, एंट्री, हनी ट्रॅप, ड्रग्ज, मिस्टर, मिसेस, पर्सेंटेज टॅग, पॉपकॉर्न, टॅरिफ, प्लॅट हे शब्द सर्रास वापरताना मी वाचत राहतो, तेव्हा लक्षात येते, की मराठी भाषेचा कर्ता आहे, कर्म संपुष्टात आले आहे. क्रिया (कर्म) बाकी आहे. अशी कठोर आत्मटीका, आत्मपरीक्षण केल्याशिवाय मराठी उद्धाराचा मार्ग नाही.

गांभीर्य हरवले

साहित्य संमेलने, व्याख्यानमाला यांचे गांभीर्य हरवत असून यांचा लंबक मनोरंजनपर विषय, कार्यक्रमांकडे वाढत्या प्रमाणात झुकत निघाला आहे, याचे कारण मराठी समाजाने वैचारिकतेशी केलेले वैर होय. बुद्धी-प्रामाण्यवाद, विवेकवाद, समानता, स्वातंत्र्य संविधान, धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा, समाजवाद इ. जीवनमूल्ये मानत गेल्या दीडशे वर्षांच्या विकास प्रवासात आपण फुले, शाहू, आंबेडकरांना अभिप्रेत पुरोगामी महाराष्ट्र बनवण्याचे स्वप्न उरी बाळगले होते, त्याचे काय झाले? या प्रश्नाने आपण अस्वस्थ होत नाही, हे आपल्या पुढील खरे आव्हान आहे.

भारत सरकारने मराठी भाषेस ३ ऑक्टोबर, २०२४ ला अभिजात भाषा दर्जा बहाल केला हे आपण जाणतो. भाषेचे अभिजातपण हे जितके तिच्या प्राचीन वैभवावर अवलंबून असते, तितकेच तिच्या वर्तमान विकास आणि व्यवहारावर. आज मराठीच्या ज्या वऱ्हाडी, पोवारी, अहिराणी, कोकणी, वारली, ठाकरी, डांगी, कोल्हापुरी, आदी बोली होत्या, या प्रामुख्याने वाड्या, वस्त्या, पाडे, तांडे या ठिकाणी असणाऱ्या व ग्रामीण भागात अधिवास असलेल्या मोठ्या लोकसंख्येकडून बोलल्या जात. ते वैविध्य मराठी भाषेचे लोकरूप म्हणून संचित होते. यंत्रयुगानंतर खेड्यांचे रूपांतर हळूहळू नागरी वस्तीत होत गेले. जागतिकीकरणानंतर खेड्यातील लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणात नगरे, महानगरे येथे स्थलांतर झाले, ते शेती उद्योग किफायतशीर न राहिल्याने. ग्रामस्वराज्याची संकल्पना वित्त आयोगाच्या निधीवर कधीच यशस्वी होणार नाही. शेतीसह शेतीपूरक व्यवसाय विकासाचे तत्त्व अंगीकारल्यानेच रोजगारक्षम खेडी तयार होणार. सांगली जिल्ह्यातील भिलवडी परिसर दूध उत्पादनाने कृषीपूरक स्वयंसिद्ध झाला. असे प्रयोग राबवले, तरच संस्कृती रक्षणाबरोबर जीवन समृद्धी येणार ना?



सातारा शहराच्या कँप हद्दीत पूर्वी मिलिटरी कॅन्टोनमेंट होते. ते बरखास्त झाल्यानंतर तेथील लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १८९० मध्ये सातारा सबअर्बन म्युनिसिपालिटीची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये १२ सदस्य होते. दिनांक १ नोव्हेंबर १९६१ रोजी सातारा सबअर्बन नगरपालिकेचे सातारा नगरपालिकेत विलीनीकरण होऊन सभासदांची संख्या ४५ झाली.

मराठी वाचन आटत आहे

मराठी प्रकाशन व्यवसायात ग्रंथांची आवृत्ती शेकड्यांवर येत मागणीपूरक मुद्रणप्रत (प्रिंट ऑन डिमांड) येऊन ठेपणे हे मराठी वाचन आटत, तुटत चालल्याचेच लक्षण ना? आर्थिक समृद्धीस समांतर सांस्कृतिक समृद्धी अंगीकारणारा समाज शहाणा मानला जातो. जीवनात भाषा, साहित्य, संस्कृती, कला, संगीत, नाटक, गायन, शिल्पसौंदर्यास प्राधान्य देणारा समाज जगात सुसंस्कृत मानला जातो. फ्रान्स हे जगातले अनुकरणीय उदाहरण होय. वस्तुसंग्रहालये, विद्यापीठे, औद्योगिक वसाहती, प्रयोगशाळा, आपल्या सहली व तीर्थस्थानांची जागा का घेत नाहीत? इतिहासात रेंगाळणारा व धर्मात बुडणारा समाज भविष्यलक्ष्यी, आधुनिक झाल्याचे उदाहरण नाही. शंभर रुपये कमावतो नि त्यातील ४० टक्के देव, धर्म, लग्न, उत्सवासारख्या अनुत्पादक बाबींवर खर्च करतो, मग मराठी समाज कर्जमुक्त आर्थिक स्थैर्य कसे गाठणार, सातबारा कोरा कसा होणार?

मराठीचा वापर

वर्तमान युग हे तंत्रज्ञान क्रांतीने उत्क्रांत होणारे युग आहे. संगणक, महाजाल, मोबाइल्स इत्यादी साधनांतून भाषाविषयक संसाधने (ॲप्स) विकसित झालीत. आपण मराठी संसाधने वापरतो का? भाषांतर, संपादन, मुद्रितशोधन, श्रुतलेखनाची कितीतरी संसाधने आज गुगलवर उपलब्ध आहेत. आपण ती मराठीसाठी, मराठी माध्यमांची वापरतो का? मोबाइलची भाषा उपयोजक (वापरणारा) निवडतो. आपण या भ्रमणध्वनी या चलभाष साधनात संपर्क क्रमांक संग्रहित करतो. ते मराठीत असतात का? आपण प्रत्यक्ष संवाद (फेसबुक), सहज संवाद (व्हॉटसअप), संक्षिप्त संदेशन (एसएमएस) साठी मराठी टंकन, लेखन करतो का? भाषेचं जिवंत राहणं तिच्या वापरावर अवलंबून असतं. निसर्ग नियम आहे. वापरा नि विकास करा. न वापराल तर आपोआप झडून जाल. माकडाला शेपूट होती, अंगावर मोठे केस होते, दात सुळे होते, नखे धारदार होती. माणसाला शेपूट नाही, केस गेले, लव राहिली, सुळे गेले, दात झाले, नखे टोकदाराची गोल झाली, का? जैसा वापर, तसा फरक.

वापरली तरच टिकेल

भाषा वापरली तरच टिकते. गेल्या अवघ्या ७० वर्षांत दोन हजार भाषा नष्ट झाल्या. मराठी मरू नये वाटत असेल तर घरी, दारी, बाजारी सर्वत्र तिचा नि तिचाच वापर, हेच तिचं भविष्य असतं. तुम्ही जी भाषा वापरता, समोरचा तिचे अनुकरण करत असतो. त्यामुळे स्वत: मराठी बोला, लिहा, वाचा, म्हणजे मराठी समाज तयार होईल. भाषेचं प्रमाणत्व, शुद्धलेखन याबाबत सध्या अनास्था वाढते आहे. समजलं की झालं, असा प्रचार वाढतो आहे. त्याबाबत जगभर बॅबेल मनोराचा दृष्टान्त सांगितला जातो. माणूस स्वकर्तृत्वावर अहंकारी होऊन स्वर्ग जिंकायला निघाला होता. स्वर्ग दोन बोटे उरला असता स्वर्गारोही माणसांत भाषिक अराजक माजलं. मानवी मनोरा कोसळला, कारण संवाद हरवला. या हृदयीचे त्या हृदयी द्यायचं, तर दोन्ही हृदयात एकच भाषा असावी लागते. मी म्हणेल ती भाषा संवादत्व गमावते. भाषा फक्त माणसासच आहे. अन्य जीवांत केवळ देवघेव आहे. तिथे विचार, अर्थ, उच्चार, अलंकार, छंद, व्याकरण नाही, ते फक्त मानवी समाजातच आहे. भाषा शब्दाचा एक अर्थ मानव, मानवी आहे. हे किती लोक जाणतात?

(लेखक प्रख्यात साहित्यिक आणि भाष्यकार आहेत.)





सारंग दर्शने
मो.: ९८२१५७०४०२५

कृत्रिम बुद्धिमत्ता मराठीला तारणार की मारणार?

कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान मारणार आहे की अस्तंगत होण्यापासून तारणार आहे, याबाबत तज्ज्ञांमध्येच एकमत नाही. सध्या मात्र हा झपाटा सर्वांना हादरवून टाकतो आहे. ही कृत्रिम प्रज्ञा मानवी प्रज्ञा, प्रतिभा आणि मुख्यत्वे संवेदना यांची जागा घेणार का, हा प्रश्न सर्वांना ग्रासून आहे; पण हे कृत्रिम प्रज्ञेचे वादळ जरा स्थिरावू दे. ते मानवी प्रतिभा व संवेदना यांची जागा घेऊ शकणार नाही, हे लवकरच लक्षात येईल.

माणूस ज्या क्षणी बोलायला शिकला, त्या क्षणापासून त्याने स्वतःभोवतीचा जगाचा गोंधळ शब्दांत बांधायला सुरुवात केली. भाषा ही त्याच्या चेतनेचा पाया ठरली. त्या भाषेतून विचार उमटले, भावना वाहिल्या, आणि संस्कृती आकाराला आली. आता हजारो वर्षांनंतर, ज्या क्षणी माणूस 'कृत्रिम बुद्धिमत्ता' निर्माण करतो आहे, त्या क्षणी पुन्हा एकदा तो आपल्या भाषेकडे पाहतो आहे; पण या वेळी आरशात नव्हे, तर यंत्रात.

कृत्रिम बुद्धिमत्ता या संज्ञेतच एक आकर्षण आहे. जणू काही माणसाची सारी बुद्धी आता संगणकाच्या मेंदूत स्थलांतरित झाली आहे. मशीन विचार करते, निर्णय घेते, संवाद साधते, शिकते, आणि अगदी कविता लिहिते; पण याच वेळी, मनात एक लहानसा प्रश्न जागा होतो, ही 'यंत्रबुद्धी' आपली माणुसकी ओळखेल का, आणि आपल्या भाषेला, आपल्या संस्कृतीला ती समजेल का?

तंत्रज्ञानाचा नवयुगीन सूर

आज आपण ज्या काळात जगतो, त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ संशोधनाची संकल्पना उरलेली नाही, ती आपल्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग बनली आहे. मोबाइलवरील ध्वनिसहायक आपल्याशी मराठीत बोलतो. यूट्यूब आपल्याला पाहिलेल्या गोष्टींवरून पुढची गाणी सुचवत राहते, आणि अनुवादक ॲप्स काही क्षणांतच मराठी वाक्यांचे इंग्रजी रूप आपल्याला देतात. आपल्याला हे सगळे सहज वाटते; पण या पाठीमागे एक खोल संगणकीय विश्व आहे. डेटा, अल्गोरिदम, आणि भाषिक नमुन्यांचे महासागर...असे सगळे त्यामागे उभे आहे.

या महासागरात इंग्रजी भाषा ही एक भली मोठी नौका आहे; तर मराठीसारख्या भाषा म्हणजे अजून छोट्या छोट्या होड्या आहेत; कारण कृत्रिम बुद्धिमत्ता ज्या माहितीवरून शिकत पुढे जाते, त्या अवाढव्य माहितीचा साठा इंग्रजीतच आहे. तो

नोंद

स्वातंत्र्यपूर्व काळातील मुंबई प्रांताचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान सर धनजीशा कूपर यांचा आहे. स्वातंत्र्यपूर्वकालीन सातारा जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला चालना देण्यात किर्लोस्कर, ओगले यांच्याप्रमाणे धनजीशा कूपर यांचेही योगदान महत्त्वाचे होते. त्यांनी १९२२ साली सातारा रोड स्टेशनजवळ पाडळी येथे आपला 'कूपर इंजिनिअरिंग वर्क्स' हा कारखाना सुरू केला.

किती आहे, याची आपण कल्पना करू शकत नाही आणि तो क्षणोक्षणी वाढतो आहे. मराठी साहित्य, ज्ञान, माहिती, संभाषणे, संशोधन, लोककथा, लोकसंस्कृती हे सर्व अजूनही मोठ्या प्रमाणावर डिजिटल जगात आलेलेच नाही. परिणामी, एआयला मराठीची तशी फारशी 'ओळख' नाही. एआय आपली भाषा शिकण्याच्या प्रयत्नात आहे; पण मराठीचे सर्वांगीण रूप, स्वरूप अजून तिला नीट उमजलेले नाही.

भाषेचे डिजिटल रूपांतर

प्रत्येक भाषेचा स्वतंत्र आत्मा असतो. तिची लय, तिचा ठेका, तिचे रूपकांचे जग असते. तिच्या प्रवाहाची एक गती असते. तिच्यातल्या गीतांना एक अंगभूत संगीत असते. श्री ज्ञानदेवांनी परोपरीने मराठीचे स्तवन केले आहे. त्याची द्यावीत तितकी उदाहरणे कमी होतील. सहाव्या अध्यायात ज्ञानदेव म्हणतात,

'हां हो नवल नोहे देशी।
मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी।
वाणें उमटताहे आकाशीं।
साहित्य रंगाचे।।

मराठीच्या अवकाशात साहित्याच्या रंगांचे अनेक आकार उमटले आहेत. अशी देशी म्हणजे मराठी भाषा बोलता येते, हे नवलच नव्हे काय...मराठी भाषेची किती ताकद आहे, हे ज्ञानदेव सांगत आहेत. अवघा अवकाश भरून आणि भारून टाकण्याची, भाषा-अलंकारांच्या रंगांनी ते व्यापून टाकण्याची मराठी भाषेची नवलाईची शक्ती ज्ञानदेव प्रचीतीस आणून देत आहेत. ही शक्ती आणि ताकद संपविण्याची किंवा ती क्षीण करण्याची ताकद या कृत्रिम प्रज्ञेत आहे का? नाहीच; पण ती मूळ ताकद जपण्यासाठी आपल्याला मात्र सावध राहावे लागेल. एआयच्या जगात भाषा प्रथम 'डेटा' बनते. ती शब्दांच्या अर्थापेक्षा, त्यांच्या वापराच्या संख्येवर आधारित ओळखली जाते. या प्रक्रियेत भाषेचा भावनिक गाभा हरवण्याची शक्यता असते. 'मी तुझ्यावर प्रेम करतो..' हे वाक्य यंत्राला फक्त शब्दांच्या मांडणीसारखे दिसते; पण त्यातील स्पर्श, धडधड, प्रतीक्षा, थरार, विस्मय, लज्जा, स्नेह...आदी ती अनुभवू शकत नाही.

याला एक दुसरीही बाजू आहे. या यंत्रयुगात भाषेला नवजीवनही मिळू शकते. एआयमुळे मराठी ज्ञान अधिक सुलभ होत आहे. आज कोल्हापूरचा किंवा राज्यातला कोणताही शेतकरी आपल्या बोलीत हवामानाचा अंदाज बॉटकडून ऐकतो. विद्यार्थ्यांना मराठी आवाजात शिकवणारे ॲप्स मिळतात. दिव्यांगांसाठी मजकूर वाचून दाखवणारे सॉफ्टवेअर तयार झाले आहेत. एका अर्थाने, भाषा आता फक्त पानांमध्ये अडकलेली नाही. ती स्वत: बोलते, ऐकवते, आणि शिकवतेसुद्धा. भाषिक प्रयोगांची ही नवनवी अंगे यापुढे अधिक विकसित होत जाणार आहेत. त्यासाठी आपल्याला तयार असावे लागेल.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे मराठीपण

मराठी हे केवळ एका भाषेचे नाव नाही, ती जीवनपद्धती आहे. तिच्यात रसरशीत परंपरा आहेत. लोककलेचा रांगडा गंध आहे, आणि इतिहासाची तेजस्वी आठवण आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेला हे सगळे शिकता येईल का आणि कधी, हे प्रश्न आज तरी अनुत्तरित आहेत. आज ज्या प्रणाली इंग्रजीवर चालतात, त्या मराठीशी संवाद साधताना गोंधळतात. 'घोडचूक झाली..' हे वाक्य त्या 'A mistake about a horse occurred..' असेही अनुवादू शकतात. कारण त्या यंत्रांना आपल्या म्हणी, वाक्प्रचार, आपल्या उपरोधाची भाषिक रचना हे काहीच माहीत नाही. म्हणून मराठी भाषेचा प्रचंड डिजिटल साठा होत जाईल, तसतसे हे नाते बदलत जाईल. पुस्तके, लोकगीते, लेख, संभाषणे, ध्वनिमुद्रिका, व्हिडिओ हे सर्व यंत्रांना शिकवले गेले की, ती मराठी भाषेला 'समजतील'.

भाषेचे स्वराज्य आणि डिजिटल आत्मनिर्भरता

यंत्रबुद्धीच्या या काळात भाषेच्या स्वराज्याचा प्रश्न पुन्हा समोर येतो. आपण तंत्रज्ञान वापरतो; पण त्या तंत्रज्ञानाचा मालक कोण? जर मराठी भाषेवरील सॉफ्टवेअर इंग्रजी केंद्रांनी तयार केली, तर भाषेचा आत्मविश्वास हरवू शकतो. त्यामुळे, मराठी विचारसरणीतून निर्माण झालेले, मराठी संशोधकांनी विकसित केलेले तंत्रज्ञान आवश्यक आहे. 'मराठी शब्दकोश प्रकल्प', 'कॉमन व्हॉइस', 'भाषिक संसाधन केंद्र'... आदी उपक्रम म्हणजे या दिशेने पहिले पाऊल आहे. हजारो लोक आपले आवाज, शब्द, वाक्ये यंत्रांना शिकवतात. इथे प्रत्येक माणूस आपल्या भाषेचा शिक्षक बनतो. सरकार, विद्यापीठे, आणि माध्यमांनी या प्रयत्नांना हातभार लावला, तर मराठीचा डिजिटल पाया मजबूत होईल.

संदेशकार अच्युतराव बळवंतराव कोल्हटकर 'संदेश' पत्रासाठी प्रसिद्ध असले तरी त्यांनी आपल्या मोठ्या कारकिर्दीमध्ये वीस ते पंचवीस वृत्तपत्रे चालवली आणि गाजवलीही. लहानथोरांपासून शिक्षित अशिक्षित सर्वांपर्यंत त्यांनी वृत्तपत्र पोहोचवले. एकामागून एक अनेक वृत्तपत्रे त्यांनी काढली, यात त्यांची जिद्द व निष्ठा दिसून येते. वृत्तपत्राच्या व्यावहारिक बाजूचा विचार न केल्यामुळे त्यांना वृत्तपत्राला स्थिर स्वरूप देता आले नाही.

नोंद

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलता

लेखनाच्या क्षेत्रातही एआयने नवे प्रयोग सुरू केले आहेत. आज यंत्र कविता लिहू शकते. कथा सांगू शकते आणि संपादन करू शकते; पण ते माणसासारखी हे सारे 'अनुभवू' शकते का? एखाद्या पावसाळी सकाळी महाबळेश्वरमध्ये कॉफीचा घोट घेताना आणि ओल्यागच्च खिडकीवर टपटपणाऱ्या थेंबांचे ठिपके ऐकताना जे काव्य मनात उमटू शकते, ते यंत्रात जन्म घेऊ शकेल का? नाही.

म्हणूनच, एआय हे लेखकाचे साधन असू शकते; पण पर्याय नाही. ती आपले लेखन गुळगुळीत, सपाट करेल. ती लेखनातील चुका दाखवू शकेल; पण त्या लेखनाला आत्मा देणार नाही. मराठी लेखकांनी, कवींनी, पत्रकारांनी या साधनांचा वापर करावा. तो होतोच आहे; पण आपली शैली, आपल्या संवेदना न गमावता; कारण यंत्रे साचेबद्ध विचार करतात. गणिती तर्क बांधतात. डेटावर आधारित अनुमानाच्या उड्या मारतात; पण ती स्वप्ने पाहू शकत नाहीत.

शिक्षण, माध्यमे आणि पुढील पिढी

भविष्यातील पिढी ही एआयच्या सहवासात मोठी होईल. त्यांचे खेळ, शिक्षण, संवाद...हे सगळे डिजिटल असेल. ही पिढी मराठीत विचार करायला शिकली नाही तर भाषा नुसती 'विषय' बनून राहील. म्हणूनच, शाळांमध्ये मराठी संगणकभाषाशास्त्र, मराठी डिजिटल लेखन, आणि सोबतच स्थानिक बोलींचा अभ्यास आवश्यक आहे. अस्सल मराठीत विचार करता आला आणि स्वप्ने मराठीत पडत राहिली, तर आमचे भावजीवन मराठी राहील. नाही तर तेही कृत्रिम प्रज्ञेसारखे शुष्क, कृत्रिम व्हायला वेळ लागणार नाही.

आपल्या सगळ्या मराठी माध्यमांनीही आपली भूमिका नव्याने ठरवावी लागेल. फक्त इंग्रजी तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्याऐवजी, मराठी सॉफ्टवेअर, पॉडकास्ट, शिक्षण-ॲप्स यांचे नवे देशी रूप साकारावे लागेल. जर आपण मुलांना मराठीत शिकविणारे, संवाद साधणारे तंत्रज्ञान दिले, तर ते मराठीशी भावनिक नाते जपतील. ते नाते पुढे वाढू, फुलू शकेल.

सहअस्तित्वाचा मार्ग

कृत्रिम बुद्धिमत्ता ही काही आपली शत्रू नाही, आणि शत्रू मानली तरी ती आपल्या घरात येऊन बसणारच आहे. किंबहुना बसलीच आहे. ती एक नव्या युगाची सोबती आहे, असे मानायला हवे. प्रश्न एवढाच आहे की, आपण तिच्याशी संवाद कसा साधतो. जर आपण आपल्या भाषेचा आत्मविश्वास, तिचे भावरूप जपले, तिला योग्य पद्धतीने डिजिटल जगात वावरू दिले आणि यंत्रांनाही आपले सगळे सांस्कृतिक संदर्भ शिकवले, तर मराठी याही युगात फुलेल.

भविष्य हे माणूस आणि यंत्र यांच्या संघर्षाचे नसून, सहअस्तित्वाचे आहे. एआय आपल्याला मदत करू शकते, अनुवादात, शिक्षणात, संशोधनात ही मदत सुरू झाली आहे; पण ती आपली ओळख ठरवू शकत नाही. ती केवळ साधन आहे; आत्मा नाही.

मराठीचे भवितव्य आपल्याच हातात

आपण एआयला मराठी शिकवली, आपले शब्द, उच्चार आणि संस्कृती दिली, तर ती भाषा केवळ टिकणार नाही तर ती एक नवे क्षितिज दाखवू शकेल. मराठीचा प्रवास मानवी प्रवासासारखाच आहे. सतत बदलणारा, पण आत्मा कायम राहणारा. ती भाषा कधी छपाईतून जगली, कधी रेडिओतून, कधी दूरदर्शनवरून; आता ती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पडद्यावर जगेल. तिला जपण्याची आणि फुलवण्याची सांस्कृतिक जबाबदारी आपलीच आहे. शब्द कधीच मरत नाहीत. ते फक्त नवे रूप घेतात. नव्या रूपातही या शब्दांचे अर्थ तेवत ठेवण्याची जबाबदारी आपली आहे. एआयला आव्हान न मानता ही एक संधी मानून मराठीच्या परमोत्कर्षासाठी आपण सगळ्यांनी तयार व्हायला हवे. नव्या युगाचे तेच सांगणे आहे.

(सारंग दर्शने हे पत्रकार आणि लेखक आहेत.)

नोंद

महाराष्ट्रातील पहिले नियोजनबद्ध शहर वसवताना शाहूमहाराजांनी स्वतःकरता दोन राजवाडे बांधले. यवतेश्वरच्या डोंगरातून नळ बांधून पाणी आणले. जागोजागी हौद, तलाव बांधले. त्यांनी शाहूनगरच्या वैभवात जास्तीत जास्त भर घालण्याचे प्रयत्न केले. सातारा शहराला शाहूमहाराजांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. व्यापार उद्योग वाढला, शाहूनगरीचा विस्तार केला.



गणेश देवी
मो.: ९८७९०१९९३०
अनुवाद :
ज्ञानदा आरोलकर

भारतीय भाषांतील अभिजात आणि लोकभाषिक प्रवाह

गेल्या काही काळात भारतात मराठीसह विविध भाषांना अभिजात दर्जा देण्यात आला. अर्थात या अभिजात भाषांचे महत्त्व अधोरेखित करताना शेकडो बोलीभाषा आणि लोकभाषा यांच्याकडे दुर्लक्ष व्हायला नको, अशी मांडणी करणारा लेख.

'फोडा आणि राज्य करा' या नीतीच्या माध्यमातून ब्रिटिश वसाहतवादी सत्तेने भारतावर नियंत्रण ठेवले. या धोरणामुळे परस्परांहून भिन्न दिसणाऱ्या समाजघटकांमध्ये दुरावा आणि अविश्वास निर्माण झाला. परिणामी, भारतीय समाज, संस्कृती आणि भूगोल यांचे आडवे विभाजन झाले. स्वातंत्र्यानंतर मात्र विभाजनाची पद्धत बदलली. पूर्वी आडव्या रेषेत विभागणी होत होती, तर आता जुनी भारतीय पद्धत वापरून समाजात उभी विभागणी केली जात आहे. ही विभागणी छद्म-अधिभौतिकवादाच्या नावाखाली नव्हे, तर निवडणूक राजकारणाच्या नावाखाली घडत आहे. वसाहतपूर्व काळात वर्ण आणि जात हे समाजविभाजनाचे मुख्य आधार होते; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात त्यात धर्म आणि भाषा या दोन घटकांची भर पडली आहे. अलीकडे केंद्र सरकारने बंगाली, आसामी आणि मराठी या भाषांना 'अभिजात भाषा' म्हणून घोषित केले. ही घोषणा म्हणजे समाजात उभी विभागणी निर्माण करण्याच्या या पद्धतीचेच एक ठळक उदाहरण आहे.

ऐतिहासिक दर्जा

'अभिजात' हा एखाद्या भाषेचा भाषिक गुणधर्म नसून पूर्वलक्षी प्रभावाने त्या भाषेला दिलेला ऐतिहासिक दर्जा आहे. प्राचीन संस्कृतींचा अभ्यास करणारे भाषातज्ज्ञ आणि इतिहासकार प्रामुख्याने चिनी, संस्कृत, अरबी, ग्रीक आणि लॅटिन या भाषांना अभिजात भाषा मानतात. या भाषांतील मूळ शब्द आणि प्रत्यय आधुनिक भाषांमध्ये नवे शब्द तयार करण्यासाठी वापरले गेले आहेत. उदाहरणार्थ, 'computer' या शब्दातील '-er' हा प्राचीन प्रत्यय आहे तर, 'artificial intelligence' या वाक्प्रचारातील 'intelligentia', हा लॅटिन शब्दावरून आलेला आहे. 'Classical' हा शब्द इंग्रजी भाषेत प्रथम १६व्या शतकात ग्रीक आणि लॅटिन साहित्याच्या प्राचीन काळाचा उल्लेख करण्यासाठी वापरला गेला.

नोंद

औरंजेबाची मुलगी बेगम झीनतउन्निसा हिने शाहूमहाराज कैदेत असताना त्यांचा चांगला सांभाळ केला आणि त्यांचे धर्मांतरण होऊ दिले नाही. झीनतउन्निसा बेगम १७२१ साली वारली. तिच्या स्मरणार्थ शाहूमहाराजांनी अदालत वाड्याच्या जवळच एक मस्जिद बांधली. आज त्या जुन्या मस्जिदीच्या जोत्यावर नवीन मशीद उभारली आहे.

दोन प्रवाहांची तुलना

१६६८ साली जॉन ड्रायडन यांनी 'Essay on Dramatic Poesy' या निबंधात आधुनिक आणि अभिजात या दोन प्रवाहांची तुलना केल्यानंतर या शब्दाचा वापर अधिक व्यापक झाला. त्यानंतर इतर अभ्यासकांनी कॉप्टिक, इजिप्शियन, सुमेरियन, बाबिलोनियन, अस्सिरियन, हिब्रू, पारशी, तमिळ, पाली आणि सिरियाक या प्राचीन भाषांना देखील अभिजात भाषांच्या जागतिक यादीत समाविष्ट केले.'अभिजात' हा शब्द केवळ एखाद्या प्राचीन भाषेच्या दीर्घ अस्तित्वाचा सूचक नाही, तर तो सामाजिक स्तराचेही प्रतीक आहे. जेव्हा लॅटिनला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळाली, तेव्हा रोमन साम्राज्यातील इतर भाषा असभ्य किंवा सामान्य लोकभाषा म्हणून पाहिल्या गेल्या. हा शब्द विशेषतः तेव्हा प्रचलित झाला, जेव्हा फ्रान्स, प्रुशिया आणि इंग्लंडसारखी युरोपीय राष्ट्रे आपला वसाहतवादी विस्तार करत होती. पुढे या राष्ट्रांनी सभ्यता पसरविण्याच्या नावाखाली इतर देशांवर अन्याय आणि शोषण करण्यासाठी याच विचारसरणीचा आधार घेतला. त्यांचा हेतू वरकरणी उदात्त भासत असला तरी त्यामागील कृती दडपशाहीची होती. विशेषणे सहसा निष्पक्ष नसतात, आणि 'अभिजात' हा शब्दही त्याला अपवाद नाही. जर हा शब्द खरोखरच निष्पक्ष असता, तर भारतातील अनेक समृद्ध परंतु दुर्लक्षित भाषांना जागतिक स्तरावर अभिजात भाषांच्या यादीत स्थान मिळाले असते; पण प्रत्यक्षात 'अभिजात' या संज्ञेमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक विषमतेचा प्रदीर्घ इतिहास दडलेला आहे.

बोलीभाषा

इतिहासकारांच्या मते संस्कृत, पाली आणि तमिळ या भाषा अभिजात म्हणून सर्वमान्य आहेत. प्राचीन काळात या तिन्ही भाषांमध्ये तत्त्वज्ञान आणि साहित्य यांची समृद्ध परंपरा निर्माण झाली. मात्र पाली ही भाषा मुख्यतः ग्रंथभाषा म्हणून वापरली जात होती. ती बोलभाषा म्हणून फारशी प्रचलित नव्हती. प्राकृत या एकाच भाषेला मात्र अशा दाव्याचा आधार सहजासहजी मिळत नाही. 'प्राकृत' ही एकच भाषा नव्हती. प्राकृत भाषा हा गांधारी, महाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, कामरूपी अशा प्रादेशिक भाषांचा आणि अपभ्रंश, अर्धमागधीसारख्या बोलभाषांचा समूह होता. काही वेळा पालीलाही प्राकृत भाषांमध्ये गणले जाते. प्राकृत ही संकल्पना भारतातील आधुनिक भाषा–जसे गुजराती, बांगला, मराठी आणि ओडिया– यांच्या प्रारंभिक टप्प्यांशी जोडली जाते. ती संस्कृतपूर्व भाषांचे अखेरचे अंशदेखील दर्शवते, ज्या हजारो वर्षांपासून भारतीय उपखंडात बोलल्या जात होत्या. प्राकृत भाषांमध्ये साहित्य आणि तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली असली तरी ती संस्कृत, पाली आणि तमिळइतकी व्यापक आणि प्रभावी नव्हती. त्यामुळे भारताच्या अधिकृत अभिजात भाषांच्या यादीत प्राकृतचा समावेश करण्याचा निर्णय विसंगत आणि पुरेशा आधाराशिवाय घेतलेला वाटतो. मुद्दा हा नाही की, ही यादी शास्त्रोक्त पद्धतीने संकलित केली आहे की नाही, तर मुळातच असे वर्गीकरण करणे योग्य आहे का, हा आहे.

समृद्ध शब्दसंपदा

इतिहासातून हे सिद्ध झाले आहे, की संस्कृत प्रमुख



भाषा म्हणून उदयास येण्याच्या अनेक सहस्र वर्षांपूर्वी आणि नंतर तमिळ विकसित होण्याआधी, भारतात अनेक प्राचीन भाषा अस्तित्वात होत्या. होलोसीन काळातील पहिले मानवी स्थलांतर सुमारे ९,००० ते ८,००० वर्षांपूर्वी भारतात झाले. या काळात मानवी समाजाने शेती क्षेत्राजवळ वसाहती निर्माण केल्या, पशुपालन सुरू केले आणि शेती विकसित केली. या जीवनशैलीतूनच भारतातील आरंभीची गावे आकाराला आली. या स्थलांतरामागील एक महत्त्वाचा घटक म्हणजे भाषा आत्मसात करण्याची मानवी क्षमता. संस्कृतपूर्व काळातील भाषांच्या स्वरूपाविषयी कोणतेही लेखी किंवा मौखिक पुरावे आज उपलब्ध नसले, तरी या भाषांमध्ये



साताऱ्यातील प्रियंका मोहिते या ३० वर्षे वयाच्या गिर्यारोहक तरुणीने जगातील सर्वांत उंच तिसऱ्या क्रमांकाचे कांचनगंगा शिखर सर केले आहे. कांचनगंगा या खडतर पर्वत शिखरावर तिरंगा फडकवण्याचा पराक्रम गिर्यारोहक प्रियंका मोहिते हिने केला आहे. हा विक्रम करणारी प्रियंका मोहिते ही पहिली भारतीय महिला ठरली आहे.

निसर्ग आणि शेती यांच्याशी संबंधित समृद्ध शब्दसंपदा विकसित झाली होती, असे मानणे तर्कसंगत आहे. यांपैकी अनेक शब्द पुढे संस्कृत समकालीन असलेल्या प्राकृत भाषांमध्ये टिकून राहिले. मात्र, प्राकृत ही 'एक' भाषा नव्हती; ती विविध प्रादेशिक आणि बोलभाषिक रूपांचा समूह होती.

मातृभाषा

अभिजात भाषांची यादी वाढवली जाते तेव्हा समाजात आणखी तफावत निर्माण होते. १९६१ च्या जनगणनेत भारतातील लोकांनी १,६७२ 'मातृभाषा' नोंदवल्या होत्या. २०११ च्या जनगणनेत हा आकडा घटून १,३६९ झाला. याशिवाय अजूनही अनेक 'मातृभाषां'ची नावे जनगणनेत आली होती; परंतु जनगणना कार्यालयाने ती स्वीकारली नाहीत. २०११ मध्ये अशा १,४७४ मातृभाषा नाकारण्यात आल्या. या १,३६९ स्वीकृत मातृभाषांपैकी, १२१ भाषांना 'मातृभाषा' पेक्षा अधिक मानाचा मानला जाणारा 'भाषा' असा उच्च दर्जा देण्यात आला. यापैकी २२ भाषांचा समावेश भारताच्या राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये करण्यात आला आहे. या २२ भाषांमध्ये, 'अभिजात' भाषेचा दर्जा मिळालेल्या आसामी, बंगाली, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, संस्कृत, तमिळ आणि तेलुगू या भाषा आहेत. पाली आणि प्राकृत भाषांचा या यादीत समावेश नाही. भारतातील भाषिक रचना एका पिरॅमिडसारखी आहे. या पिरॅमिडच्या तळाशी आहेत हजाराहून अधिक मातृभाषा, मधोमध सुमारे शंभर मान्यताप्राप्त भाषा, त्यावर राज्यघटनेतील २२ अनुसूचित भाषा आणि सर्वांत वर ११ अभिजात भाषा.

भारतातील भाषांची सध्याची चार स्तरांमध्ये विभागलेली प्रशासकीय रचना प्राचीन चातुर्वर्ण्य व्यवस्थेची आठवण करून देते. ही रचना अशा काळात निर्माण झाली आहे, जेव्हा दरवर्षी डझनभर मातृभाषा लुप्त होत आहेत. केवळ काही भाषांचा राजकीय फायद्यासाठी गौरव करणे हे धर्म किंवा जातीनुसार फूट पाडण्याइतकेच धोकादायक आहे. प्रत्येक भाषा ही जगाकडे पाहण्याची एक अनोखी विश्वदृष्टी आहे. प्रत्येक भाषेला तिच्या भाषकांकडून आणि राज्याकडून सन्मान मिळायला हवा. केवळ काही भाषांना प्रतिष्ठा दिली गेली, तर भारतही जॉर्ज ऑर्वेल यांच्या 'ॲनिमल फार्म' या कथेसारखा होईल–जिथे सर्व समान असतात; पण काही 'अधिक समान' ठरतात. काही भाषा 'अभिजात' मानल्या जातील, आणि बाकी सर्व दुय्यम ठरतील.

(लेखक प्रख्यात भारतीय भाषातज्ज्ञ आहेत.)





रवींद्र बेडकिहाळ
मो.: ९४२२४००३२१

ज्ञानेश्वरी, बाळशास्त्री आणि सातारा

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांचा 'ज्ञानेश्वरी' हा लोकप्रिय आणि सर्वमान्य ग्रंथ आहे. मराठी माणसाच्या मनामनात आणि घराघरात हा ग्रंथ पोहोचला आहे. ज्ञानेश्वरीची मुद्रित प्रत उपलब्ध करून देण्याचे श्रेय मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना द्यावे लागते.

आजघडीला महाराष्ट्रात व बाहेरच्या नजीकच्या राज्यातून सर्वत्र 'ज्ञानेश्वरी'ची प्रचंड पारायणे होत आहेत, त्यासाठी ज्या हजारो मुद्रित प्रती वापरल्या जातात त्या पाठीमागे अशा वैश्विक मूल्य असणाऱ्या 'ज्ञानेश्वरी'चे मुंबईतील 'प्रभाकर' छापखान्यात प्रथम मुद्रित व प्रकाशित करणे; आणि तेही ब्रिटिशांच्या सांस्कृतिक पारतंत्र्याच्या काळात सन१८४७ मध्ये; याचे श्रेय मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण' कार व तत्कालीन महाराष्ट्राचे प्रथम समाज प्रबोधनकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे आहे, असे आता समोर आले आहे.

त्रिखंडात्मक चरित्रात उल्लेख

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मारक व स्मरण कार्यात गेली ३७ वर्षे व त्या आधी साहित्यिक व पत्रकारितेमध्ये आजही कार्यरत असलेल्या जेष्ठ साहित्यिक व पत्रकार रविंद्र बेडकीहाळ (फलटण) यांच्या नुकतेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित झालेल्या 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर एक कर्तृत्वाचा शोध' या त्रिखंडात्मक चरित्राच्या तिसऱ्या खंडात याची सविस्तर माहिती प्रसिद्ध झाली आहे. या खंडात सन १८४७ मध्ये मुद्रित झालेली 'ज्ञानेश्वरी' जशी आहे तशी मूळ स्वरूपात प्रकाशित केली आहे व त्याला पूरक असे मनोगत प्रसिद्ध संत साहित्याचे अभ्यासक डॉ. प्रा. सदानंद मोरे यांनी व खुद्द लेखक यांनी सविस्तर, संपादकीयमध्ये माहिती लिहिली आहे. या वर्षीच्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सवाच्या वर्षीच ही नवी संशोधित माहिती पुढे आल्याने याकडे अनेकांचे लक्ष वेधले आहे.

यातील माहितीनुसार मुंबईत पहिलाच मराठी छापखाना सन १८१३ मध्ये अमेरिकन मिशनने सुरू केला. त्यानंतर सन १८२९ मध्ये तत्कालीन ब्रिटिश सरकारच्या बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी मार्फत शैक्षणिक पुस्तके

नोंद

टोकियो येथे झालेल्या कर्णबधिर व्यक्तींच्या ऑलिंपिकमध्ये (डेफलिंपिक २०२५) नेमबाजीत सुवर्णपदक मिळविणारी साताऱ्याची प्रांजली धुमाळ म्हणजे जिद्दीचे मूर्तिमंत प्रतीक मानले जाते. टोकियोत झालेल्या या स्पर्धेत प्रांजलीने २५ मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक मिळवून स्पर्धेतील दुसरे सुवर्ण, तर तिचे या स्पर्धेतील एकूण तिसरे पदक पटकावले.



छापण्यासाठी मुंबईत छापखाना सुरू केला. गणपत कृष्णाजी ह्या मराठी उद्योजकाने स्वतःच्या नावाचा छापखाना सन १८४१ मध्ये सुरू केला. त्याआधी बाळशास्त्री जांभेकर यांनी आपले मराठीतले पहिले साप्ताहिक वृत्तपत्र मुंबईतून काळबादेवी येथील 'दि मेसेंजर' या छापखान्यातून (३ महिने), नंतर 'दि कुरियर' या छापखान्यातून सुरू केले. ते साडेआठ वर्षे चालले.

'ज्ञानेश्वरी'ची ओढ

या दरम्यान काही काळ बाळशास्त्रींच्याच 'दर्पण' या छापखान्यातून दर्पण छापले जायचे (१९३५). त्याच सुमारास बाळशास्त्री जांभेकरांच्या मार्गदर्शनातून त्यांचे एक सहकारी भाऊ महाजन यांनी ही दि.१७ जुलै १८४२ रोजी मुंबईतूनच 'प्रभाकर' हा छापखाना सुरू केला. हे सर्व विस्ताराने सांगण्याचे कारण असे की, वरील सर्व छापखान्यात या वेळी अनेक हिंदू धर्मांची पुस्तके व पोथ्या छापल्या जायच्या. त्याकडे बाळशास्त्रींचे बारकाईने लक्ष असे. यामध्ये हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, तुकोबांची गाथा, नामदेवांचे अभंग, गणेश स्तोत्रे, व्यंकटेश स्तोत्र, गुरुचरित्र, सप्तशती, शिवलीलामृत, भजने, भूपाळ्या, इत्यादी अनेक धार्मिक पुस्तके व पोथ्या यांचा समावेश होता; पण त्यात कोठेही 'ज्ञानेश्वरी' किंवा 'श्रीमद् भगवद्गीता' नव्हती हे बाळशास्त्रींनी चाणाक्षपणे हेरले. कारण त्यांच्या लहानपणीच्या शिक्षणात भगवद्गीता व ज्ञानेश्वरीचा त्यांच्यावर प्रभाव होता. बाळशास्त्रींची पत्नी पंढरपूरची तसेच ते स्वतः अक्कलकोटला २० महिने तेथील छत्रपती युवराज शहाजीराजे यांचे प्रशिक्षक होते, त्यामुळे पंढरपूर व वारकरी संप्रदायाशी त्यांचा निकटचा संबंध होताच. त्यांनी आपल्या पहिल्या मुलाचे नावही पंढरीनाथ ठेवले होते. या सर्वांतून त्यांना 'ज्ञानेश्वरी'ची ओढ होती.

आव्हान बाळशास्त्रींनी स्वीकारले

डॉ. प्रा. सदानंद मोरे यांनी या त्रिखंडात्मक चरित्र ग्रंथातील 'ज्ञानेश्वरी'वरच्या मनोगतात यावर सविस्तर लिहिलेच आहे. त्यानुसार सन १८४२ ते १८४५ या काळात ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी त्यांच्या धर्म प्रसाराच्या उद्देशाने त्यांच्या धर्मग्रंथाच्या म्हणजे 'बायबल'च्या लाखो प्रती मुंबई व आसपासच्या शहरात फुकट वाटायला सुरुवात केली होती. ही बातमी 'दर्पण'मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यामुळे हिंदू धर्मपंडितांनी आपल्या धर्माचा प्रमाणग्रंथ म्हणून 'ज्ञानेश्वरी' याच पद्धतीने वाटायला हवा,

श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे राज्यकारभारातील कर्तृत्व आणि लोक कल्याणासाठी झटण्याची तयारी रेसिडेंट ग्रॅण्ट डफ सारख्या हुशार व्यक्तीच्या नजरेतून सुटली नाही. त्याबद्दल त्याने यथोचित प्रशंसोद्गारही काढले आहेत. ब्रिटिश सरकारने छत्रपती प्रतापसिंह राजांना अधिकार प्रदान करण्याचे ठरवले होते. त्यासाठी सातारला मोठा दरबार भरवण्यात आला. त्याप्रसंगी अधिकार प्रदान करणारा सरकारी जाहीरनामा वाचून दाखवण्यात आला.

नोंद

असे बाळशास्त्रींनी त्यांना पटवून दिले. हे आव्हान बाळशास्त्रींनी स्वीकारले. सन १८४५ पर्यंत 'ज्ञानेश्वरी' अमुद्रित होती. फक्त महाराष्ट्रात काही पंडित घराण्यांत ती मौखिक पाठांतर स्वरूपात व हस्तलिखित स्वरूपात होती. संत एकनाथांनी संशोधित केलेली अस्सल मूळ प्रतीच्या जवळपास असलेली ज्ञानेश्वरी हस्तलिखित स्वरूपात गोदावरीच्या तीरावर असलेल्या पैठण ग्रामी शके १७१२ मध्ये (म्हणजे मूळ ज्ञानेश्वरी नंतर ३०० वर्षांनी) तारणनाम संवत्सरी बहुकाळ पर्वणी गोमटी भाद्रपास कपिलाषष्ठी दिवशी प्रतिशुद्ध केली. (कारण या ३०० वर्षांत अनेक महाभाग, पंडित, शास्त्री यांनी स्वतःच्या पांडित्याने काही शब्द पाठभेद करून 'ज्ञानेश्वरी'ची हस्तलिखिते अशुद्ध केली होती म्हणून) पुन्हा यात कोणी फेरफार करू नये, असा सज्जड दमही संत एकनाथांनी त्यांनी सिद्ध केलेल्या ज्ञानेश्वरी प्रतीत शेवटी 'ज्ञानेश्वरीपाठी' 'जो ओवी करील मराठी तेणे अमृताचे ताटी जाणन रोटी ठेविल' अशा शब्दांत दिला आहे. बाळशास्त्रींनी ही 'ज्ञानेश्वरी' शोधून त्यात काही अर्थ तळ टिपातून पाठ भेदासहित स्पष्ट करून सदर हस्तलिखित सन १८४५ (शके १६६७) मध्ये मुंबईत 'प्रभाकर' छापखान्यात (लिथोप्रेसवर) छापून प्रकाशित केली.

अत्यंत दुर्मीळ प्रत

सदर पहिली मुद्रित प्रत अत्यंत दुर्मीळ असून आम्हाला ही पहिली प्रत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व संत साहित्य वाङ्मयाचे जेष्ठ अभ्यासक डॉ. प्रा. सदानंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आळंदी जि. पुणे येथील प्रसिद्ध अशा निवृत्तीनाथ ग्रंथालयात ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री. जयंत साठे यांच्या सौजन्याने मिळाली आहे. मुंबई, पुणे, बडोदा, अहिल्यानगर, सातारा, कोल्हापूर, तंजावर, हैदराबाद, धारवाड, इत्यादी ठिकाणच्या जुन्या इतिहासप्रसिद्ध अशा संग्रहालयांतून सुद्धा आम्ही या प्रतीचा शोध घेतला होता, मात्र तेथे ती आढळून आली नाही. सन १८४५ची 'ज्ञानेश्वरी' ही बाळशास्त्रींनी संत एकनाथ महाराजांची प्रत शोधून तयार केलेली मराठी वाङ्मयातील पहिलीच मुद्रित प्रत अति दुर्मीळ असल्यामुळे अभ्यासकांसाठी ही जशीच्या तशी आम्ही आमच्या 'दर्पण'कार 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर कर्तृत्वाचा एक शोध' या त्रिखंडात्मक चरित्र ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात डॉ. मोरे सरांच्या सूचनेनुसार समाविष्ट केली आहे. विशेष म्हणजे या 'ज्ञानेश्वरी'चे मुखपृष्ठ व मलपृष्ठ त्या काळातही आधुनिक सुविधा नसतानासुद्धा आकर्षक अशा चार रंगातील नक्षीदार वेलबुट्टीमध्ये छापले, हे वैशिष्ट्य आहे. तेही आपण या ग्रंथात जसेच्या तसे घेतले आहे.

शके १६६७ मध्ये छापलेल्या या मूळ ग्रंथाची (ज्ञानेश्वरी) छपाई ३० बाय ४० सें.मी.(८.५ बाय ११.५) आकारातील आहे. ''विश्वावना सुखांमसंवत्सरे चैत्र वैद्य दशमी गुरुवार ते दिवशी मुक्काम मुंबई येथे प्रभाकर छापखान्यात छापली'' असा पोथीच्या शेवटी स्पष्ट उल्लेख आहे. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेतील एक प्रसिद्ध ग्रंथपाल (पुणे) व प्राचीन हस्तलिखितांचे संशोधक वा. ल. मंजुळ व ॲन फेल्डहाउस यांच्यामुळे ही प्रत डॉ. सोन्थायमर संग्रहातून आळंदीच्या संत निवृत्तीनाथ ग्रंथालयाच्या मराठी 'हस्तलिखिते' विभागास क्रमांक ७६४ एम. (एम. सी. (३७ नुसार) प्राप्त झाली. या प्रतीत ९०४५ ओव्या असून अध्यायवार विविध पानांवर पृष्ठसंख्या दिली आहे. शिळाछाप असल्यामुळे ही प्रत एखाद्या उत्तम हस्ताक्षरातील प्रतीप्रमाणे आहे, असे वाटते.

नंतर मात्र 'ज्ञानेश्वरी'च्या मुद्रणाचे काम काही काळ स्थगित झाले असावे असे दिसते, कारण सन १८४५ नंतर सन १८७४ पर्यंत २९ वर्षांच्या काळात एकही 'ज्ञानेश्वरी'ची मुद्रित प्रत झाल्याचे दिसून येत नाही. सन १८७४ मध्ये मात्र प्रदीर्घ काळानंतर याच 'प्रभाकर' छापखान्यात पुन्हा एक 'ज्ञानेश्वरी' छापली गेली; पण त्याची प्रत आम्हाला उपलब्ध झाली नाही. तथापि 'ज्ञानेश्वरी' ची आद्य संशोधित पहिली मुद्रित प्रत म्हणून सन १८४५ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रकाशित करून उजेडात आणलेल्या या 'ज्ञानेश्वरी'ला ऐतिहासिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक मूल्य आहे, आणि ते नव्याने 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर-कर्तृत्वाचा एक शोध' या त्रिखंडात्मक चरित्रातून प्रथमच उजेडात आणण्यासाठीचे भाग्य मला लाभले याची धन्यता वाटते. तसेच मी सातारा जिल्ह्यातील फलटण येथील असल्याने ह्या 'ज्ञानेश्वरी'च्या संशोधनाचा वाङ्मयीन बहुमान सातारा जिल्ह्याचाही आहे, असे मी मानतो.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आणि प्रख्यात लेखक आहेत.)

नोंद

प्रवासी इतिहासकार बिशप हेब्बर यांनीसुद्धा श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांची प्रशंसा केली आहे. १८२५ मध्ये त्यांनी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे की, चांगली ग्रहणशक्ती असलेला हा अधिपती निर्मळ मनाचा आहे. त्याच्या राज्यात शांतता व सुव्यवस्था असून नुकत्याच पडलेल्या दुष्काळानंतर देखील धनधान्य पुरेसे आहे. हा राजा इतका शांततापिय आहे. राज्यातील रस्ते व तलावांच्या सुधारणांकडे सुद्धा त्यांनी लक्ष पुरवले आहे.



विनोद कुलकर्णी
मो.: ८००७५९७०९०

अभिजात दर्जासाठीचा यशस्वी लढा

मराठी भाषेला अभिजात दर्जा सहजासहजी मिळालेला नाही. त्यासाठी खूप काम करावे लागले आहे. राजकीय नेत्यांनी किंवा सत्तेतील प्रमुखांनी तो निर्णय घेतला एका दिवसात. मात्र हा निर्णय त्यांना घ्यायला लावण्यासाठी तब्बल आठ वर्षे लढा देण्याचे काम महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या नेतृत्वाखाली परिषदेच्या आपल्या शाहूपुरी शाखेने केले आहे.

ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने २०१३ मध्ये अभिजात मराठी भाषा समितीचा अहवाल सादर केला आणि मराठी भाषा अभिजात दर्जा देण्याचे निकष कसे पूर्ण करते, हे पुराव्यानिशी त्या अहवालात मांडले. या अहवालाच्या माहितीवर आधारित आपल्याला सहज दर्जा मिळायला हवा होता. मात्र तसे घडले नाही. अहवाल केंद्र सरकारला सादर झाल्यानंतर दोन ते तीन वर्षे कोणतीही हालचाल झाली नाही. त्यामुळे आम्ही त्याविरुद्ध भूमिका घेण्याचा निर्धार केला. सरकारला हा दर्जा देण्यासाठी भाग पाडले पाहिजे, अशी आमची ठाम भूमिका झाली.

संघर्ष

खरेखुरे परिवर्तन

महाराष्ट्र साहित्य परिषदेत २०१६ मध्ये सत्ता परिवर्तन करून प्रा. मिलिंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली परिवर्तन पॅनेल निवडून आले. या पॅनेलने पुढच्या दहा वर्षांत जोरदार कामे करून खरेखुरे परिवर्तन घडवून दाखवले. त्यामध्ये महत्त्वाचे आणि मोठे काम केले ते मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी लोकचळवळ उभी करण्याचे. २०१६ मध्ये प्रा. मिलिंद जोशी यांनी लेखकांची बैठक बोलावली होती आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, ही भूमिका मांडली. त्यानंतर परिषदेच्या शाहूपुरी शाखेने याबाबत सतत पुढाकार घेतला. प्रा. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयावर सतत पंतप्रधान कार्यालयाशी पत्रव्यवहार केला. मी स्वत: मराठी भाषेला हा दर्जा मिळेपर्यंत लढा उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मी ही मोहीम सुरू केली. एकट्या सातारा जिल्ह्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक लाख पत्रे पाठवली. तत्कालीन आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम सातारा जिल्ह्यात करण्यात आली. सततच्या पत्रव्यवहारामुळे मराठी भाषेला

श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचा नावलौकिक सातासमुद्रापार गेला होता. त्याची पावती म्हणजे लंडन येथील प्रख्यात रॉयल एशियाटिक सोसायटीने १८२३ च्या सुमारास श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सभासदत्व देऊन त्यांचा गौरव केला होता. हा गौरव त्या काळी फार थोड्यांना लाभत असे. इंग्रजी राजवटीला या सुधारणावादी राजाबाबत आकर्षण होते.

नोंद

अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा संपूर्ण पत्रव्यवहार हा महाराष्ट्र साहित्य परिषदेशी पंतप्रधान कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात आला, हेही या लढ्यातील प्रमुख वैशिष्ट्य आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

राजकीय इच्छाशक्ती

आपण फक्त पंतप्रधान कार्यालयाला पत्र किंवा पत्रे पाठवून हा दर्जा मिळेल यावर आमचाही विश्वास नव्हता. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती जागृत करणे आवश्यक होते. या प्रश्नाकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधण्याचा निर्णय आम्ही घेतला. महाबळेश्वर येथे पुस्तकाच्या गावाचे उद्घाटन करण्यासाठी मुख्यमंत्री येणार होते. त्या कार्यक्रमातच मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवण्याचा निर्णय मी स्वत: जाहीर केला. हे आंदोलन खूप मोठ्या प्रमाणावर गाजले. आमच्या परिषदेच्या काही पदाधिकाऱ्यांनीही या आंदोलनाला नाके मुरडली. काळे झेंडे वगैरे दाखवणे हे आपले काम नाही, अशा शब्दांत नाराजीही व्यक्त केली. मात्र या सर्व प्रक्रियेत माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहिले प्रा. मिलिंद जोशी. त्यांनी या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला. संपूर्ण वातावरण ढवळून निघाले. राज्याच्या पोलीस खात्याने माझे मन वळवण्याचा प्रयत्न केला. मी कोणाचेही ऐकत नाही हे लक्षात आल्यानंतर सरळ मला पोलिसांनी स्थानबद्ध केले. मात्र त्यालाही मी जुमानले नाही. गनिमी काव्याने आंदोलनाची मी व्यवस्था केल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात लक्षात आले. त्यात मी पत्रकार असल्याने माझ्यावर बळाचा वापर करता येत नव्हता. शेवटी तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप पाटील यांनी मध्यस्थी केली आणि हेलिपॅडवर थेट मुख्यमंत्री तुमची मागणी ऐकून घेतील, अशी हमी मला देण्यात आली. आंदोलन करणे ही आमची भूमिका नव्हतीच, तर लक्ष वेधून घेणे महत्त्वाचे होते. त्यादृष्टीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेण्यात मी यशस्वी झालो. महाबळेश्वरला प्रा. मिलिंद जोशी, माजी आमदार डॉ. कांताताई नलावडे, रवींद्र बेडकिहाळ, हरीश पाटणे यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांनी आमच्याशी चर्चा केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे या विषयावर पाठपुरावा करण्याची मागणी मान्य केली.

केंद्र सरकारला इशारा

या लढ्यात आमचा हा मोठा विजय झाला होता. मात्र तरीही पुढे फारशी हालचाल झाली नव्हती. त्यामुळे थेट केंद्र सरकारला इशारा द्यावा, असा विचार माझ्या मनात आला. केंद्र सरकारचे आणि पंतप्रधान यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी दिल्लीत आंदोलन करण्याचा इशारा मी जाहीर केला. त्यासाठी तारीख निवडली २६ जानेवारी २०१८ ही. त्या दिवशी देशाच्या राजधानीत प्रजासत्ताकाचा मोठा सोहळा होतो. मात्र हा सोहळा असतानाही आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. सर्व सुरक्षा यंत्रणांनी आम्हाला आंदोलनाची परवानगी नाकारली आणि आंदोलन करण्याचा प्रयत्न केला तर अटक करू, असा इशाराही दिला. हा सर्व संवाद आणि आंदोलनाची परवानगी नाकारल्याचा पत्रव्यवहार माझ्याशी झालेला होता. मात्र ती कल्पना मी कोणालाच दिली नाही आणि दिल्लीकडे निघालो. आंदोलनाचे नेतृत्व श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि प्रा. मिलिंद जोशी आणि माझ्याकडे होते. मात्र माझ्या नेतृत्वाला आणि आंदोलक सहकाऱ्यांनाही मी परवानगी न मिळाल्याची गोष्ट सांगितली नाही. उलट ती गोष्ट लपवून ठेवली. दिल्लीच्या विमानतळावर पोहोचल्यावर मी ही कल्पना सर्वांना दिली. दोर कापलेत आता माघार नाही, अशीच अवस्था सर्वांची झाली. भाषेसाठी फक्त दिल्लीवारी नको तर वेळप्रसंगी जेलवारी करू या माझ्या भूमिकेला मात्र सर्वांनी मनापासून पाठिंबा दिला. प्रजासत्ताकदिनी आम्ही जोरदार आंदोलन केले. त्याचा परिणाम झाला आणि अभिजात भाषेच्या प्रस्तावाची हालचाल सुरू झाली. दिल्लीत महाराष्ट्रातून केंद्रात मंत्री असलेले नेते प्रकाश जावडेकर यांची आम्ही शिवेंद्रसिंहराजे यांच्यासोबत भेट घेतली. जावडेकर हे सत्तेतील मंत्री होते आणि श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे त्या वेळी विरोधी पक्षाचे आमदार होते. त्यांनी श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे यांना थेट प्रश्न केला की, ''तुमची सत्ता होती त्या वेळी अभिजात दर्जा का दिला नाही. त्यावर शिवेंद्रसिंहराजे यांनी त्यांना आम्हाला देता आला नाही. मात्र तुम्ही द्या'', असे सांगितले. हा कटू अनुभव गिळूनही आम्ही त्यांच्याकडे दर्जा देण्याचा आग्रह धरला. दिल्ली आंदोलनादरम्यान एक सुखद अनुभव मात्र मला आला. रंगनाथ पठारे यांनी माझ्या आंदोलनाला लेखी पाठिंबा दिला आणि आंदोलनाचे कौतुक केले. त्यामुळे माझ्या आंदोलनाच्या भूमिकेला मोठे बळ मिळाले.



छत्रपती प्रतापसिंह महाराजांना १८३९ मध्ये पदच्युत करून त्यांचा छळ केल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये आणि संस्थानिकांमध्ये असंतोष पसरला होता. सातारा परिसरात असंतोषाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला. कराडजवळ कोळे येथील धारराव पवार यांनी बंडाळीसाठी लोकांना संघटित केल्यामुळे त्यास 'धारावांची बंडे' असे नाव पडले होते.





पत्रव्यवहार

दिल्ली आंदोलनानंतर मी महाराष्ट्रातील सर्व खासदार, आमदार आणि विविध पक्षांच्या प्रमुखांशीही पत्रव्यवहार करण्यास प्रारंभ केला. त्यामध्ये मला ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडून प्रतिसाद आला. त्यांनी माझ्याशी थेट संवाद केला आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, ही मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली. त्यांनीही या प्रस्तावाची माहिती घेतली. मद्रास उच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे सध्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देता येत नाही, असे सांगितले. स्थगितीचा निर्णय मला शरद पवार यांनी कळवला. त्यानंतर ही स्थगिती उठावी आणि केंद्र सरकारने त्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करावेत यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर मद्रास उच्च न्यायालयाची स्थगिती उठली. ती सर्व कागदपत्रे घेऊन मी भिलार, ता. महाबळेश्वरच्या दौऱ्यावर आलेल्या शरद पवार यांना भेटलो आणि सर्व कागदपत्रे त्यांना दिली. मात्र पुढे काही घडले नाही.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे प्रश्न मांडला, तर तो मार्गी लागू शकतो या विश्वासाने मी शिवेंद्रसिंहराजे यांना विनंती केली, की आपण त्यांना भेटूयात. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे यांनी नितीन गडकरी यांची वेळ घेतली. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे आणि आम्ही नितीन गडकरी यांची त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी भेट घेतली. गडकरींनी मात्र सुखद अनुभव दिला. त्यांनी आमची मागणी ऐकून घेतली आणि पाठपुराव्याचे आश्वासन दिले. मनसेप्रमुख राज ठाकरे यांचीही भेट प्रा. मिलिंद जोशी आणि मी घेतली. त्यांनी हा प्रश्न हातात घ्यावा, अशी विनंती त्यांना केली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील प्रत्येक नेत्याला आम्ही प्रत्यक्ष अथवा पत्रव्यवहाराद्वारे हा प्रश्न मांडण्याची विनंती केली आणि राजकीय इच्छाशक्ती जागृत करण्याचा प्रयत्न केला. आमच्या सततच्या प्रयत्नांमुळे आणि लोकजागृतीमुळे हा प्रश्न ऐरणीवर आला. सतत आठ वर्षे पाठपुरावा केल्याने हा प्रश्न मार्गी लागला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेच्या वाटचालीतील हा पाठपुरावा मैलाचा दगड ठरला आहे.

(लेखक महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखेचे संस्थापक आहेत.)

बाळ गंगाधर टिळक अर्थात लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्या राष्ट्रवादी विचारसरणीचे अनेक अनुयायी त्या काळात सातारा जिल्ह्यात होते. रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर आणि गणेश फणसळकर हे दोघे वकील लोकमान्य टिळक यांचे निकटचे सहकारी होते. तत्कालीन साताऱ्याचे नेतृत्व त्यांच्याकडेच होते आणि दोघेही १८९० पासून काँग्रेसचे सक्रिय सभासद होते.

नोंद



सचिन मोटे
मो.: ९८९२४९३४२३

अस्मितांच्या धाकात अभिव्यक्ती

आधुनिक काळात विशेषतः गेल्या काही वर्षांत अभिव्यक्ती स्वातंत्र्य संकुचित झाले आहे. कोणाची अस्मिता आणि भावना कधी दुखावतील, हे सांगता येत नसल्याने लेखनावर मर्यादा येत आहेत. विनोदी मालिका आणि लेखन यावरही त्याचा परिणाम झाला आहे. लेखन दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे, याचा आढावा घेणारा लेख.

सेन्सॉर आणि कलाकार यांच्याबद्दल खूप वर्षांपूर्वी मी एक विनोदी संवाद एका प्रहसनात लिहिला होता. तो थोडक्यात असा होता,
सेन्सॉर: तुम्हाला तुमचा हा संवाद बदलावा लागेल.
कलाकार: कुठला?
सेन्सॉर: अर्जुनाचा काही नेम नाही.
कलाकार: यात काय आक्षेपार्ह आहे?
सेन्सॉर: अर्जुन हा कुशल धनुर्धारी होता आणि तुम्ही म्हणता त्याचा नेम नाही. हा अपमान आहे त्याचा.
कलाकार: पण हा अर्जुन वेगळा आहे; तो नाही, आणि नेम नाही म्हणजे तो काहीही करू शकतो, या अर्थाने ते लिहिले आहे. मराठीतील वाक्प्रचार आहे तो.
सेन्सॉर: तरी पण नाही चालणार ते. अर्जुनाचा नेम चांगला आहे असे वाक्य करा.
कलाकार: पण मला तसे म्हणायचेच नाहीये. त्याचे नाव बदलू का? बाजीरावचा काही नेम नाही असे लिहू का?
सेन्सॉर: बाजीराव पण नाही चालणार. त्याचाही नेम चांगला होता. उमेश, रमेश, महेश असे काहीही लिहा.
कलाकार: पण उमेश आणि महेश म्हणजे शंकर. आणि रमेश म्हणजे विष्णू.
सेन्सॉर: बरे झाले सांगितले, मग ते पण नाहीत चालणार.
कलाकार: मग काय क्ष चा काही नेम नाही असे लिहू का?
सेन्सॉर: पण क्ष म्हणजे क्षत्रिय असे शिकवतात आपल्याला आणि क्षत्रियांचा नेम चांगला असतो.
कलाकार: मी माझे स्क्रिप्ट मागे घेतो. मला हे सेन्सॉर करायचेच नाही.
सेन्सॉर: धन्यवाद.

नोंद

विविध उद्योग सुरू करण्यासाठी सर्वांत प्रथम प्रयत्न करण्यात साताऱ्याने नेहमीच आघाडी घेतली आहे. १८९९ मध्ये सध्याच्या सांगली जिल्ह्यात आणि तत्कालीन सातारा जिल्ह्यातील विटे येथे शाई उत्पादनाचा प्रयत्न करण्यात आला आणि १९०५ मध्ये सातारा येथे मेन्थॉल आणि साबण उत्पादन सुरू करण्यात आले. २० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात कराड हे मॅच फॅक्टरी म्हणजे आगपेटी कारखाना सुरू करण्यात आघाडी घेतल्याबद्दल ओळखले जात असे.

सेन्सॉर सर्टिफिकेट निरुपयोगी कागद

कोणत्याही गोष्टींवरून काहीही कट् करायला सांगणाऱ्या सेन्सॉरबद्दलचे हे प्रहसन होते; पण त्या काळात निदान सेन्सॉरच्या कचाट्यातून सुटल्यावर कलाकृती सादर करता येणार, अशी आशा तरी असायची; पण आजकाल घडलेल्या, 'खालिद का शिवाजी' आणि 'मनाचे श्लोक' या सिनेमांच्या उदाहरणावरून आता सेन्सॉर संमत असणे यालाही काही अर्थ नाही हे लक्षात आले आहे. सेन्सॉर झालेली कलाकृती हवी तिथे सादर करता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे सरकारची जबाबदारी असते; पण आक्षेप घेणाऱ्या संघटना सत्ताधीशांच्या व्होट बँक असतील, तर मग सेन्सॉर सर्टिफिकेट हा फक्त निरुपयोगी कागद असतो, हे आता दिसून आले आहे.

भूमिका बदलत राहते

सेन्सॉर झालेल्या कलाकृतींना विरोध करणे हे यापूर्वीही घडले आहे. 'सखाराम बाईंडर', 'घाशीराम कोतवाल', 'मी नथुराम गोडसे बोलतोय', 'यदा कदाचित' अशी काही उदाहरणे ठळकपणे आजही आठवतात. यात पण गंमत अशी आहे, की घाशीरामला विरोध करणारे नथुरामच्या वेळी मात्र अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असतात; पण नथुरामचे कृत्य चूक होते असे मानणारे अनेक जण अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर त्या कलाकृतीच्या बाजूने उभे राहतात. सर्व तऱ्हेच्या विचारांना कलाकृतींमधून मांडता आले पाहिजे या मताचे लोक नेहमीच सर्व कलाकृतींच्या बाजूने उभे असतात. घाशीराम, सखाराम, नथुराम सर्वांनाच त्यांची मान्यता असते; पण जातीय आणि धार्मिक विचार करणारे मात्र सोयीस्करपणे आपली भूमिका बदलत राहतात किंवा अनेकदा ते काही भूमिकाच घेत नाहीत. अर्थात त्यांच्या विचारांशी ते सुसंगतच असते. जात, धर्म, वंश, संघटना, पक्ष, समाज अशा अनेक गोष्टींच्या अस्मिता घेऊन जगणारे लोक कोणत्याही गोष्टीकडे निखळ निर्मळपणे बघूच शकत नाहीत आणि अस्मिता ही माणसाच्या मेंदूतील अशी गोष्ट आहे, की ती उत्क्रांती सोबत आणखी आणखी घट्ट आणि तीव्र होत चालली आहे.

समाज माध्यमे

हे असे का झाले असेल? आत्ता विसाव्या शतकाच्या अखेरीस आपण सगळे म्हणत होतो, एकविसाव्या शतकात सगळे भेद कमी होणार, नाहीसे होणार. संगणक आणि माहिती क्षेत्रातील क्रांतीने जग जवळ येणार म्हणजे माणसामाणसांतील प्रेम वाढणार, सौहार्द वाढणार; पण मग, ते का झाले नाही, सगळे उलटे का घडते आहे, माणसं छोट्या छोट्या गोष्टींवरून एवढी हळवी आणि आक्रमक हिंस्र का होत आहेत? कला हे माणसाला मिळालेले वरदान आहे. कला आणि खेळ हे युद्धावरील उपाय मानले जातात. मग आता त्यावरूनच युद्ध का होत आहे? याचे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे मोबाइल आणि संगणकावरून पसरलेली समाज माध्यमे. तांत्रिक प्रगतीने माणूस जवळ येणार त्यामुळे समविचारी, समानधर्मी माणसांना आपले गट बनवणे, आपले विचार वेगाने पसरवणे सोपे जाणार हे आपल्या लक्षातच आले नव्हते आणि भारतासारख्या जात-धर्म अशा भेदभावांनी पोखरलेल्या समाजात नेमके हेच झाले. समाज माध्यमांमुळे धार्मिक, जातीय, पक्षीय संघटनांचे गट तयार झाले. त्यावर दिवस-रात्र आपल्या गटाचे विचार मांडले जाऊ लागले. त्यातून छोट्या मोठ्या नेतृत्वांना आपले स्थान निर्माण करणे सोपे होऊ लागले. विरोध केला की, प्रसिद्धी मिळू लागली. त्या त्या गटात मानाचे स्थान मिळू लागले. राजकीय पक्षांसाठी तर ही माध्यमे खूपच उपयुक्त झाली. आपल्या विचाराच्या लोकांना एकत्र करणे, विरोधकांना ट्रोल करणे, फेक आय. डी. बनवून आपल्या विरोधकांना कुठल्याही थराला जाऊन शिव्या देणे, त्यांना नाउमेद करणे हे सहजसाध्य होऊ लागले आणि याचा खूप वाईट परिणाम कलाक्षेत्रावर होऊ लागला. कलाकार-कलाकृती यांना विविध गटांकडून सतत छोट्या छोट्या गोष्टींवरून विरोध होऊ लागला.

समाजमाध्यमांत झुंडी

कलाकृतींना विरोध करून आपले अस्तित्व सिद्ध करणे, आपले नेतृत्व तयार करणे, माध्यमातून प्रसिद्ध होणे सोपे होऊ लागले. माणूस हा कळपाने राहणारा प्राणी आहे आणि हे कळप झुंडी बनून समाज माध्यमात फिरू लागले. त्यांना विरोध करणारे एरवी त्यांच्या सारखेच गट असतात त्यामुळे तिथे त्यांना भांडणे, वाद घालणे हे तसे कठीण जाते; पण कोणताही जातीय, धार्मिक, पक्षीय पाठिंबा नसलेल्या कलाकारांना आणि कलाकृतींना त्रास देणे मात्र त्यांच्यासाठी खूप सोपे झाले. कलाकार बऱ्याचदा एकेकटे जगणारे असतात. ते गटांमध्ये रमत

१९२० मध्ये वाई येथे सुरू झालेली एक विलक्षण संस्था म्हणजे नारायणशास्त्री मराठे यांनी सुरू केलेली 'प्राज्ञ पाठशाळा'. ही संस्था संस्कृत आणि प्राच्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करत होती आणि हिंदू धर्मशास्त्रांमधील परस्परविरोधी धार्मिक गोष्टींचे संहिताकरण व्यवस्थित करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या शाळेचे मार्गदर्शक होते. धार्मिक विषयांवर संस्थेने अनेक विद्वत्तापूर्ण ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

नाहीत. मुळात एकट्याने काही म्हणावेसे वाटते, एकट्याला काही बनावेसे वाटते असेच लोक कलाकार होतात. त्यातून ते ज्या कलाकृती करतात त्या बहुतेकदा व्यावसायिक असतात. त्यामध्ये कुणाचा तरी पैसा गुंतलेला असतो. कलाकाराची कलाकृती तयार करून आधीच त्या निर्मात्याने त्या कलाकाराला उपकृत केलेले असते. त्या निर्मात्यांसाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्यापेक्षा त्यांचा व्यवसाय महत्त्वाचा असतो. त्यामुळे त्यांना कोणालाही विरोध करायचा नसतो. म्हणूनच ते पटकन माफी मागून झुंडीला हवा तो बदल करून कलाकृती सादर व्हावी या मताचे असतात. कलाकारही एकटा सगळ्यांशी लढायला समर्थ नसतो. शंभरातील नव्वद कलाकार हे पोटार्थी असतात. त्यांनी समाजाच्या हिताचे आणि चांगले काही मनापासून तयार केले असले तरी आपण आणि आपले कुटुंब यांच्या विचाराने ते हतबल होतात. बरं झुंडीने हल्ला करणाऱ्यांचे कामच ते असते. ते दिवसरात्र आपल्या विचारांच्या विरोधकांना छळणे एवढेच काम करत असतात. आजकाल असे छळण्यासाठी अनेक संघटना पगारी लोक ठेवतात. त्यातून आपल्या व्यवस्थेने करोडो तरुणांना बेरोजगार आणि अर्धपोटी ठेवलेले आहे. आपल्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थितीने अस्वस्थ असलेल्या करोडो लोकांचे तांडे समाजमाध्यमांवर फिरत असतात. आपल्या जातीवर, धर्मावर अन्याय झाल्याची भावना त्यांच्या मनात एकदा आली की, जीवनातील सगळा राग ते या कलाकारांवर आणि कलाकृतींवर काढू लागतात. इथेही हे घडते त्याला कारण म्हणजे हा विरोध खूप सोपा असतो. दुसऱ्या पक्षाच्या, धर्माच्या नेत्यांवर किंवा विचारांवर टीका केली, तर त्यांचे कार्यकर्ते घरात येऊन मारण्याची भीती असते. कलाकाराला त्रास देताना ही भीती नसते. बहुसंख्य कलाकारांचा हिंसेवर विश्वास नसतो. त्यामुळे त्यांना हा एकूण प्रकार सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. त्यामुळे मग ते इथून पुढे कोणाच्याही भावना दुखावतील असे लिहायचेच नाही याची काळजी घेऊ लागतात. काही पहिल्याच विरोधानंतर हा मार्ग स्वीकारतात. काही अनेकदा विरोध झाल्यावर हळूहळू ताक फुंकून पिणारे होतात. शंभरातील दहा जण मात्र होणारे विरोध पचवत निर्भीडपणे आपले मत मांडत राहतात; पण तरी यामुळे कलाक्षेत्राचे अपरिमित नुकसान होते, हे मात्र खरे.

माझ्याबाबतीत सांगायचे तर गेल्या पंचवीस वर्षांत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच कसा कसा होत गेला आहे हे मी माझ्या कामात अनुभवले आहे. मी प्रामुख्याने विनोदी लेखन आणि निर्मिती केली आहे आणि तीही टेलिव्हिजनवर. हे माध्यम मुळातच या टग्यांच्या झुंडींसाठीचे आकर्षक ठिकाण आहे. इथे आक्षेप घेतले, इथल्या कलाकारांना धमकावले, की अल्पावधीत प्रसिद्ध होऊन टीव्हीवर चमकण्याची संधी यांना मिळते. अनेकदा या संघटना काही आक्षेप घेऊन दंगा करतात. माफी मागून प्रकरण मिटले, की त्याच कलाकारांसोबत फोटो काढतात. आपल्या घरच्यांशी मोबाइलवर बोलतात, त्यांना व्हिडिओ कॉल लावून आपण त्या कलाकारांसोबत असल्याचे दाखवतात. आम्ही तुमचे फॅन आहोत सांगतात. त्यांचे नेते, ''कार्यकर्त्यांसाठी आणि समाजासाठी करावे लागते हो'' असे म्हणून ओशाळवाणे हसतात आणि शूटिंग बघायचे होते एकदा म्हणून मागे लागतात. आम्ही दुखावलो आहोत असे कोणता समाज यांना सांगतो कुणास ठाऊक! कारण बहुसंख्य लोक सगळ्या गोष्टी आवडीने बघतात आणि जे पटत नाही ते सोडून देतात. पटलं तर त्यावर विचार करतात आणि स्वतःमध्ये बदल करू पाहतात. कलाकार आणि प्रेक्षकांचे नाते खरेतर हेच असले पाहिजे. मी तुम्हाला मला हवे ते दाखवतो, तुम्ही तुम्हाला त्यातील पटेल ते स्वीकारा किंवा नाकारा. यात हे जातीचे, धर्माचे ठेके घेतलेले लोक घुसतात आणि कलाक्षेत्रातील निकोप वातावरण नासवून टाकतात.

सत्ताधारी नेत्यावर टीका

मी जेव्हा पूर्वी म्हणजे दोन हजार साली लिहायचो तेव्हा कोणत्याही राजकीय पक्षावर, त्यांच्या नेत्यावर हसत हसत टीका करायचो. तेव्हाचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर तर आम्ही एका संपूर्ण वीस मिनिटाच्या भागात टीका केली होती; पण सत्ताधारी नेत्यावर टीका म्हणजे राष्ट्रावर टीका, असे तेव्हा मानले जात नव्हते. आज टेलिव्हिजनवर ती गोष्ट शक्य नाही. समाज माध्यमांवर अजून ते शक्य आहे; पण भविष्यात काय होईल माहिती नाही. आपला धर्म हा आपल्या देवांकडे आणि धर्माकडे नेहमीच मित्रत्वाच्या भावनेने बघत आला आहे. रामायण, महाभारत आणि इतिहासातील पात्रे



सातारा जिल्हा सहकार क्षेत्रातही आघाडीवर होता. जिल्ह्यात सहकारी चळवळीची सुरुवात या शतकाच्या सुरुवातीला झाली. १९०७ मध्ये माण तालुक्यातील बोधे गावात पहिली कृषी पतसंस्था नोंदणीकृत झाली. तेव्हापासून या चळवळीचे तत्त्व हळूहळू सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामीण जनतेमध्ये लोकप्रिय झाले आणि जिल्ह्याच्या विविध भागांत तत्सम संस्था नोंदणीकृत झाल्या.

यांच्यावर विनोद करत करत आजच्या समाजाला काही सांगणे हे आपल्या कलेचे आत्ताआत्तापर्यंत वैशिष्ट्य होते. आता ते शक्य राहिले नाही. आम्ही हास्यजत्रेमध्ये धृतराष्ट्राच्या एकोणपन्नासाव्या मुलाची व्यथा मांडणारे प्रहसन सादर केले होते. आज ते प्रहसन फेसबुकवर कुठे कुठे फिरत असते; पण आता त्याच्याखाली, तुम्हाला आमचाच धर्म दिसतो का वगैरे शेरेबाजी चालते. मुळात



महाभारत हा आपला धर्मग्रंथ नाही. धृतराष्ट्र आणि त्याचा मुलगा यांच्यामुळे कोणाची भावना दुखावते. 'वस्त्रहरण' या नाटकाचे महाराष्ट्रात आजवर हजारो प्रयोग झाले आहेत, आजही होतात. त्या नाटकाला एकेकाळी स्वीकारले आणि त्याचे स्थान मराठी माणसाच्या मनात चांगलेच ठसलेले आहे त्यामुळे ते नाटक आजही सुरू आहे; पण 'यदा कदाचित' या हजार प्रयोग करणाऱ्या नाटकाच्या पुढील भागाच्या वेळी धार्मिक संघटनेने प्रेक्षागृहात बॉम्ब फोडले आणि ते नाटक बंद पाडले. त्या एका बॉम्बने पुढील अनेक कलाकारांना आणि निर्मात्यांना सावध केले. त्या धार्मिक संघटनेचा हेतू चांगलाच साध्य झाला.

पूर्वी गवळणीमधील कृष्ण-पेंद्या हे प्रेक्षकांचे लाडके होते. त्यांच्या विनोदाला लोक डोक्यावर घ्यायचे. आता ती पात्रे आणली, तर कलाकृती बंद पाडली जाईल याची भीती असते. विशेष म्हणजे आजही गावात होणाऱ्या तमाशात, कोकणातील दशावतारात वगैरे देवांवर गंमती होतात. फिल्मी गाण्यांच्या चालीवर भजने चालतात; पण तिथे सगळे हसत स्वीकारले जाते; पण टीव्ही, सिनेमात, व्यावसायिक नाटकांत ते आले, की जुन्या नव्या संघटना जाग्या होतात आणि गोंधळ घालू लागतात. कोकणातील गावात सादर होणाऱ्या नाटकात जाऊन गोंधळ घातला, तर त्यांना प्रसिद्धी मिळत नाही, कदाचित चोप मिळण्याचीच जास्त शक्यता असते. तर आता महाभारत, रामायण, कृष्ण-पेंद्या, कोणताही देव, ऐतिहासिक पुरुष यांच्यावर टीका आणि विनोद करण्याची मुभा संपलेली आहे.

एस. अँड पी. डिपार्टमेंट

कोणत्याही गोष्टीचा संबंध आता जातीशी जोडला जातो आणि त्याला आक्षेप घेतला जातो. आपल्यावर होणाऱ्या हल्ल्यांची भीती असल्याने आणि संभाव्य कोर्टकचेऱ्या टाळण्यासाठी वाहिन्यांनीसुद्धा आता आपले एस. अँड पी. नावाचे डिपार्टमेंट सुरू केले आहे, जे एकही गोष्ट आक्षेपार्ह जाणार नाही यावर लक्ष ठेवून असते. एखाद्याला छपरी म्हणणे हा पण आता कायद्याने गुन्हा ठरू शकतो कारण कर्नाटकात छपरी नावाचा समाज आहे. मी लिहिलेल्या 'भटाची बायपास' या नाटकाचा

सातारा येथे १९९३ मध्ये ६६ वे मराठी साहित्य संमेलन झाले. त्यापूर्वी १९९० मध्ये सातारा येथे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक माधव मनोहर होते. हे संमेलनही मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले. त्यापूर्वी १९७८ मध्ये सातारा येथे नाट्य संमेलन झाले होते. त्याचे अध्यक्ष प्रख्यात साहित्यिक वि. स. खांडेकर होते.

नोंद

कोकणात होणारा प्रयोग तिथल्या ब्राह्मण संघटनेने अडवला होता. यातील भट म्हणजे माधव भट हे त्या पात्राचे नाव आहे; पण त्यांना ती त्यांच्या समाजाची चेष्टा वाटत होती. नाटक बघितल्यावर त्यांचा गैरसमज दूर झाला; पण त्याआधीच त्यांनी नाव बदला म्हणून हट्ट धरला होता. बुवाबाजीवर काही बोलले तर तुम्हाला आमच्याच धर्मातील बुवाबाजी दिसते का म्हणून ओरड सुरू होते. भगवा, हिरवा हे रंगही आता भावना भडकावण्यासाठी पुरेसे असतात. भाषेबद्दल हेच आहे. मराठी कार्यक्रमात हिंदी बोलले तरी अनेकांच्या भावना दुखावतात; पण यातलेच अनेक जण पहिलीपासून हिंदीच्या सक्तीचे समर्थन करणाऱ्या गटात असतात. खरंतर यांनी आता पक्ष आणि संघटना वाटून घेतल्या आहेत. आपले पक्ष, धर्म, नेते जी घेतील ती यांची भूमिका असते. कलाकार म्हणून या सर्वांचा विचार करून निर्मिती करणे आता दमछाक करणारे, चिडचिड करायला लावणारे आणि आणखी आणखी भित्रे करणारे होऊ लागले आहे.

हास्यजत्रेत काळजी

या सगळ्यामुळेच आम्ही आता हास्यजत्रेत आमचाच एम. एच. जे. म्हणून देव केला आहे. आम्ही जे बुवा दाखवतो त्यातून कोणताच धर्म दिसणार नाही याची काळजी घ्यावी लागते. नेता दाखवताना त्याला कुठल्याच पार्टीचा दाखवत नाही आणि त्याचे पदही आम्ही सांगत नाही. भाषा वापरताना, वाक्प्रचार वापरताना यांच्यात कोणताही जातीय उल्लेख येणार नाही ना याची सतत चिंता असते. महापुरुषांबाबत बोलताना अतिसावध राहावे लागते. एकेकाळी त्यांचा एकेरी उल्लेख खूप सहज केला जायचा; पण आता ते चालत नाही. त्यातून कितीही आपुलकी, प्रेम दिसत असले तरी नाही. त्यातल्या त्यात 'सलीम अकबर' या सिरीजमधून आम्ही खूप विनोद करतो. अकबर हा शासक म्हणून चांगला होता असे इतिहास सांगतो; पण तो कुणाची अस्मिता नसल्याने आम्ही ते करू शकतो. टक्कल पडलेली माणसे किंवा जाडी माणसे अशा लोकांवर टीका करणे आता कायद्याच्या कचाट्यात येऊ शकते. टक्कल असलेल्या एखाद्या पात्रावर गंमतीने हसणे किंवा जाड असलेल्या एखाद्या माणसावर विनोद करणे अजून चालते; पण तुम्ही जाड लोक, तुम्ही हडकुळे लोक असे म्हणून चालत नाही कारण मग ती टीका समग्र त्या गटावर मानली जाते. भगवा रंग, हिरवा रंग यांची तर भीती वेशभूषा आणि नेपथ्य करताना नेहमीच असते. एखाद्या प्रहसनात ज्यांच्यावर विनोद होतो आहे, त्यांच्यासाठी वापरली जाणारी नावे-आडनावे कुठल्या नेत्यांची किंवा समाजाची नाहीत ना, याची खात्री करावी लागते. आजकाल आम्ही आडनावही कधी कधी एवढे विचित्र ठेवतो, की त्यामुळे कुठल्या समूहाला ते आपल्यातील वाटून अपमान वाटू नये. धर्म आणि जातीय अस्मितांप्रमाणे आता काही कलाकार आणि कलाकृतींच्या बाबतही अस्मितेचा मुद्दा येतो आहे. आपल्यावर ऊठसूठ टीका केली जाते म्हणून 'शोले' चित्रपटाच्या निर्मात्यांनी शोलेमधील पात्रे आणि संवाद यावर विनोद करण्यास कायद्याने बंदी आणली आहे. आपली खूप वाईट मिमिक्री करून आपले चारित्र्यहनन होते म्हणून सुनील शेट्टीने आता त्या विरोधात कोर्ट केस केली आहे. गाण्याची वाईट पद्धतीने विडंबने होतात म्हणून काही गीतकारांनी आता विडंबन गीत या प्रकारावर आक्षेप घेतला आहे. त्यामुळे वाहिनी आता या गोष्टी करतानाही सावध झाली आहे, आणि या सगळ्यातून जगला वाचलाच तर, तो विनोद आम्ही प्रेक्षकांसमोर आणतो आहे.

समाजमाध्यमात यूट्यूब वगैरे ठिकाणी अजूनतरी सेन्सॉर नाही आणि तिथे अजूनही विविध गोष्टींवर यथेच्छ विनोद होतात. अर्थात काही काळात तिथल्या कलाकारांवर हल्ले करणे, त्यांना घाबरवणे हेही सुरू झाले आहे. त्यामुळे पुढे काय होईल सांगता येत नाही. भविष्यात विनोदाला या सगळ्यातून मुक्ती मिळो आणि कोणतीही टीका हसत हसत स्वीकारणारा समाज निर्माण होवो, अशी आशा आपण करू या.

(लेखक महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमाचे लेखक आणि निर्माते आहेत.)



जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ हा मराठ्यांचा आद्य इतिहासकार म्हणून ओळखला जातो. हा अधिकारी सातारा येथे पॉलिटिकल एजन्ट म्हणून कार्यरत होता. 'हिस्ट्री ऑफ मराठाज' हे त्याचे गाजलेलं पुस्तक. त्याच्याबद्दल अनेक समज-गैरसमज प्रचलित आहेत. मराठ्यांचे राज्य लयाला गेल्यानंतरच्या काळात सातारला त्याने बजावलेली प्रशासकीय कामगिरी लक्षणीय मानली जाते.

सहकार • भूषण

धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सातारा.

''विना सहकार नही उध्दार''

(Reg. No. SAT/SAT/RSR/(CR)/340/89-90 Dt. 16-10-1989)

''धन्वंतरी भवन''९३,शनिवार पेठ,सातारा ४१५००२ ☎ (०२१६२) २३८३४१ , ८४०८९२९३९४

Website :- www.dhanvantaripatsanstha.in | Email :- dhanvantari_patsanstha@rediffmail.com

शाखा : सातारा –९९६०५६९६९६, सदरबझार सातारा –९४०४३८७१३२, कोरेगांव –९९२१८०८१६३,
फलटण –९८८१९१५८०८, कराड –९८६०८८१०१७, पिंपरी चिंचवड –९६०४५४०५२९, धनकवडी –९२७०८१०३०४

महाराष्ट्र शासनाच्या 'सहकार भूषण' पुरस्काराने मा. राज्यपालसाो यांचे हस्ते गौरव

दि. ३०/०९/२०२५ अखेर सांपत्तीक स्थिती	
सभासद	१४०१४
वसूल भाग भांडवल	रू. १० कोटी ८६ लाख
एकूण निधी	रू. ४८ कोटी ११ लाख
ठेवी	रू. १५९ कोटी ७८ लाख
येणे कर्ज	रू. १२९ कोटी ०० लाख
गुंतवणूक	रू. ९४ कोटी २१ लाख
एकत्रित व्यवसाय	रू. २८८ कोटी ७८ लाख
CRAR	३५.०७%

मुदत ठेव १३ महिने 7.75% व्याजदर

ज्येष्ठ नागरिक 8.25% व्याजदर

100% ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षीत

पेन्शन ठेव १३ महीने 8.00% व्याजदर

ज्येष्ठ नागरिक 8.50% व्याजदर

ज्येष्ठ नागरीकांना घरपोच सेवा

नियमित हप्ते भरणाऱ्या कर्जदारास १% कर्जव्याजदरात रिबेट

स्थावर तारण -नाळा, एन.ए. प्लॉट, जागा खरेदी कर्ज 12%

गृह कर्ज 10%

0% प्रोसेसिंग फी

वाहन कर्ज 10%

व्यावसायिक वाहन 12%

विद्यमान संचालक मंडळ

३६ वर्षे ऑडीट वर्ग 'अ'



डॉ. रविंद्र ना. भोसले
संस्थापक - चेअरमन



डॉ. कांत फडतरे
व्हा. चेअरमन



डॉ. अरविंद काळे
संचालक



डॉ. शिरीष मोईटे
संचालक



डॉ. शकील अत्तार
संचालक



डॉ. हेमंत शिंदे
संचालक



डॉ. राजेंद्र जाधव
संचालक



डॉ. अभिजीत भोसले
संचालक



डॉ. श्रीरंग डोईफोडे
संचालक



डॉ. जयदिप चव्हाण
संचालक



डॉ. सौ. सारीका मस्कर
संचालिका



डॉ. सौ. हर्षला वावर
संचालिका



डॉ. नारायण तांबे
संचालक



डॉ. सुनिल कोडगुले
स्विकृत संचालक



श्री. सुर्यकांत देशमुख
स्विकृत संचालक



श्री. संजय पवार
मा. सी.ई.ओ.



श्री. श्रीहरी डिंगणे
प्र. सी.ई.ओ.

आमचा संकल्प आपली सेवा – आपला मात्र सहकार्याचा हात हवा



डॉ. यशवंत पाटणे
मो.: ९४२२६०६१७७

माझा मऱ्हाटीचा बोलू

माणसाला भाषा आणि संस्कृती या दोन गोष्टी वारसाहक्काने प्राप्त होतात. त्या सामर्थ्यावर माणूस भाषिक आणि सांस्कृतिक प्रगती करत असतो. भाषेद्वारे ज्ञान मिळवत असतो. ते ज्ञान आणि संस्कृती पुढच्या पिढीला देत असतो. हजारो वर्षांत चिमणीचे घरटे बदलले नाही, मुंगीचे वारूळ बदलले नाही; पण माणसाची भाषा, घर,पोशाख आणि संस्कृती यामध्ये बदल झाले. परिवर्तनाचे सामर्थ्य भाषेत असते. माणसांना एकत्र आणण्याचे, तसेच आपल्या कल्पना, विचार आणि भावना व्यक्त करण्याचे भाषा हे प्रभावी साधन असते. वृक्ष जसा मातीतले पाणी, सत्त्व घेऊन वाढतो, तशी भाषा समाजातून वाढत घडत असते. त्या भाषावृक्षाची पाने, फुले, फळे म्हणजे साहित्य असते. वृक्ष जेवढा कसदार तेवढी त्याची फळे रसदार असतात. भाषा ही देश-प्रदेशाची सांस्कृतिक ओळख असते. भाषेची जाण असणे आणि भाषेचे भान जपणे हे संस्कृती संवर्धनासाठी व संरक्षणासाठी आवश्यक असते. भाषेमध्येच सौंदर्य आणि साधुत्व निर्माण करण्याचे कसब असते.

भाषा हे संस्कृतीच्या संस्कारासाठी उपयुक्त साधन असते. संस्कारातून संस्कृती तयार होते. जसे दगडावर संस्कार केले, की मूर्ती घडते. मातीवर संस्कार केले की, शेती तयार होते. तसे माणसावर संस्कार केले, की संस्कृती आकाराला येते.

भाषा आणि शिक्षण

मनुष्याला भाषेमार्फत विविध प्रकारचे अनुभव, माहिती आणि ज्ञान प्राप्त करता येते. भाषेचा आणि शिक्षणाचा जवळचा आणि जिव्हाळ्याचा संबंध असतो. सध्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा इतका सुळसुळाट झाला आहे, की अधिकांश पालकांना आपल्या पाल्याला मराठी माध्यमाच्या शाळेत पाठवणे कमीपणाचे वाटते. मराठी शाळांत पाठवणे म्हणजे आपण जणू दारिद्र्यरेषेखाली जगतो आहोत, असे त्यांना वाटते. सध्या प्रत्येक पालकाला आपल्या मुलाला विश्वनागरिक बनवण्याची घाई झाली आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळा विनाअनुदानित असल्याने शासनही त्याबाबतीत उदार असते. त्यामुळेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. मराठी माध्यमाच्या शाळांकडे पाठ फिरवून इंग्रजी

नोंद

रेव्हरंड कासिम महंमद ढालवाणी या सातारकर व्यक्तीने १८८२ मध्ये उपलब्ध इंग्रजी बायबलकोशाच्या आधारे अनुवाद करून बायबलचा सचित्र मराठी कोश तयार केला. रेव्हरंड हेन्री ब्रूस ह्यांनी डोळ्यांत तेल घालून तो तपासला. बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटीने प्रकाशित केलेला ४५३ पृष्ठांचा हा पहिला मराठी बायबल सचित्र कोश महत्त्वाचा मानला जातो.

माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना पाठवण्यामागची मानसिकता निर्माण होण्याची कारणेही वेगवेगळी आहेत. केवळ प्रतिष्ठितपणा मिळवण्यासाठी मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाठवणे हाही हेतू दिसतो; परंतु ते मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी पोषक नाही.

मराठी माध्यमाच्या शाळांचा दर्जा

जोपर्यंत इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा पर्याय उपलब्ध नव्हता, तोपर्यंत अनेक पिढ्या मराठी माध्यमांच्या शाळेतच शिकल्या वाढल्या. आज पालक मराठी माध्यमांच्या शाळांकडे पाठ का फिरवतात त्याचेही चिंतन करणे गरजेचे आहे. त्यातले एक प्रमुख कारण म्हणजे मराठी माध्यमाच्या शाळांचा ढासळत असलेला गुणात्मक दर्जा.. तो जोपासला पाहिजे. मराठी भाषेचे आधुनिक तंत्रज्ञानाशी नाते जोडले पाहिजे. शिक्षकांनी मुलांच्या मनात मराठी भाषेचा गोडवा निर्माण केला पाहिजे. भाषेची महती आणि श्रीमंती मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजे. काळाची पावले ओळखून मराठी माध्यमाच्या शाळांनी शैक्षणिक उपक्रमशीलता वाढवली पाहिजे. आपल्याला ज्ञानोबा, तुकोबांच्या ओवी-अभंगांचा समृद्ध असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या विकसित होण्यासाठी मातृभाषा प्रेरक असते. मुळात आपण जन्मापासून आपल्या संस्कृतीत वाढतो. आपल्या मातृभाषेतच विचार करतो. मराठी शाळेत मुलांना मातृभाषा नव्याने शिकावी लागत नाही. याउलट इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ती भाषा शिकण्यातच मुलांची शक्ती खर्च होते.

भाषा व ज्ञान आवश्यक

मला पालकांना प्रश्न विचारावयाचा आहे, आपण आपल्या पाल्याला शाळेत पाठवतो ते भाषा शिकण्यासाठी की ज्ञान मिळवण्यासाठी? माणसाला जगण्यासाठी हवा, पाणी जेवढे आवश्यक तेवढेच सन्मानाने जगण्यासाठी भाषा व ज्ञान आवश्यक असते. ज्ञान ही शक्ती असते. 'ज्ञानाने संपन्न झालेली मुले, पिढी हाच राष्ट्राचा खरा ऊर्जास्रोत असतो' हे डॉ. अब्दुल कलाम यांनी नमूद करून ठेवले आहे. ज्ञानाधिष्ठित समाजाची उभारणी करण्यासाठी विविध संस्था, कला, साहित्य यांची उपयुक्तता मोठी असते. ज्ञानाच्या बळावर माणसाने हवा, पाण्यापासून वीज तयार केली. दगड-विटांपासून घरे, धरणे तयार केली. ज्ञानाचा संबंध जसा निर्मितीशी असतो, तसा तो संस्कृतीशी असतो. भाषा हे संस्कृतीच्या संस्काराासाठी उपयुक्त साधन असते. संस्कारातून संस्कृती तयार होते. जसे दगडावर संस्कार केले, की मूर्ती घडते. मातीवर संस्कार केले, की शेती तयार होते. तसे माणसावर संस्कार केले, की संस्कृती आकाराला येते.

आपण उद्योगसंस्थांचे जाळे निर्माण केले. शेतीमध्ये नवे प्रयोग केले. व्यवसायामध्ये सुबत्ता आणली. चार पैसे हाती आले. शिवारे संपन्न झाली; पण 'माणसाचे मन असंस्कृत राहिले तर माणूस आणि पशू यांच्यात अंतर राहणार नाही' असे स्व. यशवंतराव चव्हाण यांनी म्हटले होते. आपल्याला भाषेद्वारे सुसंस्कृत मन घडवता येऊ शकते. त्यासाठी मातृभाषेतील साहित्य प्रेरक ठरते.

जे ज्ञान मातृभाषेतून प्राप्त होते, त्या ज्ञानाला आपल्या संस्कृतीचा सुगंध असतो. मुलांचे भावविश्व फुलण्यासाठी आणि त्यांच्यातून उद्याचे कलावंत, साहित्यिक निर्माण होण्यासाठी ज्ञानभाषेचे संस्कार कारणीभूत असतात. बालपणी मराठी शाळेत जी बडबडगीते शिकवली जातात, त्यांचा संबंध आपल्या संस्काराशी आणि संस्कृतीशी असतो. आपली मराठी संस्कृती 'विश्व हेच माझे घर' मानते. ती वैश्विक बंधुभाव जपते. तोच संस्कार आपल्या बडबडगीतांतून केला जातो.

चांदोमामा चांदोमामा भागलास का
लिंबोणीच्या झाडामागे लपलास का

हे गाणे लेकरांचे चंद्राशी आणि झाडाशी भावनिक नाते जोडते. आकाशातल्या चांदोबाला आई भाऊ मानते. म्हणूनच तो मामाच्या नात्याने लेकरांशी जोडला जातो. त्यातून एक भावबंध मुलांच्या मनात निर्माण होतो. झाडाच्या निमित्ताने निसर्गाशी नाते जोडले जाते.

इंग्रजी माध्यमांच्या शाळेत

ट्विंकल ट्विंकल लिटिल स्टार
हाऊ आय वंडर व्हॉट यू आर

हे गाणेही मुले तालासुरात गातात. पालकांना त्याचे कौतुक वाटते; पण ते गाणे चांदोमामासारखे भावबंध निर्माण करते का?

शेवटी मुलांच्या भावविश्वामध्ये अशा अनेक बडबडगीतांचे मोल मोठे असते. अनेक मोठमोठ्या, लेखकांनी, कवींनी

१९३४ मध्ये अमेरिकन परिचारिका मिसेस लुईस फिशर ह्यांनी सातारा आणि आसपासच्या खेड्यांत मोफत औषधोपचारासह आरोग्य चळवळ सुरू केली. १९७४ मध्ये सातारा शहरापासून सात मैलांवर एका वटवृक्षाखाली कुष्ठरोगी तपासणीची सुरुवात लुईस फिशर ह्यांनी केली. रोग्यांची संख्या चौदा हजार आढळली तेव्हा औषधसामग्री घेऊन त्या तेथे पोहोचल्या. त्यांच्या मदतीस गांधीजींच्या आश्रमातले प्रशिक्षित अक्षय महंती आले होते.

लहान मुलांसाठी एकांकिका लिहिल्या, कविता लिहिल्या आणि त्यांच्या मनामध्ये मराठीची गोडी निर्माण केली.

अर्थ न समजता इंग्रजी भाषेची पोपटपंची करणारी पिढी आपल्याला घडवायची आहे का, की आपल्या मातृभाषेतून जीवनाचा अर्थ शोधणारी पिढी घडवायची आहे? मातृभाषेच्या संस्कारातूनच उद्याचे विचारवंत, कलावंत जन्माला येत असतात. आपले मन सांस्कृतिक संस्काराने घडत असते. साहित्य हे सांस्कृतिक प्रेरणा जागवण्याचे काम करीत असते. ज्ञानोबा, तुकोबांच्या संत साहित्याचा मराठी भाषेला समृद्ध वारसा लाभला आहे. एकेकाळी संस्कृतमधील ज्ञानभांडार काही ठरावीक विद्वान मंडळींसाठीच उपलब्ध होते. ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेतील गीता सर्वसामान्य लोकांना समजावी, यासाठी ती लोकभाषेतून सांगितली. 'महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पहिले पाऊल टाकले आणि भाषेच्या क्षेत्रात पहिली क्रांती केली' असा गौरव स्व. यशवंतराव चव्हाण यांनी केला आहे. लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे, हे त्यांनी निक्षून सांगितले. समाजजीवन उन्नत आणि विकसित होण्यासाठी मातृभाषा ही महत्त्वाची असते. कोणत्याही प्रशासकाला आपल्या राज्याची मातृभाषा अवगत असणे गरजेचे असते.

ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर यांनी हैद्राबाद येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लोकभाषेचा दैनंदिन जीवनात आणि प्रशासनात वापर होणे जनहितासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी तिथल्या निजामाला मराठी, तेलुगु, कानडी या तिन्ही भाषांत पारंगत होण्याविषयी खडे बोल सुनावले. आपल्या कोण्या पूर्वजाला ७६ बायका होत्या आणि तो निजाम प्रत्येक राणीशी तिच्या भाषेत संभाषण करायचा, अशी आख्यायिकाही त्यांनी निजामाला ऐकवली होती.

सामान्य लोकांचे भाषिक आणि सांस्कृतिक जीवन संपन्न करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश, भाषा संचलनालयाची निर्मिती केली. नुकतेच शासनाने राजा बढे यांचे 'महाराष्ट्र गीत' प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रमापूर्वी सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलन हा देखील वाङ्मयीन सृजनाचा सांस्कृतिक सोहळा असतो. तसे पाहिले, तर हिंदी, बंगाली, कन्नड अशा भाषेतही मराठी इतकीच विपुल व दर्जेदार साहित्यनिर्मिती झाली; पण अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासारखी शतकोत्तरी परंपरा आपल्याच मराठी भाषेला लाभलेली दिसते. अशा संमेलनांच्या निमित्ताने तयार होणारे वातावरण साहित्य, भाषा आणि संस्कृती यांच्या समृद्धीसाठी पोषक असते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिल्ली येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून काही महत्त्वाचे विचार नोंदवले. 'लोकशाही समाज आणि लोकशाही संस्कृती निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रादेशिक भाषांचे महत्त्व' त्यांनी विशद केले होते. त्यांच्या मते, वाङ्मय आणि कला यांच्या उत्कृष्ट संवर्धनाच्या योगाने भाषा प्रगल्भ दशेस येतात. प्रगल्भ दशेस आलेल्या प्रादेशिक मातृभाषा ही भारतीय लोकशाहीचीच एक मुख्य गरज आहे. सामर्थ्यशाली एक राष्ट्रीयत्व निर्माण करण्याचा उद्देश सफल करण्याकरता प्रादेशिक मातृभाषांची वाढ करणारे साहित्य कसे निर्माण होईल, हा साहित्य संमेलनाच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. मराठी साहित्य संमेलनांमध्ये आजवर भाषाशुद्धी, लिपी, भाषावार प्रांतरचना, मराठी साहित्यात येणारे नवे विचार, प्रवाह, समाजामध्ये उद्भवलेले भाषिक प्रश्न, सीमावाद, मराठी विद्यापीठाची गरज इत्यादी विषयांवर मौलिक विचारमंथन झाले आहे.

गिरीश कर्नाड यांनी अहिल्यानगरच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून 'जुलुमशाही, हिंसा, दहशतवाद यांचा समाजावर आणि संस्कृतीवर होणारा परिणाम' मार्मिक शब्दांत विशद करून विचारशीलता आणि सर्जकता यांच्यावर कोणाचीही हुकुमत चालू शकत नाही, हे ठणकावून सांगितले होते.

लेखक व कवी आपल्या साहित्यातून समाजाशी बोलत असतात. सुखदुःखाचा संवाद साधत असतात. मानवी व्यवहाराची गुंतागुंत मांडत असतात. भूतकालीन अनुभवातून वर्तमान काळातील वर्तनाची चिकित्सा करत असतात. समाजाची स्थिती, गती आणि समस्या यांना प्रभावीपणे भिडण्याचे काम करीत असतात. उत्कृष्ट साहित्यकृतींना युगतत्त्वाचे भान लाभलेले असते. असे साहित्य कालातीत असते. उत्कृष्ट साहित्य ही समाजाची उत्कट प्रतिक्रिया असते.

'ययाती', 'मृत्युंजय', 'महानायक' अशा

नोंद

सुमारे शंभर दीडशे वर्षांपूर्वी बैल आणि लाकडी नांगर घेऊन शेती करणारा सातारा जिल्ह्यातील साधाभोळा शेतकरी आता ए. आय. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून शेती करतो आहे. जगाच्या पटलावर आपले स्थान निर्माण करतो आहे. मागील शंभर वर्षांत सातारा जिल्ह्यातील शेती पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल झाले. राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत साताऱ्याचे मोठे योगदान आहे.

साहित्यकृतींना मृत्यूचा शाप नसतो, तर चिरंतन चैतन्याचे वरदान असते.

आपल्याकडे प्रत्येक वर्षी प्रकाशित होणारे दिवाळी अंक हे मराठी भाषेचे खास वेगळेपण आहे. दर्जेदार दिवाळी अंकांना वाङ्मयीन मूल्य लाभलेले दिसते. एखाद्या विशिष्ट विषयावर किंवा प्रश्नावर प्रकाशित होणारे दिवाळी अंक अनेक वाचक संग्रही ठेवतात. समाजातील जे विचारवंत, कलावंत, साहित्यिक, संशोधक असतात, त्यांच्या प्रज्ञा-प्रतिभेतून जे विचारधन जन्माला



येते, ते समाजजीवनाला प्रवाहित, रसरशीत ठेवते. संतसाहित्याने मराठी ढालनाला सात्त्विक गंध दिला आहे. याशिवाय अनेक सामाजिक चळवळींना जीवनरस पुरवलेला दिसतो. ललित साहित्याचे उद्दिष्ट मनोरंजन आणि विचारजागृती करणे असते. ते साध्य करण्यासाठी भाषिक संकेतांचे पालन करावे लागते. भाषेतील उथळपणा आणि आक्रमकपणा यामुळे मूळ विषय बाजूला पडतो. त्यातून वाद उद्भवतात. यासाठी तो टाळला पाहिजे.

'दैनंदिन जीवनातील ताणतणाव दूर करण्यासाठी साहित्याचा वापर अफूच्या गोळीसारखा होऊ नये' अशी समजूत फार पूर्वी ह. ना. आपटे यांनी करून दिली होती. दूरदर्शन मालिकेतून होणारी भडक करमणूक मानसिक संतुलन बिघडवतेच, शिवाय सांस्कृतिक मूल्यांना तडा देते. आता आपल्या कुटुंब व्यवस्थेलाच हादरा देणाऱ्या अनेक मालिकांची मोहिनी प्रेक्षकांना पडली आहे.

'वृत्तपत्रे, संगणक, इंटरनेट, विविध समाजमाध्यमे, दूरदर्शनच्या वृत्तवाहिन्या यावर होणारी मराठीची मोडतोड आणि तिचे विकृत रूप पाहिल्यानंतर शतकांनुशतके मराठी माणसाच्या अंतकरणात रुजलेली मूळ मराठी भाषा कधीच मेली आहे' असे वाटते, असे परखड मत पाठ्यपुस्तक मंडळाचे माजी मराठी विभागीय अधिकारी प्रा. माधव राजगुरू यांनी', 'मराठी भाषेपुढील आव्हाने: एक चिंतन' या पुस्तकात मांडले आहे.

जागतिकीकरणामुळे विविध भाषा आणि संस्कृतीच्या स्वाभिमानालाच जोरदार धक्का बसण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. मातृभाषा आणि परभाषा यांच्यातील शब्दांच्या देवाण-घेवाणीवरही बरेच वाद झडले आहेत झडत आहेत.

इंग्रजी शब्दास योग्य मराठी पर्यायी शब्द

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी फारशी, इंग्रजी व इतर परकीय शब्दांची मराठी भाषेतून हकालपट्टी करावी अशी मागणी केली होती. विलायती कपड्याप्रमाणे इंग्रजी शब्दांची होळी जर करता आली असती, तर त्या शब्दांबद्दल तिटकारा अधिक वाढला असता. कोल्हटकर यांनी इंग्रजी शब्दास योग्य मराठी पर्यायी शब्द देण्याची सूचना केली होती. सायकलला पायगाडी, मोटारला धूरगाडी इत्यादी, तर स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्यापूर्वीच इंग्रजी शब्दांना सुंदर मराठी पर्यायी शब्द सुचवले होते. मेयर या शब्दाला 'महापौर' हा शब्द मराठी भाषकांना अधिक जवळचा वाटतो.

अर्थात इतर भाषेच्या संपर्कात आल्याने काही परके शब्द आपले झाले असतील, तर त्यांना हाकलून न देता भाषा समृद्धीसाठी स्वीकार करावा, अशी भूमिका वामन मल्हार जोशी यांनी घेतली होती. डस्टर, चेअरमन, बस स्टॅन्ड हे शब्द रूढ झालेले दिसतात.

जसे दोन अधिक दोन बरोबर चार हे सत्य कोणाच्या मालकीचे नाही. तसे शब्दांचेही आहे. वा. म. जोशी यांनी मराठी भाषेच्या शुद्धलेखनाचा आग्रह धरला होता.

महाराष्ट्राच्या सर्वदूर भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न सातारा जिल्ह्याच्या शेतकऱ्यांनाही भेडसावत आहेत; परंतु प्रश्नाचे रूपांतर संधीत करण्याचे धाडस इथल्या शेतकऱ्यांनी नेहमीच दाखवल्याचे दिसते. येथील शेतकऱ्यांनी पिकांची विविधता आणि उत्पादकता दुप्पट केली. फलोत्पादनाच्या क्षेत्रात आज सातारा जिल्ह्याचे नाव आघाडीने घेतले जाते.

आशुतोष जावडेकर यांनी प्रमाण भाषेतील शुद्धलेखनाबाबत जो काटेकोरपणा जपला जातो, तो व्यापक जनसमूहाच्या बोलीभाषेचा विचार करताना दाखवू नये, असे मत मांडले आहे. काही शब्दांबद्दल लवचीकता दाखवली पाहिजे. उदाहरणार्थ आनि, पाणी असे शब्द प्रमाण भाषेने स्वीकारले पाहिजेत, असे नमूद केले आहे.

नवीनच भाषा जन्माला आली

आजच्या आधुनिक काळात मातृभाषेमध्ये इंग्रजी, हिंदी शब्द घुसडले गेल्याने नवीनच भाषा जन्माला आली आहे. अशा भाषेला आधुनिक म्हणून मिरवले जात आहे. वास्तविक मातृभाषेतील शब्दांचा बळी न देता आधुनिकता जपली पाहिजे, जपता येते. मराठी भाषिक म्हणून आपणच जाणीवपूर्वक आपल्या शब्दांना प्रतिष्ठा दिली पाहिजे. धन्यवाद, आभारी आहे असे म्हणण्यापेक्षा 'थँक्यू' म्हणण्यात मराठी माणसाला गौरव वाटतो. क्षमा करा किंवा माफ करा या ऐवजी 'सॉरी' म्हणणे आपल्या अंगवळणी पडले आहे. खरंतर ॲलर्जी या शब्दाला 'वावडं' हा अत्यंत चपखल शब्द मराठीमध्ये आहे; पण ॲलर्जी म्हटल्याशिवाय ऐकणाऱ्यालाही नेमका बोध होत नाही. एका मर्यादेपर्यंत आणि अनिवार्य असेल, तर परभाषेतील शब्दांचा वापर करणे गैर नाही. येथे परकीय भाषेचा द्वेष करून स्वभाषेचे समर्थन करण्याचा हेतू नाही; पण काही इंग्रजी शब्द आपल्याला चमकदार वाटत असले तरी ते सोन्याचा मुलामा दिलेल्या खोट्या नाण्यासारखे असतात, याचेही भान ठेवले पाहिजे. या संदर्भात माधव मनोहर यांनी 'अशा खोट्या नाण्यांचा वेळीच मुकाबला केला नाही, तर ती खऱ्या नाण्यांनाच देवघेवीच्या व्यवहारातून बाद करतील' असा इशारा दिला होता.

वि. वा. शिरवाडकर यांनी डोक्यावर मुकूट पण अंगावर फाटकी वस्त्रे घेऊन मराठी भाषा मंत्रालयाच्या दारी उभी असल्याची खंत व्यक्त केली होती. आजही कोर्ट, रेल्वे, बँका, पोस्ट, विद्यापीठे, सरकारी कार्यालय, मंत्रालय अशा सार्वजनिक ठिकाणी इंग्रजी भाषेतूनच पत्र व्यवहार होतो. राज्याची अधिकृत भाषा जर मराठी असेल, तर ती अभिमानाने सर्वत्र वापरली पाहिजे. आपल्या मराठी भाषेला केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा देऊन आपल्या भाषेचा सार्थ सन्मान केला आहे. मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करून शासनाने या सन्मानाला अधिक उंच नेले आहे. आता सीमाभागाचे प्रश्नही मार्गी लावले पाहिजेत.

कर्नाटकातील मराठी भाषकांचा लढा हा लोकशाही मूल्यांचा लढा आहे. लोकजीवन समृद्ध करण्याचे एक उपयुक्त साधन म्हणून या लढ्याकडे पाहिले पाहिजे. या सीमावर्ती परिसरातील मराठी साहित्य संमेलने ही महाराष्ट्र बेळगाव एकीकरणाला नवी ऊर्जा देत असतात. आपण त्या भागातील मराठी भाषकांच्या संवेदनांचा अंत न पाहता त्यांना मराठी प्रांतामध्ये समाविष्ट करून घेतले पाहिजे.

मराठी भाषा हा कृतज्ञतेचा भाग होण्यासाठी मराठी माणसाने एखाद्या शुभप्रसंगी, विवाह सोहळ्याच्या प्रसंगी किंवा वाढदिवसाच्या प्रसंगी मराठी भाषेतील ग्रंथांची भेट देऊन आपण मराठी असल्याचा स्वाभिमान जागवला पाहिजे. विवाह सोहळ्याप्रसंगी नवरदेव श्रीवंदनाला म्हणून हनुमान मंदिरात जातात, तशी प्रथा आहे. यापेक्षा त्या विवाह कार्यालयाच्या जवळ एखादे महापुरुषाचे स्मारक असेल, पुतळा असेल, वाचनालय असेल तेथे जाऊन वंदन केले पाहिजे. आपल्या घरामध्ये देवघर असते तसे ग्रंथघर असले पाहिजे. टीव्ही, फ्रीज, महागडी बैठक व्यवस्था अशा गोष्टी घराला घरपण देत असतील; पण घरातले ग्रंथघर घराला शहाणपण देत असते. वाचनसंस्कृतीच्या विकासासाठी ग्रंथ महोत्सवासारखे उपक्रम गावागावात सुरू झाले पाहिजेत. अनेक मराठी साहित्यिकांनी इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट साहित्याचे अनुवाद करून मराठी भाषेचे दालन सजवले आहे. फार वर्षांपूर्वी मार्क्सचा 'कॅपिटल' हा ग्रंथ पां. वा. गाडगीळ यांनी मराठीत आणल्यामुळे सर्वसामान्य कामगार श्रमिकांना न्याय देणारा मार्क्सवाद ग्रामीण भागातल्या लोकांनाही समजला.

साहित्याची देवाण-घेवाण ही एकमेकांच्या भाषा समृद्धीसाठी गरजेची असते. जे जे उत्तम, उदात्त त्याची देवाणघेवाण केल्याने भाषेलाही आपल्या भाषिक सीमा ओलांडून अधिक सन्मानित करता येते.

छत्रपती शिवरायांनी मराठी राजभाषाकोश तयार करून घेतला. ज्ञानकोश, शब्दकोश, लोककथा कोश, पुराण कथा, जुन्या म्हणी, वाक्प्रचार, जात्यावरच्या ओव्या, लोकगीते, लावणी, पोवाडे, बारशाचे पाळणे यांचे संकलन ही मातृभाषेची सांस्कृतिक संपत्ती असते. परकीय सत्तेने आणि परकीय शब्दांनी मराठी संस्कृतीवर



सातारची भाषा हा एक लक्षणीय विषय आहे. सातारी बोलीभाषेला खूप प्राचीन इतिहास आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या ग्रामीण भाषाशैलीत नेहमीच झटकन ओळखू येणारी आणि समजायला अवघड, तरीही इतर प्रांतीयांना खूप आवडणारी ही भाषा. लोकसाहित्यातही सातारी बोली मोठ्या दिमाखात मिरवली गेली आहे. इथली भाषा निसर्गात रमलेली दिसते.

आघात केले असले तरी आमच्या मराठी संत कवींनी, पंडित कवींनी, शाहिरी कवींनी मराठी संस्कृतीचा बाज आणि मराठी भाषेचा बाणा मोठ्या निष्ठेने जपला. 'मराठी असे आमुची मायबोली' असे गर्जून सांगणाऱ्या माधव जूलियन यांनी फार वर्षांपूर्वी, 'महाराष्ट्राचा विचार करा', 'मराठीचा अभ्यास करा' आणि प्रतिभासंपन्न व्हा, असा मौलिक संदेश दिला होता, याचे भान आपण ठेवले पाहिजे.

मातृभाषेचे श्रेष्ठत्व

डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी एक मार्मिक उदाहरण देऊन मातृभाषेचे श्रेष्ठत्व विशद केले आहे. 'दिल्लीवर स्वारी करण्यासाठी नादिरशाह आला होता. असे म्हणतात, त्याला 'हत्ती' या प्राण्याचे विशेष आकर्षण होते. महाकाय अशा हत्तीवर बसून त्याने या प्राण्याचा लगाम कुठे आहे? असे विचारले. कोणी सांगितले, याचा माहुत आपल्या हाती अंकुश घेऊन हत्तीला ताब्यात ठेवतो. नादिरशाह पटकन हत्तीवरून खाली उतरला. 'ज्या प्राण्याचा लगाम आपल्या हाती नाही, त्यावर मी स्वार होणार नाही. त्यापेक्षा माझे घोडे बरे! असे तो म्हटला.' एकूण काय तर, इंग्रजी भाषा हत्तीसारखी आहे. तिचा लगाम परकीयांच्या ताब्यात आहे आणि मातृभाषा घोड्यासारखी आहे, तिचा लगाम आणि घोडदौड स्वाराच्या हातात आहे.

मराठी भाषा ही जगामध्ये बहुसंख्येने बोलल्या जाणाऱ्या पहिल्या दहा भाषांमध्ये गणली जाते. ती युनोचीही जगन्मान्य भाषा होऊ शकते. एकोणिसाव्या शतकात इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज अशा युरोपीय समूहांनी ८७ टक्के पृथ्वीवर आपले भाषिक साम्राज्य लादले होते. केवळ दोन-तीन आशियाई देशांनी त्यांच्या वर्चस्वाला जुमानले नाही. आपणच आपल्या स्वभाषेचे सत्त्व प्राणपणाने जपले पाहिजे आणि त्यांनी आपल्या देशाची झपाट्याने प्रगती केली पाहिजे. व्यक्तीच्या, प्रांताच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीला भाषाच प्रेरणा देत असतात.

आपण अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठीचा बोलू कौतुकाने जपला आहे आणि जागतिक दर्जाचे वैभव मराठी भाषेला प्राप्त करून दिले आहे. या पुढचा काळ मोठा गुंतागुंतीचा आहे. संगणकाच्या आगमनानंतर इंग्रजी शाळांचे पेव फुटले आहे. अशा काळात आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगणारी पिढी वाढवण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे. आपणच आपल्या भाषेची अस्मिता जपली पाहिजे. वाढवली पाहिजे.
कविवर्य सुरेश भट यांनी म्हटल्याप्रमाणे,

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्मपंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी
आमच्या कुलाकुलांत नांदते मराठी
येथल्या फुलाफुलांत हसते मराठी
इथल्या दिशादिशांत दाटते मराठी
इथल्या नगानगात गर्जते मराठी

असा मराठी भाषेचा गुंजारव कानामनांत होत राहो, या शुभेच्छा!

(लेखक प्रख्यात वक्ते आणि साहित्यिक आहेत.)





प्रा. विश्वास वसेकर
मो.: ९८२२७२२६६८

लेखक आणि साहित्यिक यामधील फरक



सध्या लेखकांची संख्या प्रचंड वाढली आहे, असा कुत्सित शेरा अनेकदा ऐकू येतो. एखादे पुस्तक प्रकाशित करून व्यक्तीला लेखक म्हणून मिरवता येते, की अधिक चांगल्या प्रकारे साहित्यसेवा करणे अपेक्षित असते याची चर्चा करणारा लेख.

शब्दांचा घोळ न घालता आपल्याला लेखक आणि साहित्यिक यामधील फरक या विषयाची चर्चा करावयाची आहे. लेखक व साहित्यिक यांना समानार्थी अनेक संज्ञा या संदर्भात लक्षात घेता येतील. वा.गो.आपटे यांच्या 'शब्दरत्नाकर' या कोशात म्हटले आहे, की लेखक हा संस्कृत पुल्लिंगी शब्द असून त्याचा अर्थ 'लिहिणारा, कारकून' असा होतो. यानुसार मोठमोठ्या लेखकांकडे लेखनिक म्हणून काम करणारे सगळेच लेखक या उपाधीला पात्र ठरतील. संत ज्ञानेश्वरांचे 'लेखकु' झालेले सच्चिदानंद हे सर्वांत जुने मराठी लेखनिक. अशा प्रकारचे लेखनिक हे लेखक किंवा साहित्यिक नसतात हे स्पष्ट आहे.

पुस्तक प्रसिद्धी हा निकष

एखादे (च) पुस्तक प्रसिद्ध झालेल्या लेखकाला साहित्यिक म्हणायचे का? या प्रश्नाला माझे उत्तर 'हो' असे आहे. फार फार तर जोपर्यंत त्याच्या पुस्तकांची संख्या वाढत नाही, तोपर्यंत त्याला नवोदित साहित्यिक किंवा नवोदित कवी

नोंद

सातारा जिल्ह्यात कराडजवळ ओगलेवाडी येथील ओगले काच कारखाना हा भारताच्या स्वदेशी चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा होता. हा कारखाना १९१६ मध्ये श्रीपाद ओगले यांनी सुरू केला होता. हा कारखाना ग्रामीण भागासाठी महत्त्वाचा असलेल्या 'प्रभाकर कंदील'साठी प्रसिद्ध होता. तसेच रेल्वेसाठी काच आणि इनॅमलवेअरचा प्रमुख उत्पादक बनला.

म्हणता येईल. पुढे त्याने हाताळलेल्या वाङ्मयप्रकारांच्या आधिक्यानुसार त्याचा विशेष उल्लेख होतो. ना. सी. फडक्यांनी अनेक वाङ्मयप्रकार हाताळले तरी ते कादंबरीकार, मंगेश पाडगावकरांनी गद्यलेखन (ही) केलेले असले तरी ते कवीच आणि विजय तेंडुलकरांनी कादंबरी लिहिली असली तरी ते नाटककारच.

बालसाहित्यकार

साहित्यिकाची आणखी एक उपजाती आहे, ती म्हणजे बालसाहित्यिक. केवळ बालकांसाठी म्हणून जे लेखन करतात त्यांना आपण बालसाहित्यकार म्हणतो. बालक हा वाचक समोर ठेवून केलेले हे लेखन असते. बालकुमार हा चार वयोगटांना सामावून घेणारा वाचकगट आहे. शिशु, बाल, कुमार आणि किशोर असे चार चार वर्षांचे हे गट आहेत. बडबडगीते शिशूंसाठी, तर साहसकथा सर्वांत मोठ्या गटासाठी. बालसाहित्याची उपेक्षा करणारी आपली वाङ्मयीन संस्कृती आहे. म्हणून तर केवळ बालसाहित्याची भूमिका घेऊन अध्यक्षपदाची निवडणूक लढवणाऱ्या राजा मंगळवेढेकरांसारख्या ज्येष्ठ लेखकाला पराभूत व्हावे लागले. त्यानंतरही अनेक निवडणुका झाल्या; पण बालसाहित्याची ही खंत अजूनही गेलेली नाही. अलीकडे त्यांनी वेगळी चूल मांडली आहे. वेगळी साहित्यसंस्था आणि वेगळी संमेलने भरवून.

वैचारिक लेखन

प्रज्ञा आणि प्रतिभा या दोन्हींचा एकत्रित संगम पुष्कळदा पाहायला मिळतो; पण काहींच्याकडे फक्त 'प्रज्ञा' असते. फक्त आणि फक्त वैचारिक लेखन करणाऱ्यांना आपल्याला लेखक म्हणता येईल. या न्यायाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नरहर कुरुंदकर, न. र. फाटक, गोविंद तळवलकर हे मराठीचे मोठे लेखक होते, असे म्हणता येईल.

प्रतिभावंत वेगळा असतो. प्रतिभेची व्याख्या अशी आहे. 'अपूर्व वस्तूनिर्माणक्षमा प्रज्ञा इति प्रतिभा.' प्रतिभावंतालाच आपण कलावंत म्हणतो आणि त्याच्या निर्मितीला आपण कला म्हणतो, ललितकला म्हणतो. ताजमहालच्या निर्मितीपूर्वी ताजमहाल नव्हता, म्हणून ताजमहाल ही पूर्वी अस्तित्वात नसलेली, अपूर्व (वास्तू) कला. 'गर्जा जयजयकार' 'जपानी रमलांची रात्र', 'त्रिधा राधा' या अपूर्व वस्तू आहेत. कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार किंवा ललितगद्यकार हे एकाच वेळी कलावंत आहेत आणि साहित्यिक आहेत.

मी नवोदित कवी होतो, बी. ए. च्या प्रथम वर्षाला शिकत होतो तेव्हा रा. रं. बोराडे आणि डॉ. प्रभाकर मांडे हे दोन प्राध्यापक आम्हाला शिकवायला होते. कवी असल्यामुळे मी पदसिद्ध कलावंत होतोच; पण गुरुवर्य मांडे सरांना तोंडावर म्हणालो, की ''बोराडे सर जसे साहित्यिक आहेत तसे तुम्ही साहित्यिक नाहीत!'' तेव्हा मांडे सर क्षमाशील वृत्तीने माझ्याकडे पाहून फक्त हसले होते. आजही माझ्या त्या बोलण्यात काही तरी अर्थ होता असे मला वाटते. आज मी एवढे म्हणू शकतो की, सृजनशील किंवा ललित साहित्य (कथा, कविता, इ.) लिहिणारे हे तर साहित्यिक असतातच; पण समीक्षक आणि संशोधकही साहित्यिक असतात. ग. ह. खरे, अ. का. प्रियोळकर, रा. चिं. ढेरे, प्रभाकर मांडे हे महान संशोधक आहेत, तर वा. ल. कुलकर्णी, नरहर कुरुंदकर हे समीक्षक आहेत.

समीक्षक आणि लेखक

'थिअरी ऑफ लिटरेचर' या ऑस्टिन वॉरेन आणि रेने वेलेक यांच्या पुस्तकाचा विचार केल्याखेरीज मराठी, हिंदी किंवा इंग्रजीत (आमच्या वेळेला तरी) एम. ए. करता येत नसे. यातला रेने वेलेक हा मोठा साहित्यमीमांसक किंवा समीक्षक होता. त्याची प्रोफेसरपदी निवड झाली तेव्हा काही साहित्यिकांनी गहजब केला. ते म्हणाले, की ''वेलेकने आमच्यासारखी ललित साहित्याची निर्मितीच केली नाही. या पदावर आमचाच अधिकार आहे.'' तेव्हा वेलेक म्हणाला, ''तसे असेल, तर प्राणिशास्त्र विभागाचा प्रोफेसर म्हणून हत्तीची निवड करावी लागेल!'' मी रेनी वेलेकच्या बाजूचा आहे. समीक्षकसुद्धा निःसंशय साहित्यिकच असतात.

समीक्षकासाठी 'टीकाकार' असाही शब्दप्रयोग केला जातो. टीका या शब्दाला प्रतिकूलतेचा वास आहे. परखड, घणाघाती ही विशेषणे टीका या शब्दापुढे लावली जातात. 'टीका करणे' या वाक्प्रचाराचा अर्थही विरोध करणे असा लावला जातो. बा. भ. बोरकर जेव्हा वि. स. खांडेकरांना पहिल्यांदा भेटायला गेले तेव्हा ते घाबरलेले होते कारण खांडेकरांनी कुणावर तरी केलेली विध्वंसक टीका त्यांनी आधी वाचली होती. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी एका भाषणात अशा टीकाकारांसाठी 'भयपुरुष' हा शब्द वापरल्याचे मला आठवते. ज्यांना धड

श्री भवानी संग्रहालय हे औंधचे राजे कै. श्रीमंत भवानराव उर्फ बाळासाहेब महाराज पंतप्रतिनिधी यांच्यामुळे आकाराला आले. बाळासाहेब महाराज पंतप्रतिनिधी हे उत्तम कलाप्रेमी आणि स्वतः एक कलाकार होते. त्यांनी अनेक कला, चित्रांचा, शिल्पकलेच्या भांड्यांचा, शस्त्रास्त्रांचा आणि धार्मिक पुस्तकांचा संग्रह करून ठेवलेला आहे. सर्वसामान्य जनतेला या सर्वांचा फायदा व्हावा म्हणून त्यांनी सन १९३८ साली श्री भवानी संग्रहालय व ग्रंथालयाची स्थापना केली.

ललितसाहित्य निर्माण करता येत नाही असे अपयशी लेखक समीक्षेकडे वळतात किंवा टीकाकार होतात, हा एक लोकप्रिय समज ललित लेखकांमध्ये आहे.

अमृता प्रीतम यांनी असे लिहिले आहे, की समीक्षक जेव्हा टीका करतात तेव्हा आपल्यातली एखादी दुखरी नस उघडी करून दाखवताहेत असे वाटते. त्याच्यापुढे जाऊन त्यांनी असे म्हटले होते, की समीक्षकाची समीक्षा वाचून लेखकाला मी अजून काही चांगले लिहून दाखवीन अशी उमेद वाटली पाहिजे.

फार चांगलं, गोड गोड, रसग्रहणात्मक लिहिणे ऊर्फ आस्वादक समीक्षा ही अलीकडे मलाही मान्य होत नाही. डॉ.सुधीर रसाळांच्या मते 'रसग्रहण' हे समीक्षा न होता ललितगद्याच्या पातळीवर जाते. रसग्रहण करू नका, संहितासमीक्षा करा, अशा अर्थाचा विचार त्यांनी 'कवितानिरूपण' या ग्रंथात मांडला आहे. पुरस्तक परीक्षणे लिहिणाऱ्या प्रत्येकाने तो वाचला पाहिजे.

समीक्षक, आलोचक (हिंदी) हे समानार्थी शब्द आहेत. सम् + इक्ष असा विग्रह. संस्कृत साहित्यशास्त्रात समीक्षकासाठी सहृदय, रसिक अशा संज्ञा आहेत. डॉ. सुधीर रसाळ या दोन्ही गुणांनी संपन्न असे श्रेष्ठ समीक्षक आहेत. ललित साहित्याचे अभ्यासपूर्ण, सखोल विवेचन करणे हे समीक्षकाचे कार्य आहे. चोखंदळ वाङ्मयीन रसिकता नसलेला माणूस चांगला समीक्षक होऊ शकत नाही.

समीक्षकाला आवश्यक असणारे गुण विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या मते, ग्रंथाचे पूर्ण ज्ञान असणे, सत्यप्रीती, शांतपणा आणि सहृदय हे आहेत. ''समीक्षक हा न्यायाधीश असतो, वकील नव्हे'' असेही त्यांनी आपल्या 'ग्रंथावर टीका' या निबंधात म्हटले आहे. वामन मल्हार जोशींनी आध्यात्मिक रूपकाची भाषा वापरत असे म्हटले होते, की ''समीक्षक हा साहित्यक्षेत्रातील ज्ञानयोगी असतो, ललित लेखक हा कर्मयोगी व सामान्य रसिक हा भक्तियोगी असतो.''

प्रस्तुत लेखात आपण लेखक, विचारवंत, ललित लेखक, संशोधक, समीक्षक आदींची चर्चा करून लेखक व साहित्यिक यांच्यातला असलेला आणि नसलेला फरक स्पष्ट केला आहे.

(लेखक मराठी भाषेचे अभ्यासक आणि साहित्यिक आहेत.)

श्रीमंत सईबाई महाराज
महिला सह. पतसंस्था मर्या; फलटण



र.नं.एस.ए.टी./पी.एल.एन./आर.एस.आर.(सी.आर.) ११०६/९२-९३/सन ९३

मुख्य कार्यालय : गोविंद'टॉवर्स' प्लॉट नं.४, डी.एड.चौक,रिंग रोड,लक्ष्मीनगर,फलटण.
मो.९९२२९०१७५७ ई-मेल : shrimantsaibaipat1993@gmail.com

आपल्या ग्राहकांशी औपचारिकतेच्या आणि व्यावहारिकतेच्या पलीकडे जाऊन नातं जपणारी

श्रीमंत सईबाई महाराज महिला सह. पतसंस्था मर्या; फलटण

उत्तम लाभदायक आर्थिक ठेव योजना आणि अनेक सुलभ कर्ज योजनांसह तत्पर सेवा देण्यासाठी सज्ज आहे.

	पतसंस्थेची ठळक वैशिष्ट्ये	पतसंस्थेची सांपत्तिक स्थिती	रक्कम (लाखांत)
१.	ठेवीवर मासिक,तिमाही,सहामाही व्याजाची सोय	सभासद संख्या	५५३९
२.	ज्येष्ठ नागरिकांना ठेवीवर १/२ जादा व्याजदर	वसुल भागभांडवल	१२६.५८
३.	शाखा राजवाडा येथे लॉकर सुविधा उपलब्ध	राखीव व इतर निधी	३२२.६१
४.	सर्व शाखा संगणकीकृत व कोअर बँकींग सुविधा	ठेवी	४८९२.००
५.	पतसंस्थेमार्फत दरवर्षी महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम घेण्यात येतो.	कर्ज	२८७०.००
६.	बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण याबाबत प्रबोधन केले जाते.	गुंतवणूक	२३९१.८२
		निव्वळ एन.पी.ए.	०.४५%
		ऑडीट वर्ग	'अ'

चेअरमन
श्रीमंत सौ.शिवांजलीराजे संजीवराजे नाईक निंबाळकर

व्हा.चेअरमन
सौ.वृषाली दिपकराव भोसले



श्रीनिवास वारुंजीकर
मो.: ९८६०३६४४७६

मराठी अनुवादातील समस्या

मराठी अनुवादित साहित्य हा एक महत्त्वाचा प्रांत आहे. इतर अनेक भाषांतील साहित्य मराठी भाषेत अनुवादित होत आहे. इंग्रजी साहित्य मराठीत आणण्याचे प्रमाण जास्त आहे. अनुवादित साहित्य आणि अनुवादक वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर अनुवादित साहित्यासमोर कोणती आव्हाने आहेत, याचा आढावा घेणारा लेख.

मराठी भाषांतर करताना येणाऱ्या समस्यांमध्ये पारिभाषिक शब्दांचे अचूक मराठी प्रतिशब्द शोधणे, मूळ भाषेतील अर्थ जसाच्या तसा मराठीत आणणे, आणि सांस्कृतिक संदर्भ व भाषेचे बारकावे सांभाळणे या प्रमुख समस्या आहेत. विशेषतः आधुनिक आणि तांत्रिक संकल्पनांसाठी योग्य मराठी प्रतिशब्द तयार करणे हे एक मोठे आव्हान आहे, तसेच मूळ भाषेतील वाक्यरचना आणि भावाचा अचूक अनुवाद करणेदेखील महत्त्वाचे आहे.

एका नामांकित वृत्तपत्रामध्ये वृत्तसंस्थेच्या बातम्यांचे भाषांतर करताना येत असलेल्या अडचणी खूपच विलक्षण होत्या. पूर्वी इंटरनेटसारखे सक्षम माध्यम नसल्याने अनेकदा भाषांतर करत असलेल्या उपसंपादकाचे ज्ञान, त्याचा सारासार विचार आणि त्याने मांडलेले मुद्दे एवढेच ग्राह्य धरले जात होते. मात्र, हे करत असताना सदर अनुवादकाचे सामान्य ज्ञान आणि त्याचे स्वत:चे भाषेविषयीचे आकलन महत्त्वाचे ठरत असे. भारतीय संस्कृतीमध्ये एकूण ६४ कलांचा समन्वय आढळतो. जाहिरात करणे ही एक ६७ वी कला मानली गेली, तर अनुवाद करणे ही एक ६६ वी कला आहे. या कलेमध्ये कोणत्याही भाषेतील विचार संबंधित अन्य भाषेत जसेच्या तसे व्यक्त करता यावेत, अशी धारणा असते. म्हणूनच अन्य कोणत्याही कलेतील कॉपीराईटपेक्षाही भाषांमधील कॉपीराईटला सर्वाधिक किंमत असते.

सध्या तंत्रज्ञान इतके पुढे गेले आहे की, अगदी संयुक्त राष्ट्रांमध्ये तुम्ही कोणत्याही भाषेमध्ये बोलू शकता. त्याचे साधे उदाहरण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संयुक्त राष्ट्रातील भाषणे. सातारचाच विषय घ्यायचा झाला, तर ॲड. वर्षा देशपांडे यांनी संयुक्त राष्ट्रांत केलेले मराठीमधले भाषण उल्लेखनीय ठरले होते.

प्रतापसिंह हायस्कूल ही साताऱ्यातील जुन्या राजवाड्यात भरणारी शाळा आहे. सातारा जिल्ह्यातील ही पहिली शाळा इ.स. १८७४ मध्ये 'गव्हर्नमेंट हायस्कूल' या नावाने सुरू झाली. त्यावेळी ही इंग्रजी माध्यमाची शाळा होती, आता मराठी माध्यमाची आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गजेंद्रगडकर इत्यादी मोठ्या व्यक्तींनी या हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले आहे.

नोंद

पारिभाषिक शब्दांचे आव्हान

आधुनिक तत्त्वज्ञान, विज्ञान आणि इतर विषयांच्या संकल्पनांसाठी अचूक मराठी प्रतिशब्द शोधणे हे एक मोठे आव्हान असते. त्याचे साधे उदाहरण म्हणजे सध्या देशभर सुरू असलेली मतदार यादी सर्वेक्षणाची मोहीम. इंग्रजीमध्ये याला सरळपणाने स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन अर्थात 'सर' असे म्हटले आहे. याचा अनुवाद करताना 'विशेष गहन पुनरावृत्ती' असे म्हटले आहे; पण यामधून ही प्रक्रिया निवडणुकीतील मतदार यादीशी संबंधित काही विषयावर असल्याचे स्पष्ट होत नाही. काही वेळा आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरले जाणारे शब्द जसेच्या तसे ठेवण्याचा पर्याय निवडला जातो. त्यामुळे एकसंधतेचा अभाव जाणवू शकतो.



अर्थाचा अचूक अनुवाद

एका भाषेतील अर्थ न बदलता दुसऱ्या भाषेत रूपांतरित करणे, ही मुख्य गरज आहे. मंडल आयोगाचे आंदोलन नव्वदच्या दशकात पुढे आले असताना, त्या वेळी अनेक आंदोलकांनी स्वत:ला पेटवून घेतले होते. त्या वेळी त्याला साजेसा शब्द 'सेल्फ इमोलेशन' असा असताना त्याचा मराठीमधला अनुवाद संभ्रम निर्माण करणारा होता.. अनेकदा शब्दांचा छायानुवाद करणे, अर्थात शब्दशः भाषांतर करणे घातक ठरत असे. त्याचे सर्वांत वाईट उदाहरण हे ओशो यांनी लिहिलेल्या 'संभोगातून समाधीकडे' या शीर्षकाकडे जाते. ओशोंनी म्हटले होते की, सगळा संसार करून झाला, सगळी सुखे उपभोगून झाली, तर आता तयार राहा समाधी अवस्थेसाठी; पण 'संभोगातून समाधीकडे' या अनुवादाने ते पुस्तक कामसाहित्य असल्याचे सिद्ध झाले आणि त्या पुस्तकाच्या शीर्षकाविरोधातच रान उठले. म्हणूनच अनुवाद आणि भावानुवाद यातील फरक लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, कारण अनेकदा शब्दशः भाषांतर मूळ अर्थाला न्याय देत नाही.

सांस्कृतिक संदर्भ

प्रत्येक भाषेची स्वत:ची अशी एक संस्कृती असते. अनुवादाच्या वेळी मूळ संस्कृती आणि लक्ष्य संस्कृती यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच वाक्प्रचार, म्हणी आणि भाषेतील बारकावे यांचा योग्य अनुवाद करणे कठीण असते. अनुवादातील भाषेचा वापर हा दुसऱ्या लेखातील भाषेच्या वापराशी सुसंगत असावा लागतो. नवीन निर्माण केलेले प्रतिशब्द पूर्वीपासून वापरल्या जाणाऱ्या शब्दांशी जुळणारे असावे लागतात. अन्यथा वाचकांचा गोंधळ होतो.

सहसा मूळ भाषेतील मजकूर अथवा आशय आपल्याला अपेक्षित असलेल्या दुसऱ्या (म्हणजे लक्ष्य) भाषेत व्यक्त करण्याची कला म्हणजे भाषांतर किंवा अनुवाद होय. विज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र यांसारख्या विषयांतील मजकुराचे भाषांतर करणे तुलनेने काहीसे सोपे असते. कारण यात केवळ वाच्यार्थ अपेक्षित असतो. संकेतार्थ, गुह्य वा गूढ अर्थ, भाषेच्या शैलीची वैशिष्ट्ये यांसारख्या अवघड गोष्टींचा संबंध अशा भाषांतरात कमी येतो; परंतु या विषयात नित्यनव्या संकल्पनांची, शोधांची, माहितीची व त्याला अनुसरून शब्दांची भर पडत असल्याने, त्यांसाठी मराठी प्रतिशब्द शोधणे व रूढ करणे हे आव्हानात्मक काम आहे. विविध धर्मांचे तत्त्वज्ञान, दर्शने, इतर तत्त्वज्ञाने यांच्या संकल्पनेची विशिष्ट परिभाषा असते, ज्यांचे जसेच्या तसे भाषांतर होणे अशक्य असते. ललित साहित्याचे भाषांतर अधिक अवघड असते कारण त्यात लेखकाची मानसिकता, त्या भाषेतील शब्दांचा पोत, संकेत, वाक्प्रचारांचे संदर्भ, भाषेची लय इत्यादी गोष्टींचा विचार करावा लागतो.

नोंद

ब्रिटिश राजवटीत म्युनिसिपल कायद्याची अंमलबजावणी १ ऑगस्ट १८७३ पासून सुरू झाली आणि सातारा नगरपरिषद अस्तित्वात आली. १८७३ च्या म्युनिसिपल ॲक्ट ६ नुसार १८७५ मध्ये टाऊन म्युनिसिपालिटी व मार्च १८८४ मध्ये सिटी म्युनिसिपालिटी झाली. स्थानिक स्वराज्य कायद्यात बदल झाल्यामुळे १८८५ पासून निवडणुका घेण्यात येऊ लागल्या. तथापि कलेक्टर अध्यक्ष व त्यांचे मदतनीस बारा शासननियुक्त व बारा लोकनियुक्त असे २५ सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले.

भाषांतर, रूपांतर, सारांश किंवा विस्तार करणे ही भाषेची प्रगत नैपुण्ये होत. जगात अनेक भाषा वापरल्या जातात. तथापि, जगातील बहुसंख्य ज्ञान व पर्यायाने माहिती इंग्रजीत एकवटली आहे. त्यामुळे इंग्रजीतून इतर भाषांत मोठ्या प्रमाणावर भाषांतरे होत असलेली दिसतात. याला मराठी भाषा अपवाद नाही. त्यामुळे इंग्रजी या ज्ञानभाषेतून मराठी भाषेत अनेक प्रकारची भाषांतरे झाली आहेत. यांमध्ये वैज्ञानिक, ललित, तसेच वैचारिक साहित्याची भाषांतरे झाली आहेत.

भाषांतरकाराची नैपुण्ये

भाषांतरकार मूळ आणि ज्या भाषेत भाषांतर करणे अपेक्षित आहे, त्या दोन्ही भाषांत पारंगत असावा लागतो. दोन्ही भाषांतील शब्द, शब्दच्छटा, अर्थ, व्याकरण, बोलीभाषेतील प्रचलित शब्द यांसारख्या गोष्टींचा विचार करून भाषांतर केले जाते. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अर्थाचे संक्रमण होताना मूळ आशयाला कोणताही धक्का लागणार नाही, याची दक्षता भाषांतरकार घेतो. भाषांतरणाच्या अपेक्षित भाषेतील शब्द चपखलपणे वापरून भाषांतरकार मूळ आशय व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे वाचकाला मूळ साहित्यकृती वाचल्याचे समाधान व आनंद मिळतो. हीच खऱ्या अर्थाने भाषांतरकाराची कसोटी मानतात. थोडक्यात, हे भाषांतर आहे, असे वाचकाला वाटत नाही.

भाषांतर करताना भाषांतरकाराला सर्वसामान्य लोकांची बोली, व्यावसायिकांची भाषा, शास्त्रीय व तांत्रिक शब्दरचना यांची जाण असावी लागते. या कामांत दोन्ही भाषांतील शब्दकोश, परिभाषा कोश यांचा भाषांतरकाराला सतत आधार घ्यावा लागतो. भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, अलंकार, शैली यांच्यावर भाषेचे वैभव अवलंबून असते व यांचा वापर मुख्यत्वे ललित वाङ्मय प्रकाशनात केला जातो कारण शब्द, पद, वाक्ये इत्यादींचा उपयोग त्यांच्या मूळ वाच्यार्थाहून भिन्न अर्थाने भाषेत रूढ झालेला असतो. तसेच म्हणी, वाक्प्रचार, लोकानुभव हे लोकांच्या व्यवहारांतून रूढ होत असतात.

भाषांतरणाच्या मर्यादा व अडचणी

भाषांतर करण्याचा हेतू, दर्जा या सर्व गोष्टींचा विचार करून विविध कारणांसाठी भाषांतर करतात. एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत आणताना भाषांतरकार दोन्ही भाषा, तसेच संबंधित साहित्य, संस्कृती यांच्याशी समरस झालेला असतो. अर्थच्छटा, लक्ष्यार्थ, व्यंगार्थ यांच्यासह तो मुळाबरहुकूम भाषांतर करू शकतो. अर्थात भाषांतराच्या व्यापक क्षेत्राला व्यवहार्य रूप देताना पुढील प्रकारच्या मर्यादा व अडचणी येऊ शकतात.

भाषांतरकाराला दोन्ही भाषा, बोली, संबंधित रूढी, परंपरा यांची उत्तम जाण नसल्यास विपर्यास होऊ शकतो.

भाषांतराचा विषय व्यवस्थितपणे समजून न घेतल्यास आशयाच्या आविष्कारात चुका होऊन त्रुटी राहू शकतात.

भाषांतर करावयाच्या विषयासंबंधीचे संदर्भ विश्लेषण लक्षात घेणे गरजेचे असते. भाषांतराचा वाचकवर्ग, त्याची बोली भाषा ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन भाषांतर करावे लागते. नवनवीन पारिभाषिक शब्द, संज्ञा, संकल्पना लक्ष्य भाषेत वापरताना त्यांच्या अर्थच्छटांचा विचार करावा लागतो. शिवाय या गोष्टी वाचकाच्या माहितीतील असाव्या लागतात. दोन्ही भाषकांच्या संस्कृतीचे आकलन करून आशयाची मांडणी करावी लागते. असे आकलन नसल्यास चुका संभवतात. शास्त्रीय संकल्पना, विषयातील संज्ञा वापरताना शब्दकोश, परिभाषा कोश यांचा आधार घेतल्यास नेमकेपणा जपला जातो. पाल्हाळ व क्लिष्टता टाळणे गरजेचे असते. भाषांतरित आशय कठीण झाल्यास त्याचे वाचकाला आकलन होत नाही व भाषांतर करण्यामागील हेतू साध्य होत नाही. थोडक्यात, भाषांतर साधे, सोप्या भाषेतील आणि मुळाबरहुकूम असावे लागते. अनेकदा चुकीच्या भाषांतरामुळे किंवा चुकीच्या अनुवादामुळे अनेक गंभीर प्रसंग निर्माण झाले आहेत; पण विस्तार भयास्तव त्याविषयीची माहिती येथे देता येत नाही. एकूणच भाषांतरकाराला किंवा अनुवादकाला किमान दोन भाषांचे सम्यक ज्ञान आणि त्या-त्या भाषेतील चालीरीती, परंपरा अशा सर्व संदर्भांचे ज्ञान असावे लागते.

(लेखक पुणे येथील वृत्तपत्रांत २० वर्षे अनुवादक आहेत.)

सातारा जिल्ह्याच्या जुन्या गॅझेटियरमध्ये असे म्हटले आहे की, ''कृष्णेच्या पश्चिमेकडील किंवा उजव्या बाजूने रेल्वे लाईन टाकण्यासाठी होणारा मोठा खर्च टाळण्यासाठी सातारा रेल्वे विभाग कृष्णा नदीच्या पूर्वेकडील किंवा डाव्या बाजूने जाईल असे ठरवण्यात आले. परिणामी सातारा जिल्हा मुख्यालय रेल्वे स्टेशन आणि कराड स्टेशन मुख्य शहरापासून काही अंतरावर असेल.''



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व
आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कर्मभूमी सातारा येथे
आयोजित केलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या ९९ व्या
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा.



* शुभेच्छुक *

श्री कालिकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड.

Regd. No. SAT/KRD/RSR/CR/751/88-89/8-7-88

हेड ऑफिस : ६/१, गुरूवार पेठ, कासार गल्ली, कराड, ४१५ ११०. फोन : (०२१६४) २२०६८०

शाखा सातारा : ६, गुरूवार पेठ, कमानी हौद, सातारा. फोन : (०२१६२) २९८७६४

एकत्रित व्यवसाय ३०७ कोटी

- अत्याधुनिक व प्रशस्त कराड व सातारा येथे स्ववास्तु
- इंटरनेट बँकिंगद्वारे ई पेमेंट करण्याची सुविधा

संस्था संस्थापक

मा. मुनीर बागवान (सावकार)
(श्री कालिका कुटुंब प्रमुख)



स्व. गजानन उर्फ बाळासाहेब मोहिरे
(श्री कालिका कुटुंब जनक)



स्व. जयंतीलाल भंडारी



स्व. महेश त्रिभुवणे



मा. संजीव मोहिरे

विद्यमान संचालक मंडळ



मा. मुनीर बागवान (सावकार)
श्री कालिका कुटुंब प्रमुख



मा. राजन वेळापुरे
चेअरमन



मा. अनिल सोनवणे
व्हा. चेअरमन



प्रा. अशोककुमार चव्हाण
प्रकाशन कट्टा समिती
अ.भा.म. साहित्य संमेलन



मा. अरूण जाधव



डॉ. संतोष मोहिरे



मा. शरदचंद्र देसाई



मा. सुरेश भंडारी



मा. राजेंद्रकुमार यादव



मा. निरंजन मोहिरे



डॉ. जयवंत सातपुते



मा. श्रीमती जयाराणी जाधव



मा. सौ. सिमा विभूते



मा. सुरेश कोळेकर
तज्ञ संचालक



मा. पारस विजापुरे
तज्ञ संचालक



मा. विवेक वेळापुरे
कार्यलक्षी संचालक



जे.पी. देसाई
मो.:९४२३७२८७६६

क्रांतिकारी शिक्षणमहर्षी



महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना महाराष्ट्राचा क्रांतिकारी शिक्षणमहर्षी असे जे म्हटले आहे ते अत्यंत वास्तववादी आहे. शिक्षणाच्या मंथनाने सामाजिक विषमतेचा सागर ढवळून समतेची रत्ने शोधून काढणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे उच्च कोटीतील शिक्षणमहर्षी होते.

महर्षींचे मोठेपण हे त्यांच्या तपश्चर्येवर अवलंबून असून ती तपश्चर्या गोरगरिबांच्या सुखासाठी, समाजाच्या हितासाठी झाली असेल, तरच त्या तपश्चर्येला पावित्र्याचे अधिष्ठान प्राप्त होते. याच अर्थाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विधायक समाज परिवर्तनासाठी केलेली तपश्चर्या अत्यंत पवित्र आहे. स्वावलंबन, स्वाध्याय, स्वातंत्र्य आणि स्वाभिमान ही मूल्ये रुजविणारे ते थोर शिक्षणमहर्षी होते. प्रस्थापित सामाजिक विषमतेच्या विरोधात संघर्ष करून त्यांनी शैक्षणिक आणि सामाजिक मूल्ये रुजविली. या अर्थाने ते क्रांतिकारी शिक्षणमहर्षी होते. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून समाजामध्ये चारित्र्य रुजविले. चारित्र्याची अनेक उदाहरणे आहेत. लेखाच्या मर्यादा लक्षात घेऊन एक उदाहरण सांगतो, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांचे सुपुत्र आप्पासाहेब पाटील यांना २६ मार्च १९७२ रोजी लिहिलेले पत्र आहे.

सातारा संस्थानातील मराठा मुला-मुलींनी लष्करी शिक्षण घ्यावे यासाठी प्रतापसिंह महाराजांनी ग्रँट डफच्या सल्ल्यानुसार रेसिडेन्सीतील एक इंग्रज अधिकारी नियुक्त केला होता. आपली कन्या गोजराबाई आणि इतर सरदारांच्या मुली यांना लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था त्यांनी केली. तेथे अश्वारोहण, भालाफेक, बंदुकीची नेमबाजी यांचे शिक्षण त्या ठिकाणी देण्यात येत होते.

नोंद

सातारा.
ता. २६-३-७२.

चि. आप्पासाहेब यास,
अनेक अशीर्वाद,

पिता या नात्याने तुला जन्म देणे या पलीकडे मी तुझ्यासाठी काही एक केलेले नाही. एवढेच नव्हे, तर तुझ्या मातेचा शेवटचा सौभाग्य अलंकार तोही मी हिरावून घेतला व तुझ्या मातेचा जन्मभर सेवा करता करता त्यातच अंत झाला. तेव्हा तू त्यागी माता-पित्याचा पुत्र आहे व यातच तू सौख्य मानावयास पाहिजे.

तू संस्थेची नोकरी करू नये अशी माझी पहिल्यापासून फारच इच्छा होती व आजही आहे. संस्थेच्या ज्या स्टोअर्समध्ये तू काम करीत आहेस, त्या स्टोअर्सला चालू साली फारसा नफा झालेला नाही. यापुढेही मुळीच होणार नाही. त्यामुळे स्टोअर्सला नोकर कमी करावे लागतील, त्यात तुला कमी न करता दुसऱ्यास कमी करावे लागेल, हे स्वाभाविक आहे, अशा वेळी तू होऊन नोकरी सोडावीस व विमा कंपनीचा अगर इतर धंदा करावास अशी माझी तुला प्रेमाची सूचना आहे. काही दिवस तुला थोडं जड वाटेल; परंतु स्वतंत्र रीतीने तू आपल्या पायावर उभा राहिल्यास त्यातच तुला आनंद वाटेल. वडिलांकडून तुला आतापर्यंत काही मदत मिळालेली नाही व यापुढेही मिळणार नाही, तरी तू गरिबीचा संसार करून स्वावलंबी बनावे. कदाचित मीही असमर्थ झालो तर, माझादेखील भार तुला सहन करावा लागेल.

याकरिताच तू स्वावलंबी व्हावे, कळावे, हा आशीर्वाद.

तुझा पिता
भाऊ पाटील

महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावरील सर्वांत मोठी शिक्षण संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक आपल्या मुलाला वरीलप्रमाणे संदेश देतात. हा संदेश म्हणजे एक चमत्कार आहे, चारित्र्याचे अधिष्ठान असलेला एक दीपस्तंभ आहे. हे पत्र प्रत्येक शाळा, महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये चौकट करून लावले पाहिजे.

अनर्थांचे मूळच नष्ट करण्याचे ध्येय

'अविद्या ही सर्व अनर्थांचे मूळ आहे' या महात्मा फुले यांनी मांडलेल्या विचाराने प्रेरित होऊन कर्मवीरांनी सर्व अनर्थांचे मूळच नष्ट करण्याचे महान ध्येय उराशी बाळगून आयुष्यभर शिक्षणाचा प्रसार करण्याचे कष्ट उपसले. माणसाला त्यांची ओळख पटणे हाच त्यांच्या जीवनातील सर्वश्रेष्ठ आविष्कार आहे, असे फ्रेंच विचारवंत मॉटेन यांनी म्हटले आहे. बहुजनांच्या जीवनात असा आविष्कार घडविण्याचे महान कार्य कर्मवीर अण्णांनी केले. गरीब असणे गुन्हा नाही मात्र जो कोणी गरिबीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणार नाही, त्याच्या हातून शंभर सामाजिक गुन्हे घडतील, असे सॉक्रेटीस या महान विचारवंताने म्हटले आहे. कर्मवीर अण्णांनी बहुजन समाजातील असंख्यांना असे सामाजिक गुन्हे करण्याच्या पापातून मुक्त केले आहे.

गोरगरीब माणसांना ज्ञानप्रकाश

रयत शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या एम. फिल. आणि पीएच.डी. धारकांची संख्या काही शेकड्यांमध्ये आहे. शतकानुशतके ज्यांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते, अज्ञानाच्या आणि अंधश्रद्धेच्या अंधकारात जे चाचपडत होते त्या विविध जाती-धर्मातील असंख्य गोरगरीब माणसांना ज्ञानप्रकाश देऊन, त्यांच्यातील माणूस जागा करून, त्यांना माणूस म्हणून जगण्याचे भाग्य मिळवून देण्याचे भगीरथ प्रयत्न महाराष्ट्राच्या गेल्या दीड-पावणे दोनशे वर्षांच्या सामाजिक सुधारणा चळवळीच्या इतिहासात ज्या सामाजिक सुधारकांनी केले, त्या ऐतिहासिक नामावलीत कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव सुवर्णअक्षराने नोंदले गेले आहे. महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि कर्मवीर भाऊराव पाटील आदींनी जाती भिन्नता, स्त्री-पुरुष विषमता आणि अस्पृश्यतेवर जेवढे वैचारिक प्रहार केले आहेत तेवढे भारतामध्ये इतर घटक राज्यांत क्वचितच झाले असतील. संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केलेल्या स्वतंत्र भारतामध्ये इतर घटक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये जे सामाजिक सामंजस्य, स्थिरता



लोकहितदक्ष आणि चाणाक्ष राजा असलेल्या छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या रोजनिशीमध्ये समकालीन व राजकीय घडामोडींचा संपूर्ण तपशील पाहायला मिळतो. या रोजनिशी पुण्यातील पेशवे दप्तरात जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. त्यात कालाक्रमाने १८३७ पर्यंतचा वृत्तान्त असून त्यात समाज, विचार, भावना व लोकप्रथांचे संक्षिप्त चित्र पाहायला मिळते.

आणि विविधतेतही जी एकता दिसून येते त्याचा वैचारिक पाया या आद्य सुधारकांनी घातला आहे.

वटवृक्षाप्रमाणे विस्तार

ज्ञानदेव विश्वनाथ घोलप या हरिजन मुलाची विद्यार्थी म्हणून निवड करून विद्यादानाचा प्रारंभ केलेली कर्मवीर अण्णांची रयत शिक्षण संस्था महाराष्ट्रभर प्रचंड वटवृक्षाप्रमाणे पसरली. स्वावलंबनाची मुळे असलेल्या या प्रचंड वटवृक्षाच्या सावलीत स्वाध्यायाचे बाळकडू घेऊन स्वतंत्र बाण्याचे हजारो तरुण महाराष्ट्राच्या सर्वांगीण क्षेत्रात स्वाभिमानाने उभे आहेत. पिढ्यानपिढ्या शिक्षणाचा गंध नसलेल्या घरात कर्मवीर अण्णांच्या विचारातून एक एक विद्यार्थी शिक्षित झाला. अण्णांच्या विचाराने सुगंधित झालेल्या या विद्यार्थ्यांच्या घरात त्या विद्यार्थ्यांने स्वतःच शिक्षणाचे एक मोहोळ तयार केले. अण्णांनी शेकडो गुणी-गरीब विद्यार्थी हेरले, त्यांना जवळ केले, शिक्षणाची संधी दिली, पित्याच्या मायेने जपले, त्यांच्या भविष्याची काळजी वाहिली आणि त्यांचे संसार फुलविले. या फुलांचा सुगंध मातीला लागला आणि सर्व मातीच जणू सुगंधित झाली.

स्वावलंबी शिक्षण

स्वावलंबी शिक्षण ही कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जगाला दिलेली एक महान देणगी आहे. अमेरिकेतील ब्लॅकबर्न कॉलेजचे प्रिन्सिपल डॉक्टर लडलम यांनी २ एप्रिल १९६४ रोजी लिहिलेले एक पत्र आहे. त्या पत्रात त्यांनी लिहिले आहे, ''ब्लॅकबर्न कॉलेजमध्ये आम्हा लोकांना आजपर्यंत असे वाटत होते की, स्वावलंबी शिक्षणाचा सर्वप्रथम प्रयोग करण्याचे श्रेय आम्हाला मिळते; परंतु आमच्याही पूर्वी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सदर प्रयोग भारतामध्ये सुरू केला होता. त्या नवमार्ग शोधक कर्मवीरांना आमचे शतशः धन्यवाद!''

शिक्षणरूपी जगन्नाथाचा रथ ओढत असताना कर्मवीर अण्णांनी वंश, जात, धर्म असा कोणताही भेदभाव केला नाही. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला गुरुस्थानी मानून शिक्षण प्रसाराबरोबर सामाजिक सुधारणांसाठी आजन्म प्रयत्न केला. कर्मवीर अण्णा हे ब्राह्मणद्वेष्टे होते, अशी टीकाही काही समाजकंटकांनी केली. कर्मवीरांनी कधीही ब्राह्मण व्यक्तीचा द्वेष केला नाही. प्रहार केले ते ब्राह्मण्यांवर, ब्राह्मणवृत्तीवर. न्यायमूर्ती गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे भरलेल्या पहिल्या सामाजिक परिषदेत कर्मवीरांनी मांडलेले विचार अत्यंत सूचक, बोलके आहेत. ते म्हणाले होते, ''ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद गाडून टाकल्याशिवाय यापुढे महाराष्ट्राचा विकास होणार नाही.''

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील एका महाविद्यालयास डॉक्टर धनंजयराव गाडगीळ यांचे नाव दिलेले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या आजीव सदस्यांमध्ये काही ब्राह्मण बांधवांचाही समावेश आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षात 'मला उमजलेले कर्मवीर अण्णा' या शीर्षकाची एक पुस्तिका मी डॉक्टर मा.पं. मंगुडकर यांच्या प्रेरणेतून लिहिली. महाराष्ट्रातील नामांकित लेखक, साहित्यिकांच्या उपस्थितीत झालेल्या जन्मशताब्दी समारंभामध्ये १९ सप्टेंबर १९८७ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते या पुस्तिकेचे प्रकाशन झाले. या पुस्तिकेत रयत शिक्षण संस्थेच्या १९८४-८५ सालच्या वार्षिक अहवालातील सेवक, शिक्षकांच्या संख्येचा जातवार तपशील मी दिला आहे. यानुसार ८१०६ शिक्षकांमध्ये ब्राह्मण समाजाचे २४१ शिक्षक होते. मुस्लिम ३०१, जैन ३६०, लिंगायत २३७, माळी ३३७, धनगर २७५, महार ३४८, चांभार १४०,कैकाडी ०६, मांग ८८, शिंपी १२१, कुंभार १०९, न्हावी ११२, कोष्टी ११६, रामोशी ४५, गोसावी २०, वडार ११, गोंधळी १५, महादेव कोळी ८, भिल्ल १, ठाकूर ३, टोकरा कोळी १, आणि मराठा ४२७२ अशी संख्या होती. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील जन्माने जैन होते हे लक्षात घेतले पाहिजे. 'साधना' या १९८६ च्या दिवाळी अंकामध्ये देवदत्त दाभोळकर यांनी या आकडेवारीसंबंधी जे उद्गार काढले आहेत ते महत्त्वाचे आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ''आपल्या सेवकांची जातवार माहिती आपल्या प्रत्येक वार्षिक अहवालामध्ये देणारी रयत शिक्षण संस्था ही कदाचितच महाराष्ट्रातील व भारतातील एकमेव शिक्षण संस्था असावी. महाराष्ट्रातील एकूण समाजाचे प्रतिनिधित्व व प्रतिबिंब या आकडेवारीत दिसते.''

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील शाहू बोर्डिंगमध्ये सर्व जाती-धर्मांची मुले गुण्या गोविंदाने राहत आहेत हे पाहून राष्ट्रपती महात्मा गांधी म्हणाले होते,

श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अनेक लेखकांना उत्तेजन देऊन काही महत्त्वाची पुस्तके लिहून घेतली होती. राजांच्या प्रोत्साहनाने सातारा शहरात स्थापन झालेल्या शिळाप्रेसमध्ये काही ग्रंथही छापण्यात आले होते. 'छंदोमंजिरी' नामक काव्य लिहिणारा बेलवडे येथील रामचंद्र दैवत ज्योतिषी यास राजांनी इनाम जमीन दिली.

नोंद

''मी अजून साबरमती आश्रमात करू शकलो नाही ते भाऊरावांनी येथे केले आहे.'' पूज्य साने गुरुजी म्हणाले होते, ''संस्थेतील मुलांमध्ये सर्व पंथांची, जातीधर्मांची मुले होती. ही ध्येयवादी संस्था पाहून मला खूप आनंद झाला.'' आपल्या हातातील खराट्याने रस्ते स्वच्छ करणारे आणि विचारांनी माणसांची मने स्वच्छ करणारे राष्ट्रीय संत गाडगेबाबा म्हणाले, ''भाऊराव पाटील या माणसाची माझी गाठ पडण्यास उशीर झाला, अन्यथा मी आजवर देवळे, धर्मशाळा आणि घाट बांधण्यावर केलेला खर्च मी शाळा बांधण्यासाठी केला असता.'' लोकनेते जयप्रकाश नारायण यांची प्रतिक्रिया कर्मवीर अण्णांचे मोठेपण साकारते. ते म्हणाले होते, ''शिक्षण क्षेत्र में इन समाजवादी सिद्धांतो का व्यावहारिक प्रयोग देखकर मुझे प्रसन्नता ही नही प्रथम दर्शन हुआ.'' सयाजीराव महाराज यांनी व्यक्त केलेले विचार कर्मवीर अण्णांचे मोठेपण अधिक अधोरेखित करतात. ते म्हणाले होते, ''हिंदुस्थानच्या प्रगतीस लागलेल्या अत्यंत जुलमी जातीविशिष्ट किडीच्या मुळावरच भाऊराव पाटील यांनी कु-हाडीचा घाव घातला. अशा प्रकारचे आदर्श वसतिगृह हिंदुस्थानात कुठेच दिसून येत नाही.''

जीवनकार्याचे अनेक पैलू

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचे अनेक पैलू आहेत. जाती-पातीचा विचार न करता विद्यार्थ्याला खांद्यावर घेऊन शिक्षणाच्या दिशेने चाललेले अण्णा, भुकेलेल्या विद्यार्थ्यांची भूक भागवण्यासाठी पत्नीच्या अंगावरील दागदागिने मोडणारे अण्णा, पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांनी सणाच्या दिवशी बोर्डिंगमधील गरीब मुलांना गोड घास भरण्यासाठी प्रसंगी गहाण ठेवलेले मंगळसूत्रही सोडवू न शकलेले कर्मवीर अण्णा, ''विद्यार्थ्यांनी फोडलेले दगड धोंडे हे कधीही अवमूल्यन न होणारे माझे डॉलर आहेत'', असे स्वाभिमानी उत्तर देणारे अण्णा, दुसऱ्या सेवकावर अन्याय होऊ नये म्हणून प्रत्यक्ष मुलालाही नोकरी नाकारणारे कर्मवीर अण्णा, ''महाविद्यालयाला छत्रपती शिवाजी महाराजांचे दिलेले नाव कदापिही बदलणार नाही'', असे उत्तर देणारे अण्णा, ससून हॉस्पिटलमध्ये मृत्युशय्येवर असतानाही ग्रामीण विद्यापीठाचे स्वप्न रंगविणारे अण्णा, तत्त्वासाठी एका मुख्यमंत्र्यांसमोरही न झुकणारे कर्मवीर अण्णा, एका महर्षी आणि पराक्रमी सेनापतीच्याही पलीकडे पोहोचले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवनकार्य जणू महाकाव्य ठरावे. महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या घराघरात हे महाकाव्य आवडीने, गोडीने वाचले जाईल, अशी माझी श्रद्धा आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे तथा अण्णासाहेब कर्वे यांना स्त्री शिक्षणाच्या कार्यासाठी भारतसरकारने भारतरत्न पुरस्कार देऊन गौरविले आहे. भारत सरकारने दिलेला हा पुरस्कार अत्यंत पवित्र कार्यासाठी आणि अत्यंत योग्य व्यक्तीस दिला आहे. हीच माझी भावना आहे. मी याचा आनंद व्यक्त करतो. अशा महान अण्णासाहेब कर्वे यांचे सुपुत्र भास्करराव कर्वे यांची प्रतिक्रियाही तितकीच पवित्र आहे. ती अशी, ''महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य शहरापुरते आणि विशिष्ट वर्गापुरते मर्यादित होते. ग्रामीण भागातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य भाऊराव पाटील यांनी केले. त्यादृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील हे पूर्वीच्या थोर कार्यकर्त्यांपेक्षा कणभर जास्तच मोठे ठरतात.''

या लेखातील महान व्यक्तींच्या आणि मान्यवरांच्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याविषयी व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया लक्षात घेता भारत सरकारने कर्मवीर भाऊराव पाटील यांना भारतरत्न पुरस्काराने गौरवल्यास तो पुरस्काराचाच सन्मान ठरेल.

(लेखक ज्येष्ठ साहित्यिक व चिंतनशील वक्ते आहेत.)



नोंद

छत्रपती प्रतापसिंह महाराज शिक्षणाबाबत अत्यंत जागरूक होते. इंग्रजी शिक्षणाचे सामर्थ्य लोकांना पटवण्याचा प्रयत्न करून त्यांनी उपयुक्त इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर करण्याचे तत्त्व प्रत्यक्षात उतरवले. 'सभारंजनी', 'सभानीती', 'सेवक बोधिनी' इत्यादी ग्रंथ छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मराठीत आणले. हे त्यांच्या अभिरुचीची व लोकहितदक्षतेची साक्ष देणारे आहे.



परिसंवाद विभाग

मराठी साहित्य क्षेत्रातील आणि
मराठी भाषा विषयातील
प्रमुख विषयांना स्पर्श करणाऱ्या
विविध विषयांवरील
तज्ज्ञांचा सहभाग असलेले परिसंवाद

परिसंवाद : विज्ञानविषयक लेखन अधिकाधिक लोकाभिमुख कसे होईल?

मराठी साहित्यात विज्ञानविषयक साहित्य निर्माण होण्याचे प्रमाण कमी आहे. या साहित्यप्रकाराला वाचकांचा प्रतिसाद मिळत नाही का, असा प्रश्न उपस्थित होतो. साहजिकच हा महत्त्वाचा साहित्यप्रकार लोकाभिमुख होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, याची मांडणी केली आहे, प्रख्यात विज्ञानलेखक संजय सोनवणी, माधुरी शानभाग आणि सुबोध जावडेकर यांनी.



संजय सोनवणी
मो.: ७७२१८७०७६४

विज्ञान साहित्य लोकाभिमुख होण्यासाठी

मराठी वाचकांना विज्ञानाभिमुख साहित्याकडे वळवणे शक्य तेव्हाच होईल जेव्हा या विषयावर अनेक साहित्यिक विज्ञानाचा मूलगर्भ आणि भावी संभावना समजून घेऊ शकतील आणि रंजक कथेच्या माध्यमातून विपुल लेखन करत राहतील.

ज्या समाजात जीवनाकडे पाहण्याचा विज्ञानवादी दृष्टिकोन नसतो असा समाज कधीही ऐहिक आणि मानसिक प्रगती करू शकत नाही. मराठी विश्व हे विज्ञानच काय पण अन्य साहित्याकडे वा वैचारिक लेखनाकडे सहसा उपेक्षेनेच पाहत असल्याने मराठी समाजात वैचारिक वादळे झालीत, गहन चर्चा घडून आल्या आणि समाजाला नव्या दृष्टीने जगाकडे पाहता आले, असे क्वचितच घडले. त्यात मराठी समीक्षकांनी काही साहित्यप्रकारांना साहित्य मानायलाच नकार दिल्याने विज्ञान साहित्याला सामाजिक प्रतिष्ठा कधीच मिळू शकली नाही. अपवाद फक्त डॉ. जयंत नारळीकर यांच्या विज्ञानकथांचा; पण त्यांनाही प्रसिद्धी मिळाली ती स्वत: नारळीकर जागतिक कीर्तीचे संशोधक होते म्हणून. त्यांच्या विज्ञान-कथांमुळे अथवा त्यांनी मराठीत वैज्ञानिक माहिती पुरवणारे मूलगामी लेखन केले म्हणून नाही.

विज्ञानकथांचा इतिहास जुना

मराठीत विज्ञानकथा लिहिल्या जाण्याचा इतिहास फार जुना आहे. भा. रा. भागवत यांनी ज्युल्स व्हर्नच्या अनेक वैज्ञानिक काल्पनिका मराठीत आणून आता जमाना लोटला. या कादंबऱ्या खूप लोकप्रियही झाल्या होत्या. ज्युल्स व्हर्नची भविष्यवेधी आणि रंजनात्मक कथन शैली आणि त्याला साजेशी विलक्षण कथा याचा त्यात फार मोठा वाटा होता. पुढे स्वतंत्ररीत्या विज्ञानाधारित कथा, कादंबरी आणि लेखनाचे मार्ग खुले झाले; पण यातील बहुतेक साहित्य हे परकीय लेखनावर आधारित होते. डॉ. बाळ फोंडके, डॉ. संजय ढोले हे स्वत: विज्ञानाची पार्श्वभूमी असलेले लेखक; पण कादंबरी अथवा कथेत विज्ञान किती असावे आणि त्याला रंजक कथेची साथ किती असावी यात या मंडळीला फारसा मेळ घालता आल्याचे दिसून येत नाही. रंजकतेशिवाय वाचक अशा साहित्याकडे फिरकत

सातारा जिल्ह्यात रेल्वेचे जाळे विणताना वाठार स्टेशन महत्त्वाचे स्टेशन ठरले. महाबळेश्वरला जाणाऱ्या परदेशी आणि ब्रिटिश पर्यटकांच्या वाहतुकीची सोय करण्याचे काम वाठार स्टेशनने केले. वाठार स्टेशन स्थानकापासून सुमारे ४० मैल अंतरावर महाबळेश्वर आहे. येथे उच्च श्रेणीतील प्रतीक्षालय आणि शाकाहारी आणि मांसाहारी अल्पोपहार कक्ष अशा सुविधा तेव्हा उपलब्ध करून दिल्या होत्या.

नोंद

नाहीत हे साहित्यिक म्हणून मराठी लेखकांनी लक्षात घ्यायला हवे होते. त्यामुळे अच्युत गोडबोले यांच्यासारखे लेखक वैज्ञानिक माहिती कथात्मक स्वरूपात न आणता सोप्या भाषेत पुरवत वाचकांना अधिक विज्ञानाभिमुख

वाचण्यात रस उरलेला नाही कारण त्यांच्या भवतालाचे जग अफाट बदललेले आहे. विज्ञान युगाची फळे ते चाखत आहेत. एल विज्ञान समजून घेण्याची त्यांची जिज्ञासा आहे. हे कथांच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत



करण्यात यशस्वी झाले, असे म्हणावे लागते.

समीक्षकांचे दुर्लक्ष

'केलाटाची हाक' ही चंद्रकांत मराठे यांची महाकादंबरी मी माझ्या पुष्प प्रकाशनातर्फे प्रसिद्ध केली होती. ही एक आंतरग्रहीय विज्ञान कादंबरी होती. तिला मात्र चांगले यश मिळाले कारण मराठे यांनी एका परग्रहावरील समाजाचा अत्यंत रंजक वेध घेतला होता. अलीकडेच प्रगती पाटील या तरुण लेखिकेने 'त्रिकोणी साहस' ही अशीच एका दूरच्या ग्रहावर घडणारी महाकादंबरी लिहिली. ती वाचकांत लोकप्रियही आहे; पण दुर्दैवाने मराठी समीक्षकांनी त्यांच्याकडेही दुर्लक्ष केले. अशी उदासीनता असेल आणि अमुक म्हणजेच साहित्य असा दृष्टिकोन समीक्षक बाळगत राहतील, तर मराठी विज्ञान साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत कसे पोहोचेल, नव्या प्रतिभा असे साहित्य कशाला लिहितील? ही घोर उपेक्षा मराठी विज्ञान साहित्याच्या प्रसाराला बाधक आहे.

बालसाहित्य नाहीच

मुलांसाठी किती विज्ञानिका आहेत? आकडेवारी पाहिली तर निराशाच दाटून येईल. अजूनही बालसाहित्य म्हणजे जादू-पऱ्याच्या कथा, फुटकळ साहसकथा व बोधकथा असा घोर अपसमज आहे. मुलांना आता त्या

पोहोचवत त्यांच्या नुसत्या जिज्ञासेचेच शमन नव्हे, तर भविष्यकालीन संभावना त्यांच्यासमोर ठेवत त्यांच्या कल्पनाशक्तीला विज्ञानाधिष्ठित बळ पुरवणे आवश्यक आहे. यातून विज्ञानवादी पिढी तर घडू शकतेच; पण भविष्यातील स्वतंत्र संशोधन करणारे वैज्ञानिकसुद्धा घडू शकतात.

युरोप विज्ञानवादी व्हायला ज्युल्स व्हर्न. मेरी शेली, एच. जी. वेल्स यांच्यासारखे खंदे आणि कल्पक विज्ञानकथा लेखक होते. ज्युल्स व्हर्नने आपल्या काल्पनिकांत वर्णन केलेल्या पाणबुडीसारखीच पाणबुडी प्रत्यक्षात तयार करता येईल, असा विश्वास संशोधकांच्या मनात आला, आणि ते स्वप्न साकारही झाले. अशा अनेक कल्पना कल्पक लेखकांनी पुरवल्या आणि मग ते स्वप्न सत्यात आणले. मी १९९८ साली उडती आणि रस्त्यावरूनही चालू शकेल अशी हेलीकार बनवण्याचा संकल्प केला होता. तो प्रत्यक्षात यावा यासाठी प्रयत्नही केले होते. माझा प्रयत्न अपुरा राहिला असला तरी जगात आज अनेक संशोधक तशी कार बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. मी माझ्या विज्ञान कादंबऱ्यांत या कल्पनेचा चपखल उपयोगही केला; पण तो तेथेच संपला, कारण कोणा भारतीयाने हे संशोधन पुढे

नोंद

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील लोणंद हे गाव भारतातील महाराष्ट्र राज्यातील प्रमुख कांदा बाजारपेठ आहे. लोणंद शहरातील कांद्याची बाजारपेठ सर्वांत मोठी आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. येथील मार्केट यार्ड हे मोठे आहे, इथे कांद्याची खरेदी विक्री होते. तसेच धान्यांची खरेदी विक्री होते. त्याचप्रमाणे लोणंद शहरात अजून एक प्रसिद्ध मार्केट म्हणजे बांबूचे होय.

नेण्याचा प्रयत्न केला नाही.

भविष्यवेधी विज्ञानकथा

आहे त्या विज्ञानावर आधारित कथा महत्त्वाच्या आहेतच. त्यातून आहे त्या विज्ञानामागील अर्थ आणि उपयुक्तता समजून घेता येते; पण भविष्यवेधी विज्ञानकथा मात्र विज्ञानातील भावी प्रगतीच्या संभावना आणि दिशा सांगत असतात. त्या संशोधकांना उपयक्त ठरू शकतात. मराठीत पाहिले तर मात्र चित्र एवढे समाधानकारक नाही आणि म्हणूनच देशात मूलभूत संशोधकांचीही उणीव आहे. बालसाहित्यापासून ते प्रौढांच्या साहित्याचा आधार घेत (मग ते आजचे असो की भविष्यवेधी) विज्ञान रंजक कथा लिहिता येणे, म्हटले तर फार सोपे आहे. अट एकच की, स्वत: लेखकाचा विज्ञानाचा पाया भक्कम असला पाहिजे. त्याच्या अभावात चांगली विज्ञानकथा निर्माण करता येणे शक्य नाही. विज्ञानाच्या पायासोबतच लेखक हा उच्च दर्जाचा प्रतिभाशाली असला पाहिजे आणि त्याने रंजक खिळवून ठेवणारी कथानके बनवून विज्ञानाच्या हातात हात घालून आपली रचना उतरवली पाहिजे. दुर्दैवाने मराठीत असे लेखक किती आहेत याचा विचार केला, तर हाती निराशा आल्याखेरीज राहणार नाही.

विज्ञानाची क्षितिजे अमर्याद आहेत. आताचे संगणक जाऊन लवकरच क्वांटम संगणक येतील अशी चिन्हे आहेत, जे जगाचा चेहरामोहरा बदलून टाकतील. त्याच्या भल्या-बुऱ्या सामर्थ्याचे व्यापक चित्रण मी 'भविष्य नावाचा इतिहास' या कादंबरीत केले; पण आपले विज्ञान कथाक्षेत्र अद्याप तेथवरही पोहोचलेले नाही. नॅनो तंत्रज्ञान आता सर्व क्षेत्रे काबीज करू लागले आहे. यात मानवी जगाला सुख देणाऱ्या आणि भयभीत करणाऱ्या अनेक भावी संभावना आहेत. त्याबाबतही अत्यंत उत्कृष्ट कथा निर्माण होऊ शकतात. मी 'स्पेस ब्राव्हो' या कादंबरीत त्याचा भविष्यवेधी उपयोग केला आहे. भारतातील प्राचीन तंत्रज्ञान हाही आज फार चर्चेचा विषय आहे. पण त्या कल्पना आज सत्यात आणण्याचा प्रयत्न केला आणि त्या सत्यात आल्या, तर आजचे जग कसे असेल यावरही लेखन व्हायला हवे होते. ते झालेले नाही. मी शेवटी 'The Astronaut Who Crashed In From Space' या शीर्षकाखाली या विषयावर कादंबरी लिहिली; पण इंग्रजीत. मराठीत माझ्या अन्य विज्ञान कादंबऱ्यांनी जी उपेक्षा सहन केली, ती पुन्हा सहन करण्याची माझी इच्छा नव्हती एवढेच.

लेखक जाणकार हवा

मराठी वाचकांना विज्ञानाभिमुख साहित्याकडे वळवणे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा या विषयावर अनेक साहित्यिक विज्ञानाचा मूलगर्भ आणि भावी संभावना समजून घेऊ शकतील आणि रंजक कथेच्या माध्यमातून विपुल लेखन करत राहतील. वैज्ञानिक साहित्यच पुरेसे उपलब्ध नसेल तर लोक त्याकडे कसे वळणार आणि समीक्षकांनी ते साहित्य लोकांपर्यंत पोचवण्यासाठी आपली लेखणीच उचलली नाही तर काय होणार? साहित्य कोणतेही असो, त्याचा पहिला निकष म्हणजे ते रंजक व वाचनीय असले पाहिजे. अनेक लेखक विज्ञान कादंबरी अथवा कथा लिहिताना वैज्ञानिक माहितीचा किचकट भाषेत एवढा मारा करत जातात, की विज्ञानही हरवते आणि कथाही निरस बनते. असे टाळले गेले पाहिजे. विज्ञानकथा लेखक विज्ञानातील जाणकार तर असलाच पाहिजे; पण तो प्रतिभाशाली साहित्यिकही असला पाहिजे तरच विज्ञान-साहित्य लोकाभिमुख बनू शकते. शेवटी हा विषय लेखक-प्रकाशक आणि समीक्षकांचा आहे. विज्ञान साहित्यच निरस आहे, छद्म-विज्ञानाचे दर्शन घडवत आहे किंवा कोणाचीतरी नक्कल आहे असे काही झाले, तर ते समाजाला आपले वाटणार नाही. ते लोकाभिमुख होण्याची तीळमात्र शक्यता नाही हे लक्षात घ्यावे लागेल. शेवटी लेखकांनाच आपली कंबर कसावी लागेल. वाचकांना दोष देऊन फारसा उपयोग नाही कारण वाचक शेवटी जे उपयुक्त आहे किंवा रंजक आहे तेच वाचणार, हे लक्षात घ्यावे लागेल.

(लेखक ज्येष्ठ विज्ञानलेखक आणि प्रकाशक आहेत.)

लाखो भक्तांचे श्रद्धास्थान म्हणजे चाफळचे राम मंदिर आहे. तसेच चाफळ गावचे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे बडोद्याचे राजकवी य. दि. पेंढारकर यांचे चाफळ हे जन्म ठिकाण आहे. चाफळ हे गाव सातारा जिल्ह्यात मांड नदीच्या काठी वसलेले आहे. उंब्रजपासून अवघ्या ११ कि. मी. वर हे ठिकाण आहे. सह्याद्री पर्वतरांगेने वेढलेले हे गाव समर्थ रामदास स्वामी स्थापित चाफळचे राम मंदिर म्हणून आणि समर्थ रामदास स्वामींचे जीवन चरित्र यामुळे महत्त्वाचे ठिकाण आहे.



प्रा. माधुरी शानभाग
बेळगाव
मो.: ८९७११९१४२६

शुद्ध वैज्ञानिक ज्ञान देणारे साहित्य असावे

मराठी साहित्यात विज्ञानविषयक साहित्य निर्माण होण्याचे प्रमाण कमी आहे. साहजिकच हा महत्त्वाचा साहित्यप्रकार लोकाभिमुख होण्यासाठी शुद्ध वैज्ञानिक ज्ञान देणारे साहित्य जास्त प्रमाणात निर्माण व्हायला हवे. याबाबत ऊहापोह करणारा लेख.



आजचे युग हे नि:संशय विज्ञानाचे युग आहे. त्यामुळे अधिकाधिक समाज विज्ञान-साक्षर होणे, समाजमनाला वैज्ञानिक दृष्टिकोन असणे ही काळाची गरज आहे. जे विज्ञान विषय शिकतात, त्याच्याशी संबंधित क्षेत्रात काम करतात त्यांना अनुभवातून थोडीतरी समज असते; पण बहुसंख्य अशिक्षित अन् विज्ञानाचा अभ्यास न केलेल्या समाजाला त्याची ओळख अन् महत्त्व पटवून द्यायला हवे याबद्दल दुमत नाही. साहित्यातून समाजाचे प्रबोधन करता येते याचे अनेक पुरावे अन् उदाहरणे आपल्याला इतिहासात सापडतात. तेव्हा विज्ञान साहित्य अधिकाधिक लोकाभिमुख करून या समस्येच्या सोडवणुकीला खात्रीने हातभार लावता येईल, असे मला वाटते.

वैज्ञानिक माहिती देणारे लेखन

विज्ञानविषयक साहित्याचे साधारण तीन प्रकार पडतात. पहिला प्रकार शुद्ध वैज्ञानिक माहिती देणारे लेखन, ज्यामधे संशोधकांनी अथवा प्राध्यापकांनी लिहिलेली विज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांविषयाची माहिती देणारी पुस्तके.

नोंद

सातारा जिल्ह्यातील दुर्गम वासोट्याचे नाव छत्रपती शिवाजी महाराजांनी 'व्याघ्रगड' असे ठेवले. याच्या दुर्गमतेबद्दल पेशवाईतसुद्धा नोंद आहे. शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याचा वापर तुरुंग म्हणून केला जात असे. पुढच्या काळात १७०६ मध्ये ताई तेलिणीने हा किल्ला आपल्या हातात घेतला. पुढील वर्षी पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांनी ताई तेलिणीबरोबर लढाई केली. आठदहा महिन्यांच्या प्रखर झुंजीनंतर ताई तेलिणीचा पराजय झाला आणि १७३० मध्ये वासोटा किल्ला बापू गोखल्यांच्या हाती पडला.

आपल्याकडे अगदी प्राचीन कालापासून अशा पद्धतीचे लेखन होत आलेले आहे. अगदी संस्कृतमधे लिहिलेल्या आयुर्वेदातील ऋचांपासून गेल्या शतकात लिहिलेल्या होमियोपॅथीची, वनस्पतींची, प्राणिजगताची माहिती देणारी पुस्तके असोत, असे साहित्य आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेले आहे. आर्यभट्ट, भास्कराचार्य ते वात्स्यायन यांपर्यंत अनेक ज्ञानवंत ऋषी अन् बुद्धिवंत संशोधकांनी विविध वैज्ञानिक शाखांमधे माहितीपर लेखन केले अन् ते बहुतेक भारतीय भाषांमधे पुढे सुलभ रूपाने आले. त्याचा वाचकवर्ग त्या त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत सीमित राहिला. पुढे संदर्भासाठी वापरत राहिल्याने अशी पोथ्यापुस्तके काही ठरावीक लोकांपाशी उपलब्ध होत राहिली. सर्वसामान्यांना त्यामधे रसही नव्हता अन् त्यांना त्यातील माहिती समजणेही अवघड होते. ज्यांनी त्याचा अभ्यास केला ते विज्ञान साक्षर झाले.

आजही इंग्रजी भाषेतून अनुवाद होऊन अथवा आपल्या इथले अनेक अभ्यासक आपापल्या विषयातील अत्याधुनिक माहिती पुस्तके लिहून सतत वाचकांपर्यंत शुद्ध विज्ञान, सुलभ, सोप्या भाषेत लिहून पोहोचवत होते आणि अजून मोठ्या प्रमाणावर असे लेखन केले जाते.

लेखाच्या स्वरूपात विज्ञान

दुसरा प्रकार हा विज्ञानविषयक माहिती सोप्या अन् उत्कंठावर्धक भाषेत ललित लेखाच्या स्वरूपात लिहून वाचकांना कुतूहल वाटेल अशा पद्धतीने पोहोचवणे. हा तुलनेने अलीकडील प्रकार आहे; पण मराठी भाषेत आज या लेखनाला बरीच मागणी आहे. खास करून मुलांना विज्ञान सोप्या भाषेत समजावे, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून अनेक लेखकांनी पुस्तके लिहिलेली आहेत. नारळीकरांचे 'आकाशाशी जडले नाते' पासून अच्युत गोडबोले यांची अनेक पुस्तके या पद्धतीने लिहिलेली आहेत. वर्तमानपत्राच्या रविवार पुरवणीतून अथवा मासिकांच्या सदर लेखनातूनही अशा प्रकारचे साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचवायचे काम विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन-तीन दशकांत अगदी जोमदारपणे झाले अन् आजही या प्रकारची पुस्तके येत असतात, त्यांना चांगला वाचकवर्ग आहे. विज्ञान अन् साहित्य या दोहोंची आवड असलेल्या लोकांनी थोडे कष्ट घेतले, तर अशा प्रकारचे लेखन करणे त्यांना शक्य आहे. हे एक मोठे समाजकार्य आहे असे समजून याकडे बघायची गरज आहे.

कुतूहल शमवणारे लेखन

विज्ञान कथा-कादंबऱ्या लिहिणारे बहुतांश लेखक सदर रूपामधे, वैज्ञानिक माहिती रोचक, उत्कंठा वाटेल अशा पद्धतीने हलक्या फुलक्या भाषेत लिहितात अन् नंतर त्यांचे ललित लेखसंग्रह बनून त्याची पुस्तके प्रकाशित होतात. अनेक सर्वसामान्य वाचक, ज्यांचा फक्त विज्ञानावर आधारित उपकरणे वापरणे इतकाच विज्ञानाशी संबंध आहे, ते अशा लेखनाकडे ओढले जातात. आपण वापरत असलेला लॅपटॉप, मोबाइल, घरगुती उपकरणे आदी वस्तूंमागचे विज्ञान काय आहे हे समजून घ्यायचे कुतूहल त्यांना अशा पुस्तकांकडे आकर्षित करते आणि या प्रकारचे लेखन करणारे अनेक मान्यवर लेखक मराठीत आहेत. सर्वश्री बाळ फोंडके, सुबोध जावडेकर, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, जयंत नारळीकर, अच्युत गोडबोले यांनी सुरू केलेले हे ललित लेखन, त्याहून जोमाने पुढे न्यायला हवे. विज्ञान शिकलेले अनेक तरुण लेखक सर्वसामान्य वाचकांना विज्ञानाची माहिती देत असतात. त्यांच्या संख्येमधे अधिक वाढ व्हायला हवी. आजकाल मासिके, रविवार पुरवण्या आणि दिवाळी अंकही अशा लेखनाला आवर्जून जागा देतात. आपण शिकलो त्या विज्ञानाच्या शाखेत नवे काय येते आहे हे अशा लेखाद्वारे वाचकाला कळू शकते. तसेच एका विज्ञान शाखेत कार्यरत असलेली माणसे दुसऱ्या शाखेत काय नवे येते आहे याबद्दल कुतूहल शमवण्यासाठी अशा ललितलेखांचे आवर्जून वाचन करतात. आजकाल कानावर पडणारे नवे शब्द, उदा. चॅट जीपीटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आदी नेमके काय बद्दल घडवतील याबद्दलचे कुतूहल शमवण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ आज पुढे होऊन लेखनासाठी लेखणी सरसावताना किंबहुना आपापले लॅपटॉप उघडताना दिसत आहेत. महाजालावरील अनेक संकेतस्थळांवर अशा प्रकारचे लेखन केले जाते आहे अन् त्याचा वाचकवर्ग वाढतो आहे. आपल्या देशात २७ फेब्रुवारी हा 'विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी अनेक लेख, कविता, चारोळ्या, छोट्या कथा मोठ्यांसाठी अन् मुलांसाठी लिहिल्या जातात, त्यामधे भरीव वाढ व्हायला हवी. त्याची जाहिरात व्हायला हवी

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात 'किन्हई' गावाच्या पूर्वेकडे असलेल्या साखरगड डोंगरावरील अंबाबाई देवीचे मंदिर प्रसिद्ध आहे. या मंदिराची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली असून २०१४ मध्ये 'युनेस्को'कडून या मंदिराचा 'युनेस्को एशिया पॅसिफिक अॅवॉर्ड ऑफ मेरीट' हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला होता. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिराला महाराष्ट्र सरकारनेही तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा दिला आहे.

आणि हे उपक्रम खास दिवस निवडून, उदा. महिला दिन, ज्येष्ठ नागरिक आठवडा असे अनेक दिवस किंबहुना वर्षभर साजरे व्हायला हवेत. विशेषत: स्त्रियांपर्यंत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजला, तर तो साऱ्या कुटुंबापर्यंत पोहोचवला जातो आणि बहुतांश वेळा स्त्रियाच अंधश्रद्धेला बळी पडतात म्हणून त्यांच्या अन् मुलांच्या संदर्भात असे काम व्हायची गरज आहे.

कथा आणि कादंबऱ्या

तिसऱ्या प्रकारचे लेखन म्हणजे साहित्याकडे पूर्णपणे झुकलेले कथा आणि कादंबऱ्यांतून वाचकांपुढे येणारे ललित विज्ञान. यामधे एखादी वैज्ञानिक संकल्पना मध्यवर्ती धरून भविष्यात अथवा वर्तमानात ती मानवी जीवनावर सकारात्मक वा नकारात्मक काय परिणाम करू शकेल याची कल्पना करून लिहिलेली पूर्णतया काल्पनिक कथा अथवा कादंबरी असते. हे आज सर्वसामान्यपणे विज्ञान साहित्य म्हणून गणले जाते. आज हा साहित्याचा एक महत्त्वाचा प्रवाह बनलेला आहे आणि त्यामुळे मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात त्यांना समाविष्ट केलेले आहे. या प्रकारच्या लेखनाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे आणि अधिकाधिक तरुण या प्रकारच्या लेखनाकडे वळत आहेत. या साहित्याने नवे तंत्रज्ञान सहज आपलेसे केलेले आहे आणि महाजालावर ब्लॉग किंवा ई-नियतकालिकांमधे ते प्रकाशित होते आहे. या प्रकारचे लेखन करणाऱ्यांचा एक मस्त 'सायफाय कट्टा' नावाचा गट आहे अन् ते सतत चर्चा, एखादा विषय घेऊन त्यावर कथा, लेख लिहिणे, असे अनेक उपक्रम करून सतत संपर्कात असतात. त्यात महाराष्ट्रच नव्हे तर देशातील, अन्य काही परदेशांतीलही कट्टेकरी आहेत अन् ते उत्साहाने अनेक उपक्रम राबवत असतात. याचा परीघ त्यांनी वाढवायला हवा, अधिकाधिक गटांना त्यात वाचक म्हणून सहभागी करून घ्यायला हवे. वर दिलेल्या विज्ञान साहित्याचा पहिला प्रकार सोडला, तर उरलेले दोन्ही म्हणजे ललितलेख अन् कथा-कादंबऱ्या हा आपल्याकडे म्हणजे सर्व भारतीय भाषांत आणि मराठीतही पूर्णतया परदेशातून आलेला साहित्यप्रकार आहे. खास करून ललित विज्ञान.

साधारण विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मराठी भाषेमधे अनुवाद अथवा रूपांतर करून आज ललित विज्ञान म्हटले जाणारे साहित्य मराठीत येऊ लागले अन् हळूहळू ते वाचकांमधे त्यातील अद्भुतता, नव्या साहसी कल्पना, रोमांचक वर्णने आदी अनेक कारणांमुळे लोकप्रिय होत गेले. काही लेखकांनी त्याला गूढत्वाचे आवरण चढवले अन् त्यामुळे रहस्यकथा अन् सामाजिक विषयावर आधारित गूढकथा असा काहीसा प्रकार जन्माला आला, वाचकप्रिय झाला. मूळ साहित्यिक प्रवाह अशा प्रकारच्या साहित्याला सतत दुय्यम लेखत आला, हेही एक सत्य आहे.

साधारण सत्तरच्या दशकात हे चित्र हळूहळू पालटत गेले. डॉ. जयंत नारळीकर यांनी या साहित्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याचे कारण त्यांनी कथा, कादंबऱ्यांसाठी वापरलेली पार्श्वभूमी अस्सल भारतीय होती आणि अनेक प्रसिद्ध पुराणकथांतील संदर्भ त्यांच्या साहित्यात येताना आपल्याला दिसतात. मग अनेकांनी त्यांच्या पठडीतील पण इथल्या समाजातील घटनांना मध्यवर्ती ठेवत अस्सल इथल्या मातीत घडू शकतील अशा कथा लिहिल्या. आजमितीला हा काहीसा दुर्लक्षित असलेला साहित्य प्रवाह मुख्य साहित्यधारेत आला आणि आजघडीला शालेय अभ्यासक्रमात मराठी विषयाचा एक भाग म्हणून शिकवला जाऊ लागला.

विज्ञान साहित्य दूरच

'मानवाचे आणि त्यामुळे समाजाचे हित साधणारे ते साहित्य' अशी एक साहित्याची व्याख्या आहे. आज चारी बाजूंनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विज्ञानाने नुसता शिरकाव केला नाही तर अनेक तऱ्हेने आपले जीवन व्यापले आहे. आज आपण विज्ञानाने निर्माण केलेल्या सुखसुविधांशिवाय जगण्याची कल्पनाही करू शकत नाही. तरीही विज्ञान साहित्य हे सर्वसामान्य वाचकांपासून काहीसे दूर राहिलेले आहे. ते अधिकाधिक लोकाभिमुख करणे खरेच एक गरज बनलेली आहे.

वर उल्लेख केलेला सायफाय कट्टा हा एक चांगला गट आहे. त्यातील सदस्य ललित विज्ञान साहित्याचा प्रसार करण्यासाठी अनेक उपक्रम राबवत असतात. एकूणच खालावत चाललेल्या वाचन चळवळीच्या तुलनेत त्यांची धडपड खरंच कौतुकास्पद आहे. शाळा कॉलेजांतून या कट्ट्याचे उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले, तर महाजालावरील वाचन करणारी युवा पिढी ललित विज्ञानाकडे वळायला खात्रीने मदत होईल. गेल्या दहाबारा वर्षांत दिवाळी अंकांतील विज्ञानकथांचा परामर्श

नोंद

वाई शहरातील कृष्णा नदीवरील गणपती घाटावर असलेले महागणपती म्हणजेच ढोल्या गणपतीचे मंदिर पेशव्यांचे सरदार गणपतराव भिकाजी रास्ते यांनी १७६२ मध्ये बांधले. या मंदिराची एक वैशिष्ट्यपूर्ण रचना अशी, की या मंदिराची मागील बाजू ही त्रिकोणी म्हणजेच बोटीच्या आकाराची आहे. यामागचे कारण असे सांगितले जाते, की अशा आकारामुळे कृष्णा नदीला पूर आल्यानंतर नदीचे पाणी विभागले जाईल व पाण्याचा दाब कमी होऊन मंदिराचे संरक्षण होईल.

या कट्ट्यावरील मेघश्री दळवी, स्मिता पोतनिस आणि इतर एका लेखाद्वारे घेत असतात. त्यावरून विज्ञान साहित्यातील नवेनवे प्रयोग वाचकांपर्यंत पोहोचवले जातात. दरवर्षीच्या दिवाळी अंकांतील वाढती विज्ञानकथांची संख्या हा एक चांगला परिणाम आहे, असे मला वाटते. मुलांसाठी हा कट्टा बरेच काही करू शकेल अशी आजमितीला आशा बाळगायला हरकत नाही.

आज एकूणच तरुणाई अनेक कारणांसाठी, खास करून पोटापाण्याच्या व्यवसायासाठी बारावीनंतर विज्ञानशाखा अभ्यासक्रम निवडते. तुलनेने त्यात आर्थिक लाभ अधिक असतात. हे तरुण स्थिरावतात अन् वाचक होतात, त्यांना ललित विज्ञान आकर्षक वाटते कारण त्यामधे भविष्यातील मानवी समस्या चितारलेल्या असतात. जरी लेखकाची कल्पनाशक्ती ताणून एखादी विज्ञानाची संकल्पना कोणती दिशा घेऊ शकते, असा एखादा 'स्पेक्युलेटिव्ह' विचार मध्यवर्ती ठेवून त्यावर आधारित बहुतांश विज्ञान कथा वा कादंबऱ्या लिहिल्या जातात, तरी त्याच्या केंद्रस्थानी मानव आणि त्याच्या भावभावना, नातेसंबंध हेच असते.

आज आपण आजूबाजूला पाहिले, तर विज्ञानामुळे, आणि त्यावर आधारित तंत्रज्ञानाने जी झेप घेतलेली आहे ती अभूतपूर्व अशी आहे. विज्ञान हे जरी शक्तिशाली आयुध असले तरी ते वापरणारा माणूस सर्व गुणावगुणाने युक्त असाच असतो. त्याच्या आशा, भीती या वेगवेगळे रूप घेऊन त्याला भेडसावत असतात. एकूणच समाजात विज्ञाननिष्ठता, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजला, फळला तर अंधश्रद्धा, कर्मकांडे आदी अशिक्षित समाजाला आणखी मागे लोटणाऱ्या बाबी कमी होत जातील.

उपक्रमांना वेग हवा

मराठी विज्ञान परिषद या बाबतीत पुढाकार घेऊन जे उपक्रम राबवते त्याला अधिक वेग द्यायची गरज आहे. अगदी शालेय स्तरापासून हे उपक्रम सर्वत्र जोमाने राबवायची गरज आहे. शालेय वयात मुलांना प्रयत्नपूर्वक विज्ञानाची गोडी निर्माण व्हायला हवी. वैज्ञानिकांची चरित्रे, त्यांनी लावलेले शोध, त्यावर आधारित तंत्रज्ञान अन् त्याने अधिकाधिक सुलभ झालेले आपले रोजचे जीवन, त्या प्रगतीने उभी केलेली आव्हाने, हे सारे अगदी किशोर वयापासून मुलांपर्यंत पोहोचायला हवे. ललित विज्ञान साहित्याद्वारे समाजात हे रूजवता येईल कारण हे साहित्य मनोरंजनासोबत प्रबोधनही करत असते. आजघडीला जे जे विज्ञानावर आधारित व्यवसायात काम करतात, त्यांनी आपापल्या क्षेत्रातील अनुभव, त्यावर आधारित कथा, लेख वगैरे लिहून वाचकांना आकर्षित करायला हवे. तरुण असताना रोजची डायरी लिहीत राहिले, तर पुढे त्या नोंदींवरून आपल्या विज्ञानाशी संबंधित क्षेत्रातील माहितीपर अथवा ललित लेखन करणे तुलनेने सोपे जाईल, असे मला वाटते. एखाद्या क्षेत्रात तीस-पस्तीस वर्षे काम केल्यावर त्यात काय अन् कसे बदल झाले, संभाव्य बदल काय असतील, ते समाजावर कोणता परिणाम करतील याबाबत लेखन करायला हवे. अधिकाधिक लोकांना यासाठी प्रवृत्त करायला हवे. प्रसंगी लेखनिकाची मदत घेऊन का होईना आपापल्या कार्यक्षेत्रात मिळवलेल्या अनुभवांवर आधारित लेखन, त्या क्षेत्रात नव्याने येणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल अन् पुढे त्यांनाही अशा लेखनासाठी उद्युक्त करेल, असा मला विश्वास वाटतो.

रेने मारिया रिल्के यांनी 'लेटर्स टु अ यंग पोएट' या छोटेखानी पुस्तकात (हे पुस्तक महाजालावर मोफत डाऊनलोड करून वाचता येते) लेखनाच्या संदर्भात जे विचार व्यक्त केले आहेत ते कालातीत आहेत. त्यानंतर अनेकांनी याच आकृतिबंधाचा वापर करत पुस्तके लिहिली. लेटर्स टु अ यंग इंजिनियर, लेटर्स टु अ यंग सायंटिस्ट अशी आपापल्या वैज्ञानिक क्षेत्राशी संबंधित पुस्तके आली. तशा पद्धतीची पुस्तके सर्व भाषांत लिहिली जायला हवीत. नाहीतरी वयाच्या एका टप्प्यावर प्रत्येकाला आपण जन्मभर काम करून मिळवलेले ज्ञान पुढच्या पिढ्यांना द्यावे, अशी इच्छा होत असते. प्रसंगी लेखनिकाची मदत घेऊन का होईना ज्ञानमार्गाने उच्च स्थानी पोहोचलेल्या प्रत्येकाने आपले संचित पुढच्या पिढ्यांसाठी लेखनरूपाने ठेवायला हवे. 'एक दिवस घेणाऱ्याने, देणाऱ्याचे हात घ्यावे', हे ललित विज्ञान लेखनाच्या स्वरूपात आले, तर समाजाला विज्ञाननिष्ठ होण्यासाठी त्याचा खचित उपयोग होईल.

शुद्ध विज्ञानाची पीछेहाट

कथा-कादंबऱ्या समाजमनावर खोलवर परिणाम करत असतात. त्यातून अभ्यासक्रमात विज्ञान न शिकलेल्या मोठ्या समूहाला विज्ञानाकडे आकर्षित करता येईल. त्यातूनच विज्ञानाची गोडी वाढेल. आज सर्व

जावळी तालुक्यात डोंगरमाथ्यावर वसलेल्या मेरुलिंग येथील महादेवाचे मंदिर प्रसिद्ध आहे. असे सांगितले जाते, की हे मंदिर पांडवकालीन असून पांडवांनी स्वतः मोठ्या शिळा आणून या मंदिराची उभारणी केली होती. या मंदिराचे वैशिष्ट्य असे, की येथील शिवलिंगातून झिरपणाऱ्या धारांमुळे येथील शाळुंका नेहमी पाण्याने भरलेली असते. याशिवाय येथील गर्भगृहात काही बोललो की त्याचा प्रतिध्वनी चार ते पाच वेळा पुन्हा ऐकू येतो.



स्तरांवर असे प्रयत्न मोठ्या प्रमाणात लहानमोठे गट करत आहेत, ते अधिक प्रमाणात अन् सर्वत्र वेगाने व्हायला हवेत. सरकारी यंत्रणा ज्याप्रमाणे वैद्यकीय बाबतीत अगदी ग्रामीण भागातसुद्धा उपक्रम राबवत असते, तसे इतर सर्व विज्ञानशाखांमधेही व्हायला हवे. आज शुद्ध विज्ञानाची पीछेहाट होऊन तंत्रज्ञान, स्मार्ट संशोधन, गरज आधी निश्चित करून मग संशोधन असा पूर्णपणे व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून जगभरातच संशोधन होत असते. तेही मानवी भविष्याच्या दृष्टीने फारसे हितावह नाही. बारावीनंतर शुद्ध विज्ञानाकडे तरुणाई वळत नाही. त्यांना तंत्रज्ञान झटपट अन् अधिक पैसा मिळवून देते. विज्ञान साहित्य त्यांना शुद्ध विज्ञानातील आकर्षक बाबींकडे वळवू शकते. आज तर शुद्ध विज्ञानाच्या संशोधन क्षेत्रातही चांगला पैसा मिळू शकतो. पेटंट कायदा आणि त्याच्यासंबधी माहिती सर्वांना सहजतेने उपलब्ध आहे.

अशा तऱ्हेने ललित विज्ञानावर आधारित कथा-कादंबऱ्यांकडून वाचकवर्ग ललित विज्ञान लेखांकडे वळेल आणि त्यानंतर शुद्ध वैज्ञानिक ज्ञान देणारी पुस्तकेही त्यांना आकर्षित करतील. विज्ञान साहित्य हे मनोरंजन तर करतेच; पण ते तुम्हाला वैचारिक दृष्ट्याही अधिक समृद्ध करते. त्यात सतत बदल होणे हा विज्ञानाचा स्थायिभाव आहे. माणसाला केंद्रित ठेवून केलेल्या अशा पद्धतीच्या मनोरंजक विज्ञान साहित्याच्या वाचनानेही समाजाला विज्ञानदृष्टी मिळेल. समाजाचा एकूण स्तर उंचावण्यासाठी विज्ञान साहित्याचे लेखन आणि वाचन खचित हातभार लावेल, असा मला विश्वास वाटतो.

(लेखिका विज्ञानविषयक लेखन करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक आहेत.)





सुबोध जावडेकर
मो.: ९८७०३६९३७२

कृत्रिम बुद्धिमत्तेला कामाला लावा

खरं तर विज्ञान हा आपल्या रोजच्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. मग बहुसंख्य लोक विज्ञानविषयक लेखन वाचायचं टाळतात. असं का? याचं कारण बहुतेकवेळा ते क्लिष्ट भाषेत लिहिलेलं असतं. त्यात तांत्रिक शब्दांचा भडीमार असतो. सर्वसामान्य माणसासाठी ते वाचणं हे फार कंटाळवाणं असतं.

'विज्ञान? मला त्यातलं अजिबात काही कळत नाही. ते सगळं माझ्या डोक्यावरून जातं!' असं म्हणणारे कितीजण असतील, शंभरात नव्वद, की जास्त? युनेस्कोच्या अहवालानुसार, जगभरात ७०% लोकांना वैज्ञानिक संकल्पना समजण्यात अडचणी येतात. दुसऱ्या एका अभ्यासात भारतात विज्ञानविषयक पुस्तकांचे वाचन केवळ २.५% लोक करतात, असं आढळून आलं आहे. विकसित देशांत हे प्रमाण थोडं जास्त म्हणजे १० ते १४% आहे

साध्या-सोप्या भाषेत हवे

विज्ञानलेखन जर साध्या-सोप्या भाषेत केलं, जड जड शब्द टाळून त्यांच्या जागी सोपी उदाहरणं वापरली, भरपूर चित्रं-आकृत्या वापरल्या, तर वाचक त्यापासून फटकून राहणार नाहीत. त्यात जर आजच्या काळातले सामाजिक आणि स्थानिक संदर्भ असले, तर वाचकांना ते आपलं वाटेल. वाचक ते आवडीनं वाचतील; पण होतं असं की, बहुतेक विज्ञानलेखकांना सोप्या भाषेत लिहायची सवय नसते किंवा तशी गरज वाटत नाही, त्यामुळे विज्ञानलेखक आणि सामान्य वाचक यांच्यात सतत एक दरी राहते. ती कशी कमी करता येईल?

कृत्रिम बुद्धिमत्ता

अशा वेळी कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या मदतीला येऊ शकते. सुदैवानं गेल्या वर्षभरात कृत्रिम बुद्धिमत्तेनं अफाट झेप घेतली आहे. काही वर्षांपूर्वी आपण ज्याची कल्पनाही करू शकलो नसतो ते आज प्रत्यक्षात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारलेले कित्येक प्रोग्रॅम्स आज इंटरनेटवर मोफत उपलब्ध आहेत. आणि ते वापरण्यासाठी कुठल्याही खास भाषेची किंवा अभ्यासाची आवश्यकता नाही. ते तुमची भाषा समजून घेऊ शकतात. अगदी मराठीत दिलेल्या आज्ञाही त्यांना समजतात आणि तुम्ही मराठीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं ते मराठीत देतात.

सातारा जिल्ह्यात कराडजवळ आगाशिव लेणी किंवा जखीणवाडी लेणी आहेत. डोंगरात ही ६४ बौद्ध लेणी आहेत. कराडपासून २ किमी अंतरावर जखीणवाडी गाव आहे. ही लेणी आगाशिवजवळच्या डोंगरात असल्यामुळे या लेण्यांस 'आगाशिवची लेणी' असेही म्हणतात. कराडच्या नैर्ऋत्येला असलेल्या आगाशिव डोंगराच्या परिसरातील डोंगरात एकूण १०१ लेणी कोरलेली आहेत, त्यांपैकी ६४ सुस्थितीत आहेत. या लेण्यांत सहा चैत्यगृहे व इतर विहार आहेत.

नोंद



आज नेटवर वेगवेगळ्या विषयांवर मनोरंजक शैलीत आणि सोप्या भाषेत लिहिलेलं भरपूर विज्ञानविषयक लेखन सहजी उपलब्ध आहे. त्याचा मराठीत अनुवाद करण्यासाठी गुगल आणि मायक्रोसोफ्ट यांचे प्रोग्रॅम्स तर आहेतच; पण शैलीदार मराठीत भाषांतर करणारे Wordvice AI Translator, Lingvanex, Quillbot यांसारखे प्रोग्रॅम्ससुद्धा उपलब्ध आहेत, ते वापरून इंग्रजीतलं विज्ञानविषयक लेखन सुबोध आणि लालित्यपूर्ण मराठीत आणणं सहज शक्य आहे.

वैज्ञानिक कल्पना

चौकटीत दिलेले प्रोग्रॅम्स एखादी वैज्ञानिक कल्पना किती उत्तम प्रकारे समजावून सांगतात ते बघण्यासारखं आहे. उदाहरणार्थ, समजा तुम्हाला आईन्स्टाईनचा सिद्धान्त सोप्या शब्दांत समजावून घ्यायचा आहे, तर तुम्ही त्या प्रोग्रमला सांगायचं की, 'आईन्स्टाईनचा सिद्धान्त सोप्या भाषेत समजावून दे' मग तो तुम्हाला विचारतो, आईन्स्टाईनच्या सिद्धान्ताचे दोन भाग आहेत. एक विशेष सापेक्षता सिद्धान्त म्हणजे 'स्पेशल थियरी ऑफ रिलेटिव्हिटी' आणि दुसरा सामान्य सापेक्षता सिद्धान्त म्हणजे 'जनरल थिअरी ऑफ रिलेटिविटी' तुम्हाला कोणता भाग जाणून घ्यायचा आहे? आणि सापेक्षता म्हणजे काय यावरून सुरुवात करू, की $E = mc^2$ या सूत्राचा अर्थ अधिक खोलात जाऊन सांगू? या त्याच्या प्रश्नाचं उत्तर तुम्ही दिलं, की मग तो विचारतो की, तुम्ही आईन्स्टाईनच्या सापेक्षता सिद्धान्ताच्या कुठल्या टप्प्यावर आहात. ते जाणून घेण्याकरता तुम्हाला तो चार ऑप्शन्स देतो.

१. फक्त नाव ऐकलं आहे.
२. थोडंफार वाचलं आहे.
३. थोडं माहीत आहे; पण अजून गोंधळ आहे.
४. बऱ्यापैकी स्पष्टता आहे; पण आणखी जाणून घ्यायचंय.

मग तुम्ही ज्या टप्प्यावर आहात त्या पातळीला जाऊन, उदाहरणं सांगून आणि चित्रं दाखवून तो सापेक्षता सिद्धान्त तुम्हाला समजावून सांगतो. नंतर कोणता भाग अधिक अजून स्पष्ट करून घ्यायचा आहे, असं विचारून ते अधिक सोप्या शब्दांत सांगतो. थोडक्यात, एखादा उत्तम शिक्षक समजावून सांगणार नाही इतकं छान तो तुम्हाला सापेक्षता शिकवतो.

आकर्षक स्वरूपात मांडणी

वैज्ञानिक मजकुराच्या सोबत चित्रे, आकृत्या, चित्रफिती, व्यंगचित्रं दिल्यास मजकूर अधिक आकर्षक स्वरूपात मांडता येतो. एक चित्र हजार शब्दांचं काम करतं, असं म्हणतात ते उगीच नाही; पण अशी चित्रं आणायची कोठून? इथंही कृत्रिम बुद्धिमत्ता तुम्हाला मदत करते. काही छान साईट्स सुचवते. CartoonStock, Dreemstime, Shutterstock यासारख्या साईट्सवर चित्रं आणि व्यंगचित्रं यांचा मोठा खजिनाच आहे. तुम्हाला कुठल्या प्रकारचं चित्र हवं आहे ते सांगितल्यावर तुमच्या पुढं वीस-पंचवीस चित्रं येतात. त्यातून तुम्ही निवड करू शकता. Midjourney किंवा DALL-E सारखी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साधनं मजकुरावरून थेट प्रतिमा आणि नकाशे तयार करून देऊ शकतात.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारलेले हे प्रोग्रॅम्स केवळ वैज्ञानिक संकल्पना सुलभतेनं समजावून सांगतात असं नाही, तर ते वैज्ञानिक लेखही लिहून देऊ शकतात. समजा तुम्हाला एखाद्या विषयावर निबंध लिहून हवा आहे, तर तुम्ही या प्रोग्रॅम्सना नुसतं सांगायचं,



सातारा शहर अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी वसले आहे. सातारा शहराला दक्षिणेकडे अजिंक्यतारा, उत्तरेकडे पेढ्याच्या भैरोबाची टेकडी, पश्चिमेकडे यवतेश्वराचा डोंगर व पूर्वेकडे जरंडेश्वराचा डोंगर यांनी वेढले आहे. शहराजवळून कृष्णा व वेण्णा या नद्या वाहतात. माहुली इथे या दोन्ही नद्यांचा संगम होतो. सातारा शहराच्या पश्चिमेकडील कासचे पठार वनौषधींसाठी आणि रानफुलांसाठी प्रसिद्ध आहे.

की 'मला अमुक विषयावर तमुक शब्दांचा निबंध मराठीत लिहून दे.' की लगेच तुमच्यासमोर तो निबंध हजर. तुम्ही त्यात सुधारणा सुचवू शकता. 'हा जरा क्लिष्ट झालाय, थोडा सोपा करून दे' असं सांगितलं, तर तो तसा बदल करून देऊ शकतो. इतकंच काय पण तुम्हाला त्याच्या सुरुवातीचा परिच्छेद कुठल्या शैलीत हवा आहे, प्रश्नात्मक शैलीत, कथनात्मक शैलीत, तथ्यात्मक शैलीत, भावनिक शैलीत, विश्लेषणात्मक शैलीत, साहित्यिक शैलीत की संशोधनपर शैलीत, असं विचारून तो निबंधाची तशी सुरुवात करतो.

वैज्ञानिक कल्पना गोष्टीरूपानं किंवा संवादाच्या स्वरूपात सांगितल्या तर त्या जास्त सुलभतेनं पोहोचतात. हे प्रोग्रॅम्स तुम्हाला तशा गोष्टी, नाट्यकली किंवा संवादसुद्धा लिहून देऊ शकतात.

आम्ही शाळेत असताना आम्हाला ताटके आणि सोहनी यांचं पदार्थविज्ञानावर एक पुस्तक होतं. त्यात न्यूटनचे नियम, बॉईलचा नियम, पास्कलचा नियम चार-चार ओळींच्या कवितेत दिलेले असत. उदाहरणार्थ, न्यूटनचा तिसरा नियम सांगणारी कविता अशी होती:

जेव्हा जेव्हा घडे क्रिया, तेव्हा तेव्हा प्रतिक्रिया
दोन्ही समान परिमाणी, दिशांमध्ये विरुद्ध पै

त्यामुळे तो नियम सहज पाठ होत असे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारलेले हे प्रोग्रॅम्स अशा छोट्या छोट्या कविताही करून देतात.

दैनंदिन जीवनाशी जोडा

विज्ञानातली एखादी संकल्पना लोकांपर्यंत पोहोचवायचा एक उत्तम मार्ग म्हणजे तिला दैनंदिन जीवनाशी जोडून घेणे. या बाबतीतही कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या मदतीस येते, त्या संकल्पनेशी निगडित असे रोजच्या आयुष्यातील प्रसंग ती सुचवू शकते. आजचा जमाना हा लिखित मजकुराचा नाही, तर दृकश्राव्य माध्यमांचा आहे. व्हॉईस जनरेशन टूल्स वापरून वैज्ञानिक लेखांचे किंवा सारांशांचे ऑडिओ पॉडकास्ट तयार करता येतात. Wondercraft, EleventLab. Jellypod या सारखे काही प्रोग्रॅम्स तर मराठीतही संवाद तयार करून देतात. वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित चित्रफिती (videos) आणि ॲनिमेशन करून देणारे प्रोग्रॅम्सही आहेत. यामुळे विज्ञान फक्त 'वाचण्याची' गोष्ट राहत नाही, तर 'ऐकून आणि पाहून अनुभवण्याची' गोष्ट बनते. नजीकच्या भविष्यकाळात तुम्हाला अणूच्या अंतर्भागात शिरल्याचा किंवा दूरच्या आकाशगंगेत जाण्याचा अनुभवही आभासी तंत्रज्ञान वापरून घेता येईल.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारलेले हे प्रोग्रॅम्स वापरताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी, ती म्हणजे कधीकधी ते चुकीची माहिती देऊ शकतात. त्यामुळे त्यांनी तयार केलेला मजकूर किंवा सारांश नेहमी तपासून घेणं अत्यंत आवश्यक आहे. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता सतत नवनवीन गोष्टी शिकून स्वतःला सुधारत असते. त्यामुळे पुढील काळात अधिक अचूक माहिती देणारे प्रोग्रॅम्स येतील, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

लोकाभिमुख विज्ञानलेखन म्हणजे लोकांना केवळ माहिती देणे नव्हे, तर त्यांना ज्ञान देणे, विचार करण्यास प्रवृत्त करणे. आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्यानं हे निश्चितच साध्य करता येईल, यात शंका नाही.

(लेखक विज्ञानविषयक लेखन करणारे साहित्यिक आहेत.)



परिसंवाद : इंग्रजी माध्यमाच्या रेट्यात बालसाहित्याची पीछेहाट होत आहे का?

शिक्षणातील इंग्रजी माध्यमाच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी बालवाचकांची संख्या कमी होत आहे, बालसाहित्याचा प्रतिसादही कमी होत आहे. इंग्रजीच्या या रेट्यात बालसाहित्याची पीछेहाट होत आहे का ? या प्रश्नाचे उत्तर शोधणारी मांडणी बालसाहित्याच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या राजीव तांबे, डॉ. संगीता बर्वे आणि ल. म. कडू यांनी केली आहे.



राजीव तांबे
मो.: ९३२२३९९८७९

हीच बदलाची वेळ आहे

बालसाहित्य हे मुलांना शिकवत नाही तर शिकण्याच्या अनेकानेक पद्धती, विविध पर्याय मुलांसमोर सहजी उलगडून ठेवतं आणि मुलाला त्याच्यातील सुप्त शक्ती व सर्जनशीलता यांची जाणीव करून देतं. बालसाहित्याचा पाया हा मुलांना गृहीत धरणे हा नसून मुलांवरचा अपार विश्वास आणि मुलांवर निरपेक्ष प्रेम हा आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढू लागल्या, मराठी शाळांकडे दुर्लक्ष व्हायला लागलं, मराठी शाळांची संख्या कमी-कमी होऊ लागली, एकंदरच पुस्तके विकणारी दुकाने कमी झाली आणि मग पन्नाशी उलटलेली माणसं 'काय होते ते जुने दिवस' असं म्हणत मराठीच्या नावाने उसासे टाकू लागली. या सर्वांचा मराठी बालसाहित्य खपाशी काडीमात्र संबंध नाही, असं माझं स्पष्ट मत आहे.

कोणत्या सुधारणा हव्यात

मराठी बालसाहित्याचा खप कमी होतो आहे यासाठी इंग्रजी भाषेला, इंग्रजी शाळांना दूषणे देण्यापेक्षा मराठी बालसाहित्यकारांनी आपल्यात काय सुधारणा करायला हव्यात याचा शोध घेतला पाहिजे. मराठी आणि इंग्रजी बालसाहित्याचा जर तौलनिक अभ्यास केला, तर हे सहजी लक्षात येईल.

एक साधं उदाहरण पाहा. इंग्रजी बालसाहित्यात वेगवेगळे ५३ पेक्षा जास्त साहित्य प्रकार (जॉनर्स) आहेत. नुसता विज्ञानाचा जरी विचार केला तरी मुलांसाठी विज्ञान भयकथा, विज्ञान रंजक कथा, विज्ञान प्रयोगकथा, विज्ञान दंतकथा, विज्ञान वेधकथा, विलक्षण विज्ञानकथा, विज्ञान ग्राफीक्स, विज्ञान चित्रकथा असं खूप काही आहे आणि या सर्व मुलांमधे प्रचंड बालप्रिय आहेत. तेथील अनेक लेखकांनी मुलांसाठी धमाल कॅरेक्टर्स तयार केली आहेत आणि त्यांच्या मालिका प्रकाशित होत आहेत. सातत्याने आपल्या लेखनाचा दर्जा फक्त टिकवणं नव्हे तर तो वाढवत नेणं तसंच चिकाटीने आणि आत्मीयतेने लेखनावरच लक्ष केंद्रित करणं, तेव्हाच लेखन प्रयोगशील होतं आणि आपसूकच वाचक त्याची दखल घेतात.

आव्हान स्वीकारा

इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढल्या, इंग्रजी साहित्याचा सुळसुळाट वाढला, ही घटना मराठी बालसाहित्यकारांनी आव्हान म्हणून स्वीकारली पाहिजे. भले मराठी

खटाव तालुक्यात सिद्धेश्वर कुरोली येथे येरळा नदीवरील सिद्धेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरातील शिवपिंडीवर अभिषेकाची धार धरल्यावर शिट्टीसारखा शिवनाद निघतो. त्याला सिंहनाद म्हणतात. भारतातील शिवस्थानांपैकी शिवनाद किंवा सिंहनाद करणारे हे एकमेव स्थान आहे, असे मानले जाते. या मंदिरात भाविकांची गर्दी असते.

नोंद

बालसाहित्याचा खप कमी होत असेल, तर इतरांकडे बोट न दाखवता 'हीच बदलाची वेळ आहे' हा संदेश घेऊन आपल्या चाकोरीतून बाहेर पडायला पाहिजे.

मी वाचलेल्या मराठीतल्या बालसाहित्यातील ही केवळ निरीक्षणे आहेत; पण हा काही संपूर्ण मराठी बालसाहित्याचा धांडोळा तर नव्हेच आणि समीक्षा तर नव्हेच नव्हे. यामधे अनेक त्रुटी असणे स्वाभाविकच आहे.

* सतत उपदेशाच्या पिचकाऱ्या मारणं, सुविचारांचा सडा शिंपणं आणि हे कमी पडतं म्हणून की काय त्यावर 'मूल्यांचं टॉपिंग' करणं याला बालसाहित्य कसं म्हणता येईल. 'मी शिकवणारा आणि तो अज्ञ बालक शिकणारा' अशी भूमिका घेऊन लिहिलेले जे आहे ते बालसाहित्य नाही असं मला वाटतं. बालसाहित्याचे किंवा साहित्याचे नेमके प्रयोजन काय? मुलांना शिकवणं, उपदेश करणं, तात्पर्य सांगणं, संस्कार करणं किंवा त्यांना घडवणं हे तर नव्हे आणि नव्हेच.

* बालसाहित्याचं प्रयोजन आहे, मुलांना दृष्टी देणं आणि मुलांना आनंद देत त्यांच्या विविध संकल्पनांबाबतच्या कक्षा रुंदावत नेणं. बालसाहित्य हे मुलांना शिकवत नाही, तर शिकण्याच्या अनेकानेक पद्धती, विविध पर्याय मुलांसमोर सहजी उलगडून ठेवतं आणि मुलाला त्याच्यातील सुप्त शक्ती व सर्जनशीलता यांची जाणीव करून देतं; कारण बालसाहित्याचा पाया हा 'मुलांना गृहीत धरणे' हा नसून 'मुलांवरचा अपार विश्वास आणि मुलांवर निरपेक्ष प्रेम' हा आहे.

* बहुतेक सर्व बालकवितांचे विषय हे पाऊस, निसर्ग, माझी शाळा, माझी आई, सुंदर ते पर्यावरण कसे करावे, प्राण्यांनी किंवा पक्ष्यांनी काढलेल्या शाळा आणि त्या शाळेत गाणं शिकवणारी कोकिळा, प्राण्यांची दुकाने इ. केवळ यमक जुळवणं किंवा शब्दार्थ, म्हणी एकमेकांत गुंफणं म्हणजे कविता नव्हे, आणि भरमार विशेषणांची कलाबुतं लावणं म्हणजे कवितेला गुदमरवून टाकणं. विंदा, शांताबाई, इंदिरा संत, पाडगावकर यांच्या बालकविता या कवींनी वाचल्या आहेत का? आणि वाचल्या असतील, तर त्या समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे का, असा प्रश्न मला 'त्यांच्या कविता' वाचताना पडतो.

* विंदांच्या बालकविता जेव्हा मुलं वाचतात तेव्हा त्या त्यांना त्यांच्याच वाटतात, आणि जेव्हा मोठी माणसं त्या



कविता वाचतात तेव्हा त्या कविता त्यांना मुलांकडे पाहण्याचा नवीन दृष्टिकोन देतात, म्हणून त्या बालकविता मोठ्या माणसांना अधिक प्रगल्भ करतात.

* मुळातच आपल्या बालसाहित्यात फँटसी फारच कमी लिहिली जाते. फँटसीला तर्काची बैठक लागते. काहीतरी अचाट लिहिणं म्हणजे फँटसी नव्हे. जंगलातल्या एका सशाने सिंहाला विहिरीत ढकलून दिले ही काही फँटसी नाही; पण जेव्हा तो ससा सिंहाला म्हणाला, 'महाराज विहिरीत डोकावून पाहा. तिथे अजून एक सिंह आहे.' ही फँटसी आहे कारण ती तर्कशुद्ध आहे.

* जेव्हा मुलांच्या नजरेतून बघता येतं, समजून घेता येतं तेव्हाच मुलांच्या भाषेत बालसाहित्य आणि फँटसी लिहिता येते. मग आपल्या इथेच हा प्रॉब्लेम का येतो? मला वाटतं, काही मोठ्या माणसांचं बालपण हे करपून गेलेलं असतं. त्यामुळे त्यांच्यांत दडलेलं मूल हे एकतर चिरचिरं-किरकिरं तरी असतं किवा अपार नॉस्टॅल्जिक. अशी माणसं मुलांसाठी नाही लिहू शकत.

* किंबहुना कुठलाही मोठा माणूस तो 'मोठा' आहे म्हणून मुलांसाठी नाही लिहू शकत. समोरचं मूल गुण-दोषांसकट स्वीकारण्याची तयारी आणि मुलाला उपदेश न करता सर्व पूर्वग्रह बाजूला सारून मुलाकडून शिकण्याची आंतरिक इच्छा असेल तरच तो मोठा माणूस लहान मुलात मूल

नोंद

खटाव तालुक्यात पुसेगावजवळ नेर गावाच्या छोट्याशा गावात एक ब्रिटिशकालीन तलाव असून नेर तलाव म्हणून तो ओळखला जातो. ब्रिटिश अमदानीत व्हिक्टोरिया राणीच्या काळात इ.स. १८७३ मध्ये या धरणाचे बांधकाम इरिगेशन डिपार्टमेंटकडून झाले आहे. या तलावाच्या मध्यभागी टेकडी असून त्यावर चैतोबाचे मंदिर आहे. या मंदिरात जाण्यासाठी एक पायवाट आहे.

होऊन मिसळू लागतो. अशा वेळी त्या मोठ्या माणसात लपलेलं मूल फक्त चौकसच नाही तर खट्याळही असावं लागतं.

* फँटसीला तर्काप्रमाणेच आणखी एक किनार आहे विज्ञानाची. ही पिढी विज्ञान तंत्रज्ञान, चॅटजीपीटी, ए. आय. सोबत मोठी होत आहे. आता प्रश्न असा आहे की, मुलांसाठी लिहिणारे विज्ञानाच्या चष्म्यातून फँटसीला भिडत असतील, तरच ती मुलांना आपली वाटेल. अवैज्ञानिक फँटसी मुलांच्या पचनी पडत नाही. मुलांसाठी चांगलं लिहिणं कठीणच आहे, पण अशक्य मात्र नाही.

* कथांचा विचार केला, तर विविध कथाप्रकार इथे सशक्तपणे रुजलेच नाहीत. विज्ञान वेधकथा, विज्ञान रहस्यकथा, अंतराळविज्ञान कथा, समुद्रप्रवासाच्या साहसीकथा, रहस्यकथा, भुतांच्या गोष्टी, महायद्धांच्या कथा, गुप्तहेरांच्या कथा, जादूगारांच्या अचाटकथा असं खूप सांगता येईल. यातील अपवादात्मक काही प्रयोग झाले आहेत; पण त्यात सातत्य नाही. इंग्रजीमधे या साहित्यप्रकारात विपुल साहित्य उपलब्ध आहे. त्यांचे वेगवेगळे नायक आणि नायिका बालसाहित्यात अक्षरश: धुमाकूळ घालत आहेत. असं असताना आपण आत्ता नेमक कुठे कमी पडत आहोत हे एकदा शोधायलाच हवं.

• पूर्वी सत्यकथा, हंस किंवा अंतर्नाद मासिकात लेख, गोष्ट किंवा कविता प्रकाशित झाली की, ते प्रतिष्ठित समजलं जायचं. याचं कारण होतं त्या-त्या संपादकांनी त्या-त्या लेखनावर संपादकीय संस्कार केलेले आहेत म्हणून. चांगला संपादक हा समोरच्या लेखकाला 'काय लिही' ते कदापि सांगत नाही, तर 'कसं लिहिता येईल' याविषयी तो मांडणी करतो आणि प्रेरितही करतो. लेखकाला नवीन दिशा दाखवतो. म्हणूनच आलेलं साहित्य जसंच्या तसं छापणाऱ्याला संपादक नाहीतर संकलक म्हणतात. बालसाहित्यातील काही संपादकांचा अपवाद वगळता संकलकांचाच सुकाळ झाल्यामुळे तर बालसाहित्याची आणि पर्यायाने बालसाहित्य खपाची तब्येत बेताचीच झाली नसेल? 'टीकाच करायची असेल तर ती स्वत:वरच करा, त्यामुळे तुम्ही तुमच्यातूनच एक पाऊल पुढे जाल' ही चिनी म्हण तुम्ही ऐकलीच असेल.

(लेखक ज्येष्ठ बालसाहित्यिक आहेत.)





डॉ. संगीता बर्वे
मो.: ९७४७९९७६९३

इंग्रजी माध्यम आणि मराठी बालसाहित्य

मराठी बालसाहित्य वाचनाचे फायदे मुलांना वेळोवेळी समजावून सांगावेत. लहानपणापासून मुलांना अशा वाचनाची सवय लागली, तर मोठेपणीही चांगले वाचक घडतील आणि मग बालसाहित्याचीच काय मराठी वाङ्मयाचीही पीछेहाट होणार नाही. बालसाहित्याची कितीही पीछेहाट होते आहे असं म्हटलं तरीदेखील बालसाहित्य लिहिणारे लिहीतच राहणार. प्रकाशक प्रकाशित करत राहणार, मुलांसाठी काम करणारी मासिकं निघतच राहणार, बालकुमार साहित्य संमेलने, वाचन चळवळ सुरूच राहणार आणि मुलांपर्यंत मराठी बालसाहित्य पोहोचत राहणार, याचा विश्वास वाटतो.

इंग्रजी माध्यमाच्या रेट्यात बालसाहित्याची पीछेहाट होते आहे का, या प्रश्नाचे बहुतांशी उत्तर होय असेच आहे. इंग्रजी माध्यमामुळे मातृभाषेवरच घाला घातला जातो आहे हे आता वेगळे सांगायला नको. याची काही उदाहरणे मी पुढे देणारच आहे तरीदेखील एकांगी विचार करून उपयोग नाही केवळ इंग्रजी माध्यमामुळेच बालसाहित्याची पीछेहाट होते आहे आणि मराठी माध्यमातील मुले आवर्जून अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींची, कवितांची पुस्तकं, कादंबऱ्या मोठ्या प्रमाणात वाचताहेत असं चित्र दिसतंय का, असा प्रश्न जाणकारांनी स्वतःला विचारावा म्हणजे याचे खरे खरे उत्तर काय आहे, हे आपल्या लक्षात येईल.

आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या काळामध्ये मोबाइलचे जे आक्रमण मुलांपर्यंत झाले आहे त्यामुळे मुलांच्या आणि मोठ्यांच्यादेखील वाचनावर गंभीर परिणाम झालेला दिसून येतो. मागच्या पिढ्यांचा विचार केला तर आधुनिक तंत्रज्ञानाची साधनंच त्या काळात नसल्यामुळे छान छान गोष्टींची पुस्तकं वाचण्यात मुलं रममाण होत असत. आजी-आजोबांच्या, आई-बाबांच्या गप्पागोष्टीत रमत असत. आपण सगळेच या अनुभवांमधून गेलो आहोत. पुस्तकांमध्ये स्वतःहून रमणं आता कमी झालं आहे. गोष्टीची पुस्तकं हातात घेऊन वाचण्यापेक्षा टीव्ही, मोबाइलवर कार्टून बघण्यात मुलांना जास्त मजा येते आहे. त्यामुळे बालसाहित्याच्या प्रसारासाठी अनेक स्तरांवर काम करावे लागते आहे. मुलांसाठी काम करणाऱ्या संस्था, वाचन चळवळ, बालकुमार साहित्य संमेलनं, मुलांसाठी कथा, कविता, अभिवाचन स्पर्धा अशा विविध योजना आखून मुलांना लिहितं, वाचतं करावं लागतं आहे. बालभारती, एन.बी.टी., प्रथम बुक्स, सारख्या मुलांसाठी साहित्य प्रकाशित करणाऱ्या मातब्बर संस्था... ज्योत्स्ना, गमभन, साकेत, दिलीपराज यांसारख्या कणखरपणे उभ्या राहिलेल्या प्रकाशन संस्था याशिवाय इतरही अनेक

नोंद

सातारा-पंढरपूर मार्गावर माण तालुक्यातील म्हसवड येथे प्रसिद्ध असे श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी यांचे मंदिर आहे. दरवर्षी मागशीर्ष शुद्ध प्रतिपदा या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. मुख्य शिखराची उंची १०० फुटांहून अधिक आहे. श्री सिद्धनाथ हे कर्नाटक व आंध्र प्रदेशातील अनेकांचे कुलदैवत आहे. दरवर्षी यात्रेला आणि रविवारी या मंदिरात मोठी गर्दी होते.

प्रकाशन संस्था बालसाहित्याची पुस्तकं प्रकाशित करत आहेत.

इंग्रजी माध्यम

किशोर, छात्रप्रबोधन, शिक्षणविवेक, वयम, कुल्फी, ऋग्वेद, चिकू पिकू, निर्मळ रानवारा, लाडोबा यासारखी अनेक मासिकंही मुलांसाठी कार्यरत आहेत. मात्र हे सर्व असूनही इंग्रजी शाळा, इंग्रजी माध्यम, इंग्रजी पुस्तकं मराठी बालसाहित्याच्या आड येतात ही गोष्ट नाकारता येणार नाही. आपल्या मुलाला इंग्रजी शिक्षण देण्याचा ध्यास पालकांनी घेतलेला आहे. मुलांची मातृभाषा बिघडवण्यास इंग्रजी शाळेतले शिक्षण कारणीभूत ठरते. जिथे मुलाला नीट मराठीच बोलता येत नाही तिथे तो मराठी बालसाहित्य कसे वाचू शकणार? त्याला मराठी पुस्तकं वाचण्याची आवड कशी निर्माण होणार?

ज्या वसाहतीमध्ये मी माझी वैद्यकीय रुग्णसेवा बावीस वर्षं देत होते, त्या वसाहतीमध्ये धुणी -भांडी, झाडझुड करणाऱ्या कष्टकरी बायका, रिक्षा-ट्रक चालक, कामगार वर्गातील पुरुष, त्यांची मुलं अशी अनेक कुटुंबं राहतात. यातील आई किंवा वडील बहुतकरून आयाच आपल्या मुलांना घेऊन दवाखान्यात येत असत. त्या मुलांशी मी बोलत असे.

तू कुठल्या शाळेत आहेस?

कितवीत आहेस? कुठले विषय आहेत?

वगैरे. यातील बहुतांशी मुलंमुली जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेमध्ये जात होती. मात्र पोटाला चिमटा घेऊन काही कुटुंबांनी आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घातलं होतं.

आपण ज्या ठिकाणी कामावर जातो तिथली चांगल्या घरची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. मग आपलीच का मराठी माध्यमातून? आपल्या मुलांनाही चांगलं शिक्षण मिळायला पाहिजे, त्यांनाही इंग्लिश बोलता आलं पाहिजे अशी त्यामागची त्यांची धारणा होती. आता तर या वस्तीतदेखील इंग्रजी माध्यमात जाणाऱ्या मुलांचं प्रमाण वाढलं आहे. ग्रामीण भागातही भरपूर इंग्रजी शाळा तयार झाल्या आहेत. नवनवीन इंग्रजी शाळा उभारल्या जात आहेत. त्यामुळे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठी शाळेत शिकणाऱ्या मुलांची संख्या कमी कमी होत चालली आहे. आपल्या मुलांनी इंग्लिश शिकावं. जगात वावरताना कुठेही कमी पडू नये, या हेतूने ग्रामीण भागातली इंग्लिश माध्यमातून शिकणारी मुलांची संख्या वाढली आहे. या मुलांपर्यंत मराठीपेक्षाही इंग्रजी बालसाहित्य जास्तीत जास्त कसं पोहोचेल याची दखल शाळा आणि शाळेतले शिक्षक घेत असतात.

दुय्यम स्थान

मराठी बालसाहित्याला ते दुय्यम स्थान देतात. विशेष म्हणजे घरात कोणाला इंग्लिशचा गंधही नसताना ही मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. आपली मुलं आपल्याला मम्मी पप्पा म्हणतात, सॉरी, थँक्यू म्हणतात, त्यांची पाठ्यपुस्तक इंग्रजीत आहेत. ती बाबा ब्लॅक शीप किंवा रेन रेन गो अवे सारखी इंग्रजी गाणी म्हणून दाखवतात. याचा त्यांच्या आई-वडिलांना अभिमान वाटतो. आपल्या मुलानं फाडफाड इंग्लिश बोलावं, असं आजकाल बऱ्याच आईवडिलांना वाटत असतं. पुढच्या शिक्षणासाठी आपल्या मुलीला अथवा मुलाला परदेशात पाठवण्याचं काहींचं स्वप्न असतं. तिथल्या वातावरणात आपलं मूल रुळावं, तिथल्या भाषेत, संस्कृतीत कमी पडू नये याची काळजी लहानपणापासून हे आई-वडील घेतात. शिक्षकदेखील मुलांचा विकास व्हावा म्हणून सुरुवातीपासूनच मराठीआधी इंग्रजी अक्षर ओळख करून देतात. इंग्रजी शाळादेखील बहुतांशी इंग्रजी बालसाहित्याची खरेदी करतात. परिणाम असा होतो की इंग्लिश आणि मराठी एकत्रित करून बोलता बोलता दोन्ही भाषांची सरमिसळ होते.

मातृभाषेतील प्रगती खुंटते

मराठी शब्द हळूहळू हद्दपार होत जातात. कधी कधी तर धड मराठीही नाही आणि धड इंग्लिशही नाही अशा धेडगुजरी भाषेत मुलं बोलू लागतात. साहजिकच मुलांची मातृभाषेतील प्रगती खुंटत जाते. त्यामुळे मराठी बालसाहित्याकडेही त्यांचे दुर्लक्ष होऊ लागते. आमचा बाब्या ना मराठी पुस्तक वाचतच नाही तो गोष्टीची इंग्लिश पुस्तकंच 'प्रिफर' करतो, असं एखादी आई कौतुकाने सांगते. शाळेमध्ये या मुलांना द्वितीय भाषा म्हणून मराठी शिकवली जाते. त्यानुसार मराठी पाठ्यपुस्तकं तयार केली जातात. इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांचे संभाषण याची साक्ष देते.

बघा तर काही उदाहरणे-

१) आमच्या शेजारी राहणारी छोटी श्रद्धा एके दिवशी घरात येत मला म्हणाली,

पाटण तालुक्यात दिवशी धारेश्वर येथील धारेश्वर हे महादेवाचे मंदिर प्रसिद्ध आहे. येथे गुंफा व एक झरा आहे. ही गुंफा २०० फूट लांब, ३५ फूट रुंद व ७ फूट उंच आहे. समर्थस्थापित ११ मारुतीपैकी ३ मारुती याच परिसरात आहेत. पाटणपासून अंदाजे २० कि. मी. अंतरावर शंकराचे रूप असलेले हे नाईकबा मंदिर या भागात प्रसिद्ध आहे. पिंडीभोवती चांदीचा मुखवटा आहे. दसरा व चैत्र पंचमीला येथे यात्रा भरते.

'मावशी, तुला आज आईनं आमच्याकडे लंचला बोलावलंय'
'का गं? आज काय विशेष?' मी विचारलं.
श्रद्धा म्हणाली,'आमच्या आईने सिक्सटिन मंडे केले ना. त्याचं आज सेलिब्रेशन आहे!'
तिच्या बोलण्याचा अर्थ लावताना माझ्या असं लक्षात आलं की, श्रद्धाच्या आईने सोळा सोमवाराचं व्रत केलंय त्याचं आज उद्यापन आहे.
त्यासाठी हे आमंत्रण आहे.

२) 'राहत, लवकर लवकर जेवण फिनिश कर बघू, तरच तुला पुढचं कार्टून बघायला मिळेल. सांगून ठेवते' राहतच्या तोंडात घास भरवता भरवता राहतची आई त्याच्याशी बोलत होती.
राहत पाच वर्षांचा आहे. समोर कार्टून लावल्याशिवाय तो अजिबात जेवत नाही. कार्टून लावलं की, राहतची आई त्याच्या तोंडात एक एक घास भरवते. म्हणण्यापेक्षा एक एक घास कोंबते.
अशा वेळी आपण काय खातोय आणि किती खातोय हे राहतला समजत नाही, मात्र आईला जेवण भरवणं सोपं जातं. तिचं म्हणणं असं की, त्यामुळे राहत इकडे तिकडे पळत नाही. एका ठिकाणी स्थिर बसतो आणि कार्टून पाहत पाहत एक एक घास गिळत राहतो. घास पोटात जाईनासा झाला की, तो स्वतःहून सांगतो– 'स्टॉप. फिनिश'.
राहतची आई हे कधी कौतुकानं, तर कधी हतबल होऊन सांगते. राहतच्या मराठी आईला जेवता जेवता राहतला एखादी मराठी गोष्ट वाचून दाखवावी हे लक्षात येत नाही, आली तरी राहत प्रतिसाद देतोच असे नाही, त्यामुळे जेवता जेवता त्याने कार्टून बघणं तिला जास्त सोयीचं जातं.

३) इंग्रजी माध्यमातला गाणं शिकणारा आठवीतला एक मुलगा माझ्या चांगला परिचयाचा आहे. त्याला मराठी नीट बोलता येत नाही. म्हणजे बोलण्यासाठी शब्द सापडत नाहीत. अगदी कसंबसं तोंडातल्या तोंडात बोलतो. गाणं शिकवताना 'याचा अर्थ माहिती आहे का?' असं विचारलं, तर तो प्रत्येक वेळी नाही म्हणतो. त्याचे आई-वडील म्हणतात की, त्याला इंग्लिश शाळेत घातल्यामुळे मराठी नीट बोलता येत नाही. त्यांच्या या बोलण्यात किंचित अभिमान दिसून येतो. आश्चर्य म्हणजे त्याला चार इंग्लिश वाक्यंसुद्धा नीट बोलता येत नाहीत. 'लहानपणी तू मराठीची गोष्टीची छोटी छोटी पुस्तकं वाचलीस का?' असं विचारलं, तर तो नाही म्हणतो.

४) आता हे एक वेगळेच उदाहरण.
एकदा मी कार्यक्रम करून परभणी ते पुणे रेल्वेमधून येत होते. आमच्या डब्यामध्ये एक जोडपे आणि त्यांची दोन मुलं होती. ते सर्व अमेरिकेत राहत होते. इथे आपल्या आईवडिलांना भेटायला म्हणून मुलांना आजोळी घेऊन आले होते. त्यातला छोटा मुलगा आपल्या बहिणीला म्हणाला,
'काल किनई मी स्नानच केलं नाही. तू केलंस का काल स्नान?'
हे ऐकून मी आश्चर्यचकित झाले आणि त्यांच्याशी गप्पा मारू लागले. तेव्हा असं लक्षात आलं की, ही मुलं मराठी तर बोलत होतीच; पण बोलताना जुने मराठी शब्द वापरत होती. आईने त्यांना शुभंकरोती, मनाचे श्लोक म्हणायला लावले. त्यांनी ते अतिशय चांगल्या पद्धतीने म्हटले. मला आश्चर्य वाटलं. मी त्यांना विचारलं, की 'तुम्ही तर अमेरिकेत राहता मग तुमची मुलं इतकं शुद्ध मराठी कसं बोलतात?' त्यावर 'आम्ही घरी शुद्ध मराठीतच बोलतो', असं त्यांनी सांगितलं.

परदेशात मराठी शाळा

आता परदेशात बऱ्याच ठिकाणी दर रविवारी मराठी शाळा सुरू झाल्या आहेत. इथले आजीआजोबा जेव्हा नातवांना सांभाळायला परदेशात जातात तेव्हा ते या शाळांमध्ये जाऊन शिकवतात. मुलांचे आई-वडीलही सुट्टीच्या दिवशी रविवारी शाळेत मुलांना मराठी शिकवतात. अटलांटाच्या शाळेमध्ये तीनशे मुलंमुली दर रविवारी मराठी शिकण्यासाठी येतात. मुलांसाठी काम करणारे, लेखन करणारे आमचे मित्र दिलीप गरुड सर त्यांच्या मुलाकडे अटलांटा येथे गेले असताना त्यांनी मला ही माहिती दिली.

त्या शाळेत असलेली फास्टर फेणे, वाचू आनंदे आणि त्यात माझीही पुस्तकं बघितल्यानंतर त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. आनंदही झाला. त्यांनी त्याचे फोटोही

नोंद

सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोयना अभयारण्य येते. जंगलात हरीण, रानगवा, लांडगा, रानडुक्कर, अस्वल, वाघ हे प्राणी; बुलबुल, घार, रानकोंबडा, सूर्यपक्षी हे पक्षी; करवंद, जांभूळ, चिंचा, करंजा, पळस, साग इ. वृक्ष विपुल प्रमाणात आढळतात. विविध प्रकारच्या वनौषधी बरोबर तमालपत्र, चारोळी, दगडफूल, दालचिनी इ. मसाल्याच्या पदार्थांच्या वनस्पती आढळतात.

काढून मला पाठवले. याचाच अर्थ मुलांना बालसाहित्याची गोडी लावण्यासाठी आधी त्यांना आपल्या मातृभाषेची चांगल्या प्रकारे ओळख करून देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांच्यासमोर बालसाहित्याची पुस्तकं मोठ्यांनी ठेवण्याची गरज आहे.
त्याशिवाय मुलांपर्यंत पुस्तकं पोहोचतीलच कशी?
५) एकदा आम्ही आमच्या मित्राकडे गेलो होतो. इंग्रजी माध्यमात इयत्ता पहिलीमध्ये शिकणाऱ्या मुलाला शाळेत



शिकवलेलं गाणं म्हणून दाखव असा आग्रह त्याच्या आई-वडिलांनी केला.

मुलाने गायला सुरुवात केली.
दौडतदौडत बाल शिवाजी
घोड्यावरूनी आला
सह्याद्रीच्या सवंगड्यांनी
मुजरा त्यांना केला.

गाणं संपल्यानंतर मी विचारलं, 'हे गाणं कोणी लिहिलंय माहिती आहे का?' अर्थात त्याचं उत्तर कोणालाच देता आलं नाही. मी त्यांना सांगितलं की, ''हे गाणं मी लिहिलंय''. त्यावर सगळ्यांना अतिशय आश्चर्य वाटलं मुलाची आई म्हणाली, 'हे तर फार फेमस गाणं आहे. सगळ्या शाळांमध्ये हे गाणं शिकवलं जातं. ग्रॅदरिंगलासुद्धा मुलांकडून सादर करून घेतलं जातं.' यानंतर यू ट्यूबवर शोध घेतला असता या गाण्यावर मुलांचे अनेक व्हिडिओज मला दिसले. माझी सोळा बालगीते दुसऱ्या कोणाच्या नावावर तिथे सापडली... आपल्याला आवडलेली एखादी गोष्ट, एखादी कविता, एखादं गाणं नक्की कोणी लिहिलं आहे याचा शोध मुलं, पालक, शिक्षक जाणीवपूर्वक घेतात का, हा देखील प्रश्न आहे. मुलांसाठी साहित्य लिहिणाऱ्या अनेक साहित्यिकांची अशी ही अवस्था झाली आहे.
६) एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये मी गेले होते. त्या शाळेमध्ये मराठी दुय्यम भाषा म्हणून शिकवली जात होती. मराठी शिकवणाऱ्या टीचरबाई लगबगीने माझ्यासमोर आल्या. म्हणाल्या,
'खूप दिवसांपासून माझ्या मनात एक प्रश्न आहे. मला तो तुम्हाला विचारावासा वाटतो. तुम्ही त्याचं उत्तर बरोबर देऊ शकाल, असं मला वाटतंय.'
मी म्हटलं, 'विचारा की.'
टीचरबाईंनी मला विचारलं, 'मला एक सांगा. आरती प्रभू या मीना प्रभूंच्या कोण?' यावर मी नि:शब्द झाले. नंतर मात्र त्यांना समजावून सांगण्याशिवाय कुठलाही पर्याय उरला नाही.

मराठी माध्यम काय करते?

ही उदाहरणे आपण पाहिली, तर आपल्या असे लक्षात येते की, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे बालसाहित्याची पीछेहाट होते आहे हे तर नक्कीच; पण मुळात इंग्रजीच नव्हे तर मराठी माध्यमाच्याही शाळा मुलांपर्यंत मराठी बालसाहित्य पोहोचवण्यासाठी कमी पडत आहेत. यासाठी सतत कार्यरत राहावं लागतं. मुलांना साहित्याची गोडी लावावी लागते. त्यासाठी आधी पालक, शिक्षक यांचे वाचन चांगले असावे लागते. पालकांना इंग्रजी शाळांचे आकर्षण वाटते आहे. त्यासाठी मोठ-मोठी फी भरण्याचीही त्यांची तयारी आहे. त्या शाळांचा थाटमाट, तिथली आकर्षक इंग्रजी पुस्तकं यांचा मोह पालकांना आणि नंतर मुलांनाही पडतो. इंग्रजी बालसाहित्य हे जास्त देखण्या स्वरूपात मुलांसमोर ठेवले जाते त्यामुळे इंग्रजी शाळेत शिकणाऱ्या मुलांना मराठीपेक्षा इंग्रजी बालसाहित्य आकर्षित करते. बालसाहित्याची पीछेहाट होण्यास आणखीही काही कारणे आहेत.

सन्माननीय अपवाद वगळता आपल्याकडे बालसाहित्य लिहिणारे लेखक फारसे कष्ट घेताना दिसत नाहीत. सहज सुचतंय म्हणून, निवृत्तीनंतर काहीतरी करायचं म्हणून, मजा म्हणून, छंद म्हणून, लिहिणारेसुद्धा खूप आहेत. त्यांनी लिहावंच. मात्र मुलांसाठी लिहिताना

सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यात कण्हेरखेड हे गाव आहे. ग्वाल्हेरच्या शिंदे राजवंशाचे हे मूळ गाव असून राणोजीराव हे या घराण्याचे मूळ पुरुष आहेत. श्रीमंत महादजी शिंदे यांचे स्मारक या गावात असून माजी केंद्रीय मंत्री स्व. माधवराव शिंदे यांनी १९९८ साली या गावास भेट दिली. या गावास भेट देणारे ग्वाल्हेरचे ते पहिले राजे होते.

चिंतन करावे लागते, बारकाईने अभ्यास करावा लागतो, लिहिलेल्या गोष्टीवर वारंवार संस्करण करावे लागते. असे न करता घाईघाईने पुस्तक प्रकाशित करणे, प्रसिद्धीचा सोस असणे, पुरस्कारांच्या मागे लागणे यामध्ये काहीवेळा आपले बालसाहित्य सापडते. मग पालक, मुलं इंग्रजी साहित्याकडे वळतात. या सगळ्या गोंधळामध्ये आपली मातृभाषा आणि परिणामी आपले बालसाहित्य मात्र मागे पडत चालले आहे. ही वेगवेगळी उदाहरणं मी अशासाठी दिली की, इंग्रजी माध्यमामुळे केवळ बालसाहित्यच नव्हे तर मराठी साहित्याकडेच दुर्लक्ष होते आहे. अर्थात ज्यांना याची जाणीव आहे ते आपल्या मुलांना मराठी शिकवण्याची काळजी घेतात; पण हे प्रमाण कमी कमी होत चालले आहे. त्यासाठी खूप प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे, हेच याचे उत्तर आहे. (माझ्या दोन्ही मुली मराठी माध्यमात शिकल्या आहेत हे मी इथे आवर्जून नमूद करू इच्छिते.)

इंग्रजी शाळा काय किंवा मराठी शाळा काय यामध्ये सर्व भर अभ्यासक्रमावर दिला जातो. पाठ्यपुस्तकातील धडे, कविता मुलांना शिकवण्यात शालेय वर्ष संपते. आपल्या मुलांनी खूप गुण मिळवावेत अशी आईवडिलांची अपेक्षा असते. त्यामुळे मुलांनी इतर वाचन न करता केवळ शाळेचा अभ्यास करावा, पाठ्यपुस्तकातील धडे वाचावेत, प्रश्न सोडवावेत, गृहपाठ पूर्ण करावा यावर भर दिला जातो. पाठ्यपुस्तकांमुळेच खरं तर मुलांना बालसाहित्याची गोडी लागते. मात्र पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त आणखी काही वेगळे साहित्य, गोष्टींची पुस्तकं, कवितांची पुस्तकं मुलांपर्यंत पोहोचावीत यासाठी फार थोडे आई-वडील, शाळेतले शिक्षक सजग असतात. महाराष्ट्राच्या लोकसंख्येत बालसाहित्याचा खप खरोखर किती प्रमाणात आहे, पुस्तकांच्या किती प्रती काढल्या जातात, किती मुलं आवडीनं बालसाहित्य वाचतात? किती पालक मुलांना नियमितपणे पुस्तकांच्या दुकानात घेऊन जातात? जसे की ते हॉटेल, मॉल वा कपड्यांच्या दुकानांमध्ये जाऊन खर्च करतात, असा विचार केला तर केवळ इंग्रजी माध्यमामुळेच बालसाहित्य कमी वाचले जाते असे नाही तर आपल्याकडे शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त बाकी काही वाचायचे असते याची जाणही बऱ्याच पालकांमध्ये नसल्यामुळेदेखील बालसाहित्याची पीछेहाट झालेली दिसून येते, असे माझे वैयक्तिक मत आहे. अर्थात प्रत्येकाचे मत वेगळे असू शकते.

एकूणातच बालसाहित्याची पीछेहाट होते आहे. यासाठी काय करायला हवे याचाही विचार विविध पातळ्यांवर होतो आहे. सर्वांत प्रथम बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखकाने मुलांची मानसिकता ओळखून लिहायला हवे. जेणेकरून मुलाला ते वाचावेसे वाटेल. पुस्तकाविषयी मुलाला आत्मीयता वाटेल, प्रेम वाटेल. मूल ते पुस्तक काळजीपूर्वक स्वतःहून जपून ठेवेल. चित्रकाराने देखील मुलांच्या मानसिकतेचा विचार करून मुलाला आवडतील अशी लेखनाला अनुसरून चित्रं काढायला हवीत. उत्तम दर्जाचे पुस्तक तयार झाले की, पुस्तक वाचण्यास हुरूप येतो. पुस्तक हातात घ्यावेसे वाटते. उलगडावेसे वाटते. यासाठी वाचनाची सुरुवात घरातूनच व्हावी. पालकांनी स्वतः मुलांना मराठी पुस्तकातील गोष्टी, कविता वाचून दाखवाव्यात. मुलांसोबत लहानपणापासून वाचन करण्याची सवय लागली की, त्याचा आनंद मोठ्यांनादेखील मिळतो. वाचनासाठी मुलांच्या आवडीचे विषय निवडावेत. मुलांना गोष्टी सांगताना अभिनय करून सांगाव्यात, जेणेकरून मुलांना त्या आवडतील. वाचनाची गोडी निर्माण होईल. मराठी बालसाहित्य वाचनाचे फायदे मुलांना वेळोवेळी समजावून सांगावेत. लहानपणापासून मुलांना अशा वाचनाची सवय लागली, तर मोठेपणीही चांगले वाचक घडतील आणि मग बालसाहित्याचीच काय मराठी वाङ्मयाचीही पीछेहाट होणार नाही. बालसाहित्याची कितीही पीछेहाट होते आहे असं म्हटलं तरीदेखील बालसाहित्य लिहिणारे लिहीतच राहणार. प्रकाशक प्रकाशित करत राहणार, मुलांसाठी काम करणारी मासिकं निघतच राहणार, बालकुमार साहित्य संमेलने, वाचन चळवळ सुरूच राहणार आणि मुलांपर्यंत मराठी बालसाहित्य पोहोचत राहणार याचा विश्वास वाटतो.

आणि आपण कशासाठी आहोत, मग आपला काय उपयोग?

मराठी बालसाहित्याची पीछेहाट होऊ द्यायची नाही, हाच निर्धार करून आपण सर्वांनी त्यावर काम करायचे आहे.

(लेखिका बाल साहित्यिका आहेत.)

नोंद

सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्याच्या सरहद्दीवर चंदनगड, वंदनगड हे दोन प्रख्यात गड आहेत. हे गड जुळे असल्याने त्यांना चंदन, वंदन या नावाने ओळखले जाते. चंदनगडाची उंची २२०० फूट असून चारही बाजूला उंच शिळा आहेत. गडावर विस्तृत मैदान असून गैसपाक बाबांचा भव्य दर्गा आहे. गिरीप्रेमी नागरिकांसाठी हा आकर्षणाचा बिंदू आहे.



ल. म. कडू
मो.: ९१९८२३१०७४५७

बालसाहित्याच्या पीछेहाटीला मानसिकता कारणीभूत

आधीच मातृभाषेपासून तुटलेल्या मुलांना इंग्रजीतही धड व्यक्त होता येत नाही. 'घर का ना घाट का' अशी अवस्था. या दोलायमान स्थितीत मुलांनी ललित साहित्य वाचून त्यात कसं काय रमावं? बालसाहित्य म्हणजे मूलभूत शिक्षणाचा पाया आहे.

इंग्रजी माध्यमाच्या रेट्यात बालसाहित्याची पीछेहाट होत आहे, असं आत्ता आत्ता वाटायला लागलंय. वास्तविक ही पडझड कधीपासूनच सुरू आहे. ती काही अवकाळी पावसागत अचानक कोसळलेली नाही. ढासळता ढासळता खिंडार पडू लागल्यावर आपण जागे व्हायला लागलोय. पायाचे दगड आपणच हलवतोय. एकूणच शिक्षणव्यवस्था, धोरणं आणि समाजाची बदलती उथळ मानसिकता याला जबाबदार आहेच, शिवाय भाषाप्रेमींची निष्क्रियता यातून ही समस्या उद्भवलेली आहे.

मानसिकता कारणीभूत

मराठी भाषेची पीछेहाट होण्यास इंग्रजी भाषा जबाबदार नाही, तर आपली मानसिकता कारणीभूत आहे. इंग्रजी भाषा म्हणजे 'वाघिणीचं दूध' हे आपल्याच पूर्वसुरींनी सांगून ठेवलंय. त्याबद्दल मतभेदाचं कारणही नाही; मात्र त्यांनी असंही म्हटलं होतं की, 'मातृभाषेचा दर्जा त्याहून वरचा आहे, हे विसरू नका.' '१८७४ च्या निबंधमाला'मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकर लिहितात, ''सध्या मराठी भाषा मोठ्या कचाट्यांत सांपडली आहे. इंग्रजीसारख्या प्रबल परभाषेचा तिजवर अगदी पगडा बसून तिचे स्वत्व म्हणजे निराळेपणा नष्ट होण्याच्या बेतांत आहे. तेव्हां अजून जोंवर हे संकट अनिवार्य झालें नाहीं तोवरच तिच्या कैवाऱ्यांस कंबर बांधण्याचा अवकाश आहे!''

मराठीची अवस्था

'सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय?' असं ठणकावून विचारणारा लोकशाहीचा चौथा स्तंभ आज कणखर न राहता, अतिलवचीक होताना दिसतो. अलीकडील वृत्तपत्रीय भाषा पाहता, मराठीची काय अवस्था आहे, हे आपण उघड्या डोळ्यांनी वाचतोच. सुरुवातीला उल्लेख केल्यानुसार, पुन्हा गतकाळात गेल्यास त्याची

कोरेगावपासून १३ कि.मी. अंतरावर कल्याणगड हा किल्ला आहे. याला नांदगिरीचा किल्ला म्हणूनही ओळखतात. पन्हाळ्याच्या शिलाहारवंशीय राजा दुसरा भोज याने १२ व्या शतकात हा किल्ला बांधला. इ.स. १६७३ साली छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याने तो जिंकून घेतला. नांदगिरी हे येथील परगण्याचे मुख्य ठाणे होते. गडावर ९ व्या शतकात स्थापलेली जैन तीर्थंकर पार्श्वनाथ यांची मूर्ती आहे, तर डाव्या बाजूला दत्तात्रयाची मूर्ती आहे.

नोंद

कारणं पुढं येतात. १९०४ मधील 'केसरी'च्या अग्रलेखात लोकमान्य टिळक परखडपणे विचार मांडतात, ''आमच्यातील सुशिक्षित लोकांस मराठी ग्रंथलेखन तर लांबच; पण वाचनही कमीपणाचे वाटते. लहानपणापासून सर्व विषयांचे ज्ञान इंग्रजी भाषेद्वारे मिळण्याची सवय लागल्यामुळे पुढे मातृभाषा परकी व अनभ्यस्त वाटून सर्व विचार, लेखन, वाचन व व्यवहार इंग्रजीमय बनून जातात. ते फक्कड व्याख्याने किंवा सुंदर निबंध लिहितात; पण शुद्ध स्वभाषेत लहानसे पत्र लिहिण्याची किंवा पाच मिनिटं बोलण्याची पंचाईत होते. असे सुशिक्षित लोक आमच्यामध्ये अजूनही आढळतात, ही फार शोचनीय स्थिती आहे. हा दोष हल्लीच्या शिक्षणक्रमाचा असो किंवा उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या आमच्या लोकांच्या नादानपणाचा असो; परंतु जोपर्यंत मराठी भाषेचा अभिमान बाळगून सर्व दिशेने तिची अभिवृद्धी करणे आपले कर्तव्य आहे, असे महाराष्ट्रातील सुशिक्षित लोकांस वाटत नाही, तोपर्यंत महाराष्ट्र भाषा चांगल्या नावारूपास येण्याची आशा नको. हिंदुस्थानातील इतर प्रांतात तेथील भाषावृद्धीविषयी जे प्रयत्न चालले आहेत तितकेही मराठी भाषेसंबंधाने महाराष्ट्रात नाहीत, ही मोठी दु:खाची गोष्ट आहे. जी मराठी भाषा एकेकाळी महाराष्ट्रातच काय; पण म्हैसूर, कर्नाटक, हैदराबाद, गुजराथ, बडोदे, माळवा, मध्यप्रांत वगैरे दूरच्या प्रांतांतूनही राजकीय भाषा म्हणून प्रचलित होती, ती आता त्या ठिकाणांहून हुसकून खुद्द महाराष्ट्रातही परकी होऊ पाहत आहे. ही गोष्ट महाराष्ट्र भाषेच्या पुत्रांस अत्यंत लाजिरवाणी आहे'' आजची स्थिती काय वेगळी आहे? उलट उत्तरोत्तर हा भाषिक आजार जास्तच बळावत चाललाय; पण लक्षात कोण घेतो?

वेदनादायी, दयनीय अवस्था.

जी स्थिती मुद्रित माध्यमांची आहे, त्याहून भयंकर रूप दूरदर्शनच्या वाहिन्यांवर पाहायला मिळते. कार्यक्रमाचे मथळे असोत, की निवेदन असो. एखाद्या भरजरी वस्त्राची लक्तरं करून दाखवावीत, अशी भाषेची वेदनादायी, दयनीय अवस्था आहे. हिंदी, इंग्रजीत त्या त्या भाषेची बूज राखली जाते. मराठीत तसं का घडत नाही? ज्यांची मातृभाषा मराठी आहे, अशी मंडळीही का भलतेसलते शब्द घुसडतात? काळानुरूप बदल हवेत, हे मान्य. त्यामुळे भाषा प्रवाही राहते, हेही मान्य. याचा अर्थ



शब्दांपासून व्याकरणापर्यंत भाषेचा मूळ आकृतिबंधच तोडून टाकावा, असा होत नाही. इंग्रजी भाषेने मराठी शब्दांचा स्वीकार केला; मात्र स्वभाषेचा आब राखून! आजकाल तर केवळ इंग्रजी शब्द वापरून भागत नाही; म्हणून लिहिताना देवनागरी लिपीऐवजी रोमन लिपी वापरतात. वाचताना किती विचित्र दिसतात ती ठिगळं! भाषेचे अजून किती धिंडवडे निघावेत?

प्रसारमाध्यमं समाजाला प्रभावित करणारी असतात. भलेबुरे शोधून समाजापुढे काय सादर करायचे याचे भान आणि विवेक माध्यमांकडून अपेक्षित आहे. क्रांती घडविण्याची शक्ती त्यांच्याकडे आहे. केवळ तरुणाईला हीच भाषा भावते; म्हणून सुसंस्कृतपणाची पातळी सोडून वाट्टेल तसे शब्द वापरून कसं चालेल? गांभीर्याने विचार करून माध्यमांनी मनावर घेतलं, तर पुन्हा भाषेला मूळ पदावर आणता येईल. चुकीच्या गोष्टी दूर होतील. भाषेतला गोडवा, सौंदर्यस्थळं समजतील. भाषा सहजपणे प्रवाही होईल.

बालमनावर संस्कार

१९७२ ला आपल्याकडे दूरदर्शन सुरू झालं. तेव्हाची भाषा अवघ्या पन्नासेक वर्षांत इतकी का खालावली? हे माध्यम तर मुलांसाठी कमालीचं प्रभावी ठरतं. आज त्यात वापरली जाणारी भाषा आणि शुद्धलेखनाकडे पाहता, मराठी भाषा अशीच असते किंवा काहीही चालते, हा संस्कार बालमनावर खोलवर रुजत जातो. सातत्यानं चहूबाजूंनी कानावर आणि मनावर तेच बिंबत राहतं.

नोंद

सातारा शहरात कृष्णानगर याठिकाणी दाक्षिणात्य शैलीचे उत्तर चिदंबरम् हे चार गोपुरांचे मंदिर आहे. शामराव शानभाग यांनी हे मंदिर स्वखर्चातून बांधले आहे. या मंदिरात नटराजाची पंचधातूची साडेचार फूट उंचीची मूर्ती आहे. मंदिर समूहाच्या भोवताली चार मुख्य दिशांना प्रत्येकी पासष्ट फूट उंचीची चार गोपुरे आहेत. त्यांच्या बांधकामासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश सरकारने खर्च दिल्याने त्यांना त्यांची नावे देण्यात आली आहेत.

बालवयात मुलांच्या मनाची पाटी सर्वच दृष्टीनं कोरी असते. त्यावर काय उमटवायचं? भाषेचं सहज, सुंदर, निर्मळ चित्र की वेडेवाकडे ओरखडे?

मुलं अनुकरणप्रिय असतात, असं बोललं जातं. आता वर उल्लेख केल्याप्रमाणे जर स्वभाषेची अवस्था अशी असेल, तर त्यांनी नेमकं काय करावं? स्वभावानुसार ती अनुकरणच करणार! जबाबदार कोण? इंग्रजांच्या गुलामगिरीतून सुटलो, त्याची शंभरी व्हायची वेळ आलीय. आहोत का आपण स्वतंत्र, कुठं आहे अस्मिता?

स्वभाषेचा तिटकारा, अढी

एकाच शिक्षण संस्थेच्या आवारातल्या दोन शाळा. एक इंग्रजी माध्यमाची तर दुसरी मराठी. मधल्या सुट्टीत मुलं मैदानावर खेळताना दिसतात. इंग्रजी माध्यमाच्या मुलांच्या अंगावर शुभ्र, परीटघडीचा सदरा, तपकिरी पायघोळ विजार, गळ्यात त्याच रंगाचा टाय आणि पायात चकचकीत बूट. मराठीच्या मुलांची खाकी अर्धी विजार. पांढरा सदरा. पायात चपला. हा फरक का? आपण इंग्रजी भाषा 'माध्यम' म्हणून घेतोय की, मुलांना साहेबी थाटाची संस्कृतीही शिकवायची आहे? भाषा सराव व्हावा म्हणून पालकांनी मुलांशी इंग्रजीत संवाद करावा, असं सांगितलं जातं. आजकाल तर खेड्यापाड्यातही इंग्रजी माध्यमाच्या शाळा निघाल्यात. त्या निरक्षर, भाबड्या पालकांनी काय करायचं? मूल इंग्रजी शाळेत घातलं, म्हणजे तो मोठा साहेब होणार. आपली परिस्थिती बदलणार, अशी आशा बाळगून बिचारे खस्ता काढीत राबत असतात. न परवडणारी फी भागवताना त्यांच्या नाकीनऊ येतात. काही घरात तर मुलगा इंग्रजी माध्यमात आणि मुलगी मराठी शाळेत. मुलांचा गणवेश भारी, मुर्लीचा साधा. मुलगा-मुलगी असा भेदभाव तर झालाच; पण इंग्रजीचा थाट पाहून बालमनात एकप्रकारची न्यूनगंडाची भावना वाढीस लागते. तिथूनच स्वभाषेचा तिटकारा, अढी निर्माण व्हायला लागते.

इंग्रजी माध्यमाचं स्तोम माजल्यानं मराठी शाळा रोडावल्या. मागोमाग दर्जाही घसरत गेला. हे वास्तव आहे. दुसरीकडे इंग्रजी शिकविणाऱ्या शिक्षकांचं त्या भाषेवर प्रभुत्व असतं, असंही नाही. काहीसा शहरी भाग वगळता, ग्रामीण भागातलं चित्र चांगलं नाही. आडातच नसेल, तर पोहऱ्यात कुठून येणार? आधीच मातृभाषेपासून तुटलेल्या मुलांना इंग्रजीतही धड व्यक्त होता येत नाही. 'घर का ना घाट का' अशी अवस्था. या दोलायमान स्थितीत मुलांनी ललित-साहित्य वाचून त्यात कसं काय रमावं? बालसाहित्य म्हणजे मूलभूत शिक्षणाचा पाया आहे.

भाषेवर अशी वेळ आलेली असली, तरीही वेळ गेलेली नाही, असा आशावाद बाळगू या. जशी एखादी जुनी मूर्ती घासूनपुसून तिच्यावर साचलेली वर्षानुवर्षांची पुटं काढून स्वच्छ केली जाते, तीच बाब भाषेबद्दल करता येईल. मराठीला मूळ सौंदर्य प्राप्त होऊ शकेल. त्यासाठी वर उल्लेख केलेल्या चुका सुधारण्याचा ध्यास मराठी बांधवांनी घ्यायला हवा. कमीतकमी मुलांसाठी लिहिणाऱ्यांनी तरी अत्यंत जाणीवपूर्वक लेखन करायला हवं. मग कुठल्याही भाषेचा कितीही रेटा बसला, तरी पीछेहाट न होता मराठी भाषा बहरतच राहील!

(लेखक बालसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत.)



परिसंवाद : युवकांना वाचनाकडे कसे वळवावे?

जेन झी नावाने ओळखली जाणारी तरुण पिढी काही वाचन करते का, हा संशोधनाचा आणि चर्चेचा विषय आहे. याबाबतची सद्य:स्थिती आणि युवकांना वाचनाकडे वळवायचे असेल, तर काय करणे अपेक्षित आहे, याची मांडणी या परिसंवादात डॉ. वैभव आत्माराम ढमाळ आणि डॉ. निर्मोही फडके यांनी केली आहे.



डॉ. वैभव आत्माराम ढमाळ
मो.: ९९२१९६८६८६

आणि ग्रंथोपजीविये: ग्रंथ हेच जीवन व्हावे

वाचन ही केवळ एक उपयुक्त सवय नसून मनुष्यत्वाचा विकास साधण्याची क्षमता निर्माण करणारे प्रभावी व महत्त्वपूर्ण माध्यम आहे, हे मुलांच्या मनावर बिंबवायला हवे. वाचन हे आपल्या कल्पनाशक्तीला पंख देते, आत्मपरीक्षणाची क्षमता निर्माण करते आणि स्वतःच्या भावविश्वाशी संवाद साधायला शिकवते. यासाठी काही नव्या गोष्टी पालक, शिक्षक, लेखक, प्रकाशक आणि वाचनाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना कराव्या लागतील.

आजची तरुणाई चोखंदळ आहे. त्यांना बऱ्या वाईटाची जाणही आहे. उत्तम संगीत ऐकणे, सृजनात्मक काम करणे, चौकटी बाहेरचा विचार करणे, प्रयोगशील नाटक व सिनेमा उचलून धरणे, निवडक परंतु उत्तम वाचणे अशा अनेक गोष्टी ते करत असतात; परंतु समाज माध्यमांचा भडिमार हा त्यांच्या वाचनातील गांभीर्य व सातत्य यांच्यामध्ये बाधा निर्माण करत आहे. शिवाय तरुणाईने भरपूर पुस्तके वाचायला हवीत, या विषयाला देखील मर्यादा येऊ लागल्या आहेत. आजची पिढी म्हणजे जेन झी आणि जेन अल्फा ही माहिती तंत्रज्ञान आणि समाज माध्यमांच्या महासागरात जन्मलेली आणि सूर्याच्या किंवा ट्यूबच्या प्रकाशापेक्षा मोबाइलच्या प्रकाशात वाढलेली पिढी आहे. या जेन झी आणि जेन अल्फाचा दिवस सुरू होतो, तो मोबाइलच्या सोबतीने आणि तोच रिल्सरूपी अंगाईगीत गात दिवसाचा शेवट करतो. दिवसभराचा सवंगडीही तोच. अनेकविध संभाषणाची माध्यमे, आभासी जगाच्या अमर्याद सीमा, गेमिंगचे अद्भुतरम्य जग, इंटरनेट वरील कॉन्टेन्ट आणि सर्वांना जोडणारा ५/ फाईव्ह जीचा अति वेगवान डेटा स्पीड.... अशा काळातील या पिढीला पुस्तक हे थोडे दूरचे व संथ माध्यम वाटू शकते.

'ब्रेन रॉट'

परंतु त्यांना हे ठामपणे सांगण्याची वेळ आता आली आहे की, त्यांचा हा वेग आणि माहितीचा / कॉन्टेंन्टचा भडिमार 'ब्रेन रॉट' शिवाय दुसरे काहीही देणार नाही. हा वेग त्यांच्या बुद्धी व मनाच्या अफाट / अमर्याद शक्तींना फार संकुचित करत आहे, अपंगत्व आणत आहे, याची जाणीव करून दिली, तर ही पिढी पुन्हा एकदा वाचनाकडे, साहित्याकडे वळवता येईल. वाचन ही केवळ एक उपयुक्त सवय नसून मनुष्यत्वाचा विकास साधण्याची क्षमता निर्माण करणारे प्रभावी व महत्त्वपूर्ण

नोंद

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९२४ मध्ये सातारा शहरामध्ये छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस नावाचे छात्रालय सुरू केले. धनिणीची बाग म्हणून हे छात्रालय ओळखले जाते. कमवा व शिका या योजनेद्वारे स्वावलंबनाचे आणि शिस्तीचे संस्कार या छात्रालयातील विद्यार्थ्यांवर केले जाऊ लागले. महात्मा गांधी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले होते.

माध्यम आहे, हे मुलांच्या मनावर बिंबवायला हवे. वाचन हे आपल्या कल्पनाशक्तीला पंख देते, आत्मपरीक्षणाची क्षमता निर्माण करते आणि स्वतःच्या भावविश्वाशी संवाद साधायला शिकवते. त्यामुळे आता नव्या पिढीला पुन्हा एकदा वाचनाच्या सवयीला जवळ करावे लागणार आहे, याची नितांत आवश्यकता जाणवत आहे. यासाठी काही नव्या गोष्टी पालक, शिक्षक, लेखक, प्रकाशक आणि वाचनाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना कराव्या लागतील.

ग्रंथ हेच जीवन व्हावे

पसायदानाच्या आठव्या श्लोकामध्ये ग्रंथाचे मानवाच्या जीवनातले अनन्यसाधारण महत्त्व आणि आवश्यकता सांगताना माउली परमेश्वराकडे श्रोते आणि वाचकांच्या कल्याणाची मागणी करतात.

''आणि ग्रंथोपजीविये विशेंषीं लोकीं इये।
दृष्टादृष्ट विजयें होआवें जी।।८।।''

म्हणजेच उत्तम ग्रंथ, पुस्तके हेच आपले जीवन होऊन जावे. जीवनाचे सार, सर्वोच्च साध्य काय आहे, हे सांगणाऱ्या साक्षात्कारी ग्रंथांचा आम्हाला प्रत्यय येवो. संतवाणी, पुस्तके आणि वैविध्यपूर्ण साहित्य संपदा यांची आपल्याला फार समृद्ध परंपरा लाभली आहे. या समृद्ध परंपरेची ओळख पुन्हा करून देणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. हनुमंताला ज्याप्रमाणे आपल्या दैवी शक्तींचा एका क्षणी विसर पडला होता, तशीच काहीशी आजच्या तरुणाईची आणि समाजाची स्थिती झालेली आहे. जांबुवंताने जशी हनुमंताला त्याच्या अपार शक्तींची जाणीव करून दिली, तसेच कर्तव्य आता जाणत्या लोकांना पार पाडावे लागणार आहे. या कामी सर्वप्रथम पालक, शिक्षक, साहित्य चळवळीत काम करणारे कार्यकर्ते या सर्वांनी आपल्या व्यक्तिगत जीवनामध्ये पुस्तकांचा सहभाग हा अधिक प्रमाणात वाढवायला हवा आणि तोच विचार शक्य तितक्या अधिक माध्यमांतून तरुणाईपर्यंत पोहोचवायला हवा.

कुल आणि ट्रेंडी गोष्टी

आताची पिढी ही कुल आणि ट्रेंडी गोष्टींना लगेच समर्थन देते व मनापासून अमलात आणते. जेव्हा एखादे पुस्तक त्यांच्या वयाला, विचाराला व आवडीला साजेसे असते, अशा पुस्तकाकडे ते लवकर व सहज आकर्षित होतात. याबरोबरच 'सोशल मिडिया इन्फ्लुएंसर्स' या कामी अधिक उपयुक्त ठरू शकतील. लेखक व प्रकाशन संस्थांनी या सोशल इन्फ्लुएंसर्सची मदत घेऊन सर्व प्रकारच्या समाज माध्यमांवर नवी पुस्तके, नवे लेखन प्रयोग, लिहिणाऱ्या तरुणांच्या मुलाखती यांसह विविध संकल्पना राबवून तरुण वाचकांचे लक्ष पुस्तकांकडे वेधण्यासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे. बदलत्या जगाचा हा मार्ग आपल्याला देखील चालावा लागेल.

पुस्तकांचे कपाट असावे

प्रत्येक घरामध्ये एक पुस्तकांचे कपाट जरूर असावे. पालकांच्या हातात मोबाइल बरोबरच अधिक वेळा पुस्तक दिसावे. पालक-शिक्षक व तरुणाई यांच्यात वाचलेल्या पुस्तकांवर सातत्यपूर्ण संवाद व्हायला हवा. शाळा व महाविद्यालये विविध डेज आयोजित करतात. त्यात 'बुक डे' असावा. 'रीडर्स डे'देखील असावा. शाळेत लायब्ररी पिरियड असायलाच हवा, अवांतर वाचन आणि पुस्तक चर्चा यांना ठरावीक गुण असावेत. फिरती वाचनालये, मोठ्या ग्रंथालयांच्या सहली, वाचन कट्टे, प्रथितयश लेखकांच्या प्रत्यक्ष भेटी असे उपक्रम काटेकोरपणे आयोजित केल्यास चांगला फरक दिसेल.

शॉर्ट व्हिडिओज

मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये पुस्तकांची ओळख करून देणारे, आकर्षक पोस्टद्वारे पुस्तकांविषयी जिज्ञासा निर्माण करणारे शॉर्ट व्हिडिओज नव्या पिढीला उपयुक्त ठरू शकतात. नवी पिढी ही तंत्रज्ञानाशी एकरूप झालेली आहे, त्यामुळे त्यांना सहजगत्या हाताशी असणाऱ्या माध्यमातून साहित्य उपलब्ध झाले... उदाहरणार्थ ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, किंडल, स्टोरी टेल किंवा मराठी ई-लायब्ररी सारखी साधनं वापरून त्यांना डिजिटल माध्यमातून वाचनाकडे वळवता येणे सहज शक्य आहे. प्रवास करताना, व्यायाम करताना किंवा झोपण्यापूर्वी पुस्तक वाचणं किंवा ऐकणं ही आता नव्या काळातील वाचनाची परंपरा बनत आहे; परंतु त्याचा वेग व आवाका सीमित आहे. तो वाढवायला हवा.

पाश्चात्त्य वाचनसंस्कृती

या संदर्भात मराठी भाषेबाहेरील व पाश्चात्त्य जगतातील आणखीही काही उदाहरणे आपल्याला पाहता येतील कारण पाश्चात्त्य जीवनशैली, विचार प्रक्रिया, समाज माध्यमे इत्यादींचे अनुकरण करणाऱ्या आपल्या तरुणाईला हे सांगायला हवे की, पाश्चात्त्य जगात वाचन

नोंद

वाईपासून २ कि.मी. अंतरावर पाचगणी घाटात रेशीम उत्पादन केंद्र आहे. या केंद्रात रेशीम धागा तयार केला जातो. तसेच जिल्ह्यातील रेशीम उद्योग विस्तार योजनांची कामे केली जातात. पर्यटकांसाठी येथे एका मार्गदर्शकाची नेमणूक केली आहे. येथे ८ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड असून त्यावर रेशीम किडे पोसले जातात. या किड्यांच्या कोशापासून धागा काढला जातो. येथील रेशीम कापड स्वस्त दरात विकत मिळते.

चळवळीविषयी प्रचंड सजगता आहे. तेथील लहान मुले, तरुणाई, व्यावसायिक वर्ग हा पुस्तकांसोबतच मोठा होतो.

ओप्रा विम्फ्रे या शतकातील सर्वाधिक प्रभावशाली महिलांमधील एक अग्रगण्य नाव आहे. टेलिव्हिजन आणि मीडिया जगतात त्यांचे फार मोठे काम आहे. या प्रचंड मोठ्या क्रांतीचं श्रेय त्या पुस्तकांना देतात. हे श्रेय देताना त्या म्हणतात, "Books were my personal path to freedom." अत्यंत प्रतिकूल जीवनात त्यांनी पुस्तकांना आपलेसे केले. त्यांनी सुरू केलेल्या ओप्रा 'बुक क्लब'ला जगभरातून प्रतिसाद मिळतो. त्यांच्या विविध कार्यक्रमांमधून त्या आवर्जून नव्या, उत्तम पुस्तकांविषयी बोलतात. अशी पुस्तके हातोहात बेस्ट सेलर होतात. त्यांनी एकूण अमेरिकन वाचन संस्कृतीच्या संवर्धन व विकासासाठी अनेक उपक्रम सुरू केले. विविध वयोगटांतील मुलांनी शाळेत व सुट्ट्यांच्या दरम्यान निश्चित स्वरूपाचे वाचन केले पाहिजे अशी व्यवस्था करून त्यांनी ALA's असोसिएशन फॉर लायब्ररी सर्विससारख्या संस्थांच्या माध्यमातून वाचन संस्कृतीला मुलांपर्यंत जोडण्याचे काम केले आहे. अमेरिकेतील हजारो लायब्ररीयन्स हे १९९६ सालापासून ओप्रा बुक क्लब या संस्थेशी जोडले गेले आहेत. प्रकाशकांमार्फत वर्षाकाठी दहा हजारांहून अधिक पुस्तके या बुक क्लबला पुरवली जातात व ही पुस्तके विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांमधील ग्रंथालयांना पाठवली जातात. वाचनसंस्कृती वृद्धिंगत करायची असेल, तर आपल्यालाही अशा प्रकारचे उपक्रम राबवावे लागतील.

टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क तरुणपणी दिवसाकाठी दहा तास वाचन करायचे. ते पुस्तकांसोबतच मोठे झाले. त्याचबरोबर मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स आजच्या काळातही प्रत्येक आठवड्याला एक नवे पुस्तक आवर्जून वाचतात. वर्षभरामध्ये किमान ५० पुस्तके वाचून झालीच पाहिजेत, असा त्यांचा स्वतःविषयी दंडक आहे. ज्या फेसबुक आणि इंस्टाग्राम वर आजची तरुणाई आपला सर्वाधिक वेळ खर्च करते, त्यांचा संस्थापक-सीईओ मार्क झुकेरबर्ग हा जगातील अति श्रीमंतांच्या यादीमध्ये वरच्या क्रमांकावर आहे. विद्यार्थी तरुण-तरुणी हे मार्कने निर्माण केलेल्या फेसबुक / इंस्टाग्रामवर असताना तो स्वतः मात्र पुस्तकांचे मोठेपण व वास्तव जीवनातले वाचनाचे महत्त्व मान्य करत असे म्हणतो,

"I have vowed to read one book every other week, with an emphasis on learning about different cultures, beliefs, histories and technologies. Books allow you to fully explore a topic and immerse yourself in deeper way than most media today. I am looking forward to shifting more of my media died towards reading books."

आपल्याकडचे उत्तम उपक्रम

अमृत देशमुख हे 'द बुकलेट गाय' हा उपक्रम फार सुरेख पद्धतीने राबवतात. तसेच डॉ. आशुतोष जावडेकर यांचा 'बुक ब्रो' हा कमालीचा प्रभावी प्रयोग आहे. आपल्या शंभराव्या भागाकडे वाटचाल करणारा उत्तमोत्तम पुस्तकांविषयीचा आणि साहित्यिकांच्या गप्पांचा हा यू-ट्यूबवरील कार्यक्रम कमालीचा सुरेख आहे. या प्रयोगांकडे तरुणाईने पाहायला हवे. मराठी सिनेमा, नाटक, संगीत क्षेत्रातील काही सेलिब्रिटी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवरून पुस्तकांबाबत बोलतात, कार्यक्रम करतात. या सर्व गोष्टी आशावादी आहेत. यांचे प्रमाण अधिकाधिक वाढायला हवे.

आपल्याकडेही अशा प्रकारचे उपक्रम होत असतात; परंतु असे काम करणाऱ्या संस्थांची संख्या फार कमी आहे. शिवाय भाषा, प्रांत व विद्यार्थ्यांची प्रचंड मोठी संख्या ही आव्हाने आपल्याला पार करावी लागतील. पुण्याच्या प्रदीप लोखंडे यांच्या 'ज्ञान की लायब्ररी' सारख्या उपक्रमामुळे आशावाद निर्माण होतो. त्यांच्या 'रुरल रिलेशन्स' या संस्थेने 'ज्ञान की लायब्ररी' या उपक्रमाच्या माध्यमातून ६१२४ पुस्तक संचांचे ग्रामीण तथा निमशहरी भागांमध्ये वाटप केले आहे. या उपक्रमातून १४,३५,००० हून अधिक पुस्तके विद्यार्थी/शाळा यांच्याकडे पोहोचली आहेत. श्री. लोखंडे सर यांच्या संस्थेप्रमाणे काम करणाऱ्या इतरही अनेक संस्थांना लोकसहभागाचे व राजकीय इच्छाशक्तीचे पाठबळ लाभले, तर त्या अधिक व्यापक काम करू शकतील.

वाचन चळवळीचे कॅटेलिस्ट

याच जेन झी आणि जेन अल्फा वयोगटातील मुला-मुलींना या वाचन संस्कृतीच्या चळवळीमध्ये कॅटेलिस्ट / उत्प्रेरक म्हणून सामील करून घ्यायला हवे,

वाई शहरापासून चार मैलांवर वायव्य दिशेला पांडवगड आहे. चौकोनी आकाराचा माथा असलेला हा गड आहे. पन्हाळ्याचा शिलाहार राजा भोज याने इ.स. १२०० च्या दरम्यान हा किल्ला बांधला. गडावर जाण्यासाठी पहिला डोंगर चढून दुसरा उंच डोंगर चढावा लागतो. वाटेत विहिरी आहेत. पायवाट अरुंद व धोक्याची आहे. माथ्यावर पाण्याची अनेक तळी आहेत. पडलेल्या वाड्याच्या मध्यभागी पांडजाई देवीचे व दुसरे एक अशी देवीची दोन मंदिरे आहेत.

नोंद

कारण या पिढीला स्वतःच्या पिढीकडून एखादी गोष्ट सांगणे फार सोपे असते. त्याचबरोबर त्यांच्या आधुनिक जीवनाचे प्रतिनिधित्व करणारे जे प्रभावशाली व्यावसायिक आहेत, त्यांनादेखील हा तरुण वर्ग फॉलो करतो. अशा सुप्रसिद्ध व्यक्तींच्या यशोगाथा त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायला हव्यात. नवतरुण तरुणींसाठी तो प्रेरणेचा व दिशादर्शनाचा महत्त्वाचा स्रोत असतो. त्यांना हे कळायला हवे, की त्यांच्यासाठी जे लोक व्यावसायिक, आर्थिक, सार्वजनिक जीवनामध्ये खूप महान आहेत, अशा दहापैकी नऊ महान व्यक्ती त्यांच्या यशाचे श्रेय वाचनाला देतात. पुस्तकांना देतात.

आवड आणि निकड

वाचनाची आवड आणि वाचनाची निकड या दोन गोष्टींचा देखील आपण विचार करायला हवा. याचे कारण म्हणजे नव्या पिढीला वाचनाची आवड ही खरंतर बाल अथवा कुमारवयापासूनच लावायला हवी कारण नंतरच्या काळात ही सवय लागू शकते; परंतु त्याचे गांभीर्य आणि सातत्य किती असेल हे पुढील काळच ठरवतो. शालेय अथवा महाविद्यालयीन जीवनामध्ये वाचनाची सवय खोलवर मुरवता येणे सहज शक्य आहे. सुरुवातीच्या काळात कदाचित मुलांना त्याचे महत्त्व जाणवणार नाही; परंतु भविष्यातील विविध टप्प्यांवर आपोआप आपल्या लक्षात येते, की उत्तम लेखक व पुस्तकं आपल्याला अदृश्य रूपाने सोबत करत राहतात.

वाचनाची निकड ही मात्र आपण त्यांना कोणत्याही वयोगटांमध्ये समजावून सांगू शकतो. तंत्रज्ञानाच्या या युगात तरुणांचा भावनिक व मानसिक बुद्ध्यांक वाढणे त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे, हे आपण त्यांना गांभीर्याने समजावून सांगायला हवे. स्वानुभवाने प्रत्येकजण शिकत असतोच; परंतु अनुभव हा फार कठोर शिक्षक असतो. काहीतरी किंमत मोजल्याशिवाय स्वानुभव प्राप्त होत नाही. कधी कधी फार मोठी किंमत चुकवावी लागते. म्हणूनच पुस्तकांमधून सहज व मुबलक प्रमाणात मिळणारे अनुभव जर आपण आत्मसात केले, तर दुसऱ्यांच्या अनुभवाने येणारे शहाणपण फारच लाभदायक असेल, हे नक्की! सगळेच अनुभव मिळतील आणि जीवन सोपे होईल असे कधीच नसते, कारण प्रत्येकाची कोडी निराळी असतात. ती ज्याची त्यानेच आपापल्या कौशल्याने सोडवायची असतात. जीवनातल्या कोड्यांचे, अडचणी सोडवण्याचे निश्चित असे फॉर्म्युले नसतात. ग्रंथ जीवनातल्या प्रश्नांकडे पाहण्याची नवी दृष्टी देतात, हे मात्र नक्की. अनेकदा तुमच्या-माझ्या प्रश्नांची थेट उत्तरेदेखील साहित्यात सापडतात. प्रश्न सोडवण्यासाठी लागणारे कौशल्य विकसित करायचे असेल, तर पुस्तकांना पर्याय नाही. हे कुमारवयीन व तरुण युवक युवतींच्या मनावर ठसवायला हवे.

तरुणाई अगदीच वाचत नाही असे नाही. ते त्यांचे वय, आवडीनिवडी आणि त्यांच्या विचारप्रक्रियेशी नाते सांगणाऱ्या साहित्याकडे अधिक आकर्षित होतात. त्यांच्या आवडीचे साहित्य प्रकार त्यांना उपलब्ध करून नंतर वाचनाची बैठक पक्की झाल्यावर त्यांना अभिजात मराठी साहित्याकडे वळवणे अधिक सोपे आहे. वाचणारे पालक, संवेदनशील आणि अभिनव पद्धतीने लेखन करणारे लेखक, उपक्रमशील साहित्य चळवळीतील जेन झी कार्यकर्ते अशा सर्वांचीच मराठीच्या आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही एकत्रित जबाबदारी आहे.

वाचणारा युवक वर्ग आणि वाचनापासून दुरावलेल्या तरुणाईचा आकडा यामध्ये फार मोठे अंतर आहे. म्हणून या विषयाची चर्चा करणे अत्यावश्यक ठरते. तरुण पिढी वाचत आहे हे नक्की, मात्र त्यांची संख्या फार कमी आहे. ती अधिकाधिक असावी, यासाठी हा लेखन प्रपंच.

(लेखक भारती विद्यापीठ, पुणे येथे सहयोगी प्राध्यापक आहेत.)

नोंद

वाई शहराच्या आग्नेय दिशेला ८ कि.मी. अंतरावर वैराटगड आहे. हा गडही पन्हाळ्याच्या शिलाहार राजाने बांधला आहे. गडावर जाण्यासाठी रस्ता अरुंद व कच्चा आहे. गडावरचा सपाट भाग थोडा रुंद आहे. गडावर काही चोरवाटा आणि चोरघरे आहेत. आणीबाणीच्या प्रसंगी दडून राहण्यासाठी याचा वापर केला जात असे. या गडावर एक वैशिष्ट्यपूर्ण असे तळघर आहे. जमिनीच्या आत असलेले हे तळघर अतिशय विस्तृत आहे. हे भुयार २०० फुटांपेक्षा जास्त लांब आहे.



डॉ. निर्मोही फडके
ठाणे
मो.: ९९२०१४६७११

समन्वय महत्त्वाचा

प्रस्तुत परिसंवादाचा विषय हा वर्तमान परिस्थितीत निवळ चर्चाच नव्हे, तर कुत्सितपणे चर्चा अशा प्रकारचा झाला आहे, असे काहीसे नकारात्मक विधान लेखाच्या आरंभीच नमूद करत असले, तरी त्याबाबत भाबडी सकारात्मकता न ठेवता थोडक्यात काही ठोस मांडणी इथे करत आहे.

'युवकांना वाचनाकडे कसे वळवावे' विषयाच्या शीर्षकातील 'युवक' आणि 'वाचन' ही पदे, तसेच 'कसे वळवावे' ही कृतीयुक्त पदे आपापल्या जागी सशक्त आहेत. त्यांना एकत्रित आणण्याचा घाट आपल्याला घालायचा आहे, हे महत्त्वाचे. इथे 'आपण' ह्या सर्वनामात समाजातील पालक, शिक्षक, संस्थाचालक, साहित्य-कलाप्रेमी, विद्वान इ. मंडळी आणि प्रशासन, राजकारण, समाजकारण, कॉर्पोरेट इ. क्षेत्रांतीलही मंडळी अशी सगळीच माणसे अंतर्भूत आहेत.

'छत्रपती शिवाजी महाराज' किंवा 'संत ज्ञानेश्वर' प्रभृती जन्माला याव्यात; पण त्या दुसऱ्यांच्या घरात, तद्वतच मराठी किंवा अगदी इतर भाषांमधील पुस्तके जरूर विकत घ्यावीत, वाचावीत; पण ती दुसऱ्यांनी, दुसऱ्यांच्या घरात आणि दुसऱ्यांच्याच मुलांनी; अशी काहीशी सध्याची परिस्थिती आहे. कारण आज आपण ज्यांना 'युवक' ह्या वयोगटात मोजतो, पाहतो ती मुले आहेत १८ ते २३ ह्या वयोगटातील. म्हणजे २००१ नंतर जन्माला आलेली. आज जी स्वतःला 'जेन झी' म्हणवून घेत आहेत. नव्या सहस्त्रकाच्या पहाटेला जन्माला आलेली जगभरातील ही एकूणच पिढी हाताच्या मुठीत खुळखुळे किंवा तत्सम खेळणी नव्हेत, तर वेगवेगळे मोबाइल घेऊनच वाढू लागली.

मराठी माध्यमांच्या शाळांना हादरे

महाराष्ट्रापुरते आणि मराठीपुरते बोलायचे तर, त्याच सुमारास म्हणजे साधारण २००७ नंतर मराठी माध्यमांच्या शाळांनाही हादरे बसू लागले, ज्यांची पद्धतशीरपणे गेल्या वीस वर्षांत करवली गेलेली पडझड आपण 'याचि देही, याचि डोळा' बघत आलो आहोत. परिणामतः आज 'युवावस्थे'त असलेल्या पिढीला, त्यांच्या मराठीत किंवा सेमीमराठीत किंवा मराठीच वातावरणातल्या इंग्रजीत शिकलेल्या पालकांनी टप्प्याटप्प्याने आधी इंग्लिश, नंतर कॉन्हेंट, नंतर दिल्ली बोर्ड आणि २०१२ नंतर

वाई तालुक्यात कमळगड हा एक वैशिष्ट्यपूर्ण असा एक गड आहे. खाली निळे पाणी आणि वर निळे आकाश यांच्यामध्ये कमळगड शोभून दिसतो. या गडाला कोणतेही बांधकाम नाही. या गडाचे बांधकाम मुद्दाम कोणी केले असेल, असे प्रथमदर्शनी दिसत नाही. या 'गडालाच नवरा नवरीचा डोंगर' असेही म्हणतात.

नोंद

आंतरराष्ट्रीय बोर्डांच्या शाळांमध्ये घातलं. ही चढती भाजणी भोवताली सहज डोळ्यांना दिसणारी आणि डोक्याला कळणारी आहे; पण दिसून आणि कळून, आम्ही हतबुद्ध असल्यासारखे झालो, हेही तितकंच खरं. अशी ही मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीय इंग्लिशविंग्लिश माध्यमांतील, सर्वसाधारणपणे परदेशीच जाण्याचे स्वप्न उराशी बाळगलेली, कृत्रिम बुद्धिमत्तेचाच सर्वथैव वापर करणारी सध्या युवावस्थेत असलेली पिढी हे एक चित्र आहे. तर दुसरे चित्र आहे, गेल्या पंचवीस वर्षांत गाव ते शहर असा प्रवास करत आलेल्या महाराष्ट्रातल्या अनेक गावांमधील युवकांचे. गावागावांमध्येही मराठीच्या जोडीने इंग्लिश शाळा निघाल्यामुळे 'इंग्लिश म्हणजे प्रगती' हाच ध्यास घेतलेली, महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय शेतकरी ते सधन साखर कारखानदार अशा तमाम जनतेची मुले त्या शाळांमध्ये जाऊ लागली. तिसरे चित्र आहे, मुंबई ते कोकणातील एखादे खेडे येथील. जिथे कष्टकऱ्यांनाही आपल्या मुलांनी फाडफाड इंग्लिश शिकावे असे वाटू लागले. चौथे चित्र आहे, गेल्या दोन-अडीच दशकांत महाराष्ट्रात आलेल्या परप्रांतीय नागरिकांच्या मुलांचे. मातृभाषा मराठी नसल्यामुळे आणि इंग्लिशशिवाय पर्याय नसल्यामुळे साहजिकच त्यांच्यासाठी इंग्लिश माध्यमच उरले. आणखी एक चित्र आहे, महाराष्ट्रातील अशा समाजाचे, जो दारिद्र्यरेषेखालीही तळाशी आहे. हातावर पोट घेऊन जगत आहे. अशा वर्गांतील बालकांसाठी शाळा हे काही वर्षांपूर्वी एक स्वप्नच होते. ती बालके आता युवावस्थेत मुंबई-पुण्यात मिळेल ती रोजंदारी करत आहेत. अशी ही सध्याच्या महाराष्ट्रातील युवा पिढीची काही परिस्थितीजन्य चित्रे. ह्यांमध्ये आणखीही काही चित्रांची सरमिसळ होऊ शकते. टक्के कमी-जास्त होऊ शकतात.

विविध रंगातील युवा

अशा ह्या विविध सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक रंगांच्या चित्रांतील पालकांची मुले आज युवावस्थेत आपल्याला भोवताली दिसत आहेत.

प्रस्तुत परिसंवादात ज्या युवा पिढीचा उल्लेख झाला आहे, त्यांची ही पार्श्वभूमी आहे. हे घडाभर नमन ह्यासाठी की, ही पार्श्वभूमी आणि वाचन प्रक्रिया ह्यांचा अन्योन्य संबंध आहे. विषयाच्या दृष्टीने पार्श्वभूमी जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. 'वाचन' ही शिक्षण प्रक्रियेतील



महत्त्वाची क्रिया आहे. सर्वसाधारण शारीरिक क्षमता असणारे बालक हे शालेय जीवनात 'वाचन' क्रिया आत्मसात करते. इथे 'भाषा' महत्त्वाची ठरते. संवाद आणि श्रवण ह्या क्रियांमधून बालक एकापेक्षा अधिक भाषा ग्रहण करू शकते; पण वाचन कौशल्य आणि पर्यायाने भाषा कौशल्य, सर्जनशीलता, भावनिक, वैचारिक वाढ ह्या दृष्टीने पुस्तकांचे वाचन महत्त्वपूर्ण ठरते. ही पुस्तके शालेय विषयांना पूरक आणि अवांतर विषयांची माहिती देणारी असणे आवश्यक असते. इथे शाळेतल्या भाषा-माध्यमाचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. आजची युवा पिढी ही शाळेत अधिकाधिक टक्के इंग्लिश माध्यमातून शिकलेली आहे, हे वास्तव आहे. ते आपण स्वीकारायलाच हवे. त्यामुळे, ती मराठी साहित्यातील कथा, कविता, कादंबऱ्या बैठक मारून वाचतीलच, हा भाबडा आशावाद ठेवण्यात अर्थ नाही. कदाचित तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'किंडल' तत्सम वाचत असतील; पण तेही प्रमाण कमीच आहे.

तरुण पिढी काय वाचते?

मग ही पिढी वाचते का, काय वाचते, कशी वाचते, का वाचते, नसेल, तर काय करायला हवे? अशा

नोंद

साताऱ्याचा अजिंक्यतारा हा मोठा किल्ला 'मंगळाईचा डोंगर' म्हणून देखील ओळखला जातो. अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशीच सातारा शहर वसले आहे. किल्ल्याची उंची ९०० फूट आहे. लांबी व रुंदी अनुक्रमे ३५००X२००० फूट आहे. या किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. त्यांपैकी महाद्वार उत्तर दिशेला आहे व दुसरा दरवाजा दक्षिण दिशेला आहे. येथील तटाची उंची साधारण १५ फूट असून रुंदी १० फूट आहे.

प्रश्नांच्या उत्तरांतूनच आपल्या विषयाचे काही प्रमाणात उत्तर मिळू शकेल.

आज जी आधुनिक शहरी, निमशहरी भागातील युवा पिढी आहे. विशेषतः महाविद्यालयीन त्यांच्यामध्येही एक उत्तम वाचक वर्ग निर्माण झाला आहे. तो जास्तीतजास्त इंग्लिश भाषेतील लेखन वाचतो. जागतिक पातळीवरचे आणि इतर परकीय भाषांमधील अनुवादित इंग्रजी साहित्य वाचतो. त्यांना फिक्शन आणि अधिक प्रमाणात 'रिअल लाईफ स्टोरीज' वाचायला आवडतात. 'हॅरी पॉटर' आणि' चिकनसूप' नी ह्याच पिढीच्या पूर्वजांना (जी आता तिशी पार करून गेलीय) एके काळी वेडे केले होते. मात्र ही पिढी 'ऑनलाईन वाचन' करणारी आहे, हे लक्षात घ्यावे. तसेच ह्या युवा पिढीतील एक वर्ग जो मोठ्या प्रमाणात आहे. असाही आहे, ज्यांना फक्त पाहायला किंवा ऐकायला आवडते. दृश्य, श्राव्य माध्यमांचा भडिमार आणि माहितीचा स्फोट सोसत मोठी झालेली, अशी ही पिढी आहे. त्यांना 'ठहराव' माहीत नाही. 'चंचलपणा'चे बाळकडूच त्यांना मिळाल्यामुळे खरेतर आपणच दिल्यामुळे ही पिढी आज ३० सेकंद ते जास्तीतजास्त ३ मिनिटे इतक्याच कालावधीपुरती स्थिर राहू शकते (३० मिनिटे म्हणजे डोक्यावरून पाणी). 'वाचणे आणि मनन-चिंतन करणे म्हणजे काय रे भाऊ', असा सवाल ही पिढी करते. आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात 'विचार करून लिहिणे म्हणजे काय रे भाऊ', अशीही परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा एका अजस्त्र प्रवाहाला पुन्हा एकदा जुन्या वळणावर वळवणे, म्हणजे प्रयत्नांची पराकाष्ठा असणार आहे.

प्रस्तुत लेखात 'पुस्तक वाचन' हा विषय मध्यवर्ती ठेवला आहे.

कृतीयुक्त आराखडे करावेत

एखादे काम करताना, त्या कामाशी निगडित अधिकाधिक कंगोरे लक्षात घेतले, तर ते काम काहीसे सहजसोपे होऊ शकते. त्यासाठी प्रयत्नांचे प्रयोग करावे लागतात. युवा पिढीला वाचनाकडे आणि अधिकाधिक मराठी वाचनाकडेही वळवण्याच्या कार्यात आधीपासूनच अनेक जण गुंतलेले आहेतच. तरीही वस्तुस्थिती लक्षात घेऊन आपल्याला वैयक्तिक, सांघिक, संस्था आणि शासन पातळ्यांवर काय करता येईल, ह्याचा ऊहापोह करणे गरजेचे आहे. त्यासाठी कृतीयुक्त आराखडेही तयार करणे आवश्यक आहे. हे काम संस्था आणि शासन पातळ्यांवर अधिक भरीव पद्धतीने होऊ शकते. ह्यासाठी काही निवडक मुद्दे, सूचना इथे मांडत आहे. त्यांपैकी काहींची अंमलबजावणी काही प्रमाणात आधी झालेली असली, तरी त्यांच्याबद्दल नव्याने विचार करण्याची गरज आहे.

इथे नमूद करत असलेले मुद्दे हे लेखाच्या चौकटीच्या मर्यादेनुसार असल्यामुळे ढोबळ आहेत. त्यांचा अभ्यासपूर्ण पद्धतीने विस्तारित विचार व्हायला हवा. ह्या मुद्द्यांमध्ये महाविद्यालयीन १६/१७ ते २२ ही युवा पिढी केंद्रीभूत आहे, कारण ह्या वयात केलेले वाचन युवावस्थेतल्या त्यांच्या पुढील टप्प्यासाठी प्रेरणादायी ठरू शकते.

निवडक मुद्दे :

* 'वाचनाचे फायदे' ह्या मूळ मुद्द्याला पूरक विचार पालक आणि शालेय विद्यार्थी त्यांच्यापर्यंत आधी पोहोचावेत. जेणेकरून आजची शालेय पिढी युवावस्थेत येईल, तेव्हा त्या विचाराची रुजुवात झाली असेल. आत्ता युवावस्थेत असलेल्यांसाठी-
* अकरावी ते पदवी ह्या शैक्षणिक वर्षांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्रीभूत ठेवून, त्यांच्यासाठी ठरावीक वेळापत्रकानुसार मराठी अभिवाचनाचे कार्यक्रम (तास) आयोजित करावेत. ज्यामध्ये उत्तम अभिवाचकांकडून उत्तमोत्तम मराठी साहित्याचे अभिवाचन होईल.
* मराठीसह हिंदी, गुजराती, इंग्रजी इ. भाषांसाठीही निवडक अभिवाचन कार्यक्रम ठेवावेत.
* विद्यार्थ्यांसाठी अभिवाचन कार्यशाळा ठेवाव्यात. सहभागी मुलांना त्यासाठी श्रेणी, प्रमाणपत्र इ. ठेवावे.
* मराठी, हिंदी, इंग्रजी एकांकिकांचे अभिवाचन, प्रयोग, एकांकिका लेखन-कार्यशाळा इ. आयोजित केल्या तर, नाट्यक्षेत्राबद्दलही रुची निर्माण होण्यास मदत होईल. मुंबई, पुणे, औरंगाबाद इ. मोठ्या शहरांत असे अनेक 'नाट्य महोत्सव, करंडक स्पर्धा' होतात; पण छोट्या गावांतील महाविद्यालयांचाही विचार व्हावा.
* ग्रंथालय तास पदवी वर्षापर्यंत सर्वांना अनिवार्य करावेत. लहान गावांतील युवकांना एशियाटिकसारखी ग्रंथालये, शहरातल्या मुलांना भिलारसारखे पुस्तकांचे गाव, विश्वकोशनिर्मिती मंडळ दाखवण्यासाठी शासन

महाराष्ट्रातील लोकप्रिय थंड हवेचे ठिकाण असलेले महाबळेश्वर हे गिरीस्थान म्हणून विकसित करण्याचे श्रेय सातारचा तत्कालीन रेसिडेंट कर्नल लॉडविक यांच्याप्रमाणे श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह राजांना देखील देण्यात येते. श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी स्वखर्चाने सातारा ते महाबळेश्वर रस्ता बांधून तो पुढे प्रतापगडापर्यंत वाढवला.

नोंद

किंवा अधिकृत स्त्रोताकडून आर्थिक मदत व्हावी.

* अनेक संस्थांकडून साहित्य-विषयक कार्यक्रम होतात. स्थानिक पातळीवर त्यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. त्यासाठी त्यांना महाविद्यालयातून (शासकीय मदतीने) जाणे-येणे खर्च, प्रमाणपत्र इ. द्यावे. उदाहरणार्थ, मुंबईत एनसीपीएकडून होणारे 'पेज टू स्टेज' हे पुस्तकाविषयी कार्यक्रम किंवा गावागावांत शासकीय ग्रंथालयांकडून होणारे साहित्यविषयक कार्यक्रम, मोफत वाचनालयांचे सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रम इ. मराठी मुशायरा हा एक कार्यक्रम युवा पिढीला कवितेकडे आकर्षित करू शकतो.
* नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इन्टिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत महाविद्यालये 'वाचू आनंदे', 'लिहू आनंदे' सारखे १५ तासांचे अभ्यासक्रम तयार करू शकतात, ज्यासाठी मुलांना श्रेणी प्रमाणपत्र मिळेल.
* लेखकांनी आपल्या सर्जनशील लेखनाव्यतिरिक्त तरुणाईसाठी म्हणून विचारपूर्वक प्रायोगिक लेखन करावे. त्यासाठी नवे तंत्र आणि मंत्र ह्यांचा वापर केल्याशिवाय पर्याय नाही.
* कथा, पटकथा, माध्यमांतर इ. प्रसारमाध्यमांतील विषय नियमित भाषा-अभ्यासक्रमात समाविष्ट केले, तर तेही विद्यार्थ्यांना साहित्य-वाचनाकडे आकृष्ट करू शकण्यास मदतनीस ठरतील.
* महाविद्यालय, कॉर्पोरेट कार्यालये, खाजगी कार्यालये, मोठी निवासी संकुले इत्यादी ठिकाणी ग्रंथालये असणे अनिवार्य करावे.
* महाविद्यालये, कॉर्पोरेट कार्यालये, खाजगी कार्यालये इ. ठिकाणी वाचक संख्या, पुस्तक संख्या, साहित्यिक कार्यक्रम इ. ची नोंदणी अनिवार्य असावी. ती तपासली जावी.
* महाविद्यालयीन युवा वाचकांना आणि लेखकांना पहिल्या वर्षाच्या रेकॉर्डनुसार शासनाकडून प्रत्येक वर्षी वाचन-लेखन करण्यासाठी विशेष अभ्यासवृत्ती जाहीर करावी. पुरस्कार ठेवावेत.
* 'लोकसत्ता वक्तादशसहस्रेषु'च्या धर्तीवर गावागावात स्पर्धा व्हाव्यात.
* आपापल्या बोलींच्या लेखनासाठी मुलांना शाळा-महाविद्यालयांनी, संस्थांनी प्रोत्साहन द्यावे.
* बोलींवर लहान लहान संशोधन-प्रकल्प करण्यासाठी प्रोत्साहित करावे. त्यासाठी शिष्यवृत्ती असावी.
* मोठ्या शहरांमध्ये आणि लहान गावांमध्येही मराठी आणि इतर भाषक युवकांसाठी खास एकत्र अनुवादित पुस्तकांचे मेळे भरवावेत. त्यासाठीही शासनाने त्यांच्या कोट्यानुसार आर्थिक तरतूद करावी.
* केवळ शासन, संस्था, महाविद्यालयेच नव्हे, तर लेखक, प्रकाशक, कलाकार इ. सगळ्यांनी ही जबाबदारी उचलायला हवी.
* ऑनलाइन वाचनाला पुस्तक वाचन हादेखील एक उत्तम पर्याय आहे, त्यांच्या वापरात समतोल असावा हे युवा पिढीच्या विचारांत रुजवणे गरजेचे आहे. कारण ऑनलाइन वाचनाची अपरिहार्यता आपण स्वीकारलीच आहे; पण त्याचे शारीरिक हानीचे तोटे युवा पिढीला जास्त प्रमाणात सोसावे लागणार आहेत.

मराठीला अभिजात भाषा दर्जा मिळाल्यामुळे आज आर्थिक गणिते बदलली आहेत. (लवकरात लवकर बदलली जावीत.) सरकारी अनुदानाचे मार्ग बऱ्यापैकी मोकळे झाले आहेत. साहित्य संमेलने फक्त अखिल भारतीयच नव्हे, तर गावशिवारांतही होत आहेत. मात्र त्यात युवा पिढी मोजकीच दिसते. खिशाला तोशीस लावून संमेलनास येणारे कमीच असतात. (आणि त्यांनी असे आर्थिक भार सोसून का यावे, हाही मुद्दा महत्त्वाचा) त्यामुळे, अशा संमेलनासाठी २० ते ३० वयोगटातील युवा वाचक, लेखक, सादरकर्ता ह्यांना जाणे-येणे-राहणे शासकीय अनुदानातून विनामूल्य केले, तर ते नक्कीच अशा संमेलनांना, नाट्यसंमेलनालाही येतील, असे वाटते. शासन आर्थिक साहाय्य करण्याबाबत सक्षम आहे. (हाही भाबडा आशावाद नव्हे. न ठरो.) तसेच गावागावांमध्ये असलेल्या धनाढ्य कुटुंबे, संस्था इ. नी देवस्थानांसारखीच ग्रंथस्थानांना किंवा साहित्य कार्यक्रमांना, विशेषतः तरुणाईच्या देणग्या, संशोधकांना शिष्यवृत्ती इ. स्तुत्य कृती केल्या, तर त्यांच्या पदरी दुहेरी पुण्यसंचय नक्कीच होईल.

वेगवेगळ्या पातळ्यांवरचे प्रयत्न

लेखाच्या प्रारंभी नमूद केल्याप्रमाणे जितक्या प्रकारांत आजची युवा पिढी विभागलेली आहे, तितक्या प्रकारचे वेगवेगळ्या पातळ्यांवरचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. मुंबईतल्या युवकांसाठी, महाविद्यालयांसाठी सर्वभाषा



पाणी पुरवठ्याबाबत छत्रपती प्रतापसिंह महाराज विशेष दक्ष होते. त्यांनी सातारजवळ यवतेश्वर देवालयाच्या मागे एक मोठा सुंदर तलाव बांधून त्यातील पाणी नळाने सातारा शहरास पुरवले होते. शहराला लागून असलेल्या महारदरा येथेही तलाव बांधून खापरीच्या नळाने त्याचे पाणी सातारा शहरात आणले होते. या सर्व सोयींसाठी एक लाख रुपये खर्च करण्यात आला होता.

वाचन अभियानासारखा प्रकल्प मुंबईजवळच्याच ठाण्यातील आदिवासी भागांत राबवून उपयोगाचे नाही. जिथे बोलींचे प्राबल्य आहे, तिथे युवा पिढीसाठी बोलींविषयीही अधिकाधिक आत्मीयता आणण्यासाठी विचार व्हावा.

करायला गेलो, तर खूप काही करता येईल, अशी परिस्थिती आहे. १३५ वर्षांपूर्वीही 'मराठी आणि एकूणच वाचन-व्यवहार' ह्याबद्दल मराठी मासिकांमधून चिंता व्यक्त झाली होती. ३५ वर्षांपूर्वीही झाली होती आणि आजही आपण त्याच विषयांवर मासिके, संमेलने, नव्या तंत्रातील पॉडकॉस्ट इ. वर त्याच विषयाबद्दल चिंताक्रांत होऊन बोलत आहोत; पण ह्याबाबतीत ठोस काम करणारे, कामही करत आहेत (काही प्रमाणात), हेही नसे थोडके. म्हणूनच 'वाचन-लेखन प्रवाहो नित्यु चालला' आहे.

तंत्रमंत्राने भारावलेल्या युवकांना पुस्तक वाचनाकडे वळवण्यासाठी मनापासून इच्छा हवी. ज्यांच्यासाठी करायचे आहे, त्यांनाही आंतरिक प्रेरणा हवी. ही प्रेरणा घर, शाळा-महाविद्यालये आणि सामाजिक, सांस्कृतिक संस्थाच अधिकाधिक प्रकारे त्यांच्यात निर्माण करू शकतात. युवा पिढीमध्ये आणि पालक-शिक्षक-संस्था-पदाधिकारी-शासन ह्यांच्यात सुसंवाद हवा. भाषाबद्दल, साहित्याबद्दल, पुस्तकांबद्दल, लेखकांबद्दल आणि एकूणच कलाव्यवहाराबद्दल सगळीकडे आदर हवा. वाचनाकडे वळणारी व्यक्ती लेखनाकडेही वळू शकते, हा विचार कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोर धरण्याच्या काळात मांडणे कितपत व्यवहार्य आहे, हा करकरीत वास्तव लक्षात आणून देणारा प्रश्न नक्कीच आहे. मात्र नेटाने प्रयत्न चालू ठेवले, तर अजूनही उराशी काही धुगधुगी घेऊन आपण उर्वरित काळ व्यतीत करू शकतो.

माध्यावर साहित्यकलेचा चंद्र घेऊन आपण आधी व्रतस्थ तपस्वी होणे गरजेचे आहे, तर आपल्यामागच्या ह्या युवा पिढीला आपण केवळ 'भाकरीचा चंद्र' नव्हे, तर 'भाकरी आणि चंद्र' असा दोन्हीचा समन्वय कसा करावा, ह्याची एक पाऊलवाट निर्माण करून देऊ शकतो.

(लेखिका मराठी भाषेच्या अभ्यासक आहेत.)





successabacus.com
success
Abacus & Vedic Maths

Success Abacus Admission
88 88 56 00 11

6 ते 14 वर्ष वयोगटासाठी उपयुक्त

Success Abacus Franchise
88 88 56 16 70

कमवा ₹ महिना 50,000 ते 60,000*

परिसंवाद : कृत्रिम प्रज्ञा आणि साहित्यिकांची सर्जनशीलता

कृत्रिम प्रज्ञेचे आव्हान इतर क्षेत्रांप्रमाणे साहित्य क्षेत्रालाही जाणवत आहे. या तांत्रिक प्रगतीमुळे लेखकांची सर्जनशीलता संकटात आली आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधणारी मांडणी या परिसंवादात डॉ. राजेंद्र माने, डॉ. केशव देशमुख, शरद तांदळे यांनी केली आहे.



डॉ. राजेंद्र माने
मो.: ८९७७९८१३२१

प्रतिभेची निर्मिती अशक्य

कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक बाबतीत माणसाला उपयोगी ठरणारी आहे, यात वाद नाही. तरीसुद्धा लेखनाच्या बाबतीतली सर्जनशीलता, सौंदर्य आणि संवेदनशीलता निर्माण करणे ही तांत्रिक बाब नाही.

नवीन तंत्रज्ञानाचे काही वेगळे प्रकार आले, की प्रथम सगळ्यांच्या मनात एक वेगळी धाकधूक असते. संगणक आला, मोबाइल आले, इंटरनेट आले ही सगळी नवीन तंत्रज्ञाने आल्यावर त्यांच्या फायद्या-तोट्यावर भरपूर चर्चा झाल्या. ते स्वाभाविक होतं. इंटरनेटमुळे माहितीचं मोठं क्षितिज विस्तारित झालं; पण ही माहिती म्हणजे सत्यज्ञान असेल याची खात्री देता आली नाही. मात्र बऱ्याच क्षेत्रांत ते उपयोगी पडले. इंटरनेट लहान मुलांच्या हातात खुले झाल्यावर मुले बिघडतील असेही बोलले गेलेच; पण आता बरीच वर्षे झाल्यावर ते आता सरावाचं झालं आहे. त्याचे फायदे लक्षात आले आहेत. त्याचा वापर कसा करायचा हे ज्याच्या त्याच्या हातात आहे. ए. आय. म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. याबाबतही थोडफार तसंच आहे. आता हा शब्द आपण वारंवार ऐकतो आहोत. बरेच जण म्हणतात, त्यामुळे मोठी क्रांती घडणार आहे कारण माणूस आणि त्यामध्ये असणारी बुद्धिमत्ता म्हणजेच शिकणे, तर्क करणे, असणाऱ्या समस्या सोडवणे, निर्णय घेणे अशी कामे ए. आय. तंत्रज्ञान करू शकेल, असं म्हटलं जातं. लगेचच सध्या मोबाइलवरसुद्धा हे वापरून वेगवेगळे फोटो, रिल्स पाहायला मिळत आहेत. जसं गुगल माहिती देतं तशीच माहिती वेगळ्या पद्धतीने यावर मिळत आहे. ते फक्त माहिती देतं असे नाही तर कथा लिहून देते, कविता लिहून देते.

अगदी वाढदिवसाला शुभेच्छा लेख, तर काही वेळा मृत्युलेखही हे ए. आय. तंत्रज्ञान लिहून देते. अर्थात ते किती चांगले, दर्जेदार याची मोजपट्टी त्याला लावता येणार नाही.

फायदे आणि तोटे

आता यातल्या फायद्या-तोट्याचे गणित मांडायचे झाले, तर ते वेगळ्या वेगळ्या पद्धतीने मांडले जाते. काहींच्या मते यामुळे लोकांचे रोजगार जाण्याची शक्यता आहे

नोंद

साहित्य संमेलन कायमच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहे. काही वेळा त्यावर टीका होते; परंतु अशा संमेलनांमुळे मराठी साहित्य अधिक प्रवाही होते आणि भाषेचा विकास घडून येतो. साहित्य संमेलन हे फक्त लेखक आणि वाचक यांचे नव्हे, तर संपूर्ण मराठी समाजाचे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे, जे मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देते.



कारण ही कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित होत गेली, तर मग हळूहळू माणसाच्या सगळ्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न यामार्फत होऊ शकेल. माणसाला माणसाची फारशी गरज उरणार नाही. काहींच्या मते काही झाले तरी भावना आणि त्याचा स्पर्श या तंत्रज्ञानामार्फत विकसित होऊ शकणार नाही, ते कोरडेपण कायमच राहील. या कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्थूलमानाने तीन प्रकार सांगितले गेले.

एक म्हणजे कृत्रिम मर्यादित बुद्धिमत्ता, यात मर्यादित फिल्टर दिले जातील म्हणजे एखादा खेळ कसा खेळायचा तेवढ्यापुरतं ते सांगू शकेल. त्यातच ते फक्त पारंगत असू शकेल. दुसरं म्हणजे कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता. यात माणसाप्रमाणे ते बौद्धिक कामात सक्षम असेल. म्हणजे ते विचार करू शकेल, तर्क करू शकेल, शिकू शकेल, परिस्थितीशी जुळवून घेऊ शकेल.

बदलत्या काळानुसार अजूनही यामध्ये हे तंत्रज्ञान विकसित होऊ शकेल, आणि तिसरं म्हणजे कृत्रिम महाबुद्धिमत्ता. हे बुद्धिमान व्यक्तींपेक्षाही जास्त बुद्धिमान असू शकेल म्हणजे एखादा वैज्ञानिक शोध लावणे, तर्क करत राहणे. अर्थात अजून हे जरी घडले नसले तरी अनेक विज्ञानकथांमध्ये कल्पनेच्या माध्यमातून हे रंगवले गेले आहे; पण ते सत्यात येणार नाही असेही नाही. यात फार खोलात शिरायचं नाही म्हटलं तरीसुद्धा सर्वसामान्य माणसांच्यामध्ये आता ए. आय. किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे आणि माहितीचे वेगळेवेगळे स्रोत त्यांच्यापर्यंत पोहोचत आहेत. मोबाइलमधून फेसबुकच्या माध्यमातून येणारे रील्स त्यात दिवसेंदिवस वेगवेगळी भर घालत आहेत.

संभ्रमाची परिस्थिती

काही वेळा यातलं खरं कुठलं आणि खोटं कोणतं याचा संभ्रम निर्माण होत आहे. कोणीतरी परवा म्हणाले 'दिलीप कुमार, देवानंद, मीनाकुमारी यांना कलाकार म्हणून घेऊन ए. आय. च्या माध्यमातून पुन्हा चित्रपट निर्मिती होऊ शकेल. ही थोडीफार सुखावणारी गोष्ट असली तरी मग नवीन कलाकार निर्माण होणार का, हा प्रश्नही यामुळे निर्माण होऊ शकेल. नवीन गीतकार, संगीतकार, कथाकार निर्माण होतील का' की ही सगळी कामे या कृत्रिम बुद्धिमत्तेकडूनच पुढच्या काळात होतील हा प्रश्नही निर्माण होऊ शकतो कारण यातून मग अर्थव्यवस्थेत, निर्मितीत फायदा होऊ शकेल! पण ही निर्मिती किती प्रतिभावान असेल हा प्रश्नही आहेच. याची उत्तरे येणारा काळ देईल, कारण हे बदल आपण थांबवू म्हणून थांबणार नाहीत हेही तितकेच खरे असले तरीसुद्धा काही प्रश्न हे उरतातच. आता प्रश्न उरतो या सर्वांमध्ये साहित्यिकांना महत्त्व उरेल का, त्यांची सृजनशीलता या नव्या तंत्रज्ञानामध्ये उतरेल का, एकंदरीत प्रतिभेला किती महत्त्व राहील पुढच्या काळात? सहज म्हणून ए. आय. वर 'पु. ल. देशपांडे यांच्या शैलीत तमासगीर बाईचे व्यक्तिचित्र लिहा' असे टाकून पाहिले त्यावर मग तमासगीर बाईची माहिती ए. आय. ने दिली त्याने प्रयत्न केला; पण पु. ल. देशपांडे यांची शैली, प्रतिभा,

मराठी साहित्य संस्कृती कशी असते हे पाहायचे असेल, तर साहित्य संमेलन चळवळीचा इतिहास आणि सध्याचे वर्तमान बघायला हवे. जगात मराठी ही अशी भाषा आहे, की फक्त तिचाच साहित्य संमेलनाचा उत्सव उदंड उत्साहात होत असतो. आज सर्वाधिक साहित्य संमेलने ही मराठी भाषेचीच होतात. तालुका, जिल्हा, विभाग, राज्य पातळीवर तर मोठ्या संख्येने संमेलने होतात.

नोंद

भाषेवर असणारे प्रभुत्व त्यात कुठेच दिसले नाही. उदाहरण द्यायचं झालं तर,

'इथे सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली' यासारखी रचना जी सुरेश भटांनी लिहिली त्यामध्ये पखालीसारखी उपमा त्यांनी दिली आहे ती त्यांच्या प्रतिभेची साक्ष आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेतून निर्माण साहित्यामध्ये अशी प्रतिभा निर्माण होणं सध्या तरी अशक्य वाटतं. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहिताना ज्या प्रतिमा वापरल्या आहेत असं लिहिणं अशक्य आहे. मराठी भाषा इतकी समृद्ध आहे म्हणजे वाट दाखवणे, वाट लावणे असे शब्द कधी लिहायचे आणि त्याचे अर्थ किती विविध प्रकारे होऊ शकतात हे सगळं या कृत्रिम बुद्धिमत्तेला झेपणार आहे का, हाही प्रश्न आहेच. एखादं नाटक लिहिताना त्यातले संवाद लिहिणे ही एक शैली असू शकते. प्रत्येक पात्राची व्यक्त होण्याची वेगळी शैली असू शकते. ही शैली ही कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण करू शकेल का? आज तेंडुलकरांची शैली, जयवंत दळवींची शैली, किंवा कुसुमाग्रजांची शैली यावरून नाटकांची एक वेगळी संवेदनशीलता सामोरी आली. ते या कृत्रिम बुद्धिमत्तेतून येणं सध्यातरी अवघड वाटतं, कारण सर्जनशीलतेचा संबंध भावनेशी आहे त्याचबरोबर प्रतिभेशीही आहे, आणि कृत्रिम प्रतिभा ही माणसाच्या किंवा मान्यवर लेखकांच्या तोडीची निर्माण होईल, असं सध्या तरी वाटत नाही. 'उगा का काळीज माझे उले, पाहुनी वेलीवरची फुले' यामागे फक्त यमक साधणे नाही, तर निर्माण झालेली भावनांची स्पंदने आणि त्याच्या मागचा असणारा उरातला एक सलसुद्धा आहे. हा सल ही माडगूळकरांची सर्जनशीलता आहे. नटसम्राटमधली कुसुमाग्रजांनी लिहिलेली स्वगते हा मराठी भाषेचा वेगळा आविष्कार आहे. त्यांच्यानंतर कुठल्या लेखकाला तो निर्माण करता आला नाही. तो आविष्कार या कृत्रिम बुद्धिमत्तेला पेलणार आहे का? प्रतिभा ही देवाघरचे देणे असते. कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक बाबतीत माणसाला उपयोगी ठरणारी आहे यात वाद नाही; पण तरीसुद्धा लेखनाच्या बाबतीतली सर्जनशीलता, सौंदर्य आणि संवेदनशीलता निर्माण करणे ही तांत्रिक बाब नाही. त्यामुळे सध्या तरी साहित्यात हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान काम करेल; पण त्यालासुद्धा मर्यादा असणार आहेतच.

दर्जात्मकतेचा प्रश्न आहेच

रोबो माणसाला मदत करत राहिला, त्याची कामे करत राहिला; पण सुखदुःखांच्या संवेदना याचं सॉफ्टवेअर त्यात कितपत काम करत राहील; हा प्रश्न आहे. आईच्या वात्सल्याचा स्पर्श तो रोबो निर्माण करू शकला नाही आणि शकणारही नाही, हे सत्य आहे. काळानुसार तंत्रज्ञान किती प्रगत बनेल हे आत्ता सांगता येणे अवघड आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत ही कृत्रिम बुद्धिमत्ता कशा पद्धतीने विकसित होणार आहे हे आत्ता सांगता येणे अवघड असलं तरीसुद्धा साहित्यातील सर्जनशीलता किंवा सृजनशीलता या बुद्धिमत्तेत निर्माण होणे अवघड आहे, असं आत्ता तरी मला वाटतं. साहित्यिकांमधील किंवा कवींमधील असणारी सृजनशीलता हा वेगळा भाग आहे आणि तो प्रत्येक व्यक्तीनुसार वेगळ्या वेगळ्या पद्धतीने व्यक्त होणारा आहे. त्यांच्या कलाकृतीमध्ये किंवा त्याच्या कलाकृतीखाली त्या त्या साहित्यिकांची म्हणून एक वेगळी अदृश्य सही असते. वाचकांना, श्रोत्यांना ती जाणवून येत असते. ती अदृश्य सही कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण साहित्यातून करू शकणार आहे का? व. पुं. ची कथा वेगळी असते, शंकर पाटलांची वेगळी असते, द. मा. मिरासदारांची वेगळी असते. शांताबाई शेळके यांची कविता वेगळी असते, इंदिरा संतांची कविता वेगळी असते, कुसुमाग्रजांची कविता वेगळी असते. तशा कविता निर्माण करणे कृत्रिम प्रज्ञेला शक्य आहे का? मुळात सुखदुःखाच्या संवेदना या साहित्याच्या मुळाशी असतात, ज्या साहित्यिकाला जाणवत असतात. त्याचं जिवंतपण त्याच्या साहित्यामध्ये उतरत असतं. त्यात एक मनाचा ओलावा असू शकतो. तो ओलावा कृत्रिम प्रज्ञा निर्माण करणं अशक्य वाटतं.

(लेखक वैद्यकीय व्यावसायिक आणि साहित्यिक आहेत.)

नोंद

१९८९ साली पहिली 'जागतिक मराठी साहित्य परिषद' मुंबई येथे कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. नंतरच्या काळातही सातत्य राहिले. साहित्य महामंडळानेही अशा तीन चार जागतिक मराठी साहित्य संमेलनांचे आयोजन केले होते. यात गाजले ते सॅन होजे (अमेरिका) व दुबई येथील संमेलन, या निमित्ताने मराठीचा झेंडा साता समुद्रापार फडकला.



शरद तांदळे
मो.: ८०७७१३२९४०

एआय सर्जनशीलतेची जागा घेणे अशक्य

आजवर मानवजातीचा प्रवास हा नव्या आव्हानांचा, शोधांचा आणि चिंतनाचा राहिला आहे. प्रत्येक शतकात मानवाने विकासाची नवी साधनं शोधली आणि त्या साधनांचा वापर करून आपल्या जीवनात आमूलाग्र बदल केले. गुफांतील चित्रलिपीपासून लेखनकलेपर्यंत पोहोचण्यासाठी मानवाला हजारो वर्षे लागली. गेल्या काही शतकांमध्ये मौखिक ज्ञान शब्दबद्ध झाल्याने साहित्याच्या माध्यमातून ते पुढील पिढीकडे पोहोचलं. लेखन आणि छपाईच्या कलेमुळे ज्ञान संचयाचं दालन उभं राहिलं. माणसांतील ही प्रज्ञा आणि सर्जनशीलता विकसित होण्यासाठी हजारो वर्षे खर्ची पडली. काही साहित्य कलाकृतींनी जगावर राज्य केलं, विशेषतः सर्व धर्मग्रंथांनी. आजही त्या ग्रंथांचे महत्त्व इतर कोणत्याही पुस्तकांपेक्षा जास्तच आहे; परंतु गेल्या काही दशकांत तंत्रज्ञानाच्या विकासासोबतच साहित्यानेसुद्धा गती पकडली. जगभरातील साहित्य सहज उपलब्ध होऊ लागलं. गेल्या दोन दशकांत तर, इंटरनेटमुळे सोशल मीडिया हे लिखाणाचं आणि वाचनाचं एक नवीन दालन उघडलं गेलं, ज्यामुळे अनेक जण लिहिती झाली. आपण लिहिलेलं काही क्षणांत लोकांना वाचता येऊ लागलं. सध्या जगभरातील विविध भाषांतील, विविध विषयांवरील साहित्य आणि विविध लेखकांच्या लेखनशैलीच्या माहितीचा प्रचंड साठा इंटरनेटवर उपलब्ध झाला आहे. अनेक अभ्यासकांना व विद्यार्थ्यांना त्याचा फायदाही झाला आहे.

जोपर्यंत माणसाला जाणिवा आहेत, तो विचार करू शकतो, त्याला स्वप्ने पडतात, त्याला संघर्ष करावा लागतो, त्याला दुःख, भावना, संवेदना आहेत; तोपर्यंत त्याची सर्जनशीलता नष्ट होऊ शकत नाही.

कृत्रिम प्रज्ञा

तंत्रज्ञानाचा हा विकास आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'पर्यंत येऊन पोहोचला आहे, ज्यालाच कृत्रिम प्रज्ञा म्हटले जाते. आज हा शब्द आपण दररोज केवळ ऐकतच नाही, तर त्याचा वापरही करत आहोत. आता जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा वेगाने प्रवेश झालेला असून, साहित्य क्षेत्रही याला अपवाद राहिलेले

राज्य सरकारने प्रतिवर्षी जिल्हा व विभागीय स्तरावर मराठी साहित्य संमेलन भरवण्याचा चांगला उपक्रम सुरू केला आहे. छोट्या व आटोपशीर संमेलनास प्रतिसादही उत्तम लाभतो. तसेच राज्य सरकारने तीन विश्व मराठी साहित्य संमेलनं आयोजित केली. मुंबई, नवी मुंबई आणि पुणे. पुण्यात नुकत्याच झालेल्या विश्वसंमेलनात तर कोट्यवधीची आर्थिक उलाढाल झाली, विक्रमी पुस्तक विक्री झाली.

नाही. त्यामुळे लेखकांसमोर आता नवे आव्हान उभे राहिलेले आहे. या तंत्रज्ञानामुळे लेखकांची सर्जनशीलता संपेल काय, हा मोठा प्रश्नही त्यांच्यापुढे उभा राहिला आहे.

कृत्रिम प्रज्ञा नेमकी काय आहे? तर ते इंटरनेटचा वापर करून गोळा केलेल्या माहितीच्या आधारे संगणकाला निर्णय घेण्याची आणि प्रतिसाद देण्याची क्षमता प्रदान करणारे एक विकसित तंत्रज्ञान आहे. ते नेमके कसं काम करते? तर या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी मोठ्या प्रमाणावर माहिती संकलित केली जाते, नंतर त्या माहितीचे विश्लेषण करून त्यातील विशिष्ट पॅटर्न शोधले जातात, या पॅटर्नच्या आधारे अल्गोरिदम तयार केले जातात आणि या अल्गोरिदमच्या आधारे संगणकाला निर्णय घेण्याचे प्रशिक्षण दिले जाते. या संपूर्ण प्रक्रियेतून एक एआय मॉडेल विकसित केले जाते, जे तत्काळ त्याला मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेते आणि तत्काळ प्रतिसाद देते. हे एआय मॉडेल अनेक चाचण्या, सुधारणा आणि प्रयोगांनंतर प्रत्यक्ष ॲप्लिकेशन्स व वेबसाइट्समध्ये वापरले जाते. उदा. चॅट जीपीटी, जेमिनी एआय, ग्रोक, पर्प्लेक्सिटी, कोपायलट इत्यादी.



साहित्यासमोर संकट

साहित्याच्या बाबतीत, ए. आय.च्या मदतीने नवीन लेख, कविता, गाणी, कथा, समीक्षा, संवाद, भाषांतर किंवा अगदी कादंबरीही तयार केली जाऊ शकते. या तंत्रज्ञानाचे अगदी प्राथमिक ज्ञान असणारी व्यक्तीसुद्धा कोणतीही भाषा, शैली, लय आणि शब्द यांचे अनुकरण करून साहित्य निर्माण करू शकते. अलीकडे मराठी भाषेतसुद्धा अशा प्रकारे निर्माण केलेले साहित्य येऊ लागलेलं आहे. भविष्यात अशा ए. आय. निर्मित साहित्याचा पूर आला, तर नवल वाटायला नको. आज आपल्या वापरात असलेले ए. आय. त्याच्या अगदीच बाल्यावस्थेत आहे, तरीही साहित्यासमोर त्याचे संकट उभे झाले आहे. यावरून त्याच्या विकसित अवस्थेत काय स्थिती असेल, याची आपणास कल्पनाही करता येणार नाही. संगणक स्वतःच कविता, गाणी, कथा लिहायला लागल्यावर लेखकाच्या सर्जनशीलतेचे काय होईल, हा प्रश्न सर्जनशील लेखकांना पडणं साहजिक आहे. उत्तम कारागिरी करू शकते, मात्र, किमान आजतरी ए. आय. सर्जनशील लेखकांची जागा घेऊ शकत नाही, कारण साहित्य ही केवळ शब्दांची मांडणी नसून ते मानवी अनुभवांचे, भावनांचे आणि संवेदनांचे कलात्मक रूप असते आणि हे घटक अद्याप केवळ मानवी मेंदूजवळच आहेत. त्यामुळे असं म्हणता येईल की, ए. आय. हे जास्तीत जास्त केवळ साहित्यातील शब्दजंजाळात उत्तम कारागिरी करू शकते; परंतु त्या कलाकृतीला जिवंत करण्याचे काम केवळ प्रतिभावंत लेखकच करू शकतो. लेखक हा एक माणूस असल्यामुळे त्याला भाव-भावना, जाणिवा, वैचारिक दिशा आणि सांस्कृतिक मूल्ये असतात. त्याच्या लिखाणामागे समाज, परिस्थिती, जडणघडण, ज्ञान, कौशल्य इत्यादी घटक प्रभाव टाकतात. कुठलाही लेखक लिहितो, त्यामागे अनेक कारणे असतात. त्याच्या कवितेतील ओळी, कथेमधील प्रसंग किंवा कादंबरीतील पात्रे हे सर्व अंतर्मनातून उगवलेले असते; पण ए.आय. कडे यापैकी काहीही नाही. त्यामुळे मानवी मनाच्या खोलीचा तळ गाठता येणे त्याला अजूनतरी शक्य नाही.



मराठी साहित्य संमेलनास अनेक परंपरा आहेत. या ९८ वर्षांतील २४ संमेलनं ही महाराष्ट्रा बाहेर झालेली आहेत. बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर, बेळगाव, मडगाव, हैदराबाद, कारवार, अहमदाबाद, नवी दिल्ली, भोपाळ, रायपूर(छत्तीस गड) पणजी, घुमान(पंजाब) यातील काही ठिकाणी दोन-तीन वेळा संमेलने भरली आहेत. बृहन्महाराष्ट्रात तर बडोदा येथील वाङ्मय परिषद यांची संमेलन वाटचाल अमृत महोत्सवाकडे सुरू आहे. नवी दिल्ली येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाचीही तेवढीच अधिवेशनं झालीत. या शिवाय अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनंही एका काळात भरली होती.

नव्या स्पंदनांचा अभाव

साहित्य ही एक 'निर्मिती' असते, 'उत्पादन' नव्हे; परंतु साहित्याकडे केवळ उत्पन्नाचे साधन म्हणून पाहणारे लेखक जेव्हा ए. आय. च्या मदतीने एखाद्या लेखकाच्या शैलीचे अनुकरण करून नवीन साहित्य निर्माण करतात, तेव्हा त्या साहित्यात नव्या स्पंदनांचा अभाव जाणवतो. खरंतर, ए. आय. चा वापर करणारा लेखक लवकर मरतो, कारण त्याची स्वतःची लेखनशैली विकसित होत नाही आणि त्याचे वेगळेपणसुद्धा हरवून जाते. या तंत्रज्ञानावर अवलंबून राहणाऱ्या लेखकाची कल्पनाशक्ती आणि त्याचे विचारांचे स्वातंत्र्यच हरवून जाते. त्यामुळे साहित्याला असणारा धोका हा ए.आय.चा नाही, तर ए.आय.चा वापर करून लिहिणाऱ्या लेखकांचा आहे, हे अधिक स्पष्टपणे म्हणावे लागेल. आज अशा लेखकांना रोखणं हेच साहित्यासमोरील सर्वांत मोठं आव्हान आहे. वाचकांनाही साहित्यातील शब्दांच्या मागे असणारा 'मानवी श्वास' जाणवत असतो. त्याला एखादे पुस्तक भावते, ते त्यातील शब्दांशी भावनिक किंवा वैचारिक बंध जुळल्यामुळे. वाचक हा पुस्तकात 'स्वतःला' शोधत असतो. एखादी साहित्य कलाकृती वाचकाला आनंद देते, आतून हलवते, रडवते किंवा विचारात पाडते, कारण त्या शब्दांच्या मागे एक जिवंत लेखक असतो आणि त्याची सर्जनशीलता मानवी भावनांच्या मुळाशी असते. याउलट, ए. आय. वापरून निर्माण केलेल्या साहित्यात भावना आणि विचारांची खोली नसते, त्यामुळे ते वाचकांच्या जाणिवांना स्पर्श करू शकत नाही.

लेखनकार्यातील सहकारी

आज ए. आय. हे न टळणारे संकट आहे; परंतु या तंत्रज्ञानाला संकट समजण्यापेक्षा लेखनकार्यातील सहकारी म्हणून त्याचा वापर करता येऊ शकतो (उदा. माहिती संकलन, संपादन, भाषांतर, व्याकरण आणि मुद्रितशोधन इत्यादी). वेळ घेणारी आणि कंटाळवाणी कामे ए. आय. च्या मदतीने हाताळली आणि भावना व विचारांचा गाभा साहित्यात आणण्याची जबाबदारी लेखकाने घेतली, तर मानवी प्रतिभा आणि तंत्रज्ञानाचा संगम साहित्याला नवे आयाम देऊ शकेल. कदाचित यातून मानवी सर्जनशीलता आपली कात टाकून पुनर्जन्मही घेऊ शकेल; पण हे वापरणाऱ्याच्या सद्सद्विवेकबुद्धीवर अवलंबून आहे. कितीही झाले तरी, ए. आय. हा लेखकासाठी केवळ एक आरसा ठरू शकतो; पण तो आरसा किती उपयोगात आणायचा हे ठरविण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाच्या हाती आहे. जोपर्यंत माणसाला जाणिवा आहेत, तो विचार करू शकतो, त्याला स्वप्ने पडतात, त्याला संघर्ष करावा लागतो, त्याला दुःख, भावना, संवेदना आहेत; तोपर्यंत त्याची सर्जनशीलता नष्ट होऊ शकत नाही. लेखक आपल्या साहित्यात हे 'माणूसपण' जितके खोलवर प्रकट करू शकेल, तितकेच ए. आय.च्या युगातही त्याचे साहित्य अमर ठरेल.

ए. आय. आणि मानवी जाणिवा यांचा आज नाही पण समजा भविष्यात कधी संगम झालाच, तर मात्र खऱ्या अर्थाने साहित्य क्षेत्र आणि लेखकांची सर्जनशीलता संकटात येईल. तूर्तास तरी, सर्जनशील लेखकांची खरी ताकद अजूनही त्यांच्या संवेदनशीलतेत आहे; पण त्यांना ती ए. आय. समोर अधिक ठळकपणे सिद्ध करावी लागेल.

(लेखक 'रावण' या गाजलेल्या कादंबरीचे लेखक व प्रकाशक आहेत.)





प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख
मो.: ९४२२७२१६३१

लेखकांची सर्जनशीलता म्हणजे सोन्याची पारख

साहित्यिकांच्या सर्जनशीलतेला अर्थात मूळ सर्जनशीलतेला कृत्रिम प्रज्ञेने झळ पोहोचविलेलीच आहे. यातून मानवी मौलिकतेला धक्का बसणार आहे. भावनाशून्य आणि भावनाजन्य अशा प्रकारचे हे एक प्रकारचे वर्तमान युद्ध आहे, हे पण समजून घेणे अगत्याचे आहे.

ज्ञान वेगळे, तंत्रज्ञान वेगळे, कला वेगळी, कुसर वेगळी. प्रतिभा हा शब्द एकच; पण माणसांची प्रतिभा वेगळी आणि यंत्रांची कारागिरी अलग. नेमके हेच अलगत्व ए. आय. मधलं वेगळं, तर माणसांचं सर्जकत्व हे पण वेगळं. कोणत्याही यंत्रात तंत्राची प्रज्ञा ही कोडिंगमधूनच प्रसार पावते म्हणून यंत्र आणि तंत्रात कमांडला महत्त्व जास्त. या कमांडमधून आता जगभर नवा खेळ सुरू झाला आहे. याउलट मानवी प्रज्ञा ही कल्पना लढवणारी, भावनांनी ओथंबलेली, प्रतिभेने फुललेली आणि विचारांनी बहरलेली म्हणजे जास्त जिवंत, जास्त तरल आणि महत्त्वाचं म्हणजे जास्त संवेदनशील. जसं की, तुमच्यासमोर उभे राहून गाणारा गवई आणि रेडिओमधून गाणं ऐकणं हा जो फरक, तोच फरक कृत्रिम प्रज्ञेचा आणि जिवंत सृजनशीलतेचा.

आव्हान दिले आहेच

मानवी सृजनशीलतेला कृत्रिम प्रज्ञेने आव्हान दिले याविषयी आता संशय घ्यावयाचे कारण नाही. तथापि झट की पट ही एक नवी धारणा कृत्रिम प्रज्ञेमधून दृढ झाली, हे पण खरे. याकडे फायदा-तोटा अशा दोन्ही दृष्टीने पाहता येईल. आजचा काळ हा कृत्रिम प्रज्ञेचा आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते. तंत्रज्ञान डिजिटायजेशन आणि कृत्रिम प्रज्ञा या साधनांना भौगोलिक सीमा नाहीत. त्यामुळे गरीब-श्रीमंत, जातीभाषा यांचा फरक कळत नाही म्हणूनच हे तंत्रज्ञान प्रत्येक भारतीयांच्या कल्पनांना आकार देऊ शकते, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच व्यक्त केले. भौगोलिक सीमा पार झालेले हे तंत्रज्ञान भारतीयांच्या कल्पनांना आकार देऊ शकणारे ठरेल याबद्दल मुळीच संदेह नाही. तथापि अभिजात नव्या मानवी देशी कलावंतांना हे तंत्रज्ञान भूक न मिटवणाऱ्या खाईत लोटू शकते, हे पण भय या

नोंद

शतकाकडे वाटचाल करणाऱ्या या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून महिलांना मान मिळाला तो सहा महिला साहित्यिकांना. कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर), दुर्गा भागवत(कराड), शांताबाई शेळके(आळंदी), डॉ. विजया राजाध्यक्ष (इंदूर), डॉ. अरुणा ढेरे (यवतमाळ) डॉ. तारा भवाळकर (नवी दिल्ली)



तंत्रज्ञानातून वर्धित होऊ शकते.

ए. आय. हा राक्षस

ए.आय. हा राक्षस आहे त्याला आता आपण डावलू शकत नाही. खरे काय आणि बनावट काय यातला सारासार विवेक यातून हरवला जाण्याची भीती डॉक्टर सदानंद मोरे यांनी अलीकडे एका भाषणात व्यक्त केली आहे. या भीतीशी आपण सहमत व्हायला मुळीच हरकत नाही. अगदी जीपीटीवर काही गमतीने पाहताना खऱ्याखोट्याचा ताळा लक्षात ठेवूनच पुढे जाता येते. मुळात तंत्रज्ञान नाकारणे हे आपल्या हातात नाही. ती एक अटळता आहे. आज आणि उद्यापण. मात्र तंत्रज्ञान वापरायचे कसे हा कळीचा मुद्दा आहे. सत्याचा थेट आलाप करून एखादा खोटेपणा हाच सत्य आहे या भयाकडेही ए. आय. च्या माध्यमातून पाहणे चूक ठरू शकणार नाही. म्हणजे लेखकत्व ए. आय.शी बांधून मात्र कधीच चालायचे नाही. तथापि आपली समकालीन ज्ञानपरंपरा, आपले उद्योगजगत, आपल्या व्यापार यंत्रणा, आपले व्यावसायिक एकूण विश्व याने जबर धडक मारलेलीच आहे.

याबद्दल बहुराष्ट्रीय सल्लागार संस्थेचे एक भागीदार आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवी अभ्यासक चिन्मय गव्हाणकर यांनी केलेले स्पष्टीकरण उद्बोधक आहे. ते म्हणतात,

१. ए. आय., क्वांटम कॉम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी यांच्यात विशेष कौशल्य असलेल्या उमेदवारांसाठी वेतनात लक्षणीय वाढ झाली आहे.

२. अधिकांश प्रतिभावान विद्यार्थी संगणक अभियांत्रिकीची निवड करतात

३. साधारण २०२२ ला ए. आय. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेगाने उदय झाला.

४. भारतातील आउटसोर्सिंग नोकऱ्यांमध्ये आता २७% ए. आय. ऑटोमेशन आहे.

५ ए. आय. सारख्या तंत्रज्ञानाने बेसिक कोडिंग आणि प्रोग्रामिंग सोपे केले आहे. कोड लिहिण्याऐवजी उद्याचे अभियंते ए. आय. टूलचा वापर करून जटिल समस्या सोडवतील. नवीन कौशल्यामध्ये फ्रॉम इंजीनियरिंग ए. आय सिस्टीम इंटिग्रेशन आणि ॲडव्हान्स्ड प्रोग्रामिंग आर्किटेक्चरचा समावेश असेल.

गव्हाणकर हेही नमूद करतात की, बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी यांत्रिकी, अभियांत्रिकी, रोबोटिक्स, ऑटोमेशन, विद्युत अभियांत्रिकी, टेक्नॉलॉजी, रासायनिक, अभियांत्रिकी, सस्टेनेबल एनर्जी या इतर अभियांत्रिकी शाखांचाही विचार करावा.

तरुणाईसाठी उत्कर्षवादी विषय

काळाचा सांप्रत आवाज म्हणून आणि उच्च प्रगत शिक्षणात जोरकसपणे उतरलेल्या तरुणाईसाठी उत्कर्षवादी विषय म्हणून ए. आय. अथवा प्रगत संगणक शिक्षण अनिवार्य याबद्दल मुळीच कुणाला शंका नाही; पण काळजामधून अगदी कालानुकाल प्रतिभावंत लेखकांचे जे आवाज काळाला ऐकायला यायचे त्याचे पुढे काय होणार हा खरा मुद्दा आणि हाच खरा प्रश्न आहे. हे कबूल की, कृत्रिम प्रज्ञा गणिते मांडते, तर्क लढवते, कृत्रिम प्रज्ञा

मराठी भाषेचा इतिहास–मराठी भाषा ही इंडो–युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी भाषेला २४०० वर्षांचा समृद्ध इतिहास आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतमधून निर्माण झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. नव्या संशोधनानुसार मराठी अन् प्राकृत ह्या एकच भाषा असल्याचे सप्रमाण सिद्ध झाले आहे.

नोंद

संगीत सुरावट बनवते, चित्र रंगवते, चॅटजीटीपी हव्या त्या विषयावर भाषण रचून देते. तुम्हाला काय हवे हे विचारून हवे ते तयार करून देते.

सारांश, कृत्रिम अशा या प्रज्ञेने कल्पना लढविण्याच्या दिशा विस्तारल्यात हे खोटे नाही. त्यातून कामांना गती मिळाली, हे पण खरे. क्षणात कुठलीही कला पेश करणे अथवा त्यात क्षणात एखादे डिझाईन तयार करून तुमच्या पुढ्यात ठेवणे ही सारी किमया कृत्रिम प्रज्ञेने साधलीपण आहे. अत्याधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या नव्या गोष्टी सादर करण्याची क्षमता या प्रज्ञेने जगाला दिली, हे सगळे खरे असले तरी जिवंत माणसांची जागा कृत्रिम प्रज्ञा घेऊच शकत नाहीत, हेही तेवढेच खरे आहे. कारण अभिजात सर्जकता आणि डिजिटल सर्जनशीलता यात कायम फरक तर राहीलच कारण, निर्मिती आणि बनावटगिरी या दोन्ही गोष्टी भिन्न असतात हे नाकारून चालत नाही, तसेच विसरून पण चालत नाही.

मानवी मौलिकतेला धक्का

सारांश, साहित्यिकांच्या सर्जनशीलतेला अर्थात मूळ सर्जनशीलतेला कृत्रिम प्रज्ञेने झळ पोहोचविलेलीच आहे, यातून मानवी मौलिकतेला धक्का पण बसणार आहे भावनाशून्य आणि भावनाजन्य अशा प्रकारचे हे एक प्रकारचे वर्तमान युद्ध आहे, हे पण समजून घेणे अगत्याचे आहे. कलावंत, प्रतिभावंत यांचे काहीसे हक्क धोक्यात येण्याचे भय कृत्रिम अशा प्रज्ञेच्या पोटात आहे. नैतिकतेसारखा आत्यंतिक कळीचा विषय यामुळे ऐरणीवर येण्याची शक्यता नाकारता येणारी नाही. शिकवणारे शिक्षक यातून कदाचित सरशी मिळवतील. नोकऱ्यांचा दोर धरून तरुणाई विश्वाला माझे घर करतील. उद्योगही भरभराटीला येतील; पण शेतांच्या थेट बांधावर उभा राहून गोफण फिरवत गाणं म्हणणारा, रानपाखराशी बोलणारा बांधावरचा हा माणूस कृत्रिम प्रज्ञेमुळे कुठे जाईल याचे उत्तर मात्र ही कृत्रिम प्रज्ञा देऊ शकत नाही. हा विचारही सहज सोडून देता येणारा नाही. त्यामुळे साहित्यिकांच्या सर्जनशीलतेबद्दल खरा धक्का आणि खरे दुःख जे कोणते असेल, तर हे ते आहे. सारांश, माणसाचे आकाश जायबंद करून होणाऱ्या प्रगतीला फार किंमत देण्यात काहीही अर्थ नसतो हे पण इथे जरा अधिक बारकाईने समजून घेतले पाहिजे आणि म्हणूनच डॉक्टर सदानंद मोरे याला 'राक्षस' असे म्हणतात. ते मला अधिक यथार्थ वाटते. म्हणजेच राक्षस विरुद्ध सर्जनशील माणूस यांच्यातील ही लढाई आहे. तंत्रज्ञानाचा जबरदस्त दबाव लक्षात घेता या लढाईत कदाचित माणूस हरेल आणि प्रगत ए. आय. जिंकेलसुद्धा. अखेर नारायण सुर्वे यांचे शब्द घेऊन मी इतकेच म्हणेन,

आता आदमी झाला सस्ता
बकरा महाग झाला, पोरा
जिंदगीमध्ये पुरा अंधेर आला
सबको पैसे ने खा डाला...

मग प्रश्न हा, की वेग आणि प्रगतीची झेप केवढी जरी असली तरी कृत्रिम प्रज्ञा या प्रश्नांची उत्तरे देईल काय? शिक्षणाच्या ज्ञानगंगेपासून कोस कोस दूर असलेले आमचे लोककलावंत यांच्याकडील स्वरांचे आता काय होईल? पेरणी, कापणी करताना घर-शिवारामध्ये गाणं जिवंत ठेवणाऱ्या माणसाचे काय होईल? पाळीव प्राणी राखताना, त्यांच्या मागे हिंडताना मराठी अभिजात कथा, कविता, गोष्ट सांगणारा माणूस कुठे म्हणून जाईल? हजारो समूहांतून अक्षरशः चालत फिरत हिंडत राहणाऱ्या आमच्या एवढ्या लोककलावंतांचे काय होईल? परंपरेतून खास नवता निर्माण करणाऱ्या लक्षावधी प्रतिभावंतांचेही काय होईल? अशा असंख्य प्रश्नांची असंख्य उत्तरे कृत्रिम प्रज्ञेकडे नाहीत आणि या कृत्रिम प्रज्ञांनी ती उत्तरे द्यावयाचा प्रयत्न केला तरी एकूण त्या उत्तरांनी आपले पुरते समाधान मात्र निश्चितच होऊ शकणार नाही.

(लेखक मराठी भाषेचे अभ्यासक आहेत.)





मराठीतील आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ 'गाथा सप्तशती' हा सुमारे २००० वर्षांपूर्वीचा आहे. इ.स.१११० मध्ये मुकुंदराजांनी 'विवेकसिंधु' या ग्रंथाद्वारे शंकराचार्यांच्या वेदान्तावर निरूपणात्मक विवेचन केले आहे. इ.स. १२७८ मध्ये म्हाइंभट यांनी 'लीळाचरित्र' लिहिले. त्यानंतर इ.स. १२९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी केली. महानुभाव संप्रदायाने मराठी साहित्यात मौलिक भर घातली.

महाराष्ट्र शासनाचा ''सहकार भूषण व सहकार महर्षी पुरस्कार'' प्राप्त संस्था

ज्ञानदीप DNYANDEEP

को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

CO-OP. CREDIT SOCIETY LTD. MUMBAI

प्रशासकीय कार्यालय : साई एनक्लेव, दुसरा मजला, हरियाली व्हिलेज, विक्रोळी (पूर्व), मुंबई – ४०० ०८३.

♦ Email : adminoffice@dnyandeep.co.in ♦ Website : www.dnyandeep.co.in ♦ 9766400701/702

✻ रू.७००० कोटी व्यवसाय पुर्तीकडे वाटचाल ✻

कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य

ठेवींचे व्याजदर

११० संगणकीकृत शाखा

संस्थेची सांपत्तीक स्थिती

ठेवी	:	३९३८ कोटी
कर्जे	:	३०२९ कोटी
संमिश्र व्यवसाय	:	६९६७ कोटी
वसुल भागभांडवल	:	१५६ कोटी
राखीव व इतर निधी	:	५२८ कोटी
गुंतवणूक	:	१४६५ कोटी

मुदत, मासिक व्याज व तिमाही व्याज ठेव

ठेवीचा कालावधी	सर्वसाधारण	ज्येष्ठ नागरीकांसाठी
१२ महिने ते २४ महिने पर्यंत	८.००%	८.५०%
२५ महिने ते ३६ महिने पर्यंत	८.५०%	९.००%
३७ महिने ते ६० महिने पर्यंत	८.००%	८.५०%



लखपती ठेव योजना

लखपती ठेव योजनेमध्ये भरावयाच्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे

मिळणारी रक्कम/कालावधी	२४ महिने	३६ महिने	४८ महिने	६० महिने
रू. १ लाख	३,९००/-	२,५१०/-	१,८२०/-	१,४१०/-

ज्ञानार्थ ठेव योजना (११ महिने)	दीपलक्ष्मी ठेव योजना (५५५ दिवस)	ज्ञानसंकल्प ठेव योजना (९०० दिवस)	वसंत ऋतू ठेव योजना (१८९ दिवस)
८.५०%	८.५०%	८.००%	८.००%

ज्ञानलक्ष्मी ठेव (५ वर्षे पुर्ण)	७.५०%	८.००%
ज्ञानआनंद ठेव (१८ महिने)	८.००%	८.५०%

विविध कर्ज योजना

ज्ञानवास्तू गृहकर्ज
कर्ज मर्यादा रू. १ कोटी
मुदत २० वर्षे
व्याजदर ८.५०% ते ८.९०%

सोनेतारण कर्ज
कर्ज मर्यादा रू. २० लाख
मुदत १२ महिने
व्याजदर ९.५०%
निव्वळ सोने किंमतीच्या ७५%

सुरक्षित वैयक्तिक कर्ज
कर्ज मर्यादा रू. १० लाख
मुदत १२० महिने
व्याजदर १०.००%

व्यवसाय कर्ज
कर्ज मर्यादा रू. ५ लाख
मुदत ६० महिने
व्याजदर १५.००%

पर्यटन कर्ज वैयक्तिक
कर्ज मर्यादा रू. २ लाख
मुदत २४ महिने
व्याजदर १३.००%

कार लोन
कर्ज मर्यादा रू. ४० लाख
मुदत ६० महिने
व्याजदर ९.५०%

शैक्षणिक कर्ज
कर्ज मर्यादा रू. २५ लाख
मुदत ८४ महिने
व्याजदर ९.५०%

मालमत्ता तारण कर्ज
कर्ज मर्यादा रू. १.५ कोटी
मुदत १२० महिने
व्याजदर १२.००%

वैयक्तिक कर्ज
कर्ज मर्यादा रू. १ लाख
मुदत ६० महिने
व्याजदर १५.००%

दैनंदिन ठेव वैयक्तिक कर्ज
कर्ज मर्यादा रू. २ लाख
मुदत ६० महिने
व्याजदर १५.००%

श्री. विश्वनाथ पवार – संस्थापक, संचालक
श्री. जिजाबा पवार – अध्यक्ष
श्री. चंद्रकांत ढमाळ – उपाध्यक्ष
श्री. चंद्रकांत शिंदे – सचिव

कार्यकारी संचालक मंडळ, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी

परिसंवाद : चित्रपटविषयक लेखन साहित्य आहे का?

आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या ग्रंथांवर चित्रपट निर्मिती झाली आहे. साहित्य आणि चित्रपट यांचा संबंध आहे; पण चित्रपटविषयक लेखन हे साहित्य मानायचे का, याबाबत शंका उपस्थित केली जाते. याबाबत वस्तुस्थिती काय आहे त्याची मांडणी या परिसंवादात दिलीप ठाकूर, सुलभा तेरणीकर आणि श्रीकांत बोजेवार यांनी केली आहे.



श्रीकांत बोजेवार
मो.: ९८९२४१९२६७

‘तोवर’ हा प्रश्न आपण विचारत राहू

‘चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा का मिळत नाही?’ या प्रश्नाकडे, ‘कथा, कविता, कांदबरी, ललितगद्य या प्रकारच्या लिखाणाला ज्या अर्थाने साहित्य म्हटले जाते तसे चित्रपटविषयक लेखनाला ते का म्हटले जात नाही?’ या अर्थाने पाहावे लागते, ते केवळ नाइलाजानेच.

‘चित्रपटातील गीतांना काव्याचा दर्जा का दिला जात नाही?’ असा प्रश्न अधूनमधून विचारला जातो, त्याचप्रमाणे ‘चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा का मिळत नाही?’ या प्रश्नाचा उच्चारही होत असतो. पैकी पहिल्या प्रश्नाची चर्चा अधिक्यानं होते, कारण अनेक मोठ्या कवींनी गीतकार म्हणूनही कामगिरी केली आहे. त्यांनी लिहिलेल्या गाण्यांना अनेकदा त्यांच्या कवितांपेक्षा अधिक लोकप्रियता लाभली आहे; परंतु कवी म्हणूनच्या प्रतिष्ठेसाठी ती लोकप्रियता मारकच ठरल्याचे दिसते. हे दोन्ही प्रश्न विचारताना मुळात ‘साहित्य म्हणजे काय’ याची व्याख्या कोणी विचारात घेत नाही. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांनी ‘साहित्यशास्त्र- उद्भव आणि विकास’ या पुस्तकात ‘काव्यचिकित्साशास्त्राला दुसरे नाव साहित्य आहे’ असे म्हटले आहे. (पृष्ठ २७१). ही व्याख्या गृहीत धरली तर या लेखाच्या सुरुवातीला विचारलेले दोन्ही प्रश्न फिजुल ठरतात, कारण मुळात आपण ज्यांना साहित्य म्हणतो त्याला शास्त्रात साहित्य म्हणून मान्यताच नाही. याच पुस्तकात पुढे काणे अशी माहिती देतात, की काव्य ही ललितकला असून तिचा उद्देश मनाला प्रत्यक्ष आनंद देण्याचा आहे. अगदी प्राचीन काळापासून हे मान्य केले असल्याचेही ते म्हणतात. म्हणजे मुळात कविता हे सुद्धा साहित्य नाही आणि आनंद देणाऱ्या कवितांपेक्षा जीवनातलं वास्तव सांगणाऱ्या कविता श्रेष्ठ असतात, हा तर भलताच विपर्यास होईल, कारण अशा कवितांमधून मनाला अजिबात आनंद मिळत नाही. त्यामुळे ‘चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा का मिळत नाही?’ या प्रश्नाकडे, ‘कथा, कविता, कादंबरी, ललितगद्य या प्रकारच्या लिखाणाला ज्या अर्थाने साहित्य म्हटले जाते तसे चित्रपटविषयक लेखनाला ते का म्हटले जात नाही?’ या अर्थाने पाहावे लागते, ते नाइलाजानेच.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. स्वराज्याची राजभाषा म्हणून मराठीची निवड केली. अमराठी शब्दांचा वापर टाळण्यासाठी शिवरायांनी मराठीचा १४०० शब्दांचा ‘राजव्यवहारकोश’ तयार करून घेतला. इ.स. १९४७ नंतर स्वतंत्र भारत देशाने मराठीला अधिकृत भाषेचे पद दिले. इ.स. १९६० मध्ये मराठी भाषकांच्या एकसंघ महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.

नोंद

लेखन किती प्रकारचे होते?

आपल्याकडे चित्रपटविषयक लेखन किती प्रकारचे होते याचा आधी ऊहापोह करू. सर्वाधिक वाचले जाणारे चित्रपटविषयक लिखाण साधारण दोन प्रकारचे असते. एक म्हणजे विविध वृत्तपत्रांत, नियतकालिकांत लिहिली जाणारी चित्रपटांची परीक्षणे. दुसरे म्हणजे स्मृतिरंजन करणारे लिखाण, ज्यात किमान सत्तर ते ऐंशी टक्के लिखाण हे चित्रपट-संगीतविषयक असते. जवळपास शंभर टक्के चित्रपट परीक्षणे ही एकदा चित्रपट पाहून, त्यावर सखोल विचार न करता आणि पाचशे-सातशे शब्दांत लिहिलेली असतात. अशी जवळपास सर्व परीक्षणे आपल्याला 'साहित्य' या परिघातून बाहेर काढावी लागतील. यात लिहिणारांचा दोष अजिबात नाही, कारण 'तातडीने लिहिणे' हीच त्याची गरज असते. प्रत्यक्ष साहित्याच्या क्षेत्रातही पुस्तकांच्या वृत्तपत्रीय समीक्षणांची अथवा परीक्षणांची हीच गत असते. पुस्तकाची थोडक्यात माहिती देणाऱ्या आणि क्वचितच वाईट, बहुतांशतः लेखक आणि लेखनाचे कौतुकच करणाऱ्या या माहितीसदृश लेखनास साहित्य म्हणण्यास कोणाची जीभ धजावेल?

ते लिखाण साहित्य नाहीच

चित्रपट प्रदर्शित होतो तेव्हा तो चांगला किंवा वाईट एवढ्या दोनच प्रकारांत असतो, जो काय इतिहास निर्माण व्हायचा तो कालांतरानं होतो आणि ते सुद्धा एकूण चित्रपटांपैकी फार तर पाच टक्के चित्रपटांच्या बाबतीत खरे म्हणता येईल. मी जवळपास १९ वर्षे वृत्तपत्रात चित्रपटांची परीक्षणे लिहिली, त्यातील निवडक परीक्षणांची दोन पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत; परंतु त्या लिखाणाला कोणी साहित्य म्हटले, तर त्याला विरोध करणारा पहिला मीच असेन. अशा पुस्तकांना एका मर्यादित परिघात संदर्भमूल्य आहे, असं फार तर म्हणता येईल.

हे लिखाण मात्र साहित्य

जे चित्रपट प्रदर्शित झाल्यावर त्यांची विविध माध्यमांत चर्चा होते. जे चित्रपट दीर्घकाळ लक्षात राहतात; ज्यांच्या प्रभावाची अनेक प्रकारांनी चर्चा होते; तो चित्रपट आकाराला येण्यास साहाय्यभूत होणाऱ्या दिग्दर्शन, पटकथा, संवाद, छायाचित्रण, कलादिग्दर्शन अशा प्रत्येक पैलूविषयी सखोल विचार, विश्लेषण केले जाते; जे चित्रपट समाजाच्या मनोवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात हे स्वीकारले जाऊन त्यांचा वेगवेगळ्या संदर्भात वारंवार उल्लेख होत राहतो, अशा चित्रपटांवरील लेखनाचा मात्र वेगळा विचार करावा लागेल. या संदर्भात मराठीतील काही उदाहरणे देता येतील. सर्वांत ठळक उदाहरण आहे ते अरुण खोपकर यांच्या 'गुरुदत्त-एक तीन अंकी शोकांतिका' या पुस्तकाचे. 'प्यासा', 'कागज के फुल' आणि 'साहिब बीवी और गुलाम' या तीन चित्रपटांचे आशय आणि तंत्र या दोन्ही अंगाने या पुस्तकात विश्लेषण केलेले आहे. या पुस्तकाचा जवळपास सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये अनुवाद झालेला आहे. मात्र तरीही या पुस्तकाचा उल्लेख कधीही साहित्य म्हणून होत नाही. सत्यजित राय यांच्या भारतीय चित्रपटविषयक चिंतनाचा सुधीर नांदगावकर यांनी 'अभिजात' या नावाने केलेला अनुवाद, रेखा देशपांडे यांनी रूपेरी पडद्यावरील निवडक स्त्री व्यक्तिरेखांचा वेध ज्यात घेतलेला आहे ते 'नायिका'हे पुस्तक, 'गाईड' ही मूळ कादंबरी आणि त्यावर बेतलेला चित्रपट यांचा तुलनात्मक परामर्ष घेणारे, उल्का महाजन यांनी अनुवाद केलेले पुस्तक अशी पन्नासेक उदाहरणे देता येतील, जी अत्यंत गांभीर्याने लिहिली गेलेली पुस्तके आहेत. त्यांना 'साहित्य' अशी 'पदवी' द्यायला काहीच हरकत नाही; परंतु तसे होत नाही आणि होणारही नाही, कारण आपण 'सृजन' या अर्थाने साहित्याकडे पाहतो. 'क्रिएट करणे' म्हणजे निर्मिती करणे, म्हणजेच साहित्य असा आपला एक ठाम समज आहे. या कसोटीवर चित्रपटविषयक सगळेच लिखाण हे 'प्रतिक्रियात्मक' ठरते. प्रत्यक्ष चित्रपट हे जरी सृजन असले तरी ते टीमवर्क आहे, पैकी नेमका कोणामुळे तो चित्रपट प्रभावी झाला हे ठरवता येत नाही. किंवा त्याचे शंभर टक्के श्रेय एकाच व्यक्तीला देत येत नाही. 'जो दिखता है वो बिकता है' या आपल्या विचार परंपरेत चित्रपटाच्या यशापयशाचे बरेचसे श्रेय काही अपवाद वगळता नायकांनाच दिले जाते. जिथे ते दिग्दर्शकाला मिळते त्या चित्रपटांची जातकुळी वेगळी असते हे आपल्याला व्ही. शांताराम, राजा परांजपे, गुरुदत्त, राज कपूर, जब्बार पटेल, सत्यजीत राय, श्याम बेनेगल, मणिरत्नम, रामगोपाल वर्मा अशांच्या चित्रपटांकडे पाहिले तर लक्षात येईल. यांच्या चित्रपटांविषयी कालांतराने, म्हणजे ते समाजाच्या सामूहिक मानसिकतेचा, इतिहासाचा भाग झाल्यावर झालेले लिखाण हे खरे तर साहित्य



अगदी सुरुवातीचे म्हणजे १८७८ चे पुणे येथे संपन्न झालेले साहित्य संमेलन हे 'ग्रंथकार संमेलन' किंवा 'ग्रंथकार सभा', 'परिषद' म्हणून नामनिर्देशित झाले. त्यानंतर १९०७ मध्ये या संमेलनास 'लेखक संमेलन' असे संबोधले गेले. तर १९०९मध्ये 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' असे त्याचे नामाभिधान केले गेले. मध्यंतरीच्या काळात पुन्हा एकदा 'मराठी साहित्य संमेलन' असे नाव दिले गेले.



म्हणून स्वीकारले गेले पाहिजे; परंतु चित्रपटांकडे पाहण्याची आपल्या सुबुद्ध समाजाची दृष्टी फार लघू आहे. अव्वल दर्जाचे प्रतिभावंत म्हणून ज्यांना आपण मान्यता देतो असे साहित्यिकसुद्धा भाषणांत, मुलाखतींमध्ये लिखाणात, हिंदी-मराठी चित्रपटांचा उल्लेख करताना दिसत नाहीत, त्यात त्यांना कमीपणा वाटतो. मात्र अधूनमधून कुरुसवा, बर्गमन, हिचकॉक अशा परदेशी दिग्दर्शकांचा किंवा त्यांच्या चित्रपटांचा उल्लेख करून ते स्वतःचे 'जागतिक भान' दाखवायला विसरत नाहीत.

संगीतविषयक लिखाण

चित्रपट-संगीतविषयक लिखाणाचे लोंढेच्या लोंढे मराठीत आहेत. त्यातील एक माधव मोहोळ यांचे 'गीतयात्री' हे पुस्तक वगळले, तर 'साहित्य' म्हणून दर्जा द्यावा अशी फार कमी पुस्तके त्यात आहेत. गायक आणि संगीतकारांच्या नावाने केवळ उसासे न टाकता गाण्यांचा चिकित्सक अभ्यास आणि विश्लेषण करण्याचा विशेष अलीकडे मृदुला दाढे-जोशी, सुहास किर्लोस्कर, सुनिल देशपांडे आदींच्या लिखाणात दिसतो, मात्र अखेर तेही प्रतिक्रियात्मक लिखाणच होय. चित्रपट-संगीतविषयक अन्य लिखाण मुख्यतः आवडत्या गाण्यांच्या आठवणी जाग्या करण्याच्या हेतूनेच केले गेलेले आहे. गंमत म्हणजे मराठीत चित्रपट-संगीतविषयक झालेल्या लिखाणात मराठी चित्रपट-संगीतावरील लिखाणाचे प्रमाण जेमतेम एक टक्काही नसेल.

आत्मचरित्रे

'आत्मचरित्र' या प्रकाराला जर आपण साहित्यकृती म्हणत असू, तर मग चित्रपट क्षेत्रातील काही आत्मचरित्रे, त्यात बसू शकतील का? विश्राम बेडेकर, सुनिताबाई देशपांडे, लक्ष्मीबाई टिळक अशा किमान पाचपंचवीस आत्मचरित्रांना आपण मराठीत जवळपास साहित्याचा दर्जा दिलेला आहे. मराठीतील फिल्मी आत्मचरित्रांमध्ये मात्र सामाजिक भान क्वचितच दिसते. 'आत्मकथा', 'आत्मसमर्थन' आणि 'आत्मप्रौढी' यांचे वर्तुळ भेदून पुढे जाणारी फिल्मी आत्मचरित्रे अपवादानेच आढळतात. मात्र गदिमांचे 'तीळ आणि तांदूळ' हे व्यक्तिचित्रणात्मक लिखाण पुलंच्या 'गणगोत' एवढेच दर्जेदार आहे, त्याचाही साहित्य म्हणून उल्लेख होत नाही. आपल्याला कवी म्हटले जात नाही या गदिमांच्या दुःखात ही भरच म्हटली पाहिजे.

गंभीरपणे केलेले प्रतिक्रियात्मक आणि चिकित्सा करणारे लिखाण म्हणजे समीक्षा, असे आपण ढोबळपणे मानतो. पुस्तकांच्या अशा समीक्षणाला आपण साहित्य म्हणतो, असं मानावं लागेल कारण त्याशिवाय श्रीपाल सबनीस हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊ शकले नसते. हीच कसोटी लावून चित्रपटांचे समीक्षक हे कदाचित साहित्यिक म्हणून मान्यता मिळवू शकतील; परंतु त्यासाठी आपल्या समाजाला आधी चित्रपट या माध्यमाकडे गंभीरपणे पाहायला शिकावे लागेल. तोवर, 'चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा का मिळत नाही?' असा प्रश्न मात्र आपण विचारत राहिलं पाहिजे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट समीक्षक आहेत.)

१९३५ ते १९७३ या काळात 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' या नावाने ओळखले जाऊ लागले. पुन्हा १९७४ मध्ये 'मराठी साहित्य संमेलन' असे नाव योजले गेले. १९६१ मध्ये अखिल भारतीय मराठी महामंडळाकडे साहित्य संमेलनाचा कारभार गेला कारण त्या वेळेस या महामंडळाची स्थापना करण्यात आली.

नोंद



सुलभा तेरणीकर
मो.: ८००७८५३२८८

चित्रपटविषयक साहित्याला प्रतिष्ठा मिळावी

आज अनेक मराठी किंवा इतर भाषेतील लेखक चित्रपट आणि चित्रपटसंगीताचा विषय नेटाने आणि सातत्याने लिहितात. मात्र साहित्य शारदेच्या दरबारात त्यांच्या या लेखणीची सुप्रतिष्ठा व्हायला हवी. तरच चित्रपटाची सुंदर दुनिया दीर्घकाळ जीवित राहील.

विसाव्या शतकाच्या विज्ञान शोधात चित्रपट ही कला तंत्र, साहित्य असे संमिश्र माध्यम म्हणून उदय पावलेली नवलपरी आजच्या घडीला इतकी रुजली आहे, की ते जणू समाजाचे नव्हे तर जीवनाचे दर्पण म्हणून पाहता यावे. भारतात ३ मे १९१३ या दिवशी दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' हा मूकपट प्रदर्शित केला; पण चित्रनिर्मितीचा ध्यास घेतलेले दादासाहेब लिहितात, चित्रपट तयार करण्यास लागणाऱ्या मूलभूत साधनांची ड्रॉइंग, पेंटिंग, शिल्प, फोटोग्राफी, नाट्य, जादू वगैरे कलांची मजजवळ असलेल्या बहुतेक पूर्वतयारीस सुवर्ण रौप्यपदकांची जोडही मिळाली होती, त्यामुळे यशाची भावी आशा अधिकाधिक दृढ होऊ लागली. परंतु पुढे काय, अर्थात पुढे भांडवल हाच प्रश्न होता. याचा अर्थ सिनेमा हे माध्यम जसे तंत्र, कला, साहित्य याबरोबरच अर्थकारण, भांडवल याची प्रचंड मागणी करणारे होते. प्रसिद्धी, लोकांचा प्रतिसाद हवा असणारे होते. त्याच्या प्रदर्शनासाठी सर्वांना वसण्यासाठी वास्तूची गरज होती.

तर तो करंटेपणा ठरेल

दादासाहेबांच्या 'राजा हरिश्चंद्र'च्या यशानंतर अठरा वर्षांनी म्हणजे १४ मार्च १९३१ या दिवशी अर्देशीर इराणी यांनी बोलपट 'आलमआरा' प्रदर्शित केला आणि ध्वनीची जोड मिळताच चित्रपट बहरत राहिला, हा इतिहास सर्वश्रुत आहे. चित्रपट हे माध्यम भारतासारख्या बहुरंगी संस्कृती, भाषा, संगीत आणि अक्षरश: चौसष्ट कला असलेल्या देशात एक विराट शक्तिमानरूप धारण करून उभे ठाकले. 'कथा क्षीरसागराच्या देशात' या चित्रपटाने एक सहस्रबाहु सहस्रशीर्ष अशा परमेश्वराचा अवतार धारण केला. अशा चित्रपटाविषयीचे साहित्य हे साहित्य म्हणून कुणी उपेक्षित असेल, दुर्लक्षित असेल, तर तो करंटेपणा ठरेल. स्वत: दादासाहेब फाळके यांनी अनेकदा या चित्रपटाच्या नवख्या माध्यमाबद्दल विस्तृत लिहिले आहे,

नोंद

साहित्य संमेलन हे महाराष्ट्राचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. त्यात विश्व अखिल भारतीय, राज्यस्तरीय, प्रादेशिक, प्रांतिक, नगरीय, उपनगरीय, जिल्हास्तरीय, ग्रामीण, दलित, आदिवासी, महिला, कामगार, जातीय, व्यावसायिक, बालकुमार, नवोदित, युवा, आंबेडकरी, ख्रिस्ती अशा वेगवेगळ्या शीर्षकांनी ही संमेलने आयोजित करण्याचा झपाटा फार मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

मुलाखती दिलेल्या आहेत. १९२७ सालच्या टी. रंगाचारी कमिटीपुढे ब्रिटिश सरकारच्या सिनेमॅटोग्राफर एन्क्वायरी कमिटीसाठी दिलेल्या मुलाखतीत ते सांगतात, ''भारतात अशी एखादी शिक्षण शाळा सुरू करून छायालेखन, अभिनय, पटकथा, सिनेरियोलेखन याचे पद्धतशीर शिक्षण देण्याची सोय व्हावी.''

तथाकथित साहित्यबाह्य विषय

आज एकविसाव्या शतकात हा इतिहास आठवताना चित्रपटविषयक लेखन हे तथाकथित साहित्यबाह्य असे म्हणून दूर ठेवणं हे नि:संशय अयोग्य आहे. चित्रनिर्मिती आणि त्याला उदंड प्रतिसाद देणारे रसिक यांच्या किती पिढ्या नांदल्या आहेत. त्यामधील प्रतिसाद, मत, परीक्षण, अनुभव, कौतुक, नापसंती यांचा सेतू म्हणजे चित्रपट-साहित्य! त्यात एक प्रमुख म्हणजे बोलपट झाल्यानंतर उदयाला आलेले चित्रपटसंगीत! शास्त्रीय संगीत, लोकसंगीत यांच्या मुळांना धरून फोफावलेली वल्लरी म्हणजे चित्रपटसंगीत. स्वतंत्रपणे उभा राहिलेला एक विशाल वृक्षच!

अशा एका स्वयंसिद्ध माध्यमाबद्दल केलेले लेखन, परीक्षण, विश्लेषण, व्यक्तिचित्रण, संगीताचा विचार, अनुभव, आत्मचरित्र, चरित्र यांचा मोठा विस्तार आज पाहायला मिळतो. चित्रपटाची भुरळ सर्वांनाच पडते. अगदी सामान्य कष्टकरीसुद्धा चित्रपटाचा आश्रयदाता असतो; पण वेगळ्या जाणिवेनं लेखन करण्याची ऊर्मी असलेल्यांनी ते जरूर लिहावे, अगदी आज हातातल्या मोबाइलवर संपूर्ण सिनेमा पाहणाऱ्या रसिकानेही.

एक महत्त्वाचा दस्तावेज

तंबूमधल्या सिनेमापासून ते आजच्या मोबाइलवरील स्क्रीनपर्यंत सिनेमाबद्दलचे साहित्य हे एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. याचे एक कारण म्हणजे सिनेमा हा क्षणभंगुरता, उपेक्षा, विस्तृतीचे भक्ष्य आहे. अशाश्वततेचा शाप असलेलं माध्यम आहे. तरीही छाटलेल्या वृक्षाला पुन्हा पालवी फुटावी, असे त्याला वरदान आहे. त्यामुळेच सिनेसाहित्य हे काळाची साथ ठरू शकेल, असे एक मौलिक साधन आहे. त्याची उपेक्षा करणं किंवा त्याला दुय्यम, गौण मानणे हा अक्षम्य अपराध ठरेल. नित्यनवे रूप धारण करणाऱ्या सिनेमाचे तंत्र, साहित्य, कला, कलाकाराविषयी दृष्टिकोन हे परिवर्तनीय आहेत. बदल हा स्थायिभाव आहे. अशा या परिवर्तनीय, लवचीक माध्यमाची नोंद महत्त्वाची ठरेल. ताज्या चित्रपटाचे परीक्षण ते गतकाळाचा इतिहास हे साहित्याच्या विशाल परिघात येते. आर्थिक गणितही येते. वर्तमानकाळात घडणाऱ्या घटनांची राजकीय, सामाजिक, भावनिक घटनेची छायाही येते. तंत्र आणि कलेच्या हातात हात घालून अनिता पाध्ये, अनुराधा औरंगाबादकर, अरुणा अंतरकर, पद्माकर पाठकजी, श्रीकांत देशपांडे, स्वप्नील पोरे यांनी दमदार लेखन केले आहे. यापुढेही लेखन करणारे डॉ. मृदुला दाढे, अपर्णा संत, सुहास किर्लोस्कर मंडळी त्यांची ताज्या दमाची लेखणी सरसावून पुढे आहेत.

सुप्रतिष्ठा व्हायला हवी

गीतयात्री माधव मोहोळकर यांचे लेखन तर सर्व पिढ्यांसाठी औत्सुक्याचा विषय आहे. अंबरीष मिश्र, शिरीष कणेकर, हेमंत देसाई (बाबूमोशाय),



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने स्मरणिकेची निर्मिती केली जाते. आजवर ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने संपन्न झालीत. या संमेलनानिमित्त त्या त्या वेळी स्मरणिका प्रकाशित केल्या गेल्या. अशा स्मरणिका वाङ्मयीन आणि सांस्कृतिक दृष्ट्या एक वैभवसंपन्न दस्तावेज ठरतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्मरणिकांवर काही लोकांनी शोधनिबंध आणि शोध प्रबंधदेखील निर्माण केलेले आहेत.

नोंद

नंदिनी आत्मसिद्ध, मधू पोतदार, वसंत पोतदार यांनी सुंदर साहित्यिक भाषेत चित्रपटसाहित्य सजवले आहे. इसाक मुजावरांनी तर सुवर्णकाळाच्या संगीताचा भव्य नेत्रदीपक इतिहास मांडला आहे. हिंदी चित्रपटसंगीताची परंपरा सुविख्यात संगीततज्ज्ञ डॉ. अशोक दा. रानडे यांनी भारदस्तपणे मांडली आहे. अरुणाताई दामले यांनी प्रभातच्या चित्रपटाची संगीत परंपरा सविस्तर सांगितली आहे. शशिकांत किणीकर, कृपाशंकर शर्मा हे सातत्याने लिहीत राहिले. आता नियतकालिकांत, वृत्तपत्रांतून आणि फेसबुकसारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून दमदारपणे धर्मजय कर्णे, उदय सप्रे, धनंजय कुलकर्णी, वंदना कुलकर्णी हे चित्रपट आणि चित्रपट संगीताचा विषय नेटाने लिहितात. मात्र साहित्य शारदेच्या दरबारात यांची सुप्रतिष्ठा व्हायला हवी. तरच चित्रपटाची सुंदर दुनिया जीवित राहील. चित्रसंस्था, लेखक, दिग्दर्शक, कवी, संगीतकार, नायक कलावंत, अभिनेते, तंत्रज्ञ, संकलक, ध्वनिमुद्रक यांची आणि चित्रपटांची न संपणारी गोष्ट सांगायला हवी, लिहायला हवी आणि त्याला प्रतिष्ठा हवी, हे नक्की. चित्रपटसाहित्य गावकुसाबाहेरून घरात आणायला हवे. आपण आता एकविसाव्या शतकात आहोत.

(लेखिका ज्येष्ठ सिनेअभ्यासक आणि समीक्षक आहेत.)





दिलीप ठाकूर
मो.: ९८७०६१६२१६

चित्रपटविषयक लेखनाला गांभीर्याने घ्या

चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा का बरे नसावा, हा एक गहन प्रश्न आहे. खरेतर अतिशय आवडीने आणि उत्सुकतेने चित्रपटविषयक लिखाण वाचले जाते; पण या लिखाणाला साहित्याचा दर्जा देताना मात्र हात आखडता घेतला जातो.

चित्रपट हा 'दिसतो' तितका व तसा सोपा विषय नाही. चित्रपट पाहताच तो चांगला की वाईट, आवडला की नाही, पैसावसूल मनोरंजन होते की वेळ वाया गेला हे पटकन सांगून मोकळे व्हायचे, असे तर मुळीच नाही. मग तो पारंपरिक मसालेदार मनोरंजन चित्रपट असो वा समांतर प्रवाहातील चित्रपट असो, सोपं काहीच नाही.

गोष्टलेखन, अभिनय, गीत, संगीत, पार्श्वगायन, नृत्य, चित्रकला, कला दिग्दर्शन, गोष्टीनुसार चित्रीकरण स्थळे, छायाचित्रण, संकलन अशा अनेक कला आणि त्याला तंत्रज्ञानाची जोड; यातून चित्रपट आकार घेत गेल्यावर त्याची विविध माध्यमांतून पूर्वप्रसिद्धी, वितरण, प्रदर्शन, त्याची समीक्षा, त्याचे यशापयश असा बराच मोठा वळणावळणाचा, एकमेकांत गुंतलेला, गुरफटलेला प्रवास आहे आणि या सगळ्यात लागणारा पैसा, हे सगळे घडवायला नियोजन व यंत्रणा हवी, माणसं हवीत. चित्रपट दृश्यमाध्यम आणि त्याचा व्यवसाय असे हे समीकरण आहे. एक वेगळेच विश्व आहे. बहुस्तरीय वाटचाल सुरू आहे.

चित्रपट असा बनतो, काहींचा जमतो, अनेकांचा फसतो. अनेक चित्रपट मुहूर्त वा काही दिवसांच्या चित्रीकरणानंतर डब्यात जातात. ही झाली एक अतिशय महत्त्वाची बाजू.

चित्रपटविषयक विपुल लेखन

आता दुसरी बाजू, याच चित्रपटमाध्यम व व्यवसायावर प्रसार माध्यमातून केले जाणारे विपुल लेखन. चित्रपटाच्या जन्मापासूनचा हा अखंड प्रवासच आहे. त्यात सगळेच लेखन फिल्मी नाही. अगदी विचारपूर्वक केलेले, शैलीदार, शब्दसौंदर्य असलेले, खोलवर निरीक्षण असलेले असेही आहे. कधी जड लेखन आहे, तर कधी त्याचे दुसरे टोक पानपूरके असेही आहे. कधी गंभीर लेखन आहे आणि कधी

मराठी भाषकांना एकत्र आणून त्यांच्यात 'भावनिक ऐक्य' निर्माण करण्याचे कार्य या संमेलनाच्या माध्यमातून झालेल्या भाषिक मंथनाने केल्याचा निष्कर्ष अनेक ग्रंथातून अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडलेला आहे. अध्यक्षांच्या या भाषिक विचारांची फलश्रुती म्हणजे 'मराठी भाषकांसाठी स्वतंत्र पुणे विद्यापीठाची स्थापना, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, शिक्षणाचे माध्यम मराठी, शासनव्यवहारात मराठी होय.

नोंद

टाईमपास करणारेही आहे.

चित्रपट समीक्षा, चित्रपटाचे विश्लेषण, चित्रपटसृष्टीचा इतिहास, निर्माता आणि दिग्दर्शकांची वाटचाल, जुन्या चित्रपटातील गीत व संगीत, चित्रपट चित्रीकरणाचे स्टुडिओ, मराठी चित्रपट आणि त्यातील या अशा गोष्टी, विविध विषयांवर कलाकारांच्या मुलाखती, जागतिक चित्रपट हे मुख्य प्रवाहात असते. या जोडीला कलाकारांच्या खाजगी गोष्टींच्या कुचाळक्या, त्यांची लफडी, भानगडी, कुलंगडी, त्यांचे बंगले, प्रशस्त घरे, त्यांची लग्ने, विवाहबाह्य संबंध, घटस्फोट, दुसरं लग्न वगैरे विविध कारणांमुळे रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या ओल्या पार्ट्या, याच सेलिब्रिटीजचे आकर्षक, मोहक, मादक फोटो सेशन, कधी त्याच फोटो सेशनमधील धाडसी (की अश्लील) पोझ, सनसनाटी मुलाखत, त्यावरून होणारे वाद-विवाद.

हे सगळेच मुद्रित माध्यमातून, उपग्रह वाहिनी आणि त्यात डिजिटल माध्यमाची भर. त्यात सवंगताच जास्त. उथळपणा फार. हे तर चित्रपटमाध्यम व व्यवसायाचे गांभीर्य घालवणारे आहे. चित्रपटाचे जग म्हणजे दिखाऊपणा व थिल्लरपणा आणि अखंड वाहता पैसा अशी प्रतिमा झाली आहे. चित्रपट संस्कृतीतील मेहनत, भावना, विचार या गोष्टी दुर्दैवाने दुर्लक्षित झाल्या आहेत.

एकूणच काय तर चित्रपटजगतातील अनेक गोष्टींवर प्रसार माध्यमातून न थांबता रतीब घातला जातोय. चित्रपटविषयक गोष्टी जाणून घेताना मोठमोठ्या कलाकारांच्या खाजगी गोष्टींमध्ये वाचक आणि प्रेक्षकांना जरा जास्तच रस असतो, असे अतिशय आत्मविश्वासाने मानले जाते.

देशभरातील विविध भाषांतील चित्रपटसृष्टीवर, त्याच्या इतिहासावर, वाटचालीवर, त्यातील चित्रपटांवर, कलाकारांवर, गीत-संगीतावर अनेक पुस्तके लिहिली आहेत; अनेक कलाकार, दिग्दर्शक, संगीतकार यांची चरित्रे, आत्मचरित्रे प्रकाशित होत असतात; काही खूप गाजतात, काहींच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित होतात, त्यातून ती व्यक्ती कशी घडली याचे उत्तर मिळते.

साहित्याचा दर्जा का नाही?

आपला प्रश्न आहे, चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा का नाही, तसे ते नसते का, की तसं असूनही ते दुर्लक्षित राहिलेय आणि नसेल तर त्यामागची कारणे काय असावीत? याचं एक कारण, चित्रपटाच्या एकूणच जगाकडे पाहण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन आहे हे माझ्या दीर्घकालीन प्रत्यक्षातील अनुभवावरून सांगेन. मी १९८२ पासून सिनेपत्रकारितेत कार्यरत आहे. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत प्रत्यक्षात भटकंती, लहानमोठ्या भेटीगाठी, मुलाखती व निरीक्षण यातून माझी वाटचाल सुरू आहे. मुंबईतील इंग्रजकालीन सिंगल स्क्रीन थिएटर अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते मल्टीप्लेक्स, मुंबई व कोल्हापूर येथील चित्रिकरणाचे पारंपरिक स्टुडिओ, मुंबईतील लहान मोठे रेकॉर्डिंग स्टुडिओ, मिनी थिएटर, चित्रपट वितरक व प्रदर्शकाच्या भेटीगाठी, मुंबई तसेच देशातील विविध शहरांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभागी होणे अशा चौफेर वाटचालीतून सतत जाणवत व दिसत राहिलेली गोष्ट म्हणजे, हे प्रचंड असे क्रिएटिव्ह क्षेत्र आहे. विविध स्तरांवर येथे कमी अधिक दर्जाची, क्षमतेची अशी निर्मितीची प्रक्रिया सुरू आहे. कृष्णधवल अर्थात ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रपट ते रंगीत चित्रपट, सोळा एम.एम., पस्तीस एम.एम., सिनेमास्कोप, सत्तर एम.एम. असा हा प्रवास आहे. कलेसाठी कला (या चित्रपट क्षेत्रात काहीतरी भरीव कामगिरी करण्यासाठी झपाटून जाणे); जीवनासाठी कला (त्याच झपाटलेपणात व्यावसायिक दृष्टिकोनाची जोड), पैशासाठी कला (भरपूर नि भरभर पैसा मिळवायचे साधन म्हणजे हा चित्रपट व्यवसाय) हा प्रवास काळानुसार घडत गेला. याच व्यवसाय-वाढीत अनेक अपप्रवृत्तीही आल्या, वाढल्या व रुजल्या आणि या चित्रपटसृष्टीकडे स्वप्ननगरी म्हणून पाहणे बाजूला पडत गेले आणि प्रचंड दिखाऊ क्षेत्र अशीच या क्षेत्राची प्रतिमा बनली. चित्रपट निर्मितीचा अवाढव्य खर्च आणि शुक्रवारी चित्रपट प्रदर्शित झाल्याबरोबर प्रत्येक हाऊसफुल्ल गर्दीतील खेळासह उत्पन्नाचा वाढता आकडा याने चित्रपट हा मनोरंजनातून प्रबोधन करणारे माध्यम व व्यवसाय ही प्रतिमा धुसर होत गेली.

गंभीरपणे घेतले जात नाही

या सगळ्याच प्रवासात काही गोष्टी निश्चितच अपवाद आहेत. या सगळ्यातून एक गोष्ट अधोरेखित होत राहिली, चित्रपटविषयक लेखन फार गंभीरपणे घेण्याची फार आवश्यकता नाही. फार तर, जुन्या काळातील चित्रपटसृष्टीवरील पुस्तके साहित्यिक मूल्य असलेली



कवी सुधांशु आणि कथाकार म. भा. भोसले यांनी औदुंबर येथे सुरू केलेले 'सदानंद साहित्य संमेलन' ऐंशी वर्षांहून अधिक काळ अखंडपणे दरवर्षी मकर संक्रातीच्या दिवशी भरत असते. महाराष्ट्रातल्या मुख्य साहित्य संमेलनांव्यतिरिक्त ग्रामीण भागात भरणारे महाराष्ट्रातले हे पहिले साहित्य संमेलन होय. या संमेलनाला महाराष्ट्रातले जवळजवळ सर्व ख्यातनाम लेखक, कवी, नाटककार, ललित लेखक, समीक्षक अध्यक्ष म्हणून हजर राहिले आहेत

मानावीत. चित्रपटसृष्टीच्या वाटचालीवर फोकस टाकताना रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१५ ऑगस्ट १९७५) पर्यंतचा चित्रपट आणि त्यानंतरचा चित्रपट अशीच मांडणी केली जाते. १९७० पर्यंतचाच चित्रपटाचा काळ सुवर्णकाळ होता आणि त्यानंतर घसरण सुरू झाली, असे मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे १९७० पर्यंतच्या काळापर्यंतच्या चित्रपटसृष्टीवर मोठ्याच प्रमाणावर सातत्याने लिहिले गेले, त्यात केवढी तरी पुनरावृत्ती होत आहे आणि म्हणूनच चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा मिळत नसावा का?

दादासाहेब फाळके यांनी आपल्याकडचा पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' निर्माण केला तो ३ मे १९१३ रोजी गिरगावातील कॉरोनेशन चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. तो मूकपट आहे आणि तेव्हापासून आपल्याकडे मूकपटाची निर्मिती सुरू झाली. विशेष म्हणजे, 'राजा हरिश्चंद्र' साठी दादासाहेब फाळके यांनी दादरला पूर्व बाजूच्या मथुरा भवनमध्ये या चित्रपटाच्या निर्मितीसाठी स्टुडिओ उभारला. तेथे त्यांनी तब्बल आठ महिने शूटिंग करीत हा चित्रपट पूर्ण केला. यामुळे मुंबईत मूकपटाची निर्मिती सुरू झाली. सुरुवातीच्या काळात असेच पौराणिक मूकपट निर्माण होत. मग नाशिक शहरात फाळके यांच्या कंपनीने मूकपट निर्मिती सुरू केली. पुणे शहरात पाटणकर फ्रेन्डस ॲण्ड कंपनीने संतपट निर्मिती सुरू केली. कोल्हापूरला प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. असे करता करता निर्मिती संस्था आणि शहरे वाढत गेली आणि त्यात मुंबईचे महत्त्व कायम राहिले. प्रभात फिल्म कंपनीनेच व्ही. शांताराम दिग्दर्शित 'अयोध्येचा राजा' या आपल्या पहिल्या मराठी बोलपटाची निर्मिती केली. १९३२ सालची ही गोष्ट आहे. ६ फेब्रुवारी १९३२ रोजी हा बोलपट गिरगावातील मॅजेस्टिक थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. तत्पूर्वी अर्देशीर इराणी यांनी 'आलमआरा' हा पहिला हिंदी बोलपट मुंबईत निर्माण केला. तो १४ मार्च १९३१ रोजी गिरगावातील मॅजेस्टिक थिएटरमध्येच प्रदर्शित झाला. त्याची निर्मिती ग्रँट रोड परिसरातील 'ज्योती स्टुडिओ'त झाली. आता चित्रपट बोलू लागला. मूकपटाचा काळ आता मागे पडू लागला आणि बोलपटाचे युग हळूहळू आकार घेऊ लागले. देशाच्या इतर भागातही हळूहळू स्थानिक, प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मिती होऊ लागली. त्या काळात मुंबई, पुणे, कोल्हापूर, मद्रास (आताचे चैन्नई), लाहोर (आता पाकिस्तानात), कलकत्ता (आताचे कोलकाता) ही चित्रपट निर्मितीची मुख्य केंद्रे होती. हे माध्यम व व्यवसाय हळूहळू आकार घेत होते. मद्रासला दक्षिण भारतातील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांची, तर कोलकाता येथे बंगाली चित्रपटाची निर्मिती होई. मुंबई आणि लाहोर येथे हिंदी, तर पुणे आणि कोल्हापूर येथे मराठी चित्रपटांची निर्मिती होई. फाळणीनंतर लाहोर पाकिस्तानला गेले. फाळणीच्या वेळी दोन्हीकडील अनेक हिंदी चित्रपट अर्धवटही राहिले. हाही एक विषय आहे. तो का दुर्लक्षित राहिला याच्या कारणाचा शोध घ्यायचा, तर मेहनत आली. बरेच शोधकार्य करावे लागेल. ती करण्यासाठी झपाटून काम करायला हवं. चित्रपटविषयक लेखनात वेगळी भर पडली असती.

चित्रपट निर्मितीची वाढ

आपण प्रामुख्याने मुंबईचा विचार करू. मुंबईत एकेक करत स्टुडिओ उभे राहत होते आणि चित्रपट निर्मितीची वाढ होत गेली. ती होताना देशाच्या विविध भागांतून कलाकार, लेखक, कवी, गीतकार, संगीतकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कामगार मुंबईत येऊ लागले कारण येथे संधी होती. हे माध्यम व व्यवसाय येथे मूळ धरत होते. त्याची वाढ होत होती. तीसच्या दशकात प्रभात (पुणे शहरात), न्यू थिएटर्स (कोलकाता) आणि बॉम्बे टॉकीज (मुंबईत) यांनी चित्रपट निर्मितीचा पाया रुजवला. 'बॉम्बे टॉकीज'चा जन्म १९३६ चा मुंबईतीलच. चित्रपती व्ही. शांताराम यांनी १९४३ मध्ये मुंबईत परेल येथे 'राजकमल स्टुडिओ' उभारला.

मुंबईत एकेक करत स्टुडिओ उभे राहत जाताना एक गोष्ट झाल्याचे दिसते, चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शकांचा आपला स्वतःचा स्टुडिओ असावा, असा जास्त कल राहिला. त्या काळाशी ते सुसंगत होते. काही उदाहरणे सांगायची तर, राज कपूरने १९४८ मध्ये चेंबूरला 'आर. के. स्टुडिओ'ची स्थापना केली. कमाल अमरोही यांनी अंधेरीच्या महाकाली परिसरात भव्य 'कमालिस्तान स्टुडिओ' उभारला. शशीधर मुखर्जी यांनी अगोदर गोरेगावला 'फिल्मीस्तान' तर अंधेरी पश्चिमेला आंबोली येथे 'फिल्मालय स्टुडिओ' उभारला. मेहबूब खान यांनी वांद्र्याला 'मेहबूब स्टुडिओ' उभारला. रामानंद सागर, शक्ती सामंता, प्रमोद चक्रवर्ती, एफ. सी. मेहरा

मराठी भाषेचा सर्वांगीण प्रचार व प्रसार वैश्विक स्तरावर होण्यासाठी तसेच, सर्वांमध्ये मराठीतून संवाद करण्याची रुची निर्माण करण्यासाठी, दैनंदिन वापरामध्ये मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करण्याकरिता 'मराठी तितुका मेळवावा' या हेतूने मराठी भाषा विभागामार्फत मुंबई येथे जानेवारी २०२३ मध्ये 'विश्व मराठी संमेलन' आयोजित करण्यात आले होते.



आत्माराम या निर्मात्यांनी अंधेरी कुर्ला रोडवर 'नटराज स्टुडिओ' उभारला. दादरला चंदूलाल शहा यांचाच 'रणजित स्टुडिओ', साकीनाकाजवळ हेमंत कदम या मराठी माणसाने 'चांदिवली स्टुडिओ' उभारला. गुलशन रॉय यांचा 'त्रिमूर्ती स्टुडिओ' दहिसर येथे सुरू झाला. या वाटचालीत मुंबईत आणखी काही चित्रपट शूटिंग स्टुडिओज्ची संख्या वाढली.

प्रत्येक गोष्टीत एक कथा

म्हणजेच मुंबईत चित्रपटसृष्टी खोल खोल रुजत गेली. त्यात आघाडीच्या निर्मिती संस्था मुंबईत होत्या. काही आदरयुक्त नावे सांगायची, तर व्ही. शांताराम यांची 'राजकमल फिल्म्स', राज कपूरची 'आर. के. फिल्म्स', बिमल रॉय यांचे 'बिमल रॉय प्रॉडक्शन्स', आनंद बंधूंची 'नवकेतन' त्यातीलच. मग चेतन आनंदचे 'हिमालय फिल्म्स', बी. आर. चोप्रा यांची 'बी. आर. फिल्म्स', सोहराब मोदींचे 'मिनर्व्हा मुव्हीटोन' तसेच मेहबूब खान, कमाल अमरोही, के. असिफ, रामानंद सागर यांचे 'सागर आर्ट्स' अशा अनेक निर्मात्यांनी मुंबईत सातत्याने चित्रपट निर्मिती केली. आज पाहिलं तर मुंबईतील अनेक जुने चित्रपट स्टुडिओ, सिंगल स्क्रीन थिएटर्स, चित्रीकरणाचे बंगले आणि जुन्या काळातील कलाकारांचे बंगलेही इतिहासजमा झाले आहेत. या प्रत्येक गोष्टीत एक कथा आहे, कादंबरीही होईल. अनेक नाट्यमय प्रसंग आहेत. यशापयश आहे. ते काही प्रमाणात वाचकांसमोर वा प्रेक्षकांपर्यंत पोहोचले आहे. त्यातील माहिती व मनोरंजन आवडलेही आहे; पण त्याला साहित्याचा दर्जा वा मूल्य दिले गेले नाही.

मला वाटतं, चित्रपट माध्यम व व्यवसायाला तब्बल एकशेबारा वर्षे पूर्ण होऊनदेखील चित्रपटविषयक लेखनाला साहित्याचा दर्जा वा मूल्य का प्राप्त झाले नाही याचे उत्तर नक्कीच मिळाले असेल आणि यापुढच्या ए. आय. युगात ते मिळणे दुरापास्त आहे. चित्रपटविषयक गोष्टी वाचायला, ऐकायला, पाहायला आवडतील; पण त्याबद्दल फार गांभीर्याने काही दृष्टिक्षेप टाकेल, असे वाटत नाही.

(लेखक ज्येष्ठ चित्रपटसमीक्षक आहेत.)

कृष्णा - कोयना
नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड.
प्रशासकीय कार्यालय : १३५/२, मंगळवार पेठ, कराड - ४१५ ११०. ता. कराड, जि. सातारा.
Web : www.krishnakoyanapatsanstha.com I Email : kknsp.karad@gmail.com

आर्थिक प्रगती

ठेवी	११३ कोटी ०६ लाख	स्वनिधी	१७ कोटी ८९ लाख
कर्ज	८४ कोटी ८४ लाख	खेळते भांडवल	१३६ कोटी ४६ लाख
गुंतवणूक	४४ कोटी ०६ लाख	नफा	१ कोटी २२ लाख
ऑडिट वर्ग	"अ"	एकत्रित व्यवसाय	१२७ कोटी ९० लाख

अ.नं.	शाखा	मोबाईल नं.	फोन नं.
१	प्रशासकीय कार्यालय	९६७५४७२७७	(०२१६४) २२४०४१
२	मंगळवार पेठ, कराड	९९२२४४४८५९	(०२१६४) २२१०४१
३	मसूर	९९२२४४४८५८	(०२१६४) २५२६९६
४	मलकापूर	९९२२४४४८६१	(०२१६४) २४३०५९
५	उंब्रज	९९२२४४४८५१	(०२१६४) २६४२१८
६	विद्यानगर	९९२२४४४८५७	(०२१६४) २७३९८१
७	तळमावले	९९२२४४४८६०	(०२३७२) २७२४४०
८	नवारस्ता	९९२२४४४८६२	(०२३७२) २९९०८२
९	रेठरे बु।। (शिवनगर)	९३२३७०२३२२	(०२१६४) २६६३००
१०	पाटण	८९५६४७४८५६	(०२३७२) २८२६०३

महाव्यवस्थापक श्री. अरुण शंकर पाटील | व्हा. चेअरमन श्री. सचिन विठ्ठल चव्हाण | चेअरमन श्री. बाबासो शामराव पाटील

नोंद

ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या शिरवाडे गावाला कवितांचे गाव जाहीर करण्यात आले आहे. या गावात दोन दिवसीय कुसुमाग्रज महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिरवाडे येथे दरवर्षी कार्यक्रम होतात. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी हा निर्णय घेतला होता.

परिसंवाद : मराठी प्रकाशकांसमोरील आव्हाने

दिवसेंदिवस कमी होणारी वाचक संख्या आणि पुस्तकाच्या वाढत्या किमती हा नेहमीच चर्चेत राहणारा विषय आहे. पुस्तकाच्या निर्मितीत प्रत्यक्ष सहभाग असलेल्या मराठी प्रकाशकांसमोर कोणती आव्हाने आहेत? त्याची मांडणी या परिसंवादात प्रकाशन व्यवसायाशी संबंधित मान्यवरांनी केली आहे.



रामदास भटकळ
मो.: ९८२०८७१४०८

मराठी प्रकाशन क्षेत्रातील बाधा

रोज नव्याने होणाऱ्या मुद्रण क्षेत्रातल्या बदलामुळे मुद्रणाची आणि निर्मितीची पद्धतच बदलत आहे. त्यातच वाचकांची आवड आणि निवडही बदलत चालली आहे. वाचकांना अन्य आधुनिक पर्याय उपलब्ध होऊ लागल्याने मात्र प्रकाशन व्यवसायासमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत.

मराठी प्रकाशन व्यवसायाची स्थिती आणि आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती यात विलक्षण साम्य आहे. जगातल्या सर्वांत धनवान मंडळीत एका बाजूने भारतीय नागरिक आहेत याची प्रौढी आपण मिरवत असतो. क्रिकेट, सिनेमा अशा क्षेत्रांत कोटीची भाषा सहजपणे घेतली जाते. तसेच आपल्या देशात दारिद्र्यरेषेखाली दरिद्री नारायणाची संख्या काही कमी होत नाही. आर्थिक विवंचनेमुळे आत्मघात करणाऱ्यांची संख्याही वाढतच आहे. असाच काहीसा प्रकार निदान मराठी प्रकाशनविश्वात आढळतो. रोज नव्याने होणाऱ्या मुद्रण क्षेत्रातल्या बदलामुळे मुद्रणाची आणि निर्मितीची पद्धतच बदलत आहे. एकेकाळी लेटर प्रेस पद्धतीने निदान हजार प्रती छापण्याची पद्धत होती. ऑफसेट पद्धत आल्यावर हा आकडा वाढू लागला; परंतु आत्ताच्या पीओडीसारख्या नवीन तंत्रामुळे छोटी आवृत्ती शक्य होते आहे. जवळजवळ प्रत्येक लेखक घरी बसून डीटीपी करू शकतो. त्यामुळे पुस्तक प्रकाशन करणे किंवा करवून घेणे हे अनेकांना सहजसिद्ध वाटू लागले आहे. कमी प्रती छापणे शक्य झाल्याने पुस्तकांची संख्या कदाचित जरा वाढत असावी, जरी प्रतींची संख्या कमी होत असली तरी.

वाढती किंमत

प्रती कमी होतात तशा किमती मात्र वाढत जातात. माझ्यासारख्या प्राचीन वाटणाऱ्या प्रकाशकाला तर हे फार जाणवते. १९७२ साली मी मराठी प्रकाशनाला सुरुवात केली तेव्हा तीन रुपयाला चांगले पुस्तक प्रसिद्ध करता येत असे. बालवाङ्मय तर काही आण्यांना (एक रुपया म्हणजे सोळा आणे) मिळत असे आणि जेव्हा विंदा करंदीकर यांच्या 'राणीची बाग' सारख्या रंगीत पुस्तकाची किंमत दोन रुपये ठेवली गेली तेव्हा भल्याभल्यांनी नाके मुरडली. त्यातून देशातील राज्यकर्त्यांनी हा देश श्रीमंतांचा आणि पैसेवाल्यांसाठीच आहे, असे गृहीत धरलेले

नोंद

महाराष्ट्र राज्याच्या मराठी भाषा विभागांतर्गत 'भाषा संचालनालय', 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ', 'महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ' व 'राज्य मराठी विकास संस्था' अशी ४ कार्यालये कार्यरत आहेत. या चार कार्यालयांकडून मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवण्यात येतात. या सर्व उपक्रमांना गती देण्यात आली आहे.

दिसते. त्यामुळे कागदाच्या किमती आणि पोस्टाचे दर यांच्यात वारेमाप वृद्धी झालेली दिसते. त्यामुळे याच पुस्तकाच्या किमती शेकडोंनी मोजता येतात आणि चार आकडी किमती काही पुस्तकांवर बिनदिक्कत विराजमान होत असतात.

साहजिकच पुस्तकविक्रेत्यांना आणि वाचणाऱ्यांना निघणाऱ्या असंख्य पुस्तकांपैकी मोजकी पुस्तके ठेवणेही कठीण जाते. त्यामुळे आज पुस्तकविक्रीची पद्धतच बदलताना दिसते.

विक्रेते कोण

महाराष्ट्रात नाही तरी पुस्तकविक्रेता म्हणजे क्रमिक पुस्तके आणि त्याहून गाईड पुस्तके विकणारा, असे मानले जात असे. महाराष्ट्रातील शहरातून नव्याने प्रसिद्ध झालेली पुस्तके पाहायला मिळणे हे फक्त फिरत्या प्रदर्शनातून शक्य झालेले आहे. प्रदर्शनात होणाऱ्या विक्रीचे अतिशयोक्त वर्णन वाचून आपली दिशाभूल होते. उदाहरणार्थ, एखाद्या संमेलनात पाच कोटी रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली, असे बिनदिक्कत छापण्यात येते. याचा अर्थ त्या प्रकाशकांकडे त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांच्या प्रतींचे मूल्य कित्येक कोटी असायला हवे. शिवाय पॉप्युलर प्रकाशनाची प्रदर्शनातील एकूण विक्री लक्षात घेता अंदाज बांधता येतो. पॉप्युलर जरी खपाऊ पुस्तकांचे प्रकाशक म्हणून नावाजले नसले तरीही ती प्रकाशने हवीशी वाटणारे ग्राहक पुरेसे आहेत. शिवाय प्रदर्शनासाठी होणारा खर्च लक्षात घेतला जात नाही.

अडचणींचा पाढा

पुस्तकालयासाठी मोक्याची जागा लागते. आज अशा जागांची किंमत दिवसेंदिवस परवडण्याच्या पलीकडे जात आहे. या सगळ्या अडचणींचा पाढा सुरुवातीलाच वाचण्याचे कारण इतर कारणांचा शोध घेण्यापूर्वी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे आपल्या हातात नसलेल्या अशा घटनांकडे बोट दाखवण्यापलीकडे कल जातो. उदाहरणार्थ, पहिल्यांदा चित्रपट आणि बोलपट आले तेव्हा रंगभूमीला हलाखीचे दिवस आले अशी समजूत झाली. त्याचप्रमाणे दूरचित्रवाणीसारखी नवीन माध्यमे घराघरातून आली त्यामुळे वाचन-संस्कृतीवर मर्यादा आल्या अशी समजूत झाली त्याचा विचार करावाच लागणार आहे; परंतु त्याआधी आपण आपल्या मातीच्या पायांकडे पाहणे आवश्यक आहे.

प्रयत्न झाले

आपणच निर्माण केलेल्या काही अडचणींवर मात करण्याचे काही प्रयत्न झाले, त्याची नोंद केली पाहिजे. ललित पुस्तकांच्या विक्रीची सोय करणाऱ्या पुस्तक विक्रेत्यांची साखळी निर्माण व्हावी म्हणून देशमुख आणि कंपनीचे रा. ज. देशमुख यांनी सुरुवातीला एका नवीन कोल्हापूरच्या विक्रेत्याला तयार केले. त्यांनी परिचित अशा प्रकाशकांना विनंती केली. त्यांनी त्या विक्रेत्याला आपल्या उपलब्ध पुस्तकांची एक एक प्रत बिलावर फक्त २५ टक्के कमिशन देऊन उधारीवर पाठवावी. त्या बिलाची हमी ते स्वतः घ्यायला तयार होते. जसजशी पुस्तके विकली जातील तसतशी तो विक्रेता त्या पुस्तकाची मागणी करेल आणि ते पैसे रोखीने मिळतील. हा उपक्रम यशस्वी झाला असता, तर प्रत्येक महत्त्वाच्या शहरात तशी व्यवस्था करता आली असती.

वस्तुतः सर्व महत्त्वाच्या प्रकाशकांनी सहकार केला असता तर ही पद्धत मूळ धरण्याची शक्यता होती. देशमुख आणि इतर काही ज्येष्ठ प्रकाशक पुढे आले असते; परंतु ही कल्पना आपण छोट्या मोठ्या प्रकाशकांनी कशी मोडली ते लक्षात घेतले पाहिजे. जसजसा हा विक्रेता: मला नाव आठवत नाही; ललित पुस्तकांच्या उपलब्धतेसाठी ओळखला जाऊ लागला तसे काही प्रकाशक त्याला जास्त सवलत देऊन लोभाऊ लागले. तोही विक्रेता कदाचित मोहात पडला असेल, जास्त कमिशन आणि उधारीची सोय कोणाला नको असते. हळूहळू शिस्तीचे भोक्ते असे देशमुख नाराज झाले आणि त्यांनी हा प्रयोग बरखास्त केला.

प्रत्येक जिल्ह्यात प्रदर्शन

फार नंतर पॉप्युलर प्रकाशनाने आपल्या रजत जयंती निमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात प्रदर्शन भरवण्याचा विडा उचलला. ही १९७७-७८ ची गोष्ट. अरुण गाडगीळ हे उत्साही ग्रंथ प्रसारक होते. त्यांनी ही प्रदर्शन मालिकेची जबाबदारी घेतली. तेव्हा प्रत्येक तीन दिवसांच्या प्रदर्शनाला १२५०/- रुपये इतका खर्च अपेक्षित होता. तो जर पाच प्रकाशकांनी वाटून घेतला असता, तर प्रत्येकाला अडीचशे रुपये देऊन त्या गावात आपली सर्व पुस्तके उपलब्ध करून प्रदर्शित करण्याची आणि विक्रीची संधी मिळाली असती. पुस्तके निरनिराळ्या प्रकारची

राज्य मराठी विकास संस्थेकडून अमराठी भाषकांसाठी अध्यापन साधने विकसित करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या पुढाकाराने 'मायमराठी' हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत सन २०१८ मध्ये ३८ लाख रुपये अर्थसाहाय्य वितरित करण्यात आले होते. या अनुदानात सद्य:स्थितीत भरीव वाढ करण्यात आली आहे.

नोंद



असल्यास ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्य मिळेल म्हणून नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया बुक हाऊसचे अमरचित्रकथा असे दोघे तयार झाले. नॅशनल बुक ट्रस्ट हो म्हणाले; पण हा फक्त मराठी पुस्तकांसाठी पक्षपात का म्हणून त्यांनी पहिल्या पुस्तक प्रदर्शनासाठी पुस्तके पाठवूनही आपला आर्थिक सहभाग नाकारला. इतर भाषांत जर कोणी जबाबदारी घेत असेल, तर त्या भाषेसाठीही अनुदान द्या, असे त्यांना पटवण्याचा आम्ही प्रयत्न केला; पण ते शक्य झाले नाही आणि तो प्रयत्न फसला.

साहित्य संमेलनात पुस्तकांची विक्री

काही साहित्य संमेलनांत पुस्तकांची विक्री चांगली होते, असा प्रवाद आहे. भाग घेण्यास खर्च किती झाला ते कोणी सांगत नाही. कमीत कमी खर्चात विक्री कशी करायची यासाठी फारसे प्रयत्न होत नाहीत. या परीक्षणातून दिसलेल्या त्रुटी, याशिवाय वाचन संस्कृतीवर रोज नवीन तंत्राचे हल्ले होत आहेत. दूरदर्शनचे वेड लागणे सोपे आणि उगाचच त्या परक्या लोकांच्या सुख-दुःखात आपण सामील होतो. मुख्य म्हणजे यात वेळ जातो. त्याचप्रमाणे मुंबईपुण्यासारख्या शहरांत प्रवासासाठी लागणारा वेळ बेसुमार वाढला आहे. कटकटीच्या प्रवासात येणारा थकवा वेगळाच. पूर्वी ग्रंथालयातून पुस्तक आणून वाचायचे यात धन्यता वाटायची; परंतु काही ग्रंथपालांना लागलेली भ्रष्टाचाराची किड, शासनाची अनुदानाच्या बाबतीत हयगय आणि वाढलेल्या किमती यामुळे वाचनालयाच्या उपयुक्ततेला बंधने आली आहेत. मराठी पुस्तके घरी वाचायला द्यावीत तर अनामत रक्कम किती वाढवायची हा यक्षप्रश्न उभा राहतो. यातील काही प्रश्न सोडवणे, हे प्रकाशकाच्या हाती नसल्याने त्यांचा फक्त उल्लेख केला आहे.

(लेखक पॉप्युलर प्रकाशनचे संचालक आहेत.)

नोंद

भाषा संचालनालयाने दैनंदिन प्रशासन व न्याय व्यवहारात सातत्याने उपयोगी होणाऱ्या अ) कार्यदर्शिका ब) प्रशासन वाक्यप्रयोग क) शासन व्यवहार कोश ड) न्याय व्यवहार कोश या भ्रमणध्वनी ॲपचे काम पूर्ण केले असून वरील चार कोशांमध्ये सुमारे ८६ हजार मराठी/इंग्रजी शब्दांचा समावेश आहे. परिभाषा कोश अद्ययावतीकरण करण्याचे काम सातत्याने सुरू असते.



अरविंद पाटकर
मो.: ९९२२५५६६६३

वितरण व्यवस्थेची समस्या

दिवसेंदिवस कमी होणारी वाचक संख्या आणि पुस्तकाच्या वाढत्या किमती हा नेहमीच चर्चेत राहणारा विषय आहे. पुस्तकाच्या निर्मितीत प्रत्यक्ष सहभाग असलेल्या मराठी प्रकाशकांसमोर कोणती आव्हाने आहेत, याची मांडणी करणारा लेख.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, ही खूप आनंदाची बातमी आहेच, याबद्दल काही शंका नाही. तो दर्जा मिळावा यासाठी मराठी भाषकांनी जो लढा दिला, त्याचं हे यश आहे, असं आपण म्हणू शकतो; परंतु हे यश म्हणजेच मराठी भाषा समृद्ध झाली, ती ज्ञानभाषा बनली, तिचा वारू आता कोणी रोखू शकणार नाही, असं होत नाही. त्यासाठी अनेक पातळ्यांवर काम करण्याची गरज आहे. या सगळ्या प्रक्रियेत अनेक घटक आपापल्या पातळीवर काम करत असतातच, त्यांना गरजेनुसार मदत मिळावी लागते.

गंभीर अडचणी

उदाहरण म्हणून आपण मराठी प्रकाशन व्यवसायाची स्थिती पाहू या कारण हा दर्जा मिळालेला असताना मराठी प्रकाशन व्यवसाय हा अत्यंत गंभीर स्वरूपाच्या अडचणीतून जात आहे. अर्थात मराठी पुस्तकांचे वाचक किंवा मराठी भाषेचा, संस्कृतीचा अभिमान बाळगणारे मराठी भाषक म्हणून आपण याचा आजवर कधी विचारच केलेला नाही. वास्तविक कोणत्याही भाषेसाठी एकूण ग्रंथ व्यवहार हा खूप मोलाचा आणि महत्त्वाचा मानला जातो; कारण भाषिक समृद्धीसाठी जे जे घटक काम करतात त्या सर्वांसाठीचं पायाभूत काम प्रकाशन व्यवसायाच्या बळावर घडत असतं. त्या दृष्टिकोनातून मराठी प्रकाशन व्यवसायाकडे पाहिलं, तर काय दिसतं? थोडं बारकाईनं पाहिलं, तर आपल्या डोळ्यासमोर मराठी प्रकाशन व्यवसायाचं अत्यंत विदारक असं चित्र तरळेल.

हल्ली लोक वाचतात का?

हल्लीचे लोक पुस्तक वाचत नाहीत हा धोशा आज अनेक जण लावत असतात. जे लोक पुस्तक प्रकाशित करण्यासाठी लिहितात तेच अनेक वेळा प्रकाशकाला विचारतात, 'का हो, हल्ली लोक वाचतात का?' म्हणजे लिहिणाऱ्याचाच विश्वास

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ नवीन लेखन प्रकल्प या विषयावर विशेष लक्ष देते. नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य, लिंगायत, आनंद व अन्य संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङ्मयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कवितांचे प्रकाशन करण्यात येते. दरवर्षी २७ फेब्रुवारीला, मराठी भाषा गौरव दिन समारंभाच्या वेळी या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येते.

नोंद

नाही तरीही तो लेखक पुस्तक प्रकाशित करण्यासाठी धडपडत असतो. अशी आजची एकूण गमतीदार स्थिती आहे. हे खरे आहे, की महाराष्ट्राची जेवढी लोकसंख्या आहे त्या प्रमाणात पुस्तकांची विक्री होत नाही. महाराष्ट्रातील शाळा, कॉलेज यांची संख्या आणि त्यामधे काम करणाऱ्यांची संख्या लक्षात जरी घेतली तरी त्या तुलनेत मराठी पुस्तकांची विक्री कमीच होते. असं का घडत असावं? असा प्रश्न आपल्याला पडतो; पण त्यावर उपाय योजण्याच्या दृष्टीने आपण काय करतो हे एकदा नीट तपासून बघितलं पाहिजे. ते तसं बघितलं तर आपल्या लक्षात येईल की, मराठी वाचकांची संख्या कमी नाही. गरज आहे ती त्या वाचकांपर्यंत दर्जेदार पुस्तकं पोहोचवण्याची. नेमकी तीच व्यवस्था नीट नाही.

एकही दुकान नाही

महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे आहेत. त्यांपैकी २० जिल्ह्यात ललित साहित्याचं एकही दुकान नाही. उरलेल्या अठरा जिल्ह्यांत माझ्या माहितीनुसार मराठी ललित साहित्याची फक्त त्रेचाळीस दुकानं आहेत.(यात शालेय, धार्मिक, स्टेशनरी विक्रीची दुकानं गृहीत धरू नये.) आता काहींनी ऑनलाइन व्यवसाय सुरू केला आहे; परंतु ग्रामीण भागातला वाचक त्यापासूनही अद्याप दूर आहे. पूर्वी एस. टी. स्टँडवर पेपर स्टॉल्स असायचे आणि त्यावर पुस्तकं विकली जायची. गावोगावचे लोक पेपर घ्यायला म्हणून जायचे आणि त्यांची नजर पुस्तकांवर पडायची. त्यातून ग्रामीण वाचकांना हवी ती पुस्तकं विकत घेता यायची. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये हे स्टॉल्सही दिसत नाहीत. एस. टी. स्टँडवर इतर सर्व प्रकारची दुकानं असतात; पण पेपर स्टॉल्स बंद केले जातात ते का, हे एक कोडंच आहे. बसस्थान हे खेड्यापाड्यातल्या लोकांनी गजबजलेलं एकमेव ठिकाण आहे. आता तिथेही त्यांच्या नजरेस पुस्तकं पडत नाहीत. पूर्वी शाळांना ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी व इतर साहित्य यासाठी साडेबारा टक्के अनुदान मिळत असे. तेही शासनाने आता बंद केलेलं आहे.

ग्रंथालये

महाराष्ट्रात एकूण १२७०० अनुदानित ग्रंथालये आहेत, असाही एक मुद्दा काही जण उपस्थित करू शकतात; परंतु त्या ग्रंथालयात नक्की कोणती पुस्तके खरेदी केली जातात याचा विचार केला पाहिजे. चांगली दर्जेदार पुस्तकं



तिथं असतील आणि ग्रंथालयाने वाचकांना आकर्षित करण्यासाठी ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले, तर अनेक वाचक ग्रंथालयाकडे वळू शकतात; पण अनेक ठिकाणची अवस्था अशी आहे की, गावातल्या लोकांनाच माहिती नसतं की, आपल्या गावात ग्रंथालय आहे.

वितरण व्यवस्थाच नाही

माझ्या दृष्टीने विचार करता मराठी पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठीची जी एक यंत्रणा, व्यवस्था लागते ती वितरण व्यवस्थाच नाही. अतिशय

नोंद

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व त्यांच्या ४ घटक संस्था तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या ७ साहित्य संस्थांच्या साहित्यिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याकरिता आतापर्यंत या संस्थांना दरवर्षी प्रत्येकी ५ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येत होते. या अनुदानात वाढ करण्यात आली असून आता प्रत्येकी १० लाख रुपये इतके अनुदान दिले जाते.

तुटपुंज्या वितरण व्यवस्थेवर मराठी ग्रंथव्यवहाराचा डोलारा उभा आहे. इतर कोणत्याही व्यवसायाचा डोलारा हा त्यांच्या चांगल्या वितरणावर उभा असतो. विक्रीचे एक विशाल जाळे असते. अगदी आदिवासी पाड्यावरसुद्धा ती वस्तू सहज मिळते. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी. दोन कोटीचे शहर. किमान पन्नास टक्के मराठी माणूस राहत असणार. अशा ह्या शहरात फक्त पाच दुकानं ललित साहित्याची आहेत. माझ्या माहितीनुसार दादरच्या पुढे एकही दुकान नाही. मग येतो ठाणे जिल्हा. एकूण दुकानं चार. पालघर जिल्हा अवघं एक दुकान. रायगड जिल्ह्यात एकही दुकान नाही. असल्यास आनंद आहे. हीच अवस्था महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांची आहे.

इच्छाशक्तीची गरज

अशा अवस्थेत वाचक वाढणार कसे? खरं म्हणजे यावरही उपाय आहेत. गरज आहे ती इच्छाशक्तीची. सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा प्रशासकीय कार्यालयं आणि महत्त्वाची शासकीय कार्यालये येथे पुस्तकांची दुकानं सुरू करावीत. तसेच एस. टी. महामंडळाची जेवढी स्थानकं आहेत तिथे पुस्तकांची दुकानं सुरू करावीत. आता महामार्गावर खूप छान हॉटेल्स सुरू झाली आहेत. तिथे पुस्तकांची दुकानं लागतील यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. प्रत्येक अनुदानित शाळेत एक सुसज्ज ग्रंथालय असावं आणि त्यासाठी शासनाने खास अनुदान द्यावं. त्याचबरोबरीने 'आनंदाची शाळा' या पुरस्कारासाठी शाळांची निवड करताना सुसज्ज आणि वाचकांनी गजबजलेलं ग्रंथालय असणाऱ्या शाळांना प्राधान्य द्यावं. शालेय आणि माध्यमिक शिक्षकांना वाचनाची आवड निर्माण होईल यासाठी शासनाने खास शिबिरे आयोजित करावीत. शासनाच्या कोणत्याही कार्यक्रमात पाहुण्यांना शाल, पुष्पगुच्छ देण्याऐवजी पुस्तके भेट द्यावीत.

प्राधान्यानं खरेदी

ग्रंथालयांसाठीचे बंद केलेले सर्व उपक्रम सुरू करतानाच या ग्रंथालयांना आणखी एका गोष्टीची सक्ती केली पाहिजे. ती म्हणजे शासकीय पुरस्कारप्राप्त पुस्तकांची प्राधान्यानं खरेदी करणं. शासन दरवर्षी हजारो पुस्तकांना विविध पुरस्कार देत असते. तो लेखकाचा सन्मान असला तरी त्या माध्यमातून शासन त्या त्या पुस्तकांचा दर्जा अधोरेखित करत असते. त्यामुळे ती पुस्तकं शासनमान्य, अनुदानित ग्रंथालयात गेलीच पाहिजेत. यातून केवळ संख्या वाढवण्यासाठी ग्रंथालयांकडून केली जाणारी रद्दी पुस्तकांची खरेदी टळेल आणि वाचकांच्या हाती चांगली पुस्तकं पडतील.

दुसरी बाब जी. एस. टी. ची, प्रकाशकाला जी. एस. टी. नाही असं म्हटलं जातं; पण कागद, छपाई, बाईंडिंग, लेखक मानधन यावर तो आकारला जातो. त्यामुळे तो भार वाचकांवर टाकावा लागतो. तो रद्द करण्यात यावा, जेणेकरून पुस्तकांच्या किमती कमी होण्यास मदत होईल. सर्व आमदारांना वर्षातून एकदा पुस्तक खरेदीसाठी आमदार फंडातून फंड उपलब्ध करून देण्यात यावा आणि ती पुस्तकं त्या त्या मतदारसंघातील ग्रंथालयांना पुरवण्यात यावी. शासन त्यांच्या इतर उपक्रमांची जशी जाहिरात करतं तशी जाहिरात मान्यवरांना बरोबर घेऊन वाचनवृद्धीसाठी जाहिरात करण्यात यावी. खरं म्हणजे वाचन चळवळ जेवढी बहरेल तेवढा समाज सुधारेल. हे ब्रीद घेऊन शासनाने थोडा जरी प्रयत्न केला तरी भाषिक समृद्धी वाढवण्याच्या प्रयत्नांमध्ये प्रकाशकांना मोठं बळ मिळू शकतं. असं बळ देण्याचं काम शासनाच्या पातळीवर तसेच विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमातून उभं राहू शकलं, तर निश्चितपणे मराठी प्रकाशन व्यवसायाला ऊर्जितावस्था प्राप्त होईल.

(लेखक मनोविकास प्रकाशनाचे संचालक आहेत.)

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्यातर्फे मराठी विश्वकोशाचे १ ते २० या सर्व खंडाचे काम पूर्ण झाले असून यामध्ये सुमारे १८ हजार ५७ इतक्या नोंदींचा समावेश आहे. हा विश्वकोश शासनाच्या संकेतस्थळावर तसेच कार्ड, पेन ड्राईव्हच्या स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. या विश्वकोशाच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करण्याकरिता महाराष्ट्रातील विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था यांची मदत घेण्यात येते.



साकेत बाबा भांड
मो.: ९८२२४७८८९७

डिजिटल बदलांच्या उंबरठ्यावर मराठी प्रकाशन व्यवसाय

मराठी प्रकाशन उद्योग संक्रमणकाळातून जात आहे. आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक आव्हानांबरोबरच संधीही अफाट आहेत. परिवर्तनाची तयारी, नावीन्यपूर्ण विषयांची निवड, आधुनिक विपणन आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर यांमुळे मराठी साहित्याचा नवा उदय शक्य आहे.

मराठी प्रकाशन ही व्यावसायिक क्षेत्राची शाखा असली, तरी ती मूलतः सामाजिक बांधिलकीची परंपरा जपणारी संस्कृती आहे. आमच्या घरातील साहित्यवारसा आणि बाबांनी दिलेला संदेश ''प्रकाशन हा व्यवसाय नाही; समाजप्रबोधनाची धुरा आहे,'' ही भावना आमच्या प्रत्येक कृतीची दिशा ठरवत आली आहे. मराठी भाषा ही विचार, संस्कृती, भावविश्व आणि लोकपरंपरेचे प्रतिबिंब आहे. संतसाहित्यापासून आधुनिक कथा-कादंबऱ्यांपर्यंत मराठीने समाजमन घडवले. या परंपरेचे जतन करणे ही प्रकाशकांची जबाबदारी आहे. मात्र, डिजिटल युगात ही परंपरा अनेक आव्हानांसमोर उभी आहे.

वाचकसंख्येत घट

एकेकाळी घरा-घरांत दिवाळी अंक, कथा, कादंबऱ्या, चरित्र आणि मुलांची पुस्तके सहज आढळायची. पुस्तकांच्या दुकानांत वाचक तासन्‌तास रमायचे; मुलांना वाचनाची गोडी घरातूनच लागायची. डिजिटल युगाने हे चित्र बदलले. मोबाइल, सोशल मीडिया, व्हिडिओ प्लॅटफॉर्म्स, ऑनलाइन गेम्स यांमुळे मुलांचे लक्ष स्क्रीनकडे वळले. इंग्रजी माध्यमातील वाढते शिक्षण, मराठी वाचकसंख्येत घट हेही एक वास्तव आहे.

काळ बदलला तशी वाचकांची आवड-निवड बदलली, तत्काळ माहिती देणाऱ्या माध्यमांकडे ओढ वाढली. त्यामुळे प्रकाशकांना नवा वाचकवर्ग मिळवण्यासाठी नव्याने प्रयत्न करावे लागत आहेत. यातून बदलत्या काळाची पावले ओळखत आधुनिक विषय, संस्कारक्षम साहित्य आणि नव्या युगाला साजेशी पुस्तकं देण्याचा प्रयत्न आम्ही सुरू केला.

चेहरामोहरा बदलला

ई-बुक्स, ऑडिओबुक्स, किंडल, ऑनलाइन विक्री यांमुळे वाचनाचा चेहरामोहरा

नोंद

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्यातर्फे विषयनिहाय विविध ४७ ज्ञानमंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या ज्ञानमंडळांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन पद्धतीने विश्वकोशांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सर्व संबंधितांना विश्वकोश मंडळाकडून मार्गदर्शन करण्यात येते. त्याकरिता वेळोवेळी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

बदलला. इंग्रजी-हिंदी भाषांमध्ये डिजिटल प्रकाशन वेगाने वाढले असताना, मराठीतील डिजिटल सामग्री तुलनेने मर्यादित आहे. बहुतेक पारंपरिक प्रकाशकांना तांत्रिक साधने, प्रशिक्षण, गुंतवणूक आणि डिजिटल मार्केटिंगचा अभाव भासतो. तथापि, याच डिजिटल क्षेत्रात मोठ्या संधीही दडलेल्या आहेत. साकेत प्रकाशनाने कोव्हिडच्या काळात ऑनलाइन विक्रीचा मार्ग स्वीकारला. सातत्याने शिकत, प्रयत्न करत ऑनलाइन विक्रीची नस ओळखता आली. आज ई-पुस्तके, ऑडिओबुक्स, सोशल मीडिया प्रमोशन, आकर्षक प्रेझेंटेशन ही अनिवार्य साधने झाली आहेत. मात्र, या सर्वांसाठी लागणारे तंत्रज्ञान आणि आर्थिक गुंतवणूक अनेक प्रकाशकांसाठी आव्हान ठरते. मराठी पुस्तकांची विक्री मुख्यतः पारंपरिक दुकानांवर अवलंबून आहे. ऑनलाइन विक्री वाढत असली तरी अनेक प्रकाशकांना ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर प्रभावीपणे टिकणे कठीण जाते. आधुनिक मार्केटिंग, सोशल मीडिया जाहिरात, बुक रिव्ह्यूज, इन्फ्लुएंसर प्रमोशन यांचा वापर अद्याप कमी प्रमाणात आहे.

ग्रामीण भागात आव्हान

ग्रामीण भागात वितरण पोहोच कमी आहे. पुस्तक महोत्सव, प्रदर्शनं आणि शाळा-महाविद्यालयांत वाचनाला चालना देणारे कार्यक्रम कमी झाले आहेत. मोफत पीडीएफ्सची वाढ, पुस्तकांची पायरसी यांमुळे प्रकाशन व्यवसायाला मोठा धक्का बसतो. यासाठी 'साकेत'ने पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथे वितरण शाखा सुरू करून वितरण बळकट केले. मजबूत वितरण यंत्रणा ही नवनवीन प्रकल्पांसाठी पाया ठरते, याचा प्रत्यक्ष अनुभव आला. मराठी लेखकांना योग्य मोबदला मिळणे अजूनही कठीण आहे. विक्रीदर कमी असल्याने त्यांना राष्ट्रीय पातळीवर लेखकांच्या तुलनेत रॉयल्टी कमी मिळते; प्रकाशकांना जोखीम घेणे अवघड जाते. नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे असले तरी बाजारपेठेतील अनिश्चितता त्यांना मागे खेचते. त्यामुळे अनेक सक्षम लेखक इतर क्षेत्रांकडे वळतात. साकेत प्रकाशनामध्ये आम्ही कायमच लेखकांना सुयोग्य मानधन देत आलोय. यातून लेखक-प्रकाशकाचे संबंध जिव्हाळ्याचे आहेत.

नवोदितांना संधी

साकेत प्रकाशनात आम्ही नेहमीच नामवंत



मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या बोलीभाषांचा आणि व्याकरणाचा सखोल अभ्यास होणार आहे. मराठीत अनेक बोलीभाषा आहेत, जसे की कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी, मालवणी इत्यादी. या बोलींचा अभ्यास, संशोधन आणि दस्तऐवजीकरण करण्यासाठी सरकारकडून विशेष प्रोत्साहन मिळेल. मराठी भाषेबरोबर या भाषाही विकसित होतील.

नोंद

लेखकांसोबतच नवोदितांना संधी देण्याचा संकल्प ठेवला आहे कारण साहित्यप्रवाह टिकून राहावा आणि नवीन आवाजांना मंच मिळणे अत्यावश्यक आहे. यातून अनेक नवोदित लेखक काही वर्षांत प्रस्थापित लेखक म्हणून नावाजले गेले. ग्रंथालय योजना, अनुदान, साहित्य परिषद या काही योजना असल्या तरी त्या सर्वांपर्यंत पोहोचत नाहीत. पुस्तक विक्रीवर जी. एस. टी. नसला तरी लेखकांना दिलेल्या मानधनावर प्रकाशकांना जी. एस. टी. द्यावा लागतो. त्यामुळे आर्थिक ताण वाढतो. शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात मराठी साहित्याचा पुरेसा समावेश नसल्याने वाचकवर्ग वाढण्यात मर्यादा येतात. परभाषिक साहित्याच्या अनुवादाला सरकारी पाठबळ मिळाल्यास मराठी प्रकाशनाला नव्या बाजारपेठा खुल्या होतील. कागद, छपाई, डिझाइन, वाहतूक सर्वच खर्चांत प्रचंड वाढ झाली आहे. अनेक छोटे प्रकाशक गुणवत्तेत तडजोड करतात. कुशल संपादक, डिझायनर्स, तांत्रिक तज्ज्ञ यांची कमतरता जाणवते. ऑडिओ-बुक्ससाठीची यंत्रणा अत्यंत खर्चिक आहे. प्रिंट-ऑन-डिमांड ही खर्च कमी करणारी उत्तम पद्धत असली तरी कमी प्रती छापल्यास उरणारा नफा परवडणारा नसतो. इंग्रजी-हिंदी पुस्तकांचे मार्केट विशाल आणि स्पर्धेचे आहे. आंतरराष्ट्रीय बेस्टसेलर्स, मोठ्या प्रकाशनसंस्थांचे प्रादेशिक भाषांतील प्रकल्प यामुळे मराठी प्रकाशकांवर स्पर्धेचा दबाव वाढतो.

विपणनात नावीन्य

या स्पर्धेत टिकण्यासाठी विषयांची निवड, संपादन, डिझाइन आणि विपणनात नावीन्य आणणे आवश्यक आहे. आजचा वाचक संशोधनाधारित, वास्तववादी आणि आधुनिक विषयांकडे आकर्षित होतो. मानसशास्त्र, उद्योजकता, आत्मविकास, विज्ञान, तंत्रज्ञान, स्त्रीवाद इ. विषयांवरील मूळ लेखन आणि गुणकारी अनुवाद मराठीत तुलनेने कमी आहेत. अनुवाद करताना मूळ लेखकाचा भावार्थ राखला गेला पाहिजे. अनुवादित पुस्तकांच्या स्पर्धेत स्थानिक लेखकांचे दर्जेदार पुस्तक छापणे हे आव्हानच आहे. मराठी साहित्याचा जागतिक संदर्भात परिचय व्हावा यासाठी दर्जेदार अनुवाद आवश्यक आहेत. यामुळे मराठी पुस्तकांना भारतीय आणि परदेशी बाजारपेठेत मान्यता मिळू शकते. आम्हीही मराठी पुस्तकांचे हिंदी-इंग्रजी रूपांतर करण्याचा प्रयत्न करत आहोत. तंत्रज्ञानसंपन्न, डिजिटल दृष्ट्या सक्षम आणि सर्जनशील तरुण पिढी या क्षेत्रात उतरत आहे. सेल्फ-पब्लिशिंग, प्रिंट-ऑन-डिमांड, ऑडिओबुक्स, पॉडकास्ट्स ही सारी मराठी प्रकाशनासाठी नवी क्षितिजे आहेत. मराठी प्रकाशन उद्योग संक्रमणकाळातून जात आहे. आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक आव्हानांबरोबरच संधीही अफाट आहेत. परिवर्तनाची तयारी, नावीन्यपूर्ण विषयांची निवड, आधुनिक विपणन आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर यांमुळे मराठी साहित्याचा नवा उदय शक्य आहे. मराठी प्रकाशन हा केवळ व्यवसाय नाही; तो संस्कृतीचा, भाषेचा आणि अस्मितेचा संरक्षक आहे. म्हणूनच मराठी वाचन, लेखन आणि प्रकाशनाला नवचैतन्य देणे, ही प्रत्येक मराठी माणसाची जबाबदारी आहे.

(लेखक साकेत प्रकाशन प्रा. लि.
छत्रपती संभाजीनगरचे संचालक आहेत.)





सुनिताराजे पवार
मो. : ९८२३०६८२९२

प्रकाशनक्षेत्र: वाटा आणि वळणे

प्रकाशनक्षेत्र सामान्यांच्या आकलनापलीकडचे! व्यवसाय करायचा विचार केला आणि प्रकाशन सुरू केले, असे चित्र दुर्मीळच. पुस्तकाच्या वेडापोटी, शब्दांवर अखंड प्रेम करणारे हातात पुस्तक धरतात आणि मग त्यांचेच होतात. मरेपर्यंत त्यांच्या हातातून पुस्तक सुटत नाही. हे वेडच आहे. ते ज्याला लागले ते दुसरा व्यवसाय करणे केवळ अशक्यच! पण या व्यवसायाबद्दल लोकांच्या मनात असंख्य गैरसमज आहेत.

पुस्तक प्रकाशन हा बौद्धिक व्यवसाय आहे. ज्ञानार्जन, ज्ञानसंकलन आणि ज्ञानसंक्रमणाचे एक महत्त्वाचे माध्यम असलेल्या पुस्तकासारखा उत्पादनाचा हा व्यवसाय असल्यामुळे हे सांस्कृतिक आणि आर्थिक असे दुहेरी स्वरूप आहे. प्रकाशक हा लेखक आणि वाचक यांच्यातला दुवा असतो. २०० वर्षांहून अधिक काळ हा पुस्तक निर्मितीचा काळ आहे. प्रकाशन व्यवसाय हा केवळ साहित्य आणि ग्रंथनिर्मितीपुरता मर्यादित नसून निर्मिती, वितरण, विक्री व्यवस्था याबरोबर अनेक सहव्यावसायिक प्रक्रियांशी जोडलेला आहे. अनेक लेखकांना प्रकाशात आणण्याचे काम प्रकाशक करतो. तसं पाहिलं तर तो 'हरकाम्या' कर्मचारी. पडेल ती जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असलेला व्यावसायिक. लेखक, चित्रकार, अक्षरजुळणी, मुद्रक, या सगळ्या कलावंतांना व कारागीरांना एकत्र आणून, कुशलतेने या सर्वांकडून उच्च दर्जाचे काम करवून घेऊन, या सर्वांच्या कलेचा एकसमुच्चय करून तयार केलेली उत्कृष्ट कृती म्हणजे ग्रंथ होय. 'ग्रंथ' ही आदराची वस्तू असली तरी ग्रंथ प्रकाशन हा आर्थिक व्यवहार आहे. आर्थिक व्यवहाराची किमान शिस्त पाळल्याशिवाय तो सातत्याने चालू राहू शकत नाही. ग्रंथसंस्कृती, संवर्धन, ग्रंथ प्रकाशन हे एकमेकांना पूरक असले तरी ते सर्वार्थाने भिन्न आहेत. लेखन, प्रकाशन, ग्रंथविक्री याही स्वतंत्र बाबी आहेत. या सर्वांची मोट बांधणारा 'प्रकाशक' नावाचा घटक निर्माण झाला. हे तिन्ही व्यवहार एकत्र बांधले गेले. १८०७ साली विल्यम कॅरीने छापलेला पहिला ग्रंथ 'मराठी व्याकरण' पाहताना किंवा मासिक मनोरंजनचा का. र. मित्रानी छापलेला (१९०९) दिवाळी अंक पाहताना धन्य वाटते. पुस्तकं टिकवायची असतील, तर हा प्रवास समजून घ्यावा लागेल. त्याकडे गंभीरपणे पाहावे लागेल.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने शैक्षणिक संधी निर्माण होणार असून विद्यापीठांमध्ये मराठी भाषेचे महत्त्व वाढणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकवण्याची सुविधा निर्माण केली जाऊ शकते. मराठीतील संशोधनाला राष्ट्रीय स्तरावर अधिक महत्त्व मिळेल. मराठी अभ्यासक्रमांना नवीन संधी उपलब्ध होतील आणि विद्यापीठांना यासाठी विशेष अनुदान मिळेल.

नोंद

ग्रंथ नसते तर जगाचे ज्ञानवैभव काळाच्या दरीत लोप पावले असते. ग्रंथांचा प्रवास हा अत्यंत मनोवेधक आहे. मुद्रणाची सोय नसताना कितीतरी वाङ्मय काळाच्या ओघात नष्ट झाले असेल. लिपीचा शोध ही मानवी जीवनातील मोठी क्रांती मानावी लागेल. अक्षराच्या शोधामुळे ज्ञानाची दारं खुली झाली. अक्षरांच्या संपर्कात आल्यावर मौखिकतेने स्वत:त बदल केले. मुद्रणकलेचा शोध लागेपर्यंत पुस्तकांची निर्मिती अत्यंत कष्टपूर्वक करावी लागे. हस्तकलाकुसर करून ती केली जायची. ती एकच प्रत असायची, नंतर नकलाकारांकडून ती लिहून घेण्यास सुरुवात झाली.

''महाराष्ट्रातील कागदाचा पहिला उल्लेख इ.स. १३९७च्या एका कागदपत्रांत सापडतो'', असे अ. का. प्रियोळकरांनी म्हटले आहे. मुद्रणपूर्वकाळात हस्तलिखित पोथ्यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने त्या तयार करणे हा स्वतंत्र व्यवसाय होता. पेशवाईपर्यंत मुद्रणकला अस्तित्वात नव्हती. ग्रंथाच्या नकला करण्याचे काम अतिशय कष्टप्रद असल्याने याशिवाय खर्चिकही असल्याने ग्रंथ ही वस्तू फार दुर्मीळ, मौल्यवान समजली जात असे. 'ग्रंथदान' नावाचा विधी केला जात असे. संस्थानिक, राजेरजवाडे मौल्यवान ग्रंथ दान करीत असत. ज्ञानकोशकार केतकरांचे आजोबा गोविंद रघुनाथ केतकर यांचा ग्रंथविक्रीचा व्यवसाय होता. आपल्याकडे पन्नास-साठ ब्राह्मण लेखक ठेवून ते त्यांच्याकडून ग्रंथाच्या नकला करून घेत. पुस्तकांनी भरलेले खटारे घेऊन ते ग्रंथविक्री करीत असत.

पंधराव्या शतकात मुद्रणकलेचा शोध योहान गुटेनबर्ग याने लावला आणि सुरू झाला पुस्तकांचा देखणा प्रवास. एकाच वेळी हजारो प्रती निघू लागल्या. ही मुद्रणकला भारतात यायला अर्थातच एकोणिसावे शतक उजाडले. मराठी भाषेतील पहिले पुस्तक विल्यम कॅरी याने बंगालमधील सेराजपूर येथे छापले. ते साल होते १८०७. खऱ्या अर्थाने पहिले मुद्रणमहर्षी गणपत कृष्णाजी यांना म्हटले जाते. जावजी दादाजी, राणू रावजी, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, दामोदर सावळाराम यंदे, गणेश महादेव वीरकर इ. अनेकांनी या व्यवसायाला नावारूपाला आणले. सुरुवातीला 'प्रकाशक' हा शब्दच वापरला जात नसे. 'अमुक पुस्तक या छापखान्यात छापले' असा मजकूर असे. छापखानेच प्रकाशने करत. 'निर्णयसागर', 'कर्नाटक प्रेस', 'शिवाजी छापखाना' अशा ठिकाणी मराठी मुद्रणाचे काम चाले.

छापखान्याऐवजी 'प्रकाशक' ही बिरुदावली सन्मानाने पुढे आली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनेक पुस्तके प्रकाशित होऊ लागली. विसाव्या शतकाचा उत्तरार्ध तर मराठी पुस्तकांचे सुवर्णयुग म्हणता येईल. अनेक नामवंत लेखक नावारूपाला आले. ज्ञानपीठ प्रथमच मराठीला मिळाले. नवीन पुस्तक आल्यावर वाचकांच्या उड्या पडू लागल्या. ग्रंथालयात काही पुस्तकांसाठी लोक रांगा लावत. लेखक मंडळींना पाहण्यासाठी लोक येत. श्रवणभक्ती ही साधना समजली जाई. उत्तम वाचन हा संस्कार आणि अभिमानाने मिरवण्याची बाब होती. कुठेही जाताना हातात पुस्तक असणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण मानले जात होते.

याच काळात अनेक चांगल्या प्रकाशनसंस्था उदयास आल्या. प्रकाशक ही आदरणीय व्यक्ती मानण्याचा तो काळ होता. पुस्तकांची आवृत्ती तीन हजार, पाच हजार अशी निघत असे. ठरावीक वितरक त्या पुस्तकांच्या १०० च्या पटीत प्रती घेत. पहिल्याच दिवशी शेकड्यांची पार्सले रवाना होत असत. त्या वेळी करमणुकीचे साधन पुस्तके, एखादा चित्रपट, गाण्यांचे कार्यक्रम, नाटक किंवा व्याख्यान एवढेच होते. काळ बदलला. तंत्रज्ञानाने पंख पसरले, अवघे आकाश काबीज केले. अनेक वाहिन्या, मोबाइल, संगणक यावर जास्तीत जास्त वेळ जाऊ लागला. एकांतात वाचनाचा आनंद घेण्याची समाधिअवस्था भंग पावत गेली. व्हॉट्सअप, फेसबुक, ट्वीटर, यूट्यूब यांनी संपूर्ण जग दाखवले. पुस्तकांशी मैत्री तुटत गेली. या सगळ्यात मोठा फटका प्रकाशनक्षेत्राला बसला.

प्रकाशनक्षेत्र सामान्यांच्या आकलनापलीकडचे! व्यवसाय करायचा विचार केला आणि प्रकाशन सुरू केले असे चित्र दुर्मीळच. पुस्तकाच्या वेडापोटी, शब्दांवर अखंड प्रेम करणारे हातात पुस्तक धरतात आणि मग त्यांचेच होतात. मरेपर्यंत त्यांच्या हातातून पुस्तक सुटत नाही. हे वेडच आहे. ते ज्याला लागले ते दुसरा व्यवसाय करणे केवळ अशक्यच! पण या व्यवसायाबद्दल लोकांच्या मनात असंख्य गैरसमज आहेत. प्रकाशक म्हणजे प्रचंड पैसा! लेखकांना लुबाडणारे, वगैरे. शिवाय पुस्तकांच्या



मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने साहित्यविषयक उपक्रमांना सरकारी अनुदान आणि मदत मिळणार आहे. अभिजात भाषेच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी देते. मराठी भाषेच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी काम करणाऱ्या संस्था, संशोधक आणि साहित्यिकांना आर्थिक मदत मिळेल. मराठी संस्कृतीशी निगडित विविध उपक्रमांना अधिक प्रोत्साहन दिले जाईल.

किमती खूप असतात. असाही काहींचा (गैर) समज! पुस्तकनिर्मितीची प्रक्रिया समजून घेणारा माणूस कधीच अशी टीका करणार नाही. ललित प्रकाशनाच्या व्यवसायाचा मार्ग मोठा अवघड. एका अर्थाने काट्याकुट्यांचा प्रवास. अनेक प्रकारच्या अडचणींतून तो जगतो, वाढतो, राष्ट्राच्या विकासाला हातभार लावतो. लेखकाने दिलेले हस्तलिखित स्वीकारल्यावर संपादन, डीटीपी, प्रूफरीडिंग, मुखपृष्ठ, प्रिंटिंग, बाईंडिंग अशा साऱ्या प्रक्रिया प्रकाशक करीत असतो. या प्रत्येक टप्प्याला वेळ, पैसा या दोन्ही गोष्टी खर्च कराव्या लागतात. जेव्हा पुस्तक बाजारात येते, तेव्हा विकले जाईलच याची खात्री नसते. ते विषयाच्या निकडीवर, लेखकाच्या शैलीवर अवलंबून असते. त्यामुळे कधीकधी एका पुस्तकाची आवृत्ती संपायला ५-६ वर्षांचा काळ जातो. सहा वर्षांपूर्वी एखाद्या पुस्तकाची किंमत जर शंभर रुपये असेल, तर सहा वर्षांनंतरही ती शंभर रुपयेच असते. या सहा वर्षांत इतर गोष्टींचे भाव दुप्पट झालेले असतात. पुस्तकाची किंमत ऐनवेळी वाढविता येत नाही. याशिवाय विक्रेत्यांना कमिशन द्यावे लागते. त्याला अपवाद काही चालणारी पुस्तके असतात. मग त्याचे उदाहरण सर्व जण देत असतात; पण, कितीतरी पुस्तकांच्या हजारो प्रतींची भरलेली गोडाऊन यांनी पाहिलेली नसतात. सांगण्याचा मुद्दा हा की, हॉटेलमधील पदार्थ, कपडे, दागिने, प्रवास खर्च इतर सर्वांसाठी खर्च करणारा माणूस फक्त पुस्तक घेतानाच का कुरकुरतो? मुद्रणकलेत इतके बदल झाले की, मनात आणलं तर चार दिवसांतसुद्धा उत्तम पुस्तक येऊ शकते. प्रिंट ऑफ डिमांडच्या माध्यमातून कमीत कमी प्रतींत पुस्तक छापता येते. अगदीच शक्य नसेल, तर 'डिजिटल पब्लिशिंग' हा पर्यायही उपलब्ध आहे. संगणकाच्या वापरामुळे उत्तम फॉण्ट, मांडणी, दुरुस्त्या करणे अगदी सुलभ झाले आहे. 'देखणी' निर्मिती हाही ब्रँड झाला आहे. PODS मुळे पूर्वीसारखी मोठ्या गोदामाची गरज उरली नाही. हवी तेव्हा हवी तितकी पुस्तके छापून घेता येतात.
सोशल मीडियाचा मोठा प्लॅटफॉर्म जाहिरातीसाठी उपलब्ध झाला आहे. वर्तमानपत्रात जाहिरात देणे महाग पडते. मोफत जाहिरात सोशल मीडियावर करता येऊ शकते. व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टा, यूट्यूब अशी कितीतरी माध्यमे जाहिरातीसाठी आहेत. पुस्तक परीक्षण, पुस्तकओळख यालाही वर्तमानपत्राची गरज उरली नाही. एकीकडे सोशल मीडियाचे मोठे व्यासपीठ पुस्तकांची जाहिरात करण्यासाठी मिळाले. त्याच वेळी सोशल मीडियाने आपल्या मनावर पकड घेतली. एकांतात वाचन करणारे लोकांतात बसून रील्स वगैरे पाहू लागले. वाचनसंस्कृतीवर याचा मोठा परिणाम झाला. नव्या तंत्रज्ञानाने ग्रंथनिर्मिती सुलभ आणि देखणी झाली. अनेक प्रकाशन संस्था आपल ब्रँड निर्माण करण्यात यशस्वी झाल्या.

प्रकाशनसमारंभ, पुस्तकचर्चा, छोटी-मोठी संमेलने पुस्तकासाठी आवश्यक बाबी यांची सध्या रेलचेल आहे. कथा, कादंबरीसारखे पारंपरिक विषय सोडून विविध विषयांची मागणी वाढत आहे. त्यामध्ये अनुवाद, माहितीपर पुस्तकांना मागणी आहे. ऐतिहासिक लेखनामध्ये अनेक काळाच्या पडद्याआड गेलेल्या सेनानींवर लेखन करणे शक्य आहे. पृथ्वीच्या जन्मापासून पुढील शतकाचा पट मांडणारे लेखन येत आहे. स्त्रीविषयक लेखन हाही स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. 'वाचनप्रेरणादिन', 'गाव तिथे ग्रंथालय', 'जिल्हावार ग्रंथमहोत्सव' हे उपक्रम शासनाने सुरू केले आहेत. एकूणच वाचनसंस्कृतीला बळ देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेची संधी उपलब्ध झाली आहे. मराठी पुस्तके इतर भाषेत भाषांतर करण्याची संधीही प्राप्त झाली आहे. तरुणवर्ग प्रकाशन व्यवसायात येऊन काही नवीन प्रयोग करू पाहत आहेत. ते यशस्वी ठरत आहेत.

हे सगळं आलबेल वाटत असलं तरी प्रकाशकासमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. वाचनसंस्कृती दिवसेंदिवस कमी होत आहे. वाचकांचा जास्तीत जास्त वेळ सोशल मीडियावर जात आहे. एकाग्रतेचा कालावधी घटलेला आहे. पूर्वी वाचन करणे, आपला वेळ आनंदात, एकांतात घालविण्याचा काळ असायचा. हातात पुस्तक असणं हे प्रगल्भतेचे लक्षण मानलं जायचं. तो काळ संपला. ग्रंथालयाच्या रांगा संपल्या. उत्पादन क्षमता वाढलीय; पण वाचक क्षमता घटली आहे.
मागील काही वर्षांपूर्वी नवीन पुस्तक हातात आल्यावर ठरलेल्या ऑर्डर असायच्या. अमुक ठिकाणी १०० प्रती, ५० प्रती. अर्धी आवृत्ती संपून जायची. आता दहा प्रती पाठवण्यासाठी वितरकांना मिन्नतवारी करावी लागते.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने पुरस्कार वाढणार आहेत. अभिजात भाषेतील उत्कृष्ट संशोधनासाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. यापुढे मराठीतील भाषातज्ज्ञ, साहित्यिक आणि संशोधक यांना हे पुरस्कार मिळू शकतील. मराठी भाषेच्या वृद्धीसाठी कार्य करणाऱ्या संस्थांचा केंद्र सरकारकडून गौरव होईल. त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

नोंद

वितरक कमी झाले आहेत. महाराष्ट्रातील अर्ध्याअधिक जिल्ह्याच्या ठिकाणी पुस्तकांची दुकाने नाहीत. जिथे आहेत ते अधिकतर शैक्षणिक पुस्तके विकतात. मातब्बर प्रकाशकांना हे फटके कमी बसतात; पण, नवीन किंवा मधल्या फळीतील प्रकाशकांना हा फटका जास्त बसतो. वितरकांना पुस्तकं पाठवली, तर वसुली हा मोठा प्रश्न उभा राहतो. सध्या पीडीएफ सहज उपलब्ध होऊ शकते. 'पायरसी' हे मोठे संकट आहे. ज्या पुस्तकांना अत्यंत मागणी आहे, अशी पुस्तके प्रकाशकांना न विचारता स्वत:च छापून अल्पदरात बेमालूम विक्री करणारे महाभाग आहेत. अशी पुस्तके रस्त्यावर, दुकानात, प्रदर्शनात विक्रीला असतात. तक्रार केली तरी मागमूस लागत नाही. या सगळ्याचा फटका प्रकाशकांइतकाच लेखकाला बसतो.

प्रकाशन संस्थेत काम करणारा कर्मचारी वर्ग हा काही काळ या क्षेत्रात काम केलेला असावा लागतो. कर्मचारी अनेक वर्षे काम करत असेल, तर नक्कीच त्याला अनेक बाबींचे ज्ञान होते. वितरकांची माहिती असणे, प्रिंटरकडून काम करून घेणे, त्याचा आढावा घेत राहणे, अनेक बाबींवर तो काम करतो. कार्यालयातील डीटीपी करणारा कर्मचारी हासुद्धा थोडाफार तरी मराठी साहित्याची जाण आणि इमान असलेला असायला हवा असतो. सध्या उत्तम मुद्रितशोधक न मिळणं हा कळीचा मुद्दा आहे. चिन्हांची जाण असणं म्हणजे मुद्रितशोधन येणं, अशी काहीतरी भ्रामक कल्पना घेऊन मंडळी काम करतात. अनेकदा चुका राहतात. ओळ न् ओळ पाहणं अवघड असतं. उत्तम पदार्थात खडा लागल्यासारख्या चुका खटकत राहतात. गुणवत्तापूर्ण कर्मचाऱ्यांची उणीव हीसुद्धा प्रकाशन व्यवसायापुढे मोठे आव्हान आहे. मराठी घेऊन विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रकाशनक्षेत्र ही संधी आहे. संपादन करणे, जाहिरातीसाठी मजकूर लिहिणे, प्रिंट मीडिया किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियावर लेखन सहकार्य करणे, पुस्तकांचे शब्दांकन करणे, मुद्रितशोधन कितीतरी करण्यासारख्या बाबी उपलब्ध आहेत. या कामासाठी गुणवत्तापूर्ण व्यक्तींची वानवा आहे. प्रकाशन व्यवसायाकडे गंभीरपणे पाहिले जात नाही. आजही त्याला व्यावसायिक दर्जा नाही. प्रकाशनाचा कोणताही कोर्स नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासमंडळावर काम करताना ही बाब माझ्या लक्षात आली. प्रकाशन हा स्वतंत्र विषय सुरू करण्यात आला. हस्तलिखित अक्षरजुळणी, मुद्रितशोधन, संपादन, मुखपृष्ठ, पुस्तकाची मांडणी, छपाई, बाईंडिंग, प्रकाशन समारंभ, जाहिरात, विक्रीव्यवस्था हे सगळे टप्पे पार पाडताना प्रकाशकाची होणारी दमछाक कमी करणारा माणूस हाताशी असणं खूप गरजेचे असते.

लेखक-प्रकाशक-वितरक-वाचक ही साखळी तयार व्हायला हवी. फक्त प्रकाशकांवर अवलंबून न राहता सर्वांनी थोडा भार उचलला, तर पुस्तक विक्री वाढेल. मराठी भाषेवर आधीच इंग्रजी भाषेचे आक्रमण आहे. पुन्हा तिसरी भाषा येऊ पाहते आहे. ग्रामीण भागातही इंग्रजी शाळांनी अतिक्रमण केले आहे. मोठ्या संख्येने मराठी शाळा बंद पडत आहेत. मराठी वाचकांचा टक्का कमी होत आहे. पुढील काळात इंग्रजी शाळांचे वाढते प्रमाण पाहून मराठी वाचक किती राहतील, याबद्दल साशंकता आहे. प्रकाशकांची पुढची पिढी या व्यवसायात येण्यास फारशी उत्सुक नाही. सांस्कृतिक कार्यक्रमांनाही ज्येष्ठांची गर्दी जास्त असते. युवकांचा टप्पा कसा वाढेल, हे मराठी प्रकाशकांपुढील मोठे आव्हान आहे.

समाजात आजची परिस्थिती भयावह आहे. समाज आतून अंधकाराने ग्रासलेला आहे. माणसांची मने बोथट झाली आहेत. संवेदनांना ओहोटी लागली आहे. सोशल मीडियावर वाचायचं, तर त्याच्या सत्यतेची ग्वाही कोणी द्यायची, हा खरा प्रश्न आहे. सतत आदळणाऱ्या वेगवेगळ्या विषयांमुळे चिंतनाची प्रक्रिया संपलेली आहे. सहज उपलब्ध होणारं गुगल, ए. आय. जेमिनी यांनी आयतेपणा वाढला आहे. समाज सुंदर असावा असे वाटत असेल, तर मनात अपार शांती हवी. वाचनाने ते साध्य होते. बुद्धाची शांती, महात्मा फुलेंची क्रांती, शाहूंचा विचार हवे असतील, तर वाचनसंस्कृती, प्रकाशन व्यवसाय सक्षम बनायला हवा. पुस्तक हे संस्कृतीचे मस्तक आहे. वाचन हा आनंद शोध असतो. पुस्तकात गोठलेला काळ असतो. जो वाचकाच्या हाती आल्यावर तो वाहायला लागतो. आमच्यातच दबलेला, विस्मृतीत गेलेला आवाज ऐकायला येतो. एखादी कलाकृती आपण वाचतो, तेव्हा आपण त्यांच्या आत्म्यात प्रवेश करत नाही तर ते आत्मेच आपल्यात प्रवेश करतात. पुस्तक म्हणजे दुसऱ्या जगात प्रवेश मिळवण्याचा पासपोर्ट आहे. स्वत:ला स्पष्टपणे शोधायचे असेल, तर उत्तम वाचक बनायला



मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख आणि महत्त्व मिळणार आहे. अभिजात भाषांचा दर्जा मिळालेल्या भाषा अधिक सन्माननीय मानल्या जातात. यामुळे जागतिक स्तरावर मराठी भाषा आणि तिच्या समृद्ध साहित्याला अधिक मान्यता मिळेल. मराठी भाषा आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट होण्याची शक्यता वाढेल.

हवं. व्यापक मानवीसंस्कृतीचा एक अंश म्हणजे वाचनसंस्कृती आहे. वाचन आपलं जीवन समृद्ध करतं. अवांतर वाचन हा शिक्षणाचा भाग असला पाहिजे, त्याादृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत.

वारसदार नसेल किंवा आर्थिक गणित न जुळल्यामुळे अनेक प्रकाशन संस्था बंद पडल्या आहेत. महत्त्वाच्या लेखकांची पुस्तके त्यांच्याबरोबर गेली. हे सगळं चित्र बदलावं लागेल. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पुस्तकांची दुकानं असायलाच हवीत. अनेक सरकारी ग्रंथखरेदी योजना बंद पडल्या. त्या पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. या सर्वांवर उपाय म्हणून आम्ही प्रकाशकांनी एकत्र येऊन 'मराठी प्रकाशक व वितरक संस्था' स्थापन केली आहे. पुस्तक ही जीवनावश्यक वस्तू व्हावी, शासनाच्या जुन्या ग्रंथखरेदी योजना पुनर्जीवित व्हाव्यात. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन वितरण व्यवस्था सक्षम करावी. महाराष्ट्रभर मराठी पुस्तकांची कार्यक्षम वितरण व्यवस्था उभी राहावी यासाठी ही संस्था स्थापन केली आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गवासी यशवंतरावजी चव्हाण म्हणाले होते, ''विकासाला दोन डोळे असतात. एक भौतिक विकासाचा, तर दुसरा सांस्कृतिक विकासाचा,'' याकडे शासनाने दिलदारपणे पाहणे गरजेचे आहे. पाठपुरावा करणे आमच्यासारख्या प्रकाशकांचे काम आहे. ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय हा सुजाण, सुबुद्ध, अभिरुचीसंपन्न, सुसंस्कृत, जीवनमूल्ये मानणाऱ्या, त्याची बूज राखणाऱ्या, हे सर्व आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे असे मानणाऱ्या वाचकवर्गावर अवलंबून आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेली पिढी संवेदनशील राहण्यासाठी 'माणूस' म्हणून त्यांचा विकास होण्यासाठी पुस्तकांशिवाय अन्य पर्याय नाही, ही जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे, तरच भारतीय संस्कृतीचा हा पाया अधिक मजबूत राहील.

(लेखिका अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यवाह आहेत.)



म. सा. प. शाहूपुरी शाखा

क्षणचित्रे...



बोधचिन्ह अनावरण



९९ नवनिर्वाचीत अध्यक्षांचा सत्कार



समेलन कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी,
मा. आशुतोष जावडेकर, मा. छ. छ. उदयनराजे भोसले,
मा. ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, मा. विनोद कुलकर्णी



बोधचिन्ह लोकार्पण



संकेत स्थळाचे अनावरण



९९ मंडप शुभारंभ, शरणकुमार लिंबाळे,
मा. ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले,
मा. मिलींद जोशी, मा. सुनिताराजे पवार,
मा. विनोद कुलकर्णी

म. सा. प. शाहूपुरी शाखा

कविवर्य बा. सी. मर्ढेकर यांचे निवासस्थान व स्मारक













क्षणचित्रे...

म. सा. प. शाहूपुरी शाखा













संमेलन गीत

रणभेरी दिग्विजयाची
ललकारी मायबोलीची
औक्षण करण्या उजळली
ही ज्योत राजधानीची

हे शतकपूर्व संमेलन साताऱ्याचे
गाणे जणु सह्याद्रीच्या हिरवाईचे

शिवरायांनी या भूमीवर अखंड धरली छाया
स्वराज्यविस्तारक शाहूंनी रचला भक्कम पाया
क्रांतिसिंह गर्जला इथे गोऱ्याला थेट भिडाया
असा लढाऊ बाणा आमचा, जिंकू सर्व लढाया

शिवशंभूच्या सृजनाची
राजकोश अन् ग्रंथांची
घेऊन आण उजळली
ही ज्योत राजधानीची

हे शतकपूर्व संमेलन साताऱ्याचे
गाणे जणु सह्याद्रीच्या हिरवाईचे

क्रांतिज्योत चेतली, अक्षरे पोचवी घराघरात
मुळाक्षरे गिरवली भिमाने जुन्या राजवाड्यात
विद्येचा वटवृक्ष जणू उन्नतीचा झंझावात
कृष्णेकाठी ज्ञानयज्ञ दाखवी वाट तिमिरात

यशवंत, कीर्तिवंतांची
दृढनिश्चयी संकल्पांची
घेऊन स्फूर्ति उजळली
ही ज्योत राजधानीची

हे शतकपूर्व संमेलन साताऱ्याचे
गाणे जणु सह्याद्रीच्या हिरवाईचे

जागृत आम्ही सदा माय गे तुझ्या प्रतिष्ठेसाठी
कृष्णेने संकल्प सोडला यास्तव यमुनेकाठी
बळ घामाचे उभे राहिले विद्वानांच्या पाठी
अंथरला गालिचा तयाचा तुझ्या स्वागतासाठी

अभिजात स्वप्नपूर्तीची
त्या लखलखत्या मुकुटाची
घेऊन प्रभा उजळली
ही ज्योत राजधानीची

हे शतकपूर्व संमेलन साताऱ्याचे
गाणे जणु सह्याद्रीच्या हिरवाईचे

संकल्पना
विनोद कुलकर्णी
कार्याध्यक्ष
९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा.

लेखन
राजीव मुळ्ये

महाराष्ट्र साहित्य परिषद

मावळा फौंडेशन सातारा

सस्नेह निमंत्रण

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा–शाहूपुरी (सातारा) आणि मावळा फौंडेशन, सातारा आयोजित
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

९९वे
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन
सातारा

१ ते ४ जानेवारी २०२६ ◆ स्थळ : शाहू स्टेडियम, सातारा

प्रा. मिलिंद जोशी	विनोद कुलकर्णी	ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले
अध्यक्ष, अ.भा.म. साहित्य महामंडळ	कार्याध्यक्ष, ९९ वे अ.भा.म.सा.संमेलन	स्वागताध्यक्ष : ९९ वे अ.भा.म.सा.संमेलन सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

प्रा. मिलिंद जोशी अध्यक्ष	गुरव्या रे स्वामी उपाध्यक्ष	सुनिताराजे पवार कार्यवाह	विनोद कुलकर्णी कोषाध्यक्ष	डॉ. उज्ज्वला मेहेंदळे सदस्य	प्रतिभा सराफ सदस्य
चंद्रशेखर गोखले सदस्य	डॉ. दादा गोरे सदस्य	डॉ. रामचंद्र काळुंखे सदस्य	देविदास फुलारी सदस्य	प्रदीप दाते सदस्य	विलास मानेकर सदस्य
डॉ. गजानन नारे सदस्य	डॉ. विद्या देवधर सदस्य	मोहन रेडगावकर सदस्य	कपूर वासनिक सदस्य	रमेश वंसकर सदस्य	संजय बच्छाव सदस्य

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ संमेलन–निधी

डॉ. अश्विनी भालेराव– गांधी कार्यकारी विश्वस्त	प्रकाश पागे विश्वस्त	डॉ. तीर्थराज कापगते विश्वस्त	बाळासाहेब देशमुख विश्वस्त	सतीश तराळ विश्वस्त

डॉ. हेमलता पाटील विश्वस्त	प्रमोद आडकर विश्वस्त	विनोद कुलकर्णी विश्वस्त

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा–शाहूपुरी (सातारा)

विनोद कुलकर्णी संस्थापक अध्यक्ष	नंदकुमार सावंत अध्यक्ष	ॲड. चंद्रकांत बेबले कार्याध्यक्ष	विक्रम पाटील उपाध्यक्ष	अजित साळुंखे प्रमुख कार्यवाह	संजय माने कार्यवाह	सचिन सावंत कोषाध्यक्ष

किशोर बेडकिहाळ सदस्य	डॉ. उमेश करंबेळकर सदस्य	वजीर नदाफ सदस्य	आर. डी. पाटील सदस्य	अमर बेंद्रे सदस्य	ज्योती कुलकर्णी सदस्य	अश्विनी जठार सदस्य	डॉ. राजेंद्र माने निमंत्रित सदस्य

मावळा फौडेंशन, सातारा

विनोद कुलकर्णी अध्यक्ष	नंदकुमार सावंत सचिव	अनिल जठार सदस्य	तुषार महामुलकर सदस्य	ज्योती कुलकर्णी सदस्य

सर्व स्वागत समिती सदस्य

कार्यालयीन पत्ता : दि गुजराथी अर्बन को–ऑप क्रेडिट सोसायटी लि., १५९ भवानी पेठ, देवी चौक, सातारा–४१५००२
संपर्क : नंदकुमार सावंत ९४२२६०४५०९, अनिल जठार ८९७५९९९६८८ ● Email - mawalafoundation@gmail.com

स.न.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा–शाहूपुरी (सातारा) आणि मावळा फौंडेशन, सातारा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे, ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दि. १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान ऐतिहासिक सातारा नगरीतील शाहू स्टेडियम येथे संपन्न होणार आहे. या संमेलनात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी आपणांस आग्रहाचे निमंत्रण.

गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६

दुपारी ३.०० वाजता

ध्वजारोहण

हस्ते : **प्रा. मिलिंद जोशी** (अध्यक्ष, अ.भा.म. साहित्य महामंडळ)

दुपारी ३.३० वाजता

ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन

हस्ते : **डॉ. तारा भवाळकर** (अध्यक्ष, ९८ वे अ.भा.म. साहित्य संमेलन)
प्रमुख उपस्थिती : **चेअरमन व सर्व संचालक मंडळ सदस्य, जनता सहकारी बँक लि., सातारा**

दुपारी ४.०० वाजता

कविकट्टा

उद्घाटन हस्ते : **भालचंद्र जोशी ज्येष्ठ उद्योजक, सातारा**
प्रमुख उपस्थिती : **रवींद्र बेडकिहाळ सातारा जिल्हा प्रतिनिधी, मसाप पुणे**
विनोद जळक मुख्याधिकारी सा.न.प., सातारा

दुपारी ४.१५ वाजता

गझलकट्टा

उद्घाटन हस्ते : **संदीप शहा उद्योजक, पुणे**
प्रमुख उपस्थिती : **चेअरमन व सर्व संचालक मंडळ सदस्य, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना लि. शेंद्रे, सातारा**

दुपारी ४.१५ वाजता

प्रकाशन कट्टा

उद्घाटन हस्ते : **विश्वास पाटील अध्यक्ष, ९९ वे अ.भा.म. साहित्य संमेलन**

सायंकाळी ४.३० वाजता

ग्रंथदिंडी

उद्घाटन हस्ते : **विश्वास पाटील अध्यक्ष, ९९ वे अ.भा.म. साहित्य संमेलन**
प्रमुख उपस्थिती : **संतोष पाटील जिल्हाधिकारी सातारा**
तुषार दोशी जिल्हा पोलिस अधीक्षक, सातारा
याशनी नागराजन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवक, सा.न.प., सातारा

सायंकाळी ७ वाजता

साताऱ्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान

हस्ते : **डॉ. तारा भवाळकर** (अध्यक्ष, ९८ वे अ.भा.म. साहित्य संमेलन)
प्रमुख उपस्थिती : **सर्व संचालक मंडळ सदस्य, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा**

रात्री ८.३० वाजता

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जन्मोत्सव–वर्षानिमित्त आणि जगद्गुरू संत तुकोबाराय यांच्या ३७५व्या वैकुंठगमन वर्षानिमित्त संतसाहित्याला अभिवादन करणारा कार्यक्रम

'बहुरूपी भारूड'

सहभाग : **डॉ. भावार्थ देखणे, अवधूत गांधी आणि पांडुरंग पवार**
निरूपण : **स्वानंद बेदरकर**
प्रमुख उपस्थिती : **चेअरमन व सर्व संचालक मंडळ सदस्य, सातारा जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., सातारा**

विशेष सहकार्य

शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६

(मंडप क्र.१) सकाळी ११.०० वाजता

उद्घाटन समारंभ

संमेलनाध्यक्ष : **विश्वास पाटील** पूर्वाध्यक्ष : **डॉ. तारा भवाळकर**
उद्घाटक : **डॉ. मृदुला गर्ग** (ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत)

प्रमुख पाहुणे

ना. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)
ना. उदय सामंत (उद्योग व मराठी भाषा मंत्री)

स्वागताध्यक्ष
ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले (सार्वजनिक बांधकाम मंत्री, म.रा.)

सन्माननीय अतिथी
श्री. छ. उदयनराजे भोसले (खासदार)

सन्माननीय उपस्थिती

श्री. फरोख कुपर (संमेलन संरक्षक व ज्येष्ठ उद्योजक)
ना. जयकुमार गोरे (ग्रामविकास मंत्री, सातारा)
आ. डॉ. विश्वजीत कदम (कार्यवाह, भारती विद्यापीठ)
प्रा. मिलिंद जोशी अध्यक्ष, अ.भा.म. साहित्य महामंडळ
श्री. विनोद कुलकर्णी कार्याध्यक्ष, ९९ वे अ.भा.म.सा.संमेलन
सुनिताराजे पवार कार्यवाह, अ.भा.म. साहित्य महामंडळ
सूत्रसंचालन **स्नेहल दामले**

(मंडप क्र. १) दुपारी ३.०० वाजता

कविसंमेलन – १

अध्यक्ष : **अशोक नायगावकर**
सहभाग : **सुनील उबाळे, डॉ. रमेश रावळकर, डी. के. शेख, संगीता माने, अनिता येलमटे, गौतम सूर्यवंशी, आदित्य दवणे, ज्योती कपिले, दीपाली वझे, कमलाकर राऊत, मनोज वराडे, प्रदीप देशमुख, चुडामण बल्हारपुरे, प्रशांत पनवेलकर, सुनील यावलीकर, डॉ. विजय काळे, विवेक सावरीकर, कविता अमोणकर, त्रिवेणी शिर्के, कावेरी दाभडकर, संदीप देशमुख, ज्योती कुलकर्णी, डॉ. कांता नलावडे, किरण येले, लक्ष्मीकांत रांजणे, सागर काकडे, विलास पिसाळ, सुनील जवंजाळ, सविता पोतदार, अरुण बोऱ्हाडे, प्रभाकर शेळके, कैलास गांधी** सूत्रसंचालन : **प्रदीप कांबळे**

दुपारी ३ ते ५ स्थळ : बाल–कुमार वाचक कट्टा

संवाद बाल–कुमार वाचकांशी

सहभाग : **ल. म. कडू, एकनाथ आव्हाड** (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक)

(मंडप क्र. २) दुपारी ३.०० वाजता

परिचर्चा – **जागतिक प्रकाशन व्यवहारात मराठी प्रकाशन व्यवहार कुठे आहे?**
सहभाग : **रोहन चंपानेरकर, डॉ. मनोज कामत, राजीव श्रीखंडे, अमृता तांदळे, क्षुभा साठे, संजीव कुलकर्णी** संवादक : **संदीप तापकीर** निवेदक : **राजेश सोळसकर**

(मंडप क्र. २) दुपारी ४.३० वाजता

परिसंवाद – **मराठी कोशवाङ्मय आणि विस्ताराच्या दिशा**
अध्यक्ष : **डॉ. राजा दीक्षित** सहभाग : **डॉ. साहेब खंदारे, डॉ. नीलिमा गुंडी, मांगिलाल राठोड, प्रमोद पाटील, अविनाश कोल्हे**
संवादक : **जगतानंद भटकर** निवेदिका : **सपना डफळे**

(मंडप क्र. १) रात्री ८ वाजता

नाटक –

गौरी थिएटर्स निर्मित **प्रशांत दामले फॅन फाउंडेशन,** प्रकाशित

शिकायला गेलो एक

मूळ कथा । **द. मा. मिरासदार** लेखन, दिग्दर्शन । **अद्वैत दादरकर**
नेपथ्य । **प्रदीप मुळ्ये** संगीत । **अशोक पत्की** प्रकाश । **किशोर लंगळे**
सूत्रधार । **अजय कासुर्डे**
कलाकार । **ऋषिकेश शेलार, सुशील इनामदार, अनघा भगरे, समृद्धी मोहरीर, चिन्मय माहूरकर आणि प्रशांत दामले**

प्रमुख उपस्थिती । **शोभा शिवाजीराव पाटील**

शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६

(मंडप क्र.१) सकाळी ९ वाजता

कथाकथन

सहभाग : राजेंद्र गहाळ, माधवी घारपुरे, बाबा परीट, रवींद्र कोकरे, कल्पना देशपांडे निवेदक : मोहन गुरव

(मंडप क्र.१) सकाळी ११ वाजता

मुलाखत

अनुराधा पाटील (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवयित्री)
मुलाखतकार : डॉ. रणधीर शिंदे,
डॉ. प्रवीण बांदेकर (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक)

स्थळ : बाल-कुमार वाचक कट्टा

संवाद बाल-कुमार वाचकांशी

सकाळी ११ ते १ सहभाग : संगीता बर्वे, राजीव तांबे
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक)
दुपारी ३ ते ५ : गणेश घुले

(मंडप क्र.१) दुपारी ३ वाजता

ज्येष्ठ लेखक-प्रकाशक सत्कार

लेखक : 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक)
प्रकाशक : बाबुराव मैंदर्गीकर (सुविद्या प्रकाशन, सोलापूर)
हस्ते : ना. अजितदादा पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)

सन्माननीय उपस्थिती :

ना. अण्णा बनसोडे (उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा)
ना. मकरंद पाटील (मदत व पुनर्वसन मंत्री)
खा. नितीन पाटील (राज्यसभा)

(मंडप क्र.१) दुपारी ४ वाजता

पुस्तकचर्चा

अमोल पालेकर लिखित 'ऐवज : एक स्मृतिबंध'
सहभाग : अमोल पालेकर, संध्या गोखले, वृंदा भार्गवे

(मंडप क्र.१) सायंकाळी ५.३० वाजता

परिसंवाद

विषय : आजच्या मराठी समाजाची विचारभ्रष्टता आणि वैचारिक साहित्याची निर्मिती
अध्यक्ष : विनय हर्डीकर सहभाग : प्रमोद काळबांडे, हेरंब कुलकर्णी, शाळीग्राम निकम, यशवंत पाटणे, डॉ. संभाजी पाटील, ॲड. धनंजय वंजारी
संवादक : प्रशांत कदम निवेदक : हणमंत पाटील

(मंडप क्र.१) रात्री ८ वाजता

सांस्कृतिक कार्यक्रम : 'हास्यजत्रा'
सहभाग : सचिन मोटे (लेखक आणि निर्माता) सचिन गोस्वामी (दिग्दर्शक आणि निर्माता)
समीर चौगुले, ओंकार राऊत, चेतना भट, दत्तू मोरे, प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, शिवाली परब, पृथ्वीक प्रताप, रसिका वेंगुर्लेकर, अरुण कदम, प्रियदर्शिनी इंदलकर, निखिल बने, वनिता खरात, प्रभाकर मोरे, रोहित माने, प्रथमेश शिवलकर

शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ **(मंडप क्र.२) सकाळी १० वाजता**

परिचर्चा

विषय- आजच्या मराठी साहित्यात भयकथा, रहस्यकथा आणि गूढकथा यांचा इतका दुष्काळ का आहे?
सहभाग : प्रवीण टोकेकर, डॉ. गणेश मतकरी, डॉ. गोविंद बुरसे, ह्रषीकेश गुप्ते, डॉ.राजेंद्र राऊत संवादक : जयदीप पाठकजी निवेदक : श्रीकांत कात्रे

(मंडप क्र.२) दुपारी ४ वाजता

परिसंवाद – स्त्री चळवळीची ५० वर्षं : मागे वळून पाहताना
अध्यक्ष : डॉ. गीताली वि.म. सहभाग : सुचिता खल्लाळ, प्रमोद मुनघाटे, हिना कौसर खान, डॉ. सविता मोहिते, डॉ. गायत्री शिरोळे, डॉ. संध्या अणवेकर, डॉ. अंजली ढमाळ, नमिता कीर निवेदिका : वैदेही कुलकर्णी

(मंडप क्र.२) सायंकाळी ६ वाजता

परिचर्चा – 'अभिजात दर्जा' नंतरची मराठी : संधी आणि आव्हाने
सहभाग : श्रीधर लोणी, पी. विठ्ठल, डॉ. सुहास उगले, श्याम जोशी, डॉ. संदीप श्रोत्री, डॉ. चैती साळुंके, डॉ. अस्मिता हवालदार संवादक : डॉ. महेश गायकवाड

रविवार, दि. ४ जानेवारी २०२६

(मंडप क्र.१) सकाळी ९.३० वाजता

पुस्तकचर्चा

शाहू पाटोळे लिखित 'अन्न हे अपूर्णब्रह्म'
सहभाग : शाहू पाटोळे, राहुल कोसंबी, भूषण कोरगांवकर, डॉ. मिलिंद कसबे

(मंडप क्र.१) दुपारी ११.३० वाजता

मुलाखत

गिरीश कुबेर (ख्यातनाम लेखक आणि संपादक, दै. लोकसत्ता)
मुलाखतकार : प्रसन्न जोशी आणि किशोर बेडकिहाळ

(मंडप क्र.१) दुपारी १.००

कविसंमेलन – २

अध्यक्ष : श्रीकांत देशमुख (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवी)
सहभाग : संजीवनी बोकील, किसन पवार, निरुपमा महाजन, माधव हुंडेकर, नामदेव वाबळे, बाळासाहेब गरकळ, विठ्ठल काष्टे, व्यंकट अनेराये, डॉ. कैलास दौंड शिवाजी जोगदंड, गोपाल नेरकर, मधुकर जाधव, अनुराधा नेरूरकर, विजय ढाले, सायमन मार्टिन, कीर्ती पाटसकर, मंदाकिनी पाटील, सुजाता राऊत, रामदास खरे, दीपाली दातार, राजेंद्र वाघ, धनाजी घोरपडे, ज. तु. गार्डे, आराधना गुरुव, राकेश शेटे, संगीता केंजळे, सायली कुलकर्णी, शरद कोकास, दशरथ परब, मनिषा खरगोणकर, प्रकाश धर्मा, धनश्री पाटील सूत्रसंचालन : वैशाली राजमाने

(मंडप क्र.२) सकाळी १० वाजता

परिसंवाद

विषय – बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण आजच्या मराठी साहित्यात का दिसत नाही?
अध्यक्ष : भूषणकुमार उपाध्याय सहभाग : चंद्रकांत दळवी, श्रीकांत पाटील, भगवान काळे, चांगदेव काळे, राजेश शेगोकार निवेदक : हरिष पाटणे

(मंडप क्र.२) दुपारी १.३० वाजता

संवाद लक्षवेधी कादंबरीकारांशी

सहभाग : सदानंद देशमुख, कृष्णात खोत (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक)
अभिराम भडकमकर, नीरजा, प्रा. शेषराव मोहिते संवादक : डॉ. राजेंद्र माने
आणि निलेश महिगावकर निवेदक : ॲड. चंद्रकांत बेबले

(मंडप क्र.१) दुपारी ४.३० वाजता

समारोप

प्रमुख पाहुणे

श्री. रघुवीर चौधरी
(ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक)

सन्माननीय उपस्थिती

ना. एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री, पर्यटनमंत्री, म.रा.)
ना. उदय सामंत (उद्योग व मराठी भाषा मंत्री)
ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले (सार्वजनिक बांधकाम मंत्री, म.रा.)
श्री. फरोख कुपर (संमेलन संरक्षक व ज्येष्ठ उद्योजक)
ना. शंभूराज देसाई (पालकमंत्री, सातारा)
ना. भरत गोगावले (रोजगारहमी मंत्री)

सूत्रसंचालन : स्नेहल दामले

(मंडप क्र.१) रात्री ९ वाजता

महाराष्ट्रातील लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा कार्यक्रम फोक आख्यान
निर्मिती : रणजीत गुगळे आणि भूषण मेहरे
निर्मिती, मूळ संकल्पना, संगीत कारभारी : हर्ष-विजय
बांधणी : लमाण बंधू, ईश्वर अंधारे





ONCO - LIFE
Cancer Centre

Satara | Talegaon | Wagholi | Chiplun

कॅन्सरच्या अत्याधुनिक व विश्वसनीय उपचार पध्दती

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत
मोफत उपचार
सर्व रेशनकार्ड धारक* कॅन्सर रुग्णांसाठी

3000+ Reviews

Google ★★★★★ 4.9/5 | Justdial ★★★★★ 4.9/5

खालील सुविधांसह 10+ वर्षे सर्वात विश्वसनीय ब्रँड

• रेडिएशन थेरपी • किमोथेरपी • कॅन्सर सर्जरी • न्यूक्लियर मेडिसिन उपचार
• ऑन्को पॅथोलॉजी • ऑन्को फार्मसी • डेन्टल क्लिनिक • पेट-सीटी स्कॅन
• सोनोग्राफी • बोन मॅरो ट्रान्सप्लांट • हिमॅटोलॉजी • ब्रॅकी थेरपी • मॅमोग्राफी



India Achievers Awards 2019



ISPA Awards 2019



Navbharat HealthCare Awards 2024

ONCO - LIFE Cancer Centre
Shendre, Satara
ऑन्को-लाईफ कॅन्सर सेंटर,
शेंद्रे, सातारा – 415 519
02162-350063/77690 04343

TGH-ONCO-LIFE Cancer Centre
Talegaon, Pune
T.G.H. ऑन्को-लाईफ कॅन्सर सेंटर,
तळेगाव-चाकण रोड, तळेगाव पोस्ट ऑफिसच्या शेजारी,
तळेगाव – दाभाडे, ता.-मावळ, महाराष्ट्र – 410506.
81281 23067 / 81281 24067

ICTRC & ONCO-LIFE CANCER HOSPITAL
Wagholi, Pune
ICTRC & ऑन्को-लाइफ कॅन्सर हॉस्पिटल,
विश्वशांती धाम, केसनंद रोड,
वाघोली, पुणे – 412 207
95529 52299 / 77568 94303

ONCO-Lifecare Cancer Centre
Chiplun
ऑन्को-लाईफकेअर कॅन्सर सेंटर,
लाईफकेअर हॉस्पिटल, मिरजोळी,
चिपळूण, रत्नागिरी, महाराष्ट्र – 415605
73789 58000 / 94042 40762

www.oncolifehospitals.com





श्री सद्गुरु हरिबुवा महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.फलटण

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

संदिप कां.जगताप — जनरल मॅनेजर
राजाराम वि.फणसे — व्हा.चेअरमन
तेजसिंह दि.भोसले — चेअरमन

सर्व संचालक व सेवक वृंद

श्री सद्गुरु हरिबुवा महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.फलटण

Reg.NO.SAT/KGH/RSR (CR) 985/89-90 Date: 13/09/1989

आंतरराष्ट्रीय ISO 9001:2015 नामांकन प्राप्त संस्था

छत्रपती संभाजी महाराज सह.पतसंस्था मर्या. पिंपोडे बु।।

ता.कोरेगांव, जि.सातारा

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

•आमच्या आकर्षक ठेव योजना•

दामदुप्पट ठेव- १०५ महिने

दामदीडपट ठेव- ६२ महिने

मुदत ठेव (TERM DEPOSIT)	इतर	ज्येष्ठ ना
३० ते ९० दिवस	५.५०%	६%
९१ ते १८० दिवस	६%	६.२५%
१८१ ते १ वर्षापेक्षा कमी	६.२५%	६.५०%
१ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी	७%	७.२५%
२ वर्षे व त्यापुढे	७.५०%	८%
सौभाग्य लक्ष्मी ठेव योजना (१८ महिने)	९.५०%	९.७५%
अरुणोदय ठेव (१५ महिने)	९% सर्वांसाठी	
छत्रपती संभाजी राजे ठेव (१२ महिने)	९.२५% सर्वांसाठी	

Why Chhatrapati is best & secure for investment?
गुंतवणुकीसाठी छत्रपती पतसंस्था ही सर्वोत्तम का आहे?

- पश्चिम महाराष्ट्र कार्यक्षेत्र ५६ शाखा व ८ विभागीय कार्यालय
- ३६+ वर्षापासुन पतसंस्थेच्या माध्यमातुन विश्वसनिय व अविरत सेवा
- नियमित ऑडिट वर्ग "अ" RTGS, NEFT, धी सुविधा Mobile Banking, Total Computerised
- ISO 9001-2015 मानांकन असलेली पतसंस्था
- 78550 सभासदांचा समाधानी व विशाल परिवार
- 286 प्रशिक्षीत व विनयशिल कर्मचारी तुम्ही चकीत व्हाल इतकी विनम्र सेवा

We Believe in customer service, efficiency, problem solving, productivity and innovation...

1500 कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण

2000 कोटी संमिश्र व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल

Mo: 85300 30700







लोकनेते स्व. विलासकाका पाटील-उंडाळकर (माजी सहकार मंत्री) यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेली व ॲड.उदयसिंह पाटील (दादा) यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारी प. महाराष्ट्रात ग्रामिण भागातील अग्रगण्य असलेली पतसंस्था

कै. स्वा. सै. शामराव पाटील नागरी सह. पतसंस्था मर्या; उंडाळे

ता. कराड जि. सातारा. मो.9766634545/55

संस्थेची सांपत्तिक स्थिती
१५/१२ /२०२५ अखेर

वसूल भाग भांडवल	११ कोटी ६२ लाख	हातावरील व बँक शिल्लक	१ कोटी ८ लाख
फंडस	१४ कोटी १३ लाख	गुंतवणूक	४८ कोटी ३४ लाख
ठेवी	१८२ कोटी ८१ लाख	कर्जवाटप	१७० कोटी १३ लाख
स्वनिधी	१८ कोटी ४३ लाख	कायम मालमत्ता	२ कोटी ०९ लाख
सी. डी. रेषो	८२.०३%	संमिश्र व्यवसाय	३५२ कोटी ९५ लाख
खेळते भांडवल	२३४ कोटी २६ लाख	ऑडिट वर्ग	सतत 'अ'

संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

ग्रामीण भागातील अग्रगण्य संस्था

संस्थेमार्फत RTGS व NEFT, चेक क्लिअरिंग सुविधा / पगारदार सभासदाना रु.८ लाखापर्यंत पगारतारण कर्ज / कर्जदार सभासदांना रु. १ लाखापर्यंत अपघात विमा / सोने तारणावरती तात्काळ कर्ज / संस्थेच्या सुसज्य अशा १७ इमारती/ सभासदांना सामान्य / स्थावर तारण / पगार तारण / वाहन तारण/ सोनेतारण कर्ज सुविधा/ संस्थेच्या सर्व शाखामध्ये लाईट बील स्विकारण्याची सुविधा.

मा. श्री. अधिकराव शेळके — प्रभारी व्यवस्थापक
मा. श्री.सिद्धनाथ घराळ — व्हा.चेअरमन
मा. श्री. शहाजी शेवाळे — चेअरमन

संचालक मंडळ,सभासद व सेवक वर्ग

आपली माणसं .....आपली संस्था

Reg. No. SAT/KRD/CR/738/2-87

कराड मर्चंट

सहकारी क्रेडिट संस्था मर्यादित;कराड

मुख्य कार्यालय: ७,८, सोमवार पेठ,कराड-४१५११० ☎(०२१६४) २२०१५५,२२३६७८

Website: www.karadmerchant.com

Email:karadmerchant@yahoo.com/karadmerchant1987@gmail.com

आर्थिक स्थिती दि.३०/०९/२०२५

- सभासद संख्या – ३६८९२
- वसूल भागभांडवल - २२ कोटी
- निधी - ११६ कोटी
- ठेवी - ५२९कोटी
- कर्ज - ३८३ कोटी
- गुंतवणूक - २९९ कोटी
- स्वमालकीच्या जागा - १८
- खेळते भांडवल - ७१२ कोटी
- एकत्रित व्यवसाय - ९१२ कोटी
- निव्वळनफा(३१.०३.२०२५)८.८७कोटी
- सातत्याने "अ" वर्ग (३१.०३.२०२५)

- सत्यनारायण शिवराज मिणीयार मर्चंट ग्रुप,अध्यक्ष
- माणिकराव रामचंद्र पाटील चेअरमन
- शिवाजीराव शंकर जगताप व्हा.चेअरमन
- अशोक कृष्णा माटेकर मुख्य कार्यकारी अधिकार

व सर्व संचालक मंडळ

संस्थेचे कर्जाचे आकर्षक व्याजदर

- वैयक्तिक वापराचे वाहन - ९.५०%
- व्यावसायिक वाहन कर्ज - ११.००%
- महिला उद्योजक ९.९०% (मर्यादा १,५०,०००/-)
- सोने तारण कर्ज - ९.४०%

संलग्न संस्था :महिला मर्चंट, मर्चंट प्रतिष्ठान, मर्चंट स्वयंरोजगार,सुजीवन योगोपचार केंद्र

BOKIL

METROPOLIS

९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास,

बोकील मेट्रॉपलिस पॅथॉलॉजी लॅबोरेटरी तर्फे हार्दिक शुभेच्छा.



३२+ वर्षांचा विश्वासार्ह अनुभव

२५००+ अनुभवी वैद्यकीय तज्ञ

४०००+ चाचण्या व प्रोफाइल्स

बोकील मेट्रॉपलिस लॅब, ५३०/अ, पारसनीस कॉलनी, कलेक्टर ऑफिसच्या पाठीमागे,
वाय. सी. कॉलेज रोड, मोनार्क चौक, पोवई नाका, सातारा - ४१५००१.

For more details, call 8422 801 801 / 9075 015 472 or visit www.metropolisindia.com



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कर्मभूमी सातारा येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा.



आमचे आदर्श



मा. डॉ. सुरेशबाबा भोसले
चेअरमन, य.मो. कृष्णा सह. साखर कारखाना लि., रेठरे बु।।

आशिर्वाद



सहकारमहर्षी
स्व. जयवंतराव भोसले
(आप्पासाहेब)

संस्थापक



मा. आमदार डॉ. अतुलबाबा भोसले
कराड दक्षिण विधानसभा सदस्य

सहकारमहर्षी मा. जयवंतराव भोसले (आप्पा) नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कराड

● **प्रधान कार्यालय :** श्री रोहिणी रेसिडेन्सी, विठ्ठल–रूक्मीणी मंदिराजवळ, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा ●

फोन : (02164) 242331/243331 Website : www.jbpatsanstha.com Email : jbppatkarad@gmail.com

संस्थेची सांपतिक स्थिती दि. ३१/3/२०२५ अखेर : ●ठेवी : ५३५.४६ कोटी ● कर्ज वाटप : ३६६.९८ कोटी ● एकूण व्यवसाय : ९०२.४४ कोटी

१००० कोटी व्यवसायाकडे वाटचाल..

आर्कषक ठेव योजना

१५ दिवस ते ४५ दिवस	५%	४६ दिवस ते ९० दिवस	६%
९१ दिवस ते १८० दिवस	६.५%	१८१ दिवस ते ३६५ दिवस	८%
१ वर्ष १ दिवस ते २ वर्षे	९%	२ वर्ष १ दिवस ते ४ वर्षे	८.५%
सेव्हिंग्ज ठेव	४%	मासिक व्याज प्राप्ती ठेव	८.५%
दामदिडपट ठेव	५ वर्षे १ महिना	दामदुप्पट ठेव	८ वर्षे ७ महिने

रिकरिंग ठेव योजना (१ वर्ष ते पुढे ३ वर्षापर्यंत) ——— ८%

विविध कर्ज योजना

नवीन गृहबांधणी कर्ज	नवीन वाहन कार व दुचाकी	कमर्शिअल वाहन	प्रोफेशनल कर्ज डॉक्टर, इंजिनीयर, सीए इ.
12%	10.50%	11%	12%

शेती व शेतीपूरक कर्ज	सोने तारण कर्ज	सोलर कर्ज
13.50%	9.5%	12%

*नियम व अटी लागू

चेअरमन, व्हा. चेअरमन, सर्व संचालक मंडळ, सभासद, खातेदार व सेवक वर्ग

शाखा विस्तार

मलकापूर, कराड, वारूंजी, विद्यानगर, वडगांव हवेली, ओंड, कोळे, आटके, उंब्रज, कार्वे, सातारा, कोरेगाव, काशीळ, मसूर, रहिमतपूर, मल्हारपेठ, म्हसवड, वडूज, तांबवे (ता. वाळवा), बोरगाव (ता. वाळवा), नेर्ले (ता. वाळवा), ताकारी (ता. वाळवा), पेठ (ता. वाळवा), वाटेगांव (ता. वाळवा), कडेगांव, पुसेसावळी, कामेरी, नरसिंहपूर, येडेमच्छिंद्र, नागठाणे

नियोजित शाखा :
पेठवडगांव, उरूण-ईश्वरपूर

॥ सहकाराची दिपज्योती रयत सेवकांचे जीवन उजळती ॥

पगारदार नोकरांच्या सहकारी बँकांमधील अग्रेसर बँक

दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय :- ४५५/२/२० फ, पेठ सदरबझार, सातारा - ४१५ ००१

स्थापना - १६/०८/१९४०



संस्थापक
पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील - डी.लिट्.

दि.३१/०३/२०२५ अखेरची बँकेची सांपत्तिक स्थिती

(रु. कोटीत)

• भाग भांडवल	रु. ७७.७३
• एकूण निधी	रु.११२.१६
• ठेवी	रु. १५९५.६४
• कर्जे	रु. १०४४.७५
• निव्वळ नफा	रु. १४.७४
• निव्वळ एन.पी.ए.	०%
• सीआरएआर	१५.१४%

बँकेचे आकर्षक कर्ज व्याजदर

१)जामीनकी कर्ज १ ते ५	- ९.५० %	४) वाहनतारण कर्ज	- ७.५० %
२)घरबांधणी कर्ज १ ते ३	- ७.५० %	५) शैक्षणिक कर्ज	- ७.५० %
३)घरतारण कर्ज	- ८.५० %	६) सोने तारण कर्ज	- ८.५० %

• बँकेची ठळक वैशिष्टये • (कार्यक्षेत्र - महाराष्ट्र राज्य एकूण शाखा-२०)

१) सुलभ हप्त्यांसह साथी व सोपी कर्ज प्रक्रिया
२) मयत सभासदांच्या वारसांस रु. ४० लाखांपर्यंत आर्थिक मदत
३) कोणतेही प्रोसेसिंग चार्जेस नाहीत.
४) रु. ५ लाखापर्यंतच्या ठेवींना विमा असल्याने ठेवीची सुरक्षितता
५) बँकेच्या शाखांमध्ये सेफ डिपॉझिट लॉकर सुविधा

संचालक मंडळ

श्री. भास्कर बाबुराव कणसे	श्री. विकास विश्वासराव देशमुख	श्री. दिलीप एकनाथ डहाळे	श्री. नंदकिशोर बबनराव गायकवाड
मुख्य कार्यकारी अधिकारी	एक्स ऑफिसिओ	व्हाईस चेअरमन	चेअरमन
श्री. राजेंद्र संपतराव शिर्के	संचालक	श्री. अशोक किसन झरेकर	संचालक
श्री. दिपक यशवंत भोये	संचालक	श्री. विक्रमसिंह तानाजीराव देसाई	संचालक
श्री. अशोक बबन कोलते	संचालक	श्री. संदीप निवृत्ती चव्हाण	संचालक
श्री. श्रीराम सभाकर केदार	संचालक	श्री. प्रशांत जालिंदर खामकर	संचालक
श्री. जयराम आत्माराम पाटील	संचालक	श्री. सुरेश धोंडू तिटकारे	संचालक
श्री. किशोर सुरेश पाटील	संचालक	श्रीम. ज्योत्स्ना सारंग बाळसराफ	संचालिका
सौ. शोभा विष्णू काटकर	संचालिका	श्री. दिलीप दशरथ तुपे	संचालक
डॉ. धनंजय श्रीमंतराव कच्छवे	संचालक	श्री. भिमा लुमा लेंभे	तज्ञ स्वीकृत संचालक
श्री. बबन जगन्नाथ माने	तज्ञ स्वीकृत संचालक	श्री. दत्तात्रय शंकरराव काकडे	जनरल मॅनेजर

महाराष्ट्र शासनाचा "सहकार भूषण" पुरस्कार प्राप्त संस्था.....
राज्य पतसंस्था फेडरेशनचा "दिपस्तंभ" व "सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था" पुरस्कार प्राप्त संस्था.....

४३ वर्षांची यशस्वी वाटचाल..

॥ सत्फलाय सहकारिता ॥

शिवकृपा सहकारी पतपेढी लि.,मुंबई

नोंदणी क्र.: बी.ओ.एम./आर.एस.आर./एस./१८६२-१९८२

ठळक वैशिष्ट्ये

- महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन चा राज्यातील 'सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था पुरस्कार व दीपस्तंभ पुरस्कार' यासह २० पुरस्कार प्राप्त संस्था
- स्वतंत्र प्रशासकीय कार्यालय, २ क्षेत्रिय कार्यालये, १० विभागीय कार्यालये व १०२ शाखांचा विस्तार
- आपुलकीने वागणारे संचालक मंडळ व कर्मचारी वृंद
- सतत ऑडिट वर्ग 'अ'
- महाराष्ट्रातील आदर्श व अग्रगण्य सहकारी पतसंस्था
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जलद ग्राहक सेवा
- 'शिवम पे' या मोबाईल बँकिंग ॲप द्वारे दैनंदिन आर्थिक व्यवहार व सर्व प्रकारचे बिल भरणा करण्याची सुविधा
- NEFT / RTGS / IMPS सेवा उपलब्ध
- गतिमान प्रशासन

दि. ३० नोव्हेंबर २०२५ अखेरील सांपत्तिक स्थिती

- सभासद : ४,८१,५१०
- वसूल भागभांडवल: १६७ कोटी
- गुंतवणूक : १२५७ कोटी
- निधी : ४०२ कोटी
- ठेवी : ३१२४ कोटी
- कर्जे : २३८९ कोटी
- संमिश्र व्यवसाय : ५५१३ कोटी

अल्प मुदत ठेव योजना

मुदत	व्याजदर
१५ दिवस ते ३० दिवस	४.००%
३१ दिवस ते ४५ दिवस	५.७५%
४६ दिवस ते ८९ दिवस	६.००%
९० दिवस ते १७९ दिवस	६.५०%
१८० दिवस ते ३६४ दिवस	७.००%

शिवसमृद्धी ठेव योजना — मुदत ५०० दिवस — व्याजदर ८.२५ %

शिवसंचय ठेव योजना — मुदत १० महिने दिवस — व्याजदर ८.०० %

दिर्घ मुदत/मासिक प्राप्ती ठेव योजना

मुदत	व्याजदर
१२ महिने पूर्ण व त्यापुढे	७.२५%
२४ महिने पूर्ण व त्यापुढे	७.७५%
३६ महिने पूर्ण व त्यापुढे	८.००%

आवर्त ठेव योजना

मुदत	व्याजदर
६ महिने पूर्ण	२.५०%
एक वर्ष पूर्ण	७.२५%
दोन वर्षे पूर्ण	७.७५%
तीन वर्षे पूर्ण	८.००%

५५०० कोटींहून अधिक संमिश्र व्यवसाय

•स्थावर मालमत्ता तारण कर्ज•
१२.००%



•शिवधन सोने तारण कर्ज•
९.५०% पासून सुरु

*नियम व अटी लागू.

SHIVAM pay
शिवकृपाची मोबाईल बँकिंग सुविधा

* आपले नम्र *

मा. श्री. चंद्रकांत श्री. वंजारी
संस्थापक व उपाध्यक्ष

मा. श्री. गोरख तु. चव्हाण
संस्थापक व अध्यक्ष

संचालक मंडळ

श्री. शिरीष हिं. देशमुख
श्री. सुरेश दि. संकपाळ
श्री. रमेश पां. चव्हाण
श्री. रामदास व. कर्णे (कर्मचारी प्रतिनिधी)
श्री. नरहर वि. देव
श्री. विजय दा. घोरपडे
सौ. पुनम उ. जगदाळे
श्री. राजेश न. शेटे (मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यवाही संचालक)
श्री. बाळासाहेब तु. मोहिते
श्री. संतोष ब. चव्हाण
श्रीमती स्मिता प्र. खराडे
श्री. राजेंद्र वि. पवार
श्री. किशोर पो. माने
श्री. प्रविण गो. पाटील (तज्ञ संचालक)
श्री. हिंदुराव पां. कदम
श्री. ओमकार अ. भोसले
श्री. लक्ष्मण मा. फडतरे (कर्मचारी प्रतिनिधी)

परंपरा सेवेची, विश्वासाची १०० वर्षांची

प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सातारा

मुख्यालय – १२ ब, रविवार पेठ, सातारा.



मा.सौ.पुष्पलता बोबडे
चेअरमन



मा.श्री. संजिवन जगदाळे
व्हा. चेअरमन



संचालक,भागधारक,खातेदार, हितचिंतक व कर्मचारी वृंद

''आपली बँक,आपली माणसं''

ठेवीदार : १ लाखापेक्षा जास्त **कर्जदार : १५ हजार**

- मोबाईल बँकिंग IMPS सुविधा सुरू.
- सर्व शाखांत NEFT, RTGS सुविधा उपलब्ध. IFSC Code : IBKL0485PSS
- आमचे कामकाज चालते मुख्य कार्यालय व १३ शाखांमधून...
- सर्व शाखांत सोनेतारण कर्ज व लॉकर सुविधा उपलब्ध
- आमची बांधिलकी आहे, आमच्या सभासदांशी व ग्राहकांशी...

सांपत्तिक स्थिती (३०/०९/२०२५)

सभासद	: १०,१४७	निधी	: ३९ कोटी, १७ लाख
भाग भांडवल	: ४२ कोटी, ७४ लाख	कर्जे	: ४४२ कोटी, ४६ लाख
ठेवी	: ७०४ कोटी, ४३ लाख	खेळते भांडवल	: ८३२ कोटी, ४८ लाख


मा.श्री.ज्ञानबा ढापरे
संचालक


मा.श्री.नितीन काळे
संचालक


मा.श्री.किरण यादव
संचालक


मा.सौ. निशा मुळीक
संचालिका


मा.श्री.महेंद्र जानुगडे
संचालक, कराड-पाटण


मा.श्री.विशाल कणसे
संचालक, नागठाणे


मा.श्री.नितीन राजे
संचालक, आरळे


मा.श्री.तानाजी कुंभार
संचालक, परळी


मा.श्री.विजय शिर्के
संचालक, जावली


मा.श्री.संजय संकपाळ
संचालक, महाबळेश्वर


मा.श्री.नितीन फरांदे
संचालक, वाई


मा.श्री.विजय ढमाळ
संचालक, खंडाळा


मा.श्री.शशिकांत सोनवलकर
संचालक, फलटण


मा.श्री.राजेंद्र बोराटे
संचालक,गिरवी तरडगांव


मा.श्री.नितीन शिर्के
संचालक, कोरेगांव


मा.श्री. सुरेश पवार
संचालक, रहिमतपूर


मा.श्री.नवनाथ जाधव
संचालक, खटाव


मा.श्री.शहाजी खाडे
संचालक, मायणी


मा.श्री.विजय बनसोडे
संचालक, म्हसवड


मा.श्री. आण्णासाहेब भोसले
मुख्यकार्यकारी अधिकारी

रजि.नं.SAN/DNK/145 दिनांक: २२/०५/१९७९

सांगली जिल्हा सहकार खात्यातील कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्या. सांगली

व्दारा- जिल्हा उपनिबंधकसह.संस्था सांगली यांचे कार्यालय मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, विजयनगर, सांगली

संस्थेची माहिती

सभासद संख्या	५६	वसुल भागभांडवल	५१,८२,०००/-
निधी	२८,२५,०००/-	गुंतवणुक	११,५०,०००/-
कर्जे	७२,८७,०००/-	खेळते भांडवल	८८,९२,०००/-
निव्वळ नफा	४,२१,०००/-		



श्री. सोमनाथ जगन्नाथ साळवी (चेअरमन)

श्री. अशोकवेशव चव्हाण (व्हा.चेअरमन)

श्री.वासुदेव व्यंक्टेश पुराणिक (सेक्रेटरी)



सर्व सभासदांकरिता सोसायटीमार्फत कर्ज सुरक्षेसाठी सहकार संजीवनी फंड कर्ज सुरक्षा योजना चालु केली आहे.

रजि.नं.१२६/१९४१ स्थापना दिनांक: २२/०५/१९४१

सांगली जिल्हा पोलीस को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि. सांगली

व्दारा- पोलीस मुख्यालय, विश्रामबाग, सांगली

संस्थेची माहिती

सभासद संख्या	१८३६	वसुल भागभांडवल	२७ कोटी ४२ लाख
निधी	११ कोटी ७१ लाख	ठेवी	२४ कोटी १ लाख
कर्जे	६४ कोटी १५ लाख	गुंतवणुक	९ कोटी ९ लाख
निव्वळ नफा	३ कोटी ६५ लाख	खेळते भांडवल	७४ कोटी ६७ लाख



श्री.अभिजीत आनंदराव पाटील (चेअरमन)

श्री.प्रशांत दिलीप खेळी (ऑननरी सेक्रेटरी)

सर्व संचालकमंडळ



सर्व सभासदांकरिता सोसायटीमार्फत "पोलीस संजीवनी फंड कर्ज सुरक्षा योजना" मर्यादा ५ लाख रूपये

गतिमान नेतृत्व



सुरेंद्र गुदगे
चेअरमन

कॅशलेस बॅकींग, सीटीएस क्लिअरींग, **RTGS, NEFT**, मोबाईल बॅकींग, संपुर्ण भारतभर एटीएम व हॉटेल्स, मॉल्स, पेट्रोल पंप्स, मोठ्या दुकानातून व नेटवर ऑनलाईन व्यवहारासाठी (E-Com.) चालणारे **डेबीट कार्ड सुविधेसह** व ठेवीस विमा संरक्षण असणारी

ठेवीस आकर्षक व्याजदर देणारी एकमेव विश्वसनीय बॅक

मायणी २७०७२५ व २७०२२५, पुसेगांव २६०३३०
वडूज २३१३२०, दहिवडी २२०५११, पुसेसावळी २४८५१२
सातारा २३३७४९, म्हसवड २७०८९३

शुभेच्छुक :- व्हा. चेअरमन, संचालक, सभासद व सेवकवर्ग

दि मायणी अर्बन को-ऑप. बँक लि., मायणी

स्थापना १५ सप्टेंबर १९८९

।। सहकारातून समृध्दी ।। Reg. No. SAT/KRD/RSR/(CR)/766-89

जोतिर्लिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या;

आणे. ता. कराड, जि. सातारा (फोन नं. ७७२०००२५७३)

E-mail : jotirlingpatane@gmail.com GSTIN / UIN : 27AAAJJ0178Q1ZQ

जोतिर्लिंग स्पेशल मुदत ठेव योजना

मुदत ठेव	मुदत ठेव
२२२ दिवसाकरितां	५५५ दिवसाकरितां
८.१०. %	९.१० %

(मोह नको जास्त व्याजदराचा... आग्रह धरा सुरक्षिततेचा....)

व्यवसाईक व गृह कर्ज योजना



स्वप्नं तुमची.. साथ आमची..

सोने तारण कर्ज



तुमच्या सोन्याचं संपूर्ण संरक्षण...कमीत कमी व्याजदरात झटपट कर्ज मंजूर...

सोने मुल्यांकन रु.९०,०००/-

व्याजदर (वार्षिक) ९%

(दरमहा व्याजदर ७५ पैसे फक्त)

संस्थेची सांपत्तीक स्थिती

* अधिकृत भागभांडवल	- ०३,५६,००,०००/-	ठेवी	- ८४,७७,६८,८३७/-
* वसुल भागभांडवल	- ०३,६३,५८,६००/-	कर्जे	- ६५,५३,९३,७३०/-
* निधी	- १४,७२,४६,७०४/-	एकूण व्यवसाय	- १५०,३१,६२,५६७/-
* बँक गुंतवणूक	- ३८,३२,०६,५२०/-	नफा (३१/०३/२१)	- १,३०,३०,३३३/-

संस्थेच्या स्थावर मालमत्ता नऊ ठिकाणी आहेत. ऑडिट वर्ग 'अ'

३६ वर्षांची विश्वसनीय परंपरा..

१५० कोटी

सलग दोन वर्षे राज्यस्तरीय बँको ब्लू रिबन पुरस्कार प्राप्त संस्था

एकत्रित व्यवसाय टप्पा पूर्ण

आपणच आपल्या संस्थेच्या प्रगतीचे खरे शिलेदार...!

दि गुजराथी

अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., सातारा

मुख्यालय : १५९,भवानी पेठ, शारदा अपार्टमेंट, देवी चौक, सातारा. फोन -०२१६२-२३१८३२





महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा - शाहूपुरी, सातारा आणि मावळा फौंडेशन, सातारा.
आयोजितअखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

श्री. विनोद कुलकर्णी
चेअरमन

९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा

ॲड. चंद्रकांत बेबले
व्हा. चेअरमन

शतकाच्या उंबरठ्यावरल्या
संमेलनास हार्दिक शुभेच्छा

विश्वासाची शतकोत्तर
दैदीप्यमान परंपरा

* स्वमालकीचे मुख्य कार्यालय : १५९, भवानी पेठ, शारदा अपार्टमेंट, राजपथ, देवी चौक,सातारा. फोन.: २३१८३२ * स्वमालकीची सातारा शहर शाखा : 'संजय प्राईड' ७०४ शनिवार पेठ, देवी चौक, सातारा. फोन.: २३९९३२
* शाखा : शाहुपूरी चौक, शाहुपुरी सातारा - फोन : २५१३९३, * शाखा : गजवदन गार्डन, शाहूनगर,सातारा - फोन : २२९११५

स्थापना : ७ मार्च १९६३

जनता सहकारी बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय : १७९, भवानी पेठ, सातारा. फोन नं. ०२१६२-२२७३४६

Website : www.jsbsatara.com Email : ceo@jsbsatara.com

सातारा जिल्ह्याची अर्थवाहिनी व सर्व सामान्यांची बँक

असा नावलौकिक प्राप्त असलेली व
गेली ६२ वर्षे अखंडितपणे
सातारा जिल्हावासियांना
नम्र व तत्पर बँकींग सेवा देणारी बँक



विनोद कुलकर्णी

जेष्ठ संचालक
चेअरमन, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट
भागधारक पॅनेल प्रमुख



अमोल मोहिते

चेअरमन

बँकेची ठळक वैशिष्टये :

- बँको या संस्थेचा उत्कृष्ट ग्राहकसेवा पुरस्कार प्राप्त
- रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांप्रमाणे FSWM चे सर्व निकष मागील सलग दोन आर्थिक वर्ष पूर्ण
- नेट एन.पी.ए. 0%
- कार्यक्षेत्र – संपुर्ण सातारा व पुणे जिल्हा
- अद्यावत संगणक प्रणालीद्वारे सर्वोत्तम ग्राहक सेवा
- लवकरच अत्याधुनिक बँकिंग सेवेसह पुण्यामध्ये शाखा विस्तार

९१ व्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा

सर्व संचालक मंडळ सदस्य, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य, अधिकारी व कर्मचारी वृंद